श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.४/२०२१ दिनांक १२.१०.२०२१
स्थळ- साईनिवास अतिथीगृह वेळ-सकाळी ११.०० वाजता

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दि. ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दिनांक १२/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित केली असलेबाबत जा.नं.आस्था/४३७/२०२१,जिल्हा न्यायालय, अहमदनगर, दि.०८.१०.२०२१ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदरहु सभा मंगळवार दिनांक १२/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. न्या. सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
२. मा.श्रीमती भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
३. मा.श्री.भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
४. मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

विषय नं.०१ दि.३१.०७.२०२१ व दि. ०६.०८.२०२१ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.१६३ दिनांक ३१.०७.२०२१ व दि. ०६.०८.२०२१ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

विषय नं.०२ चक्रिय पध्दतीने निर्णय दिलेले विषय वाचून कायम करणे.
श्री साईबाबा महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्राध्यापक पदभरतीकामी स्थानिक निवड समितीचे गठन करणेबाबत. (श्री साईबाबा महाविद्यालय)

निर्णय क्र.१६४ श्री साईबाबा महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्राध्यापक पदभरतीकामी स्थानिक निवड समितीचे गठन करणेबाबत चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या विषयावरील निर्णयाचे अवलोकन करण्यात येऊन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

विषय नं.०३ तदर्थ समितीच्या दि. 06/08/2021 रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ठेवावयाचा विषय -
दिनांक 31/07/2021 रोजीच्या तदर्थ समितीच्या सभेत विषय क्र. 27 वरील निर्णयानुसार समाधी मंदिराचे दक्षिण भिंतीला असणा-या खिडक्या व दरवाजास बुलेटप्रुप काचा बसवायच्या किंवा नाही याची पाहणी करण्याकरिता तसेच श्री. साईबाबांचे समकालीन यांचे फोटोंचे नूतनीकरणाचा विषय, विषयसुचीमधील विषय क्र. 67 चर्चेसाठी येणार असल्यामुळे तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्या श्रीमती

बनकर यांनी सभा संपल्यानंतर श्रींचे समाधी मंदिराची पाहणी केली. त्यावेळेस हॉलमध्ये मध्यभागी उत्तर बाजुला पॅरापेट वॉल भिंत तोडून बांधकाम चालू असल्याचे निदर्शनास आले. दिनांक 02/08/2021 रोजी सकाळी तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी भ्रमणध्वनीद्वारे त्याबाबत विचारणा केली. त्यांना सदरहू कामास तदर्थ समितीची मंजूरी नसल्याने ते काम थांबविण्यास व त्याचे फोटो पाठविण्याची विनंती केली. तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याप्रमाणे कामकाज थांबविल्याचा संदेश व एक फोटो अध्यक्ष यांना व्हॉटसॲपवर पाठविला.

अशी तक्रार आली आहे की, कोरोना विषाणू महामारीच्या काळात अशी अनेक कामे विनापरवानगी करण्यात आली आहेत. अशा कामांची माहिती अध्यक्ष यांना मिळालेली आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे:-

अ.नं.	तपशील
1.	श्री साईबाबा मंदिरालगत पारायण कक्षाची भिंत पाडून त्याचे विलिनीकरण करुन हॉल बनवणे, हा विषय (दि.19/06/2021च्या सभेत कायम झालेला निर्णय क्र.1/82) चक्रीय पध्दतीने दि.06/01/2021रोजी चक्रीय पध्दतीने सादर करण्यात आलेला होता व त्या विषयावर 2 विरुध्द 2 अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वीत झालेले आहे.
2.	श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करण्यासाठी सदर हॉलमध्ये फर्नीचर व इंटेरीयर कामे करण्यासाठी अपेक्षित रक्कम रु.8,65,000/- चे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामी निविदा काढण्यासाठी मान्यतेसाठी प्रस्ताव दिनांक 06/01/2021 रोजी चक्रीय पध्दतीने आणलेला होता, त्यावरील निर्णय (दि. 19/06/2021 च्या सभेत कायम झालेला निर्णय क्र. 1/83) 2 विरुध्द 2 अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वीत झालेले आहे.
3.	दिनांक 14/05/2021 रोजी अक्षय तृतीयेचे दिवशी प्रसादालयात अन्नपूर्णामातेची मूर्ती बसविण्यात आली.

उपरोक्त कामे, पी.आय.एल. क्र. 120/2019 मधील मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन असल्याचा आरोप आहे. तदर्थ समितीचे काम देखरेख ठेवणे व असे जर उल्लंघन झालेतर त्याचा अहवाल मा. उच्च न्यायालयात सदरहू प्रकरणात सादर करणे, हे आहे. याबाबत तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी या अगोदरच दिनांक 02/08/2021 च्या जा. क्र.258 च्या पत्रान्वये अशा सिव्हील कामाची माहिती तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून मागविणेत आलेली आहे. तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून दिनांक 14/8/2021 च्या क्र.एसएसएसटी/बांधकाम/1635/2021 या पत्राने काही कामांची माहिती अध्यक्ष यांना प्राप्त झालेली आहे या सर्व बांधकामाबाबत.

निर्णय क्र.१६५ यावर सविस्तर चर्चा झाली, तदर्थ समितीपुढे न आणता, आणीबाणीची परिस्थिती नसतांना तसेच चक्रिय पध्दतीने देखील समितीपुढे न आणता ही जी कामे करुन घेतली आणि अन्नपुर्णा देवीची मुर्ती बसविण्याच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असतांना तो घेतला नाही. कार्योत्तर परवानगीसाठी देखील तदर्थ समितीपुढे विषय आणला नाही. या गोष्टींना तदर्थ समितीची मान्यता नाही. पीआयएल १२०/२०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरुध्द सदर खर्च करण्यात आला व कामे करण्यात आली. म्हणून सदरहु विषयाबाबत मा.उच्च न्यायालयापुढे अहवाल सादर करावा. सदर बाबतीतचा अहवाल मा.अध्यक्ष, मा.उच्च न्यायालयाकडे पाठवतील. असा निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.०४ तदर्थ समितीच्या दि. 06/08/2021 रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ठेवावयाचा विषय -

दि.31/07/2021 रोजी तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्या श्रीमती बनकर यांनी कोव्हीड-19 च्या नियमांचे उल्लंघन करुन श्रींचे मंदिरात प्रवेश केल्याबाबत बातमी, अध्यक्ष व सदरच्या सदस्या यांच्या छायाचित्रासह समाज प्रसार माध्यमात प्रसारीत केलेली आहे. तदर्थ समितीचे अध्यक्ष व या सदस्या मंदिर परिसरात त्यांच्या वाहनातून उतरुन आंत जातानाचे सीसीटीव्ही फुटेज देखील समाजप्रसार

माध्यमात प्रसारीत करण्यात आले. दिनांक 02/05/2018 रोजी पारीत निर्णय क्र. 318 दि. 01/06/2018 चे व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेत दुरुस्तीसह कायम करुन त्यान्वये सीसीटीव्ही फुटेज त्रयस्त इसमांना देण्यास बंदी घातलेली आहे. त्यामुळे ही तक्रार तदर्थ समितीचे अध्यक्ष यांच्याकडे आल्यावरुन त्यांनी दि. 03/08/2021 रोजी जा.क्र. 260/2021 प्रमाणे तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती केली की, त्यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र ठाकरे यांच्यामार्फत संबंधीतांचे जबाब नोंदवून अध्यक्ष यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. ते अध्यक्ष यांचेकडेस प्राप्त झाले,त्याबाबत.

निर्णय क्र.१६६ यावर सविस्तर चर्चा झाली, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र ठाकरे यांच्यामार्फत संबंधीतांचे जबाब नोंदवून अध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

विषय नं.०५ तदर्थ समितीच्या दि. 06/08/2021 रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ठेवावयाचा विषय –

तदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे अशी तक्रार प्राप्त झाली की, संस्थेचे काही अधिकारी व काही कर्मचारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्थ व्यवस्था, शिर्डी, सेवा (वर्तनणूक) विनिमयाचे कलम 6 व 15 चे उल्लंघन करुन समाज प्रसार माध्यमावर भाग घेतात आणि तदर्थ समितीचे कामकाजाबाबत टिपणी करत आहेत त्यामुळे संस्थानचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदर नियमांचे उल्लंघन करु नये असे स्मरण करुन देण्यासाठी तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रक काढावे. तसेच या परिस्थितीत मा. उच्च न्यायालयाने पी.आय.एल. 120/2019 मध्ये श्री. साईबाबा संस्थानचे व्यवस्थापनासाठी दि. 09 ऑक्टोबर, 2019 रोजी स्थापना केल्यापासून संस्थानचे जे अधिकारी व कर्मचारी यांनी समाज प्रसार माध्यमामध्ये भाग घेतला याची चौकशी करतांना तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी हे मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे अधिनस्त सायबर गुन्हे पोलीस अधिकारी यांचेमार्फत मटेरिअल गोळा करतील व मा. अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचेकडे सादर करतील. त्यावरुन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत गोपनिय अहवाल, तदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे सादर करतील,याबाबत.

निर्णय क्र.१६७ यावर सविस्तर चर्चा झाली. सदरील निर्णय कायम करण्यात आला. अहवाल मा.अध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात आलेला नाही. आता अंमलबजावणी होऊन अहवाल तदर्थ समितीचे अध्यक्ष किंवा शासनाने नियुक्त केलेले अध्यक्ष यापैकी जो कोणी कार्यरत राहतील त्यांचेकडे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०६ तदर्थ समितीच्या दि. 06/08/2021 रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ठेवावयाचा विषय -

संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम याविषयी संस्थानने जो प्रारुप तयार केलेला आहे त्यास अंतिम मंजुरी मिळणे बाकी आहे. तरीही संस्थाननेच हा प्रारुप तयार केलेला असल्याने त्यातील प्रस्तावित नियम, नियमावली व विनिमय यांचा प्रायोगिक तत्वावर अंमल केल्यास त्यात काय अडचणी येवू शकतात याची माहिती संस्थान प्रशासनाला मिळणार आहे आणि ही माहिती सदरहू प्रारुपाचे स्वरुप अंतिम करतांना उपयोगी ठरु शकते. म्हणून सस्थानचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांचा याद्वारे कोणताही हक्क निर्माण न करता त्याची अंमलबजावणी करता येईल. संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम याविषयी संस्थानने जो प्रारुप तयार केलेला आहे त्यामध्ये प्रस्तावीत केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव इत्यादि प्रमाणे सद्या विविध विभागाचे प्रभारी प्रमुख व इतर महत्वाचे पदावरील प्रभारी कर्मचारी कार्यरत आहेत काय? याचा सविस्तर खुलासा तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्षांकडे सादर करावा. त्यांनी सदरहू प्रारुपातील प्रस्तावीत पध्दतीचा अवलंब करुन सर्व प्रभारी विभाग प्रमुखांचा (हॉस्पीटल्स,आय.टी.आय., शैक्षणिक संस्था यांसह) व महत्वाचे पदांचा प्रभारी म्हणून जोपर्यंत त्या पदावर नियमित नियुक्ती होत नाही तोपर्यंत किंवा समितीचा पुढील आदेश होईपर्यंत कार्यभार ठेवण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा व सद्या प्रभारी पदावर कार्यरत असलेले कर्मचारी जे शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव या निकषात बसत नाहीत

त्यांचा पदभार काढून घेण्याचा प्रस्ताव व त्यांचे जागी सदरचे निकषात बसणारे कर्मचा-यांकडे प्रभारी पदभार ठेवण्याचा प्रस्ताव एका आठवडयाचे आंत अध्यक्ष, तदर्थ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे पाठविण्यात यावा, याबाबत.

निर्णय क्र.१६८ यावर सविस्तर चर्चा झाली. सेवाप्रवेश नियम खालील सुचविलेल्या सुचनांसहीत बदलांसह शासनाकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आली.

अ) प्रस्तावीत मसुद्यामध्ये आठ सदस्यांची निवडसमिती शिफारस करण्यात आलेली आहे. संख्या कमी करुन खालील प्रमाणे समितीची शिफारस करण्यात येत आहे.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी हे समितीचे अध्यक्ष असतील.

२. व्यवस्थापन समिती सदस्यांपैकी नामनिर्देशीत केलेला एक सदस्य.

३. कार्यकारी अधिकारी यांनी नामनिर्देशीत केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी- सदस्य.

४. संबंधीत विषयतज्ञ म्हणून एक सदस्य.

५. संस्थानचे मुख्यलेखाधिकारी हे समितीचे सदस्य सचिव असतील.

ब) भरतीप्रक्रिया राबवितांना ऑनलाईन अर्ज मागविण्यात यावेत. आलेल्या अर्जामधुन शैक्षणिक पात्रता, आरक्षण नियमानुसार १/१० प्रमाणात शार्टलिस्ट करुन स्क्रिनींग टेस्ट घेण्यात यावी. स्क्रिनींग टेस्टमध्ये संबधीत पदानुसार विषय समाविष्ट करण्यात यावेत. परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधुन आरक्षणाचे सर्व नियम विचारात घेऊन तांत्रिक पदांसाठीचे परिक्षेकरीता १/५ प्रमाणात उमेदवार बोलविण्यात यावेत. मौखीक परिक्षेसाठी १/३ प्रमाणात आरक्षणाचे सर्व नियम विचारात घेऊन उमेदवारांना बोलाविण्यात यावेत.

लिपीक वर्गीय पदभरती संबधाने जेथे जेथे मराठी किंवा इंग्रजी टंकलेखनाचा उल्लेख करण्यात आलेला आहे तेथे तेथे मराठी आणि इंग्रजी अशी दुरुस्ती करण्यात यावी. जेथे एमएसआयटी परिक्षेचा उल्लेख आहे तेथे आणखीचा मजकुर 'किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे' असा मजकुर टाकण्यात यावा.

नामनिर्देशनाने पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीच्या बाबतीत विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्यास किंवा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्याची तरतुद नसेल तर सदर विभागीय परिक्षा 'दोन वर्षामध्ये' उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल, हा मजुकर समाविष्ठ करण्यात यावा.

पदोन्नती प्रक्रिया राबवितांना भरावयाच्या पदासाठी पात्रता धारण करणारे उमेदवारांपैकी सेवाजेष्ठतेनुसार एका पदासाठी तीन या प्रमाणात उमेदवारांचा विचार करण्यात यावा, प्रसंगी विशीष्ठ परिस्थितीत एका पदासाठी पाच या प्रमाणात उमेदवारांचा विचार करण्यास अनुमती राहिल. पदोन्नती प्रक्रिया राबवितांना शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक राहिल.

भाषा परिक्षा व प्रशिक्षणाचे बाबतीत नियम सात (क) मध्ये सेवा प्रवेश पुर्व/ 'आणि किंवा' ऐवजी फक्त 'आणि' शब्द ठेवण्यात यावा.

सेवा प्रवेश नियम सेवांचे वर्गीकरण नियम २०२० अनुसुचीमध्ये परिच्छेद क्र. ३ मध्ये जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर देखील देण्याची तरतुद करण्यात यावी.

सेवा प्रवेश नियम सेवांचे वर्गीकरण नियम २०२० अनुसुचीमध्ये परिच्छेद क्र. १९ मध्ये सदर परिक्षा 'दोन वर्षाचे' कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, असे नमुद करावे.

वरील प्रमाणे दुरुस्त्यांना/बदलांना तदर्थ समितीने मान्यता दिली. सेवाप्रवेश नियमात सुचविलेल्या सुचनांसहीत बदलांसह शासनाकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आली.

वरील सेवाप्रवेश नियमास शासनाची मान्यता मिळेपर्यंत सध्या पदोन्नतीचे बाबतीत प्रायोगिक तत्वावर उपरोक्त सेवा प्रवेश नियमावलीची शिफारस करण्यात येत आहे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०७ दि. 01.04.2020 ते 31.07.2020 अखेर कालावधीत करण्यात आलेली सिव्हील बांधकामे.

कोरोना महामारीचे काळात केलेली सिव्हील बांधकामे (1) शांतीनिवास इमारत पश्चिम बाजुकडील जनरल टॉयलेटचे बाहेरील भिंतीस स्टोन क्लॅडींग करणे. (2) समाधी मंदिर परिसरातील पारायण हॉल व

मिटींग हॉल लगतचे पूर्व बाजुकडील ओपन टू स्काय भागवावर आरसीसी स्लॅब टाकणे. (3) संस्थानचे साई सभागृह व्ही.आय.पी.रुम/विश्वस्त कक्ष क्र.1 व 2 मध्ये अंतर्गत फेरबदल व नूतनीकरण करणे तसेच साई सभागृह येथील उत्तर-पूर्व कोप-यातील रुममध्ये मान्यवरांकरिता टॉयलेटचे बांधकाम करणे. (4) लाडू प्रसाद निर्मिती विभागातील बुंदी किचन शेडमधील फ्लोरींगकरिता पॉलीशड कोटा फरशी बसविणेबाबत. (5) साई सभागृह हॉलसमोर आरसीसी कॉरीडॉर स्लॅबचे छत करणे. (6) श्री. साईप्रसादालयात अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओटयाचे बांधकाम करणे. (7) श्री साईप्रसादालय येथील बुंदी लाडू किचन व अन्नदान हॉलमध्ये ग्रेनाईट ओटा तयार करणे. (8) श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय संचालक यांचे दालनाचे नूतनीकरण करणे. (9) समाधी मंदिर परिसरातील व्हीआयपी कक्ष क्र. 3 व 3 मधील मोकळया पॅसेजवर आरसीसी स्लॅब टाकणे. (10) समाधी मंदिर परिसरातील व्हीआयपी कक्ष व जनसंपर्क कार्यालय मधील मोकळया पॅसेजवर आरसीसी स्लॅब टाकणे तसेच सदरहू इमारतीचे छतावर जाणेसाठी आरसीसी जिना तयार करणे. (11) समाधी मंदिरातील तळघरातील कॅश काऊंटींग हॉलचे पूर्व बाजूकडील जिन्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकण्याचे काम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांचेकडून व फ्लोअरींगसाठी मार्बल बसविण्याचे काम जय भवानी ग्रेनाईट ॲण्ड टाईल्स, साकुरी यांचेकडून देणगीदाखल करुन घेणे. ही सर्व कामे श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट (शिर्डी) ॲक्ट, 2004 नुसार आणि मा. उच्च न्यायालयाचे पी.आय.एल. 120 सन 2019 मधील आदेशानुसार तदर्थ समितीची मान्यता न घेता केल्याबाबत.

निर्णय क्र.१६९ यावर सविस्तर चर्चा झाली, तदर्थ समितीपुढे न आणता, आणीबाणीची परिस्थिती नसतांना तसेच चक्रिय पध्दतीने देखील समितीपुढे न आणता या प्रस्तावातील अ.नं ३,४,५,६,७,१०,१२,१४,१६,१७, व १८ ही कामे व विषय क्र.३ मधील अ.नं.२ व ३ ची कामे करुन घेतली. आणि अन्नपुर्णा देवीची मुर्ती बसविण्याच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असतांना तो घेतला नाही. कार्योत्तर परवानगीसाठी देखील तदर्थ समितीपुढे विषय आणला नाही. या गोष्टींना तदर्थ समितीची मान्यता नाही. पीआयएल १२०/२०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरुध्द सदर खर्च करण्यात आला व कामे करण्यात आली. म्हणून सदरहु विषयाबाबत मा.उच्च न्यायालयापुढे अहवाल सादर करावा. सदर बाबतीतचा अहवाल मा.अध्यक्ष, मा.उच्च न्यायालयाकडे पाठवतील. असा निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.०८ श्री. बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनीस, श्री साई प्रसादालयविभाग यांचा खाते निहाय चौकशी दरम्यान न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवा निलंबन शिक्षा रद्द करुन त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा अपिल अर्ज.

निर्णय क्र.१७० यावर सविस्तर चर्चा झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील विषय आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचे अधिकारामध्ये निर्णय घेणे अपेक्षित आहे. तरी सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०९ सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दि.०१.०७.२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनाकडे दि.१४.०७.२०२० रोजी प्राप्त पत्र.

निर्णय क्र.१७१ यावर सविस्तर चर्चा झाली. सुनिल जोसेफ गायकवाड यांनी केलेल्या तक्रार अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर चौकशी करुन योग्य तो निर्णय घ्यावा, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१० कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या ५९८/५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जुलै-२०२१, ऑगस्ट-२०२१ व श्रींचे मंदिर भक्तांसाठी दर्शनास खुले होईपर्यंत तात्पुरत्या सेवा खंडीत कालावधीतील मानधन मानवतेच्या दृष्टीकोनातून अदा करणेबाबत.

निर्णय क्र.१७२ मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचा अभ्यास करणे तसेच या संदर्भातील शासन निर्णय पाहणे आवश्यक आहे, सबब तहकुब. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.११ संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्र येथील श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी कर्मचारी यांचा मुदतवाढ व वेतनवाढ मिळणेबाबतचा दि.०१.०७.२०२१ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.१७३ यावर सविस्तर चर्चा झाली. नियमित विषय असल्याने मंजुर. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१२ कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चे कालावधीतील माहे मार्च-२०२० व माहे एप्रिल-२०२० चे ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत.

निर्णय क्र.१७४ पुढील बैठकीत ठेवावे. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१३ श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवण्यात आलेला ठपका रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५/०६/२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.

निर्णय क्र.१७५ यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक यांनी केलेल्या अपिल अर्जाबाबत त्यांना सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना पुढील बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.१४ श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल), वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे दि.१२.११.२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.

निर्णय क्र.१७६ यावर सविस्तर चर्चा झाली. श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता यांनी केलेल्या अपिल अर्जाबाबत त्यांना सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना पुढील बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.१५ श्री. भारत एकनाथ सोनवणे (सध्या सेवा निलंबीत) वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.१७७ यावर सविस्तर चर्चा झाली. सदरची बाब ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील असल्याने या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.१६ श्री. संजय रामदास राऊत, (सध्या सेवा निलंबीत) वर्ग-४ कर्मचारी, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.१७८ यावर सविस्तर चर्चा झाली. सदरची बाब ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील असल्याने या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.१७ श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे (सध्या सेवा निलंबीत) सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.१७९ यावर सविस्तर चर्चा झाली. सदरची बाब ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील असल्याने या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.१८ श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभागयांचे खातेचौकशी दि.०७.०५.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.१८० यावर सविस्तर चर्चा झाली. श्री.किशोर साहेबराव गवळी यांनी केलेल्या अपिल अर्जाबाबत त्यांना सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना पुढील बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.१९ श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दि.०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.१८१ यावर सविस्तर चर्चा झाली. श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक यांनी केलेल्या अपिल अर्जाबाबत त्यांना सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना पुढील बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.२० श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई आश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दि.१५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.१८२ यावर सविस्तर चर्चा झाली. श्री.विठ्ठल तुकाराम पवार यांनी केलेल्या अपिल अर्जाबाबत त्यांना सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना पुढील बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.२१ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईबाबा भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक २०.०७.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.१८३ यावर सविस्तर चर्चा झाली. श्री.विठ्ठल तुकाराम पवार यांनी केलेल्या अपिल अर्जाबाबत त्यांना सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना पुढील बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. तहकुब. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/वशी-शिस्त)

विषय नं.२२ इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टर बॅट-या खरेदी करणेसाठी येणा-या खर्चास तसेच विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१८४ यावर सविस्तर चर्चा झाली. मंजुर. (कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.२३ श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यास आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरीता २४० स्केअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१८५ तहकुब.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.२४ संस्थानच्या निधीतून शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.उर्जा गॅसीफायर्स प्रा.लि.गोरखपुर (उ.प्र.) यांचेशी चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१८६ तातडीचे नसल्याने तहकुब.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.२५ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील रुग्णांना ने-आण करणेकामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्चास आणि कंपनी/अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१८७ सदरचा विषय तातडीचा नसल्याने तहकुब.

(कार्यवाही-वाहन विभाग)

विषय नं.२६ आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१८८ प्रस्ताव मंजूर. अर्ज नस्तीबध्द करण्यात यावे.

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.२७ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील RTE 25% प्रतिपुर्ती करीता संस्थानच्या नावाने पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी येथे स्वतंत्र बचत खाते उघडणेबाबत.

निर्णय क्र.१८९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.२८ श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजुकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी येणा-या अंदाजे रु.१९,३८,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.१९० मा.अध्यक्ष व समिती सदस्या यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.२९ श्री साईबाबा संस्थानकरीता केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजनेअंतर्गत विकास कामांसाठी निधी प्राप्त करुन घेणेकामी सल्लागार राज्य शासन व केंद्रशासनाकडे विस्तृत प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) सादर करणेबाबत.

निर्णय क्र.१९१ तातडीचा विषय नसल्याने तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३० संस्थानमार्फत करणेत येणारे बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्ला सेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेबाबत.

निर्णय क्र.१९२ तातडीचा विषय नसल्याने तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३१ दि.०६.०८.२०२१ रोजी झालेल्या तदर्थ समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.१६ वरील निर्णय क्र.१५९ चे कार्यवाहीबाबत.

निर्णय क्र.१९३ सदर विषयावर उपरोक्त निर्णय क्र.१६५ प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३२ संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावात गोदावरी उजवा तट कालव्यामधुन पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सल्लागार दि निसर्ग कन्सल्टंन्सी, नाशिक यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.१,९६,२८,३७८/-मात्रचे खर्चास तसेच याकामी मा.तदर्थ समितीचे मान्यतेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन सदर मान्यतेनंतर याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१९४ विस्तृत माहितीसह पुढील बैठकीत सादर करावे. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३३ श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जनरल ओ.टी.नं.१ व २ या दोन ओटीचे नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.६,०५,७५०/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१९५ सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीमध्ये सादर करावा. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३४ साईभक्तांना मंदिर परिसरात आगमन निर्गमन करणे सोईचे व्हावे व सुलभरित्या माहिती व्हावी याकरीता मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दाराचे नावात बदल केलेप्रमाणे पितळी अक्षरात नविन बोर्ड तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी निम्नतम दराचे निविदाधारक यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१९६ तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३५ संस्थान निधीतून बांधण्यात आलेले राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्सट्रक्शन ॲन्ड इंफ्रास्ट्रक्चरल लि.पुणे यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करणे व संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव जमा करणेबाबत.

निर्णय क्र.१९७ ५० लाखापेक्षा जास्त रकमेचा विषय असल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सी.ए.दाखल करण्याची गरज पडू नये म्हणून पुढील बैठकीत विस्तृत माहितीसह ठेवण्यात यावे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.३६ महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

निर्णय क्र.१९८ ५० लाखापेक्षा जास्त रकमेचा विषय असल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सी.ए.दाखल करण्याची गरज पडू नये म्हणून पुढील बैठकीत विस्तृत माहितीसह ठेवण्यात यावे.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.३७ संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यएसआर नं.०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर, भाग श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१.०१.२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबधीत जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना अदा करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील पत्र क्र.न.पं./टे-०८/९२१ दि.२५.०५.२०२१.

निर्णय क्र.१९९ ५० लाखापेक्षा जास्त रकमेचा विषय असल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सी.ए.दाखल करण्याची गरज पडू नये म्हणून पुढील बैठकीत विस्तृत माहितीसह ठेवण्यात यावे.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.३८ शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मिटर रुंदीकरण भूसंपादन एलएक्यएसआर नं.२१/२००३ दि.२५.११.२००३ यामध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं. (भूसंपादन निर्देश अर्ज) ४/२००४ व ५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

निर्णय क्र.२०० पुढील बैठकीत आजचे सभेतील विषय क्र.३७ सह ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.३९ शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी.रुंदीकरण संबधीत भूसंपादन एलएक्युआर नं.२१/२००३ दि.२५.११.२००३ यामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश, वरिष्ट स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं. ३/२००४ (भूसंपादन निर्देश अर्ज) मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

निर्णय क्र.२०१ पुढील बैठकीत आजचे सभेतील विषय क्र.३७ सह ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.४० शिर्डीतील गोरगरीब नागरीकांसाठी फुड पॅकेट अथवा भोजन व्यवस्था सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.२०२ शासन निर्णयानुसार आता मंदिर दर्शनासाठी खुले झाले असल्यामुळे याविषयावर विचार करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब नस्तीबध्द करण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

विषय नं.४१ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा तिमाही पहाणी अहवाल अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

निर्णय क्र.२०३ पुढील बैठकीत सादर करावे. (कार्यवाही-आरोग्य विभाग)

विषय नं.४२ मे.व्हि.एम.डिस्ट्रीबुटर्स, नाशिक यांचा दुध पुरवठा आदेश रद्द करणे व दुध खरेदीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणेबाबत.

निर्णय क्र.२०४ दुध खरेदीसाठी तात्पुरती परवानगी दिलेली आहे. विषयाची व्याप्ती लक्षात घेता सदरचा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

विषय नं.४३ डॉ.हरिष हुकुमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, हृदयविकार तज्ञ (निलंबीत) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.२०५ यावर सविस्तर चर्चा झाली. सदरची बाब ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील असल्याने या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.४४ रुग्णालये विभागातील वार्षिक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाची विभागीय चौकशी होणेबाबत.

निर्णय क्र.२०६ यावर सविस्तर चर्चा झाली. सदरची बाब ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील असल्याने या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.४५ बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत.

निर्णय क्र.२०७ धोरणात्मक निर्णय आहे. तहकुब. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.४६ नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता Transport Ventilator खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.२०८ निम्नतम दरधारकास चर्चा वाटाघाटी करीता पुढील बैठकीत बोलाविण्यात यावे.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.४७ संस्थान व्यवस्थापनामार्फत सन 2022 (दि.01 जानेवारी, 2022 ते दि. 31 डिसेंबर, 2022) अखेरचे कालावधीकरिता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२०९ विषयाची निकड लक्षात घेता व दि.०४.१०.२०२१ रोजी मा. उच्च न्यायालयाने प्रलंबीत सी. ए. निकाली काढतांना दिलेल्या निर्देशानुसार सदरचा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

विषय नं.४८ पोलीस निरीक्षक, साईमंदिर सुरक्षा, शिर्डी यांचे दि.०१.०९.२०२१ च्या चौकशी अहवालाचे वाचन करणे, अहवालानुसार निष्पन्न झालेले संस्थानचे कर्मचारी (१) श्री. राजेंद्र जगताप, प्रभारी प्रशासकीय विभाग प्रमुख (२) श्री.अजित जगताप (३) श्री.सचिन गव्हाणे (४) श्री.राहुल फुंदे (५) श्री.विनोद कोते, (सी.सी.टी.व्ही.विभाग प्रमुख) व (६) श्री.चेतक साबळे यांनी व्हिडीओ क्लिप व फोटो संस्थानचे बाहेर पत्रकारांना पाठवले, तसेच श्री साईबाबा समाधी मंदिर सुरक्षेस वरील संस्थान कर्मचारी यांचेपासून धोका होऊ शकतो असा अहवाल आहे. या विषयी सविस्तर चर्चा करुन पुढील निर्णय घेणे.

निर्णय क्र.२१० यावर सविस्तर चर्चा झाली. श्री.रविंद्र ठाकरे यांनी असे सांगीतले की, 'तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार पोलिस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी यांना पत्र दिलेले आहे, परंतु सदर तपासणीमध्ये कुठलाही हस्तक्षेप केलेला नाही, भविष्यात मा.अध्यक्ष यांचे पुर्वपरवानगीशिवाय मी कुठलीही कार्यवाही करणार नाही, असे लेखी दिलेले आहे. मी अध्यक्ष साहेब यांची लेखी स्वरुपात माफी मागत आहे.' त्यामुळे त्यांचे विरुध्द असलेले शेरे वगळण्यात येत आहेत.

श्री.हर्षवर्धन गवळी, पोलीस निरीक्षक, मंदिर सुरक्षा, शिर्डी यांचे दि.०१.०९.२०२१ रोजीचे तपासणी अहवालावरुन पोलीस स्तरावर कारवाई सुरु झालेली आहे. प्रशासकीय स्तरावर त्यांचा अहवालाचे आधारे आवश्यक शिस्तभंग विषयक कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

या प्रकरणात शिस्तभंग विषयक कार्यवाही पुर्ण होईपर्यंत श्री. राजेंद्र सोपान जगताप , श्री.विनोद कोते,चेतक साबळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लेखी परवानगी शिवाय समाधी मंदिरात प्रवेश करु नये. तसेच त्यांना राजशिष्टाचार व्यवस्थापनापासून दुर ठेवण्यात यावे. कंत्राटी कर्मचारी राहुल फुंदे यांना संस्थानचे कामकाजातून काढून टाकणेबाबत संबधीत ठेकेदारास पत्र देण्यात यावे.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

विषय नं.४९ श्री. राजेंद्र सोपन जगताप, प्रभारी प्रशासकीय अधिकारी यांचे विरुध्द सेशन केस नं.३१/२०२१ कोपरगाव येथील सत्र न्यायालयात दाखल आहे. तसेच शिर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नं.२४९ सन २०१८ चा भा.दं.वि.कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे दाखल आहे. अशा पार्श्वभूमिवर संस्थानला भेट देणा-या मान्यवरांचे विशेषत: मा.उच्च न्यायालयाचे व मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचे सत्कार त्यांचे हस्ते केले जाता व फोटो काढले जातात ही गंभीर बाब आहे व सर्वथा राजशिष्टाचाराच्या प्रचलित नियमांचे विरुध्द आहे. याबाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे.

निर्णय क्र.२११ विषय क्र.४८ मध्ये सविस्तर चर्चा झाली आहे. त्या व्यतिरिक्त शिर्डी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं.२४९ सन २०१८ची कागदपत्रे मागवून घेऊन त्यात कथीत वर्तणूकीबाबत शिस्तभंग विषयक कारवाई करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग-वशी-शिस्त)

विषय नं.५० श्री साईबाबा समाधी मंदिरासमोरील भूमिगत कॅश काऊटींग हॉलचे जिन्यावरील काही भागात स्लॅब टाकणे व त्यासंबंधीची अनुषंगीक कामे करणेबाबत या विषयाचे दि.०१.०९.२०२१ चे पत्र क्र.एसएसएस/ वशी-मु.का.अ.स्वीय/१८९३/२०२१ हे काम तदर्थ समितीच्या पूर्वपरवानगीशिवाय वास्तुमधील संरचनात्मक बदल केल्यासंबधीचे असल्याने त्यावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.२१२ सदर विषयावर उपरोक्त निर्णय क्र.१६५ प्रमाणे अहवाल पाठविणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.५१ दि.०४.०९.२०२१ रोजी विशेष लेखापरिक्षणासाठी रु.७०,०००/- व अधिकची रक्कम खर्च करण्याचा घेतलेला निर्णय हा जा.नं.एसएसएस/वशी-०४/१९३५/२०२१ दि.४ सप्टेंबर,२०२१ या पत्रातील कथनाशी विसंगत आहे, त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.२१३ सदर विषयावर उपरोक्त निर्णय क्र.१६५ प्रमाणे अहवाल पाठविणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.५२ निलंबीत मानलेल्या संस्थानच्या नियमीत सेवेतील व कंत्राटी पध्दतीने, बाहेरील यंत्रणेव्दारे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे बाबतीत त्यांनी शिस्तभंग केल्याबद्दलच्या अपेक्षित कारवाईबाबत.

निर्णय क्र.२१४ विषय क्र.४८ मध्ये हा विषय समाविष्ठ केलेला आहे. त्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.५३ दि.१४ आक्टोंबर, २०२१ ते दि.१७ ऑक्टोंबर, २०२१च्या दरम्यान साज-या होणा-या श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाची तयारी, नियोजन व व्यवस्थापनाबाबत.

निर्णय क्र.२१५ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्तावातील अ.नं.१ पुर्वीच मंजूरी दिलेली आहे. अ.नं.२ प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मान्यता दिली. अ.नं.३ प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्यता दिली.अ.नं.४- गुरुपोर्णीमा उत्सवाप्रमाणे मंदिर परिसरात व भिक्षाझोळी मागील वर्षीप्रमाणे चार ठिकाणी काऊंटरवर करणे. सिमोलंघन सांकेतीक पध्दतीने करण्यात यावे. अ.नं.५ ते १७ मध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. अ.नं.१८ पुर्वीच मंजूरी दिलेली आहे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगी आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. मे.व्हि.एम.डिस्ट्रीबुटर्स, नाशिक यांचेकडून दूध खरेदी करणेचे बंद केल्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून दूधाची खरेदी करणेबाबत. (खरेदी विभाग)

---

२. संस्थानचे भांडार विभागाकडील शुध्द तूप विक्रीसाठीचे Basic Price बाबत. (भांडार विभाग)

---

३. संस्थानचे भांडार विभागाकडील ४३१.७० क्विंटल शुध्द तूप Basic Price काढून टाकुन ई-निविदा कम ई-लिलाव पध्दतीने विक्रीकरणे बाबत. (भांडार विभाग)

---

४. संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि.०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२) अखेरचे कालावधीकरिता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

(प्रकाशने विभाग)

---

५. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ इयत्ता १ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ (RTE Act,2009) अन्वये इयत्ता १लीचे एकूण २३६नविन प्रवेशानुसार २५ टक्के प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.

(श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल)

---

६. संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवातील निमंत्रण पत्रिका, दैनंदिन टपाल,उदी-पाकिटे, मनिऑर्डर भक्तमंडळ सभासदांना पाठविणेकामी डीजीटल फ्रॅंकिंग मशिन खरेदी करणेबाबत.

(सामान्य प्रशासन विभाग)

---

७. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२१ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (सामान्य प्रशासन विभाग)

निर्णय क्र.२१६ उपरोक्त ०१ ते ०८ विषयावर चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेले निर्णय सोबत परिशिष्ट 'अ' म्हणून जोडले आहे. त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ श्री साईबाबा महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक (Ad-hoc) पदभरतीकामी दि.२७,२८ सप्टेंबर,२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या थेट मुलाखतीचा अहवाल.

निर्णय क्र.२१७ प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

वरील निर्णय क्र.१६३ ते २१७ घेण्यात आले.

यानंतर सायं. ०४.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- ०२

1

दि. १०. ०८. २०२१

"मा.तदर्थ समितीचे (Ad-Hoc) सभेपुढे चक्रिय पद्धतीने निणयार्थ विषय"

श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी

विषय – श्री साईबाबा महाविद्यालय – शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता प्राध्यापक पदभरतीकामी स्थानिक निवड समितीचे गठन करणेबाबत....

मान्यतेस सविनय सादर,

अधिनियम:- २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – दि.११.०८.२०२० रोजी चक्रिय पद्धतीने मान्यता मिळालेला प्रस्ताव

प्रास्ताविक – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या व्यवस्थापनास मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रमांक मान्यता-२०१८ /(३०/१८)/ मशि -४, दि. २८ फेब्रुवारी २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देणेबाबत मान्यता दिलेली आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी-२०१८(१००/१८) मशि-४, दि.१५ जुन, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालय या नामाभिधानाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालयाचे कामकाज सुरु करणेत आलेले असून, नैसर्गिक वाढीनुसार सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये द्वितीय वर्षाचे वर्ग व सन २०२०-२१ मध्ये तृतीय वर्षाचे वर्गांकरीता मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांनी यांचेकडील मंजुर कार्यभार विचारात घेता, ३५ पुर्णवेळ व ३ तासिका तत्व असे एकूण ३८ पदे मंजुर केलेली आहेत. मा.तदर्थ समितीसमोर दि.१३.०५.२०२१ रोजी चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर घेतलेल्या निर्णयामध्ये *"श्री साईबाबा महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मागणी परिच्छेदातील (अ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) सध्या कार्यरत ०१ ग्रंथपाल व २१ प्राध्यापकांना आहे त्याच अटी –शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) मुदतवाढ देणेस व (ब) दरम्यानचे काळात मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/ कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये मान्यता मिळालेल्या ०१ प्राचार्य, ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक अशा एकूण ३८ पदांसाठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन, सदरचा मसुदा विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकडून अनौपचारिक तपासणी करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करुन, विद्यापीठाच्या नियमानुसार तज्ञ समितीची नियुक्ती करुन ऑनलाईन/ ऑफलाईन मुलाखतीद्वारे उपरोक्त ३८ पदे एकत्रित मानधनावर (Ad-Hoc) भरती करणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे."*

उपरोक्त मा.तदर्थ समितीचे निर्णयातील परिच्छेद "अ" नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कार्यरत असलेल्या २१ प्राध्यापक व १ ग्रंथपाल यांना आहे त्याच अटी –शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) मुदतवाढ देणेत आलेली आहे.

तसेच मा.तदर्थ समितीचे निर्णयातील परिच्छेद "ब" नुसार त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता प्राचार्य पदा व्यतिरिक्त ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शा.शि.संचालक अशा ३७ पदांसाठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन, सदरचा मसुदा विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकडून अनौपचारिक तपासणी करुन घेण्यात आलेला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील दि.०१.०४.१९९२ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच संदर्भ - सीसीओ/२४०७ दि.०३.११.२०१५ अन्वये शिक्षक निवड समितीचा सुधारीत अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असणेबाबत नमुद केलेले आहे.

Sr.No.	Selection Committee Members
01.	Chairperson of the Governing body or his Nominee as a Chairperson
02.	V.C.Nominee
03.	V.C. Nominee (Reservation)
04.	V.C.Nominated Subject Expert
05.	Joint Director, Higher Education or his Nominee
06.	Two Subject expert Nominated by the Chair Person out of panel of four expert nominated by the Vice-Chancellor of the university
07.	The Head of the Department of the concerned subject from the college / Institute
08.	Principal/ Director of College / Institute

पान नं.२ वर

मात्र तात्पुरत्या स्वरुपात (Ad-Hoc) प्राध्यापक भरतीकामी संस्था त्यांच्या पातळीवर निवड समिती गठीत करु शकते, तात्पुरत्या स्वरुपातील प्राध्यापक भरतीकामी निवड समितीमध्ये विद्यापीठाकडील अथवा शिक्षण सहसंचालक यांचेकडील कुठल्याही सदस्याची नेमणूक करण्यात येत नाही. तसेच सदर तात्पुरत्या स्वरुपातील पदांसाठी अद्याप आरक्षण लागू नसल्याने त्याबाबींचा विचार करण्यात येत नाही. असे विद्यापीठामार्फत सांगण्यात आलेले होते. त्यानुसार मागील वर्षी सन २०२०-२१ च्या (Ad-Hoc) प्राध्यापक पदभरतीकामी मा.तदर्थ समितीचे सभेत दि.११.०८.२०२० रोजी चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार खालीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात आलेली होती.

सन २०२०२१ चे प्राध्यापक भरतीकामी गठीत केलेली निवड समिती

अ.क्र.	निवड समिती सदस्य
०१.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव, तदर्थ समिती
०२.	मा.अप्पर महसुल आयुक्त, नाशिक विभाग तथा सदस्य, तदर्थ समिती
०३.	मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती
०४.	बाहेरील महाविद्यालयातील विषय तज्ञ
०५.	बाहेरील महाविद्यालयातील विषय तज्ञ

उपरोक्तप्रमाणे ०५ व्यक्तींची निवडसमिती गठीत करुन, त्यांच्या मार्फत मुलाखती घेऊन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात प्राध्यापक भरती करण्यात आली. आता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या तात्पुरत्या प्राध्यापक भरतीकामी मा.तदर्थ समितीच्या मान्यतेने पुन्हा स्थानिक निवड समिती गठीत करणे आवश्यक आहे. स्थानिक निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांचे अहवाल मुलाखती झाल्यानंतर ७२ तासांचे आंत विद्यापीठात जमा करणे बंधनकारक असून, त्यानुसार नेमणूक केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहित प्रक्रिया पुर्ण करुन दि.३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज करुन विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे.

मागणी – तरी मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील मंजुर कार्यभार व मा.तदर्थ समितीचे दि.१३.०५.२०२१ रोजी चक्रिय पद्धतीने मिळालेली मान्यतेनुसार, श्री साईबाबा महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता ३५ पुर्णवेळ व ३ तासिका तत्व असे एकूण ३८ पदे मंजुर केलेली आहेत. त्यातील प्राचार्य पदा व्यतिरिक्त इतर ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शा.शि.संचालक अशा ३७ पदांची तात्पुरती (Ad-Hoc) पदभरती करणेकामी मुलाखती घेऊन, योग्य उमेदवारांची निवड करणेकामी विद्यापीठाचे निर्देशानुसार स्थानिक निवड समिती गठीत करुन मिळणेस विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान – प्रशासकीय मान्यतेअंती कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय – तरी प्रास्ताविकातील वस्तुस्थिती विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ची प्राध्यापक पदभरती करणेकामी मागणी परिच्छेदामध्ये नमुद केलेप्रमाणे स्थानिक निवड समितीचे गठन करुन मिळणेस व पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर.

10/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

निर्णय –

मा. अध्यक्ष सो यांनी दिलेल्या निर्णयाशी सहमत आहे

10/08/2021

(श्रीमती गिता पी. बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

मा. अध्यक्ष सो. यांनी दिलेला निर्णयाशी सहमत आहे

12/8/2021

(भानुदास पालवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अपर महसुल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

10/8/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
सदस्य - सचिव तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(सुधाकर येलगड्डा)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 10/08/2021

विषय:- श्री. साईबाबा महाविद्यालय – शैक्षणिक वर्ष 2021-22 करिता प्राध्यापक पदभरतीकामी स्थानिक निवड समितीचे गठण करणेबाबत..

विषयाचे वाचन केले. पुणे विद्यापिठाची पदभरतीची नियमावली पाहिली. तात्पुरत्या पदभरतीचा नियम क्र. 3 नुसार श्री. साईबाबा महाविद्यालय – शैक्षणिक वर्ष 2021-22 करिता प्राध्यापक पदभरतीकामी खालील प्रमाणे स्थानिक निवड समिती गठीत करण्यात येत आहे.

1) अध्यक्ष तदर्थ समिती यांचे नामनिर्देशीत म्हणून तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती गीता बनकर
2) श्री. साईबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून प्रभारी प्राचार्य श्री. विकास शिवगजे
3) अहमदनगर जिल्हयातील मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयांपैकी एका वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य/संबंधीत विषयाचे विभाग प्रमुख
4) अहमदनगर जिल्हयातील मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयांपैकी एका वरिष्ठ महाविद्यालयाचे संबंधीत विषयाचे तज्ञ

तसेच सदरील नियमावलीनुसार या समितीचे सचिव म्हणून श्री. साईबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून प्रभारी प्राचार्य श्री. विकास शिवगजे हे काम पाहतील.

वरील समिती गठीत करुन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

10.08.2021

(सुधाकर वें. यार्लगड्डा)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

दिनांक -10 ऑगस्ट, 2021.

विषय क्र.- 03

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय:- दि.०६/०८/२०२१ रोजी आलेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. १६ वरील निर्णय क्रं. १५९ चे कार्यवाहीबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –

१) अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

२) संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये, दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट कलम (३) च्या खंड (ख) अन्वये, "पंचवीस हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "पाच लक्ष रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल, अशी तरतूद सुधारीत करणेत आलेली आहे.

३) संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये, दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट कलम (३) नंतर, पुढील पोट –कलम जादा दाखल करण्यात येईल- "(४) मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरीता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलेली नसेल आणि जे त्या विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानाला भेट देणा-या यात्रेकरुंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्याचा किंवा कोणतेही कार्य करण्याचा निर्देश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम, त्या विश्वस्त व्यवथेच्या निधीतून चुकती करता येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी, या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याबद्दलच्या कारणांसह, समितीला मान्यतेसाठी ताबडतोब सादर करील."

प्रस्तावना:- मा. तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी जा.क्रं.२५८, दि.०२/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कोरोना विषाणू महामारी सुरु झालेपासून ते आजपर्यंत संस्थान प्रशासनाने केलेल्या विविध सिव्हील बांधकामाची माहिती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून मागविलेली आहे. त्यानुसार सदरची माहिती जा. नं.१६३५, दि.१४/०८/२०२१ चे पत्रान्वये मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे सादर केली आहे. मा. तदर्थ समितीचे दि.०६/०८/२०२१ रोजीचे सभेतील विषय क्रं. १६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अ. नं. ०१ ते ०३ कामांची माहिती यासभेतील निर्णय क्रं. १५९ अन्वये समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावी असा ठराव समंत झालेला आहे. त्यानुसार सदरहू विषयांचे माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

१) **श्री साईबाबा मंदिरालगत पारायण कक्षाची भिंत पाडून त्याचे विलीनीकरण करुन हॉल बनविणे, हा विषय(दि.१९/०६/२०२१ च्या सभेत कायम झालेला निर्णय क्रं.१/८२) दि.०६/०१/२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेला होता व त्या विषयावर ०२ विरुध्द ०२ अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वित झालेले आहे.**

विवरण- श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील सध्याचे साईसभागृह /पारायण हॉलमध्ये अद्यायावत मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.४६,०५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी आर्किटेक्ट डि. ओ. निकम पुणे यांचेकडून कामाच्या किंमतीचे १.२६% इतक्या फि मध्ये इंटेरिअर डिझाईन, ड्रॉईंग, सविस्तर अंदाजपत्रक, निविदा प्रपत्र या सेवा घेऊन त्यानुसार ई निविदा मागविणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीकडे चक्रिय पध्दतीने मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदरचा विषय मा. तदर्थ(Ad-hoc) समितीव्दारे २ विरुध्द २ ने नामंजूर झालेला आहे. याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत आले आहे. सद्यस्थितीत सदरहू सिव्हील ॲप्लीकेशन प्रलंबित आहे. त्यामुळे सदर कामाबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच सदरचे काम अद्याप कार्यान्वित करण्यात आलेले नाही.

२) **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करण्यासाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरिअर कामे करण्यासाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- चे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी निविदा काढण्यासाठी मान्यतेसाठी प्रस्ताव दि.०६/०१/२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने आणलेला होता, त्यावरील निर्णय (दि.१९/०६/२०२१ च्या सभेत कायम झालेला निर्णय क्रं.१/८३) ०२ विरुध्द ०२ अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वित झालेले आहे.**

विवरण- मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटींग हॉल) तयार करणेसाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई –निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रिय

पान ०२ वर

पध्दतीने सादर करणेत आला होता. सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीव्दारे ०२ विरध्द ०२ निर्णय झालेला असल्याने याबाबत सिव्हील अँप्लीकेशन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत आले आहेत. सद्यस्थितीत सदरहू सिव्हील ॲप्लीकेशन प्रलंबीत असून सदरहू कामाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

३) श्री साईप्रसादालयात अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओट्याचे बांधकाम करणेबाबत..

विवरण-

श्री साईप्रसादालयात एकाच वेळी ३५०० भक्तांची बैठक व्यवस्था असलेला प्रसादभोजन हॉल आहे. प्रसादभोजन हॉलमध्ये उत्तरबाजूचे गेटजवळ आतील बाजूस जुन्या प्रसादालयातील संगमरवरी दत्त मुर्तीची प्रतिस्थापना करुन प्राण प्रतिष्ठा करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे प्रसादालयातील किचनव्यवस्था मोठया प्रमाणात आहे. श्री साई प्रसादालयात दैनंदिन सरासरी ५० हजार भक्त प्रसाद भोजन घेत असतात. त्या धार्मिकतेने प्रसादालयातील किचनमध्ये अन्नपूर्णा देवीची स्थापना करणेबाबत अन्नपूर्णा देवीच्या मुर्ती बसविणेसाठी फर्निचर व संगमरवरी /मार्बल मध्ये ओट्याचे बांधकाम करणेस श्री साईप्रसादालय विभागाकडील दि.१२/१०/२०२० रोजीचे टिपणीन्वये कळविलेले होते.

श्री साईप्रसादालयात भोजन विक्री काऊंटरचे पश्चिम बाजूकडील पॅसेजमध्ये पुर्वाभिमुख अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओटा तयार करुन त्यावर ग्रेनाईट बसविणेकामी दि.०४/०४/२०२१ रोजीचे टिपणीन्वये रु.९२,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. याकामी ग्रेनाईट मटेरिअल खरेदी व मजुरी दराचे काम करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेणेत आले आहे. त्यासाठी एकूण रक्कम रु.८९,५३५/- मात्र खर्च आलेला आहे.

प्रस्ताव:- तरी दि.०६/०८/२०२१ रोजी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत आयत्या वेळी झालेल्या विषय नं.१६ चे निर्णय क्रं.१५९ नुसार वर नमूद विषयांवरील केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 08

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय.
(संरक्षण विभाग)

विषय :- दि.३१/०७/२०२१ रोजी तदर्थ समितीचे मा.अध्यक्ष व सदस्या गिता बनकर मॅडम यांनी मंदीर संस्थानच्या बैठकीत झाले विषयाच्या अनुषंगाने सोबत दोन अनोळखी पुरुष यांच्या समवेत दर्शन घेतांना काढलेले फोटो बातमीदारांना प्रसारीत केले तसेच त्यांच्या हालचालीवर कोणी पाळत ठेवली याबाबतचा अर्ज चौकशी बाबत...

टिपणी.

मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्या, तदर्थ समिती यांनी दि.३१/०७/२०२१ तदर्थ समितीची बैठक संपलेनंतर समितीपुढील विषय सुचीतील विषय क्र.२७ व ६७ चे अनुषंगाने प्रत्यक्ष पाहणी करण्याकरीता गेले असता त्यांचा सदरहू मंदीर प्रवेश हा कोविड नियमांचे उल्लंघन असल्याबाबत प्रसार माध्यमांमध्ये बातमी प्रसारीत झालेली होती.

श्री साईबाबा मंदीरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज बाहेरच्या व्यक्तींना देऊ नयेत, असा ठराव दि.०२/०५/२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत दि.०१/०६/२०१८ चे सभेत दुरुस्तीसह निर्णय क्र.३१८ कायम करण्यात आलेला आहे. त्यामुळे वरील विषयांन्वये दि.३१/०७/२०२१ रोजी सायंकाळी बैठक संपल्यानंतर तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्या हे जेंव्हा श्रींचे समाधी मंदीरात निरीक्षणासाठी गेले, त्यावेळी त्यांचेवर पाळत ठेवली का ? त्यात संस्थानचा अधिकारी किंवा कर्मचारी किंवा बाहेरचे लोक कोणकोण होते, व त्यामागे त्यांचा उद्देश काय होता याची माहिती अध्यक्ष व सदस्या यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन आवश्यक आहे, बाबत मा.अध्यक्ष यांनी पोलीस उपनिरीक्षक, ए.बी. परदेशी, संरक्षण अधिकारी, श्री साई संस्थान यांचेकडे प्राप्त झाली होती. अर्ज चौकशी आदेशातील मुद्दे तपासणीकामी श्री साई संस्थानचे सी.सी.टी.व्ही. विभागातील डयुटीवर असणारे विभाग प्रमुख व त्यांचे मदतनीस यांचे जबाब नोंदवून त्यांनी त्यांचे जबाबामध्ये सदर घटनेबाबत सांगितले की, आम्ही फोटो तसेच सी.सी.टी.व्ही. फुटेज कोणालाही पाठविलेले नाही. त्याबाबत आम्हाला काहीही सांगता येणार नाही. असे जबाब दिले आहेत.

संदर्भ क्र.०१- मा.तदर्थ समिती दि.०६/०८/२०२१ रोजीचे सभेत झालेला आयत्या वेळेचा विषय नं.१७ मध्ये दि.३१/०७/२०२१ रोजी तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्या श्रीमती बनकर यांनी कोविड-१९ च्या नियमांचे उल्लंघन करुन श्रीं चे मंदिरात प्रवेश केल्याबाबत बातमी, अध्यक्ष व सदरच्या सदस्या यांच्या छायाचित्रासह समाज प्रसार माध्यमांत प्रसारीत केलेली आहे. तदर्थ समितीचे अध्यक्ष व मा.सदस्या मंदिर परिसरात त्यांच्या वाहनातून उतरुन आंत जातानाचे सी.सी.टी.व्ही. फुटेज देखील समाज प्रसार माध्यमांत प्रसारीत करण्यात आले. दि.०२/०५/२०१८ रोजी पारीत निर्णय क्र.३१८ दि.०१/०६/२०१८ चे व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेत दुरुस्तीसह कायम करुन त्यान्वये सीसीटीव्ही फुटेज त्रयस्त इसमांना देण्यास बंदी घातलेली आहे, त्यामुळे ही तक्रार सदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे आल्यावरुन त्यांनी दि.०३/०८/२०२१ रोजी जा.क्र.२६०/२०२१ प्रमाणे, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती केली की, त्यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रविंद्र ठाकरे यांच्यामार्फत संबंधीतांचे जबाब नोंदवून अध्यक्ष यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. ते दि.०५/०८/२०२१ रोजी संध्याकाळी ०५ वाजेपर्यंत अप्राप्त आहे, ते काम त्यांचेकडून तात्काळ पूर्ण करुन घेणे., या विषयावर निर्णय क्र.१६० अन्वये सदरचा विषय समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा, असे ठरले.

पान नं.०२ वर...

मा.तदर्थ समिती दि.०६/०८/२०२१ चे सभेतील निर्णय क्र.१६० व मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे दि.०७/०८/२०२१ चे पत्राचे अनुषंगाने श्री रविंद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फतीने सी.सी.टी.व्ही. विभागाचे प्रमुख श्री विनोद कोते व इतर ०६ मदतनीस यांचे जबाब नोंदवून इकडील जा.क्र.एसएसएस/उप मु.का.अ./१५७८/२०२१ दि.१०/०८/२०२१ चे पत्राने मा.अध्यक्ष महोदय यांना ई-मेलद्वारे व खास दुतामार्फत समक्ष कार्यालयात सादर करण्यात आलेले आहे.

सदर चौकशी ए.बी.परदेशी, पोलीस उपनिरीक्षक, संरक्षण अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांनी दि.२०/०८/२०२१ रोजी उच्च रक्तदाबाचा व मधुमेहाचा त्रास असल्याने आमची तब्येत साथ देत नसल्याने सदरची चौकशी ही दुसरे अधिकारी यांचेकडे चौकशीकामी वर्ग होणेस विनंती आहे, असे लेखी पत्राने कळविल्याने मा.अध्यक्ष साहेब, तथा जिल्हा प्रधान न्यायाधिश, अहमदनगर यांनी सदरची चौकशी श्री गवळी, पोलीस निरीक्षक, श्री साई मंदीर सुरक्षा पोलीस चौकी यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे. श्री गवळी यांचे मार्फत पुढील तपास चालू आहे.

वरीलप्रमाणे अहवाल मा.तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सविनय सादर.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ०५

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर.

सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना)

विषयः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे सेवा (वर्तणूक) विनियमाचे उल्लंघन न करणेबाबत....

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा. तदर्थ समितीची सभा दिनांक ०६/०८/२०२१ रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत आलेली होती. सदरचे सभेत आयत्या वेळेचा विषय क्र. १८ खालील प्रमाणे सादर करणेत आलेला आहे-

' तदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे अशी तक्रार प्राप्त झाली की, संस्थेनचे काही अधिकारी व काही कर्मचारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, सेवा (वर्तणूक) विनिमयाचे कलम ६ व १५ चे उल्लंघन करुन समाज प्रसार माध्यमावर भाग घेतात आणि तदर्थ समितीचे कामकाजाबाबत टिपणी करत आहेत त्यामुळे संस्थानचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदर नियमांचे उल्लंघन करु नये असे स्मरण करुन देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रक काढावे. तसेच या परिस्थितीत मा. उच्च न्यायालयाने पी.आय.एल. १२०/२०१९ मध्ये श्री साईबाबा संस्थानचे व्यवस्थापनासाठी दि. ०९ ऑक्टोबर, २०१९ रोजी स्थापना केल्यापासून संस्थानचे जे अधिकारी व कर्मचारी यांनी समाज प्रसार माध्यमामध्ये भाग घेतला याची चौकशी तदर्थ समितीचे सदस्य तथा अपर महसुल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक श्री. भानुदास पालवे यांनी एका आठवडयात करावी व त्यांनी तसा सविस्तर अहवाल तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे द्यावा.'

(अ) जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४४६०/२०१४ दि. २७/१२/२०१४ रोजीचे आदेशानुसार दिनांक ०१ जानेवरी, २०१५ पासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी करीता विनियम लागू करणेत आलेले असून सदरचे विनियमांचे पालन करणे हे संस्थानचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांना बंधनकारक राहतील असे, कळविणेत येऊन त्याबाबत समज संस्थानचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांना देणेत आलेली आहे. तथापि मा. तदर्थ समितीचे दिनांक ०६/०८/२०२१ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. १८ नुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १०९७/२०२१ दिनांक २७/०८/२०२१ नुसार खालीलप्रमाणे परितपत्रक पारित करणेत आलेले आहे.

दिनांक ०१ जानेवारी, २०१५ पासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता विनियम लागू करणेत आलेले असून सदरचे विनियमांचे पालन करणे संस्थानचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांना बंधनकारक असलेबाबत उपरोक्ता वाचा क्र. १ नुसार चे आदेशानुसार कळविणेत येऊन त्याबाबत सर्व अधिकारी / कर्मचारी यांना समज देणेत आलेली आहे.

तदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे अशी तक्रार प्राप्त झाली की, संस्थेनचे काही अधिकारी व काही कर्मचारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, सेवा (वर्तणूक) विनिमयाचे कलम ६ व १५ चे उल्लंघन करुन समाज प्रसार माध्यमावर भाग घेतात आणि तदर्थ समितीचे कामकाजाबाबत टिपणी करतात.

संस्थानमधील सर्व विभागांचे अधिकारी / कर्मचारी यांना याव्दारे सुचित करणेत येते की, त्यांनी उपरोक्त वाचा क्र. ०१ नुसार लागू करणेत आलेल्या विनियमांचा भंग होईल असे वर्तन करु नये, जेणे करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे नावलौकीकास बाधा येणार नाही.

जे कोणी अधिकारी / कर्मचारी संस्थान विनयमाचे उल्लंघन करतील त्यांचे विरुध्द कार्यालयीन शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सर्व अधिक्षक / विभाग प्रमुख यांनी सदर परिपत्रकाची समज आपले विभागातील सर्व कर्मचा-यांना देऊन कर्मचा-यांना समज मिळालेबाबतची स्वाक्षरीत प्रत आपले दप्तरी ठेवावी.

सोबत जा.न. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ ४४६०/ २०१४, दिनांक २७/१२/२०२१४ रोजीचे आदेश व जा.क्र. एसएसएस / साप्रशा / आस्था/ १०९७/ २०२१ दिनांक २७/०८/२०२१ रोजीचे परिपत्रकाची छायांकित प्रत माहिती-तथा-आवलोकनार्थ सादर केलेली आहे.

(ब) तसेच श्री. विठ्ठल तुकाराम पवार, मदतनिस आरोग्य विभाग यांनी समाज प्रसार माध्यमांध्ये भाग घेतल्यामुळे त्यांचे त्या संबंधिची सर्व कागदपत्रे दिनांक २६/०८/२०२१ रोजी मा. तदर्थ समितीचे सदस्य तथा अपर महसुल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक श्री. भानुदास पालवे यांचेकडे पाठविणेत आलेले आहेत.

उपरोक्त परिच्छेद " अ" व " ब" नुसार केलेली कार्यवाही मा. तदर्थ समितीचे आवलोकनार्थ-तथा-माहितीस्तव सविनिय सादर.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ०६

9

दिनांकः १५/०९/२०२१

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर

सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना)

विषयः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे प्रारुप सेवाप्रवेश नियमानुसार प्रभारी पदभाराबाबत ....

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा. तदर्थ समितीची सभा दिनांक ०६/०८/२०२१ रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत आलेली होती. सदरचे सभेत आयत्या वेळेचा विषय क्र. १९ खालीलप्रमाणे सादर करणेत आलेला आहे-

संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम या विषयी संस्थानने जो प्रारुप तयार केलेला आहे त्यास अंतिम मंजुरी मिळणे बाकी आहे. तरीही संस्थाननेच हा प्रारुप तयार केलेला असल्याने त्यातील प्रस्तावित नियम, नियमावली व विनियम यांचा प्रायोगिक तत्वावर अंमल केल्यास त्यात काय अडचणी येवू शकतात याची माहिती संस्थान प्रशासनाला मिळणार आहे आणि ही माहिती सदरहू प्रारुपाचे स्वरुप अंतिम करतांना उपयोगी ठरु शकते. म्हणून संस्थानचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांचा याव्दारे कोणताही हक्क निर्माण न करता त्याची अंमलबजावणी करता येईल. संस्थान आस्थापनेवारील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम याविषयी संस्थान जो प्रारुप तयार केलेला आहे त्यामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव इत्यादी प्रमाणे सद्या विविध विभागाचे प्रभारी प्रमुख व इतर महत्वाचे पदावरील प्रभारी कर्मचारी कार्यरत आहेत काय? याचा सविस्तर खुलासा मा. मुख्य कार्याकरी अधिकारी यांनी अध्यक्षांकडे सादर करावा. त्यांनी सदरहू प्रारुपातील प्रस्तावीत पध्दतीचा अवलंब करुन सर्व प्रभारी विभाग प्रमुखांचा (हॉस्पीटल, आय.टी.आय., शैक्षणीक संस्था यांसह) व महत्वाचे पदांचा प्रभारी म्हणून जोपर्यंत त्या पदावर नियमित नियुक्ती होत नाही तोपर्यंत किंवा समितीचा पुढील आदेश होईपर्यंत कार्यभार ठेवण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा व सध्या प्रभारी पदावर कार्यरत असलेले कर्मचारी जे शैक्षणीक पात्रता व आवश्यक अनुभव या निकषात बसत नाही त्यांचा पदभार काढून घेण्याचा प्रस्ताव व त्यांचे जागी सदरचे निकषात बसणारे कर्मचा-यांकडे प्रभारी पदभार ठेवण्यांचा प्रस्ताव एका आठवडयाचे आंत अध्यक्ष, तदर्भ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे पाठविण्यात यावा.

त्यावर निर्णय क्र. १६२ **'सदरचा विषय समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा.'** असा झालेला आहे.

आता, मा. अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे निर्देशानुसार संस्थानचे प्रशासकीय अधिकारी / प्रभारी प्रशासकीय अधिकारी, अधीक्षक / प्रभारी अधीक्षक, विभाग प्रमुख / प्रभारी विभाग प्रमुख यांचे नियुक्ती / प्रभारी कार्यभार कधीपासून देणेत आलेला आहे. त्यांची शैक्षणीक पात्रता, प्रस्तावित सेवाप्रवेशात नमूद केलेली शैक्षणीक पात्रता आस्थापना विभागामार्फत **परिशिष्ट "अ"** व रुग्णालये आस्थापनेमार्फत **परिशिष्ट "ब"** तयार केलेले असून ते सोबत सादर करणेत आलेले आहे. सदरचे परिशिष्ट **मा. तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर सविनय सादर.**

(भाग्यश्री जोगेश्वर, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

D:\BHADANGE\OFFICE NOTE BGB 2021.docx/9

विषय क्र.- ०७

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय:- दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०७/२०२१ अखेरचे कालावधीत करण्यात आलेल्या सिव्हील बांधकामांचे माहितीबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –

१) अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

२) संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये, दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट कलम (३) च्या खंड (ख) अन्वये, "पंचवीस हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "पाच लक्ष रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल, अशी तरतूद सुधारीत करणेत आलेली आहे.

३) संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये, दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट कलम (३) नंतर, पुढील पोट –कलम जादा दाखल करण्यात येईल- "(४) मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरीता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलेली नसेल आणि जे त्या विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानाला भेट देणा-या यात्रेकरुंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्याचा किंवा कोणतेही कार्य करण्याचा निर्देश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम, त्या विश्वस्त व्यवथेच्या निधीतून चुकती करता येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी, या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याबद्दलच्या कारणांसह, समितीला मान्यतेसाठी ताबडतोब सादर करील."

प्रस्तावना:- शिर्डी येथे श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या सोईसाठी तसेच सस्थांन रुग्णालयामध्ये उपचार घेणा-या रुग्णांच्या सुविधेसाठी काही छोट्या स्वरुपाची सिव्हील बांधकामे तसेच दुरुस्ती कामे तातडीने करणे गरजेचे होते. कोविड – १९चे जागतिक महामारीमुळे मार्च २०२० पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन लागू करण्यात आले होते. त्यामुळे शासनाचे निर्देशानुसार साई मंदिरही साईभक्तांना दर्शनाकरीता बंद ठेवण्यात आले आहे. त्यासाठी सदर कालावधीत प्रस्तुतची सिव्हील बांधकामे व दुरुस्ती कामे करुन घेणे निकडीचे होते. त्यानुसार करण्यात आलेली सिव्हील बांधकामे व दुरुस्ती कामांचा तपशिल श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील वर नमूद तरतुदीनुसार खालीलप्रमाणे माहितीस्तव सादर करणेत येत आहे.

१) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LPM क्षमतेचा Oxygen Generation Plant उभारणेकामी सिव्हील कामे करणेबाबत..

कामाची निकड- कोरोना विषाणूचा झपाट्याने वाढत चाललेला प्रादुर्भाव रोखणेसाठी आजारी रुग्णांच्या उपचाराकरीता संस्थानच्या श्री साईधर्मशाळा येथील A, B, E, F या इमारती अधिग्रहीत केल्या होत्या. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल मधील ७० बेड कोवीड रुग्णांसाठी राखीव ठेवून त्यामधील २० बेड ICU with Ventilator व ५० बेड Oxygen चे होते. परंतू रुग्ण संख्येमध्ये झपाटयाने वाढ होत असलेमुळे मा. जिल्हाधिकारी यांचेकडील दि.१४/०४/२०२१ रोजीचे आदेशाने श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी हे अतिरिक्त डिस्ट्रीक्ट कोविड हॉस्पीटल म्हणून घोषीत करणेत आले. त्यामुळे सदरहू रुग्णालयातील सर्व १४० बेड कोविड रुग्णांकरीता आरक्षित ठेवणेत आले.

तसेच तहसिलदार राहाता यांचे दि. १७/०५/२०२१ रोजीचे पत्राने श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी येथे मोफत सेवेचे ३०० खाटांचे अद्यावत DCHC संपूर्ण मनुष्यबळ, वैद्यकिय सुविधेसह तात्काळ कार्यान्वित करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यामुळे कोवीड रुग्णांची वाढती संख्या विचारात घेवून Oxygen बेडची संख्या वाढविणे अपेक्षीत असल्याने ऑक्सीजन पुरवठयाची कमतरता विचारात घेता, संस्थानने Liquid Medical Oxygen Gas Plant ऐवजी १२०० LPM क्षमतेचा **Oxygen Generation Plant** उभारणेकामी सिव्हील कामे करणेत आली.

संक्षिप्त विवरण - श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२००LPM क्षमतेचा Oxygen Generation Plant उभारणीकामी तातडीची बाब म्हणून दरपत्रकाव्दारे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा. उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.४६८५/२०२१ दाखल केले होते, त्यास मा. उच्च न्यायालयाने दि.२०/०४/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान करीता रिलायंस ग्रुप मार्फत Oxygen Generation Plant देणगीदाखल उभारणेत येणार होते. त्यासाठी आवश्यक सिव्हील काम संस्थान मार्फत करावे लागणार असल्याने १२०० LPM क्षमतेचा Oxygen Generation Plant उभारणीकामी १८ मीटर लांब, ०८ मीटर रुंद शेडचे बांधकाम करणेसाठी सन २०२०-२०२१ चे राज्य दरसुची मधील दरांनुसार रक्कम रुपये ३९,०२,०००/- अपेक्षीत होता, त्याबाबतचा चक्रिय पध्दतीचा विषय बांधकाम विभागाने दि.२३/०४/२०२१ रोजी मा. तदर्थ समितीचे सदस्यां समोर सादर केला होता, सदर प्रस्तावावर

मा.अध्यक्ष महोदयांनी दि.२३/०४/२०२१ रोजी खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे. "I have carefully read the entire proposal. It is not mentioned as to how the Construction Division of the Trust administration is incapable of making such construction. It is also not clear from the proposal as to the time period within which the Reliance Company is going to install Oxygen Generation plant after such construction of shed with 1200 LPM capacity. In such circumstances, it is difficult to deviate the normal rule of calling tenders. Therefore, I feel that subject to approval by Honorable High Court (by making Civil Application at the earliest) the proposal is allowed on failure of the Construction Division of the Trust to carry out the construction of such shed."

तसेच सदरहू प्रस्तावावर मा.श्रीमती गिता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्या, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावावर दि.२३/०४/२०२१ रोजी खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"सदरचा प्रस्ताव वाचला सदर प्रस्तावावरुन कालावधी किती लागेल स्पष्ट होत नाही तसेच संस्थानचे बांधकाम विभाग हे बांधकाम करुन शकते किवा कसे याबाबत स्पष्टता नाही. संस्थानचे बांधकाम विभाग हे बांधकाम करु शकत नसल्यास मा.उच्च न्यायालयाच्या पूर्व परवानगी नुसार प्रस्ताव मंजूर."

चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावावर मा. श्री. भानूदास पालवे, अपर आयुक्त, विभागीय आयुक्त, नाशिक, तथा सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.२७/०४/२०२१ रोजी "मा. अध्यक्ष तदर्थ समिती तथा प्रधान जिल्हा न्यायाधिश यांचे अभिप्रायाशी सहमत आहे." निर्णय दिलेला आहे.

उपरोक्त निर्देशानुसार याकामी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन त्यास मान्यता मिळणेस काही कालावधी लागणार होता. तथापी, कोरोना साथीची स्थिती बघता सदर प्लान्ट तातडीने उभारणे अत्यावश्यक होते. याबाबत मा. उच्च न्यायालयाकडून दि.०४/०५/२०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेश झालेला आहे.

It is submitted by Mr. Dhorde, the learned senior advocate for the Sansthan that donation is received from Reliance Foundation for the Oxygen Plant. Shed is constructed by another devotee. In that event, they need not proceed further pursuant to the order passed on 20th April, 2021.

साईभक्तांचे निवासाकरीता साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा इमारत देणगीदाखल उभारणारे देणगीदार साईभक्त श्री. के. व्ही. रमणी, चेन्नई यांनी Oxygen Generation Plant उभारणेकामी सिव्हील खर्चाचे काम देणगीदाखल करुन देणेची इच्छा दुरध्वनीवरून प्रदर्शीत केली होती. त्यानूसार संस्थानचे जा. क्र.११६, दि.२९/०४/२०२१ रोजीचे पत्राने श्री. के. व्ही. रमणी, चेन्नई यांना सदरहू काम देणगी दाखल करुन देणेस विनंती करणेत आली.याकामासाठी शिर्डी नगरपंचायत यांचेकडील जा. नं./नप/टे-८१२/२०२१, दि.१७/०५/२०२१ रोजीचे पत्राने बांधकाम परवाणगी देणेत आलेली आहे.त्याप्रमाणे साईभक्त श्री. के. व्ही. रमणी, चेन्नई यांनी Oxygen Generation Plant उभारणेकामी सिव्हील खर्चाचे रक्कम रु.४३,४४,७६१/- मात्रचे काम देणगीदाखल करुन दिलेले आहे.

२) **कोविड १९ या साथ रोगातील रुग्णांचे स्वॅबचे नमूने तपासणीसाठी आरटी.पी.सी.आर. लॅब तयार करणे.**

कामाची निकड – मार्च –एप्रील २०२१ मध्ये कोविड -१९ या साथीची दुसरी लाट आल्याने या रोगाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर झाला होता.यावेळी कोवीड रुग्णांची वाढती संख्या विचारात घेवून कोविड टेस्टींगसाठी येणारे रुग्णांची तपासणी होवून पॉजिटिव्ह रुग्णांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळणे आवश्यक होते. याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील PIL No. 120/2019 मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. ४६८४/२०२१ मध्ये दि.२०/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केला आहे.

....B The Sansthan is permitted to install the laboratory for the purpose of Covid-19 testing and spent approximately an amount of Rs. 1.05 crores.

त्यानुसार संस्थानमार्फत कोविड १९ या साथ रोगातील रुग्णांचे स्वॅबचे नमूने तपासणीसाठी द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावरील उत्तरेकडील पाच रुम्समध्ये आरटी पी.सी.आर. लॅब तयार करणेत आली आहे.

संक्षिप्त विवरण - जगभरात थैमान घातलेल्या कोरोना विषाणु (Covid-19) ची साथ मार्च २०२१ मध्ये वाढत होती व सदरच्या विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत चाललेला होता. सदर साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोवीड रुग्णांची वाढती संख्या विचारात घेवून कोविड टेस्टींगसाठी येणारे रुग्णांची तपासणी होवून पॉजिटिव्ह रुग्णांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळणे कामी संस्थानमार्फत कोविड -१९ या साथ रोगातील रुग्णांचे स्वॅबचे नमूने तपासणीसाठी द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावरील उत्तरेकडील पाच रुम्समध्ये आरटी पी.सी.आर. लॅब तयार करणेत आली आहे.

दि.०१/०५/२०२१ चे टिपणीन्वये सदरहु रूम्समध्ये रंगकाम करणे, ॲल्युमिनियम पार्टीशन/दरवाजे करून केबिन्स करणे व स्टीलचे फ्रेमवर कडप्पे टाकून प्लॅटफॉर्म बनविणे व इतर अनुषंगिक कामांसाठी येणारे रु.२,४६,०००/- खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पार्टीशनचे कामासाठी दि.०१/०५/२०२१ रोजीचे पत्राने विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत येवून निम्नतम दरधारक ठेकेदार मातोश्री इंटेरिअर, नाशिक यांना इकडील जा.क्र.४६६/२०२१, दि.१०/०५/२०२१चे पत्राने रक्कम रु.१,७९,११४/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. ठेकेदार यांनी सदरचे काम पूर्ण केले आहे. मुळ प्रस्तावानुसार चेंजिंग रुम सॅंपल प्रोसेसिंग रुमसमोर होती. मात्र काम सुरु असतांना रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार सॅंपल प्रोसेसिंग रुमचे पुर्व बाजूचे खोलीत चेंजिंग रुमचे लोकेशन बदलणेत आले. या बदलामुळे ॲल्युमिनियम पार्टीशन, दरवाजे व डोअर क्लोजरची क्वांटीटी वाढली आहे. करीता मंजूर कार्यादेश रकमेपेक्षा बिलाची रकम रु.३५,२९६/-ने

वाढली आहे. सदरचे रु.३५,२९६/-मात्र वाढीव रकमेसह एकूण बिल रक्कम रु.२,१२,६६१/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेत आले आहे.

मेकॅनिकल विभागाने तयार केलेले स्टीलचे फ्रेमवर कडप्पे टाकून प्लॅटफॉर्म बनविणेकामी दि.०१/०५/२०२१ रोजीचे पत्राने विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत येवून त्यातील निम्नतम दरधारक कृष्णा ट्रेडर्स, साकुरी यांना इकडील जा.क्र.६८६/२०२१ दि.०२/०६/२०२१ अन्वये रु.२४,६२४/- रकमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानी पुरविलेल्या कडप्प्याचे रु.२०,५२०/- रकमेचे बिल त्यांना अदा करणेत आले आहे.उपरोक्त कामांसाठी एकूण रक्कम रु.२,३३,१८१/- इतका खर्च आला आहे.

तसेच उन पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी लॅबसमोरील जागेत शेड तयार करणे आवश्यक असल्याने दि.०६.०५.२०२१ चे टिपणीअन्वये रु.१,९५,७००/-मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. त्यासाठी दि. ११/०५/२०२१ चे पत्राने विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत येवून निम्नतम दरधारक साईविश्व कन्स्ट्रक्शन, पिंपळवाडी यांना इकडील जा. क्र.५५४/२०२१ दि.१९/०५/२०२१ अन्वये रु.१,९४,३३३/- रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. ठेकेदार यांनी सदर काम पूर्ण केले असून त्यांना रु.१,६४,६९७/- रकमेचे बिल अदा करणेत आले आहे. अशा प्रकारे या कामासाठी एकूण रक्कम रु.३,९७,८७८/- इतका खर्च आला आहे.

३) संस्थानचे साई सभागृह व्ही.आय.पी रुम / विश्वस्त कक्ष क्र.०१ व ०२ मध्ये अंतर्गत फेरबदल व नूतनीकरण करणे तसेच साई सभागृह येथील उत्तर-पूर्व कोप-यातील रुममध्ये मान्यवरांकरीता टॉयलेटचे बांधकाम करणे.

कामाची निकड - शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणा-या महत्वाचे, अतिमहत्वाचे व्यक्ती तसेच मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालयाचे मा.न्यायाधिश, केंद्र व राज्य सरकार मधील मा. मंत्री, मा. लोकप्रतिनिधी, वरिष्ठ मा. सनदी अधिकारी, व इतर मान्यवरांची बैठक व्यवस्था श्री साईबाबा मंदिर परिसरातील साई सभागृह शेजारील व्ही.आय.पी.रुम / विश्वस्त कक्ष क्र.०१ व ०२ येथे करण्यात येते. सदर कक्षांचे बांधकाम २० वर्षापूर्वी करण्यात आलेले असून काळानुसार शिर्डी येथे येणारे मान्यवर व साईभक्तांची संख्या वाढत असल्याने व्ही.आय.पी रुम / विश्वस्त कक्ष क्र.०१ व ०२ मधील जागा अपुरी पडत होती. सबब, सदर रुम क्र.०१ व ०२ मधील दोन टॉयलेटचे एकत्रीकरण करुन तेथे मोठा हॉल तयार करणे आवश्यक होते.

संक्षिप्त विवरण - याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करणेत येऊन अंदाजपत्रक व नकाशे तयार करणेत आले. यापूर्वी मंदिर परिसराचे पारायण कक्ष व मिटींग हॉलचे पूर्व बाजूस आर.सी.सी स्लॅब टाकणे तसेच मिटींग हॉलचे लगतचे रुममध्ये टॉयलेट बांधकाम करणेसाठी किरकोळ अंतर्गत फेरबदल करणेसाठी बांधकाम परवानगी मिळणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांचेकडे दि.२९/१२/२० रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर शिर्डी नगरपंचायत यांनी एकत्रिकृत विकास, नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील नियम क्र.२.१.२, नियम क्र.२.१.७ नुसार बांधकाम परवानगी घेतलेल्या बांधकामामधील दुरुस्तीचे बांधकाम करण्यास परवानगीची आवश्यकता नाही असे नमूद केले आहे.

सदर प्रस्तावास येणा-या खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत येत असतांना याबाबत साईभक्त श्री.मनिष भतीजा, मुंबई (पॅराडाईज बिल्डर्स) यांनी दि.१२/०१/२०२१ रोजीचे पत्राने सदर काम देणगीदाखल करुन देणेबाबत ईच्छा प्रदर्शित केली. त्यानुसार संस्थान अधिनियमातील वर नमूद कलमान्वये व तरतुदीनुसार याकामी येणारे रक्कम रु.४,४८,५००/- मात्रचे खर्चास व सदर काम देणगीदारामार्फत करणेस इकडील दि.१८/०१/२०२१ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेणेत आली. त्यानुसार सदर काम साईभक्त श्री.मनिष भतीजा, मुंबई (पॅराडाईज बिल्डर्स) यांचेमार्फत देणगीदाखल करुन घेणेत आलेले आहे.

४) समाधी मंदिर परिसरातील पारायण हॉल (प्रतिक्षालय) व साई सभागृह हॉल (मिटींग हॉल) लगतचे पूर्व बाजूकडील ओपन टू स्काय भागावर आर.सी.सी स्लोपींग स्लॅब टाकणे.

कामाची निकड - कोविड १९ या साथ रोगाच्या अनुषंगाने श्रींचे समाधी मंदिर दर्शनासाठी बंद करणेत आले आहे. त्याचबरोबर साईसत्यव्रत पूजा, अभिषेक पूजा तसेच पारायण हॉलही बंद ठेवणेत आले आहे. दरम्यान सध्या साईभक्तांकरीता बंद असलेला पारायण हॉलचा वापर मिटींग हॉलमध्ये व सध्याचे साई सभागृह (मिटींग हॉलचा) वापर प्रतिक्षालय म्हणून करुन सदरहू हॉल व कॉरीडॉर मधील ओपन टु स्काय भागावर ऊन व पावसापासून संरक्षण होणेसाठी आरसीसी स्लॅबचे छत तयार करणेत आले आहे.

संक्षिप्त विवरण – पारायण हॉल तसेच मिटींग हॉल व क्वॉरीडोअर पॅसेज मधील ओपन डक्टचे भागावर आरसीसी स्लॅबचे छत तयार करणेसाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची बांधकाम परवानगी घेणेसाठी इकडील जा. नं. २८७९/२०२१, दि.२९/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर शिर्डी नगरपंचायत यांनी एकत्रिकृत विकास, नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील नियम क्रं. २.१.२ नियम क्रं. २.१.७ नुसार बांधकाम परवानगी घेतलेल्या बांधकामामधील दुरुस्तीचे बांधकाम करण्यास परवानगीची आवश्यकता नाही, असे नमूद केलेले आहे. त्यामुळे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) २०२० मधील तरतुदीनुसार दुरुस्तीचे काम करणेत यावे. सदर दोन्ही हॉलचे पुर्व बाजूकडील ओपन टु स्काय भागावर स्लोपींग आरसीसी स्लॅब टाकणेकामी सिव्हील कामे करणेसाठी रक्कम रु.२,६४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेत आली. याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून निम्नतम दराचे ठेकेदार श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई यांना रक्कम रु.२,४६,७२२/- मात्रचा कार्यादेश देणेत येऊन ठेकेदार यांनी सदरचे काम पूर्ण केले आहे.

५) समाधी मंदिर परिसरातील व्हि.आय.पी कक्ष क्र. ०३ व ०२ मधील मोकळया पॅसजेवर आर.सी.सी स्लॅब टाकणे.

कामाची निकड – श्री साईबाबा दर्शनरांग प्रकल्पातील दर्शन लाईन कॉरीडॉर मंदिर परिसरात शांतिनिवास इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर जोडला आहे. सदरहू कॉरीडॉरमुळे साईसभागृह व व्हीआयपी कक्षाचे टेरेसवर जाता येत नसल्याने टेरेसवरील भागाची साफसफाई व इतर दरुस्तीचे कामाकरीता जाणे अडचणीचे होते तसेच व्हीआयपी कक्ष यामधील मोकळया भागात ऊन, वारा व पावसापासून संरक्षण होणेसाठी सदर भागावर आरसीसी स्लॅब टाकणेत आला आहे.

संक्षिप्त विवरण – व्हीआयपी साईभक्तांना समाधी मंदिर परिसरात ०२ नं. गेटमधून प्रवेश दिला जातो. व्ही.आय.पी कक्ष क्रं. ०३ व ०२ मधील जाणे- येणेच्या पॅसेजवर ऊन व पावसापासून संरक्षण होणेसाठी आरसीसी स्लॅबचे छत करणेसाठी रक्कम रु.४,२७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेत आली. याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून निम्नतम दराचे ठेकदार श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई यांचेकडून रु.४,२१,६४६/- मात्र अपेक्षित रकमेचे काम करुन घेणेत येत आहे. सदरहू कामास शिर्डी नगरपंचायतीची बांधकाम परवानगी मिळणेसाठी इकडील जा. नं. ११८९/२०२१, दि.०८/०७/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास शिर्डी नगरपंचायत यांना जा. क्रं. नप/टे ८१२/६०९/२०२१, दि. ०५/०८/२०२१ रोजी बांधकाम परवानगी दिलेली आहे.

---

६) श्री साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक यांचे दालनाचे विस्तारीकरण व नुतनीकरण करणे

कामाची निकड - श्री साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक तसेच त्यांचे स्विय सहाय्यक यांचेकरीता पुर्वी 19"-3" x 12'-6" या आकाराचे दालन होते. वैद्यकिय संचालक यांना भेटनेसाठी रूग्णांचे नातेवाईक, डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, इतर कर्मचारी इ. त्यांचे कॅबीनमध्ये जातात. तसेच वैद्यकिय संचालक यांना रुग्णालयातील रुग्णांचा व दिवसभरातील केलेल्या कामांचा डॉक्टरांकडून आढावा / मिटींग घेणेसाठी पुरेशी जागा त्याठिकाणी उपलब्ध नसल्याने सदरहू दालनाचे विस्तारीकरण व नूतनीकरण गरजेचे होते.

संक्षिप्त विवरण - वैद्यकिय संचालक यांनी इकडील विभागाकडे दि.२७/०५/२०२१ रोजी मागणी / प्रस्ताव पाठविला. त्यानुसार इकडील विभागामार्फत दि.२८/०५/२०२१ रोजी त्यांचे सध्याचे कॅबीनचे दक्षिणेस असलेल्या तीन कॅबीन व पॅसेजचे एकत्रिकरण करुन त्याचे नुतनीकरण व इंटेरिअरची कामे करुन सुसज्ज दालन तयार करणेसाठी येणारे रक्कम रू.४,९३,८००/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत आला व त्यास दि.२८/०५/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. याकामी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.सी.ए.टी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दिनांक २०/०५/२०२१ अन्वये खालील शासन निर्णय संमत झालेला आहे.

"... सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६/११/२०१४ च्या शासन निर्णयानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२७/०९/२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार रु.३ लक्ष रकमेवरील कामे ई-निविदा पध्दतीने करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. आता या निर्णयाव्दारे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांकरिता रु.१० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करुन) रकमेवरील कामांकरीता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात यावा."

सदर काम रक्कम रु.१० लक्षपेक्षा कमी असल्याने वरील शासन निर्णयनुसार सदरकामी इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/६९५/२०२१, दि.०२/०६/२०२१ चे पत्रान्वये दरपत्रके मागविणेत आली. त्यानुसार सदर कामाकरीता ०५ दरपत्रके प्राप्त झाली होती. सदर प्राप्त दरपत्रकांनुसार निम्नतम ठेकेदार ॲट्रीओ कन्स्ट्रक्शन, शिर्डी यांना इकडील जा.क्र.८७०/२०२१, दि.१६/०६/२०२१ रोजी रक्कम रु.४,५४,१११/- मात्रचा कार्यादेश देण्यात आला. त्यानुसार ठेकेदार यांनी कामास सुरुवात करुन सदर काम दि.३०/०६/२०२१ रोजी पुर्ण केलेले आहे. सदर कामासाठी रु.३,८०,४५१/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदर काम हे दुरूस्तीचे सदरातील असल्याने एकत्रिकृत विकास, नियंत्रण प्रोत्साहन नियमावली (UDCPR-2020) मधिल नियम क्र.२.१.२, नियम क्र.२.१.७ नुसार याकामी बांधकाम परवानगी घेतलेल्या बांधकामातील दुरूस्तीचे बांधकाम करण्यास परवानगीची आवश्यकता नाही.

७) संस्थानचे साई सभागृहासमोर आर.सी.सी. स्लॅब व संलग्न सिव्हील कामे करुन कॉरीडॉरचे बांधकाम करणे -

कामाची निकड - संस्थानचे लेंडीबागेतील साई सभागृह व मान्यवरांचे प्रतिक्षा कक्ष या ठिकाणी सातत्याने महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तिंचा वावर असतो. परंतु साईसभागृहाचे समोर (पश्चिम बाजुस) छत नसल्याने ऊन व पावसामुळे येणारे मान्यवरांची तसेच त्यांचे समवेत असलेल्या व्यक्तिंची गैरसोय होते. पाऊस आल्यानंतर फ्लोरींग ओले झाल्यामुळे त्याठिकाणी एखादी व्यक्ती पाय घसरुन पडण्याची शक्यता होती. तसेच पावसामुळे मान्यवरांची पादत्राणे ओली होत होती. त्यामुळे संस्थानचे साई सभागृहासमोर आर.सी.सी. स्लॅब व संलग्न सिव्हील कामे करुन कॉरीडॉरचे बांधकाम करणे गरजेचे होते.

शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणा-या महत्वाचे, अतिमहत्वाचे व्यक्ती तसेच मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालयाचे मा.न्यायाधिश, केंद्र व राज्य सरकार मधील मा. मंत्री, मा. लोकप्रतिनिधी, वरिष्ठ मा. संसदी अधिकारी, देणगीदार साईभक्त व इतर मान्यवर तसेच कर्मचारी यांचेशी विविध बैठका, सत्कार, स्वागत समारंभ हे साई सभागृहामध्ये करण्यात येतात तसेच त्या शेजारील विश्वस्त कक्षात येणा-या मान्यवरांचे प्रतिक्षा कक्ष आहे. त्यामुळे त्याठिकाणी सातत्याने अतिमहत्वाचे व्यक्तींचा वावर असतो.

संक्षिप्त विवरण – सदर ठिकाणी ३.२५ मिटर X ९.८० मिटर या मापाचे आर.सी.सी. कॉरीडॉरचे बांधकाम करण्यात आले आहे.

संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार याकामी येणारे रक्कम रु.४,९१,५१२/- मात्रचे खर्चास दि.१९/०१/२०२१ चे प्रस्तावान्वये मान्यता घेण्यात आली. तदनंतर याकामी दि.२१/०१/२०२१ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत आल्या. जाहिरातीनुसार ई-निविदेचा कालावधी दि.२६/०१/२०२१ ते दि.०९/०२/२०२१ असा होता. सदर कालावधीत ०२ ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तदनंतर याकामी दि,१२/०२/२०२१ चे टिपणी अन्वये, सदर प्राप्त ०२ निविदा उघडणेस, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील दि.२७/०९/२०१८ चे कलम क्र.४.३ मधील पुढील तरतूदीनुसार प्रस्ताव सादर करणेत आला.

".. .. प्रथम मागणीचे वेळी ०२ च निविदा प्राप्त झाल्यास ०३ निविदा प्राप्त नाही म्हणून प्राप्त निविदा नाकारण्यात येतात. ही बाब सीव्हीसी नियमास धरुन नाही. कालापव्यय होवू नये व कामे वेळेवर व्हावीत यासाठी ०२ निविदा प्राप्त झाल्यास त्या उघडण्यात याव्यात अशी तरतुद आहे."

तसेच याबाबत महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा दि.२९/०१/२०१९ चा शासन निर्णय खालीलप्रमाणे नमुद आहे.

".. .. दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.३ व परिच्छेद क्र.४.४ मधील तरतुदींबाबत विसंगती दुर करण्यात येत असून परिच्छेद ४.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार लिफाफा क्र.२ (आर्थिक देकार) उघडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रथम बोलीवेळी प्राप्त निविदांमध्ये ०३ प्राप्त निविदा असणेची आवश्यकता नाही".

सदरहू मान्यतेनुसार प्राप्त ०२ निविदांचा तांत्रिक लिफाफा दि.२३/०२/२०२१ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आला व वरील महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील वर नमूद शासन निर्णयानुसार सदर ०२ ठेकेदारांचे वाणिज्यक देकार दि.२४/०२/२०२१ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले.

त्यानुसार ठेकेदार श्री.ऋषिकेश सदाफळ, राहाता यांना इकडील जा.क्र.३९४५/२०२१, दि.१०/०३/२०२१ रोजी रक्कम रु.४,६१,०००/- मात्रचा कार्यादेश देण्यात आला. तदनंतर ठेकेदार यांनी कामास सुरुवात करुन सदर काम दि.१५/०४/२०२१ रोजी पूर्ण केलेले आहे. सदर कामासाठी एकूण रु.४,४८,४१७/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

८) श्री साईबाबा हॉस्पीटल येथिल पॅथोलॉजी विभागातील हिस्टोपॅथोलॉजी लॅब ही श्री साईनाथ रक्तपेढीचे दुसरा मजला येथे स्थलांतरीत करणे -

कामाची निकड - श्री साईबाबा हॉस्पीटल येथिल हिस्टोपॅथोलॉजी लॅब ही पुर्वी तळमजल्यावर होती. त्या ठिकाणी पॅथोलॉजी लॅब असल्याने दोन्ही विभागांचे कर्मचारी यांना काम करणेस अडचणी येत होत्या. त्यामुळे सदर हिस्टोपॅथी लॅब श्री साईनाथ रक्तपेढीचे दुसरा मजला येथे स्थलांतरीत करणेत आली आहे.

संक्षिप्त विवरण - वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दि.११/१२/२०१९ चे पत्रान्वये, श्री साईबाबा हॉस्पिटल येथिल हिस्टोपॅथोलॉजी विभाग हा श्री साईनाथ रक्तपेढीचे दुसरा मजला येथे स्थलांतरीत करणेत येत असल्याने बांधकाम विभागाशी संबंधित कामे करून मिळणेबाबत कळविले होते. पुर्वी हिस्टोपॅथोलॉजी लॅब ही तळमजल्याला होती. त्याठिकाणी जनरल रक्त तपासणी लॅब असल्याने त्याठिकाणी दोन्ही लॅबचे कर्मचारी यांना काम करणेस अडचणी येत होत्या. त्यानुसार इकडील विभागामार्फत पहाणी करणेत आली व सदर कामे करणेसाठी येणारे रक्कम रू.२,५१,६५२/- मात्रचे खर्चास दि.१५/०१/२०२० चे प्रस्तावान्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार याकामी जा.क्र.४५२१/२०२०, दि.१३/०२/२०२० चे पत्रान्वये दरपत्रके/निविदा मागविणेत आल्या. याकामी खालीलप्रमाणे ०३ दरपत्रके / निविदा प्राप्त झाली. सदर दरपत्रके दि.१८/०३/२०२० चे मा. खरेदी समिती सभेत उघडणेत आल्या आहेत. सदर प्राप्त दरांनुसार ठेकेदार वामने विजय मच्छिंद्र, माळेवाडी, श्रीरामपूर यांना इकडील जा.क्र.०५/२०२०, दि.०१/०४/२०२० रोजी रक्कम रु.२,३८,८८४/- मात्रचा कार्यादेश देण्यात आला. त्यानुसार ठेकेदार यांनी कामास सुरुवात करुन सदर काम पुर्ण केलेले आहे. सदर कामासाठी रु.१,८१,८५८/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

सदरकाम हे दुरूस्तीचे सदरातील असल्याने एकत्रिकृत विकास, नियंत्रण प्रोत्साहन नियमावली (UDCPR-2020) मधिल नियम क्र.२.१.२, नियम क्र.२.१.७ नुसार याकामी बांधकाम परवानगी घेतलेल्या बांधकामातील दुरूस्तीचे बांधकाम करण्यास परवानगीची आवश्यकता नाही.

९) संस्थानचे साईनिवास अतिथीगृहासमोरील बायोमेट्रीक पास काऊंटर शेड सर्व्हे क्र.०४ (श्री. नितिन कोते यांचे क्षेत्रात) मध्ये तात्पूरत्या कालावधीकरीता स्थलांतरीत करणे -

कामाची निकड – साईभक्तांचे सोईसाठी श्री नितीन उत्तमराव कोते, शिर्डी यांचे सर्व्हे नं. ४/१ पै. मधील श्रीराम पार्किंगमध्ये १२ बायोमेट्रीक पास काऊंटर्स करीता शेड तयार करणेत आले होते. शेड मंदिरापासून थोडे जादा अंतरावर होते. त्यामुळे सदरचे बायोमेट्रीक पास काऊंटर शेड त्यांचेच प्लॉटमध्ये हॉटेल गोरडीया लगत मंदिराचे जवळ हलविणे गरजेचे होते. त्यामुळे भक्तांची गैरसोय दुर होईल तसेच साईनिवास अतिथी गृहा समोरील शेड खोलून सदर जागा ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना UGT व STP चे बांधकामासाठी उपलब्ध करणे गरजेचे होते. त्यामुळे ताप्तुरत्या कालावधीकरीता संस्थानचे साईनिवास अतिथीगृहासमोरील बायोमेट्रीक पास काऊंटर शेड सर्व्हे क्र.०४ (श्री. नितिन कोते यांचे क्षेत्रात) मध्ये शेड तयार करणेत आले आहे.

संक्षिप्त विवरण - साईभक्तांचे सोईसाठी श्री. नितिन उत्तमराव कोते, शिर्डी यांचे शिर्डी सर्व्हे नं.४/१ पै. मधिल श्रीराम पार्किंगमध्ये १२ बायोमेट्रीक पास काऊंटर्स करीता शेड सन-२०१७ मध्ये तयार करणेत आलेले होते. सदर शेड मंदिरापासून थोडे जादा अंतरावर होते. इकडील विभागाचे दि.०५/११/२०१९ रोजीचे मंजूर टिपणीन्वये सदरचे बायोमेट्रीक पास काऊंटर शेड त्यांचेच प्लॉटमध्ये हॉटेल गोरडीया लगत मंदिराचे जवळ हलविणे व याकामी येणा-या अपेक्षित रू.२,९५,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती. तदनंतर इकडील जा.क्र.३१५४/२०१९, दि.१५/११/२०१९ चे कोटेशन मागणी पत्रान्वये कोटेशन मागविणेत आले.

सदरकामी प्राप्त दरांनुसार ठेकेदार एस. एस. कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स, शिर्डी यांना इकडील जा.क्रं.एसएसएसटी/बांधकाम/४०१९/२०२०, दि.१०/०१/२०२० अन्वये रु.२,८१,४१०/- मात्रचा कार्यादेश देण्यात आला. त्यानुसार ठेकेदार यांनी कामास सुरुवात केली.

तथापी तदनंतर काम सुरू असतांना जगभरात उदभवलेल्या कोरोना-१९ विषाणुजन्य साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून साईभक्तांकरीता श्री साईबाबा समाधी मंदिर दर्शन व्यवस्था, श्री साई प्रसादालय, सर्व भक्तनिवासस्थाने, कॅन्टीन इ. सुविधा दि.१७/०३/२०२० दुपारी ०३.०० वाजेपासून पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यामूळे शासन आदेशानुसार संस्थानची सुरू असलेली सर्व बांधकामे बंद करणेत आली.

त्यावेळी साईनिवास अतिथीगृहासमोर संस्थानचे बायोमेट्रीक पास वितरण काउंटर्स होते. त्यामुळे साईनिवास येथिल बायोमेट्रीक पास काऊंटर काढून ते श्रीराम पार्कीग सर्व्हे नं.०४ श्री नितिन उत्तमराव कोते यांचे क्षेत्रात स्थलांतरीत करणे व सदर जागा दर्शनरांग प्रकल्पाचे ठेकेदार यांना UGT, STP चे बांधकामासाठी उपलब्ध करुन देणेसाठी दि.१९/०३/२०२० चे टिपणी अन्वये मान्यता घेणेत आली.

त्यानुसार लॉकडाऊन नंतर कामास सुरूवात करून ठेकेदार एस. एस. कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स, शिर्डी यांनी साईनिवास अतिथीगृहासमोर संस्थानचे बायोमेट्रीक पास वितरण काउंटर्स शेड खोलून ते श्रीराम पार्कीग सर्व्हे नं.०४ येथे स्थलांतरीत केले आहे.

सदर कामासाठी रु.२,९६,९३६/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

१०) शांतिनिवास इमारत पश्चिम बाजूकडील जनरल टॉयलेटचे बाहेरील भिंतीस स्टोन क्लॅडींग करणे.

कामाची निकड - मंदिर परिसरातील शांतिनिवास इमारतीचे तळमजल्यावरील जनरल टॉयलेटस् हे साईभक्तांचे वापरासाठी उपयोगात येत आहे. सदर टॉयलेटचे लेडीज व जेन्टस बाजू प्रवेशव्दारांसमोरील दर्शनी भाग ओपन असल्यामुळे साईभक्तांची कुचंबना होत होती. त्यामुळे टॉयलेटचे बाहेरील भिंतीचे बांधकाम करुन त्यावर स्टोन क्लॅडींग करणेत आले आहे.

संक्षिप्त विवरण – मंदिर परिसरातील शांतिनिवास इमारतीचे तळमजल्यावरील जनरल टॉयलेटचे बाहेरील भिंतीचे बांधकाम विभागाकडील उपलब्ध मटेरिअल वापरून करुन घेणेस व स्टोन क्लॅडींग करणेकामी येणारे रक्कम रू.९३,७२४/- मात्रचे खर्चास व स्टोन क्लॅडींगचे काम करणारे ठेकेदाराकडून प्र. कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीने कोटेशन मागवून काम करणेस दि.२४/११/२०२० रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेणेत आलेली आहे.

सदरचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आले. प्राप्त झालेल्या कोटेशनमधील निम्नतम दराचे दरधारक श्री भारत बी रोकडे, लोणी यांना दि. २३/१२/२०२० रोजीचे पत्राने रु. ६०,५३३/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला. ठेकेदार यांनी विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. परंतु केलेल्या कामाचे बिल ठेकेदार यांनी आजअखेर अदायगीसाठी सादर केलेले नाही.

११) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना राबविणेकरीता ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेबाबत..

कामाची निकड – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत श्री साईबाबा सुपर स्पेशालीटी रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय ही दोन्ही रुग्णालय गरीब व गरजु रुग्णांचे उपचारासाठी चालविले जातात. श्री साईबाबा सुपर स्पेशालीटी रुग्णालयात दि.१४/०२/२०१३ पासून महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना सुरु करण्यात आलेली आहे व दि.११/०९/२०१९ पासून प्रधान मंत्री जनआरोग्य योजना सुरु करण्यात आलेली आहे.

महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेमध्ये एकूण रु.१,५०,०००/- मात्र प्रती वर्षी प्रत्येक रुग्णास संरक्षण आहे व या योजनेमध्ये १३०० आजारांचा समावेश आहे. तसेच प्रधान मंत्री जनआरोग्य योजने मध्ये प्रतीवर्षी एकूण रु.५,००,०००/- मात्र प्रत्येक रुग्णास संरक्षण असून या योजणामध्ये ११०० आजारांचा समावेश आहे. त्यातील एकूण ४१५ आजारावर श्री साईनाथ रुग्णालयात उपचार केले जातात.

सध्या संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना मोफत उपचार देण्यात येतात. शासनाचे महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा रुग्णांना लाभ घेता यावा यासाठी आवश्यक बैठक व्यवस्था करणेसाठी श्री साईनाथ रुग्णालयाचे तळमजल्यावर ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेत आली आहे.

संक्षिप्त विवरण – याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,२०,५००/- मात्रचे खर्चास इकडील विभागाचे दि.०२/०७/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागणी पत्र देऊन ठेकेदारांकडून व संस्थानचे संकेत स्थळावर कोटेशन मागणीपत्र प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेत आले आहे. निम्नतम दर देणारे ठेकेदार साई करनी मॉ फर्निचर, शिर्डी यांना दि.२७/०७/२०२१ रोजीचे पत्राने

रु.१,३८,१७०/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. ठेकेदार यांचे मार्फत काम पूर्ण करणेत आले असून अद्याप ठेकेदार यांनी सदरहू कामाचे बिल संस्थानकडे सादर केलेले नाही.

१२) लाडू प्रसाद निर्मिती विभागातील बुंदी किचन शेडमधील फ्लोरींगकरीता पॉलीश्ड कोटा फरशी बसविणेबाबत.

कामाची निकड – श्री साईप्रसादालयामधील मोतीचूर बुंदी किचनमध्ये प्रसादाची बुंदी तळण्याचे काम करणेत येते. सदर किचनमध्ये रफ शहाबाद फ्लोरींग बसविणेत आलेली होती. सततचे वापराने व भट्टयांच्या उष्णतेमुळे सदरची रफ शहाबाद फ्लोरींग फुटलेली असल्याने साफसफाई करणेस अडचण येत असल्याने लाडू प्रसाद निर्मिती विभागातील बुंदी किचन शेडमधील फ्लोरींगकरीता पॉलीश्ड कोटा फरशी बसविणेत आली आहे.

संक्षिप्त विवरण - त्यानुसार किचनचे फ्लोरींगला पॉलीश्ड कोटा फ्लोरींग व भिंतींना डॅडो बसविणेकामी येणारे रक्कम रु.३,५६,४००/- मात्रचे खर्चास दि.०५/०१/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आली आहे. याकामी वर्तमान पत्रात व शासनाचे संकेत स्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने ई निविदा मागविणत आल्या होत्या. प्राप्त झालेल्या ई निविदांमधील निम्नतम दरधारक सागर समाधान जायभावे, नाशिक यांना संस्थानचे दि.०६/०३/२०२१ रोजीचे पत्राने रु.३,२५,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला. ठेकेदार यांनी विहीत मुदतीत दि.१४/०४/२०२१ अखेर काम पूर्ण केले आहे. प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम रु.३,०८,४८६/- मात्र इतकी आहे.

१३) साईपालखी निवारा येथिल बी इमारती मधील रुम्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणेकरीता बुकींग कार्यालय, काऊंटर, स्टोअर रुम व कॅन्टीन व्यवस्था करणेबाबत.

कामाची निकड- मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार साई पालखी निवारा बी इमारतीतील ६४ वातानुकूलित रुम्स साईभक्तांच्या निवास व्यवस्थेकरीता सुरु करणेसाठी सदर इमारतीचे तळमजल्यावर मोकळया जागेत रुम बुकींग कार्यालय व काऊंटर तसेच स्टोअर रुम व कॅन्टीन व्यवस्था तयार करणे आवश्यक होते. सदरहू ठिकाणी ऐरोकॉन पॅनल पार्टीशन मध्ये रुम बुकींग कार्यालय, स्टोअर रुम, पॅनल रुम व कॅन्टीन व्यवस्था तयार करणेत आली आहे.

संक्षिप्त विवरण -श्री साईबाबा संस्थानला साईभक्त श्री. काशिनाथ गोविंद पाटील, वसई यांचेकडून साईपालखी निवारा, निघोज-निमगांव शिर्डी येथिल बी इमारत देणगी स्वरुपात मिळालेली आहे. मा. तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३३८ अन्वये सदर पालखी निवारा बी इमारतीतील ६४ वातानुकूलीत रुम्स साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी सुरु करणेस तसेच या इमारतीतील आवश्यक कामे विभागाकडून करुन घेणेकामी मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार सदर इमारतीचे तळमजल्यावर मोकळया जागेत रुम बुकींग कार्यालय व काऊंटर तसेच स्टोअर रुम व कॅन्टीन व्यवस्था तयार करणे आवश्यक होते. मंजूर बांधकाम नकाशात सदरहू इमारतीचे तळ मजल्यावर पार्किंग दर्शविलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी विट बांधकाम करुन कायम स्वरुपी रुमचे बांधकाम करता येणार नसल्याने सदरहू ठिकाणी ऐरोकॉन पॅनल पार्टीशन मध्ये रुम बुकींग कार्यालय, स्टोअर रुम, पॅनल रुम व कॅन्टीन तयार करणेत आले आहे. एकत्रिकृत विकास, नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) २०२० दि.०२.१२.२०२० पासून लागू झालेली आहे. उक्त नियमावलीमधील नियम क्र.२.१.२, नियम क्र.२.१.७ नुसार बांधकाम परवानगी घेतलेल्या बांधकामामधील दुरुस्तीचे बांधकाम करण्यास परवानगीची आवश्यकता नाही असे नमूद असल्यामुळे या प्रकरणी नव्याने बांधकाम परवानगी घेण्याची आवश्यकता नव्हती.

याकामी येणारे खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस दि.३०/०७/२०२० रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार निम्नतम दरधारक मातोश्री इंटेरिअर नाशिक यांना संस्थानचे जा. क्रं. ११६२/२०२०, दि.२५/०८/२०२० रोजीचे पत्राने रक्कम रु.२,६३,१७४/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. ठेकेदार यांनी विहीत मुदतीत काम पूर्ण केले असून प्रत्यक्ष मोजमापानुसार बिलापोटी त्यांना रक्कम रु. २,५३,३००/- मात्र रक्कम अदा करणेत आलेली आहे.

१४) श्री साईप्रसादालय येथील बुंदी लाडू किचन व अन्नदान हॉलमध्ये ग्रेनाईट ओटा तयार करणेबाबत.

कामाची निकड- श्री साईप्रसादालय परिसरात लाडू निर्मिती विभागामध्ये कर्मचा-यांमार्फत फर्शिवर बसून लाडू बांधणेचे काम करणेत येत होते. कर्मचा-यांचे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून तसेच कामगारांना उभे राहून लाडू बांधणे सोईचे व्हावे या करीता बुंदी किचन व नाष्टा पाकीट बनविण्याचे हॉलमध्ये ग्रेनाईट मध्ये ओटा बनविणेत आला आहे.

संक्षिप्त विवरण - याकामी येणारे खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस दि.२८/०४/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार निम्नतम दरधारक श्री सागर विठ्ठल धाकतोडे, नांदुर्खी यांना संस्थानचे जा. क्रं.५६६/२०२१, दि.२०/०५/२०२१ रोजीचे पत्राने रक्कम रु.२,३२,२००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. ठेकेदार यांनी सदरचे काम पूर्ण केले असून बुंदी लाडू किचन मधील ओटा तयार करणे कामाचे बिलापोटी त्यांना रक्कम रु.१,७२,८००/- मात्र रक्कम अदा करणेत आलेली आहे.

१५) संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतीनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकामी लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणे.

कामाची निकड – शांतिनिवास इमारतीत दुस-या व तिस-या मजल्यावर प्रशासकिय कार्यालय आहे. कर्मचारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांना प्रशासकीय कार्यालयात येणेसाठी एकच जिना आहे. याशिवाय दिव्यांग व वयोवृध्दासाठी लिफ्टची आवश्यकता असल्याने संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतीनिवास इमारतीस लिफ्ट बसविणे आवश्यक असल्याने लिफ्ट शाफ्टचे बांधकाम सुरु केलेले आहे.

संक्षिप्त विवरण - त्यानुसार प्रशासकीय कार्यालयाच्या शांतिनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकामी लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणेसाठी विहती पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१४,६५,२५६/- मात्रचे खर्चास मा. तदर्थ समितीचे दि. ११/१२/२०२० रोजीचे सभेत निर्णय क्रं. ४९४ अन्वये मान्यता देणेत आली आहे. सदरहू कामास शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची बांधकाम परवानगी मिळणेसाठी इकडील जा. नं. ३२३०/२०२१, दि. २२/०१/२०२१ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास शिर्डी नगरपंचायत यांनी जा. क्रं. नप/टे८१२/२०२१, दि.०४/०६/२०२१ रोजीचे पत्रान्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेत येऊन ई-निविदा मागविणेत आल्या. सदर जाहिरातीनुसर ई-निविदा कालावधी दि.२०/०४/०२१ ते दि.०४/०५/२१ असा होता. तथापी, सदर मुदतीमध्ये एकही ई-निविदा प्राप्त न झालेमुळे दि.११/०५/२०२१ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व्दितीय मागणीची जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन सदर ई-निविदा कालावधी दि.२५/०५/२०२१ ते दि.०३/०६/२०२१ अखेर असा होता. सदर विहीत मुदतीमध्ये ०३ ठेकेदार यांनी ई-निविदा सादर केल्या व त्यापैकी केवळ ०१ ठेकदार सनराईज कंस्ट्रक्शन, नाशिक हे ठेकेदार तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरले. सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ मधील शर्त क्रं. ४.३ एक निविदा (Single Tender) कार्यपध्दती अन्वये वाणिज्यीक देकार उघडणेत आला.

निम्नतम दराचे पात्र ठेकेदार सनराईज कंस्ट्रक्शन, नाशिक यांना चर्चा दि.०९/०७/२०२१ रोजी चर्चा – वाटाघाटीसाठी बोलविणेत आले. ठेकेदार यांचे प्रतिनिधी यांना निविदा रकमेत सवलत देणेबाबत विचारणा करणेत आली. त्यावेळी ठेकेदार यांची निविदाधिन रक्कम अंदाजपत्रकीय किंमत रु.११,७९,७३९/- पेक्षा ४.५९३८ % कमी असून त्यांनी चर्चा वाटाघाटी नंतर अंदाजपत्रकीय रकमेच्या एकूण १०% ने कमी केली आहे. त्यानुसार निविदा रक्कम रु.१०,६१,६७५/- मात्र येते.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, निर्णय क्र.सीएटी२०१७/प्र.क्र८/इमा-२ दि.१२/०४/२०१७ मधील शर्त क्र.४.६.३ नुसार १० टक्के कमी दराच्या निविदेला निविदाधिन रकमेच्या १ % एवढया किमतीची बँकेची प्रतीपुर्ती हमी परफॉरमंस सिक्युरीटी हमी म्हणून जमा करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार निविदेच्या अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा निविदाधिन रक्कम १० % कमी असल्याने एकूण १ % नुसार होणार पूर्णांकित रक्कम ११,८००/- मात्र रकमेची बँकेची प्रतीपुर्ती हमी जमा करुन घेऊन कार्यादेश देणेबाबत विषय मा.तदर्थ समितीपुढे चक्रिय पध्दतीने सादर करणेत येऊन मान्यता घेणेत आली व त्यानुसार ठेकेदार यांना कार्यादेश देणेत आला आहे.

१६) समाधी मंदिर परिसरातील व्हीआयपी कक्ष व जनसंपर्क कार्यालय मधील मोकळया पॅसेजवर आरसीसी स्लॅब टाकणे तसेच सदरहू इमारतीचे छतावर जाणेसाठी आरसीसी जिना तयार करणेबाबत..

कामाची निकड - श्री साईबाबा दर्शनरांग प्रकल्पातील दर्शन लाईन कॉरीडॉर मंदिर परिसरात शांतिनिवास इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर जोडला आहे. सदरहू कॉरीडॉरमुळे साई सभागृह व व्हीआयपी कक्षाचे टेरेसवर जाता येत नाही. त्यामुळे टेरेसवर साफसफाई व इतर दुरुस्तीचे कामाकरीता जाणे अडचणीचे झाले असल्याने जनसंपर्क कार्यालय, व्हीआयपी कक्ष यामधील मोकळया जागेवर आरसीसी स्लॅबचे कॉक्रीटींग करणे तसेच टेरेसवर जाणेसाठी आरसीसी जीना तयार करणेत आला आहे.

संक्षिप्त विवरण- सदरहू बांधकामास शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची बांधकाम परवानगी मिळणेसाठी इकडील जा. नं. ११८९/२०२१, दि.०८/०७/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी जा. क्रं. नप/टे८१२/६०९/२०२१, दि.०५/०८/२०२१ रोजी बांधकाम परवानगी दिलेली आहे. याकामी येणारे रक्कम रु. ४,९८,५००/- मात्रचे खर्चास तसेच विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस दि.२६/०६/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार निम्नतम दरधारक श्रीमं भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना संस्थानचे जा. नं. एसएसएसटी/बांधकाम/१३७४/२०२१, दि.२३/०७/२०२१ रोजीचे पत्राने रक्कम रु.४,८७,३८२/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरहू काम सध्या पूर्णत्वाचे टप्प्यावर आहे.

१७) श्री साईप्रसादालयात अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओट्याचे बांधकाम करणेबाबत..

कामाची निकड – श्री साईप्रसादालयात दररोज सुमारे ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. साईभक्तांना रु.१०/- मात्र इतक्या नाममात्र दरात अथवा देणगीतून विनामुल्य प्रसाद भोजन उपलब्ध करुन दिले जाते. अन्न हे पूर्णब्रम्ह आहे त्याचा नाश करु नये आवश्यक आहे तेवढेच पात्रात घ्यावे. जेणेकरुन अन्नाचा नाश होणार नाही. एकंदरीत प्रसाद भोजन घेतांना साईभक्तांचे मनात एक सात्विक भावना असावी. याशिवाय आजही प्रत्येकाचे घरात अन्नपूर्णा देवीची मुर्ती असते. घरात अन्न कमी पडू नये देवाने भरभरुन द्यावे अशी भावना प्रत्येकाचे मनात असते त्याच धर्तीवर श्री साईप्रसादालयात भक्तांना पुरविणेसाठी अन्न कधीही कमी पडू नये याकरीता श्री साईप्रसादालयात अन्नपूर्णा देवीच्या मुर्ती बसविणेसाठी ओट्याचे बांधकाम करणेत आले आहे.

संक्षिप्त विवरण- श्री साईप्रसादालय विभागाकडील दि.१२/१०/२०२० रोजीचे टिपणीन्वये अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी आवश्यकतेनुसार बांधकाम फर्निचर व संगमरवरी /मार्बल मध्ये काम करुन द्यावे असे कळविलेले होते. श्री

साईप्रसादालयात भोजन विक्री काऊंटरचे पश्चिम बाजूकडील पॅसेजमध्ये पुर्वाभिमुख अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओटा तयार करुन त्यावर ग्रेनाईट बसविणेकामी दि.०४/०४/२०२१ रोजीचे टिपणीन्वये रु.९२,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार देवीची मुर्ती स्थापन करणेसाठी ओटा बनवून त्यावर व मुर्तीचे पाठीमागील भागाचे भिंतीवर ग्रेनाईट बसविणेसाठी मजुरी दराचे व ग्रेनाईट खरेदीचे कोटेशन मागविणेत आले होते. त्यानुसार निम्नतम दराचे मजूरी ठेकेदार सागर विठ्ठल धाकतोडे, नांदुर्खी यांना जा. नं. ११३/२०२१, दि.०७/०४/२०२१ रोजीचे पत्राने रु. १८,३००/- मात्र रकमेचा कार्यादेश देऊन सदरचे काम पूर्ण करणेत आले आहे. सदर कामासाठी लागणारे विट, वाळू व सिमेंट इ. मटेरिअल संस्थानकडील उपलब्ध मटेरिअल मधून वापरलेले आहे. तसेच आवश्यक ग्रेनाईट निम्नतम दराचे पूरवठादार साईकृष्णा ग्रेनाईट ॲण्ड टाईल्स, साकुरी यांचेकडून जा. नं. ११२/२०२१, दि.०७/०४/२०२१ रोजीचे व जा. क्रं. २१४/२०२१, दि. १४/०४/२०२१ रोजीचे पुरवठा आदेशाने खरेदी करणेत आले आहे. त्यासाठी एकूण रक्कम रु.७०,७५६/- मात्र खर्च आलेला आहे.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे श्री साईप्रसादालयात भोजन विक्री काऊंटरचे पश्चिम बाजूकडील पॅसेजमध्ये पुर्वाभिमुख अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ४' ६" लांब व ४' ६" रुंद तसेच ०३ फुट उंच या आकाराचा ओटा व त्यामागे भिंत बांधून त्यावर ग्रेनाईट बसविणेबाबत आला आहे. याकामी सागर विठ्ठल धाकतोडे, नांदुर्खी यांनी मजूरी दराने सदरचे काम पूर्ण केले असून त्यांना रक्कम रु. १८,७७९/- मात्र इतक्या रकमेचे बिल अदा करणेत आले आहे. तसेच खरेदी केलेल्या ग्रेनाईटचे रक्कम रु.७०,७५६/- मात्र रकमेचे साईकृष्णा ग्रेनाईट ॲण्ड टाईल्स, साकुरी यांना बिल अदा करणेत आले आहे. याकामी एकूण रक्कम रु. ८९,५३५/- मात्र खर्च आलेला आहे.

१८) समाधी मंदिरातील तळघरातील कॅश काऊंटींग हॉलचे पूर्व बाजूकडील जिन्यावर आर.सी.सी स्लॅब टाकण्याचे काम ठेकेदार श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई यांचेकडून व फ्लोरींगसाठी मार्बल बसविण्याचे काम जय भवानी ग्रेनाईट ॲन्ड टाईल्स, साकुरी यांचेकडून देणगीदाखल करुन घेणे बाबत...

कामाची निकड- समाधी मंदिरात दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची रांग अंडरपासमधून जिन्याने वर आल्यानंतर प्रथम व्दारकामाई मंदिरात दर्शन घेऊन श्रींचे समाधीचे दर्शनासाठी जाते. व्दारकामाईकडे जाणा-या दर्शनरांगेसाठी काऊंटींग हॉलचे जिन्याचे डक्टमुळे अडचण येत होती तसेच दर्शनरांगेतून लहान मुले डक्टमध्ये डोकावतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समाधी मंदिरातील तळघरातील कॅश काऊंटींग हॉलचे पूर्व बाजूकडील जिन्याचे डक्टवर आर.सी.सी स्लॅब टाकण्याची आवश्यकता असल्याने सदर काम लॉकडाऊन काळात समाधी मंदिर दर्शनासाठी बद असल्याचे कालावधीत करण्यात आले आहे.

संक्षिप्त विवरण- त्यानुसार याकामी २.५२ मी.x २.७७ मी. x ०.१५ मी. या साईजचा स्लॅब टाकणेचे नियोजित होते. जिन्यावर आर.सी.सी. स्लॅबचे छत व फ्लोरींगसाठी मार्बल बसविणेसाठी एकूण रक्कम रु.१,०२,३७७/- मात्र खर्च अपेक्षित होता. यामध्ये जिन्यावर आर.सी.सी स्लॅबचे छत टाकणेचे सुमारे रु.७९,२४९/-मात्र रकमेचे काम श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा.लि. यांनी देणगीदाखल करुन दिले आहे. तसेच फ्लोरींगसाठी मार्बल बसविण्याचे सुमारे रु.२३,१२८/- मात्र रकमेचे काम जय भवानी ग्रेनाईट ॲन्ड टाईल्स, साकुरी प्रो.प्रा. श्रीपतसिंग जाट यांनी देणगीदाखल करुन दिले आहे.

प्रस्ताव:- तरी दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०७/२०२१ अखेरचे कालावधीत करण्यात आलेल्या वर नमूद क्रं. ०१ ते १८ मधील सिव्हील बांधकामांची माहिती अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सविनय सादर.

23/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

14.8 14/08

विषय क्र.- १०८

मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ

(सामान्य प्रशासन विभाग)

विषय – श्री बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांचा खातेनिहाय चौकशी दरम्यान न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवानिलंबन शिक्षा रद्द करून, त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा अपील अर्ज...

टिपणी-

अ) विषयाची पुर्वपिठीका-

श्री बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनिस, श्री साईप्रसादालय विभाग यांनी दि.२८.०८.२०१९, दि.२९.०८.२०१९ व दि.२३.१०.२०१९ रोजीच्या अर्जान्वये अशी विनंती केलेली आहे की,

१) दिं.१६.०८.२०१४ रोजी श्रींचे समाधी मंदिर येथे घडलेल्या गैरशिस्तवर्तनान्वये, मला सेवानिलंबीत करण्यात आले होते. त्यानुसार, ॲड.श्री बी.वाय.काळवाघे, संस्थान नियुक्त खातेचौकशी अधिकारी यांचेमार्फत खातेचौकशी पर्णु करून खातेनिहाय चौकशीचा अंतिम निष्कर्ष अहवाल संस्थानकडे सादर केलेला आहे. सदर निष्कर्ष अहवालामध्ये माझेवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झालेले नसुन, मला निर्दोष ठरविण्यात आलेले आहे. खातेनिहाय चौकशी दरम्यान माझे तात्पुरते स्वरूपात केलेल्या सेवा निलंबन (दि.११.१०.२०१४ ते दि.१७.०६.२०१५ अखेर एकुण ०८ महिने, ०६ दिवस) कालावधीतील वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढी, सेवा निलंबीत कालावधीतील पगार, भत्ते व इतर लाभांपासुन मला आजपर्यत वंचित ठेवण्यात आलेले आहे. तसेच मला दि.१८.०६.२०१५ पासुन पुर्नस्थापना करून, कामावर रूजु करून घेण्यात आलेले आहे. सदर बाबही माझ्यावर अन्यायकारक असुन, माझी सेवा पुर्नस्थापीत न करता नियमित करून, मला सदर कालावधीतील सर्व लाभ (नियमित) इतर स्थायी कर्मचा-याप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने लागु करावेत, अशी मागणी केलेली आहे.

२) मी माझे आईचे आजारपणामुळे, कौटुंबीक अडचणीमुळे मी सन २०१२ व २०१३ साली नियमित कामावर येवु शकलेलो नव्हतो. सदर कालावधीत मी संस्थानचे नियमांप्रमाणे किरकोळ रजा, अर्जित रजा, सार्वजनिक रजा विहीत कालावधीत अर्ज भरून उपभोगलेल्या होत्या. परंतु सदर रजा/सुट्टया संपल्यामुळे मी नियमाप्रमाणे विनावेतन रजा घेतलेल्या असुन, त्यानंतर माझ्या विनावेतन रजा संपुष्टात आलेल्या असल्याने, पर्यायाने मी उर्वरीत रजा ना काम ना वेतन या तत्वावर विहीत नमुन्यातील रजा अर्ज सादर करून घेतलेल्या होत्या. परंतु प्रशासनाने विशेष बाब म्हणुन इतर स्थायी कर्मचा-यांप्रमाणे माझ्या रजा अर्जांचा सहानभुतीपुर्वक विचार न करता, मला ३९ दिवस, ८१ दिवस, १४६ दिवस असे एकुण २६६ दिवसांच्या रजा विनापरवानगी (अनाधिकृत) धरून, मला तिनवेळेस ०४ दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत केलेले होते. त्यामुळे माझी सेवा खंडीत झालेली असुन, मला पगाराचे आर्थिक लाभापासुन वंचित रहावे लागलेले आहे.

तरी, मी रितसर अर्ज भरूनही प्रशासनाने माझे सदरहु रजा अर्ज नामंजुर करून, मला तिनवेळेस ०४ दिवस सेवानिलंबीत केलेले होते. तरी त्या कालावधीतील माझे रजा अर्ज मंजुर करून, माझी सेवा पुर्वलक्षी प्रभावाने (स्थायी कर्मचा-याप्रमाणे) नियमित करावी अशी मागणी केलेली होती.

त्यासअनुसरून, सामान्य प्रशासन विभागामार्फत दि.२१ नोव्हेंबर, २०१९ रोजी सविस्तर टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे निर्देश दिलेले आहेत की, " शिक्षा आदेश रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्षांना आहेत संबंधीतांना अपील करणेस कळवावे." सदर निर्देशाच्या अनुषंगाने, श्री गायके यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२४७६/२०२०, दि.०७ फेब्रुवारी, २०२० अन्वये, पत्र देण्यात आलेले आहे.

आता, श्री गायके यांनी दि.२८.०७.२०२० रोजी मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे खातेनिहाय चौकशी दरम्यान मला न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवानिलंबन शिक्षा रद्द करून, त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा विनंती अर्ज/अपील अर्ज केलेला आहे.

सेवाविनियमातील अपिल करणेबाबतची तरतूद-

मा.शासनाने मंजूर केलेले सेवाविनियम संस्थानला दि.०१ जानेवारी, २०१५ पासून लागू करण्यात आलेले आहेत. त्यामधील **प्रकरण ५ अपिले** मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे-

...२) जर कार्यकारी अधिका-यांनी दंडात्मक कार्यवाही लादली तर विनियम ६ मधील तरतुदींच्या अधिन राहुन संस्थानाचा कर्मचारी समितीकडे अपील दाखल करण्याचा पर्याय निवडु शकतो.

पान नं.०२ वर...कृ.मा.प...

तसेच कलम १४ (१) मध्ये तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदींच्या अधिन राहुन, संस्थानाचा कर्मचारी, त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो, कार्यकारी अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाविरूध्द समितीकडे अपील दाखल करू शकतो.

तसेच कलम १५- कोणतेही अपील अपीलदाराला ज्या आदेशाविरूध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून तिस दिवसाच्या आत दाखल केले पाहिजे, अन्यथा ते स्विकारले जाणार नाही.

त्यासअनुसरून, श्री गायके यांचे विनंती अपील अर्जाबाबत वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे-

ब) वस्तुस्थिती-

श्री गायके यांची जा.क्र.एसएसएस-वशी-१-२५९३-२००३, दि.२० ऑक्टोबर, २००३ रोजी वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. ते दि.२१.१०.२००३ रोजी कॅन्टीन विभागात हजर झालेले आहेत. श्री गायके यांना सन २००३ ते सन २०११ पर्यंत नियमित वार्षिक वेतनवाढ लागू करण्यात आलेली आहे.

सन २०१२ चे वेतनवाढीबाबत -

श्री गायके हे सन २०१२ चा वार्षिक वेतनवाढ कालावधी दि.०१.०७.२०११ ते दि.३०.०६.२०१२ दरम्यान २८६ दिवस विनावेतन/खाडे गैरहजर आहेत. त्यांना सदर कालावधीत देण्यात आलेल्या गैरशिस्तवर्तन शिक्षेचा तक्ता खालीलप्रमाणे-

अ.क्र.	विनावेतन/खाडे गैरहजर दिनांक	शिक्षा
०१	दि.०७.६.२०११, दि.०८.०६.२०११ ते दि.३१.१०.२०११	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४८३०/२०१३, दि. ११ मार्च, २०१३ अन्वये, संस्थानचे सेवेतुन दि.१४.०३.२०१३ ते दि.१७.०३.२०१३ पर्यंत चार दिवस सेवा निलंबीत करणेत आले आहे.
०२	दि.१०.१२.२०११ ते दि.१३.१२.२०११	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४३५८/२०११, दि. २५ डिसेंबर, २०११ अन्वये, दि.१०.१२.२०११ ते दि.१३.१२.२०११ एकुण ०४ दिवस विनावेतन खाडे व लेखी समज देण्यात आलेली आहे.
०३	दि.१५.१२.२०११ ते दि.२६.१२.२०११ दि.२९.१२.२०११ ते दि.०६.०३.२०१२	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३९५८/२०१३, दि. ०२ जानेवारी, २०१३ अन्वये, संस्थानचे सेवेतुन दि.०४.०१.२०१३ ते दि.०७.०१.२०१३ पर्यंत चार दिवस सेवा निलंबीत करणेत आले आहे.
०४	दि.०७.०३.२०१२ ते दि.०४.०४.२०१२ दि.०६.०४.२०१२ ते दि.१४.०४.२०१२	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०६९/२०१२, दि. १२ जुन, २०१२ अन्वये, संस्थानचे सेवेतुन दि.१४.०६.२०१२ ते दि.१७.०६.२०१२ पर्यंत चार दिवस सेवा निलंबीत करणेत आले आहे.

क) श्री गायके यांचे सन २०१५ चे वार्षिक वेतनवाढीबाबत –

श्री गायके यांना सन २०१३ व सन २०१४ ची वार्षिक वेतनवाढ लागू करणेत आलेली आहे. दि.१.७.२०१४ ते ३०.६.२०१५ या कालावधींत श्री गायके हे तात्पुरते सेवानिलंबीत असल्याने ते २४९ दिवस कामावर गैरहजर होते. त्यामुळे त्यांना सन २०१५ ची वार्षिक वेतनवाढ लागू करणेत आलेली नाही. त्याविषयीचा तपशिल खालीलप्रमाणे-

१. श्री गायके यांचें दि.१६.०८.२०१४ रोजीच्या श्री साईबाबा मंदिर गाभा-यात साईभक्तांचे फोटो काढणे या गैरशिस्तवर्तनाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२४१/२०१४, दि.११.१०.२०१४ रोजीच्या आदेशान्वये तात्पुरते सेवानिलंबीत करण्यात आले होते.

२. श्री गायके यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३५५५/२०१४, दि.२९.१०.२०१४ अन्वये आरोपपत्र देण्यात येऊन खातेचौकशी करण्यात आली.

पान नं.०३ वर....

३. श्री गायके यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११३०/२०१५, दि.१७.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये खातेचौकशी कामकाजात सहकार्य करण्याच्या अटीवर दि.१८.०६.२०१५ पासुन पुर्नस्थापना करण्यात येऊन कामावर हजर करून घेण्यात आले.

४. ॲड.बी वाय काळवाघे, खातेचौकशी अधिकारी यांनी श्री गायके यांचा खातेचौकशी अहवाल दि.२३.०२.२०१६ रोजी सादर केलेला होता, त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे.

१) **श्री बापु बाबुराव गायके, मदतनीस, श्री साई प्रसादालय दोषी नाहीत.**

२) **श्री गायके यांनी द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅन्डींग ऑर्डर) सन १९४६ खालील स्थायी आदेश कलम २४(ए) व २४ (एल) नुसार गैरशिस्तवर्तन केलेले नाही,** असे नमुद आहे.

५. ॲड.बी वाय काळवाघे, खातेचौकशी अधिकारी यांनी सादर केलेला निष्कर्ष अहवाल कामगार विभागाच्या दि.१४.०४.२०१६ रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती. सदर टिपणीचे अवलोकन करता, त्यावर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी श्री बाजीराव शिंदे सो. यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत-

१) दि.१९/०५/२०१६ रोजी श्री गमे सो.चर्चा करावी.

२) तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री गमे सो. यांनी, क.कामगार अधिकारी " कृपया मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे निर्देशाप्रमाणे तात्काळ ०३ महिन्यांचे आंत फेरचौकशी करून अहवाल सादर करणेत यावा. " असे निर्देश दिलेले आहेत.

६. त्यावर दि.१६/०६/२०१६ रोजी चर्चा होऊन तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी फेर सादर करावे असे निर्देश दिलेले आहेत. सोबत दि.१४.४.२०१६ रोजीची टिपणी अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

७. कामगार विभागामार्फत दि.११.०८.२०१६ रोजी टिपणी फेरसादर करणेत आलेली होती. सदर टिपणीच्या मंजूरीअन्वये, श्री गायके यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२६७६/२०१६, दि.१८.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन ताकीद देण्यात आलेली आहे. परंतु, सदर आदेशात निलंबन कालावधीबाबत कुठलेही निर्देश देण्यात आलेले नसल्याने श्री गायके यांना सन २०१५ ची वार्षिक वेतनवाढ देण्यात आलेली नाही.

सोबत, **परिशिष्ट अ** मध्ये श्री गायके यांचे सेवापुस्तकात असलेल्या नोंदी व त्यांचे वैयक्तिक नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार, त्यांना आजपावेतो देणेत आलेल्या वेतनाबाबतचा सविस्तर अहवाल जोडला आहे व श्री गायके यांचा गैरशिस्तवर्तन शिक्षेचा तक्ता **परिशिष्ठ ब** म्हणून जोडलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती .

ड) <u>विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव-</u>

१. सेवाविनिमयातील कलम नं.१५ अन्वये, कोणतेही अपील अपीलदाराला ज्या आदेशाविरूध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून तिस दिवसाच्या आत दाखल केले पाहिजे, अन्यथा ते स्विकारले जाणार नाही. अशी तरतूद आहे. श्री गायके यांनी वेतनवाढ व इतर लाभ मिळणेसंदर्भात केलेला अपील अर्ज हा आदेश पारीत झालेनंतर तीन महिन्यांनंतरचा आहे. त्यामुळे सेवाविनियमातील तरतुदीन्वये श्री गायके यांचा अर्ज फेटाळता येईल.

२. वार्षिक वेतनवाढ देणसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ कलम १० अन्वये, सर्व कर्मचा-यांना दरवर्षी दिनांक १ जुलै या एकाच दिनांकास वार्षिक वेतन वाढ मंजुर करण्यात येईल. दिनांक १ जुलै रोजी ज्या कर्मचा-यांची सुधारित वेतन संरचनेमध्ये ६ महिने किंवा त्यापेक्षा आधिक सेवा पुर्ण होईल ते कर्मचारी दिनांक १ जुलै रोजी वेतनवाढ मिळण्यास पात्र राहतील. असे नमुद आहे.

३. सन २०१२ मध्ये श्री गायके हे दि.०१.०७.२०११ ते दि.३०.०६.२०१२ दरम्यान एकुण २८६ दिवस गैरहजर असल्यामुळे त्यांना सदरहु २०१२ ची वार्षिक वेतनवाढ देय्य होत नाही.

४. सन २०१५ च्या वार्षिक वेतनवाढीसंदर्भात-

श्री गायके यांच्या गैरशिस्तवर्तन प्रकरणामध्ये ॲड.श्री. बी. वाय. काळवाघे, संस्थान नियुक्त खातेचौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशीअंती अहवाल व निष्कर्ष पुढीलप्रमाणे –

अ) श्री बापु बाबुराव गायके, मदतनिस, श्री साई प्रसादालय दोषी नाहीत.

ब) श्री गायके यांनी द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅन्डींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ खालील स्थायी आदेश कलम २४(ए) व २४ (एल) नुसार गैरशिस्तवर्तन केलेले नाही.

पान नं.०४ वर...कृ.मा.प...

५. श्री गायके यांना कामगार विभागाने पारीत केलेल्या दि.१८ ऑक्टोबर, २०२० रोजीचे आदेशाद्वारे उपरोक्त खातेचौकशी अधिकारी ॲड.श्री बी.वाय.काळवाघे यांच्या निष्कर्ष अहवालानूसार ताकीद ही शिक्षा देण्यात आलेली आहे.

६. श्री गायके हे सन २०१४- २०१५ मध्ये २४९ दिवस तात्पुरते सेवानिलंबीत होते. सदर निलंबन कालावधीबाबत कुठलेही आदेश पारीत करणेत आलेले नसल्याचे निर्देशनास येते.

७. श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा विनियम प्रकरण ४ निलंबन बडतर्फी आणि कामावरून काढुन टाकणे या कालाखंडातील वेतने मधील कलम नं.१९ (२) मध्ये, **जेव्हा संस्थानाच्या कर्मचा-यांला सेवेत पुन:स्थापित करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-यांचे असे मत असेल की बडतर्फ झालेला, सेवेतुन काढून टाकण्यात आलेला किंवा सक्तीने निवृत्त झालेला संस्थानाचा कर्मचारी पुर्णपणे दोषमुक्त झाला आहे, तेव्हा उपनिमियम (६) मधील तरतुदींच्या अधिन राहुन संस्थानाच्या कर्मचा-याला तो प्राप्त करण्यास पात्र असलेले संपुर्ण वेतन आणि भत्ते प्रदान करण्यात येतील आणि जर तो कामावरून बडतर्फ झाला नसता किंवा त्याला कामावरून काढून टाकण्यात आले नसते किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले नसते तर अशा बडतर्फीपुर्वी कामावरून काढुन टाकण्यापुर्वी किंवा सक्तीच्या सेवानिवृत्ती पुर्वी बडतर्फी पुर्वी, कामावरून काढुन टाकण्यापुर्वी किंवा सक्तीच्या सेवानिवृत्ती पुर्वी तो जे वेतन आणि भत्ते प्राप्त करण्यास पात्र असेल तेवढे वेतन आणि भत्ते प्रदान केले जातील. असे नमुद आहे.**

८. श्री बापुसाहेब बाबुराव गायके हे खाते चौकशी मध्ये निर्दोष सिध्द झालेले असल्याने त्यांचा निलंबन कालावधी हा कामावर आहे असा समजणेत येऊन त्यांना सन २०१५ ची वेतनवाढ व त्याकालावधीतील वेतनाचा फरक व इतर अनुज्ञेय भत्ते संस्थान नियमाप्रमाणे देण्यास हरकत नाही, असे मत आहे.

उपरोक्त प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

18/9/2020

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 09

मा. तदर्थ समिती सभेपुढील विषय
(सामान्य प्रशासन विभाग)

विषय:- सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दिनांक-०१/०७/२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनकडे दिनांक १४/०७/२०२० रोजी प्राप्त पत्र.

टिपणी-

(अ) मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी यांचे दिनांक-१३/०७/२०२० रोजीच्या पत्रात पुढील प्रमाणे:-

१. ***सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दिनांक ०१/०७/२०२० चे श्री श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या सामान्य प्रशासन विभागातील प्रभारी सामान्य प्रशासन अधिकारी श्री. बजाज साहेब बेकायदेशीर गुन्हे करणा-याला पाठीशी घालत असल्याबाबत असा विषय असलेले पत्र ...***

" श्री आपल्याकडे अर्ज करतो की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या सामान्य प्रशासन विभागातील प्रभारी सामान्य प्रशासन अधिकारी श्री बजाज साहेब आपल्या संस्थानच्या श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्री विकास महादेव शिवगजे यांनी केलेल्या बेकायदेशीर गुन्हयाला आजतागायत पाठीशी घातल आहेत.

आतापर्यंत शिवगजे यांनी केलेल्या बेकायदेशीर गुन्हयाबाबत अनेक अर्ज केलेले आहेत. त्या अर्जावर कारवाई होण्याबाबत आपल्या उच्च स्तरावरुन अनेक शेरे मारण्यात आलेले असतांना प्रभारी सामान्य प्रशासन अधिकारी श्री बजाज साहेब माझ्या अनेक अर्जावर कारवाई न करता संगनमताने अर्ज दाबुन ठेवणे, कारवाईबाब टाळाटाळ करीत असतात. श्री त्यांना अनेकवेळा माझ्या अर्जाबाबत कारवाई करण्याबाबत विनंत्या केल्या परंतू श्री बजाज साहेबांनी उडवाउडवीचे उत्तर देऊन शिवगजे यांच्याबाबतचे सर्व अर्ज आजतागायत विनाकारण दाबुन ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

आजही श्री बजाज साहेब शिवगजे यांच्या सांगण्यावरुन शालेय प्रशासनाबाबत चुकीचे निर्णय घेत आहे. श्री बजाज साहेब शिवगजे यांच्या सांगण्यावरुन शालेय प्रशासनाचे काम पाहात असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानला फार मोठया गुन्हेगाराला पोसण्याची वेळ आली आहे.

माझी मेहरबान साहेबांना कळकळीची विंनती आहे. जर बजाज साहेब शिवगजे यांच्या सांगण्यावरुन व दोघाच्या संगनमताने शालेय प्रशासन चालवित असतील तर शिवगजे यांची गुन्हेगार प्रवृत्ती अजून वाढत जाईल तरी साहेबांनी यात तत्काळ लक्ष घालून श्री बजाज साहेबांची तत्काळ या पदावरुन हकालपट्टी करावी, ही नम्र विनंती. ."

विभागाचे विवेचन:- श्री विकास महादेव शिवगजे, हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असून श्री बजाज हे सामान्य प्रशासन शाखेकडे प्र. अधिक्षक म्हणून कार्यरत आहे. प्रत्यक्षात दोनही कामाचे स्वरुप वेगवेगळे असून त्यांचा परस्परांशी कोणताही संबंध येत नाही. श्री सुनिल जोसेफ गायकवाड, मु.पो. माळवाडगांव यांनी केवळ निरर्थक आरोप केले आहेत. तसेच या आरोपांबाबत कुठले ही पुरावे अगर त्याचे पृष्ठयर्थ कोणती ही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. केवळ नैराश्याच्या भावनेतून सदरचे आरोप केल्याचे दिसून येते.

२. ***सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दिनांक-०१/०७/२०२० चे सुनिल जोसेफ गायकवाड यांचे पत्र- श्री विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी, मु.पो. शिर्डी यांनी पात्रता नसतांना संबंधीत विभाग प्रमुख व प्रशासनातील अधिकरी यांना हाताशी धरुन गैरमार्गाने पदाचा गैरवापर करुन फायदे मिळवले म्हणून त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करुन घेतलेल्या वेतनाचे पैसे वसूल करुन सदरच्या गैरकृत्यात मदत करणा-या संबंधीत अधिका-यांवरही फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करुन त्यांनाही सेवेतून निलंबीत करणेबाबत असा विषय असलेले पत्र...***

" श्री विकास महादेव शिवगजे हे पात्रता नसतांनाही आज सहा. शिक्षक म्हणून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी, मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे सहाय्यक शिक्षक म्हणून पदाचा उपभोग घेत असतांना त्यांनी संबंधीत विभागप्रमुख व प्रशासनातील अधिकारी यांना हाताशी धरुन गैरमार्गाने पदाचा गैरवापर करुन फायदे मिळविले. तसेच त्यांनी शाळा संहिता नियमाचा भंग करुन अनेक प्रकारचे गैरकारभार केले असल्यामुळे त्यांच्यावर बडतर्फाची कारवाई करुन घेतलेल्या वेतनासहीत पैसा वसुल करुन सदरच्या गैरकृत्यात मदत करणा-या संबधीत अधिका-यावरही फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन त्यांनाही सेवेतून निलंबीत करावे.

श्री विकास महादेव शिवगजे, सहा. शिक्षक म्हणून पदाचा उपभोग घेत असतांना त्यांनी संबंधीत विभागप्रमुख व प्रशासनातील अधिकारी यांना हाताशी धरुन गैरमार्गाने पदाचा गैरवापर करुन फायदे मिळविले. तसेच त्यांनी संहिता नियमाचा भंग करुन अनेक प्रकारचे गैरकारभार केले असल्यामुळे त्यांच्यावर बडतर्फाची कारवाई करुन घेतलेल्या वेतनासहित पैसा वसुल करून सदरच्या गैरकृत्यात मदत करणा-या संबंधीत अधिका-यावरही फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन त्यांनाही सेवेतून निलंबीत करावे.

त्याविषयी माझ्या सोबतच्या निवेदनामध्ये मुद्दा क्र. १ ते २५ नुसार लेखी पुराव्यासहित ते शिक्षक म्हणून कसे पात्र नाहीत. या संदर्भात कायदेशीर लेखी दस्तऐवज जोडले आहे. तरी सदरचे निवेदन मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत श्री विकास महादेव शिवगजे यांना सेवेतून त्वरीत बडतर्फ करण्यात यावे व त्यांनी पात्रता नसतांनाही घेतलेले वेतन त्यांच्याकडून १८ टक्के व्याजासहित वसुल करण्यात यावे".

खरे पहाता श्री साईबाबांची शिर्डी नगरी हे जागतीक दर्जाचे पवित्र देवस्थान आहे. त्यामुळे प्रत्येक सामान्य माणसाचा त्याकडे बघण्याचा हेतू हा पवित्ररुपी आहे. परंतू मला इच्छा नसतांनाही श्री विकास महादेव शिवगजे यांच्या सारखे लोक पात्रता नसतांनाही तेथे पदाचा गैरउपयोग करतात व त्यामुळे त्यांच्या अशा गैरकृत्यामुळे शैक्षणिक क्षेत्राचे पावित्र्य राहात नाही. म्हणून या निवेदनाव्दारे आपण एक जबाबदार अधिकारी म्हणून स्वतः माझ्या निवेदनातील १ ते २५ मुद्दे व त्या प्रत्येक मुद्याला कायदेशीर मार्गाने असणारे पुरावे मी जोडत आहे व आपला अधिकवेळ वाया जावू नये म्हणून प्रत्येक मुद्याला अनुसरुन योग्य त्या ठिकाणी मार्किंग करुन देत आहे. त्यामुळे आपण प्रत्येक जबाबदार अधिका-यांनी शिर्डी सारख्या पवित्र ठिकाणी व तेही शैक्षणिक संस्थेमध्ये घडलेले गैरप्रकार गांभिर्याने लक्षात घेवुन टाळाटाळ न करता १५ दिवसामध्ये योग्य ती कार्यवाही करावी अशी आशा बाळगतो." असे अर्जात नमुद केले आहे.

विभागाचे विवेचन:- श्री गायकवाड यांनी श्री शिवगंजे कसे शिक्षक म्हणून पात्र नाहीत याबाबत परिशिष्ट जोडून १ ते २५ मुद्दे नमुद केले आहेत. १ ते २५ मुद्यांबाबत विभागाकडे उपलब्ध कागदपत्रावरुन तयार केलेली माहीती खालीलप्रमाणे-

अ.नं.	अर्जदार यांचे अर्जातील तपशिलवार दस्तएवेज व उपस्थित मुद्दे	स्पष्टीकरण
०१.	सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम ३–महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ च्या अधिनियम ने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिर्डी शाळा १९९३ साली विनामान्यता सुरु झाल्यावर सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे व मुख्याध्यापिका सौ. चव्हाणके निता मॅडम यांनी कर्मचारी म्हणून काम करतांना, व्यवस्थापनास हाताशी धरुन बेजबाबदार काम करुन शिक्षणाचा दर्जा कसा खालावेल याचा विघातक प्रयत्न करून, सार्वजनिक हिताचा विचार न करता गैरप्रकारे कर्मचारी म्हणून कर्तव्य व कार्य अनिष्ठ प्रकारे पारपाडल्याबद्दल त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	----------
०२.	श्री साईबाबा संस्थान शिर्डी नं ९ सप्टेंबर १९९३ ला दिलेली नियुक्तीपत्र- त्यांची शैक्षणिक पात्रता नसतांना कुठल्याही प्रकारची पदाची जाहीरात वृत्तपत्रात न देता त्यांन परस्पर शिक्षक पदाची नियुक्ती दिली ती पुर्णपणे चुकीची आहे.	दि.३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री. शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
	श्री साईबाबा संस्थान शिर्डी नं २३ जून १९९४ ला दिलेले एक वर्षाच्या कालवधीसाठीचे नियुक्ती पत्र- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमकडून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे शैक्षणिक पात्रता नसतांना शिवगजे यांना सहा. शिक्षकाची नियुक्ती दिली ती पूर्णपणे चुकीची आहे. त्यांची श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमकडे सेवा खंडीत झाली असे असतांनाही ते सेवाजेष्ठता धरतांना ते १९९३ पासून धरतात.	श्री.शिवगजे यांची सेवाज्येष्ठता यादीमध्ये त्यांची प्रथम नेमणूक दिनांक ही ०७/०१/१९९६ अशी नमुद करण्यात आलेली असून, कनिष्ठ महाविद्यालयाकडील नेमणूक दिनांक ०७/०१/२००१ नमुद करण्यात आलेली आहे, त्यामुळे त्यांची सेवाज्येष्ठता १९९३ पासून धरतात सदरचा मुद्दा हा चुकीचा आहे.
०३	श्री साईबाबा संस्थान शिर्डी नं १२ जून १९९५ ला दिलेले एक वर्षाच्या कालवधीसाठीचे नियुक्ती पत्र – १९९५ या कालावधीत त्यांनी बहीस्थ बी.एड. केले. बी.एड. ची पात्रता घ्यायाची असेल तर त्या संस्थाच्या शाळेला मान्यता असणे आवश्यक आहे. त्यामुळे शिवगजे यांनी मिळविलेली बी.एड. पात्रता मान्यता प्राप्त शाळेचे नसल्यामुळे ते पुर्णत: बोगस आहे. त्यांनी ही फसवणूक केलेली आहे. त्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल व्हायला पाहीजे.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकांची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	विकास महादेव शिवगजे यांचे दि.०३/०४/१९९६ रोजी आण्णामलाई युनिव्हर्सिटी आण्णामलाईनगर येथून पारीत झालेले बी.एड. सर्टिफिकेट- शिवगजे यांच्या बी.एड. पदवी प्रमाणपत्रात May-९५- असा उल्लेख केलेला आढळतो. खरे पहाता देशभरात बहीस्थ बी.एड. पदवी पुर्ण करण्यासाठी २ वर्षाचा कालावधी ग्राहय धरला जातो. त्यांनी हे बहिस्थ बी.एड. दैनंदिन हजेरी रजिष्टरला त्यांच्या सहया असतांना एका वर्षात पुर्ण केल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे बी.एड.पात्रता ही बनावट असल्यामुळे त्यांनी सर्वांची फसवणूक केलेली आहे.	
	बहिस्थ: बी.एड. प्रवेशासंदर्भात माहीती- बहिस्थ बी.एड. शिक्षण क्रमासंबंधी अशी नियमावली आहे की, १९९१ पासून बहीस्थ बी.एड. चा कालावधी दोन वर्षाचा आहे. तो शिवगजे यांनी पुर्ण केला नाही. १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात त्यांनी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिकविण्याचे काम केले व १९९५ ला लगेच ते बी.एड. झाले हे पुर्णत: चुकीचे आहे. कारण बहिस्थ बी.एड. करण्यासाठी त्यांच्याकडे दोन वर्षाचा सलग सेवेचा अनुभव नसल्याने त्यांचे बी.एड. चुकीचे आहे.	
	दि. १७/१२/२०१४ माहीती अधिकार अधिनियम २००५ चे माहितीबाबत पत्र- सेवेत असतांना बहीस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थेची, शिक्षण अधिकारी यांची पुर्वपरवानगी घ्यावी लागते. तसा पुर्वपरवानगीचा दाखला असल्याशिवाय बी.एड. पदवी मिळविता येत नाही. संस्थेला शिक्षणाधिकारी यांना गाफील ठेवून परस्पर केलेले बी.एड. गाहय धरले जाणार नाही. पुर्व परवानगी न घेता तसा प्रकारचा दाखला दप्तरी उपलब्ध	

	नाही. याचा अर्थ त्यांनी पुर्व परवानगी न घेता परस्पर बी.एड. करणे ही फसवणूक होय. त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थेची, शिक्षणाधिकारी यांच्या पुर्वपरवानगीचा दाखला माहीतीच्या अधिकारात श्री साईबाबा संस्थानला मागीतला असता विभागप्रमुख किंवा प्राचार्य नसतांनाही शिवगजे आपल्या सहिनिशी पदाचा गैरवापर करुन खोटी माहिती माहितीच्या अधिकारात माहिती अधिकार अर्जदाराला देवून संस्थानची मोठी फसवणूक करीत आहे. तसेच माहीती देतांना निपक्षपातीपणे माहिती न देता आपण केलेले गैरप्रकार उघडकीस येऊ नये म्हणून प्रयत्न करतात. हे सगळे बनवाबनवीचे असल्या कारणाने ते संस्थानची फसवणूक करीत आहेत.	
	दि. १४/०२/२०१४ चे माहिती अधिकार माहितीपत्र-	
	दि. १६ फेब्रु. २०१५ माहितीचा अधिकार अधिनियम चे पत्र दि.१६/०२/२०१५ माहितीचा अधिकार अधिनियम २०१५ चे दुसरे पत्र- माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये बहिस्थ बी.एड. पदवी घेण्यासाठी संस्थानच्या पुर्व परवानगीचा दाखला मिळण्याबाबत अर्ज केला असता प्राचार्या सौ. निता चव्हाणके व प्रशासन अधिकारी यांना हाताशी धरुन माहीतीच्या अधिकारात विचारलेली माहीती निरंक देवून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न शिवगजे व प्रशासन अधिकारी करत असल्याने यात शिवगजे सह प्रशासन अधिकारी यांना हाताशी धरुन हे प्रकरण दडपण्याचा गैरप्रकार केल्यामुळे शिवगजेसह प्रशासन अधिका-यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. त्यामुळे सदरची माहिती निरंक देण्यात आलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती दडपविण्याचा प्रयत्न केलेला नाही.
	महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार ज्या शिक्षकांनी १९९० पर्यंत राज्याबाहेरील बी.एड. पात्रता पदवी घेतलेली आहे. अशाच शिक्षकाची बी.एड. पदवी पात्रता शिक्षक पदासाठी ग्राहय धरलेली जाते. शिवगजे यांनी संस्थेची शासनाची फसवणूक करुन १९९५ ला चुकीच्या पध्दतीने बी.एड. केले. शिवगजे यांनी केलेले बी.एड. १९९० च्या नंतरचे असल्याने ते पुर्णतः शिक्षण पध्दतीला लागु नसलेले असल्याने त्यांच्यावर फौजदारीचा गुन्हा दाखल व्हावा.	----------
०४	दि. १८ जुन १९९६ रोजी श्री विकास महादेव शिवगजे यांना दिलेली नियुक्तीपत्र जेष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी (पं.स. कोपरगांव) यांचा ११/०७/१९९६ चा शेरा- दि. १८ जुन १९९६ देखील शाळेला मान्यता नसतांना शिवगजे यांनी सहाय्यक शिक्षकाची नियुक्ती वेतनश्रेणीवर घेऊन त्यांनी संस्थानची व शासनाची फसवनुक केली आहे. जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती कोपरगांव यांनी दि.११/०७/१९९६ च्या शेराबुक पुस्तकात यांनी सदर संस्थेस शासन मान्यता वर्गासाठी व शिक्षकासाठी त्वरीत मान्यता घेण्यात यावी असा मा. गट शिक्षणाधिकारी कोपरगांव यांचे दि. १०/०७/१९९६ चे आदेशानुसार चौकशी केली असता दि. १०/०७/१९९६ च्या आदेशान्वये मान्यता नसल्याचे दिसून येत असतांना शिवगजे यांनी शाळेला मान्यता नसतांना बी.एड. केल्यामुळे ते पुर्णपणे खोटे व चुकीचे आहे. तसेच मान्यता नसलेल्या शाळेचे बहिस्थ बी.एड. करुन शिक्षक पदाची वेतनश्रेणी घेतल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, आण्णामलई **विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	दि. ५ फेब्रुवारी १९९७ दि.१७ एप्रिल १९९७, ३० मे १९९७ चे शिक्षण उपसंचालक पुणे यांचे सन १९९६-९७ शैक्षणिक वर्षात नवीन शाळेला परवानगी देण्याबाबत पत्र- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या शाळेला शिक्षण उपसंचालक पुणे यांनी सन १९९६-९७ ला शाळेला परवानगी दिली. परंतू शिवगजे यांनी शाळेला मान्यता नसतांना खोटेनाटे करुन बहिस्थ बी.एड. ला संस्थेची व शासानाची फसवणूक करुन भरमसाठ	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन

	पगार चुकीच्या मार्गाने घेतला आहे. मान्यता नसतांना बहिस्थ बी.एड. करणे चुकीचे आहे. व मान्यता नसतांना शासन नियमानुसार पगार घेणे गैर असल्याने त्यांच्यावर संस्थानची व शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल व्हावा.	१९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार दि.१४/०२/२०१४ चे पत्र – उपरोक्त माहिती मिळण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज केले असता शिवगजे प्राचार्य नसतांना खोटी माहिती देऊन त्या उपरोक्त विषयाची माहिती दडपण्याचा प्रयत्न शिवगजे यांनी केला आहे. स्वतःची माहिती स्वतःच देवुन ते संस्थेची व शासनाची फसवणूक केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. त्यामुळे सदरची माहिती निरंक देण्यात आलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती दडपविण्याचा प्रयत्न केलेला नाही.
	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार दि.१६/०२/२०१५ चे पत्र- प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेल्या उपरोक्त माहितीबाबत विकास महादेव शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करत असतांना संस्थान परवानगीच्या दाखल्याची सत्यप्रत माहिती निरंक असल्याचे माहिती दिल्यामुळे शिवगजे यांचे बी.एड. पुर्णतः खोटे असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे गुन्हा दाखल व्हावा.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार दि.१६/०२/२०१५ रोजीचे माहिती व प्रशासकीय अधिकारी यांचे पत्र- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज केला असता माहिती तथा प्रशासकीय अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या दि. १६/०२/२०१५ च्या पत्रानुसार विकास महादेव शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करतांना संस्थानमध्ये सेवा करत असतांना संस्थान सेवेच्या पुर्व परवानगीचा दाखल / पत्र न घेता चुकीच्या मार्गाने बी.एड. केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी

		संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
०५	विकास महादेव शिवगजे यांची जुन १९९७ ला दिलेली नियुक्ती ऑर्डर – सन १९९६-९७ ला श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शाळेला मान्यता मिळालेनंतर १९९७ पासून शिवगजे यांना सहा. शिक्षकांची वेतनश्रेणीनुसार नियुक्ती देण्यात आली. त्यांचे बी.एड. पुर्णत चुकीच्या पध्दतीने केले असल्यामुळे त्यांची नियुक्ती खंडीत होते. तसेच १९९७ ला शाळेला मान्यता असतांना त्यांनी १९९३ पासून सेवा शर्तीनुसार सेवा जेष्ठता सर्व पगारातील फरक रक्कमा इंटरनल रिलिफ D.A. व HRA व महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे इतर फायदे व सवलती चुकीच्या पध्दतीने घेतल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	दि. ३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री.शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
	२४) प्रशिक्षीत शिक्षक पदाचे वेतनश्रेणी मिळाल्याबाबत श्री वसंतकुमार किसन वाणी, सहा. शिक्षक यांच्या अर्जाबाबत टिपणी / आदेशपत्र- शिवगजे यांची नियुक्ती शाळेला मान्यता मिळाल्यानंतर १९९६-९७ पासून ग्राहय न धरता १९९३ पासून ते अनाधिकृतपणे बी.एड. नसतांना शिक्षक म्हणून सेवेत दाखल झाल्यापासून सर्व सेवाशर्तीनुसार नियुक्त्या व वेतनश्रेणी घेतल्यामुळे शिवगजे यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल व्हावा. संबंधीत आदेशपत्रात शिवगजे यांचीच नियुक्ती बोगस व खोटया पध्दतीने झाली असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी.	दि. ३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री.शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
०६	श्री आर.डी. थोरात विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ पुणे यांचा शेरा प्रत दि.०७/०९/१९९८- श्री आर.डी. थोरात, विभागीय सचिव पुणे, विभागीय मंडळ पुणे यांनी दि. ०७/०९/१९९८ च्या शेराबुकातील अभिप्रायात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाठी अहोरात्र झटले पाहीजे, वर्गात जाण्यापुर्वी पुर्वतयारी शिक्षकांनी केली पाहीजे, विद्यार्थ्यांना कॉप्यापासून परावृत्त केले पांहीजे असे अनेक शेरे शिक्षण सचिव शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी यांनी त्यावेळेच्या मुख्याध्यापिका चव्हाणके मॅडम यांना देवुनही मुख्या. चव्हाणके मॅडम व सहा.शिक्षक विकास शिवगजे यांनी १९९३ पासून शाळा अनाधिकृतपणे सुरु झाल्यापासून शाळेचा दर्जा उंचविण्यासाठी प्रयत्न न करता विद्यार्थ्यांना कॉप्या पुरविणे. परिक्षा केंद्रात जाऊन परिक्षा केंद्र ताब्यात घेऊन विद्यार्थीनीना कॉप्या पुरविणे जे काम करुन अनिष्ठ पध्दतीने शाळेचे कामकाज १९९३ पासून करत असल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी.	विभागीय सचिव पुणे यांनी शेराबुकात नमुद केलेल्या अभिप्रायानुसार तत्कालिन मुख्याध्यापिका व इतर सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न केलेले असून, त्यामुळेच सन १९९८ मध्ये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरामध्ये विद्यार्थी संख्या ३०९ इतकी होती, तर सन २०१८ मध्ये तीच संख्या ७६६ इतकी आहे. तसेच शाळेचा दर्जा उत्तम असल्याने ग्रामस्थांनी व पालकांनी कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याची मागणी केली, त्यानुसार संस्थानने सन २००० मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरु केलेले आहे. तेथेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न केला जातो, त्यामुळेच विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांनी संस्थानमार्फत वरिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत मागणी केली, सदर मागणीनुसार संस्थानने सन २०१८ मध्ये वरिष्ठ महाविद्यालय सुरु केलेले आहे. तसेच सदरच्या मुद्यांबाबत अर्जदार यांनी कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसुन सदरचा आरोप त्यांनी केवळ वैयक्तिक द्वेषातून व संस्थानला बदनाम करण्याच्या हेतुने केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.
०७	दि. २६-२७/०८/२००० रोजी विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३४६ नुसार कनिष्ठ महाविलय सुरु करण्याबाबत - श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीने दि. २६-२७/ऑक्टो/२००० रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरला संलग्नित कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले. दि.०१ ऑक्टो. २००१ चे शिक्षण उपसंचालक पुणे विभाग-पुणे यांचे मान्यता पत्र- दि. १ ऑक्टोबर २००१ चे शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेबाबत शासन नियम व अटी (अटी-७) नुसार कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले.	शासन नियमाप्रमाणे (परिपत्रक क्र.एच.एस.सी.१५९८/ ३०९१३/१२, एच.एस.पुणे दि.१८.०८.१९९९) खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या नेमणूक माध्यमिककडून उच्च माध्यमिककडे न करण्याबाबतचा शासन निर्णय उपलब्ध आहे.

	परिपत्रक - परिशिष्ट २६ क्र. एचएससी १५९८/३०९१३/१२, एच.एस.पुणे दि. १७/०८/१९९९ विषयः- खाजगी शाळांतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणूका माध्यमिम शिक्षकांच्या नेमणूका उच्च माध्यमिकडे न करणबाबत – परिपत्रक परिशिष्ट २६ क्र. एच.एस.सी. १५९८/३०९१३/१८, एच.एस. पुणे दि.१८/०८/१९९९ चा विषय- खाजगी शाळांतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणूका माध्यमिक शिक्षकांच्या नेमणूका उच्च माध्यमिकडे न करण्याबाबत शासन परिपत्रक असतांनाह सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन चुकीच्या मार्गाने गैरप्रकार आपली नियुक्ती उच्च माध्य.(कनिष्ठ महाविद्यालयाकडे) प्रशासनातील अधिका-यांना पैसे देवुन करुन घेतली. शिवगजे यांची नियुक्ती शासन निर्णयाचे उल्लघंन करुन केल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्यावेळेच्या प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर देखील गुन्हा दाखल करुन दोघांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.	मात्र तत्कालीन मा.व्य.समितीचे दि.३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्र.१८२ नुसार श्री.विकास महादेव शिवगजे, यांची दि.०१.०७.२००१ पासून उच्च माध्यमिक विभागाकडे सहा.शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
	सहा. शिक्षण संचालक पुणे विभाग-पुणे १ यांचे पत्र- शासन निर्णय दि. २७/०७/१९९९ नुसार उच्च माध्यमिककडे / कनिष्ठ महाविद्यालयाकडे नियुक्त्या या महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील नियम क्र. ९ (२,३ व ४) नुसार केल्या जातात. माध्यमिक शाखेकडून उच्च माध्यमिक शाखेकडे बदली, पदोन्नती करता येत नाही असा नियम असतांना प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांनी नियमाचा भंग करुन माध्यमिककडून उच्च माध्यमिक बदली करुन घेऊन चुकीच्या मार्गाने गैरप्रकार पदाचा दुरुपयोग करुन नियुक्ती केल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांची उच्च माध्यमिककडील नियुक्ती रद्द करण्यात यावी. इतरही काही शिक्षकांच्या अशाच चुकीच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यादेखिल रद्द करण्यात याव्यात.	
०८	शिक्षक सेवक योजना माध्यमिक / उच्च माध्यमिक शासन निर्णय क्र. एसएसएन १०००/(३६४/०१ मशि-२ मंत्रालय विस्तारभवन मुंबई ४०००३२ दि.२६ जुलै २००१ – सन २००० ला शिक्षण सेवक योजना कार्यान्वित झाली. दिनांक २६ जुलै २००१ च्या शासननिर्ण शिक्षण सेवक येजना लागू असतोना शिवगजे यांनी माध्यमिक कडून उच्च माध्यमिककडे गैरमार्गाने नियुक्ती करुन घेतली. परंतू वरील दिनांक २६ जुलै २००१ च्या शासन निर्णयानुसार ही शिक्षण सेवक योजना आपणांस लागु हे दाखवुन प्राचार्या निता चव्हाणके मॅडम यांच्या सहकार्याने कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी लागू करुन घेतली. चुकीच्या मार्गाने नियुक्त्या व वेतनश्रेणी घेल्याबद्दल शिवगज यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊन नियुक्त्या रद्द करुन घेतलेला पगार वसुल करावा.	शासन नियमाप्रमाणे (परिपत्रक क्र.एच.एस.सी.१५९८/ ३०९१३/१२, एच.एस.पुणे दि.१८.०८.१९९९) खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या नेमणूक माध्यमिककडून उच्च माध्यमिककडे न करण्याबाबतचा शासन निर्णय उपलब्ध आहे. मात्र तत्कालीन मा.व्य.समितीचे दि.३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्र.१८२ नुसार श्री.विकास महादेव शिवगजे, यांची दि.०१.०७.२००१ पासून उच्च माध्यमिक विभागाकडे सहा.शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
	४ ऑक्टो. २००१ चे कार्यकारी अधिकारी यांचे पत्र- शिवगजे यांनी चुकीच्या पध्दतीने कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करुन घेण्यात आली.	
	आस्थाना विभाग दि.३१/१२/२००१ चे पत्र – आस्थापना विभागातील अधिका-यांना हाताशी धरुन या पत्रान्वये कार्यवाही करुन शिवगजे यांनी कनिष्ठ महाविद्यालयाची चुकीची वेतनश्रेणी घेतल्याबदद्ल शिवगजे यांच्यावर कायदेशिर कारवाई व्हावी.	
०९	प्रोसडींग दि. २५-२६/१०/२००१ च्या सभेतील निर्णय विषय क्र. ३७, निर्णय क्र ०६ सेवा जेष्ठता यादीस मान्यता देणेबाबत.- सन २००१ ला प्राचार्या चव्हाणके मॅडम व आस्थापना विभागातील अधिकारी यांना हाताशी धरुन अर्ज करुन प्रोसिंडींग दि.२५-२६/१०/२००१ च्या सभेतील निर्णय क्र. ३७, निर्णय क्र. ०६ नुसार शिवगजे यांनी सेवाजेष्ठता यादीत १९९३ पासून सेवाजेष्ठ असल्याचे दाखवून प्राचार्य असल्याचे भासवून अनेक शैक्षणिक दस्तऐवज खोटे बनवुन त्यावर प्राचार्य म्हणून सहया करुन सेवाजेष्ठता यादीचा दुरुपयोग केला आहे. सेवाजेष्ठता यादीत चुकीच्या पध्दतीने समावेश करुन संस्थानची व शासनाची फसवणूक केल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	दि.३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री. शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
	शिक्षक माहितीपत्रक -०१, सेवा जेष्ठता यादी-०१, सेवा जेष्ठता यादी-०१, सेवा जेष्ठता यादी-०१ (२०१२-१३) – सन १९९३ शिवगजे शै. पात्रता नसतांना श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमकडे शिक्षक म्हणून काम करत होते. सन १९९३ ला त्यांची सेवा खंडीत होऊन त्यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी	

	१९९४ ला ते बी.एड. नव्हते व शाळेला मान्यता नव्हती त्यामुळे सेवाजेष्ठता यादीत त्यांची नियुक्ती अव्वलस्थानी दाखवुन त्यांनी संस्थाची व शासनाची फसवणूक केलेली आहे. शिक्षकांच्या माहितीच्या याद्या तयार करतांना प्रत्येक यादीत आपण १९९३ पासून जेष्ठ शिक्षक असल्याचे दाखवुन संस्थानची व शासनाची फसवणूक केली आहे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊन त्यांच्यावर फेरबदल केल्याबाबत गुन्हा दाखल करावा.	
१०.	शिक्षण सेवक योजना माध्यमिक / उच्च माध्यमिक शालेय शिक्षण विभाग १) शासन निर्णय क्र.एसएसएन १०००/(३६४/०१) मशि-०२, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२ दि.२६ जुलै २००१. २) शासन निर्णय क्र एसएसएस १०९९/(३४०/९९)/माशि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ दि.२६ एप्रिल २००६ ३) शासन निर्णय क्र. पीआरई २०११/ प्र.क्र. ११७ प्रशि-१ - प्राचार्या चव्हाणके मॅडम व सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे यांनी शिक्षण सेवक योजना सन २००१ पासून कार्यान्वीत करत असतांना अनुक्रमे दि. २६ जुलै २००१ व शासन निर्णय दि. २६ एप्रिल २००६ नुसार श्री साईबाबा संस्थानच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला शिक्षण सेवक योजना लागू नाही हे दाखवुन आपल्यासह जवळच्या अनेक शिक्षकांना सन २००१ पासून सहा. शिक्षक पदावर नियुक्त देवून वेतनश्रेणीचा फायदा गैरप्रकारे ठरविला आहे. त्यांनी गैरमार्गाने नियुक्ती घेऊन आपल्यासह जवळच्या शिक्षकांना देखील खोटे नाटे करुन फायदा करुन दिला आहे. शिक्षक भरती करतांना शिक्षणसेवक योजना बसवुन त्यांच्याकडून वेठबिगारी सारखे काम करुन घेतले आहे. तर काही शिक्षकांना सेवकांच्या नियमत न ऑर्डर देता सहा. शिक्षकांची ऑर्डर / नेमणूका देवुन मोठया प्रमाणात गैरकारभार प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांनी केल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊन ज्या शिक्षकांना सहा. शिक्षकांच्या नेमणका देण्यात आल्या त्या रद्द करण्यात याव्यात.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	सन १९९४ पासून जवळच्या शिक्षकांना सहाय्यक शिक्षक नेमणूक दिल्याचे प्रपत्र माहिती.- शिवगजे व प्राचार्या यांनी १९९४ पासून जवळचे शिक्षक म्हणून अनेक शिक्षकांना सहा. शिक्षक म्हणून नियुक्त्या दिल्या आहेत. वशिलेबाजी व भ्रष्टाचार करुन हे पदे भरल्यामुळे शिवगजे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.	
	दि. १८/०८/२००१ चे सभेतील निर्णय, विषय नं. ६० निर्णय क्र. ४०३ – प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन शिवगजे यांनी शिक्षण सेवक योजना असतांना दि. १८/०८/२००१ चे सभेतील निर्णय विषय नं. ६० निर्णय क्र. ४०३ नुसार जवळच्या शिक्षकांना सहा.शिक्षक म्हणून शासन निर्णयाप्रमाणे सेवेत दाखल करुन घेतले तर अनेक शिक्षकांना शिक्षण सेवक योजनेत बसवुन त्यांच्यावर वेठबिगारीची वेळ आणली. त्यामुळे त्यांच्यावर वशिलेबाजी व पदभरती करतांना भ्रष्टाचार केल्यामुळे फौजदारी गुन्हा दाखल करावा.	
	शिवगजे यांनी आपल्यासह अनेक शिक्षकांना पात्रता नसतांना सहा. शिक्षक म्हणून नियुक्ती दिल्याचे पत्र – शिवगजे यांनी १९९३ पासून आपली पात्रता नसतांना अनेक शिक्षकांना पात्रता नसतांना सहा. शिक्षकाची वेतनश्रेणी मिळवून देवुन मोठा गैरप्रकार करुन भ्रष्टाचार केला असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
११	दि.०७/१०/२००२ रोजी प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांच्या बाबतचे तक्रार अर्ज - प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन शिवगजे यांनी कामावर असतांना शिक्षकांना मानसिक त्रास देऊन त्याच्या जीवीतास धोका पोहचेल असे कृत्य केलेल आहे. मुलांना कॉप्या पुरवा नाहीतर मारेकरी घालून खुनाच्या धमक्या देवुन नोकरीवर गंडांतर आणू अशा धमक्या प्राचार्या मॅडम व सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे शिक्षकांना नेहमी देत असल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	सदरच्या मुद्याबाबत अर्जदार यांनी कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसुन सदरचा आरोप त्यांनी केवळ वैयक्तिक द्वेषातून व संस्थानला बदनाम करण्याच्या हेतूने केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.
	दि. ०७/१०/२००२ चा दुसरा एक तक्रार अर्ज – प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांनी शिक्षकावर दबाव आणून शिक्षकांना आपला आदर्श बाजूला ठेवण्यास भाग पाडून १०० टक्के शाळेचा निकाल लावण्याच्या हव्यासापोटी शिक्षकावर दबाव आणून खोटे वागण्यास भाग पाडल्याबद्दल शिवगजे सहा प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर देखील फौजदारी गुन्हा दाखल करावा.	सदरच्या मुद्याबाबत अर्जदार यांनी कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसुन सदरचा आरोप त्यांनी केवळ वैयक्तिक द्वेषातून व संस्थानला बदनाम करण्याच्या हेतूने केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

	दि.१५-१६/१०/२००२ चे सभेतील निर्णय क्र. १४ (प्रोसिडींग) – वरिल घटनेचे गांभीर्य लक्षात घेता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीने प्राचार्या चव्हाणके मॅडम सह शिवगजे यांना लेखी आदेश काढून मुख्याध्यापिका व शिक्षकामध्ये परस्पर सौहार्द व सहकार्याचे वातवरण ठेवा असे लेखी सुनावले आहे. मुख्याध्यापिका चव्हाणके मॅडम व शिवगजे यांनी अनेक कारणांनी शिक्षकांस त्रास देवुन, मारेकरी घालू, खुन करु अशा धमक्या दिल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	सदरच्या मुद्याबाबत अर्जदार यांनी कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसुन सदरचा आरोप त्यांनी केवळ वैयक्तिक द्वेषातून व संस्थानला बदनाम करण्याच्या हेतूने केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.
१२.	महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियंकम क्र.१४- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ नुसार कारभार चालतो व पाहते. या नियामानुसार संस्थानची स्थापना होऊन सार्वजनिक हिताकरीता, जनतेकरीता व्यापक कल्याणकारी निर्णय घेण्याकरीता ही संस्था स्थापन झाली. या संस्थानच्या माध्यमातून श्री. साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय चालविले जातात. अधिनियामातील (ट) तरतुदी/नियमानुसार संस्थानने सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी संस्थान नियमावलीत	श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना (शैक्षणिक संकुलासह) सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागस वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र तांत्रिक कारणास्तव त्याबाबतची अमंलबजावणी अद्याप झालेली नाही. संस्थान सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही अद्याप चालु आहे. त्यामुळे अद्याप १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक भरती अथवा इतर विभागातील कर्मचारी भरती करण्यात आलेली नाही. खाजगी शिक्षण संस्थानचे कामकाज हे खाजगी शाळा सहिंतेनुसार चालते त्यानुसार शिक्षकांच्या आवश्यक पदसंख्येची निश्चिती (संच मान्यता) शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शिक्षण विभागाने संच मान्यता घेतली आहे. संच मान्यतेनंतर बिंदुनामावली चेक करुन घेणे व त्यानुसार जाहीरात नियमानुसार पद भरती व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता घेणे अशी प्रक्रिया आहे. मात्र यापुर्वी बिंदुनामावली व वैयक्तीक मान्यता घेण्यात आलेल्या नाही. मात्र तत्कालीन व्यवस्थापन समितीने पद भरतीस मान्यता दिल्याचे दिसते.
	दि. १४ फेब्रु. २०१५ चे संस्थेच्या प्रशासकीय अधिका-याचे पत्र- माहीतीचा अधिकार २००५ च्या अर्जानुसार माहीती मागीतली असता संस्थानच्या कन्या विद्यालयास मान्यता मिळाल्यापासून शिक्षकांची भरती करतांना बिंदू नामावलीनुसार पदभरती करण्यात आली नाही.	
	दि. २५ /०३/ २०१६ चे संस्थान प्रशासकीय अधिका-याचे - माहीतीचा अधिकार २००५ च्या अर्जानुसार माहीती मागीतली असता संस्थान १०० बिंदू नामावलीनुसार पदभरती बाबत बेनाव करुन माहिती लपवून या १०० बिंदू नामावलीनुसार शिक्षक पदभरती करत नसल्याने स्पष्ट होऊन प्राचार्या चव्हाणके मॅडमसह शिवगजे व संस्थानचा प्रशासकीय विभाग जबाबतदार असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
	दि.२८/०३/२०१६ चे पत्र, दि. ०५/०४/२०१६ चे पत्र, ०६/०४/२०१६ चे पत्र, १२/०४/२०१६ चे पत्र, १५/०४/२०१६ चे पत्र – संदर्भित महितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्वस्था शिर्डी कडे १०० बिंदू नामावलीनुसार शिक्षकांची पदभरती बाबत माहिती मागितली असता याबाबत विचारणा केली असता संस्थानकडे शिक्षक भरतीबाबत १०० बिंदू नामावली पदभरती करण्यात आली नसल्याचे दिसून आले आहे. संस्थानने अल्पसंख्यांक शाळा असल्याचा बेबनाव करुन विभाग प्रमुख प्राचार्या चव्हाणके मॅडम सहा. शिक्षक शिवगजे यांनी प्रशासनातील अधिका-यांना हाताशी धरुन १९९४ पासून शिक्षकाच्या पदाची भरती १०० बिंदू नामावलीनुसार न करता मनमानी गैरकारभार करुन गैरप्रकार भरती केली आहे. १०० बिंदू नामावलीनूसार कोणताही दस्तऐवज व रजिष्टर शाळेकडे अथवा संस्थानकडे नसल्यामुळे त्यांनी केलेला गैरकारभार उघडकीस आल्याने त्यामुळे प्राचार्यासह सहा. शिक्षक शिवगजे यांच्यासह संस्थान प्रशासनातील अधिका-यांवर कायदेशिर कारवाई होऊन गुन्हा दाखल व्हावा.	
१३	महिना मे सन १९९४ हजेरीबुक, महिना जुन सन ११९४ हजेरीबुक – श्री साईबाबा कन्या विद्यामंदिरचे माहे मे, जून १९९४ हजेरी पुस्तक / बुक यावरुन असे दिसून येते की, विभाग प्रमुख प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे या शिक्षकांची पदभरती करतांना मुख्याध्यापिका अनुक्रमें व सहा.शिक्षक अशी पदभरती बिंदू नामावलीनुसार न करता वशिलेबाजी व गैरप्रकारे झाली आहे.	श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना (शैक्षणिक संकुलासह) सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागस वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र तांत्रिक कारणास्तव त्याबाबतची अमंलबजावणी अद्याप झालेली नाही. संस्थान सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही अद्याप चालु आहे. त्यामुळे अद्याप १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक भरती अथवा इतर विभागातील कर्मचारी भरती करण्यात आलेली नाही.
		खाजगी शिक्षण संस्थानचे कामकाज हे खाजगी शाळा सहिंतेनुसार चालते त्यानुसार शिक्षकांच्या आवश्यक पदसंख्येची निश्चिती (संच मान्यता) शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शिक्षण विभागाने संच मान्यता घेतली आहे. संच मान्यतेनंतर बिंदुनामावली चेक करुन घेणे व

		त्यानुसार जाहीरात, नियमानुसार पद भरती व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता घेणे अशी प्रक्रिया आहे. मात्र यापुर्वी बिंदुनामावली व वैयक्तीक मान्यता घेण्यात आलेल्या नाही. मात्र तत्कालीन व्यवस्थापन समितीने पद भरतीस मान्यता दिल्याचे दिसते.
	दि.२७ ते २००२ चे पत्र-प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे संगनमत करुन संदर्भिय पत्राला अनुसरुन संस्थानकडे खोटे-नाटे दस्तऐवज करुन / पाठवून श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर माध्यमिक शाळेकडून उच्च माध्यमिक न जाण्याचा शासन निर्णय असतांना गैरप्रकार बदली करुन नियुक्ती केली आहे. त्यांनी केलेल्या गैरप्रकारा बद्दल व शासन निर्णयाची चुकीच्या पध्दतीने अंमलबजावणी केल्याबद्दल प्राचार्या चव्हाणके मॅडमसह शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	महाराष्ट्र शासनाचे दि.१८.०८.१९९९ चे परिपत्रकानुसार खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणूका, माध्यमिक शिक्षकांच्या नेमणुका उच्च माध्यमिक कडे न करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे. मात्र संस्थानचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर (माध्यमिक) कडे अध्यापनाचे काम करणारे श्री.शिवगजे, सौ.देशमुख श्री.घोडके यांच्या नेमणूका तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कनिष्ठ महाविद्यालयाकडे करण्यात आलेल्या आहेत.
	जा.नं. एसएसएस/ वशी ०१/ २०७४ /२००४ चे पत्र - सन २००१ पासून शिक्षण सेवक योजना चालू असतांना शिवगजे यांनी आपल्यासह इतर अनेक शिक्षकांना शिक्षणसेवक योजनेत न बसविता सहा. शिक्षक म्हणून घेऊन अमाप पगार / पैसा कळविला आहे. चुकीच्या पध्दतीने शिवगजेसह अने शिक्षकांच्या नियुक्त्या झाल्यामुळे त्या रद्द करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
	शिक्षकांचे माहिती पत्र	
१४	दि. २९/०१/२००५ रोजीचे सभेतील विषय नं. २७ निर्णय क्रमांक २८ – दि. २९/०१/२००५ पासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या श्री साईबाबा कन्या विद्यामंदिराला जोडून श्री साईबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सुर करण्यात आले.	----------
	दि. १६ जुलै २००५ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-०१ यांचे मान्यता पत्र – दि. १६ जुलै २००५ च्या शिक्षक उपसंचालक पुणे यांच्या मान्यता पत्रानुसार मुलां-मुलींना (सहशिक्षण) २००५-०६ पासून सुरु करण्यात आले. २००५ पासून उच्च माधिक विभागात तिन्ही शाखामध्ये सहशिक्षण सुरु करण्यात आले.	----------
	दि. १७ नोव्हेंबर २००५ चे शिक्षण उपसंचालक यांचे पत्र – दि. १७ नोव्हेंबर २००५ पासून श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयात ११ वी कला व वाणिज्य शाखाच्या तुकडयांना शिक्षण उपसंचालकाच्या पुर्व परवानगीने सुरुवात करण्यात आली.	----------
	दि. १५/०६/२००५ ला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीने शिक्षक पदाची काढलेली जाहिरात – दि.१५/०६/२००५ ला श्री साईबाबा संस्थानने श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी या विद्यालयासाठी शिक्षण सेवक पदाची जाहिरात प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांच्या सांगण्यावरुन पुर्णतः चुकीच्या पध्दतीने काढली. १९९४ पासून म्हणजेच शाळेला मान्यता नसल्यापासून विभाग प्रमुखाच्या व शिवगजे यांच्या सांगण्यावरून सहाय्यक शिक्षक म्हणून संस्थानने शिक्षकाची पद भरली. परंतू सन २००५ पासून प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांच्या सांगण्यावरून माझ्यासारख्या अनेक शिक्षकांची पदे शिक्षण सेवक म्हणून चुकीच्या पध्दतीने या दोघांनी संस्थेस भाग पाडले. नेमणूका देतांना शिक्षणसेवक C.H.B. तत्वावर पदभरती करण्यात आली. माझा अर्थशास्त्र विषयाचा वर्कलोड (अध्यापन कार्यभार) दोन विभाग आर्ट आणि कॉमर्सकडे असतांना माझा एकाच विभागाकडे अध्यापन कार्यभार कमी दाखवून शिवगजे यांनी मला कमी मानधनावर काम करण्यास भाग पाडले. शैक्षणिक पात्रता असतांना चुकीच्या मार्गाने अध्यापन कार्यभार कमी दाखवून शिवगजे यांनी फसणुक केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	सदरचा आरोप पुर्णतः नैराश्यातून केलेला असून, अत्यंत हास्यपद असा आहे, कारण संस्थानचे कार्यकारी अधिकारी हे एका सहा.शिक्षकाच्या सांगण्यानुसार काम करतात असे अर्जदार या आरोपामधून सुचित करतात. संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार तसेच अधिनियमानुसार मा.व्यवस्थापन समिती व मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिनियमाचे तरतुदींचे अधिन राहुन स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदरचा आरोप हा तथ्यहिन आहे. तसेच सदर आरोपाबाबत अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचे परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसून, सदरचा आरोप हा वैयक्तिक द्वेषातून व नैराश्यातून केल्याचे स्पष्टपणे जाणवते.
	शासन निर्णय क्र. एसएसएस/ १०००/(३६४/०१) मशि-२ मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२ दि. २६ जुलै २००१ चा शासन निर्णय – सुधारीत शिक्षणसेवक योजना विनाअनुदानीत शाळांना लागू नये शासन निर्णय असतांना शिवगजे यांनी सन २००१ ला स्वतःची माध्यमिकाकडून उच्च माध्यमिककडे बदली करुन या शासन निर्णयाव्दारे कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी शिवगजे यांनी स्वतःसाठी बोगसपणे व गैरकारभार करुन मिळवून घेतली व हाच शासन निर्णय माझ्या सारख्या शिक्षकांवर अन्याकारकपणे लादून शिक्षण सेवक योजनेत बसवून अध्यापन कार्यभार असतांना कमी मानधनावर काम करण्यास भाग पाडून शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी आर्थिक व मानसिक छळ केला त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी

		मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता.
		आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	जा.नं. एसएसएस-वशी १-१७०६-२००५ दि. ३१ जुलै २००५ शिक्षण सेवक अर्थशास्त्र पदाची नेमणूक पत्र – शिक्षणसेवक योजना विनाअनुदानिक शाळांना लागू नसतांनाही शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या दुटप्पी धोरणामुळे त्यांनी या योजनेनुसार नेमणूका देण्यास भाग पाडून माझी व अनेक शिक्षकांची अन्यायकारकपणे फसवणूक केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	सभा क्र. ४ / २००६ दि. २४०४/२००६ चा विषय नं. १७ निर्णय क्र. २७५ – सन २००६ ला देखिल कनिष्ठ महाविद्यालयाचा अध्यापनाचा कार्यभार असतांना शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी शिक्षण सेवकाच्या सेवा पुढे चालू ठेवण्यास सांगून माझे आर्थिक नुकसान केले आहे. त्यामुळे आर्थिक शोषन करुन फसवणूक केल्याबद्दल व चुकीचे निर्णय घेण्यास संस्थानला भाग पाडल्यबद्दल शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर गुन्हा दाखल करावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/२५८९/२०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	जा.नं. एसएसएस-वशी १/१६७०/२००६ दि. २० जुन २००६ चे नेमणूक पत्र.- शिक्षणसेवक योजना श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना पदभरती व सेवा करतांना लागू नाही असे असतांना शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी सन २००५ ची शिक्षणसेवक म्हणून सेवा चालू ठेऊन पुन्हा २००६ ला शिक्षणसेवक पदाची नेमणूक देण्यास भाग पाडले. अध्यापनाचा कार्यभार लपवून ठेऊन चुकीच्या ऑर्डर देण्यास भाग पाडून वेठबिगारी सारखी राबवणुक करुन आर्थिक शोषन केल्याबद्दल शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	दि. १०/०१/२००७ सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल निर्णय क्र .०७ दि.०४/१०/२००७ (१५) – दि. १०/०१/२००७ सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कम विषय नं. ७ दि.०४/१०/२००७ रोजीचे सभेतील	सदरचा आरोप पुर्णतः नैराश्यातून केलेला असून, अत्यंत हास्यपद असा आहे, कारण संस्थानचे कार्यकारी अधिकारी हे एका सहा.शिक्षकाच्या सांगण्यानुसार काम

निर्णय क्र. ७१५ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीने माझी पुर्णवेळ सहा. शिक्षकाची वेतनश्रेणीची ऑर्डर तयार करुन त्यावेळीचे संस्थानचे कार्यकारी अधिकारी मा. भाऊसाहेब वाकचौरे पुर्णवेळ सेवेत कायम करुन वेतनश्रेणीनुसार ऑर्डर देणार तोच प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी शिवगजे यांना कार्यकारी अधिकारी साहेब यांच्याकडे पाठवून माझ्या डोळयासमोर राजकीय पुढा-यांची नावे घेऊन माझी ऑर्डरवरील संदर्भानुसार तयार होऊन शिवगजे यांनी कटकारस्थान करुन रद्द करण्यास संस्थानला भाग पाडले. पुर्णवेळ अध्यापनाचा कार्यभार असतांना शिवगजे सारख्या विघ्नसंतोषी माणसाने मला वेतनश्रेणीनुसार कायम शिक्षकाची ऑर्डर रद्द करुन माझ्या कामाच्या ठिकाणी मानसिक व आर्थिक छळ केल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	करतात असे अर्जदार या आरोपामधून सुचित करतात. संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार तसेच अधिनियमानुसार मा.व्यवस्थापन समिती व मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिनियमाचे तरतुदींचे अधिन राहुन स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदरचा आरोप हा तथ्यहिन आहे. तसेच सदर आरोपाबाबत अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचे परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसून, सदरचा आरोप हा वैयक्तिक द्वेषातून व नैराश्यातून केल्याचे स्पष्टपणे जाणवते.
दि. २८/०७/२००७ सभा क्र. ०८/२००७ विषय नं. ०४ निर्णय क्र. ५१५ (६)- दि. २८/०७/२००७ सभा क्र. २००७ विषय क्र.०४ निर्णय क्र.५१५(०६) नुसार शासकीय नियमाप्रमाणे वेतन देण्यात यावे अशी उपसमितीची शिफारस मान्य करुन नेमणूक ऑर्डर देण्यात येणार तोच शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या सांगण्यावरुन माझी कायम सहा. शिक्षकाची नेमणूक या दोघांनी संगनमत करुन रद्द करण्यास सांगून आपला मानशिक व आर्थिक छळ करुन कामाच्या ठिकाणी त्रास देण्याचे काम केले त्यामुळे या दोघांवर गुन्हा दाखल व्हावा.	सदरचा आरोप पुर्णतः नैराश्यातून केलेला असून, अत्यंत हास्यपद असा आहे, कारण संस्थानचे कार्यकारी अधिकारी हे एका सहा.शिक्षकाच्या सांगण्यानुसार काम करतात असे अर्जदार या आरोपामधून सुचित करतात. संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार तसेच अधिनियमानुसार मा.व्यवस्थापन समिती व मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिनियमाचे तरतुदींचे अधिन राहुन स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदरचा आरोप हा तथ्यहिन आहे. तसेच सदर आरोपाबाबत अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचे परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसून, सदरचा आरोप हा वैयक्तिक द्वेषातून व नैराश्यातून केल्याचे स्पष्टपणे जाणवते.
दि. ०१ सप्टेंबर २००७ चे नेमणूक पत्र- दि. २८/०७/२००७ सभा क्र. ०८/२००७, विषय क्र. ४ निर्णय क्र. ५१५ (०६) नुसार ठराव, आदेश टिपणी व नेमणूक पत्र तयार होऊनही साक्षात माझ्या डोळयासमोर शिवगजे यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना सांगुन आपली कायम पदाची ऑर्डर रद्द करुन आपणास देशोधडीला लावले. कामाच्या ठिकाणी योग्य नेमणूक न देता तसे संस्थानला खोटे-नाटे सांगून माझे शोषन केले. कामाच्या ठिकाणी लाडू वाटणे, लाडू पॅकिंग करणे, मोजणे गाद्या व मंडप यांना राखण राहाणे, चप्पल स्टॅंडला राखण राहाणे, वर्ग झाडणे, बॅंच वाहणे व पुसणे अशी अशैक्षणिक कामे मागासवर्गीय शिक्षक म्हणून देऊन कामाच्या ठिकाणी पिळवणूक करुन शोषण केले. नोकरीत कायम पदावर काम करावयाचे असल्यास मला टप्याटप्याने पाच-पाच लाख रुपये द्या अन्यथा नोकरी गमवावी लागेल असे वारंवार शिवगजे व प्राचार्या चव्हणके मॅडम धमकी देत असे. या दोघांनी संगनमत करुन माझ्या कायम पदाची ऑर्डर रद्द करण्यास संस्थानला भाग पाडल्याबद्दल व वारंवार अनेक प्रकारे कामाच्या ठिकाणी जातीयतून खालची वागणूक देऊन अशैक्षणिक कामे करुन घेतल्या बद्दल व शोषण केल्याबद्दल शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊन गुन्हा दाखल व्हावा.	श्रीमती चव्हाणके व श्री.शिवगजे यांचेबाबत इतर कोणत्याही शिक्षकांनी अथवा शिक्षकेतर कर्मचा-यांनी मानसिक, आर्थिक छळ केल्याबाबत किंवा जातीय भेदभाव केल्याबाबतची तक्रार केलेली नाही. अर्जदार यांनी त्यांचे राजीनामापत्रा बरोबरच सदरची तक्रार केलेली होती. त्यावेळी याबाबत सर्व शिक्षकांची चौकशी करण्यात आलेली आहे. तसेच संस्थानमार्फत साजरे केल्या जाणा-या विविध उत्सवामध्ये शैक्षणिक संकुलाकडील बहुतांशी शिक्षकांना मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रसादालय, कॅन्टीन, लाडू विक्री काऊंटर, भक्तनिवासस्थान, मंडप या ठिकाणी पर्यवेक्षक म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत नेमणूक देण्यात येते. त्याप्रकारेच अर्जदार हे सेवेत असतांना त्यांनाही तशी नेमणूक दिलेली होती. त्यामुळे ते मागसवर्गीय आहेत म्हणून त्यांना तशी कामे दिली या तक्रारीमध्ये तथ्य नाही. कारण शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना उत्सव काळात अशी कामे नेमून देण्यात येतात. तसेच पैशाच्या मागणीबाबत अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणत्याही शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचा-यांना तक्रार केलेली नाही. अर्जदार यांनी यापुर्वीही सदरची तक्रार केली असता, सर्व शिक्षकांना याबाबत विचारणा करण्यात आलेली होती, त्यांनी कोणीही या मुद्याचे समर्थन केलेले नाही.
दि. २०/०२/२००८ रोजीचा राजीनामा पत्र व सोबत जोडलेले पत्र- दि.२०/०८/२००८ रोजी शिवगजे व विभाग प्रमुख काम करणा-या प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या जाचाला कंटाळून राजीनामा देण्यास भाग पाडले. मी मागासवर्गीय शिक्षक असल्याने शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या जाचाला कंटाळून राजीनामा दिला व त्यासोबत एक पत्र जोडले त्या पत्राच्या आधारे माझ्यावर झालेल्या अन्यायाबाबत मी संस्थानला सांगितले परंतू शिवगजे यांनी दिलेला मानसिक त्रास, अर्थिक व जातीचे राजकारण करुन आपणास त्रास देऊन व शोषन करुन आपली छळवणुक केल्याबद्दल शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
राजीनामा सोबतचे पत्र – शिवगजे यांच्या जाचाल कंटाळून आपण राजीनामा देत असतांना शिवगजे यांनी पदाचा गैरवापर करुन आपल्यावर केलेल्या अन्यायाबद्दल संस्थानला कळविले होते. अनेक प्रकारे शोष्न करुन आपणांस राजीनामा देण्यास भाग पाडल्याबद्दल शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा. राजीनामा सोबत दिलेल्या पत्रात राजकारण करुन शिक्षकात भेदभाव करणे, फट पाडणे, शिक्षकांना त्रास देणे, शिक्षकात जातीभेद करणे, मागासवर्गीय शिक्षकांना त्रास देणे,गरीब	

	विद्यार्थ्यांना त्रास देणे, अशी संकोचीत मनोवृत्तीने शिक्षक व विद्यार्थ्यांना त्रास देत असे. मागासवर्गीय शिक्षक व विद्यार्थ्यांना त्रास देऊन साईबाबांच्या सर्वधर्मसमभाव तत्वाला काळीमा शिवगजे यांनी फासली आहे. अनेक कारणाने शिवगजे यांनी माझ्यावर अनेक शिक्षकांना त्रास देऊन राजीनामा देण्यास भाग पाडल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	
	आस्थापना विभाग दि. २८/०२/२००८ माझ्या शिक्षण सेवक पदाच्या राजीनाम्या विषयी – मी दि. २०/२/२००८ रोजी राजीनामा दिल्यानंतर त्यावेळेचे कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्याशी चर्चा केली असा खोटा शेरा शिवगजे यांच्या सांगण्यावरून माझा राजीनामा घाईघाई मंजूर करुन घेण्यात आला. राजीनामा देण्याच्या वेळेस प्राचार्या चव्हाणके मॅडम दोन महिने रजेवर होत्या. रजेवर असतांना शिवगजे यांनी त्यांच्या घरी जाऊन माझ्या राजीनाम्याची सर्व प्रक्रिया गाफील पध्दतीने करुन संस्थान प्रशासनातील अधिका-यांना हाताशी धरुन कुठल्याही प्रकारे तोंडी अथवा लेखी सूचना न देता शिवगजे यांच्या सांगण्यावरून प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या खोटया अभिप्रायानुसार माझा राजीनामा मंजूर करुन घेतल्यामुळे आज माझ्या शिक्षकी पेशाला मला मुकावे लागले आहे. व माझ्यावर उपासमारीची वेळ आली आहे. माझा राजीनाम कुठलीही चौकशी न करता परस्पर मंजूर केल्याप्रकरणी शिवगजे यांच्यासह प्राचार्या चव्हाणके मॅडक व संस्थान प्रशासनातील अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	श्री.गायकवाड यांनी राजीनामा दिल्यानंतर आस्थापना विभागामार्फत दि.२८.०२.२००८ रोजी टिपणी सादर केली असता, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संकुल यांनी श्री.गायकवाड यांना राजीनामा मंजुर करण्याअधी समक्ष चर्चेसाठी तसेच पुन्हा कामावर हजर होणेबाबत दुरध्वनीद्वारे विनंती केलेली होती. मात्र श्री.गायकवाड यांनी त्यांचे दि.२४.०३.२००८ रोजीच्या पत्रान्वये (राजीनामा दिल्यानंतर ३२ दिवसांनी) "श्री.आर.एस.साबळे साहेब यांनी फोनवरुन दिलेल्या माहितीनुसार मी आपणास कळवू इच्छितो की, मी आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवक या पदाचा राजीनामा दिला असून, मा.प्राचार्या व शिवगजे यांच्याकडून तीन वर्षापासून झालेल्या अन्यायाला कंटाळून राजीनामा दिला आहे. झालेल्या अन्यायाची माहिती या पत्राला जोडून पाठवित आहे. झालेल्या अन्यायामुळे माझे मानसिक संतुलन बिघडले असून मी मानसिक व शारिरिक दृष्टया ठिक नसल्यामुळे मी आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण सेवक पदावर यापुढे काम करु शकणार नाही. तरी आपण माझा राजीनामा मंजुर करुन मला आपल्या संस्थेच्या सेवेतून मुक्त करावे,"असे कळविले होते. दरम्यानचे काळात तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी दि.०४.०३.२००८ रोजी सदर प्रकरणी सबंधीत कर्मचारी यांची मिटींग आयोजित करुन, श्री.गायकवाड यांचे राजीनाम्यावर चर्चा केली सर्व गोष्टींची शहानिशा करुन दि.२६.०३.२००८ रोजी (राजीनामा दिल्यानंतर ३४ दिवसांनी) श्री.गायकवाड यांचा राजीनामा मंजुर केला व त्यानंतर श्री गायकवाड यांना याबाबत दि.२४.०४.२००८ रोजीचे (रोजीनामा दिल्यानंतर ६२ दिवसांनी) पत्रान्वये कळविण्यात आले. म्हणजे श्री.गायकवाड यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांना पुन्हा कामावर येण्याची संधी दिलेली होती, तसेच राजीनामा दिल्यानंतर तब्बल ३४ दिवसांनी त्यांचा राजीनामा मजुर करण्यात आलेला आहे.
	दि. २४ एप्रिल २००८ चा राजीनामा –संस्थानच्या श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे काम गरत असतांना शिवगजे यांच्या खोटे-नाटे सांगण्यावरुन प्राचार्या चव्हाणके मॅडम या निष्कीय व सांगकाम्या प्रवृत्तीमुंळे शिक्षणसेवक योजना लागु नसतांना ती अन्यायकारकपणे लादून शिक्षक म्हणून काम करतांना अनेक प्रकारे अनेक प्रकार जातीयतून शोषन करुन राजीनामा देण्यास भाग पाडून परस्पर राजीनामा मंजूर करुन घेतल्या बद्दल शिवगजेसह दोषीवर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यात यावा.	
	दि.०२/०६/२००८ रोजीची शिक्षक भरतीची जाहीरात – मी २०/०२/२००८ रोजी शिवगजे यांच्या व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या त्रास देण्याच्या कारणावरुन राजीनामा दिल्यानंतर माझ्या पदाची (अर्थशास्त्र) घाईघाईने जाहिरात काढून माझ्या जागी माझ्या जात प्रवर्ग (S.C.) चा उमेदवार न भरता संस्थान प्रशासनातील एका Open कॅटेगरी असलेल्या श्री दरेकर मच्छिंद्र या शिक्षकाची घाईघाईने नियुक्ती करुन मोठा गैरप्रकार केला आहे. माझे पद रिक्त झाल्यावर माझ्या जात प्रवर्गाचा शिक्षक भरणे गरजेचे व शासन निर्णयाप्रमाणे अभिप्रेत असतांना शिवगजे, प्राचार्या चव्हाणके मॅडम व प्रशासनातील अधिकारी यांनी घाईघाईने माझ्या पदाची जाहिरात काढून प्रवर्गातील शिक्षकांची नियुक्ती माझ्या जागेवर न करता परस्पर Open (मराठा) समाजाचा शिक्षक पदाचा उमेदवार भरुन माझी व शासनाची, शासनाच्या नियमाची पायमल्ली केल्याबद्दल शिवगजेसह दोषी व्यक्तिवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना (शैक्षणिक संकुलासह) सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागस वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र तांत्रिक कारणास्तव त्याबाबतची अमंलबजावणी अद्याप झालेली नाही. संस्थान सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही अद्याप चालु आहे. त्यामुळे अद्याप १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक भरती अथवा इतर विभागातील कर्मचारी भरती करण्यात आलेली नाही. खाजगी शिक्षण संस्थानचे कामकाज हे खाजगी शाळा सहिंतेनुसार चालते त्यानुसार शिक्षकांच्या आवश्यक पदसंख्येची निश्चिती (संच मान्यता) शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शिक्षण विभागाने संच मान्यता घेतली आहे. संच मान्यतेनंतर बिंदुनामावली चेक करुन घेणे व त्यानुसार जाहीरात नियमानुसार पद भरती व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता घेणे अशी प्रक्रिया आहे. मात्र यापुर्वी
	शैक्षणिक कर्मचारी नेमणूका आणि मंजुरी पृष्ठ क्र.८८- शैक्षणिक क्रमवारी नेमणूका आणि मंजुरी पृष्ठ क्र. ८८ नुसार नियम ७) जाहीरात प्रत व जाहिरातीनुार ८) मागासवर्गीय उपलब्ध करण्यासाठी नियमावलीतील नियम ९(८) नुसार केलेल्या कार्यवाहीची प्रपत्रे १०) ज्या संवर्गातील नेमणूक असेल त्या संवर्गातील अद्ययावत बिंदु नामावलीनुसार संवर्गातील पदाची जागा रिक्त झाल्यावर त्यांच संवर्गातील शिक्षकाची	

१६	शिक्षण सेवक योजना माध्यमिक / उच्च माध्यमिक दि. २६ जुलै २००१ दि. २६ एप्रिल २००६ शासन निर्णय – सन २००१ पासून शासन निर्णयानुसार शिक्षण सेवक योजना कार्यान्वित असतांना शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी सन २००१ पासून जवळच्या शिक्षकाकडून मोठया प्रमाणात पैसा घेऊन सहा. शिक्षकांच्या नियुक्त्या देऊन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	दि. १८/०९/२००५ सभा क्र. १३/२००५ नं. ४६ निर्णय क्र. ५२२ – श्री साईबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात काही शिक्षकांना शिक्षण सेवक योजनेनुसार दिलेल्या असतांना संदर्भिय विषय नं. ४६, निर्णय क्र. ५२२ या नुसार १) सुभाष निंबा खैरणार सहा. शिक्षक २) सौ. यास्मीन सिकंर शेख, सहा. शिक्षिका यांना माध्यमिक विद्यालयाची वेतनश्रेणीनुसार पगार सन २००५ ला देण्यात आला. जवळच्या शिक्षकांना सहा. शिक्षकाची वेतनश्रेणी तर माझ्यासारख्या अनेक शिक्षकांना २००५ पासून शिक्षण सेवक योजना लागू नसतांना अन्यायकारकपणे लादून मानसिक शोषन करुन नोकरी सोडण्यास भाग पाडले. व्यक्तिसापेक्ष शासन निर्णयाचा चुकीचा वापर करुन जवळच्या फायदा करुन देणारा तोच शासन निर्णय वापरुन अनेक शिक्षकांना देशोधडीला लावण्याचे काम शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी केल्याचा गैरप्रकार संस्थानमध्ये उघडकीस आला आहे. त्यामुळे या दोघांवर कठोर कारवाई होऊन गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील काही शिक्षकांना तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. मात्र काही शिक्षकांच्या भरतीचे वेळी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करतांना शिक्षणसेवक म्हणून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती व त्यानुसारच मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदर शिक्षकांच्या नेमणूका या प्रथम ३ वर्षासाठी एकत्रित मानधनावर शिक्षणसेवक म्हणून करण्यात आलेल्या आहेत.
	दि. ०३/०६/२००६ सभा क्र. ०६/२००६ विषय नं. ४५, निर्णय क्र ३७२ ब) सन २००१ पासून शिक्षण सेवक योजना कार्यान्वित असतांना शिवगजे यांनी आपल्या जवळच्या शिक्षीका कु. संगिता मुरलीधर अंदुरेकर यांची एम.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स) ही अपात्रता असतांना त्यांना सन २००४ मध्ये त्यांच्याकडे एम.एस्सी.बी.एड. ही पात्रता नसतांना त्यांना कनिष्ठ महाविलयाची वेतनश्रेणी मिळवून देऊन त्यांच्याकडून पैसे घेऊन फार मोठा गैरप्रकारे भ्रष्टाचार केला आहे. म्हणून शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील काही शिक्षकांना तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. मात्र काही शिक्षकांच्या भरतीचे वेळी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करतांना शिक्षणसेवक म्हणून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती व त्यानुसारच मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदर शिक्षकांच्या नेमणूका या प्रथम ३ वर्षासाठी एकत्रित मानधनावर शिक्षणसेवक म्हणून करण्यात आलेल्या आहेत.
	निर्णय क्र. ४८३ विषय नं. २१ – शिक्षण सेवक योजना कार्यान्वित असतांना श्री अजिक्यदेव रामचंद्र गायकवाड, सहा. शिक्षक यांना सहा. शिक्षकाची ऑर्डर देऊन कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी मिळवून दिली आहे. त्यांच्या कडूनही फार मोठी रक्कम घेऊन शिवगजे यांच्या कृपा आशिर्वादाने त्यांना संस्थान सेवेत कायम करुन शिक्षक पदाची गैरप्रकार / मार्गाने भरती करुन मोठा भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजे यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी.	सदरचा आरोप हा अत्यंत हास्यास्पद व नैराश्यातून केल्याचे दिसून येत आहे. श्री.अंजिक्यदेव गायकवाड हे कन्या विद्या मंदिराकडे प्राथमिक विभागाकडे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यांची नेमणूक ही प्रथम तीन वर्ष शिक्षणसेवक म्हणून करण्यात आलेली असून, त्यानंतर त्यांना प्राथमिक विभागाकडील विहित वेतनश्रेणीमध्ये कायम करण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री.गायकवाड यांना कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी देण्यात आली हा आरोप अत्यंत चुकीचा, हास्यास्पद व वैयक्तिक द्वेषातून व संस्थानला बदनाम करण्याच्या हेतूने केल्याचे दिसून येत आहे.
१७	दि. १६ जुलै २००५ रोजीचे शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांचे पत्र – दि. १६ जुलै २००५ च्या शिक्षण उपसंचालकाच्या पत्राव्दारे मुलींसाठी असलेल्या विज्ञान शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयात मुला-मुलींसाठी (सहशिक्षण) प्रवेश देण्यासाबाबत मान्यता देण्यात आली. परंतू शिवगजे यांनी या पत्राचा आधार घेत सन २००६ मध्ये मुला-मुलींना (सहशिक्षण) सुरु करण्याच्या नावाखाली शिक्षण उपसंचालकांना खोटा पत्रव्यवहार करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या विश्वस्त मंडळांना गाफिल ठेऊन त्यांच्याकडून खोटेनोट प्रस्ताव, आदेश	मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील दि.०७.१०.२००६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावात बदल केलेला आहे. (संदर्भ- जा.क्र.एससएस/कन्या/कनिष्ठ /१०५३८/दि.०९.०९.२००६ चे पत्र) मात्र सदर नाव बदलण्याबाबतचे पत्र, प्रशासकीय मान्यतेची टिपणी अथवा मा.व्यवस्थापन समितीची मान्यता, नाव

	नियुक्ती करणे गरजेचे असतांना शिवगजे यांच्या सांगण्यावरुन माझा राजीनामा दिल्याच्या रिक्त जागेवर दुस-याच जात प्रवर्गाचे शिक्षकाची नियुक्ती वशिलेबाजी व भ्रष्टाचार करुन गैरप्रकार भरल्याबद्दल शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम व प्रशासनातील अधिका-यावर गुन्हा दाखल करावा.	बिंदुनामावली व वैयक्तीक मान्यता घेण्यात आलेल्या नाही. मात्र तत्कालीन व्यवस्थापन समितीने पद भरतीस मान्यता दिल्याचे दिसते.
	दि. २१/०४/२०१७ चे माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अन्वयेचे पत्र – माझा राजीनामा दिल्यानंतर माझ्या जागेवर भरलेल्या शिक्षक पदाची माहिती, मुलाखतपत्र, मुलाखती रजिष्टर प्रत, शिक्षणाधिकारी यांना त्या पदभरती बाबतची कळविलेली माहीती, बिंदुनामावली रोष्टर अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विचारली असता संस्थान प्रशासनाकडे माझ्या प्रवर्गाच्या रिक्त पदावर त्याच संवर्गाचा शिक्षक भरल्याची, त्या संवर्गाच्या उमेदवाराची जाहिरात, मुलाखत पत्र, त्याबाबतचे रजिष्टर प्रत, शिक्षण उपसंचालकाला माहिती न कळविता रोष्टर / बिंदुनामावलीनुसार रिक्त पदावर माझ्या संवर्गातील उमेदवाराची भरती न करता परस्पर शिवगजे, प्राचार्या चव्हाणके मॅडम, प्रशासनातील त्यावेळचे अधिकारी यांनी संगनमताने दुस-याच जातीचा उमेदवार भरल्याचे निष्पन्न झाल्यामुळे या सर्वांवर गुन्हा दाखल व्हावा.	
	दि. २०/०४/२०१७ चे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेची माहिती पत्र – माझ्या राजीनामा दिल्यावर माझ्या रिक्त जागेवरील दुस-या उमेदवाराची जाहिरात, मुलाखत पत्र, मुलाखत घेतल्याची दिनांक, रजिष्टर प्रत, शिक्षण उपसंचालकाला कळविलेली माहिती, बिंदूनामावलीनुसार पद भरती केल्याचा कोणताच पुरवा संस्थेकडे नसल्यामुळे या पदभरतीबाबत शिवगजे यांच्यासह, प्राचार्या चव्हाणके मॅडम व त्यावेळचे संस्थान प्रशासकीय अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
१५	श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी शिक्षकांची माहिती पत्रक १) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी शिक्षकांचे माहिती पत्रक – १९९३-९४ पासून शिक्षकांच्या नियुक्त्याबाबतचे माहितीपत्रक बघितल्यास १९९३-९४ पासून २००५ पर्यंत शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी आपल्या जवळच्या शिक्षकांना सहा-शिक्षक म्हणून नियुक्त्या देऊन शिक्षक भरतीबाबतचा पैसा घेऊन मोठा घोटाळा गैरप्रकार केला आहे. त्यामुळे शिवगजेसह प्राचार्या मॅडम यांच्यावर देखील गुन्हा दाखल व्हावा.	सन २०१० पुर्वी शैक्षणिक संकुलाकडील आस्थापना विषयक कामकाज (भरती, नियुक्ती व इतर) हे संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरु होते. कर्मचारी नियुक्तीबाबतचे सर्व निर्णय हे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने घेतले जातात. यामध्ये कोणत्याही कर्मचा-यास अथवा अधिका-यास हस्तक्षेप करता येत नाही, किंबुहना तो त्यांचा अधिकार नाही. तसेच याबाबत अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचे परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नाहीत.
	२) असि. टिचर माहिती पत्रक – १९९३-९४ पासून शिवगजे यांनी आपल्यासह इतर शिक्षकांना पात्रता नसतांना कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी मिळवून दिली आहे व मोठा गैरकारभार केला आहे. त्यामुळे शिवगजेसह अपात्र शिक्षकाच्या नियुक्त्या रद्द करुन त्यांच्याकडून बोगस वेतनश्रेणी घेतल्याचा पगार वसुल करुन कायदेशीर गुन्हा दाखल करावा.	
	३) निर्णय क्र. २७ ची टिपणी, आदेश- शासन परिपत्रकानुसार माध्यमिककडून उच्च माध्यिमिकडे न जाण्याचा शासननिर्णय असतांना शिवगजे यांनी आपल्या जवळच्या शिक्षीका सौ. वैशाली नंदकुमार देशमुख यांची शासन निर्णयाची पायमल्ली करुन माध्यमिक कडून उच्च माध्यमिकडे गैरप्रकार नियुक्ती करुन कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी मिळवून दिली. शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन संस्थेला व शासनाला चुकीचा व खोटा अभिप्राय देऊन अशा चुकीच्या नियुक्त्या देऊन गल्लेलठ्ठ पगार जवळच्या शिक्षकांना देऊन संस्थान व शासनाची फार मोठी फसवणूक करुन गैरप्रकार केल्यामुळे शिवगजेसह दोषीवर कारवाई होऊन गुन्हा दाखल वहवा.	सन २०१० पुर्वी शैक्षणिक संकुलाकडील आस्थापना विषयक कामकाज (भरती, नियुक्ती व इतर) हे संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरु होते. कर्मचारी नियुक्तीबाबतचे सर्व निर्णय हे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने घेतले जातात. यामध्ये कोणत्याही कर्मचा-यास अथवा अधिका-यास हस्तक्षेप करता येत नाही, किंबुहना तो त्यांचा अधिकार नाही. तसेच याबाबत अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचे परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नाहीत. मा.आस्थापना उपसमितीचे दि.१८.१०.२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्रीमती वैशाली नंदकिशोर देशमुख (साळुंखे) यांची श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूक करण्यात आलेली आहे.
	निर्णय क्र. २९ ची टिपणी आदेश- निर्णय क्र. २९ ची खोटी टिपणी, आदेश तयार करुन शिवगजे यांनी आपण १९९३ पासून १ क्रमांकाचे जेष्ठतम असल्याचे खोटे दाखवुन उपप्राचार्यपदी वर्णी लावुन घेण्याचा प्रयत्न अनेकदा केला. गैरप्रकार खोटी माहिती संस्थेला व शासनाला कळवून प्राचार्य पदाचा कारभार पहाण्याचे अनके प्रयत्न शिवगजे यांच्याबाबत श्री साईबाबा संस्थामध्ये उघड झाल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	दि.३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री. शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.

टिपण्या घेऊन शिवगजे यांनी या पत्राच्या आधारे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा मान्यता व सांकेतांक क्रमांक एक असतांना ते स्वतंत्र असल्याचा बेबनाव करुन ते वेगळे करण्याचा प्रयत्न करुन संस्थानची व शासनाची फसवणूक केल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा. प्राचार्य नसतांना शिवगजे यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे आपणच प्राचार्य असल्याचे खोटे नाटे करुन महत्वाच्या मान्यतापत्रावर त्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे आपणच प्राचार्य असल्याचे खोटे नाटे करुन महत्वाच्या मान्यतापत्रावर त्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे आपणच प्राचार्य असल्याचे दाखवून त त्यावर सहया करुन संस्थान व शासनाची फसवणूक केली आहे.

दि. १७ नोव्हेंबर २००५ चे शिक्षण उपसंचालक यांचे पत्र- श्री साईबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सन २००५ पासून सुरु झाल्यानंतर शिवगजे यांनी प्राचार्य नसतांना मा. कार्यकारी अधिकारी यांच्या नावाचे शिक्षण उपसंचालकास पत्र तयार करुन (संदर्भ- आपले जा.प. क्र. एसएसएस/ कन्या / कनिष्ठ १०५३८ / दि. ०९/०९/२००६) त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांचे सहया घेऊन नवीन शाखाचे वर्ग सुरु करण्याच्या नावाखाली श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर पासून कनिष्ठ महाविद्यालय नियमबाहयरित्या वेगळे करण्याचा प्रयत्न केला आहे. खोटे दस्तऐवज तयार करून नियमबाहयारित्या प्राचार्य असल्याचे भासवून शिवगजे यांनी कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य पदाच्या हव्यासापोटी वेगळे करण्याचा प्रयत्न केला असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.

दि. १७ सप्टेंबर २००६ शिक्षण उपसंचालकाचे मान्यता पत्र.

दि. ०७ ऑक्टोबर २००६ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे -१ यांचे पत्र – श्री साईबाबा कन्य विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्याल यांची मान्यता एकच व संलग्नित असून या दोघांची मान्यता व सांकेतांक एकच असतांना शिवगजे यांनी मा. कार्यकारी अधिकारी री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या नावे खोटे पत्र तयार करुन त्यावर त्यांची गाफील ठेऊन सही घेऊन शिक्षण उपसंचालकाला खोटे पत्रव्यवहार करुन कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याच्या नावाखाली श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर पासून कनिष्ठ महाविद्यालय वेगळे करुन ते स्वतंत्र असून आपण त्याचे प्राचार्य आहोत असे खोटे नाटे दस्तऐवज करुन, गैरप्रकार करुन गैरव्यवहार करुन, मोठा गुन्हा करुन स्वतंत्र महाविद्यालय करुन संस्थानची व शासनाची मोठी फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल व्हावा.

विषय क्र २८ निर्णय क्र. ३८१ – श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय हे संलग्न असल्याने शिवगजे यांनी खोटेनाटे पत्रव्यवहार शिक्षण उपसंचालकांना पाठवून श्री साईबाबा कन्या शाळेपासून कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या बैठकीचा अभाव असल्याचे खोटे करण दाखवून श्री साईबाबा संस्थानने बांधलेल्या जिल्हा परिषद शाळेतील इमारतीतील वर्गखोल्या संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वापरासाठी उपलब्ध करणे बाबतचा ठराव करण्यास भाग पाडून श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर पासून कनिष्ठ महाविद्यालय बसण्यास इमारत / वर्गखोल्या नाही असे खोटे ठराव, आदेश टिपणी संस्थानला घेण्यास भाग पाडून श्री साईबाबा (कनिष्ठ महाविद्यालय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिर्डीच्या जिल्हा परिषद शाळेत हालवून आपण कसे प्राचार्य होऊ या स्वार्थापोटी महाविद्यालय स्वतंत्र करण्याचा कुटील डाव शिवगजे यांनी शासनाची व संस्थानची फसवणूक केल्यामुळे शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल करावा.

आयत्या वेळेचा विषय नं. ०१- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी यांची मान्यता एकच असतांना शासनाची व संस्थानची फसवणूक करुन आपण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्यपद कसे सांभाळू या हव्यासापोटी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या बैठकीच्या नावाखाली कनिष्ठ महाविद्यालय प्रथम जिल्हा परिषद शाळा शिर्डीचे अधिग्रहण करुन पुन्हा ती शाळा कनिष्ठ महाविद्यालयाला विद्यार्थ्यासाठी बैठकीची व्यवस्था अपुरी पडण्याच्या नावाखाली परत तिचा ताबा पुन्हा जिल्हा परिषदेकडे देऊन वारंवार प्राचार्य होण्याच्या हेतूने कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीत बदल करण्याचा खटाटोप शिवगजे यांनी परस्पर केल्यामुळे शिवगजे यांच्यवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

बदलाबाबत कार्यालयीन आदेश, याबाबतचे कोणतेही कागदपत्रे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर अथवा कनिष्ठ महाविद्यालयाकडून सादर करण्यात आलेले नाहीत. तसेच नावात बदल केलेबाबत प्रशासन शाखेस अथवा इतर कोणत्याही विभागास कळविण्यात आलेले नव्हते.

मुख्यध्यापिका, कन्या विद्या मंदिर यांनी त्यांचे दि.२७.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाचे नावांत बदलाबाबतचे सर्व कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयाकडे असलेबाबत कळविलेले आहे. त्याबाबत त्यांनी त्यांचेकडील दि.२९.०३.२०१६ रोजीचे पत्राची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. सदर पत्रावर सौ.चव्हाणके, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यांनी उपरोक्त संदर्भातील फाईल कनिष्ठ महाविद्यालयाकडे असलेबाबत कळविलेले आहे. मात्र कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि.०४.०६.२०१६ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त कोणतेही कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयाकडे नसलेबाबत कळविलेले आहे.

सन २००६ मध्ये मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी परस्पर (संदर्भ-जा.क्र.एससएस/कन्या /कनिष्ठ/१०५३८/ दि.०९.०९.२००६) पत्रव्यवहार करुन, शाळेचे नांवात अनाधिकृत रित्या बदल केला असल्याचे सकृतीदर्शन दिसून आलेले होते.

त्यामुळे शाळासंहिता नियमावली व मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील मान्यता यांचे अवलोकन करता श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत साईबाबा कन्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावांत केलेल्या बदल रद्द करुन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा नावांत बदल करणेचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.४६४ नुसार मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.४६४ नुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या नावात बदल करणेबाबत जा.क्र.एसएसएस /साप्रशा /आस्था/३००५/२०१६ दि.१२ सप्टेंबर, २०१६ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

त्यानुसार मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.शिउसं/पुवि/उमाशि-१/ना.ब/२०१६-१७/२५४९ दि.१० एप्रिल, २०१७ रोजीचे पत्रान्वये दि.०७.०८.२०१६ च्या ठरावानुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या प्रमाणे नावात बदल केलेला आहे.

	दि.०४/१०/९७ चे विभागीय सचिवाकरीता पुणे विभागीय मंडळ, पुणे – दि. ०४/१०/१९९७ चे विभागीय सचिव करीता पुणे विभागीय सचिवकरीता पुणे विभागीय मंडळ पुणे यांच्या पत्रानुसार श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता क्रमांक, संकेतांक क्रमांक, संलग्निता व एकच असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या अकार्यक्षमतेचा फायदा घेऊन शिक्षण उपसंचालकांशी पत्रव्यवहार करुन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर पासून कनिष्ठ महाविद्यालय स्वतंत्र करण्याचा प्रयत्न प्राचार्य होण्याच्या हव्यासापोटी केल्यामुळे त्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
	मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर (आस्थापना विभाग) विषय- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिराचे नावातील बदलबाबत – २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये कन्या विद्यामंदिरामध्ये मुलींसाठी कनिष्ठ महाविद्यालय (इयत्ता ११ वी) चे नवीन वर्ग सुरु करणेकामी मा. शिक्षण उपसंचालक यांनी त्यांचेकडील दि. ०१/१०/२००१ रोजीच्या पत्रान्वये मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी १८६० अगर मुंबई सार्वजनिक अधिनियम १९५० प्रमाणे आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वर्गांना परवानगी घ्यावयाची आहे तसेच मान्यता पत्रातील नियम नं. ७ मध्ये स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयास परवानगी देण्यात येणार नाही असे असतांना शिवगजे यांनी शिक्षण उपसंचालक पुणे यांना बोगस पत्रव्यवहार करुन श्री साईबाबा कन्या विद्यामंदिराच्या नावात बदल करुन शासनाची व संस्थानची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. प्राचार्य होण्याचे अभिलाषेपोटी संस्थानला अंधारात ठेऊन कोणताही ठराव, आदेश, टिपणी न ठेवता परस्पर बनावट दस्तऐवजच्या आधारे श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर पासून कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावात बदल करुन ते स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केल्यामुळे शिवगजे यांच्यावर अफरातफरीचा गुन्हा दाखल करुन फौजदारी दाखल करावी.	
१८	विषय नं. १८, विषय नं.१९ निर्णय क्र.४८८ – सन २००१ पासून सन २००५ पर्यंत जवळच्या शिक्षकांना सहा. शिक्षक म्हणून नियुक्त्या देऊन त्यांना वेतनश्रेणीनुसार पगार देण्यात आला. २००५ पासून शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम संगनमत करुन आपल्या मनमानी गैरकारभारामुळे परत २००५ शिक्षण सेवक योजना काही शिक्षकांना लागू करुन त्यांची वेठबिगारी सारखी राबवणूक करुन त्यांना वेतनश्रेणीपासून वंचित ठेवले. २००८ पासून पुन्हा आपल्या मनमानी निर्णयात बदल करुन संदर्भिय विषय नंबरने, निर्णयाने २००८ पासून जवळच्या शिक्षकांना सहा. शिक्षकांच्या नेमणूका देऊन वेतनश्रेणी देऊन मोठा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर गुन्हा दाखल करावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	श्री साईबाबा संस्थानच्या शैक्षणिक संकुलातील इतर विभागाच्या शाळातील शिक्षकांच्या नेमणूकी यादी, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी. – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित संस्थेच्या शाळा माध्यमानुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय मराठी माध्यम तर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शिर्डी असे दोन शाळा असतांना श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या शिक्षकांच्या नियुक्त्या या शासन नियमानुसार सहा. शिक्षक म्हणून वेतनश्रेणीनुसार देण्यात आल्या. संस्थानच्या एका माध्यमाच्या शाळेला वाटल तसा मनमानी नियम देऊन शिक्षण सेवक योजनानुसार शिक्षण सेवकांचा नियम काही शिक्षकांना अन्यायकारकणे लादून त्यांचा वेठबिगारी सारखा वापर करुन काही शिक्षकावर अन्याय केला तर संस्थानच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना शिवगजे यांच्या संस्थानला दिशाभुल करण्याच्या प्रवृत्तीमुळे शासन निर्णयानुसार व्यक्तीसापेक्ष वेतनश्रेणीच्या नेमणूका देऊन शिवगजे यांच्या संस्थेला माहती कळविण्याच्या चुकीच्या पध्दतीमुळे देऊन शिवगजे यांनी जवळच्या शिक्षकांचे भले केले तर काही शिक्षकांना देशोधडीला लावले	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले

	असल्याने नियमांचा भंग केल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
१९	दि. १५ सप्टेंबर २००१ चे नियुक्तीपत्र जा.नं. एसएसएस / वशी १ /१९२८८/२००३ जा. नं. एसएसएस/ वशी ०१/ ३४११/ २००८ दि. १३ नोव्हेंबर २००५ चे नमेणूक पत्र दि.०३/०१/२००९ च्या सभेतील निर्णय क्र. ३(२७) – माध्यमिक कडून उच्च माध्यमिकडे न जाण्याचा शासन निर्णय असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन सौ. वैशाली नंदकिशोर देशमुख यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर कडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे नियुक्ती देऊन चुकीच्या पध्दतीने देऊन शाहा संहितेच्या नियमाचा भंग केल्यामुळे शिवगजेसह दोषींवर कारवाई करुन त्यांच्या नियुक्त्या रद्द करुन कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.	श्रीमती वैशाली नंदकिशोर देशमुख (साळुंखे) यांना तत्कालिन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, माध्यमिक विभागाकडे प्रथम शिक्षणसेवक म्हणून (दि.०१.११.२००० ते दि.३०.०४.२००३) व त्यानंतर दि.०१.०७.२००१ पासून रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता नेमणूक देण्यात आली. सदरचे नेमणूक आदेश त्यांनी अटी व शर्तीसह स्विकारलेले आहेत. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-१/१९२७/२००३ दि.१४ ऑगस्ट, २००३ अन्वये श्रीमती वैशाली नंदकिशोर देशमुख (साळुंखे) यांना श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर माध्यमिक विभागाकडे रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत संस्थान सेवेत कायम करण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्वतः केलेल्या अर्जानुसार मा.आस्थापना उपसमितीचे दि.१८.१०.२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार त्यांची श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे रु.७२२५-२२५-११०५० या वेतनश्रेणीत सहा.शिक्षक (गणित) पुर्णवेळ या पदावर दि.१५.०६.२००७ पासून नेमणूक करण्यात आली, सदरचा नेमणूक आदेशही त्यांनी अटी व शर्तीसह स्विकारलेला आहे.
	दि. २६ जुन १९९५ चे नियुक्ती पत्र ०१/०७/१९९६ चे नियुक्ती पत्र दि. १३ नोव्हेबर २००८ चे नेमणूक पत्र दि. ०३/०१/२००९ चे सभेतील विषय नं. ०३ निर्णय क्र. ०३ – माध्यमिक कडून उच्च माध्यमिककडे न जाण्याचा शासन निर्णय असतांना श्री घोडके यांची नियुक्ती १९९५ पासून माध्यमिक विभागाकडे असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या संगनमताने या शिक्षकाकडून पैसे घेऊन त्याची माध्यमिककडून उच्च माध्यमिकडे नियुक्ती देऊन गैरकारभार करुन भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजेसह दोषीवर कारवाई होऊन सर्व शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करुन त्यांनी लाटलेल्या वेतनश्रेणीच्या रकमा वसुल करुन त्यांच्यावर शाळा संहितानियमाचा भंग केल्यामुळे गुन्हा दाखल व्हावा.	श्री.घोडके यांनी वेळोवेळी कनिष्ठ महाविद्यालयाकडे काम करण्याची संधी मिळावी म्हणून प्रशासनाकडे विनंती अर्ज केले होते, त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२००९ चे सभेतील निर्णय क्र.०३ (२१) नुसार जा.क्र. एसएसएस/वशी-०१/३४१२/२००८ दि.१३ नोव्हेंबर, २००८ अन्वये श्री.अरुण बाबुराव घोडके यांची दि.१४.११.२००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडे विहीत वेतनश्रेणी देऊन सहा.शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्राचार्या चव्हाणके मॅडम व श्री.शिवगजे यांनी पैसे घेतलेबाबत अथवा त्यांनी बळजबरीने नियुक्ती दिलेबाबत श्री.घोडके यांनी अथवा इतर कोणत्याही शिक्षकांनी यापुर्वी तक्रार केलेली नाही, तसेच अर्जदार यांनी केवळ तक्रार केलेली आहे.
	विषय नं. ७९ (१८) – कनिष्ठ महाविद्यालयाकडे अध्यापन करणा-या शिक्षकाची पात्रता ही एम.ए.बी.एड. (II) व्दितीय श्रेणी असावी असा शासन नियम असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन श्री दिलीप शंकरराव शेळके या शिक्षकाची कनिष्ठ महाविद्यालयाकडे शिकविण्याची किमान एम.ए.बी. एड. व्दितीय श्रेणी ही पात्रता नसतांना या शिक्षकाकडून अमाप पैसा घेऊन यांची नियुक्ती कनिष्ठ महाविद्यालयाकडे पात्रता नसतांना केल्यामुळे शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी शिक्षकाची पद भरतांना शासनाच्या नियमावली नुसार न भरता आपल्या जवळच्या शिक्षकांच्या नियुक्त्या गैरप्रकारे करुन शासनाची व संस्थानची गैरप्रकारे फसवणूक केल्याप्रकरणी शिवगजेसह दोषीवर कारवाई करुन दिलीप शंकरराव शेळके या शिक्षकाची नियुक्ती रद्द करुन त्यांनी लाटलेला पगार संस्थानने वसुल करुन शिवगजेसह दोषीवर गुन्हा दाखल करावा.	श्री.दिलीप शंकरराव शेळके यांनी वर्तमानपत्रातील जाहिरातीस अनुससरुन शिक्षणसेवक (इंग्रजी) या पदासाठी अर्ज केलेला होता. जाहिरातीमध्ये सदर पदाची पात्रता एम.ए.(द्वितीय क्षेणी) व बी.एड.अशी नमुद केलेली होती. मात्र श्री.शेळके यांची शैक्षणिक पात्रता एम.ए.(तृतीय श्रेणी) व बी.एड. अशी होती. श्री.शेळके यांचे एम.ए.तृतीय श्रेणीमध्ये असल्यामुळे विशेष बाब म्हणून त्यांना मुलाखत पत्र देण्यात आलेले होते. मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर मुलाखत होऊन, श्री.शेळके यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे तासिका तत्तवावर नेमणूक करण्यात आली. त्यानंतर त्यांचे विषयाचा कार्यभार पुर्ण झाल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५१५ (६) नुसार त्यांना दि.१६.०६.२००८ पासून ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत कनिष्ठ महाविद्यालयाकडे सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) या पदावर नेमणूक करण्यात आली. श्री.शेळके यांचेकडे अपुर्ण पात्रता असल्याने त्यांना माध्यमिक सहा.शिक्षकाची वेतनश्रेणी देण्यात आलेली होती. उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या अर्हता नियमावलीमध्ये पुर्णकालिक शिक्षका यांचे पात्रतेमध्ये सांविधी विद्यापीठाची स्नातक पदवी

		(दोन) पदवी तृतीय वर्गातील (पास क्लास) असल्यास इ.८ वी ते इ.१० वी अगर इ.११ वी ला शिकविण्याचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. श्री.शेळके यांचेकडे सदरचा अनुभव असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.०५.२००९ चे सभेतील निर्णय क्र.४५७ नुसार श्री.शेळके यांची अपुर्ण पात्रता असली तरी अनुभव विचारात घेऊन त्यांना ७२२५-२२५-११०५० ही कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी दि.१८.०५.२००९ पासून देण्यात आलेली आहे. उपरोक्त सर्व कार्यवाही तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने करण्यात आलेली आहे. यामध्ये श्रीमती चव्हाणके व श्री.शिवगजे यांना कोणताही अधिकार नव्हता. तसेच अर्जदार यांनी अर्जात केवळ तक्रार केलेली आहे, मात्र याबाबत कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे जोडलेले नाहीत.
	दि. ०२/०६/२००८ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची शिक्षक पदाची जाहीरात – कायम विनाअनुदानीत शाळेला शिक्षण सेवक योजना लागु नाही या तत्वानुसार सन २००१ पासुन शिक्षकाची पद भरती केली असतांना शिवगजे यांनी प्राचार्यांच्या मदतीने पुन्हा सन २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण सेवकांची जाहीरात काढून अनेक शिक्षकांची आपल्या मनमानी व सत्तापिपासू वृत्तीमुळे फसवणूक करुन त्याची चुकीच्या मार्गाने नियुक्त्या देऊन फसवणूक केल्याप्रकरणी शिवगजसह दोषीवर गुन्हा दाखल करावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	दि. १२/१०/२०१२ श्री डी.के. राऊत शिक्षण विस्तार अधिकारी जि.प. अहमदनगर यांचा तपासणी बुकातील शेरा – शाळा विनाअनुदानीत असल्याने सर्व शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व संच मान्यता घेणे प्रशासकीय दृष्टीने योग्य असल्याचे असतांना शिवगजे यांची शैक्षणिक पात्रता बोगस असल्याने व त्यांच्या नियुक्त्या चुकीच्या पध्दतीने झाल्यामुळे तसेच शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या शाहा संहितेच्या नियमांचा भंग करुन केल्यामुळे तसेच अने अपात्र शिक्षकांच्या नियुक्त्या पैस घेऊन केल्यामुळे शिक्षण विस्तार अधिका-यांनी शेरे देऊनही आजपर्यंत शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व बोगस संच मान्यता दाखवुन शासनाची व संस्थानची फसवणूक केली आहे. आणि करत आहे त्यामुळे शिवगजेसह दोषीवर कारवाई व गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील कोणत्याही शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता घेण्यात आलेल्या नाहीत ही बाब सत्य आहे. मात्र शैक्षणिक संकुलाकडील सर्व शाळांच्या संच मान्यता या दरवर्षी वेळोवेळी घेण्यात आलेल्या आहेत. तसेच अर्जदार यांनी अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे बोगस संच मान्यतेच्या विषयाबाबत श्रीमती मिरजकर, तत्कालीन मुख्याध्यापिका यांची खाते चौकशी सुरु आहे.
	दि. २८/०७/२०१४ श्री पोले, शिक्षणाधिकारी (माध्य.) सोलापूर यांचा तपासणी पुस्तकातील शेरा – कोणत्याही संस्थेच्या माध्य. व उच्च माध्यमिक विभागात पदे भरतांना रोस्टर तपासणी करुन आरक्षणानुसार पदे भरती करण्याचा शासन निर्णय, शिक्षणाधिकारी यांचा आदेश असतांना शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी कटकारस्थान करुन, खोटेनाटे करुन अल्पसंख्यांक शाळेचे नियम वापरुन १९९४ पासून फक्त मराठा (ओपन) समाजाच्या शिक्षकांना श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूका देण्यात आल्या आहेत. वशिलेबाजी व पैशाचा व्यवहार करुन शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी चुकीच्या मार्गाने शासन निर्णय, शिक्षणाधिकारी यांचे म्हणणे डावलून मनमानी नियुक्त्या करुन मोठा गैरकारभार करुन शासनाची फसवणूक केल्यामुळे शिवगजेसह सर्व दोषीवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. तसेच आरक्षण व रोष्टर प्रमाणे श्री साईबाबा संस्थानने पद न भरल्यामुळे शिक्षकांची पदे रद्द करुन शाळेची मान्यता काढून घेण्याचा आदेश शिक्षण उपसंचालक पुणे यांना द्यावा.	श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना (शैक्षणिक संकुलासह) सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागस वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र तांत्रिक कारणास्तव त्याबाबतची अमंलबजावणी अद्याप झालेली नाही. संस्थान सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही अद्याप चालु आहे. त्यामुळे अद्याप १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक भरती अथवा इतर विभागातील कर्मचारी भरती करण्यात आलेली नाही. खाजगी शिक्षण संस्थानचे कामकाज हे खाजगी शाळा सहिंतेनुसार चालते त्यानुसार शिक्षकांच्या आवश्यक पदसंख्येची निश्चिती (संच मान्यता) शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार

		शिक्षण विभागाने संच मान्यता घेतली आहे. संच मान्यतेनंतर बिंदुनामावली चेक करुन घेणे व त्यानुसार जाहीरात,नियमानुसार पद भरती व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता घेणे अशी प्रक्रिया आहे. मात्र यापुर्वी बिंदुनामावली व वैयक्तीक मान्यता घेण्यात आलेल्या नाही. मात्र तत्कालीन व्यवस्थापन समितीने पद भरतीस मान्यता दिल्याचे दिसते.
२०	दि. १३/११/२०१४ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती- शिक्षण उपसंचालकांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारणे बंधनकारक आहे असे मान्यता पत्रात म्हटलेले आहे. त्याकामी शासनाने पुर्व परवानगीने निश्चित केलेले शुल्क व्यवतिरीक्त मुले ३३० रु. मुली शुल्क नाही असे तोतया प्राचार्य शिवगजे यांनी दिलेली माहिती पुर्णपणे खोटी व दिशाभुल करणारी आहे. शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी संगनमत करुन शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या व्यतिरीक्त अनेक प्रकारचे शुल्क आकारुन गरीब विद्यार्थ्यांचे शोषण करुन भरमसाठ पैसा कमाविला आहे. त्यामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असून, याठिकाणी गरजू, वंचित व आर्थिकदृष्टया मागसलेल्या विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण देण्याचा मानस आहे, त्यामुळे अत्यंत माफक शैक्षणिक शुल्क आकारणी करुन, विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.
	दि. २०/०८/२०१४ चा कु. रणमाळे सायली मधूकर या विद्यार्थीनीचा अर्ज दि. २०/०८/२०१७ चा सय्यद सिजया हसन हिचा अर्ज- शासनाने आकारले परिक्षा शुल्क आकारणे बंधनकारक असतांना तोतया प्राचार्य शिवगजे यांनी आपल्या सहीनिशी विद्यार्थीनीकडून ११ वी गुणपत्रकाचे प्रत्येकी १०० रु. शुल्क आकारुन शासनाची व संस्थानची फसवणूक करुन मोठा गैरकारभार व भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा. दि. १३/११/२०१४ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती चे पत्र – तोतया प्राचार्य शिवगजे यांनी दिलेल्या माहितीवरुन श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी मार्कशिटचे डुप्लीकेट अथवा मुळप्रत मिळण्यासाठी कोणतेही शुल्क घेतले जात नाही व कोणतेही दंड वसुल कले जात नाही. तरी वरील उपरोक्त विद्यर्थीनी कडून प्रत्येकी १०० रु. प्रमाणे निकाल पत्रकाचे पैसे घेऊन शिवगजे यांनी आपल्या सहीनिशी गैरप्रकार केल्याचे उघडकीस आल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा. दि. १३/११/१४ चे पत्र दि. १९/११/२०१४ ची विद्यार्थ्यांची परिक्षा फी भरल्याची वर्गशिक्षकांनी दिलेली पावती – १) ऋतुजा सुभाष ओहोळ,२) खरात गणेश पांडूरंग, ३) पटेल आरजूबाना अब्दूलमुक्तदिर, ४) गायकवाड अशोक शंकर, ५) मयुरी बबन कुलधरण - शासनाने ठरवुन दिलेले बोर्डाची परिक्षा फी प्रत्येकी ३२५ रु. एवढी असतांना शिवगजे तोतया प्राचार्य पदाचा गैरवापर करुन विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी सराव फी १२० रु. सराव परिक्षा ॲडमिशन चार्ज १० रु. अन्यायकारकपणे प्रत्येक विद्यार्थ्यामागे आकारुन विद्यार्थ्यांची फसवणूक करुन अर्थिक शोषन केल्याबद्दल शिवगजे यांच्यावर भ्रष्टाचार व फसवणूकीचे सर्व गुन्हे दाखल व्हावे.. दि. ११/१२/२०१४ चा सागर त्र्यंबक बिडगर विद्यार्थ्याचा अर्ज – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या माहितीमध्ये आम्ही कोणतेही दंड वसुल करत नाही असे लेखी म्हटले असता या विद्यार्थ्याकडून आकरावी नापासाची पुर्वपरिक्षा नावाखाली ५०० रु. शैक्षणिक शुल्क नियमबाहयरित्या आकारुन आर्थिक शोषन करुन या विद्यार्थांची फसवणूक करुन दंड स्वरुपात रक्कम / शुल्क आकारुन भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा. महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, पुणे विभागीय मंडळ, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा, परिक्षा शुल्काचे विवरणपत्र विविध दंड आकारल्याचे विवरणपत्र, विकास शिवगजे यांचे बॅकेत पैसे जमा केल्याचे बॅक पावती / रिसीट – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाचे परिक्षा शुल्काचे विवरणपत्र नावाखाली शिवगजे यांनी स्वतःचे बोगस परिक्षा शुल्काचे विवरणपत्र	अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेल्या श्री.शिवगजे यांचे विरुद्ध भ्रष्टाचार व फसवणुकीच्या प्रकरणांबाबत यापुर्वीही इतर अर्जदारांचे तक्रार अर्ज प्राप्त झालेले होते. सदर अर्जांबाबत श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांचे मार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. त्यानंतर श्री.शिवगजे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचा लेखी खुलासा घेण्यात आलेला आहे. श्री.शिवगजे यांचे लेखी खुलाशावर श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.३१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/ २०१५दि.११ जुन, २०१५अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली आहे.

	तयार करुन एकूण २३९१९५/- रु. व इतर जाचक परिक्षा शुल्क, आयकार्ड फी, मोबाईल दंड, रकमा संस्थेला अकौटं विभागाला किंवा शाळेच्या बँक अकाउटंवर जमा न करता स्वतःच्याखात्यावर जमा करुन फक्त ३२५ रु. प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क नियमबाहय पध्दतीने बोर्डाला पाठवून इतर उरलेले पैसे आपल्याच खात्यावर ठेऊन भ्रष्टाचार केला आहे. भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर शिवगजे यांनी विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी रकमा डोनेशन (देंणगी) म्हणून संस्थानच्या अकाऊंट विभाग (लेखाशाखेला) जमा केलेल्या आहेत. विद्यार्थ्यांची फि डोनेशन (देणगी) म्हणून स्विकारणे हे कायद्याने गुन्हा असल्याने शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा श्री साईबाबा संस्थानने दाखल करणे गरजेचे असतांनाही श्री साईबाबा संस्थानने शिवगजे यां प्रकरणात दोषी असतांनाही कुठलीही कारवाई न करता हे प्रकरण पडपण्याचा प्रयत्न केल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे नाहक शोषन झाले आहे. अनेक प्रकारे भ्रष्टाचारात दोषी असलेल्या शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
	दि. ११ नोव्हेंबर २०१४ चा पालक व प्रतिष्ठित नागरीकांनी केलेला अर्ज व स्वाक्षरी प्रत.- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात शिवगजे तोतया प्राचार्य वाढीव परिक्षा शुल्क व विविध दंड आकारुन गरीब विद्यार्थ्यांचे शोषन करत असल्याबाबत पालक व शिर्डीचे प्रतिष्ठित नागरीकांनी केलेल्या अर्जावर श्री साईबाबा संस्थानने थातुर-मातुर कारवाई करुन अर्ज निकाली काढण्याचा किळसवाणा प्रयत्न श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने केला आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे परिक्षाशुल्क व दंड आकारुन त्यांचे आर्थिक शोषन करुन भ्रष्टाचार करणा-या शिवगजे व हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणा-या प्रशासकीय अधिका-यावर गुन्हे दाखल व्हावेत.	
२१	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची दि. २/०८/२०१४ ची शिक्षक पदाची जाहिरात – दि.२८/०८/२०१४ ची शिक्षक पदाची जाहिरात परत शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या सांगण्यावरुन सहा. शिक्षक (परिवीक्षाधिन) असा व्यक्तीसापेक्ष नियमात बदल करुन शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी जवळच्या शिक्षकांना सहा. शिक्षक तर जे मागासवर्गीय शिक्षक आणि त्यांच्या जवळचे नसलेले शिखक असा भेद करुन व्यक्तिसापेक्ष नियमाचा वापर करुन अनेक शिक्षकाचे शोषन करुन फसवणूक केल्याबद्दल शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
२२	वृत्तपत्राचे कात्रण- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विविध उपक्रमाची माहिती श्री साईबाबा संस्थान प्रशासनाला न देता परस्पर पत्रकारांना हाताशी धरुन प्राचार्य असल्याचे खोटे सांगुन वृत्तपत्रामध्ये माहती देतांना प्राचार्य असल्याचे खोटे सांगून पत्रकारांना प्राचार्य असल्याची खोटी माहिती देऊन प्राचार्य या पदाचा गैरवापर करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त शिर्डी सारख्या संस्थेची बदनामी केली आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करावी.	जा.नं.एसएसएस/ वशी-०१/१८९२/२००८ दि.०४ जुलै, २००८ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचा कार्यभार पुढील आदेश होईपावेतो श्री.विकास महादेव शिवगजे यांचेकडे तात्पुरता देण्यात आलेला होता. श्री.शिवगजे यांना प्र.प्राचार्य अथवा प्र.उपप्राचार्य असा कोणताही पदभार अथवा पदनाम दिलेले नाही. असे असतांनाही श्री.शिवगजे हे वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या बातम्या अथवा जाहिराती तसेच इतर कागदपत्रांवर (कार्या.टिपण्या, व इतर) स्वतःचा नामोल्लेख प्राचार्य म्हणून करतात. त्यामुळे यापुढे श्री.शिवगजे यांना सर्व पत्रव्यवहार अथवा दैनंदिन कामकाज हे सहा.शिक्षक या नावाने करण्याबाबत समज देता येईल.
२३	कु. दाणगे आरती अशोक, कु. तुरकणे माहेश्वरी कैलास यांचा शाळा सोडल्याचे दाखले. – शाळा संहिता नियमानुसार विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर नियुक्त मुख्याध्यापकाचीच सही असणे आवश्यक असतांना शिवगजे यांनी सहा. शिक्षक असतांना विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर बोगस प्राचार्य म्हणून बोगस सहया केल्याचे उघडकीस आले आहे. शालेय दस्तऐवजावर अधिकार नसतांना पदाचा गैरवापर करुन शिवगजे यांनी शासनाची, संस्थानची व विद्यार्थ्यांची फसवणूक केल्यामुळे मुळ दस्तऐवजावर अधिकार नसतांना सहया केल्यामुळे शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल करणे ऐवजी श्री साईबाबा संस्थानने हे प्रकरण पडपण्याचा प्रयत्न करुन शिवगजे यांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. सहयांचा अधिकार नसतांना विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर सहा करणे हा गंभीर गुन्हा असल्याने शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	

२४	दि. १८ जुन २०१७ सकाळ वृत्तपत्राचे कात्रण बातमी दि. १९/०७/२०१७ पुढारी वृत्तपत्राचे कात्रण बातमी – अधिकार नसतांना प्राचार्य पदाचा गैरवापर करुन साईसंस्थानच्या सहाय्यक शिक्षक विकास महादेव शिवगजे यांनी विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर सहया व शाळेचे नावही परस्पर बदलल्याचे दैनिक वृत्तपत्रामध्ये येऊन तसेच त्याबाबत शिवगजे यांना संस्थानने नोटीसही काढून त्यावर कोणतीही कारवाई अगर गुन्हा दाखल न करता परस्पर हे प्रकरण शिवगजे यांनी संस्थान अधिक-यांना पैसा देऊन मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. शिवगजे यांच्याकडून या वा अनेक जबरी गुन्ह शालेय कामकाजाच्या बाबतीत झाले असल्याने त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा.	
२५	दि. १२/०५/२०१५ रोजीचा तक्रार अर्ज, दि.२७/०५/२०१५ रोजीचे अपर सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र. , दि. ०५/०९/२०१५ रोजीचा अर्ज, दि. १६/०९/२०१५ रोजीचा अर्ज, दि.०८/१२/२०१५ रोजीचा अर्ज, दि. ११/०१/२०१६ रोजीचा अर्ज, दि. २८/०७/२०१६ रोजीचा अर्ज, दि. ०८/१०/२०१६ रोजीचा अर्ज, दि. ११/०३/२०१७ रोजीचा अर्ज, दि. २०/०३/२०१७ रोजीचा अर्ज दि. १५ सप्टेंबर २०१५ रोजीचे इतर शिक्षकांचे अर्ज व इतर अनेक तक्रार अर्ज--,– श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील शिवगजे या सहा. शिक्षकाने १९९३-९४ पासुन शिक्षक पदावर काम करत असतांना पदाचा गैरवापर करुन खोट-नाटे करुन, माझ्या सारख्या प्रमाणिक व मागासवर्गीय शिक्षकाची फसवणूक तर केलीच परंतू शिवगजे चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन खोटे-नाटे दस्तऐवज तयार करणे, त्यावर सहया करणे, शासन निर्णयाचा भंग करणे, शासन नियमाचा व्यक्तिसापेक्ष वापर करणे, प्राचार्य पदाचा गैरवापर करणे, शासनाची व संस्थानची दिशाभुल करणे, गोपनीय अहवाल तयार करणे, खोटी माहिती पुरवुन दिशाभुल करणे, मा. शिक्षणाधिकारी अहमदनगर, मा. शिक्षण संचालक, पुणे शासनाची तसेचविधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांची फसवणूक गैरकारभार करुन भ्रष्टाचार केला आहे.शिक्षकांना त्रास देणे, मागासवर्गीय शिक्षक व विद्यार्थ्यांना त्रास देणे, संस्थान सेवत असतांना राजकारण करुन शिक्षकांवर मारेकरी घालणे, प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्याशी संगनमत व कटकारस्थान करुन शिक्षक- शिक्षकांमध्ये भांडणे लाऊन मारहाण करण्याच्या धमक्या देणे, गरिब व मागास विद्यार्थ्यांचे शोषन करणे, परिक्षा फी मध्ये भ्रष्टाचार केला आहे. वृत्तपत्रामध्ये प्राचार्य असल्याच्या खोटया बातम्या देऊन पदाचा गैरवापर केला आहे. विद्यार्थ्यांच्या दाखल्यांवर बोगस प्राचार्य म्हणून सहया केल्या आहेत. या व अशा कारणाने व कृत्यांनी सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे दोषी ठरले आहेत. त्यांच्या बाबत अनेक तक्रार अर्ज दाखल झाले आहे. परंतू विद्यमान श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व प्रशासकीय अधिकारी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करुन शिवगजे यांना सेवेत वाचविण्याचा प्रयत्न करत आहे. शिवगजे यांच्या बाबतीत अनेक तक्रार अर्जाच्यावर सहानुभुतीपुर्वक कारवाई होऊन शिवगजेसह दोषींवर कारवाई होऊन गुन्हे दाखल व्हावेत.	अर्जदार श्री.गायकवाड यांनी यापुर्वी वेळोवेळी तत्कालीन प्राचार्या श्रीमती चव्हाणके व सहा.शिक्षक श्री.शिवगजे यांचे विरुद्ध अनेक तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. तसेच माहिती अधिकारान्वये अनेक कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने त्यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रार अर्जानुसार वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. तसेच त्यांनी माहिती अधिकारात मागविलेल्या माहितीबाबत त्यांना आवश्यक ती सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच त्यांचे तक्रार अर्जानुसार श्री.शिवगजे यांची खाते चौकशी करण्यात येऊन, काही प्रकरणांमध्ये श्री.शिवगजे यांचेकडून अनियमितता आढळल्याने त्यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखून ठेवण्यात आलेली होती. मात्र अर्जदार श्री.गायकवाड हे तरीही वेळोवेळी सदरचे अर्ज करत असल्याचे निर्देशानास येत आहे.

तरी, सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

(सचिन ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी -तथा-
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- १०

दिनांकः १३/०८/२०२१

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना),

विषय – कोव्हीड-१९ मूळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत करणेत आलेल्या ५९८/ ५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जुलै- २०२१, ऑगस्ट- २०२१ व श्रींचे मंदिर भाक्तांनासाठी दर्शनास खुले होईपर्यंत तात्पुरत्या सेवा खंडीत कालावधीतील मानधन मानवतेच्या दृष्टीकोनातून अदा करणेबाबत.. . .. .

टिपणी

विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेलीआहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

(१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील

(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(अ-२) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-३) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच संदर्भांकित पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(अ-४) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत "** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा

पान २ वर .... कृ.मा.प. .. ..

फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस, मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "

(अ-५) दिनांक ०५/०६/२०१९ ते दिनांक ३०/१०/२०१९ अखेरचे कालावधीत महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात प्राप्त झालेले शासन निर्णयांचे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचे सभेत सदरहू निर्णयाचे निर्णय क्र. ५७५ अन्वये वाचन करुन नोंद घेणेत आलेली आहे.

(अ-६) सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेल्या विविध विवेचनात्मक टिपणीनुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था /२२०० /(०१ ते ६३५)/२०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.

(ब) **२८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेले असून त्यातील निर्णय क्र. ४२१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे-**

" दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समित सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली..

निर्णय क्र. ३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. १३.०७.२०२० चे विषय क्र. ६ निर्णय क्र. ३६ बाबत सदरचा निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डोंगरे यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते. तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.

सन १९ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगष्ट, २००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कमगारांना पात्र ठरविण्यात आले व त्यानुसार शासन निर्णयाची शासनाने दि. १७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कर्मचा-यांना कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक दि. ०२ जानेवारी, २०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तात्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

५९८ कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकूण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे व या शासन निर्णयान्वये तात्कालीन् मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष, श्री. आणेकर साहेब व सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3 X 1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला."

तसेच मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीने ५९८ कर्मचारी यांचेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे-

(iv) वरील नमूद ५९८ कर्मचा-यांना, त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे ऑगस्ट, २०२० ते ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वरील नमूद दि. १३.०७.२०२० च्या तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे वेतन द्यावे मात्र असे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ द्यावे कारण त्यांचे बाबतीत संस्थान प्रशासनाने दि. १३.०७.२०२० रोजीच्या निर्णयानंतर योग्य तो प्रस्ताव आणलेला नाही व त्यांचा दर्जा (status) स्पष्ट नाही.

(v) मानवतेच्या दृष्टीकानातून सदर ५९८ कर्मचा-यांना ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत काम केलेले असल्याने त्यांना, अटी व शर्तीची पूर्तता केली असल्यास, वरील प्रमाणे दि. ०१ ऑक्टोबर, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

(vi) सदर ५९८ कर्मचा-यांबाबत योग्य तो प्रस्ताव ठेवण्याची मुभा संस्थान प्रशासनास आहेच.

पान ३ वर .... कृ.मा.प. .. ..

(क) संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०६५/ २०२०, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० नुसार यथोचीत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती करणेत आलेली होती. त्यावर मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांनी जा.नं. आस्था/ ४७२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० नुसार ई-मेल पत्र पाठविलेले आहे. ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-४/२१०२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, ई-मेल पत्र पाठविणेत आलेले आहे. सदरचे ई-मेल पत्राबाबत अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय आलेला नाही.

तथापि, दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२००/ (०१ ते ६३५)/ २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेसाठी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१९/२०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित करणेत आलेला होता. तसेच जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १६१२/२०२० दिनांक ०१/१२/२०२० रोजी आदेशान्वये संस्थान आस्थापनेवार घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ०२ डिसेंबर, २०२० पासून पुढील आदेश हाईपावेता खंडीत करणेबाबत आदेश पारित करणेत आलेला होता. परंतु सदरचे प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे मौखिक निर्देश दिल्याने ते पारित करता आलेले नाहीत.

तथापि दरम्यान श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी

करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे दाखल केले असल्याचे समजते तथापि शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा तपशिल इकडे उपलब्ध नाही.

सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई, दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश पारित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र आता, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२२९०/२०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनीही मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र शासन व मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

ड) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केलेली आहे. याबाबत-

१) दिनांक २३/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जे मौखिक निर्देश दिले त्याबाबत संस्थानचे वकील ॲड. अनिल बजाज यांनी लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23/11/2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ Petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

पान ४ वर.. .. कृ.मा.प. .. ..

The Dy. CEO Mr. Thakre & Mr. Nalge were present on the said date and are aware of the same. This is for your records and necessary actions.

२) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीचे सुनावणीबाबत मा. न्यायालय यांनी खालीलप्रमाणे लेखी आदेश दिलेले आहेत-

1. It is submitted that Mr.Bajaj, learned Advocate for respondent no. 2 is not well.
2. Place the mattet on 6th January 2021.

३) **तसेच दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान** मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या मौखिक निर्देशाबबत ॲड. अनिल बजाज यांनी खालीलप्रमाणे लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23.11.2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

That, on dt. 08.12.2020 the matter was listed again on the board and as the undersigned was not well the matter was adjourned and the Hon'ble Court has again orally instructed to follow the same orders and not to terminate the employment of 598 workers.

रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० ची उपरोक्त सद्यस्थिती मा. तदर्थ समिती समक्ष सादर करणेस तसेच सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांना माहे नोव्हेंबर, २०२० व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक १९/१२/२०२० रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. त्यावर दिनांक १९/१२/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र. ५७४ खालीलप्रमाणे झालेला आहे. " प्रस्तुत प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असल्याने माहे, नोव्हेंबर व डिसेंबर, २०२० या महिन्यांचे प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे किमान विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे किमान विहीत वेतनदरानुसार ५० टक्के अदा करण्यास मान्यता देण्यात आली. "

मा. अध्यक्षांनी खालील मत मांडले-

सदर ५९८ व्यक्तीचा दर्जा (status) निश्चित नाही. सर्व बाबी न्यायप्रविष्ट आहेत, त्यामुळे त्यांना सानुग्रह अनुदान म्हणून माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२० चे हजर दिवसांबाबतचे अनुदान देण्यास हरकत नसावी.

समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी सदरचा विषय न्यायप्रविष्ट असलेने त्यांना सानुग्रह अनुदान देण्यास हरकत नाही असे मत मांडले.

तथापि माहे नोव्हेंबर, २०२० चे वेतन जा.क्र. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १८७१/ २०२० दिनांक ०५ जानेवारी, २०२१ नुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत वेतन मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे हजर दिवसाला पूर्ण व कामावर नसलेल्या दिवसाला अर्धवेतन तसेच दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे. तसेच माहे डिसेंबर, २०२० चे वेतन जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१९०६/२०२० दिनांक १३/०१/२०२१ रोजीचे आदेशानुसार दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे.

ई) ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा संस्थान आस्थापनेवरुन कंत्राटदाराच्या आस्थापनेवर वर्ग करण्या संदर्भात जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत आहेत. ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० ते डिसेंबर, २०२० पर्यंतचे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ (दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने दिनांक १६/११/२०२० पासून कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने वेतन अदा करणेत येत आहे.) अदा करणेत आलेले आहे.

सबब ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणेसाठीचे मान्यतेसाठी दिनांक २८/०१/२०२१ रोजी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यावर मा. अध्यक्ष साहेब यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद, येथे दाखल करणेत आलेले ॲफिडयुटची प्रत सादर करणेबाबत मौखीक निर्देश दिलेले होते.

पान ५ वर....कृ.मा.प. .. ..

दिनांक १६/०२/२०२१ रोजी कामगार विभागामार्फत सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदरचे प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी 'माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतच्या' दि. २८/०१/२०२१ रोजीच्या प्रस्तावावर मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेची प्रत व त्यामध्ये संस्थान प्रशासनाने व शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत सदरहू विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरता अवलोकनासाठी हजर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सोबत दिनांक १६/०२/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

त्यानुसार दिनांक २०/०२/२०२१ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी मागविलेले सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत. मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे प्र. आस्थापना विभाग प्रमुख ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबतच्या चक्रीय पध्दतीचे विषयाबाबतचे निर्णयार्थ अहमदनगर येथे दिनांक २३/०२/२०२१ रोजी जाऊन आलेले आहेत. तथापि ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबत दिनांक २४/०२/२०२१ पर्यंत निर्णय झालेला नसल्याने.

The payment of wages Act 1936 नियम ५ मध्ये वेतनाबाबत पुढील प्रमाणे तरतुद आहे-

(a) Any railway, factory or industrial or other establishment upon or in which less than one thousand persons are employed, shall be paid before expiry of the seventh day.

(b) Any other railway, factory or industrial or other establishment, shall be paid before the expiry of the tenth day.

तसेच दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे अर्जान्वये श्री अविनाश बाबासाहेब जगताप व इतर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी त्यांना वेतन न मिळाल्याने त्यांचे कुटूंबाला अर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे घरात कौटूंबिक कलह निर्माण होत असलेमुळे वेतन मिळणेबबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त सर्वबाबींचे अवलोकन करुन ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणे विधीवत व अनिवार्य आहे. सदरची बाब मा. तदर्थ समिती अध्यक्ष व सदस्य यांना उक्त विवेचणासह माहितीस्तव तथा अवलोकनार्थ जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३६९६ /२०२१ दि. २४/०२/२०२१ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आलेली आहे.

उ) माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत दिनांक २५/०२/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

(१) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

आज संस्थान प्रशासनाने काही बाबी नमूद करुन ५९८ कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्याबाबत ब-याच बाबींचा अहापोह केलेला आहे. मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत वेतन हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाचे मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सरसकट वेतन हा शब्द न वापरुन त्यांना दरमहा केलेल्या कामाचा मेहनताना देणे व ही बाब वेळोवेळी ठरविणे, हेच योग्य आहे, कारण सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट आहेत. म्हणूनच संस्थान प्रशासन सुध्दा दि. २८/०१/२०२१ च्या प्रस्तावामध्ये सदर ५९८ कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत मान्यता मागत आहे, जी देणेत येत आहे. करिता सदर ५९८ कर्मचा-यांना माहे जानेवारी, २०२१ व फेब्रुवारी, २०२१ मध्ये त्यांनी काम केलेले असल्यास त्यांनी केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनतून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(२) दिनांक २८/०१/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे विषय सादर करतांना श्री. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से), मा. मुख्य कार्यकारी अधिका-तथा-सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचा निर्णय खालीलप्रामणे –

पान ६ वर ....कृ.मा.प. .. ..

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(३) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक २७/०२/२०२१ रोजी श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेस अधिन राहून माह जाने, २०२१ व माहे फेब्रु, २०२१ या महिन्याचे महेनताना सानुग्रह अनुदान म्हणून मंजुरीस माझी हरकत नाही.

(४) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक ०८/०३/२०२१ रोजी श्रीमती गिता पी. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

संस्थान मार्फत सादर करण्यात आलेला प्रस्ताव वाचला. प्रस्ताव, मा. सदस्य अप्पर आयुक्त नाशिक यांचा अभिप्राय तसेच मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचा अभिप्राय वाचला. संस्थानमार्फत सादर करण्यात आलेल्या विषयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये कंत्राटी कर्मचारी व वेतन अशा शब्दप्रयोग केल्याचे दिसून येते. त्यामुळे ५९८ कर्मचा-याची स्थिती status अद्याप स्पष्ट न झाल्यामुळे त्यांच्याबाबत वेतन हा शब्द वापरणे अयोग्य आहे.

त्यामुळे त्यांना सानुग्रह मेहनताना हा शब्द वापरणे उचित होईल. याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असणा-या न्यायप्रविष्ठ बाबींच्या आदेशास अधिन राहून मान्यता देण्यास हरकत नाही.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे, जानेवारी, २०२१ व माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेस जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२६०/२०२१ दिनांक २५/०२/२०२१ नुसार आदेश पारित करणेत आलेले आहे.

ऊ) **मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशिन ६२२४/२०२० बाबत दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेशीत केलेले आहे.**

1. The objection is regarding court fees. The petitioner shall comply the objection of deficit court fees.
2. Stand over to 05.04.2021.

माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी माहे मार्च, २०२१ मध्ये विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांचे माहे मार्च, २०२१ वेतन कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेसाठी मा. तदर्थ समितीचे सभेसमोर दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला होता.

(१) दिनांक ०७/०४/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयात मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

पूर्वीचे निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत 'वेतन' हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर ५९८ कर्मचा-यांना, माहे मार्च २०२१ मध्ये काम केलेले असल्यास त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(२) दिनांक २४/०३//२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे विषय सादर करतांना श्री.. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से), **मा. मुख्य कार्यकारी अधिका-तथा-सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचा निर्णय** खालीलप्रामणे –

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(३) दिनांक ०७/०४/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

५९८ कर्मचा-यांना मार्च, २०२१ मध्ये केलेल्या कामाचा मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून मंजूर करणेस हरकत नाही.

(४) श्रीमती गिता पी. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्या तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

पान ७ वर ....कृ.मा.प. .. ..

५९८ कर्मचा-यांना माहे मार्च, २०२१ मध्ये केलेल्या कामाचा मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास हरकत नाही.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेत आलेले आहे.

ए) आता, महसूल व वन, अपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांकः डीएमयु/ २०२०/ प्र.क्र. ९२/ डीआयएसएम-१, दिनांक ०४ एप्रिल, २०२१ नुसार ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ विषाणूचा फैलाव होण्याचा धोका आहे. याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली आहे. आणि म्हणून विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी व परिरोध करण्याकरिता काही तातडीच्या उपायोजना हाती घेण्यासाठी साथरोग अधिनियम, १८९७ याचे कलम २ तसेच अपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याच्या अन्य सर्व समर्थकारी तरतुदी यांअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर वापर करुन, शासनास, संपूर्ण महाराष्ट्र राज्यमध्ये ३० एप्रिल, २०२१ पर्यंत पुढील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे इष्ट वाटत आहे.

त्यानुसार लागू केलेल्या उपाय योजना आदेशातील क्र. ०९ मध्ये धार्मिक स्थळांबाबत खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

९. धार्मिक पूजा स्थळे / उपासना स्थळे

- धार्मिक पूजा स्थळे / उपासना स्थळे बंद राहतील.
- धार्मिक स्थळी सेवा देणारे सर्व कर्मचारी, त्यांची कर्तव्ये नियमितपणे बजावतील, परंतु बाहेरील अभ्यागतांना तेथे जाण्यास परवानगी असणार नाही.
- या ठिकाणी काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. जेणेकरुन ही ठिकाणे पुन्हा शीघ्रतेने सुरु करता येतील.

तसेच, मा. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील क्र. डी.सी./ कार्या ९ब१/ ८६६/२०२१, दिनांक ०५ एप्रिल, २०२१ अन्वये असे आदेशित केले आहे की,

".. .. त्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रदुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासुन लागू करुन खंड २, ३, ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड-१९) वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्याकरणेसाठी सक्षम प्रधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याआर्थी, दिनांक ०४/०४/२०२१ रोजीचे आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याचे अनुषंगाने सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. तदनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यामध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश दि. ३०/०४/२०२१ रोजीचे रात्री २४.०० वाजेपर्यंत लागू करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी अहमदनगर जिल्ह्यात व लगतच्या जिल्ह्यामध्ये कोरोना बाधीत रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यास्तव या कार्यालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोरोनरा विषाणू प्रतिबंधात्मक आदेशांची प्रभावीपणे अंबलबजावणी होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, कारोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोनजेचे एक भाग म्हणुन नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमा होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, मी जिल्हादंडाधिकारी अहमदनगर मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, अहमदनगर जिल्हा महसुल स्थळ सीमेच्या हद्दीमध्ये या आदेशान्वये दि. ०५/०४/२०२१ रोजीचे रात्री. ०८.०० पासुन ते दि. ३०/०४/२०२१ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील बाबींस मनाई करीत आहे.

त्यानुसार कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत लागू करणेत आलेला असल्यामुळे सर्व प्रकारचे प्रतिबंधात्मक उपायोजना करणेसाठी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे साईसभागृह येथे मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय स्तरावर बैठक घेणेत येऊन संस्थान व्यवस्थापन संचलित श्री साईबाबा समाधी मंदिरांसह सर्व मंदिरे (व्दारकामाई, गुरुस्थान, चावडी, प्रधान लेंडीबाग, नंदादीप, श्री दत्त मंदिर, श्री गणेश, श्री शनी, श्री महादेव मंदिर व श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर आदि) दिनांक ०५/०४/२०२१ रोजी संध्याकाळी ८.०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो दर्शनाकरीता (मुख दर्शनासह) बंद करणेत आलेले आहे.

तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३७/२०२१ दिनांक ०६/०४/२०२१ नुसार सर्व भक्तनिवासस्थाने (साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, साई अश्रम भक्तनिवासस्थान , साई आश्रम धर्मशाळा) हे दिनांक ०६ एप्रिल, २०२१ पासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी बंद करणेत आलेले आहेत. सदरचे विभागांचे कार्यालयीन कामकाजा व्यातिरिक्त या विभागाकडे कार्यरत असलेले ५९८ मधील संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत.

पान ८ वर ....कृ.मा.प. .. ..

कॅन्टीन विभाग हे अंशता बंद करणेत आलेले आहेत. सदर विभागांतील कार्यालयीन कामकाजा व्यातिरिक्त या विभागाकडे कार्यरत असलेले ५९८ मधील कार्यरत असलेले संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. प्रसादालय विभागही अंशता बंद करण्यात अलेला आहे. प्रसादालय विभागातील ५९८ मधील कार्यरत असलेले कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रसादालय विभागामार्फत कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी दोन वेळेची भोजन व्यवस्था करणेत येत आहे. तर कॅन्टीन विभागामार्फत कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी रुग्णांना व सर्व कर्मचारी यांना चहा / दुध पुरविणेत येत आहे. तसेच कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी बिस्कीट व मिनरल वॉटर यांची विक्री चालू आहे.

संस्थानचे कोव्हीड-१९ सेंटर तसेच साईबाबा हॉस्पिटलकडे ही कोव्हीड-१९ वर उपचार सुरु करणेत आलेले आहेत. साईबाबा हॉस्पिटल, साईनाथ रुग्णालय विभाग, पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, फायर अॅण्ड सेफ्टी विभाग, मॅकेनिकल विभाग, वाहन विभाग, बगीचा विभाग व संरक्षण विभाग या विभागांच्या सेवा अत्यावश्यक असल्याने सदरचे विभागांकडे कार्यरत असलेले ५९८ मधील कायम कंत्राटी कर्मचारी यांचेसेवा चालू ठेवण्यात आलेल्या आहेत.

परंतू मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील शासन परिपत्रक बंद करण्यात येणा-या कर्मचा-यांचे वेतनाबाबत कुठल्याही प्रकाराच्या सुचना / निर्देश देण्यात आलेले नाहीत.

तथापि, संस्थान आस्थापनेवारील विभागांचे कामकाजासाठी काही विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा पुर्वीप्रमाणे चालू ठेवण्यात आलेल्या असून काहींच्या सेवा खंडीत करण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	विभाग	तपशिल	शेरा
०१	साईबाबा हॉसिप्टल व साईनाथ रुग्णालय	अ) कोव्हीड-१९ च्या संसर्गजन्य रोगावरील उपचार व दोन्ही रुग्णालयामधील इतर रुग्णांचे उपचाराकामी ब) या व्यतिरिक्त रुग्णालयाकडे इतर विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कोव्हीड सेंटर व रुग्णालयाचे कामांसाठी नेमण्यात आलेले आहेत. जशे, दोन्ही रुग्णालयातील स्वच्छतेसाठी आरोग्य विभाग / विद्युत विभाग / बांधकाम विभाग/ मॅकेनिकल विभाग / पाणीपुरवठा विभाग/ फायर अॅण्ड सेफ्टी विभाग / संरक्षण विभाग इत्यादी फिल्ड वर्क कामांकरीता अत्यावश्यक सेवांसाठी कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.	दोन्ही रुग्णालये विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तसेच इतर विभागांचे तांत्रिक स्वरुपाच्या सेवा पुर्वीप्रमाणेच चालू आहे.
०२	संरक्षण विभाग, आरोग्य विभाग, वाहन विभाग, पाणी पुरवठा विभाग, फायर अॅण्ड सेफ्टी विभाग, मॅकेनिकल विभाग, विद्युत विभाग, बगीचा विभाग, बांधकाम	सदरचे विभागांकरीता त्यांचे फिल्ड वर्क असल्या कारणाने तसेच कोव्हीड-१९ चे कामांकरीता सुविधा पुरवविणेसाठी सदरचे विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा अत्यावश्यक असल्याने पूर्वीप्रमाणेच चालू आहेत.	५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा पुर्वीप्रमाणेच चालू आहे.
०३	प्रसादालय विभाग / मंदिर विभाग	प्रसादाल विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना कामाचे अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने कामवर बोलविणेत येत आहे.	५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या कामांच्या अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने सेवा चालू आहेत.
०४	कॅन्टीन विभाग, लेखशाखा विभाग, साईप्रसाद निवासस्थान विभाग	या विभागांचे ५९८ अकुशल कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. फक्त कार्यालयीन कामाकरीतांचे आवश्यक तेवढेच ५९८ कुशल कंत्राटी कर्मचारी कामावर बोलविणेत येत आहे.	फक्त कार्यालयीन कामाचे आवश्यक्तेनुसारच ५९८ कुशल कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा चालू ठेवण्यात आलेल्या आहेत.
०५	आय टी आय, इंग्लिश मेडियम स्कूल, कन्या विद्यामंदिर, ज्यू. कॉलेज, वरिष्ठ महाविद्यालय	शैक्षणीक संकुलाकडील कंत्राटी / मानधनावरील शिक्षक / ५९८ कायम कंत्राटी शिक्षक यांच्या शिक्षण विभागाचे सुचनेनुसार ऑनलाईन क्लास (Work From Home), परिक्षा / निकाल विषयक कामे चालू आहेत.	शैक्षणीक संकुलाकडे ५९८ मधील कायम कंत्राटी शिक्षक, मानधनावरील शिक्षक व कंत्राटी शिक्षक यांच्या सेवा पूर्वीप्रमाणे चालू होत्या.

पान ९ वर ....कृ.मा.प. .. ..

अ.क्र.	विभाग	तपशिल	शेरा
०६	जनसंपर्क विभाग, प्रकाशने विभाग, साईप्रसाद निवासस्थान विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग, साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग, ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभाग, भांडार विभाग, साई अश्रम भक्तनिवासस्थान विभाग, कॅन्टीन विभाग, साई धर्मशाळा विभाग, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग	या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत.	या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत.

त्यानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता-

मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन व मा.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील शासन परिपत्रकात कर्मचा-यांचे वेतनाबाबत कुठल्याही प्रकारच्या सुचना / निर्देश देण्यात आलेले नसल्याने, खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे अत्यावश्यक सेवेच्या विभागांकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित असल्याने त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन त्यांचे हजर दिवासांनुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

२) ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचेपैकी काही विभागांचे अवशक्तेनुसार सेवा चक्रीय पध्दतीने चालू असून त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे हजर दिवासांचे मानधन सानुग्रह अनुदान प्रित्यर्थ अदा करणेस तसेच इतर दिवसांचे मानधानबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

३) ज्या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत करणेपूर्वीचे कालावधीचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन हजर दिवसांनुसार विहीत पध्दतीने अदा करणेस तसेच सेवा खंडीत केलेनंतरचे कालावधीचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधनाबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

४) शैक्षणीक संकुलाकडील ५९८ मधील कायम कंत्राटी शिक्षक यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन हजर दिवसानुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेच्या मान्यतेस्तव इतर दिवसांचे मानधानबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे दिनांक ०५ मे, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने उपरोक्तप्रमाणे सादर करणेत आलेल्या प्रस्तावर खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

(१) दिनांक १०/०५/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयात मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

विषय पाहिला. पूर्वीचे निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर ५९८ कर्मचा-यांना, माहे एप्रिल, २०२१ मध्ये काम केलेले असल्यास त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

जे कामगार काम करत नाहीत त्यांच्या बाबतीत कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी सर्वसमावेषक चर्चा गरजेची वाटते. करिता सदराची बाब नियमीत बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावी.

(२) दिनांक ११/०५/२०२१ रोजी श्रीमती गिता प्र. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्या तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

प्रस्ताव वाचला. पूर्वीचे निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुळातच ५९८ कर्मचा-यांची स्थिती स्पष्ट नाही. त्यामुळे आजपावेतो संबंधित कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. असे अनुदान मा. उच्च न्यायालयांनी मंजूर देखील केले आहे. सद्यपरिस्थिती पहाता ५९८ कर्मचा-यांना, माहे एप्रिल, २०२१ मध्ये त्यांनी काम केले असल्यास त्यांना त्यांचे कामाचा महेनताना म्हणून मानवता दृष्टीकोन लक्षात घेऊन सानुग्रह अनुदान मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अनुसरुन देण्यास हरकत नाही.

ज्यांनी काम केलेले नाही त्यांचेबाबतीत कोव्हीड-१९ चा विचार करता योग्य तो निर्णय घेण्यासाठी सर्वसमावेषक चर्चा होणे आवश्यक आहे. करिता सदरची बाब नियमित बैठकीत ठेवल्यास उचित होईल.

३) दिनांक १७/०५/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

५९८ कर्मचा-यांना माहे एप्रिल, २०२१ मध्ये काम केले असल्यास केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून देणेस माझी मान्यता आहे.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२१ चे हजर दिवसानुसारचे मानधन सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेबाबत जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/२६१ /२०२१ दि. १८/०५/२०२१ नुसार आदेशीत करणेत आलेले आहे.

तसेच ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे, २०२१ चे मानधन त्यांचे हजर दिवसांनुसार मा. तदर्थ समितीचे चक्रीय पध्दतीचे मान्यतेने विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेत आलेले आहे. व माहे जून, २०२१ चे मानधन सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत मा. तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे व त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली आहे.

कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करणेत आलेल्या आहेत. अशा विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत केलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीतील वेतनाबाबत मा. तदर्थ समितीचे दिनांक १०/०५/२०२१ व दिनांक ११/०५/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार जे कामगार काम करत नाहीत त्यांच्या बाबतीत कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत निर्णय घेणेसाठी सर्वसमावेशक चर्चा गरजेची वाटते, करिता सदरचीबाब नियमीत बैठकीत चर्चेसाठी ठेवणेबाबत निर्देशित करणेत आलेले आहेत.

त्यानुसार माहे एप्रिल, २०२१, मे, २०२१ व जून, २०२१ मध्ये ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करणेत आलेल्या आहेत आशा विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या सेवा खंडीत करणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीत संबंधीत कर्मचारी यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून सनुग्रह अुनदान म्हणून मानधन देणेबाबत दिनांक १९ जून, २०२१ चे मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

मा. तदर्थ समितीचे दिनांक १९ जून, २०२१ रोजीचे सभेत निर्णय क्र. १५ खालीलप्रमाणे झालेला आहे.
"कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंड करणेत आलेल्या आहेत अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी तसेच त्याव्यतिरिक्त कंत्राटदारामार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी (आऊटसोर्स) माहे एप्रिल-२०२१, मे-२०२१ व जून-२०२१ या कालावधीत हजर दिवसांसाठी पूर्ण दराने व कोव्हीड-१९ मुळे सेवा खंडीत दिवसांसाठी ५० टक्के दराने वेतन अदा करणेत मान्यता देण्यात आली. "

त्यानुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ८११/२०२१ दि. २६/०७/२०२१ नुसार माहे एप्रिल-२०२१ ते माहे जून-२०२१ या कालावधीतील ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंड करणेत आलेल्या आहेत अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत दिवसांसाठी ५० टक्के दराने वेतन अदा करणेबाबत आदेशीत करणेत आलेले आहे.

आता, माहे जुलै- २०२१ व ऑगस्ट- २०२१ मध्ये ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करणेत आलेल्या आहेत. आशा विभागांचे ५९८ / ५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या सेवा खंडीत करणेत आलेल्या ५९८ / ५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीत संबंधीत कर्मचारी यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून ५० टक्के मानधन देणेबाबत मा. तदर्थ समितीचे मान्यात घेण्यात येऊन मा. तदर्थ समितीचे मान्यतेने पुढील कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय:

५९८ / ५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जुलै-२०२१ ऑगस्ट-२०२१ या कालावधीत कर्तव्यावर उपस्थित असलेल्या कर्मचा-यांचे मानधन अदा करणेत आलेले / येत आहे. तसेच ज्या कर्मचा-यांना कर्तव्यावर बोलविणेत आलेले होते परंतू ते कर्तव्यावर आले नसतील तर त्या कालावधीची गैरहजरी नोंदविणेत येऊन त्या कालावधीचे वेतन अदा करणेत येणार नाही.

ज्या विभागांच्या सेवा कोव्हीड-१९ मुळे तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा विभागांचे ५९८/ ५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जुलै- २०२१ व माहे ऑगस्ट-२०२१ व श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले होईपर्यंतचे तात्पुरत्या सेवा खंडीत कालावधीचे मानधन मा. तदर्थ समितीचे दिनांक १९ जून, २०२१ रोजीचे निर्णय क्र. १५ नुसार ५० टक्के दराने देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

14/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

13/8 13/8/21

D:/ 598 Contract employee order cancellation note/VHBAJAJ/442

विषय क्र.- ११

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

(सामान्य प्रशासन विभाग)

54

विषयः- संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्र येथील श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी कर्मचारी यांचा मुदतवाढ व वेतनवाढ मिळणेबाबतचा दि.०१/०७/२०२१ रोजीचा अर्ज.

टिपणी,

अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत हैद्राबाद येथे साईभक्तांना सोई - सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानचे वतीने सन २०१० पासून सिकंदराबाद (हैद्राबाद) येथे माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर माहिती केंद्र कार्यालयात दि.१७/१०/२०१० रोजी पासून श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, यांची ऑफीस असिस्टंट म्हणून कंत्राटी पध्दतीने एक वर्षाच्या मुदतीकरीता एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानंतर आज अखेर श्री. चंद्रकांत सुराणा यांना वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात आलेली आहे.

श्री. सुराणा हे संस्थानचे हैद्राबाद येथील माहिती केंद्रात साईभक्तांसाठी ऑनलाईन आरती / दर्शन बुकींग, ऑनलाईन रुम बुकींग, पुस्तक विक्री, देणगी स्विकारणे इ. सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम करत आहेत.

ब) यापुर्वी, मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६३ नुसार संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्रात कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक यांना ४ दिवसांचा ब्रेक देऊन / सेवाखंड देऊन दि.२९/०८/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक यांना ४ दिवसांचा ब्रेक देऊन / सेवाखंड देऊन दि.२९/०८/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) एकत्रित मानधनावर इकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/१९६९/२०२१ दि.१८ जानेवारी, २०२१ रोजीचे पत्राने लेबर ठेकेदार यांना पत्राने कळविणेत आले होते.

प्रकाशने विभागाकडून प्राप्त माहितीनुसार सदर कर्मचा-यामार्फत मागील वर्षी दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ या कालावधीत साईभक्तांना खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. (सोबतःपरिशिष्ट अ जोडलेले आहे)

अ.नं.	तपशिल	एकूण रक्कम
०१	ऑनलाईन दर्शन व आरती बुकींग	१,३३,८००.००
०२	अन्नदान , शैक्षणिक व वैद्यकीय फंड, तसेच देणगी इ.	१,४५,६५५.००
०३	ऑनलाईन रुम बुकींग	५८,३०४.००
०४	पुस्तक विक्री	३,३९,९५६.००
	एकूण -	६,७७,७१५.००

क) आता, श्री. सुराणा, कंत्राटी कार्यालय सहाय्यक यांना वरील प्रमाणे देणेत आलेली मुदतवाढीचा कालावधी दि.२८/०७/२०२१ रोजी संपत असल्याचे कारणास्तव श्री. सुराणा यांनी दि.०१/०७/२०२१ रोजीचे अर्जाने, कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचे कालावधीस मुदतवाढ व मानधन वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री. सुराणा यांचे सदर अर्जावर प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी " श्री. चंद्रकात माणकचंद्र सुराणा, माहिती केंद्र हैद्राबाद यांचे काम समाधानकारक असून त्यांच्याबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यांची मुदत दि.२८/०७/२०२१ अखेर संपत असून, श्री सुराणा यांना उपरोक्त मुदतवाढीचा विचार करता, संस्थान नियमानुसार मुदतवाढ देण्यास हरकत नाही." असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री. सुराणा यांचा मुदतवाढीबाबतचा विनंती अर्ज व त्यावरील प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री. सुराणा यांना संस्थानचे हैद्राबाद येथील माहिती केंद्रात कार्यालय सहाय्यक म्हणून कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीची मुदत दि.२८/०७/२०२१ अखेर संपुष्टात येत असून, पुढे ११ महिन्यांकरीता संस्थान नियमाप्रमाणे मुदत वाढ व योग्य मानधन वाढ देणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी, संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहीत केंद्रात कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी कर्मचारी (कार्यालय सहाय्यक) यांचे दि.०१/०७/२०२१ रोजीचे अर्ज व त्यावरील प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्रायास अनुसरुन, श्री. सुराणा यांना दि.२९/०७/२०२१ ते दि.०१/०८/२०२१ अखेर ०४ दिवसांचा ब्रेक / सेवाखंड देऊन दि.०२/८/२०२१ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ व योग्य मानधनवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- 92

दिनांक: २२/०७/२०२१

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर

55

सामान्य प्रशासन विभाग,

विषय – करोना विषाणू (कोव्हीड १९) चे कालावधीतील माहे मार्च २०२० व माहे एप्रिल, २०२० चे ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत .....

टिपणी

विषयाची पूर्वपीठीका -

(अ) कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत सर्व स्तरांवरुन कार्यवाही सुरु करणेत आलेली होती. सदर साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी संस्थान व्यवस्थापन व प्रशासनाच्या स्तरावर मा. तदर्थ समितीच्या दिनांक १७ मार्च, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीचे मान्यतेने व निर्देशानुसार, संस्थानचे प्रशासकीय स्तरावर विविध आदेशान्वये / परिपत्रकान्वये उचित उपाययोजना करणेत आलेल्या होत्या.

या उपाययोजनेंतर्गत दिनांक १७ मार्च, २०२० पासून व त्यानंतर दिनांक २३ मार्च, २०२० / दिनांक २४ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कायम / संस्थान कायम कंत्राटी / कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी / बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी / मानधनावर कार्यरत असणारे कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार व कामाचे निकडीनुसार पूर्णतः तर काही विभागात अंशतः बंद करणेत आलेले होते.

(ब) माहे फेब्रुवारी,२०२० अखेर व सध्या संस्थान आस्थापनेवर खालीलप्रमाणे विविध प्रकारचे कर्मचारी विविध विभागात कार्यरत होते-

०१. कायम कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी

०२. संस्थान कंत्राटी कर्मचारी

०३. कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी

०४. बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी (उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदारामार्फत कार्यरत विशेषतः निवासस्थाने, प्रसादालय, रुग्णालये आदि विभाग)

०५. निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कार्यरत कर्मचारी (विशेषतः रुग्णालये विभाग)

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी दिनांक २२ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात / राज्यात **LOCKDOWN**लागू केलेला आहे. त्यामुळे संस्थान स्तरावर ही वर नमुद केलेप्रमाणे दिनांक २३ मार्च, २०२० पासून टप्प्या-टप्प्याने अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्वच विभागातील कर्मचा-यांची कार्यालयातील / कार्यस्थळावरील उपस्थितीवर निर्बंध आणणेत आलेले होते. तथापि उपरोक्त सर्व कर्मचा-यांचे माहे मार्च, २०२० चे वेतन माहे एप्रिल, २०२० मध्ये आदा करावे लागणार होते. त्याबाबत-

(क-१) वित्त विभाग, भारत सरकार यांचेकडील दिनांक २३ मार्च, २०२० रोजीचे कार्यालयीन परिपत्रकात खालीलप्रमाणे नमूद केलेल होते-

> *".. .. 2. Due to these measures, there is a likelihood of a number of contractual, **casual and outsourced staff such as house-keeping staff etc. being required to stay at home, which under normal circumstances would result in deduction in their pay / wages.** In order to avoid any undue hardships under the prevailing extraordinary circumstances, it has been decided that where every any such contractual, causal and outsourced staff of Ministries / Departments and other organizations of Government of India, is required to **stay at home in view of lockdown order regarding COVID-19 prevention, as announced by various States / UT Governments, they shall be treated as "on duty" during such period of absence and necessary pay / wages would be paid accordingly."***

(क-२) मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. कामगार उपआयुक्त, मुंबई शहर यांना अग्रेषित केलेल्या दिनांक २० मार्च, २०२० रोजीचे पत्रात खालीलप्रमाणे नमूद केलेले होते-

> *" .. .. In the backdrop of such challenging situation, all the Employers of Public / Private Establishments may be advised to extend their coordination by not terminating their employees, particularly casual or contractual workers from job or reduce their wages. **If any worker takes leave, he should be deemed to be on duty without any consequential deduction in wages for their period. Further, if the place of employment is to be made non-operational due to COVID-19, the employees of such unit will be deemed to be on duty.***

पान २ वर. कृ.मा.पा.

The termination of employee from the job or reduction in wages in this scenario would further deepen the crises and will not only weaken the financial condition of the employee but also hamper their moral to combat their fight with this epidemic. In view of this you are therefore directed to issue necessary Advisory to the Employers / Owners of all the establishments in your jurisdiction."

(क-३) मा. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचे शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद केलेले होते-

" .. .. सर्व खाजगी आस्थापना, कारखाने, कंपन्या, दुकाने (अत्यावश्यक सेवा आस्थापना वगळून) इत्यादी आस्थापनांचे सर्व कामगार (कंत्राटी, बाह्यस्त्रोतांव्दारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मचारी व कामगार, रोजंदारीवरील कामगार) ज्यांना कोरोना वायरस Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे घरी / स्थानबध्द राहावे लागत आहे, अशा सर्व कामगार / कर्मचारी हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे व त्यांना संपूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत.

हे आदेश महाराष्ट्रातील सर्व निमशासकीय, औद्योगिक, वाणिज्यिक, व्यापारी व दुकाने आस्थापनांना लागू राहतील. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी याबाबतची दक्षता सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावी. "

(क-४) मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचे शासन आदेश / परिपत्रकान्वये माहे मार्च, २०२० चे माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान करणेत येणार वेतन दोन टप्प्यात आदा करणेत यावे, म्हणून कळविणेत आलेले होते.

उपरोक्त आदेश सर्व सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांना देखील लागू राहतील, असे नमूद करणेत आलेले आहे. **परंतु याबाबत विवेचन असे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही स्वयं अर्थसहाय्यित विश्वस्तव्यवस्था असून, केंद्र अथवा राज्य शासनाकडून सदर विश्वस्तव्यवस्थेस कर्मचा-यांचे वेतनासाठी / कर्मचा-यांना द्यावयाचे आर्थिक लाभासाठी कुठल्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य / अनुदान प्राप्त होत नाही.** त्यामुळे संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनाबाबत कुठलीही आर्थिक अडचण नसल्याने ते आदा करणेत आलेले होते.

(ड) उपरोक्त परिच्छेद अ, ब व क मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, संस्थान आस्थापनेवरील सर्व प्रकारचे अधिकारी / कर्मचारी यांना माहे मार्च, २०२० चे मासिक वेतन माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान / आदा करणेसाठी, विषयांकित कामकाजासाठी दिनांक १७ मार्च, २०२० रोजीचे आदेशानुसार, स्थापित करणेत आलेल्या प्रशासकीय उपसमितीने दिनांक ०१ एप्रिल, २०२० रोजीचे टिपणीन्वये प्रस्तावित केलेनुसार व मान्यता दिलेनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करणेत आले होते.

०१. दिनांक २२ मार्च, २०२० रोजी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी संपूर्ण देशात संचारबंदी (जनता कर्फ्यू) लागू केलेली होती. त्यामुळे अत्यावश्यक विभागांच्या सेवा वगळतां इतर सर्व कर्मचा-यांना सुट्टी देणेत आलेली होती. तसेच दिनांक २२ मार्च, २०२०रोजी मध्यरात्रीनंतर मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संचारबंदी लागू केली. दिनांक २२ मार्च, २०२० पासून राज्यात / शहरात / गावांमध्ये संचारबंदी लागू केल्यामुळे संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कर्मचा-यांना दिनांक २४ मार्च, २०२० रोजीचे आदेशाने कामावर येण्यास प्रतिबंध करणेत आलेला होता तसेच काही विभागात टप्प्या-टप्प्याने / चक्रीय पध्दतीने कमीत कमी कर्मचारी कामावर बोलविणेत यावेत म्हणून आदेशित करणेत आलेले होते. त्यामुळे दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी कामावर / कर्तव्यावर हजर आहेत, असे गृहित धरुन त्यांना वेतन आदा करावे लागणार आहे.

०२. दिनांक २१ मार्च, २०२० रोजी व त्यापूर्वी कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी विनावेतन रजेवर / कामावर गैरहजर / विनावेतन खाडयावर असतील, त्यांचे वेतनविहित पध्दतीने नियमानुसार, त्याप्रमाणात कपात करावे लागणार आहे.

०३. तथापि, ज्या कायम कर्मचा-यांनी दिनांक २१ मार्च, २०२० रोजी व त्यापूर्वी अर्जित / किरकोळ / वैद्यकीय रजा मिळणेबाबत विहीत पध्दतीने संबंधित विभागप्रमुखांकडे अर्ज सादर केले असतील, तर त्यांचे अर्ज मंजूर करणेत येऊन, त्याच्या नोंदी रजा नोंदवहीत घेणेत येतील.

पान ३ वर. कृ.मा.पा.

०४. दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च,२०२० चे अखेर जे कर्मचारी आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने / टप्प्या-टप्प्याने कर्तव्यावर हजर असतील, त्यांच्या स्वाक्ष-या हजेरी नोंदवहीत घेणेत याव्यात. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र. २९१६ / २०२०, दिनांक २४ मार्च, २०२० नुसार, आवश्यकतेनुसार कमीत कमी कर्मचारी कार्यालयात किंवा कार्यस्थळावर हजर ठेवणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे, त्यामुळे या संस्थान आदेशानुसार जे कर्मचारी कर्तव्यावर हजर नसतील, त्यांचे नांवापुढे **"Covid-19-P"** या इंग्रजी अक्षरात मानवी हजेरी नोंदविणेत यावीआणि त्यानुसार माहे मार्च, २०२० चे हजेरीपुस्तकावर याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय संबंधित विभागप्रमुखांचे स्वाक्षरीनिशी नोंदविणेबाबत आदेशित करता येईल -

" .. ..अभिप्रायदेणेत येतो की, माहे मार्च, २०२० मध्ये दिनांक २२ मार्च, २०२० नंतर वरील कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांचे पुढे "Covid-19-P" असे नोंदविणेत आलेले आहेत, ते त्या-त्या दिवशी कामावर / कर्तव्यावर हजर होते, असे गृहित धरुन, माहे मार्च, २०२० या महिन्याचा खाडेतक्ता कामगार विभागास / सामान्य प्रशासन विभाग (पगारबील कक्ष) यांना कळविणेत आलेला आहे तसेच त्यानुसार माहे मार्च, २०२० चे वेतन आदा करणेत आलेले आहे."

०५. सामान्य प्रशासन विभाग (रजा) / कामगार विभाग यांनी उपरोक्त अभिप्रायानुसार विहित पध्दतीने सर्व संबंधित विभागाचे खाडेतक्ते तपासून त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेबाबत आदेशित करता येईल -

" .. ..अभिप्रायदेणेत येतो की,संबंधित विभागप्रमुख यांनी हजेरीपुस्तकावर नोंदविलेल्या अभिप्रायानुसारमाहे मार्च, २०२० या महिन्याचा खाडेतक्ता कामगार विभागास / सामान्य प्रशासन विभाग (पगारबील कक्ष) यांना कळविणेत आलेला आहे."

०६. संस्थान आस्थापनेवरील सर्व विभागांनी तसेच कामगार विभाग आणि कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी त्यांचेमार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांची हजेरी तपासतांना, दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक २१ मार्च, २०२० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी पूर्णपणे गैरहजर असतील, त्यांची दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर या कालावधीतही सलग गैरहजेरी दर्शवून त्यांना माहे मार्च, २०२० चे वेतन आदा / प्रदान करु नये. माहे मार्च, २०२० मध्ये पूर्ण गैरहजर असणा-या अशा कंत्राटी कर्मचा-यांची नांवाची स्वतंत्ररित्या नोंदी संबंधित विभागाने ठेवणेबाबत तसेच बिलांसोबत जोडणेकामी आदेशित करता येईल.

०७. सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांची बिले अदायगीसाठी सादर करतांना वर अ.नं. ०४ व अ. नं. ०५ मध्ये नमूद केलेला अभिप्राय बिलांवर सुस्पष्ट नोंदवून, सदरची बिले विहित पध्दतीने मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत आदेशित करता येईल.

०८. ज्या विभागांकडे उक्ते पध्दतीने दिलेल्या कामांसाठी बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी / निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कर्मचारी कार्यरत आहेत, त्या विभागांनी उपरोक्त अ.नं. ०४ व ०५ मध्ये नमुद केलेल्या अभिप्रायांशी सुसंगत व सुस्पष्ट अभिप्राय देऊन, अशी वेतनबिले अदायगीसाठी स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणीसह मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेस्तव सादर करणेबाबत आदेशित करता येईल.

०९. माहे एप्रिल,२०२० चे वेतनाबाबत (माहे मे, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत), उपरोक्त परिस्थितीत काही बदल झाल्यास, त्याप्रमाणे परिस्थितीनुरुप अलाहिदा आदेश पारित करणेत येईल.

(इ) मा. तदर्थ समितीचे दिनांक १७ मार्च, २०२० रोजीचे निर्णयानुसार तसेच उपरोक्त परिच्छेदांतील सविस्तर विवेचनानुसार, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या साथरोगाचा प्रादुर्भाव रोखणेकामी करणेत आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतर्गत, संस्थान आस्थापनेवर परिच्छेद ब मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यरत असणारे सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२० व एप्रिल, २०२० चे वेतन अदायगीसाठी परिच्छेद "ड" मध्ये अ.नं. ०१ ते ०९ मध्ये नमुद केलेल्या प्रस्तावित कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

पान ४ वर. कृ.मा.पा.

त्यावर दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजी चक्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले सविस्तर विवेचनानुसार, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या साथरोगाचाप्रादुर्भाव रोखणेकामी करणेत आलेल्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेंतर्गत, वरील प्रस्तावातील 'परिच्छेद ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२० व एप्रिल, २०२० चे वेतन अदायगीसाठी प्रस्तावातील ' परिच्छेद ड ' मध्ये अ.नं. ०१ ते ०९ मध्ये नमुद केलेली प्रस्तावित कार्यवाही करणेस आणि त्याची अंमलबजावणी करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली.

त्यास अनुसार माहे मार्च, २०२० चे वेतन आदा करणेसाठी जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४१/ २०२० दिनांक ११ एप्रिल, २०२० अन्वये **दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी कामावर / कर्तव्यावर हजर आहेत, असे गृहीत धरुन** प्रस्तावातील इतर अटी-शर्तीनुसार वेतन आदा करणेबाबत खालीलप्रमाणे आदेशीत करणेत आलेले होतो.

आदेश-

वाचा क्रमांक ०८ अन्वये प्रशासकीय उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार व निर्देशानुसार, संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना माहे मार्च, २०२० चे मासिक वेतन माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान / आदा करणेसाठी खालीलप्रमाणे खालील कार्यपध्दती अवलंबविणेत यावी.

०१. दिनांक २२ मार्च, २०२० रोजी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी संपूर्ण देशात संचारबंदी (जनता कर्फ्यू) लागू केलेली होती. त्यामुळे अत्यावश्यक विभागांच्या सेवा वगळतां इतर सर्व कर्मचा-यांना सुट्टी देणेत आलेली होती. तसेच दिनांक २२ मार्च, २०२०रोजी मध्यरात्रीनंतर मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संचारबंदी लागू केली. दिनांक २२ मार्च, २०२० पासून राज्यात / शहरात / गावांमध्ये संचारबंदी लागू केल्यामुळे संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कर्मचा-यांना दिनांक २४ मार्च, २०२० रोजीचे आदेशाने कामावर येण्यास प्रतिबंध करणेत आलेला होता तसेच काही विभागात टप्प्या-टप्प्याने / चक्रीय पध्दतीने कमीत कमी कर्मचारी कामावर बोलविणेत यावेत म्हणून आदेशित करणेत आलेले होते. त्यामुळे दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी कामावर / कर्तव्यावर हजर आहेत, असे गृहित धरुन त्यांना वेतन आदा करणेत यावे.

०२. दिनांक २१ मार्च, २०२० रोजी व त्यापूर्वी कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी विनावेतन रजेवर / कामावर गैरहजर / विनावेतन खाडयावर असतील, त्यांचे वेतनविहित पध्दतीने नियमानुसार, त्याप्रमाणात कपात करणेत यावे.

०३. ज्या कायम कर्मचा-यांनी दिनांक २१ मार्च, २०२० रोजी व त्यापूर्वी अर्जित / किरकोळ / वैद्यकीय रजा मिळणेबाबत विहीत पध्दतीने संबंधित विभागप्रमुखांकडे अर्ज सादर केले असतील, तर त्यांचे अर्ज मंजूर करणेत येऊन, त्याच्या नोंदी रजा नोंदवहीत घेणेत याव्यात.

०४. दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० चे अखेर जे कर्मचारी आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने / टप्प्या-टप्प्याने कर्तव्यावर हजर असतील, त्यांच्या स्वाक्षऱ्या हजेरी नोंदवहीत घेणेत याव्यात तसेच जे कर्मचारी कर्तव्यावर संस्थान आदेशानुसार कर्तव्यावर हजर नसतील, त्यांचे नांवापुढे**"Covid-19-P"** या इंग्रजी अक्षरात हजेरी नोंदविणेत यावीआणि त्यानुसार माहे मार्च, २०२० चे हजेरीपुस्तकावर याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय संबंधित विभागप्रमुखांचे स्वाक्षरीनिशी नोंदवावा -

> *" .. ..अभिप्रायदेणेत येतो की, माहे मार्च, २०२० मध्ये दिनांक २२ मार्च, २०२० नंतर वरील कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांचे पुढे "Covid-19-P" असे नोंदविणेत आलेले आहेत, ते त्या-त्या दिवशी कामावर / कर्तव्यावर हजर होते, असे गृहित धरुन, माहे मार्च, २०२० या महिन्याचा खाडेतक्ता कामगार विभागास / सामान्य प्रशासन विभाग (पगारबील कक्ष) यांना कळविणेत आलेला आहे तसेच त्यानुसार माहे मार्च, २०२० चे वेतन आदा करणेत आलेले आहे."*

०५. सामान्य प्रशासन विभाग (रजा) / कामगार विभाग यांनी उपरोक्त अभिप्रायानुसार विहित पध्दतीने सर्व संबंधित विभागाचे खाडेतक्ते तपासून त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदवावा -

> *" .. ..अभिप्रायदेणेत येतो की, संबंधित विभागप्रमुख यांनी हजेरीपुस्तकावर नोंदविलेल्या अभिप्रायानुसार माहे मार्च, २०२० या महिन्याचा खाडेतक्ता कामगार विभागास / सामान्य प्रशासन विभाग (पगारबील कक्ष) यांना कळविणेत आलेला आहे."*

०६. सर्व विभागांनी तसेच कामगार विभाग आणि कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी त्यांचेमार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांची हजेरी तपासतांना, दिनांक ०१ मार्च,२०२० ते दिनांक २१ मार्च, २०२० या

पान ५ वर. कृ.मा.पा.

कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी पूर्णपणे गैरहजर असतील, त्यांची दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर या कालावधीतही सलग गैरहजेरी दर्शवून त्यांना माहे मार्च, २०२० चे वेतन आदा / प्रदान करु नये. माहे मार्च, २०२० मध्ये पूर्ण गैरहजर असणारे कंत्राटी कर्मचा-यांची नांवे स्वतंत्ररित्या बिलासोबत जोडावीत.

०७. सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांची बिले सादर करतांना वर अ.नं. ०४ व अ. नं. ०५ मध्ये नमूद केलेला अभिप्राय बिलांवर सुस्पष्ट नोंदवून, सदरची बिले विहित पध्दतीने मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेसाठी सादर करावीत.

०८. ज्या विभागांकडे बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी / निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कर्मचारी कार्यरत आहेत, त्या विभागांनी अशा विभागांनी उपरोक्त अ.नं. ०४ व ०५ मध्ये नमुद केलेल्या अभिप्रायांशी सुसंगत व सुस्पष्ट अभिप्राय देऊन, अशी वेतनबिले स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणीसह मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेस्तव सादर करावीत.

०९. माहे एप्रिल,२०२० चे वेतनाबाबत (माहे मे, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत), उपरोक्त परिस्थितीत काही बदल झाल्यास, त्याप्रमाणे परिस्थितीनुरुप अलाहिदा आदेश पारित करणेत येईल. सदरची आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करणेत यावी.

तसेच माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत जा.क्र.एसएसएस/ साप्रशा / आस्था /१००/ २०२०, दिनांक ०५/०५/२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेशीत करणेत आलेले होते-

आदेश.

माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत वाचा क्रमांक ११ अन्वये दिनांक २३ एप्रिल, २०२० रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा. वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना माहे एप्रिल, २०२० चे मासिक वेतन माहे मे,२०२० मध्ये प्रदान / आदा करणेसाठी खालीलप्रमाणे खालील कार्यपध्दती अवलंबविणेत यावी.

०१. **सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील आदेश क्रमांक एसएसएस / साप्रशा / आस्था / ४१ / २०२०, दिनांक ११ एप्रिल, २०२० अन्वये (वाचा क्रमांक ११ अन्वये) पारित करणेत आलेल्या आदेशातील अ. नं. ०१ ते ०५ मध्ये नमूद करणेत आलेल्या / आदेशित करणेत आलेल्या अटी-शर्तीमध्ये कुठलाही बदल करणेत आलेला नसून, या अटी-शर्तीनुसार संस्थान आस्थापनेवरील कायम / संस्थान कंत्राटी कर्मचारी यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.**

०२. सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल / **अकुशल कंत्राटी कर्मचारी** यांनामाहे एप्रिल,२०२० चे आदा करावयाचे वेतनाबाबत तूर्त **किमान वेतन कायद्यानुसार आणि किमान वेतन दरानुसार देय्य होणारे वेतन** आदा करणेबाबत कार्यवाही करावी. कंत्राटी कर्मचा-यांना या कालावधीतील आदा करावयाचे ४० टक्के वाढीव वेतनाबाबतमा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार / मान्यतेने अलाहिदा स्वतंत्र आदेश पारित करणेत येईल.

०३. कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे निश्चित मानधनावरील / वेतनावरील अधिकारी / कर्मचारी यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन विहित पध्दतीने आदा करावे.

०४. सर्व विभागांनी तसेच कामगार विभाग आणि कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी त्यांचेमार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांची हजेरी तपासतांना, दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक २१ मार्च, २०२० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी पूर्णपणे गैरहजर असतील, त्यांचीदिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३० एप्रिल, २०२० अखेर या कालावधीतही सलग गैरहजेरी दर्शवून त्यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा / प्रदान करु नये.

०५. सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांची बिले सादर करतांना दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजीचे आदेशात नमूद केलेप्रमाणे, बिलांवर अभिप्राय सुस्पष्ट नोंदवून, सदरची बिले विहित पध्दतीने मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेसाठी सादर करावीत.

०६. ज्या विभागांकडे बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी / निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कर्मचारी कार्यरत आहेत, त्या विभागांनी / अशा विभागांनी त्यांची माहे एप्रिल, २०२० ची वेतनबिले स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणीसह मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेस्तव सादर करावीत.

पान ६ वर. कृ.मा.पा.

०७. माहे मे,२०२० चे वेतनाबाबत (माहे जून, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत), उपरोक्त परिस्थितीत (काही बदल झाल्यास, त्याप्रमाणे परिस्थितीनुरुप अलाहिदा आदेश पारित करणेत येईल.

सदरची आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करणेत यावी.

सदरचे आदेशीतल मुद्दा क्र. ०१ नुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना पूर्ण वेतन आदा करणेत आलेले आहे.

तथापि दिनांक ११/०५/२०२० रोजी झालेल्या तदर्थ समितीचे सभेत चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेल्या विषय वाचुन कायम करतांना (कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत माहे मार्च, २०२० व एप्रिल, २०२० वेतन आदा करणेबाबत) निर्णय क्रमांक २३५ सोबत सादर केलेला आहे. सदरचे निर्णयातील मुद्दा क्रमांक ३९ खालीलप्रमाणे आहे-

39) Now coming to payment of salary/ wages to said 598 employees, this Committee is put in difficult situation. On one hand it is clear from the record that in absence of any decision by erstwhile Committee to appoint said 598 employees on contract basis directly on the Trust, nor there is any such decision being taken by this Committee, the order of appointment issued to said 598 employees by the then Chief Executive Officer of the Trust is a questhin to be decided. Secondly, the fate of the agreement, which the Trusth had with the Cointractor is to be decided. This Committee can not predict the stand that is likely to be taken by the Labour Contractors with regard to said employees. In such circumstance, on humanitarian grounds this Committee is of the view that payment of about 60% of the wages (as per Minimum Wages Act and G.R. issued from time to time however, without any incentive as decided by the erstwhile Committee on 25.2.2017) be paid to such 598 employees for the month of April paid in May. In case, any such employee was asked to work during the period of April 2020, he be paid full salary / wages of the respective days of work and in addition to it he be paid such 60% of monthly wages for remaining days to be adjusted if future. Trust to obtain written undertaking from such employees to the above effect. (This be taken as decision-D For Clarity)

मा. तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयापूर्वी माहे एप्रिल, २०२० चे वेतन संबंधित ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांना मा. तदर्थ समितीचे दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार पूर्ण दराने आदा करणेत आलेले होते. माहे एप्रिल, २०२० नंतरचे वेतन वळोवेळी मा. तदर्थ सामितीचे मान्यतेने व निर्णयानुसारच आदा करणेत आलेले आहे.

मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० नुसार संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा ठेकेदाराकडे वर्ग करणेतबाबत निर्णय झाला होता. मा तदर्थ . समितीचे दिनांक १३ : सभेतील निर्णय क्रोजीच्या २०२०/०७/३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत श्रीयालय मुंबई न्याउच्च :अनिल कचरु कोते व इतर यांनी मा ., खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र . .दि २०२०/६२२४१० रोजी दाखल २०२०/९/केलेली होती.

सदर रिट पिटीशनचा दिनांक ०३ .मा २०२१/०७/उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबद यांनी निर्णय दिलेला असून तो सोबत माहितीस्तव सादर करीत आहोत. सदरचे निर्णयानुसार सदरचे ५९८ कर्मचारी यांना मा. शासनाचे दिनांक १७/०९/२०१९ चे निर्णयातील अटी-शर्तीनुसार कार्यवाही करणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सदर ५९८ कर्मचारी यांच्या सेवा संस्थानकडे ठेवणेबाबत मा. उच्च न्यायालयचा निर्णय झालेला असल्याने इतर कर्मचारी यांचेप्रमाणे ५९८ कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२० व माहे एप्रिल, २०२० मध्ये आदा करणेत आलेल्या वेतनास मा तदर्थ समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय:

वित्त विभाग, भारत सरकार यांचेकडील दिनांक २३ मार्च, २०२० रोजीचे कार्यालयीन परिपत्रकात, मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. कामगार उपआयुक्त, मुंबई शहर यांना अग्रेषित केलेल्या दिनांक २० मार्च, २०२० रोजीचे पत्र व मा. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचे शासन निर्णयानुसार तसेच मा.

तदर्थ समितीचे दिनांक ०७/०४/२०२० रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांना दिनांक २२ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० तसेच माहे एप्रिल, २०२० चे वेतन सदरचे कर्मचारी कर्तव्यावर असल्याचे समजून पूर्ण वेतनदरानुसार वेतन आदा करणेत आलेले आहे.

पान ७ वर. कृ.मा.पा.

तथापि दिनांक ११/०५/२०२० रोजी झालेल्या तदर्थ समितीचे सभेत चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेल्या विषय वाचुन कायम करतांना निर्णय क्रमांक ३३५ फक्त ५९८ कर्मचारी यांचेकरीता हजर दिवसाला पूर्ण वेतन व उर्वरित दिवसांसाठी ६०% वेतन आदा करणेबाबत झालेला आहे व इतर सर्व कर्मचारी यांना पूर्णदराने वेतन आदा करणेबाबत निर्णय झालेला असून त्यानुसार त्यांना पूर्णदराने वेतन आदा करणेत आलेले आहे. परंतू माहे मार्च, २०२० व माहे एप्रिल, २०२० चे वेतन मा. तदर्थ समितीचे दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीने निर्णयानुसार पूर्णदराने दिनांक ११/०५/२०२० चे सभेपूर्वीच आदा करणेत आलेले होते. तसेच ५९८ कर्मचारी यांचेबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबद यांनी मा. शासनाचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१९ रोजीचे निर्णयातील अटी-शर्तीनुसार कार्यवाही करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्यामुळे ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांना माहे मार्च, २०२० व माहे एप्रिल, २०२० मध्ये आदा करणेत आलेल्या किमान वेतनदारनुसार पुर्ण वेतनास मा. तदर्थ समतीचे मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर.

२५/७/२१

(कान्हूराज बगाटे,भा. प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 93

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय:- श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना गैरशिस्तवर्तनाबाबत ठेवणेत आलेला "ठपका" रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५.०६.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत....

टिपणी

(A) विषयाची पुर्वपिठीका-

श्री.अनाप हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. ते दि.१५.०२.२०२० रोजी कर्तव्यावर होते.दि.१८.०२.२०२० पासुन इ.१२ वी.च्या बोर्ड परिक्षा सुरु होणार असल्याने व सदर परिक्षेचे केंद्र आपल्या महाविद्यालयात असल्याने त्या संदर्भात नियोजन करण्यासाठी दि.१५.०२.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.कनिष्ठ महाविद्यालयाकडील सर्व सहा.शिक्षकांची सभा आयोजीत करण्यात आलेली होती. सदर सभेमध्ये त्यांनी प्रत्येक विद्याशाखेनुसार उपकेंद्र नेमण्याची मागणी केली. मुळात बोर्डाच्या नियमानुसार महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठ शिक्षकांची इ.१२ वी. परिक्षा केंद्राचे उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करावी, असे संकेत आहेत असे असतांनाही त्यांनी विनाकारण त्या विषयावर वाद घालत बसले व सभेतील वातावरण खराब केले, तसेच वेळेचा अपव्यय केला.

तसेच इ.१२ वी.ची बोर्ड परिक्षा चालु असतांना इ.११ वी.च्या विद्यार्थ्यांना सुट्टी देणेबाबत नियमावलीमध्ये कोणतीही तरतुद नसतांना श्री.अनाप हे वारंवार इ.११ वी.च्या विद्यार्थ्यांना परिक्षेच्या काळात सुट्टी द्या अशी अवास्तव मागणी करुन वाद घालत राहिलेत.

सदरची सभा ही इ.१२ वी.च्या परिक्षा संदर्भात असतांना त्यांनी मध्येच गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केला कि," गोपनीय अहवाल अधिकारी न लिहिता इतर व्यक्ती लिहितात" असा आरोप त्यांनी सर्वासमोर केला, त्यांची सदरची बाब हि गंभीर आहे. तसेच सुरक्षारक्षकांची बदली करा, सुरक्षा रक्षकांना प्रशासन पाठीशी घालतात. ते आम्हांला नियम शिकवतात वगैरे असे आवंतर मुद्दे त्यांनी उपस्थित करुन, सभेच्या पर्यायाने प्रशासकिय कामकाजात अडथळा निर्माण केला. तसेच पुर्ण सभेच्या कालावधीत ते अत्यंत चिथावणीखोर वर्तन करत होते. तसेच इतर शिक्षकांना प्रशासनाच्या विरुध्द भडकविण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री.अनाप हे नेहमीच प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे विरोधात वर्तन करत असतात, ते इतर शिक्षकांना भडकविणे, चिथावणीखोर वक्तव्य करुन प्रशासन व विभागाकडील वातावरण कलुषित करणे, बेजबाबदारपणाने वागणे असे कृत्य करत असतात. त्यांचे अशा वागण्यामुळे दैनंदिन शालेय व प्रशासकिय कामकाजात मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

त्यांचे उपरोक्त गैरवर्तनामुळे दि.१५.०२.२०२० चे सभेत मुळ विषयास बगल देऊन, इतर आवंतर विषयांवर चर्चा होऊ लागलेली होती.त्यामुळे इ.१२ वी.च्या अत्यंत महत्वाच्या बोर्ड परिक्षेच्या नियोजनाकरीता जादा वेळ खर्ची पडला. तसेच इतर शिक्षक देखील नियमामध्ये नसलेल्या गोष्टीची मागणी करु लागले व त्यांना श्री.अनाप यांचेमुळे प्रशासनाचे विरोधात चिथावणी मिळाली.

असे त्यांचे विरुद्ध प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून कर्मचारी गैरवर्तनाबाबत रिपोर्ट आलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य गंभिर गैरशिस्त वर्तनात मोडते.

श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना द्यावयाचे कारणे दाखवा नोटीसीबाबत इकडील दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,"Call the Personally" असे निर्देश दिलेले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशास अनुसरुन श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२०, दि.११.०३.२०२० रोजी श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी कक्ष येथे सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले होते.

पान नं.२ वर..

त्यास अनुसरुन दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत श्री.वरघुडे,प्राचार्य व श्री.अनाप हजर होते व श्री.संगमनेरे हे गैरहजर होते.

दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी," १) अनाप हजर त्यांचे म्हणणे परत घेणे.अनाप यांना किरकोळ शिक्षा का करण्यात येऊ नये अशा आशयाची Show cause Notice काढा.२) संगमनेरे गैरहजर, पुर्वकल्पना न देता गैरहजर.श्री.संगमनेरे यांना निलंबीत का करण्यात येऊ नये अशी नोटीस काढा."असे निर्देश दिलेले होते.

उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.अनाप यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२८२६/२०२०, दि.१७-०३-२०२० अन्वये लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन त्यांनी दि.२३.०३.२०२० व दि.०३.०४.२०२० रोजीचे दोन खुलासे सादर केलेले आहेत.

त्यांना करावयाचे शिक्षेबाबत इकडील दि.०७.०५.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, ठपका ठेवण्यात येत आहे, असे निर्देश दिलेले होते.

श्री.अनाप यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार, शिक्षा म्हणून त्यांचेवर "ठपका" ठेवणेत येतो की, यापुढे त्यांचेकडून उपरोक्त प्रमाणे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी असे उपरोक्त संदर्भीय शिक्षेचे पत्र देण्यात आले.

(B) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पारीत केलेल्या शिक्षेचा आदेश रद्द करणेचा अधिकार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना आहे.

श्री.अनाप यांनी संदर्भ क्रं.०१ चा ठपका आदेश रद्द करणेबाबत मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दि.१५.०६.२०२० रोजीचा अपिल अर्ज केलेला आहे व सदर अर्जाची एकप्रत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस आवक विभागामार्फत सादर केलेली आहे.

श्री.अनाप यांनी दि.२५.०६.२०२० रोजी केलेल्या अपील अर्जात त्यांनी," अ) अपिलाची कारणे :-

१) माझ्या दि.२३/०३/२०२० रोजीचे खुलाशासोबतची कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नासावीत. दिनांक २१/०५/२०२० रोजी प्राप्त झालेले संदर्भीय पत्राने माझ्यावर ठपका ठेवण्यात आला आहे की, दि.१५/०२/२०२० रोजी इयत्ता १२ वी च्या बोर्ड परीक्षा केंद्राचे कामाचे नियोजनासाठी सकाळी ११.०० वाजता सर्व सहाय्यक शिक्षकांची सभा आयोजित केली होती. तुम्ही प्रत्येक विद्या शाखेनुसार उप केंद्र प्रमुख नेमण्याची मागणी केली. बोर्डाच्या नियमानुसार सेवाजेष्ठ शिक्षकाची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करावी असे संकेत असतांनाही तुम्ही अवास्तव मागणी करुन त्या विषयावर विनाकारण वाद घालून सभेचे वातावरण खराब केले. वेळेचा अपव्यय केला. सदर सभेत तुम्ही असा आरोप केला की, गोपनीय अहवाल अधिकारी न लिहिता इतर व्यक्ती लिहितात. तसेच सुरक्षारक्षकाची बदली करा, सुरक्षा रक्षकांना प्रशासन पाठीशी घालतात, असे मुद्दे उपस्थित करुन प्रशासकीय कामात अडथळा निर्माण केला. तुम्ही चिथावणी देऊन इतर शिक्षकांना भडकाविणे, चिथावणीखोर वक्तव्य करणे, वातावरण कलुषीत करणे, सदरचे कृत्य गंभीर व गैरशिस्त वर्तनात मोडते. असे संदर्भीय पत्रात असत्य निराधार कथने करुन माझ्यावर ठपका ठेवणेत आला आहे.

२) संदर्भीय पत्रापूर्वी याचकामी मला दि.१७/०३/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून माझा लेखी खुलासा मागविणेत आला होता. मी माझा दिनांक २३/०३/२०२० रोजीचा खुलासा सादर केला होता. त्यात मी माझी बाजू व्यवस्थित मांडलेली आहे. खुलाशासोबत मी आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली आहेत. परंतु संदर्भीय ठपका पत्रकाम मी खुलाशा सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा उल्लेख नाही. यदाकदाचित खुलाशा सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन झालेले नसावे किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झालेले नसावे.

३) मा.मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी माझ्या दिनांक २३/०३/२०२० रोजीचे खुलाशा बाबत दि.०४/०५/२०२० रोजीचा अहवाल सादर केलेला आहे. त्यात मुद्दा नं.१ मध्ये असे कथन केले आहे की, बोर्डाच्या संकेतानुसार श्री.शिवगजे व सौ.सावंत यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक केलेली आहे. श्री.शिवगजे सर यांना मागील १५ वर्षापासून केंद्रप्रमुख पदाचा अनुभव आहे. वास्तविक सदरचे विधान धादांत खोटे आहे. कारण आपल्याला इयत्ता १२ वी केंद्राची

पान नं.३ वर..

मान्यता सन २००७ पासून मिळालेली आहे. त्यापैकी ८ वर्षे सौ.चव्हाणके मॅडम , मुख्याध्यापिका तर २ वर्षे श्रीमती मिरजकर मॅडम , मुख्याध्यापिका व २ वर्षे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी केंद्र प्रमुख म्हणून काम केलेले आहे. दुसरे असे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सुचना पुस्तिकेत पान नं.१६ नियम २.२.४ मध्ये असे म्हटले आहे की, केंद्रास जोडलेल्या स्थानिक शाळांच्या / कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकातून उपप्राचार्यातून जेष्ठ शिक्षकतून सक्षम उपकेंद्र संचालकाची नियुक्ती करावी. आपल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक श्री.वरगुडे सर आहेत. श्री.शिवगजे व श्री.सावंत हे सहाय्यक शिक्षक आहेत. त्यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून केलेली नियुक्ती निसमबाहय आहे. याच मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.२१ वर असे म्हटले आहे की, (४:१-४.) प्रयोगशाळा सहाय्बक / प्रयोगशाळा परिचर व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी यांना पर्यवेक्षक म्हणून नेमण्यात येऊ नये. परंतु प्रत्यक्षात पर्यवेक्षक चार्टचे अवलोकन करता असे दिसते की, पर्यवेक्षक म्हणून प्रयोगशाळा सहाय्यक श्री.विलास आंबेकर व श्री.मिनीनाथ कोते यांची नियुक्ती करण्यात आली होती. थोडक्यात प्रत्येक वेळी निसमांचा भंग केला जातो.

अभिप्राय अहवालात मुद्दा क्र.१ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.शिवगजे सरांबाबत केलेले आरोप सन २०१७ मधील असून दोन प्रशासकीय अधिकारी समितीने चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, हा अहवाल प्रशासनासमोर आलेला नसून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

अहवालात मुद्दा नं.२ बाबत मुख्याध्यापकांनी असे म्हटले आहे की, यावर्षी वरिष्ठ महाविद्यालयाची इमारत उपलब्ध असल्याने इयत्ता ११ वीचे वर्ग तिकडे भरविण्याबबात सुचना दिल्या. इतर शिक्षकांनी मान्य केले. मात्र अनाप सरांनी विरोध करत आम्ही इयत्ता १२ वीचे कामकाज करावयाचे की इयत्ता ११ वीचे वर्ग पहायचे ? परीक्षेमध्ये काही अडचधी आल्यास त्यास मुख्याध्यापक जबाबदार राहतील, असे बोलून शिक्षकांना भडकावले. नियोजनाचे मिटींगमध्ये मी माझी अडचण मांडली. त्यावर मुख्याध्यापक या नात्याने त्यांचे मार्गदर्शन अपेक्षीत होते. ते त्यांनी केले नाही, मी शिक्षकांना भडकावले नाही.

मुद्दा नं.३ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.अनाप यांनी सर्व शिक्षकांसमोर अरेरावीने वागणूक गैरवर्तन केले आणि इतर शिक्षकांना चिथावणी दिली. मी अरेरावीने वागलो नाही, इतर शिक्षकांना चिथावणी दिली नाही.

मुद्दा क्र.४ मध्ये असे म्हटले आहे की, सभेमध्ये इयत्ता १२ वी परक्षिचे नियोजनाचे कामकाज सुरु असताना श्री.अनाप सर व श्री.संगमनेरे सर यांनी मध्येच उठून म्हटले की, तुम्ही गोपनीय अहवाल इतर व्यक्तीकडून लिहून घेता, ते श्रेणी देतांना भेदभाव करतात. तसेच मागील वर्षी इयत्ता १२ वी परीक्षा सुरु असताना श्री.अनाप व इतर काही शिक्षकांनी संबंधित सुरक्षा रक्षकाशी विनाकारण वाद केले. सदरचे विधान खोटे आहे. मुख्याध्यापक यांनी इतर शिक्षक कोण ? याचा उल्लेख केलेला नाही. यावरुन संदिग्धता दिसून येते दिसून येते. मग त्या इतर शिक्षकाविरुध्द मुख्याध्यापक यांनी गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही, हा प्रश्न निर्माण होतो.

४) मुद्दा क्र.५ बाबत असे म्हटले की, दि.२६/०२/२०२० रोजीची टिपणी मी सादर केली नव्हती. सामान्य प्रशासन विभागाकडून दि.०४/०३/२०२० रोजी कळविण्यात आले की, मुख्याध्यापक श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चेसाठी बोलावले. त्यानंतर दि.१०/०३/२०२० रोजी पुन्हा निरोप आला की, दिनांक ११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात हजर राहावे. कंत्राटी लिपीक श्रीसचिन कोपरे यांनी दि.१०/०३/२०२० रोजी रात्री ८.१९ वाजता श्री.अनाप यांना त्यांचे भ्रमणध्वनीव्दारे निरोप दिला. वास्तविक या बाबत दि.०४/०३/२०२० रोजी मला अवगत करणे आवश्यक होते.

मुद्दा क्र.६ बाबत श्री.अनाप अप्रत्यक्ष धमकी देत असतात. सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्री.अनाप यांच्या खुलाशा अभिप्रायावर सहया केलेल्या आहेत. हेच सहा.शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभेमध्ये वाद घालत होते. मा.मुख्याध्यापकांचे सदरचे म्हणणे असत्य व निराधार आहे. जर हे सहा कर्मचारी सभेत वाद घालत होते तर मुख्याध्यापकांनी त्यांच्या विरुध्द गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही. फक्त माझे विरुध्द रिपोर्ट केल्याने मुख्याध्यापकांचा सापत्नतेचा भाव दिसून येतो.

पान नंबर ४ वर..

वस्तुसिथती अशी आहे की, सदरच्या सहा जणांनी असे लेखी निवेदन सादर केले आहे की, दि.१५/०२/२०२० रोजीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सभेबाबत मा.मुख्याध्यापक यांनी श्रीअनाप सर यांच्याबाबत प्रशासनाला वाद नसून फक्त चर्चा झालेली होती. मा.मुख्याध्यापक यांनी कळविल्याप्रमाणे काहीही झालेले नाही. सदरच्या निवेदनाचा विचार झालेलर नाही. शिक्षक सभेच्या इतिवृत्तात फक्त चर्चा झाल्याची नोंद आहे.

मुद्दा नं.७ मध्ये म्हटले की, श्री.अनाप सेवाजेष्ठता यादीत १४ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा हेतू नसून गैरवर्तनाबाबत वरिष्ठांना अवगत करण्यात आले आहे. मुलतः मुख्याध्यापकांचे रिपोर्टनुसार काही गैरवर्तन माझ्याकडून झालेले नाही. सभेमध्ये मी केवळ अडचणी, समस्या याबाबत चर्चा केली की, ज्यासाठी सभा आयोजित केली होती.

श्री.शिवगजे सर यांच्या सांगण्यावरुन मुलांचे पैसे बॅकेत भरले, याबाबत माझ्या दिनांक ०३/०४/२०२० रोजीचे खुलाशाबाबत मा.मुख्याध्यापक यांनी असा अभिप्राय दिला आहे की, त्या प्रकरणाची संस्थान प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी होऊन सदरचे प्रकरण सन २०१७ मध्ये संपलेले आहे. महोदय, मी आपले निदर्शनास आणुन देतो की, श्री.शिवगजे सर यांचे विरुध्दच्या तक्रारी व प्रकरणाचा चौकशीचा फार्स / नाटक करण्यात आलेले आहे. त्या प्रकरणाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अंतिम निर्णय झालेले नाहीत. कदाचित त्यासाठी मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी समोर सादर झाली नसावीत.

मा.मुख्याध्यापक यांनी अभिप्राय अहवालात माझ्यावर असा आरोप केला की, नोटीसीचा खुलासा परस्पर सादर केला. वस्तुस्थिती अशी आहे की, मी माझा खुलासा मुख्याध्यापकांना दाखवला होता. त्यांचे असे म्हणणे होते की, खुलाशातील काही विधाने वगळावीत, तरच ते खुलासा त्यांचेमार्फत पाठवतील. परंतु ती विधाने म्हणजे वस्तुस्थितीदर्शक व माझ्या बचावासाठी आवश्यक होती. त्यामुळे ती विधाने मजकूर मी वगळण्यास तयार नव्हतो तर त्याशिवाय मुख्याध्यापक माझ्या खुलाशावर स्वाक्षरी करणेस तयार नव्हते. परिणामी मला नाईलाजाने माझा खुलासा थेट सादर करावा लागला.

ब) अपिलाची पार्श्वभुमी :-

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून इयत्त ११ वी कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. श्री.वरगुडे सर यांनी दि.२७/०४/२०१८ पासून मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे. त्यापूर्वीचा इतहिास व घटना या बाबत श्री.वरगुडे सर अनभिज्ञ आहे. जावक नं.वशी १-१८९२ दि.०४/०७/२००८ अन्वये कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग व प्रयोगशाळा जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीत स्थलांतरीत झाले. त्यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासन व नियंत्रण श्री.शिवगजे सर यांचेकडे सोपवण्यात आले. त्याचा गैरफायदा / गैरवापर श्री.शिवगजे यांनी घेतला आहे. प्राचार्य किंवा उपप्राचार्य पद मिळावे यासाठी संस्थान दरबारी खोटे, चुकीचे रेकॉर्ड तयार केले. संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांना श्री.शिवगजे सर यांनी खोटी, चुकीची, अपुर्ण, दिशाभूल करणारी माहिती सादर केली. त्याबाबतची माहिती ज्यांनी वरिष्ठांना देण्याचा प्रयत्न केला त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा श्री.शिवगजे सरांनी प्रयत्न केलेला आहे. हे खालील घटनांवरुन आपले निदर्शनास येईल.

१) मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०३/०१/२००९, विषय नं.२९ चे अवलोकन करता असे दिसले की, श्री.शिवगजे सर यांनी त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य पद मिळावे यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर असा निर्णय झाला की, उप प्राचार्य पदाची उपलब्धता, त्याचे निकष व शैक्षणिक पात्रता इ.बाबत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून पडताळणी करुन घेऊन, त्या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. याचाच अर्थ श्री.शिवगजे सर यांची उप प्राचार्य पदासाठीची पदोन्नती नाकारण्यात आली. या निर्णयाप्रमाणे कार्यवाही केल्यास आपली उप प्राचार्यपदी वर्णी लागणार नाही म्हणून श्री.शिवगजे सर यांनी या निर्णयामुळे कार्यवाही केली नाही. श्री.शिवगजे सर यांनी मा.व्यवस्थापनाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करता केराची टोपली दाखविली.

पान नं.५ वर..

दि.१५/१२/२०१६ रोजी १२ सेवकांनी व दि.३०/०६/२०१७ रोजी ६ शिक्षकांनी श्री.शिवगजे सर यांचे विरोधात तक्रार अर्ज सादर केले होते. त्यात अशा तक्रारी केल्या की, श्री.शिवगजे सर अध्यापनाकरीता वर्गावर जात नाहीत. बाहेर जाताना मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करीत नाही, विहिती अभ्यासक्रम विहित वेळेत पुर्ण करीत नाहीत, श्री.शिवगजे सर यांनी इयत्ता १२ वीचे विद्यार्थ्यांची परीक्षा फीची रक्कम स्वतःचे वैयक्तिक बँक खात्यात जमा केली. विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकल घेत नाहीत, विद्यार्थ्यांना फी भरणाबाबत संस्थानची अधिकृत पावती न देता कॉम्प्युटर प्रिंट पावती देतात, विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर श्रीशिवगजे सर यांनी अनाधिकारे प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केल्या, या व इतर अनेक तक्रारींबाबत तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री.गमे साहेब यांचे समोर सुनावणी झाली. परंतु चौकशी अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समोर सादर झाला नसावा. त्यामुळे त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

२) व्यवस्थापन समितीची सभा दि.०७/०८/२०१६, विषय नं.१९ प्रस्तावाचे अवलोकन करता असे आढळून येते की, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी परस्पर (संदर्भ जा.क्र.एसएसएस-कन्या-कनिष्ठ/१०५३८ दि.०९/०९/२०१६) पत्रव्यवहार करुन शाळेच्या नावात बदल केला. संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार विभागाचे नावात बदल करावयाचा असल्यास त्याबाबत प्रथम व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन त्यानंतर प्रशासनामार्फत कार्यालयीन आदेश पारित करुन नावात बदल केला जातो. मात्र शाळेच्या नावात बदल करतेवेळी मा.व्यवस्थापन समितीची अथवा मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही. यावर असा निर्णय झाला की, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावात केलेला बदल रद्द करणेत येऊन त्या ऐवजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा बदल करणेस मान्यता देण्यात आली. महोदय, श्री.शिवगजे सर यांनी शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे संच मान्यतेसाठी (कार्यभार निश्चिती व पट पडताळणी) सादर केलेल्या प्रस्तावावर अनाधिकारे शाळेचे नाव बदलून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय अशी नोंद केली आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास न जुमानता सन २०१६-२०१७ च्या प्रस्तावात जुनेच नावाने (श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी) नोंद केली. तसेच प्राचार्य हे पद नसतांना श्री.शिवगजे सर यांनी अनाधिकारे सन २०१३-२०१४ च्या प्रस्तावात प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केली आहे.

४) इयत्ता १० वी परीक्षेत सामान्य गणित हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मध्ये गणित हा विषय अभ्यासता येत नाही, असा नियम आहे. तरी देखील श्री.शिवगजे सर यांनी अशा एका विद्यार्थ्यासन २०१५ मध्ये प्रवेश दिला. त्यामुळे विभागीय सचिव, पुणे, विभागीय मंडळ, पुणे यांनी त्यांचे पत्र जावक नं.६७५ दि.०३/०७/२०१७ अन्वये संस्थानला रु.१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) दंड केला. अशाप्रकारे श्री.शिवगजे सर यांनी नियमाची पायमल्ली केली आहे. संस्थानचे आर्थिक नुकसान झाले. संस्थानच्या इभ्रतीला धोका पोहचला.

५) श्री.विकास महादेव शिवगजे सर यांना आतापर्यंत गैरवर्तनाबद्दल खालीलप्रमाणे शिक्षा झाल्यात.

अ.नं.	जावक नं.	दिनांक	गैरवर्तनाचे स्वरुप	शिक्षा
१)	३१२६	१८/११/२०१५	दि.२९/०२/२०१५ रोजीचे बैठकीस उशिरा हजर झाले.	ठपका
२)	५४५	१८/०५/२०१६	वर्कशीट दि.२६/१०/२०१५ ते ३१/१०/२०१५ उशिरा सादर केले, शिक्षण सेवक व प्रयोगशाळा सहाय्यक वेतनश्रेणी प्रस्ताव उशिराने सादर केला.	ताकीद
३)	४०६७	१५/०२/२०१७	नोव्हेंबर २०१६ मध्ये एकही दैनंदिन अहवाल सादर केला नाही.	समज
४)	४४०२	२२/०३/२०१७	नाताळ सुट्टी दि.२९/१२/२०१६ ते दिनांक ०२/०१/२०१७ साईभक्त दर्शन लाईन नियोजनाचे काम व्यवस्थित केले नाही, नोटीसीचा खुलासा केला नाही.	ठपका

पान नं.६ वर..

अ.नं.	जावक नं.	दिनांक	गैरवर्तनाचे स्वरुप	शिक्षा
५)	२२७८	०४/०९/२०१७	विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याचे दाखल्यावर स्वाक्षरी करु नये, असे बजावले असतांनाही अनाधिकारे उप प्राचार्य म्हणून स्वाक्षऱ्या केल्या. कॉलेजच्या नावात बदल केलेला असतांनाही जुने नावानेच दाखल्याचे वाटप केले. खुलाशा सोबत राजकीय व्यक्तीचे शिफारस पत्र जोडून प्रशासनावर राजकीय दबाव आणला.	ठपका
६)	३४५३	०५/१२/२०१७	कर्तव्यात कसूर केला, नोटीसीचा खुलासा सादर केला नाही.	ठपका
७)	१९४८	०२/१०/२०१८	१) दि.०६/०१/२०१८ रोजी शिक्षक सुचना वही मुख्याध्यापिका मिरजकर यांचे टेबलावरुन विना परवाना घेऊन स्वतःकडे ठेवले, परत मागितली असता देणार नाही असे उध्दट उत्तर दिले. २) सन २०१७-१८ मध्ये इ.११ वी सायन्स तुकडी ब चे वर्ग शिक्षक असतांना एकाही महिन्यात विद्यार्थी हजेरी पत्रक तपासणी करुन पुर्ण केले नाही. लेखी तोंडी सुचना देऊनही पूर्तता न केल्याने संच मान्यता कामकाजात अडचणी आल्या. अशाप्रकारे कामात हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा केला. याबाबतच्या नोटीसीचा देखील लेखी खुलासा सादर केला नाही.	ठपका
८)	१२७७	०२/०८/२०१८	दि.१६/०२/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता कंत्राटी महिला शिक्षिका श्रीमती शबाना सय्यद यांना शिपायामार्फत बोलावून घेतले व त्यांना जाब विचरला की, माझा टेबल का सरकावला, असा आगाऊपणा करु नका, असे म्हणून दम दिला. श्रीमती सय्यद यांनी सांगितले की, त्यांनी टेबल सरकावला नाही. त्यांचे ऐकून न घेता दम दिला. प्राचार्या मिरजकर यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांना म्हणाले की, तुम्ही शहाणपणा करु नका, कशाला मला खेटायला येता, तुम्ही सगळी घाण करुन ठेवली, कशाला इकडे झक मारायला येता, अशा असभ्य भाषेत महिला शिक्षिका व प्राचार्या यांना बोलले. घटनेचे वेळी घटनास्थळी बरेच विद्यार्थी, शिक्षक हजर होते. याबाबतच्या कारणे दाखवा नोटीसीचा लेखी खुलासा सादर केला नाही. श्री.शिवगजे सर यांचे तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांचेशी लागेबांधे असल्याने एवढे गंभीर गैरशिस्त वर्तन असतांनाही त्यांना किरकोळ शिक्षा झालेल्या आहेत.	ताकीद

६) कनिष्ठ महाविद्यालयातील एका शिक्षकाला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नेमणूक आदेश दिलेला आहे. त्या आदेशात श्री.शिवगजे सर यांनी परस्पर अनाधिकारे फेरफार व बदल करुन दुसरा नेमणूक आदेश त्याच जावक नंबर व तारखेचा दिला आहे.

अशाप्रकारे श्री.विकास महादेव शिवगजे सर उप प्राचार्य पद मिळविण्यासाठी चुकीची, बेकायदेशीर, नियमबाहय कृत्ये व गैरकृत्ये करतात. त्यास मी विरोध करतो व वरिष्ठ अधिकारी यांचे निदर्शनास आणुन देतो. त्याचा राग मनात धरुन श्री.शिवगजे सर माझे रेकॉर्ड खराब करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पान नं.७ वर..

वरील कथनांच्या सत्यतेसाठी माझेकडे आधारभूत कागदपत्रे उपलब्ध आहेत. परंतु संस्थान व्यवस्थापन, प्रशासन, संस्थानचे शैक्षणिक संकुल यांची बदनामी होऊ नये, नावलौकीकास बाधा पोहचू नये म्हणून ती कागदपत्रे या अपिलासोबत सादर केलेली नाहीत. परंतु आपण परवानगी दिल्यास मी ती कागदपत्रे सुनावणीच्या वेळी आपल्या समोर सादर करणेस तयार आहे.

सबब, माझी नम्र प्रार्थना की,

१) संदर्भीय आदेशानुसार मला झालेली शिक्षा रद्द करावी.

२) वरील सर्व घटनांबाबत संबंधितांची विभागीय चौकशी करणेत यावी. "असे म्हटलेले आहे.

C) श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना संदर्भ क्रं.१ अन्वये ठपका हि शिक्षा करणेत आलेली होती.त्यांनी शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजी केलेल्या अपील अर्जात त्यांनी केलेले गैरशिस्तवर्तनाचा विषयास बगल देवुन, श्री.गंगाधर वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी व श्री.विकास महादेव शिवगंजे,सहा.शिक्षक यांचेबद्दल कथन केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

श्री.अनाप यांनी दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, महोदय, व्यवस्थापन समिती यांनी अग्रेषित केलेले व प्रत माहितीसाठी कार्यवाहीसाठी सविनय सादर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब अशा दोन प्रती इकडील आवक विभागास दिलेल्या आहेत.श्री.अनाप यांचा दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे सोबतचे पत्रासोबत पाठविणेत येवुन त्यावर त्यांचा स्पष्ट अभिप्राय घेण्यात येवुन पुढील योग्य ती कारवाई करता येईल. तरी प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना दयावयाचे सोबतचे पत्रावर स्वाक्षरी होणेस विंनती याबाबत इकडील दि.०४.०७.२०२० रोजीची टिपणी सादर करणेत आलेली होती.दि.०४.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीनुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/४६९/२०२०, दि.१०-०७-२०२० रोजीचे पत्रासोबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना श्री.अनाप यांचा दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्जाची छायांकित प्रत त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालाकरीता पाठविणेत आलेली होती.

D) त्यास अनुसरुन प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी श्री.अनाप यांचे दि.१५.०६.२०२० रोजीचे अपील अर्जावर दि.२८.०७.२०२० रोजीचा स्वयंस्पष्ट अहवाल प्रशासकिय अधिकारी यांचेमार्फत इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. त्यात त्यांनी," श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे दि.१५.०६.२०२० रोजीचे पत्रान्वये त्यांचेबाबत व्यवस्थापन समिती यांचेकडेस करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर माझी स्वाक्षरी व अभिप्राय नाही. त्यानुसार संदर्भीय पत्रान्वये श्री.अनाप यांनी दि.१५.०६.२०२० रोजीचा सादर केलेला अपील अर्जातील कथनाबाबत मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट लेखी अभिप्राय प्रशासकीय अधिकारी यांचे मार्फत सादर करणेबाबत आदेशीत करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०१.	माझ्या दि.२३/०३/२०२० रोजीचे खुलाशासोबतची कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नसावीत. दिनांक २१/०५/२०२० रोजी प्राप्त झालेले सदर्भीय पत्राने माझ्यावर ठपका ठेवण्यात आला आहे की, दि.१५/०२/२०२० रोजी इयत्ता १२ वी च्या बोर्ड परीक्षा केंद्राचे कामाचे नियोजनासाठी सकाळी ११.०० वाजता सर्व सहाय्यक शिक्षकांची सभा आयोजित केली होती. तुम्ही प्रत्येक विद्या शाखेनुसार उपकेंद्र प्रमुख नेमण्याची मागणी केली. बोर्डाच्या नियमानुसार सेवाज्येष्ठ शिक्षकाची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करावी असे संकेत असतानाही तुम्ही अवास्तव मागणी करून त्या विषयावर विनाकारण वाद घालून सभेचे वातावरण खराब केले, वेळेचा अपव्यय केला. सदर सभेत तुम्ही असा आरोप केला की, गोपनीय अहवाल अधिकारी न लिहिता इतर व्यक्ती लिहितात. तसेच सुरक्षा रक्षकाची बदली करा, सुरक्षा रक्षकांना प्रशासन पाठीशी घालतात, असे मुद्दे उपस्थित करून प्रशासकीय कामात अडथळा निर्माण केला.तुम्ही चिथावणी देऊन इतर शिक्षकांना प्रशासनाच्या विरोधात भडकाविण्याचा प्रयत्न करतात. तुम्ही प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे विरोध करतात, इतर शिक्षकांना भडकाविणे, चिथावणीखोर वक्तव्य करणे, वातावरण कलुषीत करणे, सदरचे कृत्य गंभीर व गैरशिस्त वर्तनात मोडते. असे संदर्भीय पत्रात असत्य निराधार कथने करून माझ्यावर ठपका ठेवणेत आला आहे.	श्री.अनाप यांनी खुलाशा सोबतचे कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नसावीत, असा निराधार आरोप केलेला दिसून येत आहे. संस्थानचे प्रचलित पद्धतीने कारणे दाखवा नोटीसचा खुलासा व त्यासोबतचे कागदपत्रे हे वशी-शिस्त विभागामार्फत पदोसोपान पद्धतीने वरिष्ठांकडे अवलोक - नार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात येत असतात. त्यानुसार अनाप यांचेवर संस्थानच्या प्रचलित पद्धतीने शिस्तभंगाची कारवाई झालेली आहे. मात्र श्री.अनाप यांनी सदर मुद्यानुसार सबंधीत विभागवर अप्रत्यक्षपणे निराधार आरोप केलेले दिसून येत आहे.

पान नं.८ वर..

अ.क्र.	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०२.	संदर्भीय पत्रापूर्वी याचकामी मला दि.१७/०३/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून माझा लेखी खुलासा मागविणेत आला होता.मी माझा दिनांक २३/०३/२०२० रोजीचा खुलासा सादर केला होता. त्यात मी माझी बाजू व्यवस्थीत मांडलेली आहे. खुलाशा सोबत मी आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली आहेत. परंतु संदर्भीय ठपका पत्रकात मी खुलाशा सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा उल्लेख नाही. यदाकदाचित खुलाशा सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन झालेले नसावे किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झालेले नसावे.	श्री.अनाप यांनी खुलाशासोबतचे कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नसावीत, असा निराधार आरोप केलेला दिसून येत आहे. संस्थानचे प्रचलित पद्धतीने कारणे दाखवा नोटीसचा खुलासा व त्यासोबतचे कागदपत्रे हे वशी-शिस्त विभागामार्फत पदोसपोन पद्धतीने वरिष्ठांकडे अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात येत असतात. मात्र श्री.अनाप यांनी सदर मुद्यानुसार सबंधीत विभागावर अप्रत्यक्षपणे केलेले आरोप निराधार आहेत.
०३.	मा.मुख्याध्यापक; श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी माझ्या दिनांक २३/०३/२०२० रोजीचे खुलाशा बाबत दि.०४/०५/२०२० रोजीचा अहवाल सादर केलेला आहे. त्यात मुद्दा नं.१ मध्ये असे कथन केले आहे की, बोर्डाच्या संकेतानुसार श्री.शिवगजे व सौ.सावंत यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक केलेली आहे. श्री.शिवगजे सर यांनी मागील १५ वर्षापासून केंद्रप्रमुख पदाचा अनुभव आहे. वास्तविक सदरचे विधान धादांत खोटे आहे. कारण आपल्याला इयत्ता १२ वी केंद्राची मान्यता सन २००७ पासून मिळालेली आहे. त्यापैकी ८ वर्षे सौ.चव्हाणके मॅडम, मुख्याध्यापिका तर २ वर्षे श्रीमती मिरजकर मॅडम, मुख्याध्यापिका व २ वर्षे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी केंद्रप्रमुख म्हणून काम केलेले आहे. दुसरे असे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.१६ नियम २.२.४ मध्ये असे म्हटले आहे की, केंद्रास जोडलेल्या स्थानिक शाळांच्या /कनिष्ठ महाविलयाच्या मुख्याध्यापकातून उपप्राचार्यातून ज्येष्ठ शिक्षकातून सक्षम उपकेंद्र संचालकाची नियुक्ती करावी. आपल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर आहेत. श्री.शिवगजे व श्री.सावंत हे सहाय्यक शिक्षक आहेत. त्यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून केलेली नियुक्ती नियमबाहय आहे. याच मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.२१ वर असे म्हटले आहे की, (४ :१-४.) प्रयोगशाळा सहाय्यक/प्रयोगशाळा परिचर व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी यांना पर्यवेक्षक म्हणून नेमण्यात येऊ नये. परंतु प्रत्यक्षात पर्यवेक्षक चार्टचे अवलोकन करता असे दिसते की, पर्यवेक्षक म्हणून प्रयोगशाळा सहाय्यक श्री.विलास आंबेकर व श्री.मिनीनाथ कोते यांची नीयुक्ती करण्यात आली होती. थोडक्यात प्रत्येक वेळी नियमांचा भंग केला जातो.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८२९/२००८ दि.०४ जुलै, २००८ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील वर्ग व प्रयोगशाळा जि.प.शाळेच्या नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आलेमुळे श्रीमती चव्हाणके, प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना ज्यू.कॉलेजचा दैनंदिन प्रशासन व नियंत्रण करणे शक्य नसल्याने त्यांचेकडील श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचा कार्यभार पुढील आदेश होईपावेतो श्री.विकास महादेव शिवगजे यांचेकडे तात्पुरता देण्यात आला आहे. सदर आदेशानुसार श्री.शिवगजे हे सन २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडील कामकाज पाहत आहेत. श्री अनाप यांनी त्यांचे मुद्यामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.१६ नियम २.२.४ मध्ये असे म्हटले आहे की, केंद्रास जोडलेल्या स्थानिक शाळांच्या /कनिष्ठ महाविलयाच्या मुख्याध्यापकातून, उपप्राचार्यातून, ज्येष्ठ शिक्षकातून सक्षम उपकेंद्र संचालकाची नियुक्ती करावी. असे निर्देश असल्याचे नमुद केलेले आहे. त्यानुसारच श्री.विकास शिवगजे व सौ.मंदाकिनी सांवत या सेवाज्येष्ठ शिक्षकांची उपकेंद्र संचालक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे ती नियमबाह्य नाही. इ.१२ वी.च्या केंद्र परिक्षेचेवेळी केंद्रावर परिस्थितीनीरुप निर्णय घेण्याचा अधिकार केंद्रप्रमुख यांना असतो. त्यानुसार अपवादात्मक परिस्थितीमध्ये पर्यवेक्षक संख्या कमी असल्यास शिक्षकेतर कर्मचारी (ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक) यांना दोन किंवा तीन वेळा पर्यवेक्षण दिलेले होते. त्याबाबत सबंधीतांची काहीही तक्रार नाही.

पान नं.९ वर..

अ.क्र.	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०४.	अभिप्राय अहवालात मुद्दा क्र.१ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.शिवगजे सरांबाबत केलेले आरोप सन २०१७ मधील असून दोन प्रशासकीय अधिकारी समितीने चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, हा अहवाल प्रशासनासमोर आलेला नसून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.	श्री.शिवगंजे यांचेवर केलेल्या आरोपाबाबत श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.२१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/२०१५ दि.११ जून, २०१५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५ मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री.अनाप यांनी त्यांचे अर्जात अतिशय निराधारपणे संस्थाने प्रशासनावर बेछुटपणे आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
०५.	अहवालात मुद्दा नं.२ बाबत मुख्याध्यापकांनी असे म्हटले आहे की, यावर्षी वरिष्ठ महाविद्यालयाची इमारत उपलब्ध असल्याने इयत्ता ११ वीचे वर्ग तिकडे भरविण्याबाबत सुचना दिल्या. इतर शिक्षकांनी मान्य केले. मात्र अनाप सरांनी विरोध करत आम्ही इयत्ता १२ वीचे कामकाज करावयाचे की इयत्ता ११ वीचे वर्ग पहायचे ? परीक्षेमध्ये काही अडचणी आल्यास त्यास मुख्याध्यापक जबाबदार राहतील, असे बोलून शिक्षकांना भडकावले. नियोजनाचे मिटींगमध्ये मी माझी अडचण मांडली. त्यावर मुख्याध्यापक या नात्याने त्यांचे मार्गदर्शन अपेक्षित होते. ते त्यांनी केले नाही, मी शिक्षकांना भडकावले नाही.	मुख्याध्यापकांनी सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करुनच इ.१२ वी.ची परिक्षा सुरु असतांना इ.११ वी. चे वर्ग वरिष्ठ महाविद्यालयाचे इमारतीमध्ये भरविणेबाबत सुचना केलेली होती. त्यामध्ये इतर कोणीही शिक्षकांनी काहीच आक्षेप घेतला नाही. मात्र फक्त श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनीच मुद्दयात नमुद केलेप्रमाणे प्रश्नावली उपस्थितीत केली, हे त्यांनी त्यांचे मुद्यात मान्य केले आहे. मात्र त्यास ते आता मार्गदर्शन मागितले असे म्हणतात. तसेच त्यांनी इतर शिक्षकांनाही तुम्ही दोन दोन कामे करण्यास कसं काय तयार होत आहात असे बोलून भडकविण्याचे काम केलेले आहे.
०६.	मुद्दा नं.३ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.अनाप यांनी सर्व शिक्षकांसमोर अरेरावीने वागणूक गैरवर्तन केले आणि इतर शिक्षकांना चिथावणी दिली. मी अरेरावीने वागलो नाही, इतर शिक्षकांना चिथावणी दिली नाही.	याबाबत गैरवर्तन रिपोर्टमध्ये नमुद केलेले आहे.
०७.	मुद्दा नं.४ मध्ये असे म्हटले आहे की, सभेमध्ये इयत्ता १२ वी परीक्षेचे नियोजनाचे कामकाज सुरू असतांना श्री.अनाप सर व श्री.संगमनेरे सर यांनी मध्येच उठून म्हटले की, तुम्ही गोपनीय अहवाल इतर व्यक्तीकडून लिहून घेता, ते श्रेणी देतांना भेदभाव करतात. तसेच मागील वर्षी इयत्ता १२ वी परीक्षा सुरू असतांना श्री.अनाप व इतर काही शिक्षकांनी संबंधित सुरक्षा रक्षकाशी विनाकारण वाद केले. सदरचे विधान खोटे आहे. मुख्याध्यापक यांनी इतर शिक्षक कोण ? याचा उल्लेख केलेला नाही. यावरून संदिग्धता दिसून येते. मग त्या इतर शिक्षकाविरूध्द मुख्याध्यापक यांनी गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही, हा प्रश्न निर्माण होतो.	इ.१२ वी परिक्षेचे नियोजनाचे कामकाजाबाबत सभा आयोजित केली असतांना त्यामध्ये सुरक्षारक्षक बदला, ही मागणी प्रथम श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनीच मांडली होती. तसेच मागील वर्षी इ.१२ वी च्या परिक्षेच्या वेळी श्री.अनाप व इतर काही शिक्षकांनी सुरक्षारक्षकाशी वाद घातला होता. सदरची बाब ही मागील वर्षातील असल्यामुळे त्या शिक्षकाविरुद्ध गैरवर्तन रिपोर्ट करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तसेच त्यावेळी सबंधीत सुरक्षारक्षक यांनी वाद घालणा-या शिक्षकांची तक्रार संरक्षण कार्यालयात केलेली होती. त्याबाबत सदर शिक्षकांना तत्कालीन प्रतिनियुक्त पोलीस उपअधिक्षक श्री.भोईट साहेब यांनी समक्ष बोलवून समज दिल्याचे समजते.

पान नं.१० वर..

अ.क्र.	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०८.	मुद्दा नं.५ बाबत असे म्हटले की, दि.२६/०२/२०२० रोजीची टिपणी मी सादर केली नव्हती. सामान्य प्रशासन विभागाकडून दि.०४/०३/२०२० रोजी कळविण्यात आले की, मुख्याध्यापक श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चेसाठी बोलावले. त्यानंतर दि.१०/०३/२०२० रोजी पुन्हा निरोप आला की, दिनांक ११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात हजर राहावे. कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांनी दि.१०/०३/२०२० रोजी रात्री ८.१९ वाजता श्री.अनाप यांना त्याचे भ्रमणध्वनीद्वारे निरोप दिला. वास्तविक या बाबत दि.०४/०३/२०२० रोजी मला अवगत करणे आवश्यक होते.	श्री.अनाप, श्री.संगमनेरे व तुम्ही यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष चर्चेसाठी बोलविले आहे. मात्र त्याबाबतची वार व वेळ नंतर कळविण्यात येईल, असा निरोप मला मला दि.०४.०३.२०२० रोजी भेटलेला होता. हा निरोप मी सबंधीत शिक्षकांना त्याच दिवशी दिलेला होता व वार व वेळ कळविल्यावर तुम्हास सांगतो असे सांगितलेले होते. त्यानंतर मला दि.१०.०३.२०२० रोजी निरोप भेटला की उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ११.०० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना घेऊन उपस्थित राहावे, त्यानुसार मी कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांना सबंधीत शिक्षकांना निरोप देण्याबाबत सुचना दिल्या. त्यानुसार श्री.कोपरे यांनी सबंधीत शिक्षकांना कळविलेले होते. त्यामुळे श्री.अनाप यांचा सदरचा मुद्दा अत्यंत चुकीचा व निराधार आहे.
०९.	मुद्दा नं.६ बाबत श्री.अनाप अप्रत्यक्ष धमकी देत असतात. सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्री.अनाप यांच्या खुलाशा अभिप्रायावर सहया केलेल्या आहेत. हेच सहा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभेमध्ये वाद घालत होते. मा.मुख्याध्यापकांचे सदरचे म्हणणे असत्य व निराधार आहे. जर हे सहा कर्मचारी सभेत वाद घालत होते तर मुख्याध्यापकांनी त्यांच्या विरूध्द गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही. फक्त माझे विरूध्द रिपोर्ट केल्याने मुख्याध्यापकांचा सापत्नतेचा भाव दिसून येतो. वस्तुस्थिती अशी आहे की, सदरच्या सहा जणांनी असे लेखी निवेदन सादर केले आहे की, दि.१५/०२/२०२० रोजीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सभेबाबत मा.मुख्याध्यापक यांनी श्री.अनाप सर यांच्याबाबत प्रशासनाला वाद विवाद व गैरवर्तन केल्याचे चुकीचे कळविलेले आहे. सदर सभेत वाद नसून फक्त चर्चा झालेली होती. मा.मुख्याध्यापक यांनी कळविल्याप्रमाणे काहीही झालेले नाही. सदरच्या निवेदनाचा विचार झालेला नाही. शिक्षक सभेच्या इतिवृत्तात फक्त चर्चा झाल्याची नोंद आहे.	श्री.अनाप यांनी स्वतःचा स्वतंत्र लेखी खुलासा सादर करणे आवश्य असतांना त्यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना त्यांच्या लेखी खुलाशावर सह्या करणेबाबत अग्राह केला होता. श्री.अनाप यांचेकडून ज्या ठिकाणी गैरवर्तन झाले त्या ठिकाणी शिक्षक व शिक्षकेतर असे एकुण ३२ कर्मचारी उपस्थित होते. मात्र त्यांचे खुलाशावर फक्त सहाच कर्मचा-यांनी स्वाक्ष-या केलेल्या आहेत व हेच कर्मचारी वाद घालत होते. मात्र त्यांना समजावून सांगितल्यानंतर त्यांनी सभेमध्ये मुख्याध्यापक यांचे म्हणणे समजून घेतले होते, मात्र श्री.अनाप व श्री.संगमनेरे हे समजून घेण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हते. त्यांनी सभेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाद घातला त्यामुळे त्यांचा गैरवर्तन रिपोर्ट केलेला आहे. यामध्ये भेदभाव करणे किंवा इतरांचा रिपोर्ट न करणे असा काहीही प्रकार नाही. तसेच निवेदनाचा विचार झालेला नाही, असा मुद्दा उपस्थित करुन श्री.अनाप यांनी पुन्हा निराधारपणे संस्थाने प्रशासनावर व वरिष्ठांवर आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
१०.	मुद्दा नं.७ मध्ये म्हटले की, श्री.अनाप सेवाज्येष्ठता यादीत १४ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा हेतू नसून गैरवर्तनाबाबत वरिष्ठांना अवगत करण्यात आले आहे. मुलतः मुख्याध्यापकांचे रिपोर्टनुसार काही गैरवर्तन माझ्याकडून झालेले नाही. सभेमध्ये मी केवळ अडचणी, समस्या याबाबत चर्चा केली की, ज्यासाठी सभा आयोजित केली होती.	याबाबत गैरवर्तन रिपोर्टमध्ये नमुद केलेले आहे.

पान नं.११ वर..

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
	मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०३/०१/२००९, विषय नं.२९ चे अवलोकन करता असे दिसले की, श्री शिवगजे सर यांनी त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य पद मिळावे यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर असा निर्णय झाला की, उप प्राचार्य पदाची उपलब्धता, त्याचे निकष व शैक्षणिक पात्रता इ.बाबत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडुन पडताळणी करून घेऊन, त्या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. याचाच अर्थ श्री.शिवगजे सर यांची उप प्राचार्य पदासाठीची पदोन्नती नाकारण्यात आली. या निर्णयाप्रमाणे कार्यवाही केल्यास आपली उप प्राचार्यपदी वर्णी लागणार नाही म्हणून श्री.शिवगजे सर यांनी या निर्णयामुळे कार्यवाही केली नाही. श्री.शिवगजे सर यांनी मा.व्यवस्थापनाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करता केराची टोपली दाखविली.	
१४.	दि.१५/१२/२०१६ रोजी १२ सेवकांनी व दि.३०/०६/२०१७ रोजी ६ शिक्षकांनी श्री.शिवगजे सर यांचे विरोधात तक्रार अर्ज सादर केले होते. त्यात अशा तक्रारी केल्या की, श्री.शिवगजे सर अध्यापनाकरीता वर्गावर जात नाहीत, बाहेर जाताना मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करीत नाही, विहीत अभ्यासक्रम विहीत वेळेत पुर्ण करीत नाहीत, श्री.शिवगजे सर यांनी इयत्ता-१२ वीचे विद्यार्थ्यांची परीक्षा फीची रक्कम स्वतःचे वैयक्तिक बँक खात्यात जमा केली. विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकल घेत नाहीत. विद्यार्थ्यांना फी भरणा बाबत संस्थानची अधिकृत पावती ने देता कॉम्प्युटर प्रिंट पावती देतात, विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर श्री.शिवगजे सर यांनी अनाधिकारे प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केल्या, या व इतर अनेक तक्रारींबाबत तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री.गमे साहेब यांचे समोर सुनावणी झाली. परंतु चौकशी अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समोर सादर झाला नसावा. त्यामुळे त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.	श्री.शिवगजे यांचेवर केलेल्या आरोपाबाबत श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.२१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/२०१५ दि.११ जून, २०१५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५ मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री.अनाप यांनी त्यांचे अर्जात अतिशय निराधारपणे संस्थाने प्रशासनावर बेछुटपणे आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
१५.	व्यवस्थापन समितीची सभा दि.०७/०८/२०१६, विषय नं.१९ प्रस्तावाचे अवलोकन करता असे आढळून येते की, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी परस्पर (संदर्भ जा.क्रं.एसएसएस-कन्या-कनिष्ठ/१०५३८, दि.०९/०९/२०१६) पत्रव्यवहार करून शाळेच्या नावात बदल केला. संस्थानचे प्रचालित पध्दतीनुसार विभागाचे नावात बदल करावयाचा असल्यास त्याबाबत प्रथम व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन त्यानंतर प्रशासनामार्फत कार्यालयीन आदेश पारित करून नावात बदल केला जातो. मात्र शाळेच्या नावात बदल करतेवेळी मा.व्यवस्थापन समितीची अथवा मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही. यावर असा निर्णय झाला की, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावात केलेला बदल रद्द करणेत येऊन त्या ऐवजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा बदल करणेस मान्यता देण्यात आली.	श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे नावतील बदलाबाबतची कार्यवाही तत्कालीन मुख्याध्यापिका यांचे कार्याकाळातील असून, त्यानंतर पुन्हा नव्याने नावात बदलाबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यवाही झालेली आहे.

पान नं.१३ वर..

73

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
११.	श्री.शिवगजे सर यांच्या सांगण्यावरून मुलांचे पैसे बँकेत भरले, याबाबत माझ्या दिनांक ०३/०४/२०२० रोजीचे खुलाशाबाबत मा.मुख्याध्यापक यांनी असा अभिप्राय दिला आहे की, त्या प्रकरणाची संस्थान प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी होऊन सदरचे प्रकरण सन – २०१७ मध्ये संपलेले आहे. महोदय, मी आपले निदर्शनास आणुन देतो की, श्री.शिवगजे सर यांचे विरूध्दच्या तक्रारी व प्रकरणाचा चौकशीचा फार्स/नाटक करण्यात आलेले आहे. त्या प्रकरणाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अंतिम निर्णय झालेले नाहीत. कदाचित त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी समोर सादर झाली नसावीत.	श्री.शिवगजे यांचेवर केलेल्या आरोपाबाबत श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनुसरुन कामगार विभागामार्फत दि.२१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/२०१५ दि.११ जून, २०१५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५ मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री.अनाप यांनी त्यांचे अर्जात अतिशय निराधारपणे संस्थाने प्रशासनावर बेछुटपणे आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
१२.	मा.मुख्याध्यापक यांनी अभिप्राय अहवालात माझ्यावर असा आरोप केली की, नोटीसीचा खुलासा परस्पर सादर केला. वस्तुस्थिती अशी आहे की, मी माझा खुलासा मुख्याध्यापकांना दाखवला होता.त्यांचे असे म्हणणे होते की, खुलाशातील काही विधाने वगळावीत, तरच ते खुलासा त्यांचेमार्फत पाठवतील. परंतु ती विधाने म्हणजे वस्तुस्थितीदर्शक व माझ्या बचावासाठी आवश्यक होती. त्यामुळे ती विधाने मजकूर मी वगळण्यास तयार नव्हतो तर त्या शिवाय मुख्याध्यापक माझ्या खुलाशावर स्वाक्षरी करणेस तयार नव्हते. परिणामी मला नाईलाजाने माझा खुलासा थेट सादर करावा लागला.	सदरचा आरोप अतिशय चुकीचा व बेछुट आहे. श्री.अनाप यांनी त्यांच खुलासा मला दाखविला नाही व माझा अभिप्राय न घेता परस्पर खुलासा सादर केलेला आहे. त्याची सत्यता पडताळणी करावयाची असल्यास त्यांनी सादर केलेल्या खुलाशामध्ये कुठेही मुख्याध्यापक यांचे मार्फत सादर असे म्हटलेले नाही, यावरुन सिद्ध होते की, श्री.अनाप हे अत्यंत खोटे कथन करुन प्रशासनाची व वरिष्ठांची दिशाभूल करत आहेत. तसेच आताही अपिल दाखल करतांनाही त्यांनी संस्थानचे प्रचलित पद्धतीने अर्ज करुन, प्रथम विभागप्रमुख यांचा अभिप्राय घेऊन अथवा त्यांचे मार्फत अपिल सादर करणे बंधनकारक असतांनाही त्यांनी पुन्हा वरिष्ठांचा अवमान करुन परस्पर अपिल दाखल केलेले आहे. व त्यामध्ये अत्यंत चुकीचे व खोटे कथन केलेले आहे.
१३.	सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ११ वी कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाले. श्री.वरघुडे सर यांनी दि.२७/०८/२०१८ पासून मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे.त्यापूर्वीचा इतिहास व घटना या बाबत श्री.वरघुडे सर अनभिज्ञ आहे. जावक नं.वशी १-१८९२ दि.०४/०७/२००८ अन्वये कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग व प्रयोगशाळा जिल्हा परिषदेच्या शाळेच्या नवीन इमारतीत स्थलांतरीत झाले. त्यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासन व नियंत्रण श्री.शिवगजे सर यांचेकडे सोपवण्यात आले. त्याचाच गैरफायदा/गैरवापर श्री.शिवगजे यांनी घेतला आहे. प्राचार्य किंवा उपप्राचार्य पद मिळावे यासाठी संस्थान दरबारी खोटे, चुकीचे रेकॉर्ड तयार केले. संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांना श्री.शिवगजे सर यांनी खोटी,चुकीची,अपुर्ण, दिशाभुल करणारी माहिती सादर केली. त्याबाबतची माहिती ज्यांनी वरिष्ठांना देण्याचा प्रयत्न केला त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा श्री.शिवगजे सरांनी प्रयत्न केलेला आहे. हे खालील घटनांवरून आपले निदर्शनास येईल.	श्री.अनाप यांनी केलेले गैरवर्तन व या मुद्यांचा काहीही संबंध नसतांना केवळ प्रशासनाची दिशाभूल करुन, विषयांतर करण्यासाठी श्री.अनाप यांनी खालील मुद्दे त्यांचे अपिलामध्ये समाविष्ठ केल्याचे दिसून येत आहे. श्री.शिवगजे यांना उपप्राचार्य पद देणे अथवा त्याचा प्रस्ताव ठेवेणे ही बाब सामान्य प्रशासन (आस्थापना विभाग) विभागाशी संबंधीत आहे. त्यामुळे याबाबत माझे स्पष्टीकरण देणे योग्य होणार नाही.

पान नं.१२ वर..

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
१६.	महोदय,श्री शिवगजे सर यांनी शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे सच मान्यतेसाठी (कार्यभार निश्चिती व पट पडताळणी) सादर केलेल्या प्रस्तावावर अनाधिकारे शाळेचे नाव बदलून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय अशी नोंद केली आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास न जुमानता सन २०१६-२०१७ च्या प्रस्तावात जुनेच नावाने (श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी) नोंद केली. तसेच प्राचार्य हे पद नसतांना श्री.शिवगजे सर यांनी अनाधिकारे सन २०१३-२०१४ च्या प्रस्तावात प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केली आहे.	शाळेच्या नावातील बदलाबाबत उपरोक्त मुद्दा क्र.१५ मध्ये नमुद केलेले आहे. जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८२९/२००८ दि.०४ जुलै, २००८ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील वर्ग व प्रयोगशाळा जि.पं.शाळेच्या नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आलेमुळे श्रीमती चव्हाणके, प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना ज्यू.कॉलेजचा दैनंदिन प्रशासन व नियंत्रण करणे शक्य नसल्याने त्यांचेकडील श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचा कार्यभार पुढील आदेश होईपावेतो श्री.विकास महादेव शिवगजे यांचेकडे तात्पुरता देण्यात आला आहे. सदर आदेशानुसार श्री.शिवगजे हे सन २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडील कामकाज पाहत होते. त्यानुसार त्यांनी प्राचार्य यांचे अनुपस्थितीत अथवा इतर तातडीची गरज म्हणून प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केली असेल, मात्र त्याबाबत शिक्षण उपसंचालक अथवा शैक्षणिक विभागाने काहीही आक्षेप घेतलेले नाहीत,

उपरोक्त अ.क्र.०१ ते १५ मुद्यांचे स्पष्टीकरण पाहाता खालील बाबी प्रकर्षाने दिसून येत आहेत.

१. श्री.अनाप यांनी केलेल्या अपिलामध्ये त्यांनी अत्यंत असत्य, अर्धसत्य, खोटे व निराधार असे कथन केलेले आहे.

२. श्री.अनाप यांनी त्यांचे गैरवर्तन रिपोर्ट व त्याबाबत त्यांचेवर ठेवण्यात आलेला ठपका यासंदर्भात मुद्यांचे आधारे अपिल करणे गरजेचे असतांना त्यांनी प्रशासनाची व वरिष्ठांचे दिशाभूल करण्यासाठी ते मुद्दे दुर्लक्षित करुन, सबंधीत प्रकारणाशी काहीही सबंध नसलेले मुद्दे नमुद केलेले आहेत. ज्या मुद्याबाबांत सर्व चौकशा पुर्ण होऊन कार्यवाही संपलेली आहे.

३. तसेच त्यांनी त्यांचे अपिलामध्ये वारंवार मुख्याध्यापक, माजी मुख्याध्यापिका, संस्थानचे वशी-शिस्त विभाग व प्रशासनावर अत्यंत निराधार व बेछुटपणे आरोप केलेले दिसून येते. श्री.अनाप हे नेहमीच जाणीवपुर्वक खोटे, निराधार अथवा अपु-या माहितीच्या आधारे वरिष्ठांवर, प्रशासनावर अशा प्रकारे आरोप करत असतात.

४. सहा.शिक्षक यांचेवर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी असतांना त्या गोष्टीकडे लक्ष न देता, ज्या गोष्टींशी त्यांचा काहीही सबंध नाही अशा संस्थानच्या प्रशासकीय कामकाजामध्ये लक्ष घालुन वरिष्ठांवर, प्रशासनावर नको ते आरोप करण्यात धन्यता मानतात.

५. तसेच त्यांनी सदरचे अपिल सादर करतांना मुख्याध्यापक यांचेमार्फत सादर न करता परस्पर सादर केलेले आहे, त्यामुळे तयांनी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३११९/२०१४ दि.०२ ऑक्टो., २०१४ चे परिपत्रकाचा पुन्हा अवमान केलेला आहे. ते नेहमीच अशा पद्धतीने वरिष्ठांचे आदेशांचा अवमान करत असतात. "असे म्हटलेले आहे

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

E) श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना संदर्भ क्रं.१ अन्वये ठपका हि शिक्षा करणेत आलेली होती.त्यांनी शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजी केलेल्या अपील अर्जात त्यांनी केलेले गैरशिस्तवर्तनाचा विषयास बगल देवुन, श्री.गंगाधर वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी व श्री.विकास महादेव शिवगजे,सहा.शिक्षक यांचेबद्दल कथन केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

१. श्री.अनाप यांनी दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, महोदय, व्यवस्थापन समिती यांनी अग्रेषित केलेले व प्रत माहितीसाठी कार्यवाहीसाठी सविनय सादर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब अशा दोन प्रती इकडील आवक विभागास दिलेल्या आहेत.श्री.अनाप यांचा दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना उपरोक्त संदर्भ क्रं.३ अन्वये पत्र पाठविणेत आलेले होते. त्यानुसार प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दि.२८.०७.२०२० रोजीचा स्वयंस्पष्ट अहवाल इकडील कार्यालयास पाठविलेला आहे.त्यात त्यांनी," श्री.अनाप यांनी केलेल्या अपिलामध्ये त्यांनी अत्यंत असत्य, अर्धसत्य, खोटे व निराधार असे कथन केलेले आहे.

पान नं.१४ वर..

२. श्री.अनाप यांनी त्यांचे गैरवर्तन रिपोर्ट व त्याबाबत त्यांचेवर ठेवण्यात आलेला ठपका यासंदर्भात मुद्यांचे आधारे अपिल करणे गरजेचे असतांना त्यांनी प्रशासनाची व वरिष्ठांचे दिशाभूल करण्यासाठी ते मुद्दे दुर्लक्षित करुन, सबंधीत प्रकारणाशी काहीही सबंध नसलेले मुद्दे नमुद केलेले आहेत. ज्या मुद्याबाबांत सर्व चौकशा पुर्ण होऊन कार्यवाही संपलेली आहे.

३. तसेच त्यांनी त्यांचे अपिलामध्ये वारंवार मुख्याध्यापक, मांजी मुख्याध्यापिका, संस्थानचे वशी-शिस्त विभाग व प्रशासनावर अत्यंत निराधार व बेछुटपणे आरोप केलेले दिसून येते. श्री.अनाप हे नेहमीच जाणीवपुर्वक खोटे, निराधार अथवा अपु-या माहितीच्या आधारे वरिष्ठांवर, प्रशासनावर अशा प्रकारे आरोप करत असतात.

४. सहा.शिक्षक यांचेवर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी असतांना त्या गोष्टीकडे लक्ष न देता, ज्या गोष्टींशी त्यांचा काहीही सबंध नाही अशा संस्थानच्या प्रशासकीय कामकाजामध्ये लक्ष घालुन वरिष्ठांवर, प्रशासनावर नको ते आरोप करण्यात धन्यता मानतात.

५. तसेच त्यांनी सदरचे अपिल सादर करतांना मुख्याध्यापक यांचेमार्फत सादर न करता परस्पर सादर केलेले आहे, त्यामुळे तयांनी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३११९/२०१४ दि.०२ ऑक्टो., २०१४ चे परिपत्रकाचा पुन्हा अवमान केलेला आहे. ते नेहमीच अशा पद्धतीने वरिष्ठांचे आदेशांचा अवमान करत असतात. "असे म्हटलेले आहे

सबब, श्री.अनाप यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार, शिक्षा म्हणून त्यांचेवर "ठपका" ठेवणेत येतो की, यापुढे त्यांचेकडून उपरोक्त प्रमाणे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी असे उपरोक्त संदर्भ क्रं.१ चे शिक्षेचे पत्र देण्यात आले.

त्यानंतर श्री.अनाप यांनी उपरोक्त करणेत आलेली शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेला होता.सदरचे अर्जातील कथनाबाबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचा स्वयंस्पष्ट अहवाल मागविणेत आलेला आहे.

श्री.अनाप यांचे अपील अर्जातील कथनाबाबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे अहवालाचे अवलोकन करता त्यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत करणेत आलेली "ठपका"ही शिक्षा कायम करावी, असे मत आहे.

तरी श्री.अनाप यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार,उपरोक्त गैरशिस्तवत्रनाबाबत करणेत आलेली शिक्षा म्हणून त्यांचेवर "ठपका"ठेवणेत आलेली शिक्षा रद्द करावी किंवा त्यांना करणेत आलेली शिक्षा कायम करावी याबाबत सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर करणेकरीता वरिष्ठांना समोर ठेवलेला होता.

सदरचे प्रस्तावावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,"Dy.CEO – ना.से.नि.शिस्त व अपिल तरतुदी काय आहेत ? तपासून सादर करावे."असे निर्देश दिलेले होते.

दि.०१.०१.२०१५ पासुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा विनीयम लागु करणेत आलेले आहेत. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ५ अपिले उपविनीयम १७ नुसार प्रत्येक अपील थेट समितीकडे दाखल करणे आवश्यक आहे. त्यानुसार श्री.अनाप यांनी उपरोक्त करणेत आलेली शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेला होता. श्री.अनाप यांना "ठपका"ठेवणेत आलेली शिक्षा रद्द करावी किंवा त्यांना करणेत आलेली शिक्षा कायम करावी याबाबत सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

18/9/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

GA-meeting-201-2020

11/9/2020

11/9/2020

विषय क्र.- १४

76

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल),वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे दिनांक १२.११.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत...

टिपणी

श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल),वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे गैरशिस्त वर्तन खातेचौकशी अहवालात दोषी आढळुन आल्याने त्यांना जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/१३८५/२०२० दि.०२.११.२०२० रोजीचे आदेशान्वये त्यांना खालील अ.नं.१,२,३ प्रमाणे शिक्षा करणेत आलेली आहे.

१) श्री.अमृत गंगाधर जगताप यांनी उपरोक्त अभिकथन पत्र व पुरवणी अभिकथन पत्रा प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (३) (त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.) अन्वये त्यांचेकडुन संस्थानचे RTO कार्यालयास दंडापोटी भरण्यात आलेली रक्कम रुपये १,४८,९०६/- मात्र त्यांचे मासिक वेतनातुन २४ (चोवीस) समान हफ्त्यात वसुल करणेत येत आहे.

२) श्री.अमृत जगताप यांचा दि.१२.०४.२०१७ ते दि.१२.०५.२०१७ अखेरचा कालावधी हा निलंबन कालावधी म्हणून गृहीत धरण्यात येत आहे.

३) श्री.अमृत जगताप यांना उपरोक्त अभिकथन पत्र व पुरवणी अभिकथन पत्रा प्रमाणे केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) नुसार श्री.जगताप यांची सन २०२१ या एक वर्षाची वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी करीता थांबविणे, हि शिक्षा देण्यात येत आहे. सन २०२१ ची वेतनवाढ रोखून धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परीणामकारक होणार आहे. श्री.जगताप यांची सन २०२१ ची एक वेतनवाढ कायम स्वरुपी रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.१२.११.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

श्री.जगताप यांनी सदरचे अपील अर्जात जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/१३८५/२०२० दि.०२.११.२०२० रोजीचे आदेशान्वये त्यांना उपरोक्त अ.नं.१,२,३ प्रमाणे शिक्षा करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

अ) श्री.अमृत जगताप यांचा दि.१२.११.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबतचा प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि.०९.०१.२०२१ रोजी स्वाक्षरी झालेवर लगेच सभा कामकाज विभागाकडे दि.११.०१.२०२१ रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर निर्णय होणकरीता सादर करणेत आलेला होता. परंतू बराचा कालावधी होऊन गेला तरी देखील मा.तदर्थ समितीची सभेसमोर श्री.जगताप यांचे अर्जावर निर्णय झालेला नाही.

आ) तदनंतर वरिष्ठांचे निर्देशानुसार श्री. जगताप यांचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर चक्रीय पध्दतीने दि.१६.०३.२०२१ रोजी सादर करणेत आलेला होता.

सदरचे प्रस्तावर मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वाक्षरीने जा.नं. आस्था/१८३/२०२१ दि.२४.०५.२०२१ रोजीचे पत्रासोबत श्री.जगताप यांचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे. सदरचे पत्रात," अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत. " असे नमुद आहे.

श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल),वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांना वरील १,२,३ अन्वये शिक्षा करण्यात आलेल्या आहेत. सदर शिक्षांबाबत श्री.अमृत जगताप यांनी केलेल्या अपिल अर्जानुसार निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

12/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- १५

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय विषय:- श्री.भारत एकनाथ सोनवणे,(सध्या सेवा निलंबीत) वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत...

टिपणी

अ) विषयाची पुर्वपिठीका-

श्री. भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-०४ कर्मचारी,श्री साई प्रसादालय विभाग यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले आहे.

श्री.सोनवणे हे श्री साई प्रसादालय विभागात वर्ग-०४ कर्मचारी म्हणुन कार्यरत आहेत. त्यांचे गंभीर गैरशिस्तवर्तनाबाबत संदर्भ क्रं.०१ ची टिपणी सादर केलेली असुन, त्यात १) श्री.धोडीराम ठोंबरे,श्री.राजाराम सावळे, लिपीक टंकलेखक यांचा दि.२०.१२.२०१९ रोजीचा तक्रार अर्ज,२) श्री.सुशांत वाघ, कार्यालयीन स्थायी कर्मचारी यांचा दि.२०.१२.२०१९ रोजीचा तक्रार अर्ज,३) श्री.भैय्या शेख, श्री.निवृत्ती देवकर, हॉल मुकादम,४) श्री.दिनकर गायकवाड, श्री.संदीप निर्मळ, सुरक्षा रक्षक यांनी तक्रार अर्ज दिलेले आहेत.

त्यानुसार त्यांचेबाबत साई प्रसादालय विभागाने संदर्भ क्रं.०१ ची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली आहे. सदरचे टिपणीवर प्रशासकिय अधिकारी यांनी, कडक समज देण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत. तसेच प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,त्यांचेवर यापूर्वी केलेल्या कारवाईचा तपशिल सादर करा,असे निर्देश दिलेले होते.

त्यांची संस्थान सेवेत दि.०४.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	लेखी समज	२
०२	ताकीद	५
०३	ठपका	४
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	११

श्री.सोनवणे यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ११ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री.सोनवणे यांचे गंभीर गैरशिस्त वर्तनाबद्दल संदर्भ क्रं.०३ अन्वये टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर त्यांना निलंबनाची नोटीस बजवावी असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिलेले आहे.

श्री.सोनवणे यांनी श्री साई प्रसादालय विभागाकडील/२३०/२०१९ दि.२१.१२.२०१९ रोजीचे टिपणीत नमुद केलेप्रमाणे गंभीर स्वरुपाचे गैरशिस्तवर्तन केलेले आहे. त्यांना निलंबनाचे नोटीसीसोबत दि.२१.१२.२०१९ रोजीचे टिपणीची छायांकित प्रत पाठविणेत आलेली होती.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.सोनवणे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२२३ /२०२०, दि.०७.०१.२०२० अन्वये संस्थान सेवेतुन निलंबीत का करणेत येऊ नये अशा आशयची कारणे दाखवा नोटीस काढून,त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. श्री.सोनवणे यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.०७.०१.२०२० रोजी बजाविणेत आलेली होती.त्यास अनुसरुन त्यांनी दि.११.०१.२०२० रोजीचा लेखी खुलासा प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांचेमार्फत सादर न करता रजिष्टर पोष्ट ए.डी.ने सामान्य प्रशासनाचे आवक विभागास सादर केलेला आहे.श्री.सोनवणे यांचे गैरशिस्तवर्तनाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

पान नंबर २ वर...

अ.नं.	गैरशिस्त वर्तनाचा तपशिल	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३
०१.	प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य :- (१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :- (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल. (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ; (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.	कलम ३ (१)

श्री.भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-०४ कर्मचारी,श्री साई प्रसादालय विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य न करणे इत्यादीचे उल्लंघन केलेले आहे. श्री.सोनवणे यांच्या शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत ११ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या असुन त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने, त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.०३.२०२० रोजीचे निर्णय क्रं.१७४ नुसार तात्काळ संस्थानचे सेवेतुन जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६३/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०८.०६.२०२० पासुन " सेवानिलंबीत" करण्यात आलेले आहे.

श्री.भारत सोनवणे यांना सेवा निलंबन कालावधीत श्री सांईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देणेत येत आहे.

तसेच त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६४/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे त्यांना अभिकथनपत्र बजाविण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६५/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.श्री.देशमुख यांनी दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल इकडील कार्यालयास सामान्य प्रशासन शाखा, आवक विभाग ८१८० दि.०७.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

ब) खातेचौकशी अहवाल-निर्णयासाठी मुद्दे, पुराव्याचे मूल्यमापन :-

श्री.ए.एम. देशमुख,नाशिक, चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे काढलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या अधिनस्त असलेले श्री साई मंदिर हे भारतातीलच नव्हे तर जगभरातील साईभक्तांचे श्रध्दास्थान असल्याने येथे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची सतत गर्दी असते. मंदिर परिसर खूप मोठा असल्याने व भाविकांची खूप गर्दी असल्याने संस्थानने भक्तांसाठी येथे खूप सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थान परिसरामध्ये एकाच वेंळी हजारो अनेक भक्तांची साई दर्शनासाठी सतत रीघ लागलेली असते. दर्शनानंतर सर्व भक्ताना प्रसाद घ्यावयाचा असतो. त्यासाठीही संस्थानने प्रसादासाठी साई प्रसादालय नावाचे मोठे भोजनगृह बांधलेले आहे. यासाठी संस्थानचा एक स्वतंत्र विभाग कार्यरत असून या विभागात भोजन प्रसाद याची निर्मिती व भक्ताना तो वाढणे व अन्य अनुषंगिक सेवा अशी कामे केली जातात. अशा या साई प्रसादालय विभागात श्री भारत एकनाथ सोनवणे हे वर्ग ४ कर्मचारी म्हणून कार्यरत होते. येथे काम करीत असताना त्यांच्याकडे साई भक्ताना भोजन सेवा देण्याची डयूटी देण्यात आलेली होती. तेथे या डयूटीवर कार्यरत असताना त्यानी सोपविलेल्या जबाबदारीचे पालन केले नाही, असे कार्यालयाचे मत झालेले दिसते.

पान नंबर ३ वर...

ते प्रसादालयात काम करीत असताना त्यांचे सहकारी व वरिष्ठ यांनी त्यांचेबाबत प्रशासनाकडे लेखी तक्रार अर्ज दाखल केले व त्यामुळे साई प्रसादालय विभागाने प्रशासनास टिप्पणी सादर केली. त्यात, त्याना साईभक्ताना भोजन वाढण्याचे व तदनुषंगिक कामे दिलेली असताना त्यानी कधीही प्रामाणिकपणे काम केलेले नाही व ते त्यांचे सहका-याबरोबर व साईभक्तांबरोबर सुध्दा वाद घालत असतात असे म्हटले आहे. तसेच ते विनापरवना गैरहजर राहतात, आल्यावर कर्मचा-यांच्या अंगावर रजेचा अर्ज फेकतात व वरिष्ठांशी अरेरावी करतात. तसेच वाढपी कर्मचा-यानी दाढी, डोक्याचे केस व नखे काढणे, ॲप्रन घालणे व टोपी घालणे बंधनकारक असताना ते न घालता जाब विचारताच अरेरावीची उत्तरे दिलेली आहेत.

तसेच, या दोषारोपपत्रापूर्वीही त्याना सन २०१६ पासून एकुण ११ वेळा कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात येऊन तेवढयाचवेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत. एवढया वेळा केलेल्या शिक्षेवरुन अपचारी यानी त्यातून कोणताही धडा घेतलेला नाही असे दिसते दोषारोपपत्रातील दोषारोपावरुन दिसून येते.

सदर विभागीय चौकशीमध्ये शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने बजावलेल्या दोषारोपपत्रावरुन त्यातील दोषारोपांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. दोषारोप पत्रासोबतचे दस्तावेज, साक्षीदारांच्या साक्षी, सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम टाचण व अपचारी यांचे बचावाची व अंति निवेदने यांचा विचार केल्यानंतर निर्णयासाठी खालील मुद्यांचा उहापोह करण्यात येत आहे.

१) अपचारी हे वर्ग ४ कर्मचारी आहेत व मंदिर परिसरातील प्रसादालय येथे साई भक्तांना भोजन सेवा देणे व तदनुषंगिक कामे करणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

२) आपला बचाव करताना त्यानी असे म्हटले आहे की "त्यांचेविरुध्द ज्या कर्मचा-यानी लेखी तक्रारी केल्या आहेत, ते तक्रार अर्ज अभिकथनाच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट केलेले नाहीत. तसेच, त्याना यापुर्वी ज्या शिक्षा झालेल्या आहेत त्याबाबतचे आदेश परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट केलेले आहेत ते चुकीचे आहे. कारण त्याबाबत त्याना त्या आदेशानूसार त्यावेळी शिक्षा झालेल्या असल्याने ते विषय त्याचवेळी संपलेले असताना आता पुन्हा त्या आदेशांचा शाबीत करण्याच्या कागदपत्रात समावेश करणे बरोबर नाही. त्यामुळे त्यांची काहीही चूक झालेली नसून आरोप त्याना मान्य नाहीत. तसेच हे तक्रार अर्ज चौकशीच्या कागदपत्रात समाविष्ट नसल्याने व साक्षीदारानीही हे कबूल केलेले असलेमुळे ती कागदपत्रे शाबीत झालेली नाहीत"

३) दोषारोपपत्राच्या परिशिष्ट ब मधील कागदपत्रे पाहिली असता असे दिसते की, त्यातील बरीचशी कागदपत्रे अपचारी याना केलेल्या शिक्षेच्या आदेशाच्या प्रती आहेत. अपचारी यांची नियुक्ती दि.०४/१२/२०१६ रोजी वर्ग ४ कर्मचारी म्हणून करण्यात आलेली आहे. त्यानंतर आजतागायत आपल्या सेवाकालात अनेकवेळा गैरवर्तन केल्याचे आढळून आलेले असून त्याना आतपर्यंत २ वेळा लेखी समज, ५ वेळा ताकीद व ४ वेळा ठपका अशी ११ वेळा शिक्षा करण्यात आलेली आहे.

येणेप्रमाणे अपचारी याना सन २०१६ पासून चार वर्षात एकुण ११ वेळेस शिक्षा झालेल्या दिसून येतात.

एवढया वेळेस गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेल्या असताना व सन २०२० मध्ये, म्हणजे आता, त्यानी पुन्हा त्याच प्रकारचे गैरवर्तन केल्याचे दिसून येते व त्याबदद्ल आता विभागीय चौकशी होत आहे ही गंभीर बाब आहे.

पान नंबर ४ वर...

४) अशा प्रकरणी अपचारी बचावाचा असा मुद्दा उपस्थित करतात की, एकदा शिक्षा झाल्यावर ती कागदपत्रे दुस-या आरोपासाठी वापरल्यास ती मान्य करण्यात येऊ नयेत. मात्र बचावाचा हा मुद्दा मान्य करता येत नाही. एकतर पुर्वी केलेल्या गैरवर्तनावरुन त्याना ज्या शिक्षा वेळोवेळी झाल्या त्यावेळी विभागीय/खाते चौकशी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे अशी चौकशी करताना पुर्वी झालेल्या शिक्षेचा संदर्भ देणे हे उचित समजले जावे. प्रस्तुत प्रकरणातील गैरवर्तनाचे गांभीर्य हे पुर्वी केलेल्या शिक्षेच्या पार्श्वभुमीवर तपासून पाहणेही योग्यच आहे. न्यायालयात दाखल गुन्हे, वाहतुक नियमा संबंधीचे गुन्हे इ. गुन्हयांचे गांभीर्य ठरवताना पुर्वी कोणते गुन्हे केले व किती वेळा केले हे जाणून घेणे शिक्षा करणा-या अभिकरणास माहीत करुन घेणे जसे आवश्यक असते, तसेच, ते विभागीय/खाते चौकशीत सुध्दा गरजेचे आहे. त्यामुळे हा बचाव मान्य होऊ शकत नाही.

५) प्रस्तुत प्रकरणात तर अपचारी यानी बचाव करताना त्यानी त्यांचे सहकारी कर्मचारी असलेले साक्षीदार यांच्या उलट तपासणीत पुढील मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात.

काही बाबी अभिकथनपत्राच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नाहीत. जसे, १) कर्मचा-यानी केलेल्या तक्रारी २) तक्रारदार कर्मचा-यानी केलेल्या तक्रारीबाबतचे तपशील व त्यासंबंधीचे कागदोपत्री पुरावे ३) तक्रार अर्जातील तक्रारीबाबत त्यांचे कथनाव्यतिरिक्त कोणताही पुरावा जोडलेला नाही. याबाबत असे म्हणता येईलकी,

साक्षीदार यानी उलटतपासणीत उत्तरे दिलेली आहेत की, या तक्रारी कार्यालयात आहेत. त्याचप्रमाणे सर्व साक्षीदारानी अभिकथनात वर्णन करण्यात आलेल्या व तक्रारीत समाविष्ट असलेल्या गैरवर्तनास दुजोरा देणा-या साक्षी दिलेल्या आहेत.

तसेच, वरिष्ठ व सहकारी कर्मचारी साक्षीदार यानी केलेल्या अपचारी यांच्याबाबत केलेल्या तक्रारीतील घटनांबाबत त्याना उलटतपासणीत प्रश्न विचारुन अपचारी याना बचाव करता येऊ शकला असता. मात्र अपचारी यानी या साक्षीदाराना त्यानी तक्रारीत वर्णन केलेल्या घटनांबाबत उलटतपासणीत कोणतेही प्रश्न विचालेले नाहीत. उलटतपासणीतील त्यांच्या प्रश्नांचा भर हा तक्रारींचे कागदोपत्री पुरावे आहेत का व ती कागदपत्रे अभिकथनाच्या परिशिष्टामध्ये समाविष्ट आहेत का यावरच होता. तसेच, बचावाच्या निवेदनातही याच मुद्यावर त्यानी भर दिलेला दिसून येतो. यावरुन अपचारी हे केवळ कथित तांत्रिक त्रुटीवर बोट ठेवून बचाव करीत आहेत असे दिसते.

६) अशाप्रकारे कथित तांत्रिक त्रुटीवर बोट ठेवून बचाव करीत असताना त्यांच्या सहकारी व वरिष्ठ साक्षीदारांनी त्यांच्या गैरवर्तनाबाबतच्या घटनांबाबत बचाव करताना अपचारी यानी या सर्व साक्षीदारांचे त्याचेबाबत काही पुर्व वैमनस्य आहे किंवा कसे व त्यानी त्याचा सूड उगविण्यासाठी त्यांचेविरुध्द कुभांड रचून तक्रारी दाखल केल्या आहेत किंवा कसे याबाबत अशा प्रकारचेही कुठले प्रतिपादन बचावात अपचारी यानी केलेले दिसून येत नाही.त्यामुळे अपचारी यांच्या बचावातून असा अर्थ निघतो की, "तक्रारी कदाचित खऱ्या असू शकतील पण त्या कागदपत्रत समाविष्ट नाहीत म्हणून त्या ग्राहयनाहीत."

पण त्या तक्रारी खोटया आहेत असे त्यावरुन सिध्द होऊ शकत नाही.

७) तसेच, अपचारी यानी आणखी एक असा आरोप केला आहे की, "सादरकर्ता अधिकारी यानी साक्षीदारांची केलेली सरतपासणी त्यांचे समोर केलेली नसून त्यानी त्यावर आमचेकडून नंतर सहया घेतलेल्या आहेत." यासाठी मात्र त्यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. अथवा त्याबाबत त्याच वेळी अर्ज करुन किंवा सही करण्यापुर्वी त्याच ठिकाणी ही बाब नोंदवता आली असती. मात्र त्यानी केलेले नाही. तसेच, समजा, ते म्हणतात ते खरे आहे असे जरी मानले , तरी त्या सरतपासणीतील जे प्रश्न व त्यांची उत्तरे त्याना आक्षेपार्ह वाटत असतील तर त्याबाबत उलटतपासणीत साक्षीदारानी प्रश्न विचारता आले असते. परंतु त्यानी तसेही काही केलेले नाही. किंबहुना सादरकर्ता अधिकारी यानी सरतपासणीत साक्षीदारानी विचारलेल्या बहुतेक प्रश्न व त्यांच्या उत्तराबाबत साक्षीदारांच्या अपचारी यानी घेतलेल्या उलटतपासणीत कोणतेही प्रश्न विचारलेले नाहीत. त्यामुळे त्यांचा हा बचाव मान्य करता येण्यासारखा नाही.

पान नंबर ५ वर...

८) वरील विवेचनावरुन असे म्हणता येईल की,

विभागीय चौकशीदरम्यान काही बाबी अभिकथनपत्रांच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नसणे जसे, कर्मचा-यांच्या तक्रारी याव अशा स्वरुपाच्या तांत्रिक त्रुटी असलेल्या मुद्यांचा अपचा-यास advantage देणे योग्य ठरणार नाही. याचे कारण असे की, विभागीय चौकशीत हे मुद्दे अगदी तावून सुलाखून सिध्द करवून घेणे आवश्यक नाही.

याबाबत सर्वोच्च न्यायालयांच्या अनेक निकालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की,

Standard of proof required in criminal case and that of Departmental enquiry are different. In criminal case, evidence has to be verified from various angels in order to prove a criminal case beyond doubt. Whereas in Departmental enquiry standard of proof has to be fixed based on Preponderence of Probability.

९) यावरुन असे स्पष्ट होते की, तक्रारदारानी केलेल्या तक्रार अर्जातील तक्रारी हया सकृत दर्शनी घडलेल्या आहेत अथवा नाही याची चौकशीच्या सुनावणीत शहानिशा करण्यात आली तर ती घटना/त्या घटना घडलेल्या आहेत असे गृहीत धरणे आवश्यक आहे. जर सर्व तक्रारदारानी केलेल्या तक्रारीतील तथ्ये खोटी पाडावयाची असतील तर ती संधी अपचारी यांना, बचाव निवेदनाचे वेळी, उलटतपासणीत तसेच अंतिम निवेदनात देण्यात आलेली आहे. मात्र अपचारी व त्याचे बचाव सहायक तक्रारदारानी केलेल्या तक्रारी प्रत्यक्षात घडलेल्या नाहीत हे सिध्द करण्याबाबत कोणतेही प्रतिपादन/बचाव केलेला दिसून येत नाही. केवळ तक्रार अर्ज चौकशीचे कागदपत्रात समाविष्ट नाहीत एवढयाच तांत्रिक कथित त्रुटीकडे तें लक्ष वेधतात. त्यामुळे तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीतील घटना घडलेल्याच नाहीत असे कोठेही त्यानी दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला नसल्याने व सर्व साक्षीदारानी त्याबाबत साक्षीत दुजोरा दिलेला असल्यामुळे त्या घटना घडलेल्या आहेत असे स्पष्ट होते.

१०) तसेच, अपचारी यांचेकडून प्रत्येक वेळी शिक्षा होताना चूक कबूल करुन अथवा नाकबूल करुन पुन्हा त्याचप्रकारचे गैरवर्तन होताना दिसत आहे. यावरुन त्यांची सेवा व त्या बजावताना त्यांचेकडून होत असलेले गैरवर्तन याबाबत ते अजिबात गंभीर नाहीत असे दिसून येते.

११) दरवर्षी गैरवर्तन करणे ही अत्यंत गंभीर बाब समजण्यात आली पाहिजे. प्रत्येकवेळी केलेली शिक्षा गुपचूप सहन करुन पुन्हा लगेचच गैरवर्तन करण्यास अपचारी निर्ढावलेले दिसून येतात.

१२) अपचारी यानी त्यांचे अंतिम निवेदनात म्हटले आहे की, "निलंबन कालावधीत दररोज कार्यालयात येऊन स्वाक्षरी करणे ही बाब अन्यायकारक आहे." याबाबत असे म्हणता येईल की, ही बाब विभागीय चौकशीच्या कक्षेतील नाही. त्यामुळे त्याबाबत काही मत व्यक्त करणे उचित होणार नाही.

१३) **निर्णय:**

वरील १ ते १२ मुद्दयांचा विचार करता चौकशी अधिकारी या निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत की, <u>दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप सिध्द होत आहेत.</u>

पान नंबर ६ वर...

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्यांच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्यांच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

श्री.भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गंभीर गैरशिस्तवर्तवतनाबाबतचा प्रस्ताव दि.०४.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती निर्णय क्रं.१७४ अन्वये त्यांना उपरोक्त क्रं.२ अन्वये तात्काळ संस्थान सेवेतुन निलंबीत करणेत आले. श्री.सोनवणे यांना उपरोक्त संदर्भ क्रं.३ अन्वये अभिकथनपत्र व संदर्भ क्रं.४ अन्वये खातेचौकशी अधिकारी यांना आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री.सोनवणे यांना संदर्भ क्रं.२ अन्वये दि.०८.०६.२०२० पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले असुन तीन महिन्यात खातेचौकशी पुर्ण होवुन अहवाल प्रशासनास प्राप्त होणे आवश्यक होते. सदरची मुदत दि.०७.०९.२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.परंतु श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांना कोराणा संसर्ग या आजाराचे गांभीर्य विचारात घेता जिल्हाबंदी असल्याने ते शिर्डी – नाशिक येथे ये-जा करु शकलेले नाही. त्यामुळे खाते चौकशी आदेश प्राप्त होवुन देखील चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण होवु शकली नाही. तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१०७६/२०२० दि.०९.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०७.०९.२०२० पासुन पुढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली होती.

पान नंबर ७ वर...

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, चौकशी अधिकारी यांनी श्री.सोनवणे खातेचौकशी पुर्ण करुन दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल सादर केलेला असुन, त्यात त्यांनी," **दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप श्री. सोनवणे यांचेवर सिध्द होत आहेत.**" असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

उपरोक्त अ चे अवलोकन करता श्री.सोनबणे हे उपरोक्त अभिकथनपत्रामध्ये नमुद केलेल्या आरोपात दोषी आढळून आलेले असल्याने व त्यांचे सेवेचा पुर्वइतिहास तसेच गैरवर्तनाचे स्वरुप पहाता त्यांना यापुर्वी ११ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

१) श्री.सोनवणे यांचा दि.०८.०६.२०२० ते कामावर हजर/रुजु करुन घेणेपर्यंतचा कालावधी निलंबन कालावधी गृहीत धरता येईल.

२) श्री.भारत एकनाथ सोनवणे,वर्ग-०४ कर्मचारी (सध्या सेवा निलंबीत),श्री साईप्रसादालय विभाग यांना उपरोक्त अ प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना कामावर हजर/रुजु करुन घेऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा त्यांना देता येईल, असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

16/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

16/12/2020

Meeting-344/2020

विषय क्र.- ९६

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय:- श्री.संजय रामदास राऊत, (सध्या सेवा निलंबीत) वर्ग-०४ कर्मचारी, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत...

टिपणी

(अ) विषयाची पुर्वपिठीका-

१) श्री.राऊत यांची दि.०५.०२.२०२० रोजी सकाळी १० वा. ते सायं. ६ वा. पर्यंत जनरल डयुटी द्वारावती भक्तनिवास येथे लाडु प्रसाद वितरण काऊंटर येथे नेमण्यात आली होती.ते डयुटीवर असतांना दुपारी ३.३० वा.परस्पर कोणासही पुर्वकल्पना न देता अथवा कार्यालयातील हालचाल रजिष्टरला नोंद न करता डयुटीवरुन निघुन गेलांत. त्यामुळे सदरचे कालावधीत मिडीया/वार्ताहर यांनी सदर काऊंटर बंद असल्याची व्हीडीओ शुटींग काढुन त्यांचे स्तरावरुन श्री.राऊत यांना विचारणा केली आहे. तसेच द्वारावती येथे वास्तव्यास असलेल्या साईभक्तांनी सदरचे कालावधीत लाडु प्रसाद न मिळाल्याने त्यांनी प्र. अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग यांचेकडे तक्रार केली आहे.लाडु प्रसाद वितरण काऊंटर कर्मचारी नसलेबाबत द्वारावती विभागातील कर्मचारी यांनी दुरध्वनी मार्फत संपर्क करुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभागास कळविले आहे. त्यानुसार त्यांना दुपारी ४.२० वा.दुरध्वनीवर संपर्क केला असता त्यांनी उडवा-उडवीचे उत्तर देवुन फोन बंद करुन संपर्क खंडीत केलेला आहे.

श्री.राऊत यांचे हलगर्जीपणामुळे लाडु प्रसाद उपलब्ध असुन साईभक्तांना मिळण्यास उशिर झाला,त्यामुळे साईभक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच संस्थानची मिडीयाद्वारेही बदनामी झाली आहे. तसेच ते वारंवार गैरवर्तन करत आहेत याबाबत त्यांचे रिपोर्टही केलेले आहे.

२) श्री.राऊत हे दैनंदीन डयुटीवर आल्यावर फींगर प्रिंट पंचीग करत नाही.याबाबत अहवाल दरमहा सादर केला जातो.

३) श्री.राऊत हे डयुटीवर असुन देखील हजेरी मस्टरला ३-४ दिवस स्वाक्षरी करत नाहीत, त्यांना स्वाक्षरी करणेबाबत लेखी/तोंडी सुचना देवुनही स्वाक्षरी करत नाही.

४) श्री.राऊत हे अचानक रजा घेतात व रजा उपभोगुन आल्यानंतर रजा अर्ज मागणी केल्यानंतर अर्ज भरुन देतात. असे त्यांचे विरुध्द प्र. अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग यांचे निवेदन आलेले आहे. श्री.राऊत यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर स्वरुपाचे वर्तनात मोडते.

उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.राऊत यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२५३१/२०२० दि.११-०२-२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्याचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. तथापी, श्री.राऊत यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१५.०२.२०२० रोजी प्राप्त होवुन देखिल,त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन येते.

तदनंतर श्री.राऊत यांनी उशिराने दि.२५.०२.२०२० रोजीचा लेखी खुलासा सात दिवसात सादर करणेऐवजी सात दिवसाचे नंतर (१० दिवस) उशिराने दि.०३.०३.२०२० रोजी प्र.अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती यांचेकडे सादर केलेला आहे.

प्र.अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती यांनी सदरचे लेखी खुलाशासी मी सहमत नाही.सदर खुलासा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर असा अभिप्राय नोंदविला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) **संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.**

(ii) **सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;**

(iii) **संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.**

पान नं. २ वर...

श्री.संजय रामदास राऊत, वर्ग-०४ कर्मचारी, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य न करणे इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे. श्री.राऊत यांच्या शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत १९ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या असुन त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने, त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.०३.२०२० रोजीचे निर्णय क्रं.१७५ नुसार तात्काळ संस्थानचे सेवेतुन जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६०/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०८.०६.२०२० पासुन " सेवानिलंबीत" करण्यात आलेले आहे.

श्री. संजय राऊत यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देणेत येत आहे.

तसेच उपरोक्त जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६१/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये त्यांना अभिकथनपत्र बजाविण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६२/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. श्री.देशमुख यांनी दि.३०.११.२०२० रोजीचा श्री.राऊत यांचा खातेचौकशी अहवाल इकडील कार्यालयास सामान्य प्रशासन शाखा, आवक विभाग ८१६१ दि.०७.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

श्री.राऊत यांची संस्थान सेवेत दि.०७.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	एक दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत	०१
०२	ताकीद	०९
०३	सक्त ताकीद	०४
०४	सुचना	०१
०५	लेखी समज	०१
०६	ठपका	०३
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	१९

श्री.राऊत यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण १९ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे.

ब) खातेचौकशी अहवाल-निर्णयासाठी मुद्दे, पुराव्याचे मूल्यमापन :-

श्री.ए.एम. देशमुख,नाशिक, चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे काढलेले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या अधिनस्त असलेले श्री साई मंदिर हे भारतातीलच नव्हे तर जगभरातील साईभक्तांचे श्रध्दास्थान असल्याने येथे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची सतत गर्दी असते. मंदिर परिसर खूप मोठा असल्याने व भाविकांची खूप गर्दी असल्याने संस्थानने भक्तांसाठी येथे खूप सोयी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थान परिसरामध्ये एकांच वेळी हजारो अनेक भक्तांची साई दर्शनासाठी सतत रीघ लागलेली असते. दर्शनानंतर सर्व भक्ताना प्रसाद घ्यावयाचा असतो. त्यासाठीही संस्थानने प्रसादासाठी साई प्रसादालय नावाचे मोठे भोजनगृह बांधलेले आहे. तसेच लाडू व बर्फी प्रसाद घ्यावयाचा असतो.त्यासाठीही संस्थानने प्रसादासाठी भोजनगृह बांधलेले आहे. तसेच लाडू व बर्फी प्रसाद आकर्षक पॅकिंगमध्ये वाजवी किमत घेऊन जाऊ शकतात.यासाठी संस्थानचा एक स्वतंत्र विभाग कार्यरत असून या विभागात लाडू व प्रसादाची निर्मिती व वितरण अशी दुहेरी कामे आहेत. वितरण व्यवस्थेसाठी संस्थान परिसरातच काही काऊंटर ठेवलेले आहेत. भक्तांच्या दर्शन कालावधीत ती काऊंटर्स सतत उघडी ठेवण्यात येतात, जेणेकरुन भक्ताना प्रसाद मिळावा.

पान नं. ३ वर...

अशा या लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागात श्री.संजय रामदास राऊत हे मदतनीस म्हणून कार्यरत होते. येथे काम करीत असताना त्यांच्याकडे लाडू व बर्फी प्रसाद वितरण काऊंटरवर डयूटी देण्यात आलेली होती. तेथे या डयूटीवर असताना त्यानी सोपविलेल्या जबाबदारीचे पालन केले नाही. ते काऊंटरवर दि.०५.०२.२०२० रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंतच्या डयूटीवर असताना दुपारी ३.३० च्या दरम्यान काऊंटर बंद करुन कुणासही न सांगता अथवा हालचाल रजिष्टरवर नोंद न करता निघून गेले. त्यामुळे साई भक्तांची लाडू व प्रसाद न मिळाल्याने गैरसोय झाली व तशा तक्रारी त्या विभागाकडे साई भक्तानी केल्या. तसेच, मीडियाने बंद काऊंटरचे फोटो घेऊन कळविले. त्यामुळे त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

सदर विभागीय चौकशीमध्ये शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने बजावलेल्या दोषारोपपत्रावरुन त्यातील दोषारोपांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. दोषारोपपत्रासोबतचे दस्तावेज, साक्षीदारांच्या साक्षी, सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम टाचण व अपचारी यांचे बचावाची व अंतिम निवेदने यांचा विचार केल्यानंतर निर्णयासाठी खाली मुद्यांचा उहापोह करण्यात येत आहे.

१) अपचारी हे मदतनीस आहेत व मंदीर परिसरातील लाडू व बर्फी प्रसाद काऊंटरवर डयूटीवर असताना साईभक्तांना लाडू व बर्फी प्रसाद पुरविणे व त्यासाठी आलेला निधी हाताळणे/जमा करणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

२) आपला बचाव करताना त्यानी असे म्हटले आहे की "ते त्यांची डयूटी सोडून काऊंटर बंद करुन गेले होते व शेजारच्या कर्मचा-यास सांगून गेले होते व त्यात त्यांची काहीही चूक झालेली नसून हा आरोप त्याना मान्य नाही."

३) दोषारोपपत्राच्या परिशिष्ट ब मधील अ.क्र.४ ते २२ ही कागदपत्रे पाहिली असता असे दिसते की, ही कागदपत्रे अपचारी याना केलेल्या शिक्षेच्या आदेशाच्या प्रती आहेत. पहिले कागदपत्र दि.१०.०९.२००७ चे असून ती सह त्याना खालीलप्रमाणे शिक्षा झालेल्या दिसून येतात,

सन २००७ मध्ये २ वेळा,
सन २००८ मध्ये ४ वेळा,
सन २००९ मध्ये ४ वेळा,
सन २०१० मध्ये २ वेळा,
सन २०१२ मध्ये ३ वेळा,
सन २०१७ मध्ये १ वेळा,
सन २०१८ मध्ये ३ वेळा,

येणेप्रमाणे अपचारी याना सन २००७ पासून एकुण १९ वेळेस शिक्षा झालेल्या दिसून येतात. एवढया वेळेस गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेल्या असताना व सन २०२० मध्ये, म्हणजे आता त्यानी पुन्हा त्याच प्रकारचे गैरवर्तन केल्याचे दिसून येते. व त्याबदद्ल आता विभागीय चौकशी होत आहे, ही गंभीर बाब आहे.

४) अपचारी आपल्या बचाव व अंतिम निवेदनात बचावाचा असा मुद्दा उपस्थित करतात की, "एकदा शिक्षा झाल्यावर ती कागदपत्रे दुस-या आरोपासाठी वापरल्यास ती मान्य करण्यात येऊ नयेत." मात्र बचावाचा हा मुद्दा मान्य करता येत नाही. एकतर पुर्वी केलेल्या गैरवर्तनावरुन त्याना ज्या शिक्षा वेळोवेळी झाल्या त्यावेळी विभागीय/खाते चौकशी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे अशी चौकशी करताना पुर्वी झालेल्या शिक्षेचा संदर्भ देणे हे उचित समजले जावे. प्रस्तुत प्रकरणातील गैरवर्तनाचे गांभीर्य ठरवताना पुर्वी कोणते गुन्हे केले व किती वेळा केले हे जाणून घेणे शिक्षा करणा-या न्यायालयास/अभिकरणास माहीत करुन घेणे जसे आवश्यक असते, तसेच, ते विभागीय /खाते चौकशीत सुध्दा गरजेचे आहे. त्यामुळे हा बचाव मान्य होऊ शकत नाही.

पान नं. ४ वर...

तसेच अपचारी यांनी आपल्या अंतिम निवेदनात असे म्हटले आहे की,"एकदा एका गुन्हयाबाबत शिक्षा झाली असेल तर पुन्हा त्याच गुन्हयासाठी दुस-यांदा शिक्षा करणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुध्द आहे " हे त्यांचे प्रतिपादन जरी बरोबर असले तरी प्रस्तुत प्रकरणी शिक्षा करणारे अभिकरण पूर्वी झालेल्या शिखेचा प्रस्तुत प्रकरणी झालेल्या गैरवर्तनाशी संबंध जोडण्यासाठी शिक्षेचे आदेशाच्या प्रती अभिकथनाच्या परिशिष्टमध्ये समाविष्ट केल्या आहेत आहे व तें उचित आहे, असे मत व्यक्त करण्यात येते.

५) प्रस्तुत प्रकरणात तर अपचारी यानी, "लाडू व बर्फी प्रसाद काऊंटर सोडून गेल्याबदद्ल आपली कोणतीही चूक झालेली नाही" असे प्रतिपादन केलेले आहे व त्याचे कारण, "ते काऊंटर बंद करुन शेजारच्या कोणा कर्मचा-यास सांगून संडासला गेले होते" असे दिले आहे. यात दोन बाबी महत्वाच्या आहेत. एक तर संडासला जास्तीत जास्त अर्धा तास लागेल असे गृहीत धरले तर जाऊन आल्यानंतर ते काऊंटर अपचारी यानी पुन्हा उघडले का? कारण ही घटना दुपारी ३.३० वाजता घडल्यानंतर ४ वाजल्यापासून त्यानी पुढे २ तास ते काऊंटर उघडे ठेवले होते का ? तर या बाबत त्यानी आपल्या बचावात, उलट तपासणीत कोठेही काहीही प्रतिपादन केलेले नाही. तसेच, काऊंटर बंद करण्यापुर्वी ज्या कर्मचा-याचा ते हवाला देत आहेत त्या कर्मचा-याबाबत त्यांनी काहीही तपशील दिलेला नाही, अगर त्यास स्वतःचे बचावाचा साक्षीदार म्हणूनही समोर आणलेले नाही. यावरुन, त्यांचा हा बचाव मान्य करता येत नाही.

६) याखेरीज, अपचारी जेव्हा काऊंटर सोडून गेले तेव्हा भक्तानी तक्रार करुन व अन्य कर्मचा-यानी फोनवरुन विभाग प्रमुखास सांगितल्यानंतर अपचारी याना फोनवरुन संपर्क केला असता त्यानी ते दवाखान्यात गेले आहेत असे सांगितले होते, असे विभाग प्रमुख व साक्षीदार श्री शेकडे यानी आपल्या साक्षीच्या प्रश्नातील उत्तरात सांगितले आहे. अपचारी हे जर संडसला गेले होते तर साक्षीदार श्री शेकडे यांचे म्हणणे की ते दवाखान्यात गेले आहेत हे अपचारी यानी उलटतपासणीत खोडून काढणे आवश्यक होते. परंतु अपचारी यानी याबाबत कोणतेही प्रश्न विचारले नाहीत. याचा अर्थ ते संडासला गेले होते हा बचाव मान्य करता येत नाही.

७) साक्षीदार श्री. शेकडे हे कार्यालय अधीक्षक असून अपचारी श्री राऊत यांचे वरिष्ठ आहेत.त्यांच्या उलट तपासणीत त्यानी पुढील मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात.

१) काही बाबी अभिकथनपत्राच्या परिशिष्अ ब मध्ये समाविष्ट नाहीत. जसे, साई भक्तानी केलेली तक्रार, २) फिंगर प्रिंट अहवाल व त्याचा तपशील, जसें कोणत्या तारखेस फिंगर प्रिंटींग केलेले नाही व त्या दिवशीचे त्याना वेतन देण्यात आले किंवा नाही३) मस्टरवर नंतर सही करणे४) रजा उपभोगून आल्यावर रजेचा अर्ज देणे इ.

याबाबत साक्षीदार यानी उत्तरे दिलेली आहेत की साई भक्तानी केलेली तक्रार कार्यालयात नाही. तसेच, फिंगर प्रिंट न करणे, मस्टरवर नंतर सही करणे, रजा उपभोगून आल्यावर रजेचा अर्ज देणे इ.बाबत तपशील देता येत नसला तरी असे अनेकवेळा घडलेले आहे. तसेच, उलटतपासणीत हालचाल रजिष्टर काऊंटर पासून लांब १ कि.मी. अंतरावर असणे, काऊंटरवर अपचारी हे एकटेच कर्मचारी असणे, रिलीव्हर न देणे, रोख रक्कम हाताळणेसाठी भत्ता नसणे याबाबी बचावासाठी स्पष्ट करुन घेतल्या आहेत.

पान नं. ५ वर...

८) याबाबत असे म्हणता येईल की,

विभागीय चौकशी दरम्यान "काही बाबी अभिकथन पत्राच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नसणे जसे, साई भक्तांची तक्रार, फिंगर प्रिंट अहवाल व त्याचा तपशील, जसे कोणत्या तारखेस फिंगर प्रिंट केलेले नाही व त्या दिवशीचे त्रूाना वेतन देण्यात आले किंवा नाही, मस्टरवर नंतर सही करणेचा तपशील, रजा उपभोगून आल्यावर रजेचा अर्ज देणे चा पुरावा इ. " या वअशा सवरुपाच्या तांत्रिक त्रुटी असलेल्या मुद्यांचा अपचा-यास advantage देणे योग्य ठरणार नाही. याचे कारण असे की, विभागीय चौकशीत हे मुद्दे अगदी तावून सूलाखून सिध्द करवून घेणे आवश्यक नाही.

याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, Standard of proof required in criminal case and that of Departmental enquiry are different. In criminal case, evidence has to be verified from various angles in order to prove a criminal case beyond doubt. Whereas in Departmental enquiry standard of proof has to be fixed based on Preponderence of Probability.

त्यामुळे केवळ अपचारी यांच्या बचावातील मुद्दे हे केवळ कथित तांत्रिक स्वरुपाच्या त्रुटी दर्शविणारे आहेत.त्यावरुन अपचारी यानी प्रस्तुत प्रकरणात केलेले गैरवर्तन हे केलेलेच नाही असे सिध्द होऊ शकत नाही. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालामध्ये स्पष्ट असलेली Preponderence of Probability, म्हणजेच गैरवर्तन घडले असण्याची शक्यता आहे किंवा नाही ही बाब तपासणे हाच खाते/विभागीय चौकशीचे प्रमुख उद्देश आहे.त्यामुळे उपलब्ध पुराव्यांच्या आधारे ते गैरवर्तन घडलेले आहे असे मत व्यक्त करण्यात येते.

९) अपचारी यांचेकडून प्रत्येक वेळी शिक्ष होताना चूक कबूल करुन बथवा नाकबून करुन पुन्हा त्याचप्रकारचे गैरवर्तन होताना दिसत आहे. यावरुन त्यांची सेवा व त्या बजावताना त्यांचेकडून होत असलेले गैरवर्तन याबाबत ते अजिबात गंभीर नाहीत असे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणातही अपचारी यानी त्यांच्या अंतिम निवेदनात त्यांचे हातून चूक झालेली आहे हे कबूल केले आहे. मात्र घडलेले गैरवर्तन हे फारसे गंभीर स्वरुपाचे नाही व त्रूासाठी खाते चौकशी करण्याची आवश्यकता नाही असा बचाव केला आहे. त्यावरुन त्यानी आपले गैरवर्तन कबूल केले आहे असे दिसून येते.

१०) प्रस्तुत प्रकरणातील गेरवर्तनाबाबत अपचारी यानी ते फारसे गंभीर नाही हा मुद्दा त्यानी यापुर्वी १९ वेळा केलेल्या गैरवर्तनाच्या पार्श्वभूमीवर तपासून पाहून शिस्तभंग विषयक प्राधिकरणाने या प्रकरणातील गैरवर्तनाबाबत खाते चौकशी सुरु केली आहे ही बाब महत्वाची म्हणून नोंदविण्यात येत आहे.

११) जवळ जवळ दरवर्षी शिक्षा होण्याएवढी गैरवर्तन करणे ही अत्यंत गंभीर बाब समजण्यात आली पाहिजे. प्रत्येकवेळी केलेली शिक्षा गुपचूप सहन करुन पुन्हा लगेचच गैरवर्तन करण्यास अपचारी निर्ढावलेले दिसून येतात.

निर्णय:

वरील १ ते ११ या मुद्दयांचा विचार करता चौकशी अधिकारी या निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत की,आरोपपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप सिध्द होत आहेत.

पान नं. ६ वर...

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया** अंतर्गत

(१) ठपका ठेवणे, (२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती, (८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

श्री.संजय रामदास राऊत, सध्या सेवा निलंबीत, मदतनीस, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांचे गंभीर गैरशिस्तवर्तवतनाबाबतचा प्रस्ताव दि.०४.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमार सादर करणेत आलेला होता. त्याबाबत निर्णय क्रं.१७५ अन्वये त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६०/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये तात्काळ संस्थान सेवेतुन निलंबीत करणेत आले. श्री.राऊत यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६१/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये अभिकथनपत्र व जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६२/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये खातेचौकशी अधिकारी यांना आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री.राऊत यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६०/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वय दि.०८.०६.२०२० पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले असुन तीन महिन्यात खातेचौकशी पुर्ण होवुन अहवाल प्रशासनास प्राप्त होणे आवश्यक होते. सदरची मुदत दि.०७.०९.२०२० रोजी संपुष्टात आलेली होती.परंतु श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांना कोराणा संसर्ग या आजाराचे गांभीर्य विचारात घेता जिल्हाबंदी असल्याने ते शिर्डी – नाशिक येथे ये-जा करु शकलेले नाही. त्यामुळे खाते चौकशी आदेश प्राप्त होवुन देखील चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण होवु शकली नाही. तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१०७६/२०२० दि.०९.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०७.०९.२०२० पासुन पुढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली होती.

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, चौकशी अधिकारी यांनी श्री.राऊत खातेचौकशी पुर्ण करुन दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल सादर केलेला असुन, त्यात त्यांनी,“ **दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप श्री.राऊत यांचेवर सिध्द होत आहेत.**” असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

पान नंबर ७ वर...

उपरोक्त अ चे अवलोकन करता श्री.राऊत हे उपरोक्त अभिकथनपत्रामध्ये नमुद केलेल्या आरोपात दोषी आढळून आलेले असल्याने व त्यांचे सेवेचा पुर्वइतिहास तसेच गैरवर्तनाचे स्वरुप पहाता त्यांना यापुर्वी १९ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

१) श्री.राऊत यांचा दि.०८.०६.२०२० ते कामावर हजर/रुजु करुन घेणेपर्यंतचा कालावधी निलंबन कालावधी गृहीत धरता येईल.

२) श्री.संजय रामदास राऊत, सध्या सेवा निलंबीत, मदतनीस, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांना उपरोक्त अ प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना कामावर हजर/रुजु करुन घेऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा त्यांना देता येईल, असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

6/1/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB-meeting-364-2020

विषय क्र.- 910

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, (सध्या सेवा निलंबीत) सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत...

टिपणी

विषयाची पुर्वपिठीका-

श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले आहे.

श्री.सोनवणे हे दि.१६.०१.२०२० ते दि.१९.०१.२०२० अखेर ०४ दिवस या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.सोनवणे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२५२५/२०२० दि.११-०२-२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता.तथापी, श्री.सोनवणे यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१४-०२-२०२० रोजी प्राप्त होवुन देखिल,त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन आलेले आहे.सदर गैरशिस्तवर्तनाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य न करणे इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे. श्री.सोनवणे यांच्या शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत २१ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या असुन त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने, त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि.०४.०३.२०२० निर्णय क्रं.१७६ नुसार त्यांना जा.नं. एसएसएस/ वशी-शिस्त/२६६/२०२०, दि.०८-०८-२०२०७ रोजीचे आदेशान्वये तात्काळ संस्थानचे सेवेतुन " सेवानिलंबीत " करण्यात आलेले आहे.

श्री.रंगनाथ सोनवणे यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देणेत येत आहे.

तसेच त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६७/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे त्यांना अभिकथनपत्र बजाविण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६८/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.श्री.देशमुख यांनी दि.३०.११.२०२० रोजीचा श्री.सोनवणे यांचा खातेचौकशी अहवाल इकडील कार्यालयास सामान्य प्रशासन शाखा, आवक विभाग ८१८२ दि.०७.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

पान नं. २ वर...

श्री.सोनवणे यांची संस्थान सेवेत दि.०४.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	सक्त ताकीद	०३
०२	लेखी समज	०१
०३	ठपका	१५
०४	वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखणे	०२
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	२१

श्री.सोनवणे यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण २१ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे.

ब) खातेचौकशी अहवाल-निर्णयासाठी मुद्दे, पुराव्याचे मूल्यमापन :-

श्री.ए.एम. देशमुख,नाशिक, चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे काढलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या अधिनस्त असलेले श्री साई मंदिर हे भारतातीलच नव्हे तर जगभरातील साईभक्तांचे श्रध्दास्थान असल्याने येथे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची सतत गर्दी असते. मंदिर परिसर खूप मोठा असल्याने व भाविकांची खूप गर्दी असल्याने संस्थानने भक्तांसाठी येथे खूप सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थान परिसरामध्ये एकाच वेळी हजारो अनेक भक्तांची साई दर्शनासाठी सतत रीघ लागलेली असल्याने मंदीर परिसर तसेच संस्थानचे सर्व विभाग यामध्ये पराकोटीची स्वच्छता ठेवण्याची संस्थान नेहमीच काळजी घेते. या आरोग्य सुविधेवर आरोग्य विभागाच्या वरिष्ठाकडून सतत नियंत्रण ठेवले जाते.

अशा या मंदिरात अपचारी श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे हे सफाई कामगार असून ते आरोग्य विभागात कार्यरत होते. येथे काम करीत असताना त्यांच्याकडे सोपविलेल्या जबाबदारीचे त्यानी पालन केले नाही. ते सफाई काम करीत असताना त्यांनी त्यांचे काम सोडून विनापरवाना गैरहजर राहत असल्याबाबत त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले आहेत. यापुर्वीही सन २०१९ मध्ये त्यांची विभागीय चौकशी अशाच प्रकारच्या गैरवर्तनाबाबत करण्यात आलेली होती व त्यात त्याना दोषी ठरविण्यात आलेले होते. असे असतानाही पुन्हा तशाच प्रकारचे गैरवर्तन अपचारी यांचेकडून सन २०२० या वर्षातही दिसून आल्याबाबत त्यांचे वरिष्ठानी गैरवर्तन रिपोर्ट सादर केल्यामुळे असे मत बनले असावे की, अपचारी यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत बनलेले दिसते.

त्यामुळे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने बजावलेल्या दोषारोपपत्रावरुन त्यातील दोषारोपांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. दोषारोपपत्रासोबतचे दस्तावेज, साक्षीदारांच्या साक्षी,सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम टाचण व अपचारी यांचे बचावाची व अंतिम निवेदने यांचा विचार केल्यानंतर निर्णयासाठी खाली मुद्यांचा उहापोह करण्यात येत आहे.

१) अपचारी हे सफाई कामगार आहेत व मंदीर परिसरात स्वच्छता राखणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

२) आपला बचाव करताना त्यानी असे म्हटले आहे की "ते त्यांची डयूटी सोडून अनधिकृतरित्या काही अपरिहार्य कारणास्तव गैरहजर राहिले होते व ती त्यांची चूक झालेली असून ती त्याना मान्य आहे ."

३) याच निवेदनात त्यानी असे म्हटले आहे की, "त्याना परिशिष्ट ब मधील अ.क्र.३ ते २८ कागदपत्रे मान्य नाहीत.कारण ती कागदपत्रे त्यानी पुर्वी केलेल्या गैरवर्तनाबाबतची असून त्यावेळी त्याना शिक्षा झालेली आहे. "

४) परिशिष्ट ब मधील अ.क्र.३ ते २८ ही कागदपत्रे पाहिली असता असे दिसते की, ही कागदपत्रे अपचारी याना केलेल्या शिक्षेच्या आदेशाच्या प्रती आहेत. पहिले कागदपत्र दि.०१-०१-२०११ चे असून त्यानंतर खालीलप्रमाणे शिक्षा झालेल्या दिसून येतात.

पान नं. ३ वर...

सन २०१३ मध्ये १ वेळा,
सन २०१४ मध्ये १ वेळा,
सन २०१५ मध्ये ३ वेळा,
सन २०१६ मध्ये ७ वेळा,
सन २०१७ मध्ये २ वेळा,
सन २०१८ मध्ये ७ वेळा,
सन २०१९ मध्ये ३ वेळा,
सन २०२० मध्ये १ वेळा,

येणेप्रमाणे अपचारी याना सन २०११पासून एकुण २५ वेळेस शिक्षा झालेल्या दिसून येतात. त्यातील सन २०१६ मध्ये ७ वेळा व सन २०१८ मध्येही पुन्हा ७ वेळा शिक्षा झालेल्या दिसून येत आहेत.एवढया वेळेस गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेल्या असताना व सन २०१९ मध्ये त्यांची विभागीय चौकशी होऊन त्याना दोषी ठरविलेले असतानाही त्यानी पुन्हा त्याच प्रकारचे गैरवर्तन केल्याचे दिसून येते. याबाबत गंभीर दखल घेण्यात येते.

५) तसेच, प्रत्येक वेळी शिक्षा करताना ते चूक कबूल करुन पुन्हा असे करणार नाही असे आश्वासन देत असले तरी त्यावर विश्वास ठेवता येत नाही. तसेच, यावेळच्या अंतीम निवेदनात तर त्यानी तेही आश्वासन दिलेले दिसून येत नाही. यावरुन त्यांची सेवा व त्या बजावताना त्यांचेकडून होत असलेले गैरवर्तन याबाबत ते अजिबात गंभीर नाहीत असे दिसून येते.

६) दि.०६ ऑक्टोबर रोजी त्यानी दिलेल्या अर्जात त्यानी तीन प्रकारे बचाव केलेला दिसतो,
अ)दोषारोपपत्रातील कागदपत्रापैकी क्र.१ व २ या पत्राप्रमाणे मी गैरहजर राहिलो होतो. परंतु त्यावेळी माझी मनःस्थिती बरोबर नव्हती.
ब) माझे घरगुती अडचणीमुळे गैरहजर होतो.
क) मी गैरहजेरीबाबत माझी चूक झालेली आहे. तरी "एक वेळ " मला माफ करावे.
वरील तीन प्रकारचे बचाव पाहता त्यात विसंगती दिसून येते. एक वेळेस "मनःस्थिती ठीक नव्हती " असा बचाव केला आहे. तर त्यास नक्की कोणत्या कारणामुळे "मनःस्थिती ठीक नव्हती " हे सांगणे आवश्यक होते. यापैकी काहीही त्यानी केलेले नाही. केवळ मोघमपणे "मनःस्थिती ठीक नव्हती "यासारख्या प्रतिपादनामुळे त्यांचा बचाव मान्य करता येत नाही. तसेच "मनःस्थिती ठीक नव्हती " या प्रतिपादनानंतर लगेच " घरगुती अडचणीमुळे गैरहजर" ही बचावाची दोन्ही प्रतिपादने परस्पर विरोधी आहेत. त्यामुळे हा त्यानी केलेला बचाव एक मोघम व Casual पध्दतीने केलेला बचाव असून तो अमान्य करण्यात येत आहे.

७) याप्रकरणी बचावाचे निवेदन देताना त्यानी परिशिष्ट ब मधील उपरोक्त शिक्षेच्या आदेशाच्या कागदपत्रे मान्य नाहीत असे म्हटले आहे. हे मान्य करता येत नाही. कारण त्याना एकुण २५ वेळा शिक्षा झालेल्या असताना त्या शिक्षेच्या आदेशापुर्वी त्यांची कोणतीही विभागीय चौकशी करण्यात आलेली नव्हती.

८) दरवर्षी गैरवर्तन करणे ही अत्यंत गंभीर बाब समजण्यात आली पाहिजे. प्रत्येकवेळी केलेली शिक्षा गुपचूप सहन करुन पुन्हा लगेचच गैरवर्तन करण्यास अपचारी निर्ढावलेले दिसून येतात.

९) त्यामुळे बचाव निवेदनातील त्यांचे प्रतिपादन की, "मला एक वेळ माफ करण्यात यावी " हे पटू शकणारे नाही.

पान नं. ४ वर...

निर्णय:-

वरील १ ते ९ या मुद्यांचा विचार करता चौकशी अधिकारी या निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत की, आरोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप सिध्द होत आहेत.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सध्या सेवा निलंबीत, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गंभीर गैरशिस्तवर्तवतनाबाबतचा प्रस्ताव दि.०४.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमार सादर करणेत आलेला होता. त्याबाबत निर्णय क्रं.१७६ अन्वये त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६६/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये तात्काळ संस्थान सेवेतुन निलंबीत करणेत आले. श्री.सोनवणे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६७/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये अभिकथनपत्र व जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६८/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये खातेचौकशी अधिकारी यांना आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री.सोनवणे यांना संदर्भ क्रं.२ अन्वये दि.०८.०६.२०२० पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले असुन तीन महिन्यात खातेचौकशी पुर्ण होवुन अहवाल प्रशासनास प्राप्त होणे आवश्यक होते. सदरची मुदत दि.०७.०९.२०२० रोजी संपुष्टात आलेली होती.परंतु श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांना कोराणा संसर्ग या आजाराचे गांभीर्य विचारात घेता जिल्हाबंदी असल्याने ते शिर्डी – नाशिक येथे ये-जा करु शकलेले नाही. त्यामुळे खाते चौकशी आदेश प्राप्त होवुन देखील चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण होवु शकली नाही. तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१०७६/२०२० दि.०९.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०७.०९.२०२० पासुन पुढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली होती.

पान नंबर ५ वर...

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, चौकशी अधिकारी यांनी श्री.सोनवणे खातेचौकशी पुर्ण करुन दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल सादर केलेला असुन, त्यात त्यांनी," दोषारोपत्राच्या **परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप श्री. सोनवणे यांचेवर सिध्द होत आहेत."** असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

उपरोक्त अ चे अवलोकन करता श्री.सोनवणे हे उपरोक्त अभिकथनपत्रामध्ये नमुद केलेल्या आरोपात दोषी आढळून आलेले असल्याने व त्यांचे सेवेचा पुर्वइतिहास तसेच गैरवर्तनाचे स्वरुप पहाता त्यांना यापुर्वी २१ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

१) श्री.सोनवणे यांचा दि.०८.०६.२०२० ते कामावर हजर/रुजु करुन घेणेपर्यंतचा कालावधी निलंबन कालावधी गृहीत धरता येईल.

२) श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सध्या सेवा निलंबीत, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना उपरोक्त अ प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना कामावर हजर/रुजु करुन घेऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा त्यांना देता येईल, असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

23/9/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

Meeting-354/2020

LAB - Meeting - 225 - 2021

विषय क्र.- ९८

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे खातेचौकशीचे दि.०७.०५.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत...

टिपणी

अ) विषयाची पुर्वपिठीका -

श्री.गवळी हे सीसीटीव्ही विभागाचे प्र. सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

१) श्री.गवळी यांनी सीसीटीव्ही विभागामार्फत कॅमेरा केबल व पॉवर केबल पुरवठा करणेबाबत दरपत्रके मागविणेत आलेली होती. त्यामध्ये न्यूनतम दरधारकांस पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु सदर पुरवठाधारकाने नमूद मालाच्या पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली. या संदर्भात दरपत्रकात नमूद न्यूनतम दरधारक जर पुरवठा करण्यास तयार नसल्यास खरेदी नियमावली प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतु त्यांनी तशी कार्यवाही केली नाही. वास्तविक पाहाता खरेदी नियमावली कलम ४.४.४.१ मधील मार्गदर्शक सुचनेमध्ये L1 व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्ती बरोबर वाटाघाटी करु नये असे स्पष्ट केलेले असतांना सुध्दा त्यांनी वरिष्ठांकडे सादर केलेल्या टिपणीत L2 निविदाधारक हे L1 चे दरामध्ये पुरवठा करणेस तयार असून त्यांना पुरवठा आदेश देता येईल असे नमुद केलेले आहे. वास्तविक,खरेदीची नियमावलीनुसार पुन्हा दरपत्रके मागविणे आवश्यक होते. परंतु श्री.गवळी यांनी नियमांचा भंग करुन, वरिष्ठांची दिशाभूल करुन, टिपणी सादर करुन मंजुरी घेण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

२) दि.३१.१२.२०२० व दि.०१.०१.२०२१ चे रात्री दर्शन रांग चालु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन दर्शन रांग व हॉल्स साफ सफाई करण्यासाठी दर्शन रांग बंद करण्यात आली होती. तथापी, दि.३१.१२.२०२० च्या रात्री गतवर्षीचा अनुभव पाहता काही निवडक भक्तगण हटवादी भूमिका घेवुन हॉलमध्येच थांबत असतांत. ही बाब विचारात घेवून अशा हटवादी भक्तगणांकडून अरेरावी करत असल्याच्या पार्श्वभूमिवर एकुण १० कॅमेरे लावुन जर असे काही प्रसंग घडले तर त्याचे सीसी फुटेज पाहून आक्षेपार्ह बाबी असल्यास त्याच्याबाबत पोलीसात तात्काळ फिर्याद दाखल करण्याबाबत निर्देश दिले होते. सदर रात्री संस्थानचे अधिकारी व काही निवडक गांवकरी यांनी अनाधिकाराने मंदिर प्रक्षेत्रात प्रवेश करुन दर्शन रांगेत घुसून श्रींचे दर्शनाकरीता जाणेवरुन वाद-विवाद झाला. सदरचे सीसीटीव्ही फुटेज पाहून आक्षेपार्ह सीसीटीव्ही फुटेज इ-मेलने तात्काळ शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचेकडे देणेबाबत वरिष्ठांनी सुचना दिलेली असतांना श्री.गवळी यांनी ही कार्यवाही केलेली नाही. याबाबत श्री.रविंद्र ठाकरे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठपुरावा केल्यानंतरच सदरचे फुटेज दि.०१.०१.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेनंतर शिर्डी पोलीस स्टेशनला उशिराने पाठविलेले आहे.वास्तविक, त्यांनी याबाबत स्वत:हून कार्यवाही करणे अपेक्षित असतांना श्री.गवळी यांनी नेमुन दिलेल्या कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

वरिल मुद्दयावरुन असे स्पष्ट होते की, श्री.गवळी यांनी त्यांचे कामात अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई केलेली आहे व कामात कर्तव्यपरायणता ठेवलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे.

उपरोक्त नमुद केलेल्या बाबींबाबत / कारणास्तव त्यांनी त्यांचा लेखी खुलासा जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१ दि.०२-०१-२०२१ अन्वये ही नोटीस मिळालेपासुन ०२ दिवसांचे आंत त्यांचे विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत थेट मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास एकतर्फी निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी. अशा आशयाची नोटीस त्यांना दिली होती.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१ दि.०२-०१-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता. त्यास अनुसरुन त्यांनी दि.०४.०१.२०२१ रोजीचा लेखी खुलासा प्रशासकिय अधिकारी, सीसीटीव्ही कंट्रोल सेल यांचेमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर केलेला आहे. सदरचे खुलाशावर, प्र.अ.सादर करावे, असे वरिष्ठांनी निर्देश दिलेले होते.

दि.२४.०३.२०२१ रोजीचे शिस्त-भंग/शास्ती उप समिती सभेत वरील गैरशिस्तवर्तनबाबत निर्णया करीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

पान नंबर ०२ वर...

दि.२४.०३.२०२१ रोजीचे शिस्त–भंग/शास्ती उप समिती सभेतील निर्णयानुसार ," खुलासा नोटीसीच्या मुद्दयास अनुसरुन नाही. खुलासा अमान्य करणेत येत आहे. सदर गैरशिस्तवर्तनाबाबत विभागीय चौकशी करणेत यावी." असा निर्णय समंत झालेला आहे.

दि.२४.०३.२०२१ रोजीचे शिस्त–भंग/शास्ती उप समिती सभेतील निर्णयानुसार,विभागीय चौकशी प्रस्तावीत करणेत येत आहे.

श्री.गवळी यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	समज	५
०२	ताकीद	१
०३	श्रींच्या ०५ दिवस चारही आरत्या करणे.	१
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	०७

श्री.गवळी यांचे सेवेचा पुर्व इतिहास पहाता त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत एकुण ०७ वेळा शिक्षा करणेत आलेल्या आहेत. तरी देखील त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	गैरशिस्त वर्तनाचा तपशिल	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३
०१.	प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य :- (१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :- (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल . (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ; (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.	कलम ३ (१)
०२.	पर्यवेक्षी पद धारण करणारे संस्थानाचा प्रत्येक कर्मचारी तात्पुरते त्याचे नियंत्रणाखाली आणि प्राधीकाराखाली असलेल्या संस्थानच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणीकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहिल याची काळजी घेण्यासाठी शक्य त्या सर्व उपाय योजना अमलात आणेल.	कलम ३ (२)

त्यास अनसुरुन श्री.गवळी यांनी उपरोक्तप्रमाणे, प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-यांला साजेसे नसणारे कृत्य न करणे व पर्यवेक्षी पद धारण करणारे संस्थानाचा प्रत्येक कर्मचारी तात्पुरते त्यांचे नियंत्रणाखाली आणि प्राधीकाराखाली असलेल्या संस्थानाच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणिकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहिल याची काळजी घेण्यासाठी शक्य त्या सर्व उपाय योजना अमलात आणेल इत्यांदींचे उल्लंघन केलेले आहे.

उपरोक्त आरोपांबाबत त्यांचे विरुद्ध कडक कारवाई का करणेत येऊ नये ? याबाबतचे लेखी निवेदन तसेच त्यांना बचावासाठी काही लेखी अगर तोंडी पुरावे सादर करावयाचे असल्यास साक्षीदारांची व पुराव्यांची यादी या प्रकरणांचे खाते चौकशीकामी नेमलेले खाते चौकशी अधिकारी श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांचेकडे हे दोषारोप पत्र त्यांना मिळालेपासून सात दिवसांचे आत सादर करावे. अन्यथा त्यांचेवर ठेवलेले दोषारोप त्यांना मान्य आहेत असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यांना बचावासाठी काही कागदपत्रे पहावयाची असल्यास अगर माहिती पाहीजे असल्यास खातेचौकशी अधिकारी यांचेकडे वेळीच लेखी मागणी केल्यास उपलब्ध होतील.

उपरोक्त दोषारोप ज्या घटनांवर आधारीत आहेत त्या घटनांचे तपशिल दर्शविणारे घटना पत्रक, शाबीत करावयाच्या कागदपत्रांची यादी, साक्षीदारांची यादी (परिशिष्ट अ,ब,क), तसेच संबंधीत कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती या सोबत जोडल्या आहेत.

पान नंबर ३ वर....

आपण या चौकशीत आपला बचाव संस्थानच्या दुस-या कर्मचा-याची किंवा शासकिय सेवकाची किंवा संस्थानच्या सेवानिवृत्त कर्मचारी यांचेमार्फत करु शकता. आपणांस खाते चौकशीमध्ये नैसर्गिक न्यायतत्वानुसार व नियमानुसार सर्व प्रकारे बचावाची संधी दिली जाईल. आपण खातेचौकशीस हजर राहीला नाही तर आपले अपरोक्ष चौकशी पुर्ण केली जाईल व त्यानंतर आपली कोणतीही तक्रार व सबब ऐकून घेतली जाणार नाही.

चौकशीकामी चौकशी अधिकारी आपणांस कळवतील त्या तारखेस त्या ठिकाणी व वेळेत आपण साक्षी पुराव्यांसह उपस्थित रहावे.

ब) खातेचौकशी अभिकथनपत्र, खातेचौकशी आदेश

श्री.गवळी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ (१) (२)चे उल्लंघन केले असलेबाबत, जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/८७/२०२१ दि.१०-०४-२०२१ अन्वये अभिकथनपत्र देण्यात आलेले होते. श्री.पा.म.ताकटे, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/८६/२०२१ दि.१०-०४-२०२१ या आदेशानुसार याकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.ताकटे यांनी श्री.गवळी यांची दि.०४.०६.२०२१ रोजी प्राथमिक सुनावणी घेतलेली आहे.दि.०४.०६.२०२१ रोजी खातेचौकशीकामी कागदपत्रांची मागणी केलेली आहे. दि.१८.०६.२०२१ रोजी खातेचौकशी करणेत आलेली आहे. पुढील खातेचौकशीची तारीख **दि.०२.०७.२०२१** रोजी नेमण्यात आलेली आहे.

खातेचौकशीमध्ये श्री.गवळी यांना त्यांची बाजू मांडण्याची व त्यांचा बचाव करण्याची पूर्णपणे संधी देण्यात येत आहे, त्यांनी खातेचौकशीचे कामकाजामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतलेला असल्याने, सदरची खातेचौकशी पूर्णत: नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांचे समोर करणेत येत आहे.

(क) मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.गवळी यांनी उपरोक्तप्रमाणे खातेचौकशीकामी देण्यात आलेले अभिकथनपत्र/दोषारोप पत्र रद्द करणेबाबतचा दि.०७.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज.

मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.गवळी यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.०७.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी," विधाने व मजकुर यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून यापूर्वी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१, दि.०२/०१/२०२१ या कारणे दाखवा नोटीसला मी दिलेला दि.०४/०१/२०२१ रोजीचा खुलासा या अपिलाचा भाग म्हणून वाचणेत यावा, ही नम्र विनंती. त्याची प्रत आपले अवलोकनार्थ सोबत सादर करत आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.५ (पान क्र.१३ ते १४)*

१) <u>कार्यकक्षा</u> – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनीयम २०१३ मधील नियम क्र.१४ नुसार मी सदरचे अपिल करत आहे. या नियमात अशी तरतुद आहे की, तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदीच्या अधिन राहून संस्थान कर्मचारी, त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तींचा समावेश होतो, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध समितीकडे अपिल दाखल करु शकतो.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.६ (पान क्र.४३)

<u>अपिलाची कालावधी मर्यादा</u> – सेवा विनियम २०१३ मधील नियम क्र.१५ मध्ये अशी तरतुद आहे की, कोणतेही अपिल अपिलदाराला ज्या आदेशाविरुद्ध अपिल दाखल करावयाचे आहे, त्या आदेशाची प्रत प्राप्त झालेपासून तीस दिवसांचे आत दाखल केले पाहिजे अन्यथा अपिल स्वीकारले जाणार नाही. मला संदर्भिय आदेशाची प्रत दि.१०/०४/२०२१ रोजी सायं.१५.४५ वा.प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सदरचे अपिल मुदतीत आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.६ (पान क्र.४३)*

२) <u>अपिलाची कारणे</u> –

१) मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी माझ्या दि.०४/०१/२०२१ रोजीच्या खुलाशाचा मन:पूर्वक विचार केलेला नाही. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.५ (पान क्र.१३ ते १४)*

२) मी माझ्या दि.०४/०१/२०२१ रोजीच्या खुलाशात उपस्थित केलेले मुद्दे विचारात न घेता मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संदर्भीय आदेश पारीत केलेला आहे.

३) दि.०२/०१/२०२१ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये असे नमुद आहे की, " सदर रात्री संस्थानचे अधिकारी व काही निवडक गावकरी यांनी अनाधिकाराने मंदिर प्रक्षेत्रात प्रवेश करुन दर्शन रांगेत घुसून श्रीं चे दर्शनाकरीता जाणेवरुन वाद विवाद झाला " महोदय, मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, सदरच्या संस्थान अधिका-यांवर प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिस्तभंग कारवाई किंवा कोणतीही कारवाई केलेली नाही. यावरुन प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सापत्नतेचा भाव दिसून येतो.

पान नंबर ४ वर...

४) खातेचौकशी काळात शिस्तभंग कारवाई खाली असलेल्या कर्मचा-यास आर्थिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक आणि इतर हानीला तोंड द्यावे लागते. त्याच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन विनाकारण बदलतो त्यामुळे तो मानसिक तणावाखाली असतो.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनीयम २०१३ मधील नियम क्र.७ नुसार शिस्तभंग कारवाई चालू करण्याचा अधिकार समिती किंवा समितीने अधिकार प्रदान केलेले कोणतेही अधिकारी यांना आहे. तसे समितीने अधिकार प्रदान केलेले नसलेने प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी यांना शिस्तभंग कारवाई करणेचा अधिकारी नाही. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.६ (पान क्र.४२)*

६) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था; (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील नियम क्र.१४(२) (क) नुसार समितीच्या कोणत्याही अन्य अधिका-याविरुद्ध किंवा कर्मचा-याविरुद्ध शिस्तभंग कारवाई करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच आहे. या नियमानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शिस्तभंग कारवाई करणेचा अधिकार नाही. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं. ७ (पान क्र.४४)*

४) <u>घटनेची पार्श्वभूमी</u> –

मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१, दि.०२/०१/२०२१ अन्वये माझ्यावर कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सदर नोटीसीमध्ये माझ्यावर खालील दोषारोप ठेवलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.४ (पान क्र.८ ते १२)*

१) सीसीटीव्ही विभागामार्फत कॅमेरा व पॉवर केबल पुरवठा करणेबाबत दरपत्रके मागविणेत आलेली होती. त्यामध्ये न्यूनतम दरधारकास पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु, सदर पुरवठाधारकाने नमूद मालाचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली. या संदर्भात दरपत्रकात नमुद न्युनतम दरधारक जर पुरवठा करण्यास तयार नसेल खरेदी नियमावलीप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते, आपण तशी कार्यवाही केली नाही. वास्तविक पाहाता खरेदी नियामावली कलम ४.४.४.१ मधील मार्गदर्शक सूचनेमध्ये **L1** व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तीबरोबर वाटाघाटी करु नये, असे स्पष्ट केलेले असताना सुद्धा आपण वरिष्ठांकडे सादर केलेल्या टिपणीत **L2** निविदाधारक हे **L1** च्या दरामध्ये पुरवठा करणेस तयार असून त्यांना पुरवठा आदेश देता येईल, असे नमुद केलेले आहे. वास्तविक खरेदीच्या नियमावलीनुसार पुन्हा दरपत्रके मागविणे आवश्यक होते. परंतु, आपण नियमाचा भंग करुन, वरिष्ठांची दिशाभूल करुन, टिपणी सादर करुन मंजूरी घेण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

२) दि.३१/१२/२०२० व दि.०१/०१/२०२१ चे रोजी दर्शन रांग चालु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता . त्यास अनुसरुन, दर्शनरांग व हॉल साफ-सफाई करण्यासाठी दर्शनरांग बंद करण्यात आली होती. तथापी, दि.३१/१२/२०२० च्या रात्री गतवर्षीचा अनुभव पहाता काही निवडक भक्तगण हटवादी भूमिका घेवुन हॉलमध्येच थांबत असतात. ही बाब विचारात घेवुन अशा हटवादी भक्तांकडुन अरेरावी करत असल्याच्या पार्श्वभुमीवर एकुण १० कॅमेरे लावुन जर असे काही प्रसंग घडले तर त्याचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन आक्षेपार्ह बाबी असल्यास त्यांचेबाबत पोलिसात तात्काळ फिर्याद दाखल करणेबाबत निर्देश दिले होते. सदर रात्री संस्थानचे अधिकारी व काही निवडक गावकरी यांनी अनाधिकाराने मंदिर प्रक्षेत्रात प्रवेश करुन दर्शनरांगेत घुसून श्रीं चे दर्शनरांगेत जाणेवरुन वाद विवाद झाला. सदरचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन आक्षेपार्ह सीसीटीव्ही फुटेज ई-मेलने तात्काळशिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांचेकडे देणेबाबत वरिष्ठांनी सुचना दिलेल्या असताना आपण ही कार्यवाही केली नाही. याबाबत श्री रविंद्र ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठपुरावा केल्यानंतरच सदरचे फुटेज दि.०१/०१/२०२१ रोजी सायं. ५.०० वाजेनंतर शिर्डी पोलिस स्टेशनला उशीराने पाठविले आहे. वास्तविक याबाबत आपण स्वतःहुन कार्यवाही करणे अपेक्षित असताना आपण नेमुन दिलेल्या कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. याच आरोपासाठी प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझेवर संदर्भीय आरोपपत्र बजावले असुन खातेचौकशी करणेचा आदेश पारीत केलेला आहे.

५) <u>युक्तीवाद</u> -

महोदय, मी सविनयपणे आपले निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, सदरचे कारणे दाखवा नोटीस उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा. रविंद्र ठाकरे साहेब यांनी माझ्यावर बजावलेली आहे. सध्या प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार श्री रविंद्र ठाकरे साहेब, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे आहे. त्यांनीच संदर्भीय आदेश पारित केलेले आहे. त्यानुसार माझेवर आरोपपत्र बजावुन खातेचौकशी करणेचा आदेश केला आहे.

पान नंबर ५ वर...

माझेवर संस्थानचे दोन स्वतंत्र विभागांचा प्र.विभागप्रमुख पदाचा पदभार सोपविलेला आहे. परंतु, मला विभागप्रमुख पदाची वेतनश्रेणी आजतागायत देण्यात आलेली नाही. तसेच अतिरीक्त विभागाचे पदभारासाठी नियमानुसार देय असलेला कुठलाही अतिरीक्त भत्ता/अलौंस मला देण्यात येत नाही.

जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/८४२/२०१६, दि. ०३/०६/२०१६ रोजीचे आदेशान्वये माझी बदली प्र.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीयर, ध्वनीक्षेपण व टेलिफोन विभाग या पदावर करण्यात आलेली आहे.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं. ८ (पान क्र.१५)

तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४९९/२०१८ दि. २१/०५/२०१८ रोजीचे आदेशान्वये माझेकडे सीसीटीव्ही कंट्रोल सेलचे दैनंदिन प्रशासकीय नियंत्रणाचे अतिरीक्त कामकाज सोपविण्यात आलेले आहे.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.९ (पान क्र.१६)

परंतु, सदर विभागाचा अतिरीक्त पदभार माझेवर विना आकृतीबंध, विना तांत्रिक कर्मचारी तसेच कायम लिपीक-टंकलेखकाशिवाय देणेत आलेला आहे. सदर संवेदनशील अशा तांत्रिक विभागाचे कामकाज हे सर्व मदतनीस कर्मचा-यांकडुन विनातक्रार व प्रामाणिकपणे करुन घेणेत येत आहे. अशा परीस्थितीत देखील माझेवर सोपविण्यात आलेले विभागाचे अतिरीक्त प्रशासकीय नियंत्रणाचे कामकाज मी करीत असून, मला दैनंदिन कामामध्ये ब-याच अडचणी निर्माण होत आहेत. परंतु, आजपावेतो त्याची प्रशासनाकडुन कोणतीही दखल घेणेत आलेली नाही. तथापी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मला नोटीस देणेपुर्वी समक्ष सांगीतले होते की, आपणांस मी मैत्रीपुर्ण नोटीस देणार आहे. अशाप्रकारे माझ्याकडे नेहमीच अतिरीक्त कार्यभार हा विना मोबदला, वेतनश्रेणी शिवाय सोपविला जातो. तरी देखील मी विना तक्रार, प्रामाणिकपणे काम केले आहे व करीत आहे. महोदय, सदरहु विभागाचा अतिरीक्त पदभार काढुन घेणेत यावा यासाठी मी यापुर्वी दि.२२/०९/२०१५ आणि दि.२३/०१/२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं. १० (पान क्र.४५ ते ४६)

<u>मुद्दा क्र. (१) चा खुलासा -</u> मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये सीसीटीव्ही विभागाचे दि.१७/०६/२०२० रोजीची टिपणीन्वये, *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.४८)*" श्रीं " चे व्दारकामाई मंदिराचे परिसरात श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी करणेत आलेली सीसीटीव्ही कॅमे-यांचीवायरींग ही Over-head असल्याने ती भूमीगत करणे गरजेचे असल्याने सदरकामी आवश्यक ते साहित्यखरेदी करणेकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.२५,०६५/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन सदरकामी संस्थानचे अधिकृतसंकेतस्थळावर दि.०१/०७/२०२० ते दि.०७/०७/२०२० अखेर जाहिरात प्रसिद्ध करुन विविध पुरवठाधारकांकडुन सदरकामी कोटेशन्स मागविण्यात आले होते. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.११ (पान क्र.४७)*त्यानुसार प्राप्त कोटेशनातील निम्नतम दरांचा तुलनात्मक तक्ता वरिष्ठांचे मान्यतेस्तव सादर करणेत येवुन त्यातील प्राप्त निम्नतम पुरवठाधारकांना सदर साहित्य पुरवठा करणेकामी दि.२७/०७/२०२० रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.२०)*प्राप्त कोटेशनातील निम्नतम दरधारकांचा तपशील खालीलप्रमाणे असून त्यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने दि.०१/०८/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहे.

अ.नं.	वस्तुचा तपशील	पुरवठाधारकाचे नाव	दरपत्रकातील दर रु .
१.	2" HDEP पाईप 6Kg (31 Mtr)	जैन कॉम्प्युटर्स, राहाता	२,७९०(सर्व करांसहीत) -/
२.	2" ग्रुपबेड GI 4)–नग (	न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी	८५० (सर्व करांसहीत) -/
३.	2" Core 2.5 mm armoured Cable (100 mtr (	रिद्धी एंटरप्रायजेस, नाशिक	१५,०००(सर्व करांसहीत) -/
4.	D-link -Cat-6 Cable (305 mtr)	साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी	६,२०० (सर्व करांसहीत) -/

सबब,उपरोक्त तपशीलात नमूद केलेनुसार, व्दारकामाई मंदिराचे परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वायरींग भूमीगत करणेकामी आवश्यक असणारे 2" HDEP पाईप 6Kg (31 Mtr) पुरवठा करणेकामी उपरोक्त तपशीलातील अ.नं.१ मधील पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांना जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/८८४/२०२०, दि.०१/०८/२०२० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१२ (पान क्र.२१)

परंतु, पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांनी "***कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खूप रेट वाढलेले आहेत त्यामुळे मी मटेरीयल आपणांस देवु शकत नाही व मला ते परवडत नाही. तरी, माझ्या नांवे निघालेली ऑर्डर कॅन्सल करणेत यावी***" असे दि.२१/०८/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१३ (पान क्र.२२)

पान नंबर ६ वर...

तथापी, सदर 2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) खरेदी करणेकामी द्वितीय निम्नतम पुरवठाधारक न्युसाईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांचे दर रक्कम रु.२,५५३/- मात्र (सर्व करांसहीत) प्राप्त झालेले होते. त्या अनुषंगाने सदर 2" HDEP पाईप रु.२,७९०/- मात्र (सर्व करासंहीत) दरानुसार पुरवठा करण्यास तयार आहे काय ? याबाबत द्वितीय निम्नतम पुरवठधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांना दुरध्वनीद्वारे विचारणा केली असता, त्यांनी " *2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) मी श्री साईबाबा संस्थानला रक्कम रु.२,७९०/- मात्र (सर्व करांसह) पुरविणेस तयार असलेबाबत* " न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांनी दि.१०/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.
(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१४ (पान क्र.२४)

त्यास अनुसरुन, सदर "2" HDEP पाईप 6Kg (31 Mtr) पुरवठाधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांनी दि.१०/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार त्यांचेकडुन रक्कम रु.२,७९०/- मात्र (सर्व करांसहीत) दराने खरेदी करणेस तसेच त्यांना सदरकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव दि.०४/११/२०२० रोजी *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.२५)*टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर " १) 'अ' बाबत प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांचा लेखी खुलासा सादर करावा २) कायदेशीर बाबींची पूर्तता होत नाही तरी प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख यांनी नस्ती सादर केली आहे तरी त्यांचा खुलासा मागवावा, असे नम्र मत आहे " तसेच " 'अ' प्रमाणे " सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन सदर "2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) L1 पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता हे कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खुप रेट वाढलेले असल्याने पुरवठा करण्यास असमर्थ होते. सदरचे "2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) L2 पुरवठाधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी हे L1 पुरवठाधारक यांनी नमुद केलेल्या रक्कम रु.२,७९०/- मात्र (सर्व करांसहीत) दराने पुरवठा करण्यास तयार असल्याने L2 पुरवठाधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांचेकडुन सदर "2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) खरेदी करणेकामी कामाची निकड व तातडीचे काम विचारात घेता दि.०४/११/२०२० रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. तसेच खरेदी नियमावलीत L1 पुरवठाधारक वस्तु/साहित्य पुरवठा करण्यास असमर्थ असल्यास L2 पुरवठाधारक यांचेकडुन सदर वस्तु/साहित्य खरेदी करणेबाबत खरेदी नियमावलीत कुठलाही Clause नाही. परंतु, सदरचे पाईप खरेदी ही किरकोळ स्वरुपाची असल्याने तसेच सदर पाईप सोबत इतर किरकोळ वस्तु देखील खरेदी करणे आवश्यक असल्याने सदरकामी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन कोटेशन मागविण्यात आलेले होते. तसेच **L1 पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांनी कळविलेनुसार, कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खुप रेट वाढलेले असल्याने सदरकामी पुनःश्च कोटेशन मागवावयाचे झाल्यास संस्थानचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता** नाकारता येत नाही, असे नमुद करुन, दि.०५/१२/२०२० रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केलेला होता. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.१७)*

सदर प्रस्तावावरील प्राप्त निर्देशाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा करणेत येवुन, त्यांनी श्रींचे द्वारकामाई मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वायरींग भुमीगत करणेकरीता2" HDEP पाईप 6K (31 Mtr) खरेदीकामी पुनःश्च दरपत्रके मागविणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यास अनुसरुन, सदरकामी दि.०८/१२/२०२० रोजीचे मंजूर टिपणीन्वये *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.२६)*दि.०९/१२/२०२० ते दि.१८/१२/२०२० अखेर संस्थानचे संकेतस्थळावर फेर जाहिरात प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविण्यात आले होते. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१६ (पान क्र.२७)* तथापी, सदरकामी पुरवठाधारकांचा प्रतिसाद मिळत नसुन फक्त एकच पुरवठाधारक यांचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे. सबब, सदरकामी पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधला असता, पाणी पुरवठा विभागाकडे ४ इंची PVC पाईप उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तरी, "श्रीं" चे द्वारकामाई मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वायरींग भूमीगत करणेकामी ४ इंची PVC पाईप पाणी पुरवठा विभागाकडुन उपलब्ध करुन घेणेस तसेच सदर पाईपचे खोदकाम करुन पाईप भूमीगत करण्याचे काम बांधकाम विभागामार्फत करुन घेणेकामी प्रस्ताव दि.२४/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येवुन ठेकेदारावर प्रथम कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यानुसार, ठेकेदारावर दि.२२/०२/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये त्यांना दि.०१ /०३/२०२१ रोजीचे पत्रान्वये पुढील तीन वर्षाकरीता Black Listed करणेत आलेले आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१७ (पान क्र.५४ ते ५५)*

सबब, उपरोक्तप्रमाणे सर्व कार्यवाही ही संस्थानचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा करुन, त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करुन, त्यांचे मान्यतेने कार्यवाही करणेत आलेली आहे. तरी, देखील मला कारणे दाखवा नोटीस देवुन, मुद्दा क्र. १ मध्ये नमुद केलेनुसार आपण नियमांचा भंग करुन, वरीष्ठांची दिशाभुल करुन, टिपणी सादर करुन, मंजुरी घेण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते, असे नमुद केलेले आहे.

खरेदी नियमावली, नियम क्र. ३.२.२ नुसार रू. ५,०००/- पर्यंत च्या वस्तुंची खरेदी साठी निविदा काढण्याची गरज नाही. दरपत्रके/निविदा न मागविता थेट जागेवर खरेदी करता येईल. या संदर्भातील खरेदी नियमावली परिच्छेद ३.२.२ आपले अवलोकनार्थ जोडलेले आहेत.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१८ (पान क्र.५१)*

पान नंबर ७ वर...

तसेच भारत सरकारच्या GFR 2017 Rule 154, नियमावलीनुसार Purchase of goods without quotation:- "Purchase of goods upto the value of Rs.25,000.00(Rupees twenty five thousand)only on eachoccasion may be made without inviting quotations or bids on the basis of a certificate to be recorded by the competetent authority in the following format."I,am personally satisfied that these goods purchased are the requisite quality and specification and have been purchased from a reliable supplier of a reasonable price"अशी तरतूद आहे. या संदर्भातील नियमावली परिच्छेद GFR 2017 Rule 154 आपले अवलोकनार्थ जोडलेले आहेत.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.२१ (पान क्र.५२)*

महोदय, मी आपले लक्ष खरेदी नियमावलीकडे वेधु इच्छितो, खरेदी नियमावलीमधील नियम क्र.४.४.४.१ वाटाघाटासाठी मार्गदर्शक सुचना यात अशी सुचित केले आहे की, L1 निवीदाधारकाबरोबर जर काही भागांच्याकिंमती असमर्थनीय असतील किंवा बाजारभावापेक्षा जास्त असतील तर वाटाघाटी करता येतील. वाटाघाटीसाठी शिफारस करणा-या प्राधिका-याने खात्री पटेल अशी कारणे नमुद करणे आवश्यक आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१८ (पान क्र.५०)*

सदर प्रकरणात खरेदी ही किरकोळ स्वरुपाची रु.२,७९०/- ची होती. खरेदी नियमावलीचे मार्गदर्शक सुचनेनुसार किंमत असमर्थनीय असलेने L1 यांनी नकार दिल्यानंतर वरिष्ठांच्या सुचनेनुसार मी दि.०४/११/२०२० रोजीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यात संस्थानचा काहीही आर्थिक तोटा झालेला नाही. संस्थानचे आर्थिक नुकसान होऊ नये, काल अपव्यय होऊ नये या शुद्ध हेतुने वरिष्ठांच्या सुचनेनुसार प्रस्ताव सादर केलेला होता व त्यास वरिष्ठांनी मान्यता देखील दिलेली आहे. या कामी नियमाचा भंग केलेला नाही. मी वरिष्ठांची कुठल्याही प्रकारची दिशाभूल केलेली नाही.

तरी उपरोक्त नमूद केलेल्या मुद्दा क्र. (१) चे खुलाशातील विवेचनास अनुसरून, महोदय, संस्थानचे सदरकामी आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता मी वेळोवेळी वरीष्ठांशी समक्ष चर्चा करुनच प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेस्तव सादर करणेत येवुन, त्यास वरीष्ठांनी देखील प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे मी वरीष्ठांची दिशाभूल केली असे म्हणणे उचित होणार नाही. हे कथन खरे नाही. सदर साहित्य खरेदी केलेले नाही. मी खरेदी नियमावलीचा भंग केलेला नाही.

मुद्दा क्र. (२) चा खुलासा -दि.३१/१२/२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी रात्रौ १.१५ वाजता सरंजाम बागेजवळ सर्व सीसीटीव्ही कर्मचा-यांचे समक्ष सदर दिवशी घडलेल्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व व्हीडीओ कॅमे-याचे शुटींग जतन करुन ठेवणेबाबत सांगून, योग्य त्यावेळी पुढील सुचनेनुसार कार्यवाही करावी, असे तोंडी सांगीतले होते. तदनंतर दि.०१/०१/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी शिर्डीतील काही स्थानिक ग्रामस्थ यांनी दि.३१/१२/२०२० रोजी रात्रौ.२३.३० ते २३.३१ वाजेच्या दरम्यान गेट नं.-५ मधुन तसेच पी.आर.ओ. गेट या ठिकाणाहुन रात्रौ. २२.३५ ते २३.०० वाजे दरम्यान काही शिर्डी ग्रामस्थ यांनी अनाधिकाराने प्रवेश केलेला असल्याने शिर्डी ग्रामस्थांनी शासकीय कामांत अडथळा निर्माण केलेला असून, त्यांचेवर सीसीटीव्ही फुटेजचे तसेच व्हीडीओ कॅमे-याचे शुटींगचे अवलोकन करुन, संबंधितांवर नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करणेबाबत सांगीतले. सदरकामी शिर्डी पोलीस स्टेशनला द्यावयाच्या पत्रात नमुद करावयाचा मसुदा दुपारी १.१२ मिनिटांनी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दूरध्वनीव्दारे सांगून, त्यांनी सदर पत्र मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो., शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना देणेबाबत सांगितले होते. वास्तविक, महोदय माझी जबाबदारी फक्त तांत्रिक कामापुरती मर्यादित आहे. श्री साईभक्तांची सुरक्षेकरीता संरक्षण विभाग व कायदेशीर बाबींकरीता विधी विभाग असे दोन स्वतंत्र विभाग संस्थानमध्ये कार्यरत असुन त्यांचेकडुन कार्यवाही होणे अपेक्षित होते व आहे. परंतु वरिष्ठांचे वेळोवेळी सदरकामी प्राप्त होणा-या सूचनेनुसार मी कार्यवाही तत्परतेने विनाविलंब पूर्ण केलेली आहे.

महोदय, संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार संस्थानचे बाहेरील इतर विभागांशी करावयाचे पत्रव्यवहार हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने होत असल्याने, मी त्वरीत सदर दिवशी दुपारी ३.३० वाजता मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो.,शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना पत्र देणेबाबतचा प्रस्ताव दि.०१/०१/२०२१ रोजीचे टिपणीन्वये *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१९ (पान क्र.२९)*प्रशासकीय अधिकारी यांची मान्यता घेवुन, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे स्वाक्षरीकरीता समक्ष सादर केला असता, त्यांनी स्वाक्षरी न करता सदर पत्र हे आपले स्वाक्षरीने देणेत येवुन, सदर प्रस्ताव अवलोकनार्थ तथा माहीतीस्तव सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार मी मा.उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो.,शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना देणेबाबतचा पत्रातील नमुद आशयाचा मसुदा मी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांना समक्ष दाखवुन, सदर पत्र व दि.३१/१२/२०२० रोजीच्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तसेच व्हीडीओ कॅमे-याचे शुटींग डी.व्ही.डी.मध्ये तातडीने मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो., शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना जा.क्र.एसएसएसटी/सीसीटीव्ही/२९१८/२०२१, दि.०१/०१/२०२१ रोजी समक्ष सायं.१७.०५ वाजता देण्यात आलेले आहे.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.२० (पान क्र.३०)*

पान नंबर ८ वर...

तसेच सदर पत्र दिलेनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, प्रशासकीय अधिकारी महोदय यांना व्हॉटसअपव्दारे अवगत करणेत येवुन, प्रस्ताव दि.०१/०१/२०२१ रोजी माहीती तथा अवलोकनार्थ सादर करणेत आलेला आहे.

महोदय, उपरोक्त सर्व घटनाक्रमांचे अवलोकन करता, सदरकामी वरीष्ठांकडुन वेळोवेळी प्राप्त झालेले निर्देश, पत्रात नमुद करावयाच्या आशयाच्या मसुद्याबाबतचा प्राप्त संदेश तसेच तांत्रिक बाब विचारात घेता, संबंधित सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज तपासुन ते एकत्रित संकलन करुन, साईज प्रमाणे डेटा कनव्हर्ट करुन, सदर सर्व डेटा डी.व्ही.डी.मध्ये एकत्रित कॉपी करणेकामीची कार्यवाही मी माझे स्तरावर अचुकतेने व विनाविलंब अवघ्या काही तासातच पूर्ण करुन, वरीष्ठांचे निर्देशांनुसार शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी येथे सायंकाळी १६.०० वाजता स्वतः जावुन, तेथे वरीष्ठ पोलीस अधिकारी यांची भेट घेवुन, त्यांनी सदर पत्र व डी.व्ही.डी. मधील डेटाची प्रत्यक्ष तपासणी करुन,सायंकाळी १७.०५ वाजता मला पत्राची पोहोच दिलेली आहे. तदनंतर सदर प्रस्ताव तात्काळ पत्रासह मी दि.०१/०१/२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे माहीती तथा अवलोकनार्थ सादर केलेला होता.

महोदय, उपरोक्त तपशीलातील नमुद घटनांचा सारासार विचार करता, माझेकडील अशा या संवेदनशील व तांत्रिक दृष्टया महत्वपूर्ण विभागांचा अतिरीक्त पदभार हा विना आकृतीबंध, विना तांत्रिक कर्मचारी, लिपीक-टंकलेखक नसुनही, मी मदतनीस कर्मचा-यांच्या सहकार्याने सदर कामे करुन घेतलेली आहे व घेत आहे, अशी या विभागाची परीस्थिती असतांनाही दि.०२/०१/२०२१ रोजीचे नोटीस पत्रात (पान क्र.८) नमुद केल्याप्रमाणे मी वरीष्ठांचे निर्देशांनुसार त्वरीत कार्यवाही पूर्ण केलेली असून देखील मी कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ व दिरंगाई केलेली असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी, महोदय, मी नम्रपणे आपले निर्दशनास आणुन देऊ इच्छितो की, माझेकडुन सदर कामांमध्ये कुठलीही दिरंगाई अथवा टाळाटाळ झालेली नसुन, मी वरीष्ठांचे निर्देशांनुसार प्रामाणिकपणे व एकनिष्ठेने सर्व कामे त्वरीत केलेली आहेत.

महोदय, दि.०२/०१/२०२१ रोजीच्या नोटीसमध्ये असे कथन केले आहे की, सीसीटीव्ही फुटेज पहाणे आक्षेपार्ह बाबी असल्यास त्याच्याबाबत पोलिसात तात्काळ फिर्याद दाखल करणेबाबत निर्देश दिले होते. परंतु, आक्षेपार्ह बाब कोणती आहे हे ठरविण्याचे अधिकार मला नाही. दूसरे असे कि सदर घटना मंदिर प्रक्षेत्रात दर्शनरांगेत घडलेली आहे. या घटनेबाबत मंदिर विभाग, संरक्षण विभाग व मंदिर परिसरातील कार्यरत असलेला पोलिस विभाग यांचा थेट संबंध होता व आहे.

तथापी, दि.०१/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये " *संस्थानमधील सीसीटीव्ही विभागाचे प्रस्तावात नमुद " अ " नुसार उपलब्ध असलेले सीसीटीव्ही फुटेज पोलिस यंत्रणा, केंद्र व राज्य शासनाच्या गुप्तचर विभाग यांना तपासाकामी त्यांच्या मागणीप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विभागाच्या प्रस्तावात " ब " प्रमाणे माहिती अधिकार कायदा २००५मधील कलम ८(१) मधील " छ "व " ज " मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार खाजगी अर्जदारास सीसीटीव्ही फुटेज देण्याचे नाकारण्यात यावे* " असे ठरले.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.२२ (पान क्र.५३)*

महोदय, मी आपले निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, सदर घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तपासाकामी मिळणेबाबतची मागणी पोलीस विभागाने केलेनंतर सदरचे घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिस विभागास तपासाकामी देणे अपेक्षित होते व आहे. परंतु, पोलिस विभागाने सदर घटनेचे सीसीटीव्ही फुटेज मिळणेबाबत मागणी केलेली नसतानाही सदरचे फुटेज मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे सुचनेनुसार पोलिस विभागास पुढील कारवाईसाठी देणेत आलेले आहे.

तसेच दि.१७/०४/२०२१ रोजीचे माझ्या खुलाशात नमुद केल्याप्रमाणे मला निर्गमीत नोटीस मला दि.१०/०४/२०२१ मधील सर्व आरोप असत्य, निराधार, कपोल कल्पित, संदिग्ध व बनावट असुन असेच बनावट आरोप करुन कागदपत्रे पुरावा परिशिष्ट "क" (पान क्र.६) मधील अनुक्रमांक ४ ते १० दि.३०/०९/२०११, दि.२२/११/२०१४, दि.२४/०२/२०१६, दि.१९/०५/२०१६, दि.०९/११/२०१६, दि.०१/०२/२०१८व दि.२८/११/२०२० चे कागदपत्र बनविण्यात आलेले आहेत. सदर परिशिष्ट "क" मधील कागद क्रमांक ४ ते १० हे सर्व संबंधीत खुलासा समाधानकारक असुन देखील केवळ पूर्वग्रह दूषित ठेवुन लिहिल्या गेलेले आहेत. परिशिष्ट "क" मधील कागद क्रमांक ४ ते १० हे प्रस्तुत अपिलातील परिच्छेद क्र.३ मधील मुद्दा क्र.५ व ६ प्रमाणे अधिकारनसताना निगर्मीत केलेले आदेश असल्याने ते सर्व आदेश रद्द व्हावे, ही नम्र विनंती.

महोदय, मी तांत्रिक विभागातील कर्मचारी असून मला प्रशासनाचे व आर्थिक बाबींचे अत्यल्प ज्ञान असून देखील मी माझ्यावर सोपविलेली जबाबदारी इमाने इतबारे कोणत्याही नियमांचे उल्लंघन न करता शुद्ध हेतूने बाबांच्या आशीर्वादाने पार पाडत आहे.

उपरोक्त सर्व मुद्दे विचारात घेता हे स्पष्ट होते की, मी साहित्य खरेदी केलेले नाही. मी संस्थानचे आर्थिक नुकसान केलेले नाही. मी संस्थानचे आर्थिक नुकसान टाळले तसेच कालापव्यय देखील होणार नव्हता व सदरहु बाब ही स्वयंस्पष्ट प्रस्तावात नमुद करुन प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेस्तव सादर केला होता. त्यामुळे मी खरेदी नियामावलीचा भंग केलेला नाही. तथापी, सीसीटीव्ही फुटेजमधील आक्षेपार्ह बाबी कोणत्या हे ठरविण्याचे अधिकार मला नव्हते व नाही. त्याबाबत वरिष्ठांनी निर्णय घेतलेनंतर त्यांचे आदेशानुसार मी सीसीटीव्ही फुटेज शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांना अचुक वेळेत सुपूर्द केले. माझ्यावरील करण्यात आलेले आरोप हे असत्य, निराधार व कपोल कल्पित आहेत. त्यामुळे ते मला मान्य नाहीत.

तरी, मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केलेले संदर्भीय आदेश व अभिकथन पत्र रद्द व्हावे, ही आपणांस नम्र विनंती." असे म्हटलेले आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत-

१) श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांना देणेत आलेले अभिकथनपत्र व आदेश रद्द होणेबाबत मा.अध्यक्ष महोदय, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस दि.०७.०५.२०२१ रोजी अपिल अर्ज केलेला आहे.

श्री. गवळी यांचे उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत विभागीय खातेचौकशी प्रस्तावीत केलेली आहे.

२) सदरची खातेचौकशी रद्द करणेकरीता श्री.गवळी यांनी दिलेल्या अपील अर्जाबाबत मा.अध्यक्ष महोदय, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वाक्षरीने जा.नं.स्वीस/२६/२०२१ दि.१७.०६.२०२१ रोजीचे पत्रासोबत श्री.गवळी यांचा दि.०७.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे.

सदरचे पत्रात," (१) अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद दोन प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व संबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल (असल्यास), त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत.

अ.नं.	अपीलकत्याचे नाव	दिनांक
१)	श्री.किशोर साहेबराव गवळी, प्रभारी ध्वनीक्षेपन व टेलीफोन विभाग प्रमुख, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	२८.०५.२०२१
२)	श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	१६.०६.२०२१

(२) आज दि.१७ जुन २०२१ रोजी श्री.साईनाथ रुग्णालय, शिर्डी या विभागामार्फत चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय (१) श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- व (२) श्री साईबाबा संस्थान मार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर सुरु करणेबाबत हे विषय चक्रीय पध्दतीने सादर करण्याची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करीता हे दोन्ही विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत." असे नमुद आहे.

सदरचा अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि.१७.०६.२०२१ रोजी सादर करणेत आलेला आहे.

सबब, श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांना उपरोक्त दोषारोपासबंधी सुरु करणेत आलेली खातेचौकशीची सद्यस्थिती प्रस्तावातील 'ब' मध्ये नमुद करणेत आलेली आहे. श्री.गवळी यांना देण्यात आलेले दोषारोप पत्राबाबत त्यांची सुरु असलेली खातेचौकशी पुर्ण करणेत येवून, त्यांचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल प्राप्त झालेनंतर मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर अवलोकनार्थ सादर करणेत येवून, मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करता येईल. तरी श्री.गवळी यांचे दि.१७.०६.२०२१ अपिल अर्जाबाबत विभागाचे असे मत आहे. अर्जाचे प्रकरण निकाली काढणेकरीताचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव-

श्री.गवळी यांचे विरुध्द उपरोक्त 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. सदर विभागीय चौकशी विरुध्द श्री.गवळी यांनी मा.तदर्थ समितीकडे दि.१७.०६.२०२१ रोजी अपील दाखल केले आहे. तरी विभागाचा अभिप्राय विचारात घेवून, निर्णय घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

26/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- १९

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दिनांक ०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत...

विषयाची पुर्वपिठीका :-

(अ) श्री.शिवगजे हे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी चे स्थायी प्राचार्य पद भरण्याची कार्यवाही सुरु असुन, सदरचे स्थायी प्राचार्य पद भरेपर्यंत अथवा पुढील आदेश होईपावेतो श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासकिय कामकाज सांभाळुन त्यांचेकडे दिलेला आहे.

त्यांचेबद्दल प्रशासकिय अधिकारी कक्ष यांचेकडील दि.०५.०८.२०२० रोजीचा संदर्भाकित अहवाल आणि विशेषत: सहायक कुलसचिव, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील दि.१९.०६.२०२० रोजीचे संदर्भीय पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. प्रशासकिय अधिकारी कक्ष यांचेकडील संदर्भाकित अहवाल व विशेषत: पुणे विद्यापीठ यांचेकडील पत्रात खालीलप्रमाणे नमुद आहे.:-

" शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाकरीता बेसिस शिक्षक मान्यतेबाबत.

स्थानीक निवड समितीद्वारे केलेल्या प्रक्रियेतुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता काही महाविद्यालयास शिक्षकी पदांना एका शैक्षणिक वर्षाकरीता (ॲडहॉक) मान्यता देण्यात आल्या होत्या. परंतु कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर टाळेबंदी व संचारबंदीमुळे विहीत प्रक्रिया अद्याप पुर्ण न होऊ शकल्यामुळे अशा हंगामी शिक्षकांना मुदतवाढ देण्याबाबत महाविद्यालयांनी केलेली विनंती विचाराधीन होती.

या संदर्भात प्राप्त आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एका शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंती वरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या कालावधी अथवा विहीत प्रक्रियेद्वारे नियमित पद भरती होई पर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ (Continution) देण्याचा धोरणात्मक निर्णय कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला आहे.

ज्या पात्र शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेली असुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे.अशा मान्यताप्राप्त शिक्षकांच्या सन २०२०-२१ या एका शैक्षणिक वर्षाकरीता नव्याने नियुक्ती दिलेले आदेश व रुजू अहवाल व संस्थेच्या सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षक मान्यतेची मुदतवाढ घेण्यासाठी केलेल्या ठरावासह आणि शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता दिलेले विद्यापीठ मान्यतापत्रासह पाठविल्यास अशाच शिक्षकांना विशेष बाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ यासाठी नियुक्तीच्या मान्यतेस मुदतवाढ देण्यात येईल. वरील निर्णय ३१ जुलै २०२० पर्यंत विद्यापीठास प्राप्त होणा-या प्रस्तावांना लागु राहिल.

यापुढे असेही कळविणेत येते की, ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकिय मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी घेतलेली नाही असे पदे भरतांना संस्थेने / महाविद्यालयाने शिक्षकिय पद भरण्यासाठी विहीत प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक राहिल. "

सन १९१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना त्यांनी ती प्राप्त करुन घेतली नाही. यावरुन श्री.शिवगजे हे अत्यंत बेजबाबदारपणे वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज करत असल्याचे दिसते.

तदनंतर वरीलप्रमाणे परिस्थिती असतांना सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाकरीता श्री साईबाबा महाविद्यालय यांना शिक्षक मान्यता मिळाली कि नाही याबाबत श्री.शिवगजे यांनी वरिष्ठांना माहिती दिली नाही. तसेच संदर्भीय पत्रान्वये पुणे विद्यापीठाने कळवूनही त्यांनी मागील शैक्षणिक वर्षाकरीता भरती केलेल्या शिक्षकांना मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समिती पुढे सादर करतांना श्री साईबाबा विद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता शिक्षकीय मान्यतेबाबत समितीला अवगत केलेले नाही.

सदर बाबत श्री.शिवगजे यांनी मा.वरिष्ठांना तात्काळ अवगत करुन उचित कार्यवाही न केल्याचे तसेच यामुळे श्री साईबाबा महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अध्यापन करणेकरीता प्राध्यापकांचे पदांबाबत विद्यापीठ व शासन स्तरावर तांत्रीक अडचण निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे. प्रशासकिय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांनी दि.०५.०८.२०२० रोजी अहवाल सादर केला असुन, श्री.शिवगजे यांचेकडुन झालेल्या दिरंगाईबाबत कारणे दाखवा नोटीस बजावून लेखी खुलासा मागविणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उपरोक्त संदर्भाकित पत्र व त्या अनुषंगाने सादर करणेत आलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, त्यांना नेमुन देणेत आलेल्या कामात हलगर्जीपणा व टाळाटाळ केल्याचे प्रकर्षाने दिसुन येत आहे.

पान नंबर २ वर...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.शिवगजे यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे.

सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.शिवगजे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/७६०/२०२० दि.०६-०८-२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता. त्यास अनुसरुन श्री.शिवगजे यांनी दि.१४.०८.२०२० रोजी लेखी खुलासा सादर केलेला आहे.

श्री.शिवगजे यांचा सेवेतील पुर्वइतिहास पहाता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (४) नुसार त्यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेत येत आहे. वेतनवाढ रोखून धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परीणामकारक होणार नाही. श्री.शिवगजे यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात येईल.

श्री.शिवगजे यांना जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त /१२८१/२०२० दि.१४.१०.२०२१ रोजीचे आदेशान्वये उपरोक्तप्रमाणे शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.०२.१२.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

(ब) मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.शिवगजे यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१२.११.२०२० रोजीचा अपील अर्ज दि.०१.१२.२०२० रोजी मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वीय सहाय्यक यांचेकडे दि.०१.१२.२०२० रोजी सादर केलेला आहे.

मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचीकडे श्री.शिवगजे यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१२.११.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी,"

संदर्भ- ०१.जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/१२०८/२०१८ दि.२६ जुलै २०१८

०२. जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/२३५६/२०२० दि.२५ जानेवारी २०२०

०३. जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/७६०/२०२० दि.०६.०८.२०२०

०४. दि.१४.०८.२०२० रोजीचा केलेला खुलासा.

०५.जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२८१/२०२० दि.१४.१०.२०२० रोजीचा आदेश

०६.संस्थान सेवा विनिमय-सेवा (शिस्त आणि अपिल) विनिमय, २०१३ मधील तरतूद

मी अर्जदार विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी तथा प्रभारी प्राचार्य श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी कारणे विनंतीपूर्वक अपिल अर्ज करतो की, मी सन १९९३ पासून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागात व सन २००० पासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सहा.शिक्षक म्हणून कार्यरत.आहे.

वरील संदर्भ क्र.०१ व ०२ अन्वये माझ्याकडे श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. वरिष्ठांचे निर्देशानुसार मी माझ्या मूळ पदाचे (श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे) कामकाज पाहून, माझ्याकडे सोपविलेल्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या कामाचा अतिरिक्त कार्यभार पाहात आहे.

संदर्भ क्र.३ चे कारणे दाखवा नोटीसद्वारे, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाकरिता ॲडहॉक Ad-hoc बेसिस शिक्षक मान्यतेबाबत-"स्थानिक निवड समितीद्वारे केलेल्या प्रक्रियेतून शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता काही महाविद्यालयास शिक्षकी पदांना एका शैक्षणिक वर्षाकरिता (ॲडहॉक) मान्यता देण्यात आल्या होत्या. परंतू कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी व संचारबंदीमुळे विहीत प्रक्रिया अद्याप पूर्ण न होऊ शकल्यामुळे अशा हंगामी शिक्षकांना मुदतवाढ देण्याबाबत महाविद्यालयांनी केलेली विनंती विचारधीन होती. यासंदर्भात प्राप्त आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एका शैक्षणिक वर्षाकरिता मान्यताप्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंतीवरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या कालावधी अथवा विहित प्रक्रियेद्वारे नियमित पद भरती होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत मुदतवाढ (Continuation) देण्याचा धोरणात्मक निर्णय कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला आहे. ज्या पात्र शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची

पान नंबर ३ वर...

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे. अशा मान्यताप्राप्त शिक्षकांच्या सन २०२०-२१ या एका शैक्षणिक वर्षाकरिता शिक्षक मान्यतेची मुदतवाढ घेण्यासाठी केलेल्या ठरावासह आणि शैक्षणिक वर्ष २०१९२० करिता दिलेले विद्यापीठ मान्यता पत्रासह पाठविल्यास अशाच शिक्षकांना विशेषबाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ यासाठी नियुक्तीच्या मान्यतेसह मुदतवाढ देण्यात येईल, वरील निर्णय दि.३१ जुलै, २०२० पर्यंत विद्यापीठास प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना लागू राहील. यापुढे असेही कळविण्यात येते की, ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकिय मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी घेतलेली नाही, असे पदे भरताना संस्थेने /महाविद्यालयाने शिक्षकीय पद भरण्यासाठी विहित प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक राहील." सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना आपण ती प्राप्त करुन घेतली नाही, यावरुन आपण अत्यंत बेजबाबदारपणे वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज करत असल्याचे दिसते.

तदनंतर वरीलप्रमाणे परिस्थिती असताना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा महाविद्यालय यांना शिक्षक मान्यता मिळाली की नाही याबाबत आपण वरिष्ठांना माहिती दिली नाही. तसेच संदर्भीय पत्रान्वये पुणे विद्यापीठाने कळवूनही आपण मागील शैक्षणिक वर्षाकरिता भरती केलेल्या शिक्षकांना मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समितीपुढे सादर करतांना श्री साईबाबा महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शिक्षकीय मान्यतेबाबत समितीला अवगत केलेले नाही.

सदरबाबत आपण मा.वरिष्ठांना तात्काळ अवगत करुन उचित कार्यवाही न केल्याचे तसेच यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अध्यापन करणेकरिता प्राध्यापकांचे पदांबाबत विद्यापीठ व शासन स्तरावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे निर्देशनास येत आहे. प्रशासकीय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांनी दि.०५.०८.२०२० रोजी अहवाल सादर केला असून, आपणाकडून झालेल्या दिरंगाईबाबत कारणे दाखवा नोटीस बजावून लेखी खुलासा मागविणेबाबत प्रस्तावित केले आहे. उपरोक्त संदर्भांकित पत्र व त्यानुषंगाने सादर करणेत आलेल्या कामात हलगर्जीपणा व टाळाटाळ केल्याचे प्रकर्षाने दिसुन येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चे उल्लंघन केलेले आहे. तरी ही नोटीसचा खुलासा प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संकुल यांचेमार्फत इकडील कार्यालयास सादर करणेत यावा, असे कळविलेले होते. त्यानुसार मी दि.१४.०८.२०२० रोजी माझा सविस्तर लेखी खुलासा मा.प्रशासकीय अधिकारी शैक्षणिक संकुल यांचेमार्फत सबळ पुराव्यानिशी सादर केलेला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

सविस्तर खुलासा खालीलप्रमाणे-

मुद्दा क्र.१ सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना आपण ती प्राप्त करुन घेतली नाही, यावरुन आपण अत्यंत बेजबाबदारपणे वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज करत असल्याचे दिसते, तदनंतर वरीलप्रमाणे परिस्थिती असताना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा महाविद्यालय यांना शिक्षक मान्यता मिळाली की नाही याबाबत आपण वरिष्ठांना माहिती दिली नाही, असे नमुद केलेले आहे.

खुलासा - सन २०१९-२० मध्ये प्राध्यापक पदासाठी झालेल्या मुलाखतीचा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे सादर करण्यासाठी गेलो असता, सदर पदभरतीची जाहिरात चुकीची असल्याने शिक्षकीय पदांना मान्यता मिळणार नाही, याबाबत श्री साईबाबा महाविद्यालयाच्या कार्यालयाकडील दि.२७.०७.२०१९ रोजीचे टिपणीअन्वये वरिष्ठांना सविस्तरपणे अवगत केलेले होते. (सदर टिपणीची छायांकित प्रत सोबत परिशिष्ट अ-१ म्हणून जोडलेले आहे.) तसेच त्यावर्षी शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी प्रथम केलेली भरती प्रक्रिया रद्द करुन, पुन्हा नव्याने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवावी लागणार होती, याबाबत वरिष्ठांना समक्ष भेटून सांगितले असता, सदरची बाब टिपणीमध्ये नमुद न करणेबाबत वरिष्ठांनी मौखिक निर्देश दिलेले होते.

मुद्दा क्र.२ संदर्भीय पत्रान्वये पुणे विद्यापीठाने कळवूनही आपण मागील शैक्षणिक वर्षाकरिता भरती केलेल्या शिक्षकांना मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समितीपुढे सादर करताना श्री साईबाबा महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शिक्षकीय मान्यतेबाबत समितीला अवगत केलेले नाही असे नमुद केलेले आहे.

खुलासा - कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर नवीन पदे न भरता, तसेच जाहिरात काढून नव्याने प्राध्यापक भरती न भरता, तसेच जाहिरात काढून नव्याने प्राध्यापक भरती न करता, मागील वर्षातील प्राध्यापकांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करावा, असे मौखिक निर्देश तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे साहेब यांनी दिलेले होते. त्यानुसार सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना सन २०२०-२१ करिता मुदतवाढ देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावेळी श्री साईबाबा महाविद्यालय कार्यालयाकडील दि.०४.०५.२०२० दि०९.०५.२०२० तसेच मा.तदर्थ समितीचे सभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये अद्यापं शिक्षक मान्यता/पदनिश्चिती मिळालेली नसल्याबाबत नमुद केलेले होते. (सदर टिपण्यांची छायांकित प्रत सोबत परिशिष्ट अ-२ म्हणून जोडलेले आहे.)

पान नंबर ४ वर...

मुद्दा क्र.३ सदरबाबत आपण मा.वरिष्ठांना तात्काळ अवगत करुन उचित कार्यवाही न केल्याने तसेच यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अध्यापन करणेकरिता प्राध्यापकांचे पदांबाबत विद्यापीठ व शासन स्तरावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे निर्देशनास येत आहे असे नमुद केलेले आहे.

खुलासा - सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापक यांना सन २०२०-२१ मध्ये मुदतवाढ देण्याचा विषय दि.०९.०५.२०२० रोजी सादर करण्यात आलेला होता, तसेच सदरबाबत मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेत निर्णय क्र.३०२ नुसार सदर प्राध्यापकांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली होती, मा.तदर्थ समितीचे मान्यतेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी CA दाखल करण्यात आलेला होता. मा.उच्च न्यायालयात CA दाखल झाल्यानंतर सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाकडील दि.१९.०६.२०२० रोजीचे संदर्भीय पत्र प्राप्त झालेले होते. त्यामुळे सदरचे पत्र वरिष्ठांकडे Whats App व email द्वारे पाठविले होते. त्यानंतर सदरचे पत्र समक्ष नेऊन, त्यावर काय कार्यवाही करावयाची याबाबत विचारणा केली असता, वरिष्ठांनी सदरचे पत्र संस्थानचे विधी विभागाकडे देण्यात आले. विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही होऊन, सदर पत्राचा उल्लेख मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या CA मध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे संदर्भीय पत्राबाबत वरिष्ठांना अवगत केले नाही, हे म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. (मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या CA ची छायांकित प्रत परिशिष्ट अ-३ म्हणून जोडलेले आहे.) तसेच सदर शिक्षकीय पदांना विद्यापीठाची मान्यता नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.१७ जुलै २०२० रोजीच्या निर्णयात देखील नमुद आहे. (सदरचा निर्णय परिशिष्ठ अ-४ म्हणून जोडलेले आहे.)

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ चे अवलोकन करता, सन २०१९-२० मध्ये झालेल्या प्राध्यापक भरतीची कार्यवाही वेळेत करुन, त्यावेळी आलेल्या अडचणींबाबत वरिष्ठांना तात्काळ अवगत केले होते. तसेच सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना २०२०२१ मध्ये मुदतवाढ देण्याबाबतचा विषय हा दि.११.०५.२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेत मान्य झालेला असून, विद्यापीठाकडून संदर्भीय पत्र हे दि.१९.०६.२०२० रोजी विद्यापीठाचे वेबसाईटवर टाकण्यात आले. त्यामुळे सदर पत्राचा उल्लेख मा.तदर्थ समितीचे सभेतील प्रस्तावामध्ये नाही. तसेच विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत वरिष्ठांना Whats App व email व समक्ष अवगत केलेले होते (परिशिष्अ अ-५) व त्यांचेच सुचनेनुसार सदरचे पत्र संस्थानच्या विधी विभागाकडे देण्यात आले. सदर पत्राचा उल्लेख मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या CA मध्ये व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी माझ्याकडून कुठल्याही प्रकारचा बेजबाबदारपणा , दिरंगाई अथवा गैरवर्तन झालेले नाही. झालेली सर्व कार्यवाही ही वरिष्ठांच्या निर्देशानुसार व मौखिक सुचनेनुसार झालेली आहे. तरी सदरची कारणे दाखवा नोटीस दप्तरी दाखल व्हावी, अशी विनंती केलेली होती.

मात्र मी सादर केलेला खुलासा किंवा त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा विचार न करता संदर्भ क्र.५ चे आदेशान्वये मला गैरशिस्तवर्तनाबाबत दंडात्मक कारवाई म्हणून माझी सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून धरणेत आली आहे.

त्यामुळे सदर अपिल अर्जानुसार आपणांस विनंतीपूर्वक मागणी करतो, की खालील कारणांमुळे सदरची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्याच्या दंडात्मक कारवाईचा आदेश रद्द करण्यात यावा, ही विनंती.

(१) श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पदाचे कामकाजाबाबत प्रशासनाने मला बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसचा खुलासा, सबळ पुराव्यानिशी आवश्यक त्या कागदपत्रांसह मी सादर केलेला आहे. मी सादर केलेला खुलासा अथवा स्पष्टीकरण तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नाकारलेले नाही. याउलट माहितीच्या अधिकारात मला प्राप्त झालेल्या दस्तऐवजानुसार सादरकर्ते अधिकारी (अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग) यांनी प्रशासकीय अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांचेमार्फत मला बजावलेली कारणे दाखवा नोटीस, मी दिलेल्या खुलाशाचे अवलोकन करुन दप्तरी दाखल करण्याचा प्रस्ताव त्यांच्या दि.३/९/२०२० रोजी सादर केलेला आहे, असे आढळून येत आहे. (परिशिष्ट अ-६)

(२) मा.तदर्थ सिमतीच्या समोर दि.७ ऑगस्ट २०२० रोजी चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या निर्णयामध्ये मा.तदर्थ समितीने मुद्दा क्र.०६ व ७ मध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती या सर्व बाबींचा पुनःविचार /पुनर्वलोकन व्हावे. यामध्ये मी प्रशासनाला प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत प्रशासनास दि.२५/०७/२०१९ रोजी अहवाल दिलेला असल्याची माझ्या नावानीशी नोंद आहे. (परिशिष्ट-अ-७ व अ-८) त्यामुळे प्रशासनाने बजावलेली कारणे दाखवा नोटीस अवैध ठरते आणि त्यानुसार झालेली कारवाई अवैध आहे.

पान नंबर ५ वर...

(३) मा उच्च न्यायालयात दाखल करावयाच्या सिव्हील ॲप्लिकेशन (याचिका) मध्ये सदर शिक्षकांना मान्यता नसल्याचे मा.प्रशासकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने विधी विभागास दुरुस्ती कळविली होती. (परिशिष्ट अ-९) त्यामुळे त्यांना अवगत केले नाही हे चुकीचे आहे व त्यांनी केलेली तक्रार /रिपोर्ट चुकीचा ठरतो.(परिशिष्ट -अ-१०) त्यामुळे त्या आधारावर केलेली दंडात्मक कारवाई अवैध आहे.

(४) श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पद माझ्या पदोन्नती साखळीत नाही. मात्र माझी शैक्षणिक पात्रता M.Sc.,M.Ed.,SET,NET अशी असल्याने तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझी मागणी नसतांना मला दिलेल्या आदेशानुसार मी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून कामकाज पाहिलेले आहे आणि पाहत आहे. जुलै २०१८ ते आजपर्यंत या तीन शैक्षणिक वर्षाच्या काळात श्री साईबाबा महाविद्यालय नवीन असून सुध्दा विद्यार्थ्यांसाठी नामांकित महाविद्यालयात असलेल्या योजना व उपक्रम यामध्ये 'कमवा आणि शिका योजना' राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, बहिशाल केंद्र श्री साईबाबा महाविद्यालयात सुरु केले. तसेच विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना सुरु केल्या असून, त्याचा फायदा महाविद्यालयातील बहुतांशी विद्यार्थ्यांना घेत आहेत. विद्यापीठात व परिसरात श्री साईबाबा महाविद्यालयाचे नावलौकिक वाढलेले आहे. त्यामुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोविड-१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबर -२०२० मध्ये होत असलेल्या ऑफलाईन परीक्षेसाठी राहाता तालुक्यासाठी आपल्या श्री साईबाबा महाविद्यालयात परिक्षा केंद्र मंजुर केले, ही बाब महाविद्यालयासाठी तसेच संस्थानसाठी अभिमानास्पद आहे. श्री साईबाबा महाविद्यालयात ६३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यामुळे महाविद्यालयाचे कामकाज मी बेजबाबदार पध्दतीने पाहत आहे हे म्हणणे चुकीचे आहे.

(५) श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीच्या प्रभारी प्राचार्य पदाचे अतिरिक्त कामकाज पाहण्यासाठी शासन नियमांनुसार देय असलेले अतिरिक्त कामकाजाचे अतिरिक्त विशेष वेतन मला दिलेले नाही तसेच अद्याप दिले जात नाही.

(६) श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीच्या प्रभारी प्राचार्य पदाचे अतिरिक्त कामकाज पाहण्यासाठी मला माझ्या अध्यापकीय कामकाजातून सूट/सवलत दिलेली नाही व अद्याप जात नाही. (मला माझ्या Physics विषयाच्या पूर्णवेळ शिक्षक पदाचे अध्यापकीय कामकाज तसेच माझ्या Physics विषयाच्या रिक्तत असलेल्या आणखी एका शिक्षक पदाचे अतिरिक्त अध्यापकीय कामकाज मी विभागून करतो आहे.)

(७) श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीच्या प्रभारी प्राचार्य पदाचे अतिरिक्त कार्यभार माझ्याकडे दिल्यापासून मी माझ्या मुळ पदासाठी असलेल्या दिर्घ मुदतीचा सुटटया अथवा इतर कोणत्याही सुटटया उपभोगलेल्या नाहीत. याउलट मी पुर्णवेळ श्री साईबाबा महाविद्यालयाचे कामकाज अत्यंत निष्ठेने व जबाबदारपणे करत आहे.तरीही माझ्यावर मी न केलेल्या चुकीसाठी आर्थिक दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(८) सदरची दंडात्मक कारवाई माझ्या मूळ शिक्षक पदाच्या कामकाजाबाबत नसून तर अतिरिक्त कार्यभार असलेल्या प्रभारी प्राचार्य पदाचे कामकाजाबाबत आहे, की ज्याचे मला वेतन/मानधन मिळत नाही किंवा या कामकाजासाठी मला माझ्या शिक्षक पदाच्या कामातून सूट /सवलत नाही आणि अशा या कामाबददल बेजबाबदार असल्याचा सिध्द न झालेला खोटा आरोप ठेवून बळजबरीने केलेली आर्थिक स्वरुपाची दंडात्मक कारवाई अवैध ठरत आहे.

वर नमुद केलेली वस्तुस्थिती तथा वरील सर्व बाबींचा विचार केल्यास, मी दोषीच ठरत नसल्याने, माझ्यावर सन २०२१ ची वेतनवाढ रोखून धरणेबाबत केलेली दंडात्मक कारवाई अन्यायकारक ठरत आहे.त्यामुळे सदरची कारवाई रद्द करण्यात यावी आणि मला न्याय द्यावा, ही नम्र विनंती. " असे म्हटलेले आहे.

श्री.शिवगजे यांनी सदरचे अपील अर्जात जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२८१/२०२० दि.१४.१०.२०२० रोजीचे आदेशान्वये त्यांना उपरोक्त प्रमाणे करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

सदरचे श्री.शिवगजे यांचे अपील अर्जावर मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे स्वाक्षरीने जा.नं.आस्था/१८३/२०२१ दि.२४ मे २०२१ रोजीचे पाठविलेल्या पत्रासोबत श्री.शिवगजे यांचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे

सदरचे पत्रात," अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत. " असे नमुद आहे.

पान नंबर ६वर...

सदरचे अर्ज मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.२४.०५.२०२१ रोजीचे पाठविलेले पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेले आहे. सदरचे अपील अर्जावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२७.०५.२०२१ रोजी To much delayed असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी श्री.शिवगजे यांचे अपिल अर्जावर सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत. असे नमुद आहे.

श्री.शिवगजे यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत कारणे दाखवा नोटीस देणेत येऊन, त्यास अनसरुन त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला आहे. सदरचा त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा विनिमयातील किरकोळ दंडात्मक कार्यवाही अतर्गत त्यांना शिक्षा करणेत आलेली आहे. त्यांची याकरीता विभागीय चौकशी करणेत आलेली नसल्याने, त्यांचा चौकशी अहवाल/निष्कर्ष अहवाल नाही.

श्री.शिवगजे यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) नुसार त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेची शिक्षा त्यांना करणेत आलेली आहे. वेतनवाढ रोखुन धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परिणामकारक होणार नाही. श्री.शिवगजे यांची सन २०२१ ची एक वेतनवाढ एक वर्ष रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात. असे आदेशात नमुद आहे.

श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दिनांक ०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जात त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२८१/२०२० दि.१४.१०.२०२० रोजीचे आदेशान्वये करणेत आलेली शिक्षा रद्द करणेची विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.०१.१२.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

सबब, श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी त्यांना करणेत आलेल्या शिक्षेबाबत केलेल्या अपिल अर्जावर निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

11/06/21

(काकूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- 20

111

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक १५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत...

विषयाची पुर्वपिठीका :-

(अ) श्री.पवार हे श्री साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये वर्ग-०४ कर्मचारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

श्री.पवार यांनी शिर्डी येथे असलेल्या S-9 या चॅनलला खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे. त्यांनी इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे समोर बोलतांनी प्रशासनाची पुर्व परवानगी घेतलेली नाही.

श्री साई संस्थानमधील कामगार हे कोरोणाबाधीत कर्मचा-यांच्या सुरु असलेल्या मालीकेपुढे भयभीत झालेले असून रुग्णालय विभाग वगळता श्री साई संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुठल्याही कर्मचा-यांचे आणि त्याचे परिवाराचे लसीकरण अद्यापही संस्थानने केले नसुन, श्री साईबाबा संस्थान कर्मचा-याला साईबाबा कोव्हिड रुग्णालयामध्ये राखीव खाटा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मागणी श्री साई एम्प्लॉईज क्रेडीट सोसा.चे संचालक श्री.विठ्ठल पवार यांनी केली आहे.असे म्हटलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानमध्ये या कोरोणा महामारीमुळे कामगार भयभीत झालेला असून, लसीकरणाच्या बाबतीत प्रशासनाला वेळोवेळी निवेदन देण्यात आले. परंतु अद्यापपर्यंत कर्मच्या-यांना रुग्णालय विभाग वगळता लसीकरण करण्यात आलेले नाही. त्या कर्मचा-यांवर अवलंबून असणा-या कुटूंबातील पत्नी,आई-वडील व मुले यांनाही लसीकरण करणे गरजेचे आहे. तसेच श्री साईबाबा संस्थानमधील कर्मचा-यांना रुग्णालयामध्ये ॲडमीट करतांना राखीव खाटा उपलब्ध होत नाही आणि त्यामुळे अनेक कर्मचा-यांनी बाहेरील रुग्णालयाकडे उपचार घेतलेले असून, त्याची वैद्यकिय बीलेही अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेले नाही. प्रशासनाचे बाबतीमध्ये कागदोपत्री घोडे नाचविण्याचे काम केल जात असून कामगारांना दिलासा देण्याचे काम मात्र केलं जात नाही आणि कामगार एक भयभीत अशा दडपणाखाली काम करत असून संरक्षण विभाग असेल, प्रसादालयील वाढपी असतील, कॅन्टीन विभाग असेल, वाहन विभाग असेल आणि भक्तनिवास असेल, रुग्णालय विभागातील काही कर्मचारी असतील त्यांना तीथे औषधे उपलब्ध होत नाही. तसेच खाटाही उपलब्ध होत नसल्यामुळे या कर्मचा-यांमध्ये प्रशासनाचे विरोधामध्ये अत्यंत नाराजी आहे. प्रशासनाने त्यांची गंभीर स्वरुपात दखल घ्यावी.आम्ही १८ मार्च रोजी एक निवेदन दिले, ०३ मे ला एक निवेदन दिले कि कर्मचा-यांचा नैसर्गिक विमा उतरविणे गरजेचे आहे. या महामारीमध्ये दररोज एक ते दोन कर्मचारी मयत असून, आतापर्यंत कर्मचा-यांचे रोजही मालीकाच चालू झालेली आहे. त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर त्वरीत कामावर घ्यावे आणि कामगार कल्यान निधी जो संस्थानकडे राखीव आहे या निधीतून तात्काळ कर्मचा-यांना विमा संरक्षण मिळावं आणि नैसर्गिक विमा उतरविल्यानंतर त्या कर्मचा-याच्या कुटूंबाला अर्थिक स्थैर्यता लाभेल. तसेच ज्या कामगारांच्या बाबतीमध्ये प्रशासनाने ठोस अशा स्वरुपाचे निर्णय घेवून, सॅनिटायझर वगळता आणि मास्क वगळता साई संस्थानमधील कर्मचा-यांना कोविडचे काळात फार अशा काही वैद्यकिय सुविधा दिल्या जात नाही. त्यामुळे कर्मचा-यामध्ये नाराजीचा सुर आहे. या मयत झालेल्या कर्मचा-यांची मालीका थांबविण्याचे काम तात्काळ रुग्णालय प्रशासनाने करावे. कर्मचा-यांना खाटा उपलब्ध करुन दयावा व नैसर्गिक विम्या संदर्भात प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावा अशी आमची प्रशासनाकडे मागणी आहे. व संस्थानच्या कायम, इनसोर्स तसेच आऊटसोर्स तसेच सर्व एकत्र मिळून जवळ जवळ १०० ते १५० कर्मचा-यांनी उपचार घेतलेले आहेत. त्यातील काही बरे झाले परंतु सध्या एक मालीका चालु झालेली आहे आणि कर्मचारी मयत होऊ राहिले आहे. त्या संदर्भामध्ये जवळजवळ २० ते २५ कर्मचारी मयत झाले असून, त्या रुग्णालयाच्या जे डॉक्टर्स आहेत हे एम.डी.फिजीशियन डॉक्टरची खरोखर तेथे आवश्यकता असतांना जर साई संस्थान आर एम ओ डॉक्टरांवर जर उपचार देत असाल तर त्या डॉक्टरांमुळे साई संस्थानच्या कामगारांचे बळी गेलेले आहे ही पोकळी न भरुन निघणारी आहे. त्या कुटूंबावरची आजची परिस्थिती पहाता प्रशासनाने त्या साई संस्थानमधील डॉक्टरांच्या बाबतीत योग्य तो निर्णय घेवुन कर्मचा-यांना तात्काळ वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. प्रशासनाने राखीव स्वरुपाच्या खाटा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत.कर्मचारी बेडसाठी वणवण करीत हिंडतात. असे म्हटलेले आहे.

श्री.पवार यांनी S-9 टी व्ही चॅनलला मुलाखत देतांना प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. श्री.पवार यांनी संस्थान प्रशासनावर S-9 टी व्ही चॅनलला मुलाखत देऊन चुकिचे व बेछुट आरोप केलेले आहे. सद्यस्थितीत श्री.पवार यांची नेमणूक साईआश्रम भक्तनिवास येथे असून त्यांचा साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलला काहीही संबध नाही, असे असतांनाही त्यांनी हॉस्पिटल व संस्थान प्रशासनावर चुकीचे आरोप करुन श्री साईबाबा संस्थान व संस्थान हॉस्पिटल यांची बदनामी केली.

पान नंबर २ वर...

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.पवार यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४१/२०२१ दि.१२-०५-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन श्री.पवार यांनी दि.१७.०५.२०२१ रोजीचा सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

सबब, श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्तनिवास, सध्या आरोग्य विभाग यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (४) नुसार त्यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेत येत आहे. वेतनवाढ रोखून धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परीणामकारक होणार नाही. श्री.पवार यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

श्री.पवार यांना जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१.०५.२०२१ रोजीचे आदेशान्वये उपरोक्तप्रमाणे शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.१५.०६.२०२१ रोजीचे अर्जान्वये अपील सादर केलेले आहे.

(ब) मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.पवार यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१५.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज दि.१६.०५.२०२१ रोजी मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेला स्वीय सहाय्यक यांचेकडे दि.१६.०५.२०२१ रोजी सादर केलेला आहे.

मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचीकडे श्री.पवार यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१५.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी," विधाने व मजकूर यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मी यापुर्वी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४१/२०२१, दि.१२/०५/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीसला दिलेला दि.१७/०५/२०२१ रोजीचा खुलासा या अपिलाचा भाग म्हणून वाचण्यात यावा. ही विनंती तसेच त्याची प्रत आपले अवलोकनार्थ या अपिलासोबत सादर करत आहे.

कार्यकक्षा:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम-२०१३ (येथून पुढे याबाबत **सेवा विनियम** असा उल्लेख केला जाईल.) मधील नियम क्र.१४ नुसार मी सदरचे अपील करत आहे. या नियमात अशी तरतुद आहे की, तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदीच्या आधीन राहून संस्थान कर्मचारी त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पारीत केलेला आदेशा विरुध्द समितीकडे अपील दाखल करु शकतो.

अपिलाची कालावधी मर्यादा:-

सेवा विनयम मधील नियम क्र.१५ मध्ये अशी तरतूद आहे की, कोणतेही अपील अपिलदाराला ज्या आदेशाविरुध्द अपील करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे. अन्यथा ते स्वीकारले जाणार नाही. संदर्भिय आदेश दि.२१/०५/२०२१ रोजीचा आहे.त्यामुळे अपील मुदतीत आहे.

अपिलाची कारणे:-

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी माझ्या दि.१७/०५/२०२१ रोजीच्या खुलाशाचा मनःपूर्वक विचार केलेला नसून मला नैसर्गिक न्याय तत्वानुसार न्याय दिलेला नाही.

२) मी माझ्या दि.१७/०५/२०२१ रोजीच्या खुलाशात उपस्थित केलेले मुद्दे विचारात न घेता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संदर्भिय आदेश पारीत केलेला आहे.

३) सेवा विनियम मधील नियम क्र.१० (२) मध्ये अशी तरतुद आहे की, कोणत्याही कालखंडासाठी संचयी परिणामसहीत वेतनवाढ रोखणे किंवा वेतनवाढ रद्द करणे प्रस्तावित करणेत आले असेल तर विनियम ८ उपविनियम (२) आणि (२७) मध्ये विशद केलेल्या पध्दतीने अशा प्रकारची दंडात्मक कारवाई संस्थानच्या कर्मचा-यांवर लादण्यापूर्वी, चौकशी केली जाईल.

महोदय, सदरच्या निर्णयानुसार संदर्भिय आदेश पारीत करण्यापुर्वी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केलेली नाही. म्हणजेच या सेवा विनयमातील या नियमांचा भंग करण्यात आलेला आहे.

४) मी संस्थान कर्मचा-यावर होणा-या अन्यायाला, झालेल्या अन्यायाला तसेच न्याय हक्काच्या सनदशीर व कायदेशीर मार्गाने वाचा फोडली व फोडत आहे. मी साईबाबा संस्थान एम्प्लॉईज सोसायटी (कर्मचारी सोसायटी) संचालक असून, कामगार नेता आहे. याचा राग मनात धरुन संदर्भिय आदेशाने मला शिक्षा करण्यात आलेली आहे. तसेच मी साईआश्रम भक्तनिवास विभागात शिफ्ट सुपरवायझर म्हणून काम करत असतांना संदर्भ २ अन्वये माझी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार पदी तडकाफडकी बदली केली आहे.

पान नंबर ३ वर...

घटनेची पार्श्वभूमी:-

१) मी दि.१८/०३/२०२१ रोजीचे निवेदन आपणासमोर व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर केलेले आहे. त्यात प्रामुख्याने पुढील मागण्या कर्मचारी हितासाठी केलेल्या आहेत. संस्थान कर्मचा-यांना कोरोना (कोव्हीड-१९) बाबत विमा उतरविणेत यावा. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण२०२०/प्र.क्र.४/व्यय/९/दि.१४/०५/२०२१ नुसार संस्थान कर्मचा-यांना आर्थिक सहारय्य मिळावे, संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांना कोरोना बाबतचे संपूर्ण उपचार मोफत करणेत यावेत, संस्थान रुग्णालयात बेड शिल्लक नसल्याने ज्या कर्मचारी व त्यांचे अवलंबीत कुटुंबातील सदस्य यांनी तातडीने खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत त्यांची बिले अदा करावीत.

२) मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर दि.०३/०५/२०२१ रोजीचे निवेदन सादर केलेले असून, त्यामध्ये पुढीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत. संस्थानचे विविध विभागात सेवा देत असताना २० ते २५ कर्मचारी जीव गमवावा लागला त्यांच्या कुटुंबांना शासन निर्णयाप्रमाणे आर्थिक मदत मिळावी, तसेच संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांना संस्थानमार्फत मोफत लसीकरण करणेत यावे, संस्थान कर्मचारी व कुटुंबीय यांना कोरोना रोगाच्या उपचारासाठी राखीव बेड असावेत, कोरोनामुळे मयत झालेल्या कर्मचा-यांचे वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी हया प्रामाणिक हेतूस्तव विनंती केलेली होती.

३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४१/२०२१ दि.१२/०५/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस माझ्यावर बजावली. त्यात माझ्यावर असे आरोप ठेवणेत आला की, आपण शिर्डी येथील स्थानिक एस-९ टीव्ही चॅनेलला प्रशासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पुढील प्रमाणे माहिती दिली. कोरोना रोगाच्या महामारीमुळे संस्थान कर्मचारी भयभीत झालेले आहेत. रुग्णालय विभाग वगळता इतर कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांचे लसीकरण संस्थानने केलेले नाही. कोरोना बाधित कर्मचा-यांस संस्थान रुग्णालयात खाटा उपलब्ध होत नाही. खाजगी उपचार घेतल्यास वैद्यकीय बीले अदा केली जात नाही.कर्मचा-यांना विमा उतरविणे गरजेचे आहे. संस्थान रुग्णालयात ऐनवेळेस एम.डी. डॉक्टर उपलब्ध नसतात. संस्थानने योग्य तो निर्णय घेऊन संस्थान कर्मचा-यांना वैद्यकीय सुविधा व बेड तात्काळ उपलब्ध करुन दयावेत. याप्रमाणे आपण हॉस्पीटल व प्रशासन यांचेवर चुकीचे बेछुट आरोप करुन बदनामी केलेली आहे.

४) मी वरील कारणे दाखवा नोटीस बाबत माझा दि.१७/०५/२०२१ रोजीचा खुलासा सादर केलेला आहे. त्यात मी स्पष्ट नमूद केले आहे की, मी चुकीचे आरोप करुन संस्थानची बदनामी केलेली नाही. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.०५/०५/२०२१ रोजी व दि.१३/०५/२०२१ रोजी प्रसार माध्यमांना जी माहिती दिली. त्याचाच आधार घेऊन मी वस्तुस्थिती मांडलेली आहे. तथापी सदर न्यूज चॅनेलने स्थानिक सामाजिक कार्यकर्ते श्री.सचिन चौगुले यांचीही प्रतिक्रीया घेऊन त्यांची बाईट नंतर सदरचे बातमीमध्ये माझी प्रतिक्रीया दाखविल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मला कारणे दाखवा नोटीस बजावली मी कामगार हितासाठी मूलभूत हक्कांसाठी उचित न्याय मिळावा यासाठी प्रतिकीया व्यक्त केली असून त्यामध्ये कुठेही संस्थानची बदनामी केलेली नाही.

५) माझ्या खुलाशाचा योग्य तो विचार न करता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१/०५/२०२१ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून माझी सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून धरलेली आहे.

६) मी दि.२०/०५/२०२१ रोजी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजेचा अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन माझी सदरची अर्जित रजा प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व निवासस्थाने प्रशासकीय अधिकारी यांनी मंजुर केलेली होती. परंतु अचानक प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास यांनी दि.२७/०५/२०२१ रोजीचे पत्राने मला असे कळविले की आपण दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ पर्यंत अर्जित रजा मिळणेबाबत अर्ज दिलेला होता.परंतु कोव्हीड -१९ चे पार्श्वभूमीवर कामाचे अडचणीमुळे तुमची दि.२१/०५/२०२१ ते दि. २४/०५/२०२१ पर्यंत रजा मंजुर करणेत आली असून, पढील रजा मंजुर करता येणार नाही. याबाबत व त्वरीत डयुटीवर हजर व्हावे अशा आशयाचा एसएमएस भ्रमणध्वनीद्वारे कळविलेले आहे. परंतु आपण अदयापपर्यंत कामावर हजर झालेला नाहीत. सदरचे पत्र मी घरी नसतांना माझ्या घरावर चिकटविण्यात आले. माझे मुंबई येथील साडूबंधू यांचे कोरोनामुळे दुःखद निधन झालेले असल्याकारणामुळे मी त्यांचे कुटुंबीयांना भेटण्यासाठी मुंबई येथे गेलेलो असल्याने मी निवासस्थानी नसल्याने मी उदया आपणाकडून पत्र घेतो असे प्र.अधिक्षक यांना सांगितले तथापी त्यांनी माझ्या निवासस्थानी गावांतील लोकांसमोर नोटीस/पत्र चिटकविले. माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीची अर्जित रजा मंजुर झालेची नोंद हजेरी अभिलेखावर घेण्यात आली होती. माझी

कसल्याही प्रकरची कोव्हीड रुग्णांचया सेवेसाठी डयुटी नेमण्यात आलेली नसतांना माझी अर्जित रजा अचानक रद्द केली. याबाबत मी माझा दि.२८/०५/२०२१ रोजीचा सविस्तर पत्र प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व निवासस्थाने प्रशासकीय अधिकारी यांना ई-मेलद्वारे सादर केलेले आहे. परंतु त्याचा विचार न करता याकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३७२/२०२१ दि.०३/०६/२०२१ अन्वये माझेवर पुन्हा कारणे दाखवा नोटीस बजावली असून , त्यास अनुसरुन मी माझा दि.०७/०६/२०२१ रोजीचा खुलासा सादर केलेला आहे. त्याचा अदयाप पर्यंत विचार करण्यात आलेला नाही.

पान नंबर ४ वर...

७) माझी एस-९ चॅनलने घेतलेल्या प्रतिक्रीया व त्यानंतर मी सादर केलेल्या खुलाशानंतर मी साईआश्रम भक्तनिवास या विभागात शिफट सुरपवायझर म्हणून काम करीत असतांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझया शैक्षणिक आर्हतेचा विचार न करता केवळ आकस व सूड बुध्दीने माझी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार म्हणून बदली केलेली आहे. आदेशाचा अवमान होऊ नये मी आरोग्य विभागात रुजू झालेलो आहे. मी पदवीधर असून, मी सन २०१३ पासून लिपीक पदाचे कामकाज करीत आहे. तसेच माझे मराठी व इंग्रजी टायपिंगचा कोर्स पूर्ण केलेला असून, एमएससीआयटी संगणक कोर्स झालेले आहे.

८) माझी आई आजारी असल्याने त्यांचे उपचारासाठी मी दि.०६/०६/२०२१ रोजी रजा अर्जाद्वारे दि.१०/०६/२०२१ ते दि.१२/०६/२०२१ अखेर ०३ दिवस रजेची मागणी केली होती. परंतु दि.१०/०६/२०२१ रोजी संस्थान दूरध्वनीवरुन मला असे कळविणेत आले की, रजा नामंजुर करणेत आली. तुम्ही कामावर हजर व्हावे. वास्तविक रजा नामंजुर करणेस विशेष कारण नसतांना केवळ हेतू हाच आहे की मला वारंवार त्रास देणे, अडचणीत आणणे, मानसिक छळ करणे हाच प्रशासनाचा हेतू दिसत आहे.

युक्तीवाद:-

१) मी कर्मचारी हितासाठी प्रशासनास दि.१८/०३/२०२१ व दि.०३/०५/२०२१ रोजी निवेदन सादर केलेली आहेत. माहे मे-२०२१ अखेर २० ते २५ संस्थान कर्मचा-यांचा कोरोना (कोव्हीड-१९) आजाराने दुःखद निधन झालेले आहे. कोरोना रोगाचे प्रादुर्भावामुळे संस्थान कर्मचारी भयभीत झालेले आहेतण् अनेक कर्मचारी व त्यांचे कुटूंबातील सदस्य यांचे निधन झालेले असून, संस्थान रुग्णालयातील मदतीसाठी एक कामगार प्रतिनिधी त्यांच्या कुटुंबातील सदस्य या भावनेने मला त्यांनी भ्रमणध्वनीद्वारे मदतीसाठी याचना आर्त हाक दिलेली असून, प्रसंगानूसार मी त्यांना मदत केलेली आहे. संस्थान कर्मचारी यांनी मला साईबाबा संस्थान एम्प्लॉईज सोसायटीच्या माध्यमातून संचालक म्हणून निवडून दिलेले आहे. ते मला आपला प्रतिनिधी मानतात. अनेक कर्मचारी यांनी मदतीसाठी माझ्याशी संपर्क केला आहे व करत आहे.

२) कोरोना काळात संस्थान रुग्णालयाकडून संस्थान कर्मचा-यांना योग्य व आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा, उपचार मिळत नाही. कामगारांचे लसीकरण नाही. कर्मचारी व त्यांचे अवलंबीत कुटुंबातील सदस्य यांना खाटा उपलब्ध नसतात. कर्मचा-यांचे विमा कवच नाही या व अशा अनेक कारणांमुळे संस्थान कर्मचारी यांचा कोव्हीड काळात मृत्यु झालेला असल्याने ही बाब स्थानिक ज्युन चॅनेलचे प्रतिनिधी याच्या लक्षात आली असता त्यांनी कर्मचारी सोसायटी संचालक व कामगार प्रतिनिधी या नात्याने माझ्याशी संपर्क साधला असता मी त्यांचेसमोर वरीलप्रमाणे वस्तुस्थिती मांडली संस्थान रुग्णालय, प्रशासन यांची बदनामी करणेचा माझा हेतू नव्हता व नाही. सर्व कर्मचा-यांचे हितासाठी व त्यांचे मुलभुत हक्कांसाठी मी एस-९ चॅनेलकडे भावना/प्रतिक्रिया व्यक्त केली. मी संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांची बदनामी केलेली नाही. यापुर्वी अनेक संस्थान कर्मचारी यांनी मुलाखती दिलेल्या आहेत. त्यांनी संस्थानची पूर्व परवानगी घेतलेली नाही. त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणेत आलेली नाही. परंतु संदर्भिय आदेशाने मला शिक्षा करण्यात आलेली आहे. याकामी प्रशासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागते याबाबत मी अनभिज्ञ आहे. वास्तविक पाहता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्मचारी यांचेकरिता संस्थान वैद्यकीय सुविधांबाबत संवेदनशीलपणे कोरोना आपत्कालीन परिस्थिती योग्य प्रकारे हाताळली असती तर निश्चितपणे संस्थान कर्मचारी यांचा मृत्यु दर कमी असता, जे कर्मचारी कोरोना रोगामुळे मृत्युमुखी पडलेले आहेत अशा कुटुंबाला निदान सांत्वन/आधार देण्याची कुटुंब प्रमुख म्हणून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे.

३) माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजा मंजुर असताना अचानक दि.२५/०५/२०२१ पासूनची रजा नामंजुर केलेली आहे. वास्तविक रजा नामंजुर करणेसाठी खास विशेष कारण नव्हते व नाही. केवळ मला त्रास देणेचा काही वरिष्ठांचा दूषित हेतू आहे.

४) मी साईआश्रम भक्तनिवास विभागात शिफ्ट सुपरवायझर म्हणून काम करत असताना माझे काम उत्कृष्ट असताना माझे विरुध्द कोणाची तक्रार नसतांना केवळ मी कर्मचा-यांचे हितासाठी लढतो म्हणून सूड व आकस मनात ठेवून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार म्हणून बदली केलेली आहे. आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून मी आरोग्य विभागात रुजु झालेलो आहे.

५) मी दि.०६/०६/२०२१ रोजी ७० वर्षीय वयस्कर आईस वैद्यकीय उपचारासाठी दि.१०/०६/२०२१ ते दि.१२/०६/२०२१ या कालावधीसाठी रजा मागणी केली असता, काहीही विशेष कारण, अडचण नसताना माझी रजा ऐनवेळी नामंजुर केली आहे.

अशा प्रकारे मी केवळ कामगार हितासाठी आवाज उठवितो त्यांचे प्रश्नांसाठी लढतो म्हणून माझी ऐनवेळी रजा नामंजुर करणे, माझी आरोग्य विभागात स्वच्छता विभागात तडकाफडकी बदली, मला नोटीसा देणे ही मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित विभागप्रमुख यांची कृत्य म्हणजे केवळ मला शारीरीक मानसिक, आर्थिक त्रास देणे अडचणीत आणणे तसेच सामाजिक मानहानी करणे हा दूषीत हेतू होता व आहे.

तरी माझी महोदय आपणांस नम्र प्रार्थना की वरील सर्व बाबींचा सहानुभुती पूर्वक विचार करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संदर्भिय दोन्ही आदेश रद्द करणेत यावी ही विनंती." असे म्हटलेले आहे.

पान नंबर ५ वर...

श्री.पवार यांनी सदरचे अपील अर्जात जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१.०५.२०२१ रोजीचे आदेशान्वये त्यांना उपरोक्त प्रमाणे करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

श्री.पवार यांचे अपील अर्जावर मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे स्वाक्षरीने जा.नं.स्वीय/२६/२०२१ दि.१७ जुन २०२१ रोजीचे पाठविलेल्या पत्रासोबत श्री.पवार यांचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे.

सदरचे पत्रात," सदरचे पत्रात," (१) अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद दोन प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल (असल्यास), त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत.

अ.नं.	अपीलकत्याचे नाव	दिनांक
१)	श्री.किशोर साहेबराव गवळी, प्रभारी ध्वनीक्षेपन व टेलीफोन विभाग प्रमुख, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	२८.०५.२०२१
२)	श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	१६.०६.२०२१

(२) आज दि.१७ जुन २०२१ रोजी श्री.साईनाथ रुग्णालय, शिर्डी या विभागामार्फत चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय (१) श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- व (२) श्री साईबाबा संस्थान मार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर सुरु करणेबाबत हे विषय चक्रीय पध्दतीने सादर करण्याची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करीता हे दोन्ही विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत." असे नमुद आहे." असे नमुद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी श्री.पवार यांचे अपिल अर्जावर सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या नियमीत बैठकीत ठेवण्यात यावेत. असे नमुद आहे.

श्री.पवार यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत कारणे दाखवा नोटीस देणेत येऊन, त्यास अनुसरुन त्यांनी दि.१७.०५.२०२१ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यांनी दिलेला खुलासा अमान्य करण्यात आलेला आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (४) नुसार सेवा विनिमयातील किरकोळ दंडात्मक कार्यवाही अंतर्गत त्यांना शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री.पवार यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) नुसार त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेची शिक्षा करणेत आलेली आहे. वेतनवाढ रोखुन धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परिणामकारक होणार नाही. श्री.पवार यांची सन २०२१ ची एक वेतनवाढ एक वर्ष रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात, असे आदेशात नमुद आहे.

श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक १५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जात त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१.०५.२०२१ रोजीचे आदेशान्वये करणेत आलेली शिक्षा रद्द करणेची विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.१५.०६.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

प्रस्ताव-

श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग यांना करणेत आलेल्या शिक्षेबाबत त्यांनी दि.१५.०६.२०२१ रोजी केलेल्या अपिलावर निर्णय होण्यासाठी सदरचा मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- 29

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक २०.०७.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत...

विषयाची पुर्वपिठीका :-

(अ) श्री.पवार हे श्री साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये वर्ग-०४ कर्मचारी या पदावर कार्यरत होते. सध्या त्यांची बदली आरोग्य विभागात करणेत आलेली आहे. श्री.पवार यांनी दि.२१.०५.२०२१ ते दि.०१.०६.२०२१ अशी अर्जित रजा दि.२०.०५.२०२१ रोजी मंजुर केली होती. तथापी, विभागीय कामाचे अडचणीमुळे त्यांना दि.२५.०५.२०२१ रोजी कामावर हजर होणेस मोबाईल व SMS द्वारे कळविले होते परंतू ते आजतागायत कामावर हजर झाले नाही. त्यामुळे कोव्हीड-१९ चे कामामध्ये अडचण निर्माण झाली. अत्यावश्यक कामामध्ये अडचण निर्माण झाली. असे त्यांचे विरुध्द प्र.अधिक्षक,श्री साईआश्रम भक्तनिवास विभाग यांचे निवेदन आलेले आहे.

सदर गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३७२/२०२१ दि.०३.०६.२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, तुमचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन आपण दि.०७.०६.२०२१ रोजीचा खुलासा सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी," आपली संदर्भिय नोटीस मला दि.०३/०६/२०२१ रोजी प्राप्त झाली असून, मी श्री साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये वर्ग-०४ या पदावर कार्यरत असतांना माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ रोजी घराचे बांधकाम व दुरुस्ती देखभालीकरीता अर्जित रजा मंजुर करण्यात आलेली होती.

तथापी प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास यांनी मला दि.२४/०५/२०२१ रोजी सायंकाळी ०५.२५ वाजता एसएमएसद्वारे अचानक रजा नामंजुर करण्यात आली असल्याचे तसेच कामावर हजर होणेबाबत अचानक कळविले. परंतू मी माझया नियोजीत कामामुळे बाहेरगांवी असल्यामुळे माझी अर्जित रजा संपल्यानंतर कामावर हजर होईल असे त्यांना दूरध्वनीद्वारे कळविलेले होते. तसेच याबाबत प्र.अधिक्षक यांनी दि.२७/०५/२०२१ रोजी माझे कनकुरी येथील निवासस्थानी कोणीही नसतांना नोटीस चिकटविली. तथापी या संदर्भात दि.२८/०५/२०२१ रोजी प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व प्रशासकीय अधिकारी, निवासस्थाने विभाग यांना ई-मेलपत्राद्वारे व व्हॉटसद्वारे मी माझे लेखी म्हणणे कळविलेले आहे.

साईआश्रम विभागात काउंटर पर्यवेक्षक व इमारत म्हणून मला दैनंदिन डयुटी देण्यात येत होती. तथापी प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास यांनी सादर केलेल्या निवेदनामध्ये विभागीय कामाची अडचण निर्माण झाली असे नमूद केलेले आहे. तथापी याबाबत आपले निर्देशनास आणू इच्छितो की, या कालावधीत साईआश्रम विभागात कार्यरत असणारे मी व माझे सहकारी यांची नेमणूक कोव्हीड-१९ साठी करण्यात आलेली नाही. तसेच साईआश्रम विभागात कार्यरत असणारे कर्मचारी यांचा व्हॉटसअप ग्रुपवर कर्मचारी यांचे दैनंदिन डयुटी चार्ट मध्ये माझी रजा मंजुर करण्यात आलेली असल्याचे दिसून येते व तशी नोंद हजेरी मस्टर व डयुटी तक्त्यावरुन निदर्शनात येते. दरम्यानच्या कालावधीत माझे सहकारी कर्मचारी हे ही अर्जित रजेवर होते. परंतु यांना याबाबत कसल्याही प्रकारे त्यांना कामावर हजर होणेबाबत कळविण्यात आलेले नाही अथवा त्याचे निवेदन सादर करण्यात आलेले नाही. तसेच प्र.अधिक्षक, साईआश्रमविभाग यांनी दैनंदिन विभागाचे कामकाजात कोव्हीडकरीता नेमणूक करण्यात असल्याचे मला लेखी/तोंडी अथवा दैनंदिन डयुटी चार्टवर नमूद नाही.याबाबत आवश्यक वाटल्यास मी पुरावे सादर करील.

प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवासस्थान यांनी सादर केलेले निवेदन हे समर्पक नसून, आधी अर्जित रजा मंजूर असताना केवळ मला एकटयाला अचानकपणे रजेच्या मध्यावर एसएमएस, मोबाईलद्वारे व कनकुरी येथील निवासस्थानावर नोटीस चिकटवून कामावर हजर होणेबाबत निर्देष दिले होते. तथापी या कालावधीतच इतर कर्मचारी रजेवर असतांना त्यांच्यावर अश्या प्रकारची वागणूक देण्यात आलेली नाही.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तवयवस्था, शिर्डी सेवा वर्तनूक विनियम २०१३ कलम ३ (१) चे उल्लंघन करण्याचा माझा हेतू उददेश मानस नव्हता. तरी मला नैसर्गिक न्याय तत्वानुसार न्याय मिळावा ही विनंती. " असे म्हटलेले आहे.

सदरचा लेखी खुलासा श्री.पवार यांनी प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास यांचेमार्फत सादर केलेला असुन, त्यावर त्यांनी पुढील कार्यवाहीकामी सविनय सादर, असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

पान नं.२ वर

(ब) श्री.पवार हे साईआश्रम भक्तनिवास यांनी दि.२५.०५.२०२१ रोजी कामावर हजर राहणेबाबत कळविलेले होते. परंतु ते कामावर हजर झालेले नाही. तरी त्यांची दि.२५.०५.२०२१ ते दि.०१.०६.२०२१ अशी अर्जित रजा नामंजूर करणेत येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५(१) मध्ये नमूद केल्यानुसार, त्यांना शिक्षा म्हणून त्यांचेवर **"ठपका"** ठेवणेत येतो की, यापुढे त्यांचेकडून उपरोक्त प्रमाणे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी. अशी उपरोक्तप्रमाणे शिक्षा त्यांना जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/५७०/२०२१ दि.२६-०६-२०२१ रोजीचे आदेशान्वये करणेत आलेली आहे.

(क) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.२०.०७.२०२१ रोजीचे अर्जान्वये अपील सादर केलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.पवार यांनी उपरोक्त करणेत आलेला शिक्षा आदेश रद्द करणेबाबतचा दि.२०.०७.२०२१ रोजीचा अपील अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज, " No.EB/297 of 2021, District Court, Ahmednagar Date 27th July 2021. रोजीचे पत्रासोबत इकडील कार्यालयास पाठविण्यात आलेले आहे. सदरच्या पत्रात मा.अध्यक्ष महोदय यांनी, " Please find herewith the copy of an appeal preferred by one Shri Vittal Tukaram Pawar, Class-IV employee, Shri Saibaba sansthan, Shirdi, whereupon I require your remarks.

You are, therefore, requested to send your remarks at the earliest." असा निर्णय दिलेला आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांचेकडील दि.२७ जुलै २०२१ रोजीचे पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, 'Pls put up' असे निर्देश दिलेले आहेत.

श्री.पवार यांनी उपरोक्त ठपका आदेश रद्द करणेबाबतचा दि.२०.०७.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे. त्यात त्यांनी," विधाने व मजकूर यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मी यापुर्वी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३७२/२०२१, दि.०३/०६/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीसला दिलेला दि.०७/०६/२०२१ रोजीचा खुलासा या अपिलाचा भाग म्हणून वाचण्यात यावा. ही विनंती तसेच त्याची प्रत आपले अवलोकनार्थ या अपिलासोबत सादर करीत आहे.

कार्यकक्षा:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम-२०१३ (येथून पुढे याबाबत सेवा विनियम असा उल्लेख केला जाईल.) मधील नियम क्र.१४ नुसार मी सदरचे अपिल करत आहे. या नियमात अशी तरतुद आहे की, तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदीच्या अधीन राहून संस्थान कर्मचारी त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पारीत केलेला आदेशाविरुध्द समितीकडे अपील दाखल करु शकतो.

अपिलाची कालावधी मर्यादा:-

सेवा विनयम मधील नियम क्र.१५ मध्ये अशी तरतूद आहे की, कोणतेही अपील अपिलदाराला ज्या आदेशाविरुध्द अपील करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत दाखल केले पाहिजे. अन्यथा ते स्वीकारले जाणार नाही. संदर्भिय आदेश दि.२६/०६/२०२१ रोजीचा आहे. त्यामुळे अपील मुदतीत आहे.

अपिलाची कारणे:-

६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी माझ्या दि.०७/०६/२०२१ रोजीचा खुलाशाचा मन:पूर्वक विचार केलेला नसून मला नैसर्गिक न्याय तत्वानुसार न्याय दिलेला नाही.

७) मी माझ्या दि.०७/०६/२०२१ रोजीचे खुलाशात उपस्थित केलेले मुद्दे विचारात न घेता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी संदर्भिय आदेश पारीत केलेला आहे.

८) सेवा विनयम मधील नियम क्र.१०/२ मध्ये अशी तरतुद आहे की, कोणतेही कालखंडासाठी संचही परिणामासहीत वेतनवाढ रोखणे अथवा प्रस्तावित करणेत आले असेल तर विनियम ८ उपविनियम (२) आणि (२७) मध्ये विशद केलेल्या पध्दतीने अशा प्रकारची दंडात्मक कारवाई संस्थानच्या कर्मचा-यांवर लादण्यापूर्वी, चौकशी केली जाईल. (सेवा विनियम पा नं.४४)

पान नं.३ वर

९) सेवा विनियम पा नं.३३, प्रकरण क्र.०३ कलम५ (१) मध्ये नमूद केलेनुसार किरकोळ दंडात्मक कारवाई १ नुसार ठपका ठेवण्यात आलेला आहे.

१०) पान नं.५१ मधील विनियम ५ (अ) (१)(२) नुसार अर्जित रजा मंजुर केलेली आहे.

घटनेची पार्श्वभूमी:-

१) मी दि.२०/०५/२०२१ रोजी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजेचा अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन माझी सदरची अर्जित रजा प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व निवासस्थाने प्रशासकीय अधिकारी यांनी मंजुर केलेली होती. परंतु अचानक माझी मंजुर अर्जित रजा उपभोगत असताना मला विभागीय कामकाजाचे अडचणीमुळे दि.२४.०५./२०२१ रोजी मोबाईल एसएमएसद्वारे कामावर हजर होणेबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु मी पुर्व नियोजनामुळे मुंबई (दिवा) येथील साडूबंधू यांचे कोरोनामुळे दुःखद निधन झालेले असल्याने मी बाहेरगावी असल्याचे कळविले तथापी प्र.अधिक्षक यांनी दि.२७/०५/२०२१ रोजी मी व माझे कुटुंबीय उपस्थित नसतांना घरावर नोटीस चिटकावून उर्वरित रजा नामंजुर करण्यात येत असल्याचे भ्रमणध्वनीद्वारे सांगितले तसेच प्र.अधिक्षक यांनी संस्थान सुरक्षा रक्षकांसह माझ्या घरावर नोटीस चिटकविण्यासाठी आले असता मी त्यांना उदया आपणाकडून पत्र घेतो असे सांगितले तथापी त्यांनी माझ्या निवासस्थानी गावातील लोकांसमोर नोटीस/पत्र चिटकविले. माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजा मंजुर झालेची नोंद हजेरी अभिलेखावर घेण्यात आली होती. माझी कसल्याही प्रकरची कोव्हीड रुग्णांच्या सेवेसाठी डयुटी नेमण्यात आलेली नसतांना माझी अर्जित रजा अचानक रद्द केली. याबाबत मी माझा दि.२८/०५/२०२१ रोजी सविस्तर पत्र प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व निवासस्थाने प्रशासकीय अधिकारी यांना ई-मेलद्वारे सादर केलेले आहे. परंतु त्याचा विचार न करता याकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३७२/२०२१ दि.०३/०६/२०२१ रोजीची नोटीस दिली. त्यास अनुसरुन मी दि.०७.०६.२०२१ रोजी सविस्तर खुलासा सादर केलेला असून नैसर्गिक न्याय व तत्वाचा विचार न करता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/५७०/२०२१, दि.२६.०६.२०२१ रोजीचा आदेशान्वये माझ्यावर ठपका ठेवलेला आहे.

युक्तीवाद:-

५) कोरोना कालावधीत संस्थान कर्मचारी हितासाठी व त्यांचे मुलभुत हक्कांसाठी प्रशासनास दि.१८/०३/२०२१ व दि.०३/०५/२०२१ रोजी दिलेल्या निवेदनाचा तसेच माझी एस-९ चॅनलने घेतलेली प्रतिक्रिया याचा रोष मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मनात धरुन माझी सूड व आकस बुध्दीने मला वारंवार त्रास देण्याचे उद्देशाने माझी शैक्षणीक पात्रतेचा सारासार विचार न करता माझी बदली आरोग्य विभागात करण्यात आली.

६) माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजा मंजुर असताना अचानक दि.२५/०५/२०२१ पासूनची रजा नामंजुर केलेली आहे. वास्तविक पाहता साईआश्रम भक्तनिवास मधील माझ्या सोबत ०२ कर्मचारी यांचीही रजा मंजुर करण्यात आलेली असतांना त्यांना परत कामावर बोलविण्यात आलेले नाही. केवळ मला त्रास देण्याचे वरीष्ठांच्या दूषित हेतूने कनकुरी येथील ग्रामस्थांसमोर साईआश्रम भक्तनिवास, प्र.अधिक्षक यांनी सुरक्षारक्षकांसोबत माझ्या घरावर नोटीस चिटकविण्यात आली.

७) मी साईआश्रम भक्तनिवास विभागात शिफ्ट सुपरवायझर म्हणून काम करत असताना माझे काम उत्कृष्ट असताना माझे विरुध्द कोणाची तक्रार नसतांना केवळ मी कर्मचा-यांसाठी हितासाठी लढतो म्हणून सूड व आकस मनात ठेवून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार म्हणून बदली केलेली आहे. आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून मी आरोग्य विभागात रुजु झालेलो आहे.

८) तथापी आता आरोग्य विभाग प्र.अधिक्षक यांना मी दि.०६/०६/२०२१ रोजी ७० वर्षीय वयस्कर आईस वैद्यकीय उपचारासाठी दि.१०/०६/२०२१ ते दि.१२/०६/२०२१ तसेच दि.१४.०६.२०२१ रोजी अर्जित दि.२१.०६.२०२१ ते दि.२९.०६.२०२१ या कालावधीसाठी रजा मागणी केली असता, काहीही विशेष कारण नसताना केवळ मला त्रास देण्यासाठी माझी रजा ऐनवेळी नामंजुर करण्यात येत असून ऐने-केणे प्रकारे वारंवार एकाच विषयासाठी हेतु परस्परणे मला त्रास दिला जात असून नोटीस, वार्षिक वेतनवाढ रोखणे, रजा नामंजुर करणे इत्यादी शारीरीक व मानसिक त्रास दिला जात आहे.

तरी माझी महोदय आपणांस नम्र प्रार्थना आहे की वरील सर्व बाबींचा सहानुभुती पूर्वक विचार करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संदर्भिय आदेश रद्द करणेत यावी ही नम्र विनंती. " असे म्हटलेले आहे.

पान नंबर ४ वर...

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी श्री.पवार यांचे अपिल अर्जाबाबत दि.२७ जुलै २०२१ रोजीचे पाठविणेत आलेल्या पत्रामध्ये अभिप्रायासह सादर करावे, असे नमुद आहे.

श्री.पवार यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत कारणे दाखवा नोटीस देणेत येऊन, त्यास अनुसरुन त्यांनी दि.०७.०६.२०२१ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) नुसार सेवा विनिमयातील किरकोळ दंडात्मक कार्यवाही अंतर्गत त्यांना शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री.पवार यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (१) नुसार त्यांचेवर उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत **"ठपका"** ठेवण्यात आलेला आहे.

श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक २०.०७.२०२१ रोजीचे अपील अर्जात त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/५७०/२०२१ दि.२६.०६.२०२१ रोजीचे आदेशान्वये करणेत आलेली शिक्षा आदेश रद्द करणेची विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.२०.०७.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

प्रस्ताव-

श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग यांना करणेत आलेल्या शिक्षेबाबत त्यांनी दि.२०.०७.२०२१ रोजी केलेल्या अपिलावर निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- 22

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
विभागाचे नांव :- विदयुत विभाग

विषय :- इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टरच्या बॅट-या खरेदी करणेसाठी येणा-या खर्चास तसेच विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत ....

प्रस्तावना :- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ मध्ये सुधारणा करुन दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन(रु.३,००,०००/-) रु. १० लाखापर्यंत (रु. १०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव :- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विद्युतपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी बसविण्यात आलेले जनसेट चालू होऊन सप्लाय पुर्ववत सुरु होणे करीता ३० ते ६० सेकंद विलंब होतो. याकालावधीमध्ये रात्रीचे वेळी दर्शन घेणा-या साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून श्री समाधी मंदिर, मंदिर परिसर, व्दारकामाई, चावडी, शांतीनिवास, भक्तनिवास दर्शनरांग याठिकाणी इनव्हर्टर मार्फत लाईट व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच श्री साई प्रसादालय येथे साई भक्तांचे प्रसाद भोजन व्यवस्थेकरीता अतिथी भोजन कक्ष, विशेष अतिथी भोजन कक्ष, जनरल भोजन हॉल व रसोडा याठिकाणीही इनव्हर्टर मार्फत लाईट व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सदरच्या इनव्हर्टरकरीता बसविण्यात आलेल्या बॅट-या साधारणतः ०६ वर्षापुर्वी बसविण्यात आलेल्या आहे. सततच्या वापरामुळे श्री समाधी मंदिर, मंदिर परिसर, व्दारकामाई, चावडी, शांतीनिवास, भक्तनिवास दर्शनरांगेतील इनव्हर्टरच्या बॅट-या खराब झालेल्या आहेत. तसेच श्री साई प्रसादालय येथील विशेष अतिथी भोजन कक्ष व रसोडा याठिकाणचे इनव्हर्टर व बॅट-या खराब झालेल्या असल्याने सदरचे युनिट बंद पडलेले आहे. त्यामुळे सदर इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टरच्या बॅट-या बदलविणे गरजेचे आहे. याकामी आवश्यक असणा-या इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टरच्या बॅट-या विद्युत विभागाचे सबस्टोअरला व भांडार विभागाकडे शिल्लक नाही.

मागणी :- त्याकरीता खालीलप्रमाणे इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टरच्या बॅट-या तातडीने खरेदी करावे लागणार आहे. सदर इनव्हर्टर युनिट व बॅट-याची किंमत ही तीन स्थानिक दुकानदारांकडून कोटेशन घेऊन त्यांनी दिलेल्या दराचे सरासरी नुसार खालीलप्रमाणे दर येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	मटेरीयल तपशिल	मागणी	दर	रक्कम
०१)	Tubular Battery 200 AH Company - Exide, SF Sonic, Okaya	०९ नग	रु. १८,२३०/-	रु. १,६४,०७०/-
०२)	Invertor -1075 VA, 12 Volt Company -Microtech, Luminous	०२ नग	रु. ५,६७०/-	रु. ११,३४०/-
			एकुण रक्कम :-	रु. १,७५,४१०/-

विभागाचा अभिप्राय स्पष्ट / मत :-

उपरोक्तप्रमाणे इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टरच्या बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,७५,४१०/- इतक्या खर्चास तसेच सदर इनव्हर्टर युनिट व इनव्हर्टरच्या बॅट-या खरेदी करणेकरीता बाहेरील ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

E.C. meeting - 29-4-2021

051

विषय क्र.- 23

121

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
विदयुत विभाग

विषय :- श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरिता २४० स्क्वेअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅंज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत ....

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद - अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे. तसेच अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

शासन निर्णय - शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ मध्ये सुधारणा करुन दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन (रु. ३,००,०००/-) रु. १० लाखापर्यंत (रु. १०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc). समितीचा निर्णय -

विद्युत विभागामार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६-०८-२०२१ रोजीचे सभेत विषय क्र.६८ निर्णय १०८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा केली, प्रस्तावामध्ये अ.क्र.१ ते ३ याप्रमाणे केबल-६६० मीटर + १० नग + ४० नग श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या पैकी ऑक्सिजन प्लॅंट करीता वापरण्यास तातडीचे काम असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून दुरध्वनीव्दारे परवानगी घेऊन वापरल्याचे सांगितले. पण याबाबत अद्याप लेखी आदेश श्री.प्रकाश अभंग, प्र.उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी प्राप्त करुन घेतलेला नाही. आणि थेट दि.१०-०६-२०२१ रोजी खरेदीच्या प्रस्तावासाठी टिपणी तयार केली आहे. त्यांनी तातडीचे वापरासाठीची परवानगी रितसर घ्यावी. व प्रस्ताव पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा."

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्तावना :- कोव्हिड-१९ या साथ रोगाचे रूग्णांना श्री साईनाथ रूग्णालयात पुढील उपचार देण्याचे ठरलेले असल्याने श्री साईनाथ रुग्णालयासाठी १२०० LPM क्षमतेचा ऑक्सिजन प्लान्ट तातडीने उभारण्याचे ठरले. वरील संदर्भीय पत्रानुसार श्री साईनाथ रुग्णालयामार्फत सदर प्लान्टचे २१० केडब्ल्यु इलेक्ट्रीक लोड असलेबाबत व त्याकरीता इलेक्ट्रीक केबल टाकून ऑक्सिजन प्लॉन्टला इलेक्ट्रीक सप्लाय देणेबाबत कळविणेत आले होते.

ऑक्सिजन प्लान्ट तातडीने चालू करावयाचा असल्याने त्याकरीता आवश्यक असलेली २४० स्क्वेअर एम.एम.ची केबल विद्युत विभागाचे सबस्टोअरला तसेच भांडार विभागाकडे शिल्लक नसल्याने श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यामधील ICCU ऑपरेशन थिएटर व इतर इलेक्ट्रीक लोडसाठी सप्लाय देणेकरीता आणलेल्या केबलमधून २४० स्क्वेअर एम.एम.ची केबल घेऊन ऑक्सिजन प्लान्ट करीता तातडीने टाकून घेऊन इलेक्ट्रीक सप्लाय जोडण्यात आलेला आहे. आता श्री साईनाथ रुग्णालयामधील वाढीव तिस-या मजल्याचे कामही अंतिम टप्प्यात असल्याने तेथेही इलेक्ट्रीक केबल टाकून विद्युतपुरवठा करावा लागणार आहे. त्याकरीता सदरचे ठिकाणी २४० स्क्वेअर एम.एम.ची इलेक्ट्रीक केबल टाकून घ्यावी लागणार आहे. याकरीता आवश्यक असणारी इलेक्ट्रीकल केबल, कनेक्शनसाठी लग्ज, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड खरेदी करावी लागणार आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये ७,६९,४८०/- इतक्या खर्चास तसेच सदरची खरेदी करणेकरीता बाहेरील ठेकेदार यांना पोस्टाव्दारे दरपत्रक पत्र पाठविणेस तसेच ई-मेलव्दारे कळविणेस व खरेदीची नोटीस संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामीचा व दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर दरपत्रके खरेदी समितीसमोर सादर करणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेकरीता दि.०६-०८-२०२१ रोजीचे सभेत विषय क्र.६८ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय १०८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

122

151

- दि.०६.०८.२०२१ रोजीचे सभेतील मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय.

" यावर सविस्तर चर्चा केली, प्रस्तावामध्ये अ.क्र.१ ते ३ याप्रमाणे केबल-६६० मीटर + १० नग + ४० नग श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या पैकी ऑक्सिजन प्लॅंट करीता वापरण्यास तातडीचे काम असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून दुरध्वनीव्दारे परवानगी घेऊन वापरल्याचे सांगितले. पण याबाबत अद्याप लेखी आदेश श्री.प्रकाश अभंग, प्र.उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी प्राप्त करुन घेतलेला नाही. आणि थेट दि.१०-०६-२०२१ रोजी खरेदीच्या प्रस्तावासाठी टिपणी तयार केली आहे. त्यांनी तातडीचे वापरासाठीची परवानगी रितसर घ्यावी. व प्रस्ताव पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा."

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरणाचे काम करणारे ठेकेदार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांनी श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यामधील ICCU ऑपरेशन थिएटर व इतर इलेक्ट्रीक लोडसाठी सप्लाय देणेकरीता आणलेल्या केबलमधून २४० स्क्वेअर एम.एम.ची ६६० मीटर केबल फ्लॅंज टाईप ग्लॅंड-१० नग तसेच लग्ज-४० नग लग्ज याप्रमाणे मटेरीअलचे वापरास विद्युत विभागाचे दि.११-०८-२०२१ रोजीचे टिपणी नुसार कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी ही दरपत्रके मागवुन करावी लागणार आहेत. सदर मटेरीयलचे दराकरीता बाहेरील दुकानदारांकडून ई-मेलव्दारे दरपत्रक घेऊन त्यांनी दिलेल्या दरांचे सरासरी प्रमाणे प्रती ॲटमच्या दरानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

Sr.No.	Description	Qty	Rate Rs	Amount Rs
01)	Supplying XLPE armoured cable 3 1/2 core 240 sq.mm.aluminium conductor with continuous 12.97 sq.mm.(8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL	660 Mtrs.	1149/-	7,58,340/-
02)	Supplying Flange type brass cable glands for 3 1/2 core 240 sq.mm.for XLPE armoured cable as per specification no.CB-CL/3 1/2	10 Nos.	770/-	7,700/-
03)	Supplying crimping type aluminium lugs for cable 240 sq.mm.complete specification no.CB-CL/AL	40 Nos.	86/-	3,440/-
			Total Rs :-	7,69,480/-

प्रस्ताव :- उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी वरील तपशिलाप्रमाणे येणा-या अंदाजे रक्कम रुपये ७,६९,४८०/- इतक्या अपेक्षित खर्चास तसेच विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

14/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

14.8.

विषय क्र.- 28

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

मेकॅनिकल विभाग

विषय :- संस्थानच्या निधितुन शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी प्राप्त ई निविदेतील निम्नत्तम दर धारक मे. उर्जा गॅसीफायर्स प्रा.लि. गोरखपुर (उ.प्र.) यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणे बाबत ...

टिपणी –

०१	कामाचे नाव	संस्थानच्या निधितुन शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदीस व कार्यान्वित करुन देणे
०२	प्रशासकिय मान्यता	मा. तदर्थ समिती दिनांक ११.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं ४५५/१८
		मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची दिनांक १४ जानेवारी २०२१ रोजीची मान्यता
		शासन निर्णय क्रं. सांसवि-१०२१/२५६/प्र.क्र. ७७/का.१६ दिनांक ४/०५/२०२१ रोजीची महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांची मान्यता
०३	अंदाजे खर्च	रु. ५७,७३,३२२/-
०४	प्रस्तावाची थोडक्यात माहीती	मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक १.१०.२०२० रोजीचे पत्रान्वये " अहमदनगर जिल्हामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असून दैनंदिनरित्या मोठया प्रमाणावर नागरिकांना कोरोनाची बाधा होत असल्याने जिल्हासाठी एक गॅस क्रिमॅटोरियम श्री साई संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे निधीतून शिर्डी मध्ये उपलब्ध करुन देणेत यावे " असे कळविलेले होते. त्यानुसार संस्थानमार्फत एक गॅस क्रिमॅटोरीयम खरेदी करुन नगरपंचायतीचे मालकीचे हिंदु स्मशानभुमीमध्ये उभारणी करणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास तसेच गॅस क्रिमॅटोरीयम उभारणी झालेनंतर शिर्डी नगरपंचायत यांचे कडे हस्तांतरीत करणेस मा. तदर्थ समितीची मान्यता घेणेत आलेली आहे
०५	ई निविदा तपशिल	ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक २२.४.२०२१ ते दिनांक २९.०४.२०२१ पर्यंत देणेत आली होती. पाच ई निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त ई निविदांचे टेक्नीकल बीड दिनाक ३.५.२०२१ रोजी उघणेत आले, त्यापैकी मे. व्हिजन एन्टरप्राईजेस, पुणे यांची वार्षिक उलाढाल ६० लाख (मागील तीन वर्ष सरासरी) पेक्षा कमी असलेने ते अपात्र झाले. पात्र चार निविदांचे कर्मशियल बीड दि. ५.५.२०२१ रोजी मा. खरेदी समितीच्या सभेमध्ये उघडणेत आले होते. त्यामध्ये मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांचे दर रक्कम रु.७४,२७,०००/- मात्र न्युनत्तम होते. परंतु सदरचे दर हे मंजूर अंदाजपत्रकिय खर्चापेक्षा २८.६४% जास्त असलेने दिनांक १०.५.२०२१ रोजीचे मा. तदर्थ समितीचे चक्रिय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावावरील निर्णयानुसार प्रस्तावीत कामी न्युनत्तम दरधारकास कार्यादश देणे कामी मान्यतेकरीता मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेत आलेले होते. सदर सिव्हिल ॲप्लीकेशन मध्ये कोर्टाने दिनांक ८.६.२०२१ रोजीचे आदेशाने फेर ई निविदा काढणेचे आदेश दिले आहे. तसेच दिनांक १९.६.२०२१ रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र.६ अन्वये फेर ई निविदा काढणेस मानयत मिळालेली असलेने सदरची ई निविदा रद्द करुन फेर ई निविदा मागविणेत आल्या. फेर ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक ९.०७.२०२१ ते दिनांक २२.०७.२०२१ पर्यंत देणेत आली होती. यात चार ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.
	I. कामाची मुदत	४० दिवस

पुढिल पानावर ..

	II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ	दिनांक २९/०७/२०२१ रोजी सांय ४.०० वाजता.
६,९	III. प्राप्त ई निविदा	०४
	IV. प्राप्त ई निविदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलॉईन जमा केलेले आहेत का?	होय
	V. सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले कागदपत्रे जमा केलेले आहेत का ?.	होय

ई निविदा वाणिज्य बीड दिनांक ३.०८.२०२१ रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघणेत आले असून निविदाधारकांचा प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

अ.नं.	निविदाधारकांचे नाव	ई निविदेतील प्राप्त दर रक्कम	शेरा
१	मे. कल्याणी एन्टरप्राईजे, पुणे	८२,६९,०००/-	L4
२	मे. अल्फा इक्युपमेंटस, बडोदा	५३,००,०००/-	L2
३	मे. उर्जा गॅसिफायर्स प्रा.लि. गोरखपुर	४२,९८,७००/-	L1
४	मे. राधिका एन्टरप्राईजेस,हरियाना	६८,७५,०००/-	L3

उपरोक्त तपशिलानुसार संस्थानमार्फत एक गॅस क्रिमॅटोरीयम खरेदी करुन नगरपंचायतीचे मालकीचे हिंदु स्मशानभुमीमध्ये उभारणी करणेकामी मे. उर्जा गॅसिफायर्स प्रा.लि. गोरखपुर यांचे रक्कम रु. ४२,९८,७००/- (अक्षरी रक्कम रुपये बेचाळीस लाख अठयाण्णो हजार सातशे) मात्र निम्नत्तम आहेत .

प्रस्ताव :- मे. उर्जा गॅसिफायर्स प्रा.लि. गोरखपुर या न्युनत्तम दरधारक यांचेशी मा. तदर्थ समितीच्या वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चर्चा / वाटाघाटी करण्याचे अधिकार देवून निम्नत्तम पुरवठाधारकास कार्यादेश देणे व पुढिल कार्यवाही करणेकरीता कामी मा. तदर्थ समितीची मान्यता घेणेकामी निर्णयार्थ सादर.

३०/८/२१

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

विषय:- श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील रुग्णांना ने-आण करणे कामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्चास आणि कंपनी/अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे बाबत..

महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-

१..कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष् आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२..कलम १७ (२) ण मध्ये, " मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालणा देईल ". अशी तरतूद आहे.

३..कलम २१ (१) मध्ये विश्वस्तव्यस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तुरतुदींना अधिन राहुन, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करणत येईल,--

(ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

विषयाची पुर्वपिठीका -

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रुग्णालयातील रुग्णांना बाहेरगावी ने आण करणे तसेच संस्थान परिसरातील रुग्ण/साईभक्तांना रुग्णवाहीकेची सेवा देणेकरीता सध्या संस्थानकडे ११ रुग्णवाहीका वापरात असुन त्यांची तपशीलवार माहीती खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	वाहन क्रमाक	रुग्णवाहीका प्रकार	वापर सुरु दिनांक	मे-२०२१ अखेर वर्ष	मे-२०२१ वापर कि.मी.
1	MH-17-AG-1016	फोर्स रुग्णवाहीका	23-09-2010	१० वर्ष- ८ महिने	2,45,417
2	MH-17-BD-1991	मारुती इको रुग्णवाहीका	15-06-2012	८ वर्ष- ११ महिने	53,054
3	MH-17-BD-1992	मारुती इको रुग्णवाहीका	15-06-2012	८ वर्ष- ११ महिने	45,187
4	MH-17-BD-0889	फिरते वैद्यकीय पथक रुग्णवाहीका	26-12-2014	६ वर्ष- ५ महिने	54,873
5	MH-17-BD-2442	तवेरा रुग्णवाहीका	14-10-2015	५ वर्ष- ७ महिने	3,30,428
6	MH-17-BD-2249	मारुती इको रुग्णवाहीका	28-11-2015	५ वर्ष- ६ महिने	68,056
7	MH-15-EF-0596	फोर्स मोटार शववाहीका	19-01-2016	५ वर्ष- ४ महिने	1,05,887
8	MH-17-BD-2248	SML इसुझु शववाहीका	03-02-2016	५ वर्ष- ४ महिने	3,03,088
9	MH-17-BD-5181	मारुती इको रुग्णवाहीका	18-02-2017	४ वर्ष- ३ महिने	85,533
10	MH-17-BD-5601	महिंद्रा बोलेरो रुग्णवाहीका	23-03-2017	४ वर्ष- २ महिने	98,433
11	MH-17-BD-9933	फोर्स कार्डीयाक रुग्णवाहीका	28-02-2018	३ वर्ष- ३ महिने	1,11,865

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटल येथे १ रुग्णवाहीका, १ कार्डीयाक रुग्णवाहीका, १ शववाहीका, साईनाथ रुग्णालय येथे १ रुग्णवाहीका, कोव्हीड सेंटर येथे १ रुग्णवाहीका, मंदिर परिसरात १ रुग्णवाहीका अशा एकुण ६ रुग्णवाहीका २४ तास तीन शिप्ट मध्ये वापरात आहेत. या ठिकाणची एखादी रुग्णवाहीका लांब पल्ल्याच्या प्रवासाकरीता बाहेरगावी गेलेस त्या रुग्णवाहीके ऐवजी रुग्णांच्या सेवेकरीता इतर रुग्णवाहीका देण्यात येते.

सध्या संस्थानमार्फत साई धर्मशाळा व श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कोव्हीड सेंटर सुरु करण्यात आलेले असुन कोव्हीड-१९ चे प्रादुर्भावामुळे येथे उपचारार्थ दाखल होणा-या रुग्णांची संख्या जास्त आहे. सध्याच्या रुग्णवाहीका रुग्णसेवेकरीता अपु-या पडु नये म्हणुन एक B Type मधील BS-6 प्रकारातील रुग्णवाहीका खरेदी करावी लागेल, असे मत आहे.

पान नं. २ वर

सदर रुग्णवाहीका ग्रामीण भागात तसेच शहरी भागात रुग्णांना ने-आण करणे करीता वापरावयाची आहे. सध्या BS-6 प्रकारातील बी-टाईप मध्ये टाटा मोटर्स कंपनी, " टाटा सुमो रुग्णवाहिका " तसेच महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी, " बोलेरो रुग्णवाहिका " उत्पादन करत नसलेबाबत टाटा कंपनीचे अधिकृत पुरवठादार ए. एस. मोटर्स अहमदनगर व महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे अधिकृत पुरवठादार जितेंद्र मोटर्स , नाशिक यांनी मेलव्दारे कळविलेले आहे. त्यामुळे सध्या फोर्स मोटर्स कंपनीची B Type मधील BS-6 प्रकारातील (एसी, पॉवर स्टेअरींग) ट्रॅक्स रुग्णवाहीका उपलब्ध आहेत. सदर रुग्णवाहीका खरेदी करणे करीता अंदाजे रु.१३,५०,०००/- (अक्षरी- रुपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च रुग्णवाहीका खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीतून करता येईल.

महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये ," कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि , मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." अशी तरतूद आहे. या नुसार सदरची रुग्णवाहीका दरपत्राकाव्दारे खरेदी करता येईल.

तरी श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही *रुग्णालयातील* पेशंट ने-आण करणे कामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१३,५०,०००/- (अक्षरी- रुपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतचे खर्चास तसेच कंपनी/अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

सदरचे विषय टिपणीवर तदर्थ समितीचे मा.अध्यक्ष व मा. सदस्य यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१. मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ समिती यांनी "Instead of limiting the choice to force motor co. Trax Ambulance, other companies ambulance prices also be called and the vehicles be inspected and then we can finalised the brand".
२. मा.तदर्थ समिती सदस्य गीता बनकर यांनी "सदरचा प्रस्ताव वाचला, त्यावरील संबंधीत विभागाचा अभिप्राय वाचला. प्रस्तावावरुन असे लक्षात येते की, फक्त फोर्स मोटार कंपनीचाच विचार केलेला दिसुन येतो. परंतु, त्यापेक्षा दुस-या कंपनीच्या रुग्णवाहीकच्या किंमती देखील विचारात घाव्यात आणि त्यावरुन या प्रस्तावाचा तुलना करुन विचार करावा".
३. मा.तदर्थ समिती सदस्य भानुदास पालवे यांनी, "मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे अभिप्रायाप्रमाणे फक्त फोर्स मोटर कंपनीचा विचार न करता त्यापेक्षा दुस-या कंपनीच्या रुग्णवाहीकेच्या किंमती देखील विचारात घ्याव्यात".

विभागाचा अभिप्राय –

उपरोक्त तपशीलात दर्शविल्यानुसार रुग्णवाहीका/ शववाहीका/कार्डीयाक रुग्णवाहीका असुन सध्या श्री साईबाबा हॉस्पीटल येथे १ रुग्णवाहीका, १ कार्डीयाक रुग्णवाहीका, १ शववाहीका, साईनाथ रुग्णालय येथे १ रुग्णवाहीका, कोव्हीड सेंटर येथे १ रुग्णवाहीका, मंदिर परिसरात १ रुग्णवाहीका अशा एकुण ६ रुग्णवाहीका २४ तास तीन शिप्ट मध्ये वापरात आहेत. या ठिकाणची एखादी रुग्णवाहीका लांब पल्ल्याच्या प्रवासाकरीता बाहेरगावी गेलेस त्या रुग्णवाहीके ऐवजी रुग्णांच्या सेवेकरीता इतर रुग्णवाहीका रुग्णालय विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येते.

सध्या संस्थानमार्फत साई धर्मशाळा व श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कोव्हीड सेंटर सुरु करण्यात आलेले असुन कोव्हीड-१९ चे प्रादुर्भावामुळे येथे उपचारार्थ दाखल होणा-या रुग्णांची संख्या कमी-जास्त होत असते. भविष्यात कोव्हीड १९ चे संभाव्य तिस-या लाटेत रुग्णांची संख्या वाढल्यास सध्याच्या रुग्णवाहीका रुग्णसेवेकरीता अपु-या पडु नये म्हणुन एक B Type मधील BS-6 प्रणालीतील रुग्णवाहीका खरेदी करावी लागेल.

तसेच सदरची रुग्णवाहीका जास्तीत जास्त ग्रामीण भागातील रुग्णांना ने-आण करणे करीता वापरावयाची असलेने ग्रामीण भागातील रस्त्यांचा विचार करता याकामी जीप टाईप प्रकारातील रुग्णवाहिका खरेदी करणे आवश्यक आहे असे या विभागाचे मत आहे.

सध्या जीप प्रकारातील BS-6 प्रणालीत, बी-टाईप मध्ये टाटा मोटर्स कंपनी, " टाटा सुमो रुग्णवाहिका " तसेच महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी, " बोलेरो रुग्णवाहिका " उत्पादन करत नसलेबाबत टाटा कंपनीचे अधिकृत पुरवठादार ए. एस. मोटर्स अहमदनगर व महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे अधिकृत पुरवठादार जितेंद्र मोटर्स , नाशिक यांनी दि.२१/०६/२०२१ रोजीचे मेलव्दारे इकडील कार्यालयास कळविलेले आहे.

सध्या जीप प्रकारातील, फोर्स मोटर्स कंपनीची B Type मधील BS-6 प्रणालीतील (एसी, पॉवर स्टेअरींग) ट्रॅक्स रुग्णवाहीका उपलब्ध आहेत. सदर रुग्णवाहीका खरेदी करणे करीता सुमारे रु.१३,५०,०००/- (अक्षरी- रुपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च रुग्णवाहीका खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीतून करता येईल.

पान नं. ३ वर

महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये ," कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलंच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि , मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." अशी तरतूद आहे. या नुसार सदरची रुग्णवाहीका दरपत्राकाव्दारे खरेदी करता येईल.

या खरेदी नियमावलीतील *तरतुदीनुसार*, सदर फोर्स मोटर्स कंपनीची ट्रॅक्स रुग्णवाहीका (Type B) BS6, PS, A/C या प्रकारातील कंपनीकडून / कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून रुग्णवाहिका खरेदी कामी दरपत्रके मागवावी लागतील तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दर मागणीपत्र संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द कराता येतील.

प्रस्ताव -

तरी श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही *रुग्णालयातील* पेशंट ने-आण करणे कामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रणालीतील (Type B) BS6, PS, A/C प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका निश्चीत होऊन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१३,५०,०००/- (अक्षरी- रुपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतचे खर्चास तसेच कंपनी/अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणेस व अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरपत्रक संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा विषय मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वतव्यवस्था, शिर्डी.

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा अनुदान

विषय :- आर्थिक अनुदान मागणीकरिता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत..

प्रास्तविक:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे अर्थसहाय्य मागणीसाठी दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जाद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत; ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

अर्थसहाय्य देणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

कलम २१ (२) (एक) छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

संस्थानकडे अनुदान मागणीसाठी दाखल झालेले अर्ज

दि.०१.०६.२०२१ ते ३१.०७.२०२१ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

अ.नं.	अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता	प्रयोजन	शेरा
१	पवन पुत्र रोडलाईन्स, वापी	वैद्यकीय मदत	
२	श्री हेमल मंजुल	शैक्षणीक मदत	
३	श्रीमती मनीषा, कानपूर	आर्थिक मदत	
४	श्री उदय देशपांडे	रुग्णवाहिका	
५	तुळजाभवानी जेष्ठ नागरिक संघ, बुलढाणा	फर्निचर घेणसाठी	
६	श्रीमती मनिषा उत्तम गवई, संगमनेर	कोरोनाग्रस्त मदत	
७	जन विकास युवा मंडळ, छतरपूर	कोव्हीड सेंटर उघडणेसाठी	
८	श्री माणिक्य राव जाला	आर्थिक मदत	
९	श्री दत्तगुरू अन्नछत्र मंडळ, माढा	बांधकामासाठी मदत	
१०	श्री बाळासाहेब. वाय. पुंगळ, पुणे	आर्थिक मदत	
११	श्रीमती पूनम सोनी	वैद्यकीय मदत	
१२	श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी	वैद्यकीय यंत्रसामुगीसाठी	
१३	श्री शुभ्रांशु दिक्षीत, मुंबई	कोरोनाग्रस्तांना मदतीसाठी	
१४	श्री अमेय मोंडकर	वैद्यकीय मदत	
१५	श्री अशिष दास, ओडिसा	मैदानी खेळ मदत	
१६	श्री सोमा प्रसाद	आर्थिक मदत	
१७	श्री बी. एस. रामलिंगम, चेन्नई	मंदिरासाठी मदत	
१८	श्री विनोद भ. पवार, जळगांव	शैक्षणीक मदत	
१९	श्री विकास सिंग	शैक्षणीक मदत	
२०	श्री शुभम मढवी, गडचिरोली	आर्थिक मदत	
२१	मानवता सहाय्यता संस्था पुणे	अनाथांच्या मदतीसाठी	
२२	श्री. रोहित सैनी, नैनीताल	आर्थिक मदत	
२३	श्री. जेरस्टीन सी. दारूवाला, मुंबई	शैक्षणीक मदत	
२४	श्री. कल्पेश येवले, नाशिक	शैक्षणीक मदत	

२५	श्री शरद झा, भागलपूर	आर्थिक मदत	
२६	श्री प्रदीप त्रिपाठी,	आर्थिक मदत	
२७	कु. सतिष अशोक आठवले,पुणे	शैक्षणीक मदत	
२८	श्री विरेन व्होरा, वापी	वैद्यकीय मदत	

विभागाचा अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या **"अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "**

३) वैद्यकीय उपचारासाठी श्री साईनाथ रुग्णालयाकडून वैद्यकीय अनुदान दिले जाते त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठींचे अर्ज विचारात घेऊ नये.

४) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानाची स्पष्ट तरतूद आहे फक्त त्याच अर्जाचा अनुदान देताना विचार व्हावा असे मत आहे.

५) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ३०.०१.२०१९ रोजी "Shri Sai Baba Sasthan Trust, shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense" असे आदेश दिलेले आहे.

प्रस्ताव :- दि.०१.०६.२०२१ ते ३१.०७.२०२१ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीबाबत आलेले अर्ज नस्तीबंद करण्याचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- २७

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा विभाग

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय:- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील RTE 25 % प्रतिपुर्ती करीता, संस्थानच्या नावाने पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी येथे स्वतंत्र बचत खाते उघडणेबाबत...

अधिनियम:- सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक – शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा) अन्वये २५ % प्रवेश देणे, यामध्ये वंचित गटातील व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी मोफत प्रवेश दिला जातो. वंचित गटातील बालक याचा अर्थ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती बालके व दुर्बल घटकांतील बालके याचा अर्थ ज्या बालकांच्या माता पित्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या धार्मीक अल्पसंख्याकसह इतर बालके असा होय. अशा इयत्ता १ ली ते ८ वी प्राथमिक विभागातील बालकांना प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देणे चालू ठेवणेत यावे असे अधिनियमात नमूद केलेले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल व वंचीत घटकातील बालकांना खाजगी विना अनुदानीत व खाजगी कायम विना अनुदानीत शाळांमध्ये (Private unaided Non-minority schools, PrivatePermanent Unaided non- minority schools) किमान २५ % ठेवण्याची तरतुद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची तरतुद आहे.

प्रतिपुर्तीची रक्कम संस्थानच्या SBI Bank Account वर जमा झाल्यानंतर याबाबतचा तपशिल वेळेत उपलब्ध होत नाही. संस्थानचे इतर डोनेशन सदरच्या खाती जमा होत असल्याने हिशोबाचा ताळमेळ होत नाही. कारण- सदर प्रतिपुर्तीची रक्कम ही सन २०१५ ते २०१६ पर्यंत जमा झाली आहे.

विभागाची मागणी:- आर.टी.ई. २५ % अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून प्रतिपुर्ती करीता श्री साईबाबा संस्थानच्या SBI Bank Account (००००००३०६३०८९६८०१) मध्ये सदरची रक्कम जमा होत असते. शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प.अ.नगर यांच्या दि.२२/०६/२०२१ च्या पत्रान्वये आर.टी.ई. २५ % प्रतिपुर्ती करीता राष्ट्रीयकृत बॅंकेत स्वतंत्र खाते उघडणेबाबत गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्यामार्फत, सुचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि, आपले शाळेने त्या संदर्भात कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. आर.टी.ई. २५ % प्रतिपुर्तीकरीता राष्ट्रीयकृत बॅंकेत स्वतंत्र खाते उघडण्याची कार्यवाही तात्काळ करावी व त्याची छायांकित प्रत या कार्यालयास अवगत करावी अन्यथा या कार्यालयामार्फत आर.टी.ई. २५ % प्रतिपुर्तीची रक्कम अदा केली जाणर नाही, याची नोंद घ्यावी-असे निर्देश दिले आहे.

याबाबत दि.२२/०६/२०२१ रोजी शिक्षण विभागाचे पत्र प्राप्त झालेले आहे. तरी सदरची प्रतिपुर्तीची रक्कम संस्थानच्या नावाने State Bank of India, Shirdi येथे असलेल्या बचत खात्यात जमा झाल्यानंतर याबाबतचा तपशिल वेळेत उपलब्ध होत नाही. कारण सदर बॅंक खात्यामध्ये देणगीदार साईभक्तांकडून मोठ्या प्रमाणात देणगी जमा होत असते. त्यामुळे शाळेकडील जमा झालेल्या रकमेच्या हिशोबाचा ताळमेळ लागत नसल्याने गटशिक्षण अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार RTE २५% प्रतिपुर्तीसाठी पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी या राष्ट्रीयकृत बॅंकेत स्वतंत्र खाते उघडता येईल. असे मत आहे.

प्रस्ताव - श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचे उपरोक्त मागणी नुसार तसेच शिक्षण विभाग यांच्या पत्रान्वये, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील RTE 25% प्रतिपुर्ती करीता, संस्थानच्या नावाने, पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी येथे नव्याने स्वतंत्र बचत खाते उघडणेस व या खात्यामार्फत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील RTE 25% प्रतिपुर्तीचे व्यवहार करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेत निर्णयार्थ सादर

13/8/21

(कान्हूराज बगाटे , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- २८

SCI

मा तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

131

विषय : श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी येणारे अंदाजे रु.१९,३८,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :

अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

प्रस्तावना:

श्री साईबाबा समाधी मंदिर शिर्डीचे सुरक्षा आढावा दरम्यान आढळून आलेल्या त्रुटी व सुचनांची पुर्तता करणेसाठी कार्यवाही होणेबाबत पारीत केलेल्या आदेश क्रं. एसएसएसटी/संरक्षण/२८/२०१९,दि.०४/०४/२०१९ मधील अ.नं.१० मध्ये श्री साईबाबा समाधी मुख्य मंदिरात वरच्या मजल्यावर सर्व खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा लावण्यातं याव्यात अशी उपाययोजना सुचविणेत आलेली आहे.

समाधी मंदिर दक्षिण बाजूस ४ खोल्या असून सदर खोल्यांचे दक्षिण बाजूस तळमजल्याला दोन दरवाजे व पाच खिडक्या आहेत. तसेच पहिल्या मजल्यावर दक्षिण बाजूस ०४ खिडक्या आहेत. पैकी तळमजल्यावरील दोन दरवाजे व दोन खिडक्यांना यापुर्वी बुलेटप्रुफ काचा बसविण्यात आलेल्या आहेत.

वर नमूद आदेशान्वये सुचविणेत आलेल्या उपाययोजनेनुसार समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील तळमजल्याच्या उर्वरीत ०३ व पहिल्या मजल्यावरील ०४ अशा एकूण ०७ खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी यापुर्वी सन २०१६ मध्ये समाधी मंदिरातील दक्षिण बाजूकडील ०२ खिडक्यांना बसविण्यात आलेल्या बुलेट प्रुफ काचांचे ठेकेदार जीत ॲण्ड जीत ग्लास ॲण्ड केमिकल्स प्रा.लि. जयपूर यांचेकडून अंदाजपत्रक घेण्यात आले असून त्यानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. यामध्ये सदरहू ०७ खिडक्यांना आतिल बाजुने स्टेनलेस स्टील फ्रेममध्ये फिक्सड् ग्लास फिटींगसह कामाचा समावेश आहे.

Sr.No.	Description	Qty (Sq.Mtr.)	Rate (Rs)	Amount (Rs)
01.	Providing and fixing bullet proof glass for window with heavy duty stainless steel frame (fixed glass) including necessary fitting & fixtures etc. complete. Multipact TM Bullet Proof Glass Size- 1.12 x 1.34 = 07 Nos. Note -- Bullet proof Glass specifications • Proection level : EN1063BR41 • Weapon : Rifle AK47 • Velocity : 720 mlsec • Caliber : 7.62 x 39 • Thickness of Glass : 33 to 35 mm • Weight : 65 to 72 Kg/sqm Manifactured undered License from department of diffence Production/Deptt. Of Industrial Promotion, Government of India for atleast 10 years. Tested and approved by Government of India.	10.50	1,28,900.00	13,53,450.00
02			Packing Charges @ 6%	81,207.00
03			Transport Charges	45,000.00
04			Fitting Charges	1,62,600.00
			Total-	16,42,257.00
05			GST @18%	2,95,606.00
			Grand Total-	19,37,863.00
			R/o-	19,38,000.00

पान ०२ वर

प्रस्तावित तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील तळमजला व पहिल्या मजल्यावरील एकूण ०७ खिडक्यांना आतील बाजुने बुलेटप्रुफ काचा बसविणेकामी येणारे अंदाजे रु.१९,३८,०००/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

7/12/2020

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

28.8 27.8

-19/10

2EY-2020

विषय क्र.- २९

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील (Ad-hoc) विषय

बांधकाम विभाग

विषय:- श्री साईबाबा संस्थानकरीता केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजनेंअंतर्गत विकास कामांसाठी निधी प्राप्त करुन घेणेकामी सल्लागार राज्य शासन व केंद्रशासनाकडे विस्तृत प्रकल्प अहवाल(डि. पी. आर.) सादर करणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-

१) अधिनियमाचे कलम १७ (२) मधील पोटकलम (ट) अन्वये, " विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजन पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमिनी व इमारती संपादित करील किंवा खरेदर करील," अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल," अशी तरतूद आहे.

प्रस्तावना: –

श्री साईबाबांचे दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त शिर्डीत येत असतात. शिर्डीत येणा-या भाविकांच्या सोयीसाठी विकास प्रकल्प राबविणे व त्यासाठी केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजनेअंतर्गत निधी प्राप्त करुन घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी सुचना दिलेल्या आहेत.

शिर्डीत येणा-या भाविकांच्या सोईसाठी विकास प्रकल्प राबविणे व त्यासाठी केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजनेअंतर्गत संस्थानकरीता विकास प्रकल्प राबविणेसाठी प्रस्ताव तयार करणे व इतर अनुषंगीक बाबींची चर्चा करुन पुढील कार्यवाहीसाठी श्री. टि. रविशंकर यांना आमंत्रीत करणेत आले होते. त्यानूसार दि.२८/०१/२०२१ रोजी श्री. टि. रविशंकर यांचे समवेत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व प्र.कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत बैठक झाली. त्यावेळी श्री. टि. रविशंकर यांना खालील तीन प्रकल्पांसाठी प्रस्ताव तयार करणेबाबत सुचना देणेत आल्या.

१) मोजे निमगाव-को-हाळे येथील श्री साई प्रसादालयाचे पश्चिमेकडील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे मालकीचे गट नं.८९, ९० मधील जमीन संस्थानचे विविध विकास प्रकल्पांसाठी खरेदी घेणेबाबत मालमत्ता विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. यामध्ये गट नं. ८९ चे ०१ हे.८० आर व गट नं.९०/२ चे १० हे.३६ आर क्षेत्र आहे. यापैकी ०२ हेक्टर जागेत बहूमजली पार्किंग विकसीत करणे.

२) निमगाव को-हाळे येथे श्री. काशिनाथ गोविंद पाटील यांचेकडून मौजे निघोज ता. राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भूखंड क्र.१ मधील इमारत बी व डी देगणीदाखल प्रात झालेल्या आहेत. त्यापैकी डी इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ ७१४८.६८ चौ.मी इतके आहे. या इमारतीमध्ये १५० खोल्या (तळमजला + ०६ मजले) असून त्यापैकी ०२ मजल्यांचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित इमारतीचे बांधकाम अपूर्ण स्थितीत आहे. सदरहू काम पूर्ण करणेकामी निधी प्राप्त करणेसाठी प्रस्ताव तयार करणे.

३) समाधी मंदिरालगत गट नं.२/४, ३/१ मध्ये श्री साईबाबा दर्शन रांग प्रकल्पाचे (तळमजला + ०२ मजला) काम सुरु आहे. इमारतीचे तिस-या मजल्याचे बांधकाम करणेकामी निधी प्राप्त करणेसाठी प्रस्ताव तयार करणे.

श्री. टि. रविशंकर यांचेकडून प्रसाद योजनेकरीता डिपीआर तयार करणे तसेच प्रत्यक्षात विकास काम सुरु झालेनंतर त्यासाठी आर्किटेक्चरल व पीएमसी सेवा देणे याकामी त्यांचेमार्फत दि.३१/०१/२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे Scope of work व Terms and conditions कळविल्या आहेत.

"It is pleasure meeting you in our site visit. We are interested to prepare the proposal under the Prasad scheme, Ministry of Tourism, Govt Of India, we request you to agree following terms and conditions as discussed in our meeting

1. Our scope of work will be
   - Land Survey
   - Concept design
   - Detail architecture design
   - Detail project Report

पान क्र.०२ वर ...

- Structural design
- Detail estimates
- PMC

2. We will claim the consultancy fees approved by Govt of India for Preparation of DPR, Architecture fees and PMC after approval and sanction of amount from Govt. of India. We will not charge any fees to Shirdi Saibaba Trust except Accommodation, conveyance charges and travelling expenses for site visits and presentation with Government official in Delhi and Mumbai till the sanction of funds.
3. After the approval of project Proposal you have to enter into agreement with us for the consultancy services, as per the fees sanctioned by Govt. of India.
4. You have to submit DPR to Director Tourism, Govt. of Maharashtra to forward the proposal for sanctions to Ministry of Tourism, Govt. of India.
5. Liaison with the Ministry of Tourism Govt. of India is in our scope of work.
6. You have to provide the land documents like survey plan, 7 and 12 extract of the land to confirm the land ownership."

उपरोक्त पत्रात नमूद Scope of work व Terms and conditions बाबत चर्चा करणेसाठी श्री टि. रविशंकर दि.२३/०३/२०२१ रोजी शिर्डी येथे उपस्थित होते. त्यावेळी त्यांना सदर योजनेअंतर्गत विकास कामासाठी निधी प्राप्त करुन घेणेकामी प्राथमिक प्रस्ताव तयार करणेबाबत कळविणेत आले.

त्यानुसार सल्लागार श्री. टि. रविशंकर यांनी सदरहू कामाचा प्रकल्प अहवाल (DPR) संस्थानकडे सादर केला असून त्यातील प्रमुख बाबींसह येणा-या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr.No.	Name of the Component	Amount (Rs.)
01	Construction of Bus Parking 189 nos for Tourist Buses.	4,37,50,000/-
02	Construction of Bus Terminal.	1,86,00,000/-
03	Construction of Taxi stand 69 nos.	83,75,000/-
04	Construction of Auto Rickshaw Stand 67 nos	65,62,500/-
05	Construction of Multilevel Car Parking	
	a) Ground floor	22,00,00,000/-
	b) First	17,60,00,000/-
	c) Second floor	17,60,00,000/-
06	Construction of Sai Shrishti Theme Park with the miniatures of Saibaba Life Stories from His Childhood to Samadhi time.	3,18,00,000/-
07	Construction of Saibaba Statue with landscaping around the statue.	1,06,00,000/-
08	Construction of Vedic Library with audio visual display room.	1,32,75,000/-
09	Construction of Yoga and Meditation Hall	2,28,00,000/-
10	Construction of Auditorium with 1500 Seating capacity	6,05,50,000/-
11	Construction of All State Handicraft Centres (HAAT)	7,96,50,000/-
12	Construction of Amphitheatre with 4000 seating capacity	5,49,60,000/-
13	Construction of Multi purpose hall with 4000 Capacity	75,25,00,000/-
14	Construction of Arrival Centre with lounges, Locker rooms, cloak rooms and Food Courts	21,98,40,000/-
15	Construction of Ticketing Counter with seating areas, security check areas and lounges.	7,64,40,000/-
16	Construction of 10 mtr wide SkyWalk to connect Bus Parking, Multi level Car Parking, Ticket Counter and Arrival centre to the Darshan queue building which is around 870 mtrs.	10,44,00,000/-
17	Amenities and Environment Management components	
	a) Construction of Sump Tank to distribute all the proposed facilities	1,60,00,000/-
	b) Construction of Overhead tank to carry water (grey and drinking) to all the buildings.	1,60,00,000/-
	c) Construction of STP and Solid waste management facility	5,00,00,00/-
19	Construction of Internal Pathways and approach roads	16,00,00,00/-
20	Construction of approach roads	
21	Construction of Landscaping around all the buildings and activities.	1,00,00,000/-
	Sub Total Rs.:-	**1,46,38,52,500/-**

पान क्र.०३ वर ...

	Electrification @4% cost of the Project	5,85,54,100/-
	GST 12%	17,56,62,300/-
	Total	169,80,68,900/-
	DPR Charges	10,00,000/-
	Architects fees 2%	3,39,61,378/-
	PMC Fees 2%	3,39,61,378/-
	Contingency Charges 5%	5,09,42,067/-
	Total Cost of the Project :-	**181,79,33,723/-**

सल्लागार श्री. टि. रविशंकर यांनी उपरोक्त नमूद डिपीआर मध्ये मौजे निमगाव को-हाळे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मालकीचे गट नं.८४,८५,८६,८९ व ९० तसेच संस्थान मालकीचे गट नं. ८५पै., ८७ व ८८ मधील क्षेत्रात दर्शविलेल्या प्रकल्पांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे-

➢ **पार्किंग सुविधा –**

१) १७५०० चौ. मी. जागेमध्ये एकूण १८९ प्रवासी बसेस पार्किंग करणेसाठी सुविधा करणेत येणार असून १५५०क्षेत्रफळाची बस टर्मिनल इमारत बांधकाम करणेत येईल. यामध्ये टॉयलेट, फुड कोर्ट व पिण्याच्या पाण्याची सुविधा असेल. तसेच बस टर्मिनलचे पहिला मजला हा आगमन केंद्र (Arrival Center) ला जोडलेला असेल.

२) OLA, Uber, व स्थानिक टॅक्सी अशा एकूण ६९ टॅक्सी उभे राहणेसाठी एकूण ३३०० चौ. मी. क्षेत्रात टॅक्सी स्टॅण्ड.

३) २६२५ चौ. मी. क्षेत्रात एकूण ६७ ऑटो रिक्शा राहतील असे ऑटो रिक्षा स्टॅण्ड.

४) २१५५२ चौ. मी. क्षेत्रात तळमजला + ०२ मजले अशी कार पार्किंगची सुविधा करणेत येणार असून यामध्ये एकूण ४२०० कार सामावू शकतील.

➢ **साईसृष्टी थिम पार्क** – १०६०० चौ. मी. क्षेत्रात साईबाबांच्या जीवनावर आधारीत म्युरल्स, पुतळे व पेंटींगसह बगिचा विकसीत करणे. श्री साईबाबांचा २१ फुट उंच पुतळा व त्याभोवती लॅण्ड स्केपींग विकसीत करणेत येईल. हे साईसृष्टी थिमपार्कचे प्रमुख आकर्षण केंद्र असेल.

➢ **वेदीक लायब्ररी**- ८८५ चौ. मी. क्षेत्रावर ०१ सुसज्ज अशी वेदीक लायब्ररी निर्माण करणेत येणार असून यामध्ये रुग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद याबाबत पुस्तके व ऑडीओ व्हीजुअल स्वरुपात माहिती देणेत येईल. तसेच यामध्ये इतर धर्मग्रंथ देखील वाचनासाठी उपलब्ध असतील.

➢ **योग व मेडीटेशन हॉल** – शिर्डीत येणा-या साईभक्तांकरीता श्रींचे दर्शनाबरोबरच वेद व योगाभ्यासाची सोय उपलब्ध करणेत येणार असून एकूण १९०० चौ. मी. जागेत १९०० व्यक्ती बसू शकतील अशी सुविधा करणेत येणार आहे.

➢ **ऑडीटोरिअम हॉल**- १५०० व्यक्ती सामावू शकतील असे ऑडीटोरिअम बनविणेत येणार असून यामध्ये कार्यक्रमांसाठी भव्य स्टेज, ग्रीन रुमसह मेक अपरुम, पुरूष व महिलांसाठी स्वतंत्र टॉयलेट सुविधा उपलब्ध करणेत येणार आहेत.

➢ **हॅण्डीक्राफ्ट सेंटर** – ५३१० चौ. मी. क्षेत्रावर सर्व राज्यांतील हॅण्डीक्राफ्ट मटेरीअल विक्रीसाठी स्वतंत्र स्टॉल उपलब्ध करणेत येतील.

➢ **ॲम्फीथिएटर** – ४००० व्यक्ती बैठक क्षमतेचे ६६४० चौ. मी. क्षेत्रावर ॲम्फीथिएटर बनविणेत येणार असून यामध्ये कार्यक्रमांसाठी भव्य स्टेज, पुरूष व महिलांसाठी स्वतंत्र टॉयलेट सुविधा उपलब्ध करणेत येणार आहेत.

➢ **मल्टीपरपझ हॉल** – एकाच वेळी ४००० व्यक्ती सामावू शकतील असा ५१५० चौ. मी. क्षेत्रावर भव्य मल्टीपरपझ हॉल उभारणेत येणार आहे.

➢ **अराईवल सेंटर, लॉकर व फुड कोर्ट** – बस पार्किंग सुविधेचे शेजारी एकूण १८३२० स्क्वे. मी. जागेत अराईवल सेंटर उभारणेत येईल यात साईभक्तांना बायोमेट्रीक पास काढून दर्शन रांगेकडे जाणेसाठी लॉकर, क्लोक रुम, फुड कोर्ट तसेच पुरूष व महिलांसाठी स्वतंत्र टॉयलेट सुविधा उपलब्ध करणेत येणार आहे.

➢ **तिकीट काऊंटर, सिक्युरिटी चेकींग व तात्पुरत्या स्वरुपात बसण्याची सोय**- एकूण ६३०० स्क्वे. मी. जागेत नमूद सुविधा उपलब्ध करणेत येणार आहे.

➢ **स्कायवॉक**- मेन गेट वर सिक्युरिटी चेकींग नंतर दर्शनरांग, तिकीट काऊंटर आदि उपरोक्त नमूद ठिकाणी ये-जा करणेसाठी १० मीटर रुंदीचा स्कायवॉक उभारणेत येणार आहे.

➢ **इतर सुविधा व पर्यावरण व्यवस्थापन घटक –**

a) २० लाख लिटर क्षमता असलेली पाण्याची टाकी उभारणेत येणार असून सदर पाणी अंदाजे ०२ दिवस पुरेल.

b) १० लाख क्षमतेची ओव्हरहेड पाण्याची टाकी उभारणेत येणार असून २४ मिटर उंचीवर बांधणेत येईल. सदर पाण्याचा साठा ०१ दिवस पुरेल.

c) ८०० के.एल.डी क्षमतेचा सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट उभारणेत येणार असून सदरहू प्लॅन्टमधून येणारे पाणी फ्लशींग व लॅन्डस्केपींगकरीता वापरणेत येईल.

पान क्र.०४ वर ...

- अंतर्गत रस्ते / पाथ वे – सर्व इमारतींना जोडण्यासाठी परिसरात पेव्हींग ब्लॉक वापरुन पाथ-वे तयार करणेत येणार आहे.
- लॅण्डस्केपींग – सर्व इमारतींच्या सौदर्यात भर घालण्यासाठी तसेच परिसरातील तापमान व प्रदुषण नियंत्रणात राहणेसाठी आकर्षक स्वरुपात लॅण्डस्केपींग करण्यात येणार आहे.
- टॉयलेट ब्लॉक – बस टर्मिनल, स्पिरीच्युल पार्क, फूड कोर्ट, मल्टीपर्पज हॉल आणि टिकीट काऊंटर या सर्व इमारतींमध्ये पुरुष व महिंलासाठी स्वतंत्र शौचालय सुविधा तयार करणेत येणार आहे.

केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजने अंतर्गत उपरोक्त विकास प्रकल्प कार्यान्वीत झालेनंतर त्यातून संस्थानला मिळणा-या उत्पनामधून दैनंदिन देखभालीचा खर्च भागविणेत येईल.

विभागाचा अभिप्राय- केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजने अंतर्गत विकास कामांसाठी निधी प्राप्त करुन घेणेसाठी डि.पी.आर तयार करणे, सदर डि.पी.आर संस्थानमार्फत राज्य शासन व केंद्र शासनाकडे सादर केलेनंतर पाठपुरवा करणे, सदर डि.पी.आरचे सादरीकरण करणे तसेच केंद्र शासनाकडून या प्रस्तावास निधी प्राप्त झालेनंतर प्रकल्पाचे कामासाठी आर्किटेक्चरल व पी.एम.सी सेवा देणेकरीता श्री.टि.रविशंकर यांची प्रकल्पाचे आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करता येईल.

प्रस्ताव - तरी श्री साईबाबा संस्थानकरीता केंद्र शासनाचे PRASAD (National mission on Pilgrimage Rejuvenation & Spiritual Augmentation Drive) योजने अंतर्गत विकास कामांसाठी निधी प्राप्त करणेसाठी श्री.टि.रविशंकर यांनी सादर केलेल्या डि.पी.आरचे अवलोकन होणेस, तसेच त्यावर चर्चा व विचार विनीमय होऊन डि.पी.आर. राज्य शासन व केंद्र शासनाकडे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 30

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विषय

बांधकाम विभाग

विषय:- संस्थानमार्फत करणेत येणारे बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्लासेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेबाबत..

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-

अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, हि समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना –

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांनुसार संस्थानमार्फत साईभक्तांना मूलभूत सुविधा पुरविणेसाठी तसेच शिर्डी परिसराचे विकासासाठी अनेक छोटे-मोठे प्रकल्पांचे बांधकाम वेळोवेळी करण्यात येते असते. असे प्रकल्पाचे बांधकाम सुरु करणेपूर्वी याकामी वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन आर्किटेक्ट यांची नेमणूक करणेत येते. आर्किटेक्ट यांचेमार्फत बांधकाम आराखडे व इतर तांत्रिक बाबींसह अंदाजपत्रके तयार करुन येणारे अंदाजे खर्चाचे अंदाजपत्रक मा. व्यवस्थापन समितीचे मान्यता घेऊन, बांधकामासाठी विहीत पध्दतीने निविदा मागवून बांधकामे सुरु केली जातात. प्रत्येक प्रकल्प सुरु करतेवेळी आर्किटेक्ट नेमणूकीसाठी स्वंतत्रपणे जाहिरात देऊन निविदा मागविणे व त्यामधून आर्किटेक्टची निवड करणे या प्रक्रियेकरीता बराच कालावधी लागतो. त्यामुळे संस्थानचा आर्किटेक्ट पॅनल तयार असल्यास सदर पॅनलमधून आर्किटेक्टची निवड करणे सोईचे होईल.

तसेच मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.३१/०७/२०२१ रोजीचे सभेतील विषय क्र. २८, ३० व ३६ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावांवर अनुक्रमे निर्णय क्र.६५, ६७ व ७३ अन्वये *"यावर सविस्तर चर्चा केली. आर्किटेक्ट नेमणूकीबाबत धोरण ठरविणेसाठी सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा. तहकुब."* असा ठराव संमत झालेला आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि.२५/०१/२०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार रस्ते, इमारती व पुलांच्या प्रकल्पाकरीता सल्लागाराची नेमणूक करणेबाबत सुधारीत सुचना करणेत आल्या आहेत. त्यानुसार जाहिर निविदेव्दारे सल्लागाराची नियुक्ती करणेसाठी वर्तमान पत्रात मोठया प्रमाणात प्रसिध्दी देऊन इच्छूक सल्लागारांकडून खूले स्पर्धात्मक देकार काही अर्हता- अटीसह (Qualification) बोलाविण्यात यावे, असे नमूद केले आहे.

संस्थानकडील विविध कामांचे स्वरुप पहाता खालील ०४ वर्गवारी A1, A2, A3 व A4 मध्ये आर्किटेक्ट पॅनल तयार करता येईल.

- Group A1 – Architects Panel for works up to Rs.3 Crores
- Group A2 - Architects Panel for works From Rs.3 Crores to Rs.20 Crores
- Group A3 – Architects Panel for works from Rs.20 Crores to Rs.50 Crores
- Group A4 – Architects Panel for works more than Rs.50 Crores.

आर्किटेक्ट पॅनलवर नेमणूक करणेत येणा-या आर्किटेक्ट यांची उपरोक्त वर्गवारीमध्ये निश्चिती करणेसाठी Request for Proposal मधे खालील नमूद केलेप्रमाणे पात्रता-निकष लावून वर्गवारी करता येईल.

SR. No.	Trade	Category	Eligibility Limit (Amount in Rupees)	Similar Work Executed/Completed During Last 5 Years ending on 30.05.2021	Experience of Firm
i)	**Architect** (Civil construction &maintenance, Interior projects, composite works, Electrical, Air-conditioning, Networking, CCTV, fire alarm & fighting system, landscaping, plumbing, structural,etc.)	A1	Up to Rs.3 Crores	One project costing Rs.2.25 Crores or Two projects costing Rs.1.5 Crores each	Minimum 5 years
		A2	From Rs.3 Crores to Rs.20 Crores	One project costing Rs.15 Crores or Two projects costing Rs.10 Crores each	Minimum 7 years
		A3	From Rs.20 Crores to Rs.50 Crores	One project costing Rs.37.5 Crores or Two projects costing Rs.25 Crores each	Minimum 10 years
		A4	Above Rs. 50 Crores	One project costing Rs.80 Crores or Two projects costing Rs.50 Crores each	Minimum 15 years

..२/-

C. Applicants should have experience in having successfully completed similar works of value as prescribed in table above for Government/ Semi-Government/ PSUs/ PSBs/ Financial Institutions/ reputed MNCs during the last 5 years ending on 31.07.2021. The information must be supported with the copies of Work Order, Satisfactory Completion Certificate etc.

D. The applicant should preferably have inhouse team of Consultants/ Engineers for carrying out the services such as Electrical, Air-conditioning, Networking, CCTV, fire alarm & fighting system, landscaping, plumbing, structural etc. In case the Architect proposes to sublet these activities, they should furnish the details of the Consultants having the experience & educational requirements as under.

a. **Structural design:** - Masters degree in structural engineering with minimum of 10 years of relevant experience in the field.

b. **Electrical works:** - Graduate Engineer in Electrical having 10 years of relevant experience in designing HT/LT installation

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने आर्किटेक्ट पॅनल नेमणूकीसाठी विहीत पद्धतीने वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन विविध आर्किटेक्ट संस्थांकडून प्रस्ताव मागविता येतील. प्राप्त होणा-या सर्व प्रस्तावांचे तांत्रिक कागदपत्रांची पडताळणी करुन त्यामधील पात्र संस्थांचे वाणिज्यीक लिफाफे उघडणेत येतील. प्रत्येक गटातील पात्र आर्किटेक्ट संस्थांनी दिलेल्या फि चे प्रस्तावांपैकी निम्नतम दर देणा-या संस्थेच्या दरात आर्किटेक्चरल सल्लासेवा देणेस तयारी दर्शवीणा-या आर्किटेक्ट संस्थांचा त्या गटाचे पॅनल मधे समावेश करता येईल. त्यानंतर सदरहू पॅनलची मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने नेमणूक करता येईल. नविन प्रकल्प सुरू करतेवेळी पॅनल वरील आर्किटेक्ट संस्थेचा त्या क्षेत्रातील अनूभव विचारात घेऊन त्यांना काम देता येईल.

विभागाचा अभिप्राय –

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने याकामी विहीत पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावरुन प्रस्ताव (Request for Proposal) मागवून प्राप्त होणा-या प्रस्तावाची वरील निकषानुसार वर्गवारी करुन आर्किटेक्ट पॅनल तयार करता येईल. संस्थानचे भविष्यातील प्रकल्पांकरीता संबंधीत गटातील आर्किटेक्ट यांची मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने निवड करता येईल.

प्रस्ताव –

तरी संस्थानमार्फत करणेत येणारे बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्लासेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेस व याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकतेस्थळ www.sai.org.in यावरुन जाहीरात प्रसिद्ध करुन विहीत पद्धतीने प्रस्ताव (Request for Proposal) मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

23/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

18.8 17/08

विषय क्र.- 39

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

139

विषय:- दि.०६/०८/२०२१ रोजी आलेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. १६ वरील निर्णय क्रं. १५९ चे कार्यवाहीबाबत.

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –

१) अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

२) संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये, दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट कलम (३) च्या खंड (ख) अन्वये, "पंचवीस हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "पाच लक्ष रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल, अशी तरतूद सुधारीत करणेत आलेली आहे.

३) संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये, दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट कलम (३) नंतर, पुढील पोट –कलम जादा दाखल करण्यात येईल- "(४) मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरीता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलेली नसेल आणि जे त्या विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानाला भेट देणा-या यात्रेकरुंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्याचा किंवा कोणतेही कार्य करण्याचा निर्देश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम, त्या विश्वस्त व्यवथेच्या निधीतून चुकती करता येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी, या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याबद्दलच्या कारणांसह, समितीला मान्यतेसाठी ताबडतोब सादर करील."

प्रस्तावना:- मा. तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी जा.क्रं.२५८, दि.०२/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कोरोना विषाणू महामारी सुरु झालेपासून ते आजपर्यंत संस्थान प्रशासनाने केलेल्या विविध सिव्हील बांधकामाची माहिती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून मागविलेली आहे. त्यानुसार सदरची माहिती जा. नं.१६३५, दि.१४/०८/२०२१ चे पत्रान्वये मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे सादर केली आहे. मा. तदर्थ समितीचे दि.०६/०८/२०२१ रोजीचे सभेतील विषय क्रं. १६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अ. नं. ०१ ते ०३ कामांची माहिती यासभेतील निर्णय क्रं. १५९ अन्वये समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावी असा ठराव समंत झालेला आहे. त्यानुसार सदरहू विषयांचे माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

१) श्री साईबाबा मंदिरालगत पारायण कक्षाची भिंत पाडून त्याचे विलीनीकरण करुन हॉल बनविणे, हा विषय(दि.१९/०६/२०२१ च्या सभेत कायम झालेला निर्णय क्रं.१/८२) दि.०६/०१/२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेला होता व त्या विषयावर ०२ विरुध्द ०२ अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वित झालेले आहे.

विवरण- श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील सध्याचे साईसभागृह /पारायण हॉलमध्ये अद्यायावत मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.४६,०५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी आर्किटेक्ट डि. ओ. निकम पुणे यांचेकडून कामाच्या किंमतीचे १.२६% इतक्या फि मध्ये इंटेरिअर डिझाईन, ड्रॉईंग, सविस्तर अंदाजपत्रक, निविदा प्रपत्र या सेवा घेऊन त्यानुसार ई निविदा मागविणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीकडे चक्रिय पध्दतीने मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदरचा विषय मा. तदर्थ(Ad-hoc) समितीव्दारे २ विरुध्द २ ने नामंजूर झालेला आहे. याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत आले आहे. सद्यस्थितीत सदरहू सिव्हील ॲप्लीकेशन प्रलंबित आहे. त्यामुळे सदर कामाबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच सदरचे काम अद्याप कार्यान्वित करण्यात आलेले नाही.

२) श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करण्यासाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरिअर कामे करण्यासाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- चे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी निविदा काढण्यासाठी मान्यतेसाठी प्रस्ताव दि.०६/०१/२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने आणलेला होता, त्यावरील निर्णय (दि.१९/०६/२०२१ च्या सभेत कायम झालेला निर्णय क्रं.१/८३) ०२ विरुध्द ०२ अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वित झालेले आहे.

विवरण- मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटींग हॉल) तयार करणेसाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई –निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रिय

पान ०२ वर

पध्दतीने सादर करणेत आला होता. सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीव्दारे ०२ विरध्द ०२ निर्णय झालेला असल्याने याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत आले आहेत. सद्यस्थितीत सदरहू सिव्हील ॲप्लीकेशन प्रलंबीत असून सदरहू कामाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

३) श्री साईप्रसादालयात अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओट्याचे बांधकाम करणेबाबत..

विवरण-

श्री साईप्रसादालयात एकाच वेळी ३५०० भक्तांची बैठक व्यवस्था असलेला प्रसादभोजन हॉल आहे. प्रसादभोजन हॉलमध्ये उत्तरबाजूचे गेटजवळ आतील बाजूस जुन्या प्रसादालयातील संगमरवरी दत्त मुर्तीची प्रतिस्थापना करुन प्राण प्रतिष्ठा करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे प्रसादालयातील किचनव्यवस्था मोठया प्रमाणात आहे. श्री साई प्रसादालयात दैनंदिन सरासरी ५० हजार भक्त प्रसाद भोजन घेत असतात. त्या धार्मिकतेने प्रसादालयातील किचनमध्ये अन्नपूर्णा देवीची स्थापना करणेबाबत अन्नपूर्णा देवीच्या मुर्ती बसविणेसाठी फर्निचर व संगमरवरी /मार्बल मध्ये ओट्याचे बांधकाम करणेस श्री साईप्रसादालय विभागाकडील दि.१२/१०/२०२० रोजीचे टिपणीन्वये कळविलेले होते.

श्री साईप्रसादालयात भोजन विक्री काऊंटरचे पश्चिम बाजूकडील पॅसेजमध्ये पुर्वाभिमुख अन्नपूर्णा देवीची मुर्ती बसविणेसाठी ओटा तयार करुन त्यावर ग्रेनाईट बसविणेकामी दि.०४/०४/२०२१ रोजीचे टिपणीन्वये रु.९२,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. याकामी ग्रेनाईट मटेरिअल खरेदी व मजुरी दराचे काम करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेणेत आले आहे. त्यासाठी एकूण रक्कम रु.८९,५३५/- मात्र खर्च आलेला आहे.

प्रस्ताव:- तरी दि.०६/०८/२०२१ रोजी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत आयत्या वेळी झालेल्या विषय नं.१६ चे निर्णय क्रं.१५९ नुसार वर नमूद विषयांवरील केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 32

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय - संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता सल्लागार दि. निसर्ग कन्सल्टंसी, नाशिक यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम रू.१,९६,२८,३७८/- मात्रचे खर्चास तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करणे तसेच मा. विधी व न्याय विभाग यांची मान्यता घेणे व तदनंतर याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता मिळणेबाबत...

टिपणी -

मान्यतेस्तव सविनय सादर,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद - अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पूरविणे, तसेच पोट कलम १ (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे.

मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय -

१. दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.४५ संमत झालेला आहे.
"...यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्येपाणी घेणेकरीता ९०० mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."

२. दि.११/०५/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३०३ संमत झालेला आहे.
"...सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.तसेच संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्रजिवन प्राधिकरण यांचे सल्लागार म्हणून करणेत आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्ती करीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांकडून e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागवण्याबाबत आभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवणेत यावा, असे ठरले".

३. दि.१३/०७/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३६५ संमत झालेला आहे.
"...यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेले निर्णय व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेशी याबाबत झालेला पत्रव्यवहार यासह आभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले".

४. दि.२८/०८/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.४३२ संमत झालेला आहे.
"...यावर सविस्तर चर्चा होवून, मोजे निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी Meter Room, DI Pipe, Intake Well व इतर अनुषंगकी बाबींचे कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना दि.२९/०८/२०१९ रोजी देणेत आलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदर कामी सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवणे ठेकेदार यांनी बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवाप्राप्त करणेसाठी नव्याने सल्लगार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे संस्थानचे www.sai.org.in संकेतस्थळावर e-RFP (e- Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली.
यावेळी समितीच्या असे निर्दशनास आले की, संस्थानचे सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येत नाही."

५. मा. तदर्थ (Ad-hoc) समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेला निर्णय खालीलप्रमाणे आहे.
".. .. संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावात गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेसाठी जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता सल्लागार नियूक्ती करणेसाठी मागविणेत आलेल्या ई-आर.एफ.पी प्रस्तावांत पात्र ०२ सल्लागारांपैकी The Nisarga Consutancy, Nashik यांची निम्नतम ई-निविदा स्विकारणेबाबत चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली."

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ मध्ये देणगीदार साईभक्त यांचे देणगीतून पाणीपुरवठा विभागामार्फत नविन साठवण तलावाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदरहू तलावाचे काम सन २०१८ मध्ये पूर्ण झाले असून त्याकरीता गोदावरी उजवा तट कालव्यापासून पाईपलाईन टाकणेचे काम बाकी आहे.

सदरहू नविन साठवण तलावाकरीता पाईपलाईन टाकणे व इतर अनुषंगीक बाबींचे कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना दि.२९/०८/२०१९ रोजी दिलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदरकामी प्रकल्पाचे सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवून ठेकेदार यांची बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवा प्राप्त करणेसाठी नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता ई-आरएफपी प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२८/०८/२०२० चे सभेपुढे सादर करणेत आला होता.

पान क्र.०२ वर...

त्यावर निर्णय क्र.४३२ खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होवून, मोजे निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी Meter Room, DI Pipe, Intake Well व इतर अनुषंगकी बाबींचे कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना दि.२९/०८/२०१९ रोजी देणेत आलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदर कामी सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवणे ठेकेदार यांनी बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवाप्राप्त करणेसाठी नव्याने सल्लगार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे संस्थानचे www.sai.org.in संकेतस्थळावर e-RFP (e- Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली.

यावेळी समितीच्या असे निर्दशनास आले की, संस्थानचे सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येत नाही." असा निर्णय झालेला आहे.

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे उपरोक्त निर्णयान्वये, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची दि.२९/०८/२०१९ रोजीचे आदेशान्वये केलेली नियुक्ती रद्द केली असलेबाबत त्यांना दि.१४/०१/२०२१ चे पत्रान्वये कळविणेत आले तसेच सदर निर्णयाचे अनुषंगाने मौजे निमगांव-को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधिल नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी डी.आय. पाईपलाईन टाकणे, मिटर रूम बांधकाम करणे व इतर अनुषंगीक बाबींचे कामांसाठी प्रकल्पाचे सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, ई-निविदा प्रपत्रे तयार करणे; कामावर देखरेख ठेवून ठेकेदार यांची बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवा प्राप्त करणेसाठी नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-आरएफपी (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेत आले.

सदर e-RFP प्रस्तावाचा कालावधी दि.२०/०१/२०२१ ते दि.०३/०२/२०२१ असा होता. सदर विहित मुदतीत ०३ सल्लागार यांनी ई-आर.एफ.पी प्रस्ताव सादर केले होते. त्यापैकी सल्लागार The Nisarga Consultancy, Nashik यांचे निम्नतम दराचे प्रस्तावास मा. तदर्थ (Ad-hoc) समितीने चक्रीय पध्दतीने दि.१६/०३/२०२१ रोजी मान्यता दिली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने सल्लागार The Nisarga Consultancy, Nashik यांना दि.०६/०४/२०२१ रोजी नियूक्ती पत्र देणेत आले व दि.२२/०५/२०२१ रोजी त्यांचेशी याकामी करारनामा करणेत आला. सदर चक्रिय पध्दतीचे प्रस्तावास दि.१९/०६/२०२१ चे समिती सभेत विषय क्र.०१ (९०) निर्णय क्र.१ अन्वये, अवलोकन करण्यात येऊन नोंद घेण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागार The Nisarga Consultancy, Nashik यांनी कामास सुरूवात करून त्यांनी दि.१८/०५/२०२१ रोजी साईटचे सर्व्हेक्षण केले आहे व सर्व माहीती संकलीत करून दि.१७/०८/२०२१ रोजी त्यांनी याकामाचा DPR, Conceptual Plans, L Section, C Section, Pipe Design, Survey Levels, Detailed Estimate etc. सादर केलेले आहेत. सल्लागार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे सन २०२१-२०२२ चे एसएसआर नुसार या प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

Sr. No.	Project Components	Cost In Rs.
01	Working Survey	50,000.00
02	Gravity Main D. I. K.7 - 900 mm Dia.	1,30,79,363.00
03	Construction of RCC Channel at Canal	11,78,249.00
04	Full Bore Electromagnetic Flow Meter 900 mm Dia.	7,20,199.00
05	Meter Room for Flow Meter (3 x 3 x 3 m)	3,19,897.00
06	Miscellaneous Works	8,00,000.00
	Cost of work in Rs. -	**1,61,47,708.00**
	Add 12% for GST -	19,37,725.00
	Net Cost in Rs. -	**1,80,85,433.00**
	Add 3% for Contingency Charges -	4,84,431.00
	Add 1% for Technical Scrutiny Charges -	1,61,477.00
	Add 4.96% for Project Management Consultant Charges -	8,97,037.00
	Gross Cost in Rs -	**1,96,28,378.00**

वरील विषयांकित कामासाठी प्रकल्प सल्लागार यांनी वरीलप्रमाणे रक्कम रु.१,९६,२८,३७८/- मात्र इतका खर्च अपेक्षित असलेचे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय - संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सल्लागार दि. निसर्ग कन्सल्टंसी, नाशिक यांनी रक्कम रु.१,९६,२८,३७८/- मात्र इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. याकामी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेनंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करून त्यांची मान्यता घेणे तसेच मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेची कार्यवाही करावी लागेल. तसेच सदर मान्यतेनंतर याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

पान क्र.०३ वर...

पान क्र.०३

प्रस्ताव - तरी संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी खालील बाबींकरीता मान्यता मिळणेस विनंती.

१. सल्लागार दि. निसर्ग कन्सल्टंसी, नाशिक यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम रू.१,९६,२८,३७८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी.

२. मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेनंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करून त्यांची मान्यता घेणे.

३. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२३/०१/२०१३ चे पत्राचे अनुषंगाने, पायाभूत व धोरणात्मक प्रकल्प, योजना अंतर्गत सदर काम येत असल्याने त्यास मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे.

४. या सर्व कार्यवाहीनंतर सदरकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

तरी वरीलप्रमाणे बाबींकरीता मान्यता मिळणेस विनंती.

20/8/14

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

20.8.14 20/08

Con-Meeting

328-2021

141

विषय क्र.- 33

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

बांधकाम विभाग

144

विषय - श्री साईबाबा हॉस्पीटल येथिल General OT - 01 & 02 या दोन ओटींचे नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रू.६,०५,७५०/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत...

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद -

१. अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

२. संस्थान अधिनियम २००४ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अन्वये दि.१३/०७/२०१७ रोजी सुधारीत केलेनुसार अधिनियमाच्या कलम १४ मधील पोटल कलम (३) च्या खंड (ख) अन्वये, "पंचवीस हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "पाच लक्ष रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल, अशी तरतूद सुधारीत करणेत आलेली आहे.

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सदस्यांचे चक्रिय प्रस्तावावरील मत - यापूर्वी दि.०७/१२/२०२० रोजी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सादर होणेसाठी संस्थानचे सभा कामकाज विभागाकडे सादर करणेत आला होता. तथापी, त्यावेळी समितीची सभा न झाल्याने याकामी दि.२५/०३/२०२१ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटल येथील ओ.टींची दुरुस्ती करणेकामी येणा-या अपेक्षित रु.११,१९,३२३/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेसाठी चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला होता, त्यावर समिती सदस्यांनी खालील प्रमाणे निर्णय दिलेले आहे.

अ) मा. अध्यक्ष, श्री. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी दि.२२/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

विषय वाचला तसेच संचिकेमधील सर्व पत्रव्यवहार पाहिला. हे स्पष्ट होते की, CVTS मध्ये सन २०१४ मध्ये व General OT मध्ये सन २०१७ मध्ये ईपॉक्सी फ्लोरींग / कोटींग केलेले आहे. ऑपरेशन थेटरमधील केमीकलच्या वापरामुळे खरंतर ईपॉक्सी फ्लोरींग लावल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत ते किती अंशी खराब झाले आहे. याबाबत कुठलाही तज्ञाचा अभिप्राय नाही व हे ईपॉक्सी फ्लोरींग यापूर्वी बसविण्याआधी जर ग्रेनाईट किंवा फरशी बसवलेली होती तर पुन्हा ईपॉक्सी फ्लोरींग काढून पुन्हा ग्रेनाईट फ्लोअरींग करण्याचे प्रयोजन काय, हे स्पष्ट नाही. वरील परिस्थितीत संचालक यांच्या दि.१५/७/२०२० च्या पत्रावरुन फक्त ईपॉक्सी फ्लोरींग खराब झाल्याची बाब नमूद आहे. अशा परिस्थितीत सरसकट सर्व फ्लोअरींग बदलून ग्रेनाईट फ्लोअरींग टाकणे हेच मुळात तर्कसंगत नाही, करिता माझेतर्फे परवानगी नामंजूर.

ब) मा. श्री. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा सदस्य यांनी दि.२५/०३/२०२१ रोजी सादर केलेला प्रस्ताव मान्य केला आहे.

प्रस्ताव मान्य.

क) मा. श्री. भानुदास पालवे, अप्पर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक तथा सदस्य यांनी दि.२७/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

प्रस्ताव नामंजूर.

ड) मा. श्रीमती गीता बनकर, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्य यांनी दि.२३/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

प्रस्ताव वाचला सन-२०१७ साली लावण्यात आलेले ईपॉक्सी फ्लोरींग, केमीकलच्या वापरामुळे किती खराब झाले आहे. याबाबत तज्ञ अभिप्राय नाही. त्यामुळे ईपॉक्सी पूर्वी ग्रेनाईट बदलून ईपॉक्सी व पुन्हा ग्रेनाईट याबाबत योग्य कारण / प्रयोजन नमूद नाही. त्यामुळे प्रस्ताव वस्तुस्थितीस तर्कसंगत नाही. सबब नामंजूर.

प्रस्तावना - श्री साईबाबा हॉस्पिटल येथिल General OT - 01 & 02, CVTS OT - 01 & 02, Neuro OT - 01 & 02 या ओटींची दुरूस्ती करणेसाठी यापुर्वी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर चक्रिय पध्दतीने वरीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे. सदर निर्णयाची नोंद दि.१९/०६/२०२१ चे सभेत विषय क्र.०१ (९२) अन्वये घेण्यात आली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल येथिल General OT - 01 या ओटीची दुरूस्ती करणेसाठी वैद्यकिय संचालक यांनी वरील संदर्भिय पत्रान्वये फेर विनंती केलेली आहे. सदर हॉस्पीटल मधिल General OT - 01 व 02 ची पहाणी केली आहे. सदर ओटींचे इपॉक्सी फ्लोरींग, दरवाजे इ. मोठया प्रमाणात खराब झालेले आहेत.

सदर ओटींमध्ये अवजड मशिनरी, एक्स रे मशिन, रेडीएशन मशिन इ. चा वापर असलेने सदर ओटींची इपॉक्सी फ्लोरींगला तडे जाऊन त्यास खड्डे पडलेले आहे. त्यामूळे त्यामध्ये रूग्णांचे रक्त, ओटी साफ केलेनंतर पाणी आदी जाऊन त्यामध्ये बॅक्टेरिया होऊन रुग्णांना इन्फेक्शन होण्याचा धोका संभवू शकतो.

पान क्र.०२ वर ...

सदर ओटींकरीता यापूर्वी श्री साईबाबा रुग्णालयामार्फत इपॉक्सी फ्लोरींग करण्यात आलेले आहे. सदरहू इपॉक्सी फ्लोरींग सततच्या वापरामुळे ०२ ते ०४ वर्षात खराब होते असे वैद्यकिय संचालक यांनी कळविले आहे.

सदर ओटींचे सद्यस्थितीदर्शक छायाचित्रे सोबत जोडलेली आहेत. त्याकरीता सदर नुतनीकरणाचे काम तातडीने करणे गरजेचे आहे. पहिल्या टप्प्यात General OT - 01 व 02 या ओटींची दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम हाती घेता येईल. त्यानुसार याकामी इकडील विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्याकरीता इपॉक्सी फ्लोरींग काढून त्याठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग बसविणे प्रस्तावित केले आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Providing and laying Granite Flooring and Miscellaneous Civil Works in General OT - 01 & 02 in Shri Saibaba Hospital, Shirdi.

S.No.	Description	Quantity	Unit	Rate	Amount (Rs.)
1	Removing cement tiles or marble or polished shahabad floor or dado without bed concrete etc. complete.	75.00	Sqm	42.00	3,150.00
2	Carting away unwanted material from the site upto 2 kms.	8.00	Cum	178.13	1,425.04
3	Providing and laying in position flooring of Imperial White / Kashmir White / Moon White / Amba White stone of approved shade and size 18 mm to 20 mm thick. (Flooring).	75.00	Sqm	4005.00	300,375.00
4	Providing and laying in position flooring of Imperial White / Kashmir White / Moon White / Amba White stone of approved shade and size 18 mm to 20 mm thick. (Skirting).	5.20	Sqm	4005.00	20,826.00
5	Providing and fixing Hermetically sealed single open swing door as per site conditions with automatic swing operated by sensors or switches and also having manual operation (Non -SSR).	6.72	Sqm	14000.00	94,080.00
6	Providing and fixing in position, Double shuttered aluminium extruded powder coated openable door of specified size.	5.76	Sqm	7858.00	45,262.08
7	Providing and fixing in position extruded aluminium partitions.	3.60	Sqm	3397.00	12,229.20
8	Providing and applying interior wall finish luster of approved make on internal wall surface. (Anti Bacterial Paint to be used in the OT).	160.00	Sqm	225.00	36,000.00
				TOTAL:	513,347.32
				ADD GST @ 18%:	92,402.52
				TOTAL AMOUNT RS.:	605,750.00

विभागाचा अभिप्राय - वरील विषयांकीतकामी वर नमूद अंदाजपत्रकानूसार रक्कम रू.६,०५,७५०/- मात्र इतका अपेक्षित आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.सी.ए.टी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दि.२०/०५/२०२१ अन्वये खालील शासन निर्णय संमत झालेला आहे.

".. .. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६/११/२०१४ च्या शासन निर्णयानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२७/०९/२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार रु.३ लक्ष रकमेवरील कामे ई-निविदा पध्दतीने करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. आता या निर्णयाव्दारे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांकरिता रु.१० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करुन) रकमेवरील कामांकरीता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात यावा."

सदर काम रक्कम रु.१० लक्षपेक्षा कमी असल्याने वरील शासन निर्णयानुसार याकामी दरपत्रके मागविता येतील असे मत आहे. सदरकामी तज्ञ म्हणून दर्शनरांग प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे, पाटर्नर, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांचा अभिप्राय घेणेत आला त्यावर त्यांनी दि.०९/०९/२०२१ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

With respect to above subject & site inspection, following is observed, noted and changes suggested.

1. In general OT 1 & 2 area Ceramic flooring & epoxy coating is totally damaged.
2. We recommend to remove old ceramic & epoxy coating and replace it with granite flooring which will be durable. Please ensure to use the largest size of granite available for this purpose, as minimum joints should be provided in the flooring and dado of OT and such other areas.
3. For walls use Granite / Marble dado with Large stone size in order to have minimum joints. The dado must be upto the ceiling height.
4. For Maintaining privacy or control access kindly use the automatic sliding doors available for this purpose, in every OT.

आर्किटेक्ट यांचे वरील अभिप्रायानूसार सदर कामाचे अंदाजपत्रकात ओटीकरीता ग्रेनाईट फ्लोरींग, हरमॅटीकली सिल्ड डोअर इ. बाबींचा समावेश करणेत आला आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये ऑपरेशनचे प्रमाण जादा आहे. त्यामूळे General OT – 01 & 02 या ओटी जादा कालावधीसाठी बंद ठेवणे शक्य होणार नाही. तसेच सदर इमारत ही जूनी असून त्यास डॅडो बसविणेसाठी जादा तोड करणे उचीत होणार नाही. त्यामूळे भिंतींना डॅडो न घेता काम लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने भिंतींना ॲन्टी बॅक्टेरीअल लस्टर पेंट घेण्यात आला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकात खालील बाबींचा समावेश करणेत आला आहे.

१) जुन्या फ्लोरींग टाईल्स काढणे.
२) तोड फोडीचे मटेरीअलची वाहतूक करणे.
३) ग्रेनाईट फ्लोरींग व स्कर्टींग बसविणे.
४) ओटीकरीता हरमॅटीकली सिल्ड डोअर बसविणे.
५) ओटी पॅसेजकरीता ॲल्यूमिनियम डोअर व पार्टीशन.
६) ओटीकरीता ॲन्टी बॅक्टेरीअल लस्टर पेंट देणे.

श्री साईबाबा हॉस्पिटल येथिल General OT – 01 & 02, CVTS OT – 01 & 02, Neuro OT - 01 & 02 या ०६ ओटींची दुरूस्ती करणे गरजेचे आहे. तथापी, पहिल्या General OT – 01 & 02 मधील दुरुस्ती काम हाती घेता येईल. सदर ओटींचे फ्लोरींग, दरवाजे इ. मोठया प्रमाणात खराब झालेले असल्याने त्यांचे नुतनीकरण तातडीने करणे गरजेचे आहे. सदर ओटींमध्ये अवजड मशिनरी, एक्स रे मशिन, रेडीएशन मशिन इ. चा वापर असलेने सदर ओटींची इपॉक्सी फ्लोरींगला तडे जाऊन त्यास खड्डे पडलेले आहे. त्यामूळे त्यामध्ये रूग्णांचे रक्त, ओटी साफ केलेनंतर पाणी आदी जाऊन त्यामध्ये बॅक्टेरिया होऊन उपचार घेणारे रुग्णांना इन्फेक्शन होण्याचा धोका संभवू शकतो.

पान क्र.०३ वर ...

प्रस्ताव - तरी श्री साईबाबा हॉस्पीटल येथिल General OT - 01 व 02 या दोन ओटींचे पहिल्या टप्प्यात नुतनीकरण करणेसाठी येणारे रक्कम रू.६,०५,७५०/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच यांकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस प्रशासकिय मान्यता मिळणेस विनंती.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
14.9 14/09

Com. Meeting

362-2021

i. 1

विषय क्र.- 38

मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग,

147

विषय – साईभक्तांना मंदिर परिसरात आगमन –निर्गमन करणे सोयीचे व्हावे व सुलभरित्या माहिती व्हावी याकरीता मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नावात बदल केलेप्रमाणे पितळी अक्षरात नविन बोर्ड तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी निम्नतम दराचे निविदाधारक यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत..

टिपणी-

१)	कामाचे नांव	साईभक्तांना मंदिर परिसरात आगमन –निर्गमन करणे सोयीचे व्हावे व सुलभरित्या माहिती व्हावी याकरीता मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नावात बदल केलेप्रमाणे पितळी अक्षरात नविन बोर्ड तयार करुन बसविणे.
२)	प्रशासकिय मान्यता	मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.०७
३)	प्रशासकिय मान्यता दिलेली अंदाजपत्रकीय रक्कम	रु.०४.७५ लक्ष
४)	प्रस्तावित कामाबाबत माहिती	प्रस्तावना: श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी देश विदेशातून लाखो साईभक्त शिर्डीला येतात. श्री साईबाबा संस्थानने साईभक्तांसाठी शिर्डी व परिसरामध्ये मोठया प्रमाणावर सुविधा व नवनविन प्रकल्प उभारलेले आहेत. यामध्ये मंदिर परिसर नुतनीकरणाचे महत्वाचे काम संस्थानने पूर्ण केले आहे. साईभक्तांना मंदिर परिसरात सहजतेने ये-जा करणेसाठी ०५ गेटची निर्मिती केलेली असून या सर्व गेटला अनुक्रमे गेट नं. ०१ ते गेट नं. ०५ असे नंबर दिलेले आहेत. साईभक्तांचे सुलभ माहितीकरीता मंदिर परिसराचे सर्व गेटचे अस्तित्वातील नंबर बदलून त्याऐवजी खालीलप्रमाणे नावांचा वापर केल्यास साईभक्तांना सदर गेटची सुलभतेने माहिती होईल. याशिवाय गेटचे अशा स्वरुपाचे नामकरण केल्यास साईभक्तांना ही नावे प्रचलित असल्याने लक्षात ठेवण्यास सोपे जाईल.

अ.नं.	सध्याचे नाव	करावयाचा नाम निर्देश
०१	गेट नं. ०१	श्रध्दा व्दार (SHRADDHA GATE)
०२	गेट नं. ०२	साईबाबा व्दार (SAIBABA GATE)
०३	गेट नं. ०३	व्दारकामाई व्दार (DWARKAMAI GATE)
०४	गेट नं. ०४	गुरुस्थान व्दार (GURUSTHAN GATE)
०५	गेट नं. ०५	सबुरी व्दार (SABURI GATE)
०६	शनि गेट	शनीमहाराज व्दार (SHANIMAHARAJ GATE)

५)	निविदा तपशिल	दि.११/०२/२०२१रोजीचे वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२०/०२/२०२१अखेर पर्यंत विहीत मुदतीत १)ऋषीकेश सदाफळ, राहाता २) पूजा आर्कीटेक्चरल सिस्टीम प्रा. लि. , मुंबई ३) डि. एल. कार्पोरेशन, मुंबई या ०३ ठेकेदारांनी ई-निविदा सादर केलेल्या आहेत.
अ)	निविदा कालावधी	दि.११/०२/२०२१ते दि.२०/०२/२०२१ अखेर
ब)	तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ	दि.२३/०२/२०२१ , सकाळी ११.०० वाजता
क)	निविदा प्रक्रीयेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या	०३ (तीन)
ड)	तांत्रीक निविदेत पात्र ठेकेदार संख्या	०३ (तीन)
इ)	सर्व निविदा धारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ?	होय
ई)	सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहे काय?	होय.
ऊ)	निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम	रु. ४.७५ लक्ष (अंदाजपत्रकानुसार) रु.३,८०,०००/- (२० % कमी केलेली रक्कम)

पान ०२ वर

६) तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिल –

अ.नं.	ठेकेदाराचे नाव	निविदा रक्कम	निविदा टक्केवारी (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३,८०,०००/- वर)कमी/अधिक
१)	ऋषीकेश सदाफळ, राहाता	रु.४,२०,०००/-	१०.५२६३% (अधिक)
२)	पूजा आर्कीटेक्चरल सिस्टीम प्रा. लि. , मुंबई	रु. ७,३८,०८४/-	९४.२३२६% (अधिक)
३)	डि. एल. कार्पोरेशन, मुंबई	रु.७,५५,००४/-	९८.६८५२%(अधिक)

७) निम्नतम निविदाधारकाचा तपशिल –

अ)	ठेकेदाराचे नाव	ऋषीकेश सदाफळ, राहाता
ब)	निविदा रक्कम	रु.४,२०,०००/-/-
क)	निविदा टक्केवारी कमी/अधिक	+१०.५२६३% (अधिक)

८)	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार	मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

उपरोक्त नमूद तपशिलानुसार मुदतीत प्राप्त निविदाधारकांचे उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक लिफाफाचे तुलनात्मक तक्त्यानुसार ठेकेदार ऋषीकेश सदाफळ, राहाता यांचे निम्नतम दर रक्कम रु. ४,२०,०००/-(१०.५२६३% अधिक) आहे.

उपरोक्त विषयांकित कामी पात्र निविदांपैकी ठेकेदार ऋषीकेश सदाफळ, राहाता यांची रक्कम रु.४,२०,०००/- मात्र इतक्या निम्नतम दराची निविदा स्विकारणेकामी त्यांचेशी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणेसाठी मा.तदर्थ समितीची मान्यता मिळणेसाठी चक्रिय पध्दतीने दि.०६/०४/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. यावर " या विषयामध्ये कुठलीही तातडी नाही करीता हा विषय योग्य वेळी आणावा" असा निर्णय दि.०७/०४/२०२१ रोजीचे पत्राव्दारे मा. तदर्थ समितीचे मा. अध्यक्ष महोदय यांनी तसेच मा. तदर्थ समिती सदस्य यांनी दिला आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रलंबीत आहे.

सदरहु विषयाची उपयुक्तता विचारात घेऊन हा विषय पुन्हा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त प्रस्ताव फेर सादर करता येईल. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणे क्रमप्राप्त आहे.

प्रस्ताव:- तरी वर नमूद तपशिलानुसार साईभक्तांना मंदिर परिसरात आगमन –निर्गमन करणे सोयीचे व्हावे व सुलभरित्या माहिती व्हावी याकरीता मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नावात बदल केलेप्रमाणे पितळी अक्षरात नविन बोर्ड तयार करुन बसविणे कामी पात्र निविदांपैकी ठेकेदार ऋषीकेश सदाफळ, राहाता यांची रक्कम रु.४,२०,०००/- मात्र इतक्या निम्नतम दराची निविदा स्विकारणेकामी त्यांचेशी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा वाटाघाटी होऊन ठेकेदार कार्यादेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

(भाग्यश्री बानायत, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी
21.9 21/09.

Con-Meeting
429-2021

विषय क्र.- ३५

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग,

विषय – संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील सं.न.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्सट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांचे अंतीम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करणे व संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव परत करणेबाबत.....

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद -

अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद असल्याने महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि २००६/६७/(८७) का. सोळा मंत्रालय, मुंबई -४०० ००३ दि. १३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पध्दतीने बांधण्याकरीता रु. ७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६४८

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या राज्य परीवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे अंतिम बीलाची रक्कम रु. ६,६३,७९,९२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात यावे व त्यानंतर सदर कामाची उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२४,२०,७७०/- मात्र पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रांस्ट्रक्चर लि., पुणे यांना आदा करणेत यावी, असे ठरले. "

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४२

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथिल स.नं. १७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याचे काम सुरु असून सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर व भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे उदघाटन करण्यात यावे, तोपर्यंत ठेकेदार यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करण्यात येऊ नये, असे ठरले. "

प्रस्तावना-

शिर्डी येथील सं.न.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारत बांधकामाची माहिती -

०१.	ठेकेदाराचे नांव	पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे
०२.	मंजूर निविदा रक्कम	रु. ७,६०,९०,०८९/-
०३.	अंतिम बिलाची एकूण रक्कम	रु. ६,६३,७९,९२६/-
०४.	यापुर्वी अदा केलेली रक्कम	रु. ६,३९,५९,१५६/-
०५.	उर्वरीत शिल्लक देय रक्कम	रु. २४,२०,७७०/-
०६.	मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च	रु. ९७,१०,१६३/- (१२.७६१४%) कमी
०७.	करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत	१५ महिने – दि.१३/०८/२०११ पर्यंत
०८.	ठेकेदार यांना देण्यात आलेली मूदतवाढ	मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.८५८,दि.२७/१०/२०१३ अन्वये दि. ३१/०१/२०१४ अखेर शेवटची मूदतवाढ देण्यात आलेली आहे.
०९.	प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक	दि.२८/०८/२०१७
१०.	निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांचे बिलातून विलंबापोटी कपात करणेत आलेली दंड आकारणीची रक्कम. (मंजूर निविदा रक्कम रु.७,६०,९०,०८९/- मात्रचे १०%)	रु.७६,०९,००९/- मात्र

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील वर नमूद निर्णय क्रं. ६४८ अन्वये सदरहू अंतिम बिलाची रक्कम रु.६,६३,७९,९२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तथापि बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात यावे व त्यानंतर सदर कामाची उर्वरीत निव्वळ देय रक्कम ठेकेदार यांना अदा करणेत यावी, असे सदरहू निर्णयान्वये ठरले आहे.

२) सदरहू इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे शुभहस्ते करणेसाठी कार्यक्रमाचे स्वरुप, दिनांक, वेळ व मान्यवर आदि बाबी निश्चित होणेस तसेच ठेकेदार यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करणेबाबत दि.३०/०१/२०१९ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर सदरहू सभेतील वर नमूद निर्णय क्रं.४२ अन्वये इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणेचे काम सुरु असून सदरचे काम पूर्ण झालेनंतर व भोगवटा प्रमाणपत्र मिळालेनंतर इमारतीचे उदघाटन करण्यात यावे तोपर्यंत ठेकेदार यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करणेत येऊ नये, असे ठरले.

३) शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीसाठी अग्निशमन यंत्रणा उभारणेचे काम पूर्ण झालेले असून सदरची यंत्रणा दि.२३/०९/२०१९ पासून कार्यान्वित झालेली आहे.

पान ०२ वर

४) शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडून जा. क्रं. नप/टे-८१२/९२४/२०१९, दि.२९/११/२०१९ अन्वये इमारत वापर परवाना मिळालेला आहे.

५) सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन ०४ वर्षे इतका कालावधी झालेला आहे. तसेच दोषदायीत्व (Defects Liability Period) कालावधी पूर्ण होऊन ०३ वर्षे झाले आहेत.

६) अंतिम बिलाची उर्वरीत देय रक्कम मिळणेबाबत ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांचेकडून वारंवार पत्रांव्दारे तगादा करणेत येत आहे. आता ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फास्ट्रक्चर लि. यांनी दि.१८/१२/२०१९ रोजी प्राप्त पत्रान्वये अंतिम बिलाची उर्वरीत रक्कम, सुरक्षा ठेव रक्कम व दंड आकारणी पोटी कपात केलेली रक्कम अशी एकूण रु.१,३७,५२,०७६/- मात्र मिळणेची विनंती केलेली आहे. ठेकेदार यांनी त्यांचे दि.२६/०८/२०१९ रोजीचे पत्रात सदरहू अंतिम बिल दिर्घ कालावधीपासून प्रलंबित असल्याने देय रकमेवर व्याज का आकारु नये असे नमूद केले आहे. त्यानंतर ठेकेदार यांनी आता दि.२९/१२/२०२० रोजीचे पत्राव्दारे रु.१,३७,५२,०७६/- मात्र इतकी रक्कम मिळणेबाबत विनंती केली आहे. ठेकेदार यांनी केलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr.No.	Details	Amount
1	Final Bill Amount	23,23,938.00
2	L.D.Amount	76,09,009.00
3	Security Deposit Recoverded From R.A. bill	19,16,877.00
4	Initial Security Deposit	12,10,252.00
5	Earnest Money	6,92,000.00
	Total Amount	1,37,52,076.00

७) ठेकेदार यांनी वरीलप्रमाणे मागणी केलेल्या रकमांपैकी दंडाची रक्कम (L.D.Amount) वगळून तसेच Water Proofing व Antitermite या बाबींचा दोषदायीत्व कालावधी अनुक्रमें ७ व १० वर्षांनी पूर्ण होत असल्याने या बाबींची सुरक्षा ठेव म्हणून रक्कम रु.१,१५,३२०/- राखून ठेऊन खालील रक्कम देय आहे.

१) अंतिम बिलापोटी निव्वळ देय रक्कम - रु. २४,२०,७७०.००

२) EMD, ISD व बिलातून कपात केलेली सुरक्षा ठेव एकूण रक्कम - रु. ४९,६२,२३२.००

एकूण रक्कम – रु.७३,८३,००२.००

उपरोक्तप्रमाणे ठेकेदार यांची अंतिम बिलाची निव्वळ देय रक्कम रु.२४,२०,७७०/- व संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेवीपैकी रक्कम रु.४९,६२,२३२/- अशी एकूण रक्कम रु.७३,८३००२/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेकामी इकडील दि.०७/०१/२०२० रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेणेत येऊन बील आदायगीसाठी लेखाशाखा विभागाकडे सादर करणेत आले होते. त्यावर लेखाशाखा विभागामार्फत ई.पी.एफ भरलेबाबतचा अहवाल सादर करणेबाबत तसेच जी.एस.टी इनव्हॉईसची पूर्तता करणेबाबत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदार यांना कळविणेत येऊन ठेकेदार यांनी पूर्तता केलेनंतर सदरचे बील लेखाशाखा विभागाकडे आदायगीसाठी पाठविणेत आले असता मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन बील सादर करणेबाबत मा.मुख्य लेखाधिकारी यांनी निर्देश दिले आहेत.

त्यानुसार शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. पुणे यांचे अंतिम बिलातील उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२४,२०,७७०/- व संस्थानकडे जमा असलेल्या सुरक्षा ठेवीपैकी रक्कम रु.४९,६२,२३२/- ठेकेदार यांना परत करणे अशी एकूण रक्कम रु.७३,८३,००२/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेबाबत दि. २८/०५/२०२१ रोजीची टिपणी मान्यतेसाठी सादर केली होती. त्यानुसार झालेल्या चर्चेदरम्यान प्राप्त निर्देशान्वये इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेबाबतचे प्रमाणपत्र इ. आवश्यक पूर्तता झालेबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

१. शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ पै.मधील बसस्थनक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार यांनी दि.२८/०८/२०१७ रोजी पूर्ण केले आहे.

२. तळमजल्यावरील शिर्डी बसस्थानकाचा वापर राज्य परिवहन महामंडळामार्फत नाशिक सिंहस्थ कुंभमेळा कालावधी दरम्यान सप्टेंबर-२०१५ पासून सुरु करणेत आलेला आहे.

३. शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचा वापर संस्थानमार्फत साईभक्तांचे रहिवासाकरीता ऑक्टोबर - २०१७ पासून सुरु केलेला आहे.

३. सदर इमारतीसाठी अग्नीशमन यंत्रणा बसविणेत आली असून त्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून जा.क्र.१८/२००८/२०१९ अन्वये प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सदरची यंत्रणा दि.२३/०९/२०१९ पासून कार्यान्वीत झालेली आहे.

४. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस शिर्डी नगरपंचायत यांचेकडून जा.क्र.नप/टे-८१२/९२४/२०१९ दि.२९/११/२०१९ अन्वये इमारत वापर परवाना मिळालेला आहे.

वरील प्रमाणे कार्यवाहीचा अहवाल दि. १९/०७/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यतेसाठी सादर करणेत आला असता सदर टिपणीवर,"*प्रस्तावित केल्यानुसार ठेकेदाराची देय रक्कम रु.७३,८३,००२/- मात्र ठेकेदारास अदा करण्यास हरकत नसावी. अंतिम देयक असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार मा. तदर्थ समितीची मान्यता घ्यावी असे मत आहे.*"असे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदरहू प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत येत आहे.

विभागाचा अभिप्राय-

इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन ०४वर्षे व दोषदायीत्व कालावधी पूर्ण होऊन ०३ वर्षे पूर्ण झाले आहेत. अग्निशमन व्यवस्थेचे काम पूर्ण होऊन इमारतीस वापर परवानाही मिळालेला आहे. इमारतीचा वापरही पूर्ण क्षमतेने करणेत येत आहे. त्यामुळे इमारतीचे औपचारीक उदघाटन होईपर्यंत अंतिम बिलाची उर्वरित देय रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम रोखून ठेवणे उचित होणार नाही. ठेकेदार यांना देय होणारी रक्कम मोठया स्वरुपाची असल्याने व बील दिर्घकाळ प्रलंबित असल्याने ठेकेदार भविष्यात व्याजाची मागणी (Claim) करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ठेकेदार यांचे बील लवकरात लवकर अदा करणे उचित होईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव –

तरी शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कंस्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. पुणे यांचे अंतिम बीलातील उर्वरीत निव्वळ देय रु.२४,२०,७७०/- व संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम रु.४९,६२,२३२/- मात्र अशी एकूण रक्कम रु.७३,८३,००२/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

23/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

18.8 17/08

विषय क्र.- ३६

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

मालमत्ता विभाग

152

विषय – महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

टिपणी -

अधिनियमातील तरतूद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविणेच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,असे नमूद आहे.

प्रस्तावना – उपरोक्त विषया संदर्भात मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३२७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार त्याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे,असे ठरले."

तदनुषंगाने खालीलप्रमाणे फेरप्रस्ताव सादर करणेत येत आहे.

पूर्वपिठीका- संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००९ रोजीच्या सभेत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या लक्ष्मीवाडी मळया अंतर्गत येणा-या जमीनी विविध कारणांसाठी संस्थानने घेणेबाबतचा निर्णय क्रं.१६५ झालेला आहे. त्या अनुषंगाने मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भूसंपादन/२१२६ /२००९ दि.२०/०२/२००९ अन्वये खालील गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला खरेदी देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

अ.नं.	गावाचे नाव	क्षेत्र हे.आर
१	निमगाव-को-हाळे	६३.०९
२	कनकुरी	०६.६५
३	शिर्डी	११.८२
४	निमगाव-को-हाळे (जी.आर.बी.वाडी)	०५.९५
५	साकुरी	१३.८२
६	सावळविहीर बु.	७५.७०
७	सावळविहीर खु.	३३.६७
८	चांदेकसारे/सोनेवाडी	१५३.७३
	एकूण	३६४.४३

उपरोक्त मागणी केलेल्या क्षेत्राबाबत शेती महामंडळाचे स्थानिक अधिकारी यांचेकडेस समक्ष चौकशी केली असता व सदर क्षेत्राचा ताळमेळ घेतला असता त्यापैकी काही गावातील काही क्षेत्र शेती महामंडळाने शासनामार्फत खंडकरी शेतक-यांना वाटप केलेले असलेचे व काही क्षेत्र वाटप करावयाचे प्रस्तावित असलेचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी खाली नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपूढे दाखविलेले क्षेत्र संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेकामी व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडेस सादर करणेकामीच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला. त्यात निर्णय क्रं.७४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे,शिर्डी,साकुरी,सावळविहीर बु., सावळविहीर खु. व चांदेकसारे/सोनेवाडी येथील शेती महामंडळाची ३०१.८४ हेक्टर जमीन दुय्यम निबंधक यांनी कळविलेल्या रु.३६९,२८,९०,५३०/- मात्र मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली व तसा प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे व मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडे सादर करणेत यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सुधारीत प्रस्तावात खालील जमीनी दर्शविण्यात आलेल्या होत्या.

अ.नं.	गावाचे नाव	क्षेत्र हे.आर
१	निमगाव-को-हाळे	७१.०५
२	शिर्डी	११.६२
३	साकुरी	१३.८२
४	सावळविहीर बु.	७५.६१
५	सावळविहीर खु.	३३.६७
६	चांदेकसारे/सोनेवाडी	९६.०७
	एकूण	३०१.८४

उपरोक्त निर्णय क्रं.७४५ प्रमाणे उपरोक्त जमीनी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/३८९८/२०१६ दि.२४/१०/२०१६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडे सादर करणेत आला व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीच्या सभेत खालीलप्रमाणेच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे.

सुधारीत प्रस्ताव- वरील जमीनींची संस्थानचे मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.२८/०३/२०१७ रोजी समक्ष पाहणी केली असता त्यापैकी खालील नमूद केलेल्या जमीनी या संस्थानच्या जमीनीचे लगत असून सन २०१७-१८ हे श्रीं चे समाधी शताब्दी वर्ष असल्याने या कालावधीत साईभक्तांच्या गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असलेने त्यासाठीचे नियोजन करणे, साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्किय सेवा या मुलभूत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे यासाठी सदर जमीनींची संस्थानला तातडीने खरेदी करणे आवश्यक असलेचे मत झालेले आहे.

त्यासाठी खालील नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदीने मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.पुणे यांचेकडेस सादर करता येईल.

अ.नं.	गावाचे नाव	क्षेत्र हे.आर
१	निमगाव-को-हाळे	४०.७३
२	शिर्डी	११.६२
	एकूण	५२.३५

उपरोक्त क्षेत्र संस्थानला खालील विविध कारणांसाठी आवश्यक असलेबाबत प्रस्तावात नमूद करता येईल.

१) उपरोक्तपैकी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८५ या जमीनीलगत संस्थानचे प्रसादालय आहे. त्या प्रसादालयात लाडू निर्मिती व्यवस्था आहे. लाडू निर्मितीसाठी १) विभाग प्रमुख कार्यालय २) स्टोअर ३) ऑनलाईल चक्की ४) पुरुष स्वच्छतागृह, स्त्री स्वच्छतागृह ५) एल.पी.जी.शेगडया त्याठिकाणी फलाईंग पॅन असतात. ६) बुंदी सुकविणे. ७) बुंदीपासून लाडू तयार करणे. ८) लाडू सुकविणे ९) मेंटेनन्स रुम १०) कर्मचा-यांचे कपडे बदलण्याची जागा ११) कंट्रोल कॅबिन सुपरवायझर कार्यालय १२) वॉशिंग प्लॅन्ट तसेच एल.पी.जी.गॅससाठी स्वतंत्र गोडावून इ.साठी किमान ०.३० आर जागा लागते. १३) लायटींग रुम १४) पार्कींग इ.साठी संस्थानला उक्त सर्वे नं.८५ मधील पुरेशा जागेची आवश्यकता आहे व उर्वरित क्षेत्रात

२) साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

३) तात्पुरत्या स्वरुपाच्या निवासव्यवस्थेसह कॅम्पिंग ग्राऊंड.

४) पालखी तळ.

५) वाहनतळ व कॅम्पिंग ग्राऊंड इ.साठी सदर क्षेत्राची संस्थानला आवश्यकता आहे.

तसेच उपरोक्त मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीनींच्या किंमतीबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतली असून त्याप्रमाणे उपरोक्त जमीनींची एकूण किंमत रक्कम रु.१५७,२४,४३,०००/- (अक्षरी रु.एकशे सत्तावन्न कोटी चोवीस लाख त्रेचाळीस हजार मात्र) इतकी होत आहे. उपरोक्त गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदी मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय

संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना सादर करणेच्या मान्यतेसाठी आणि उक्त जमीनींचे मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला.

त्यात निर्णय क्रं.३२४ प्रमाणे **"महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेत येवून त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई यांना देणेस व सदरहू जमीन मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे."**

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाचे अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील खालील नमूद केलेप्रमाणे मौजे निमगाव-को-हाळे येथील ४०.७३ हेक्टर व मौजे शिर्डी येथील ११.६२ हेक्टर असे एकूण ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५७७/२०१७ दि.०२/०५/२०१७ अन्वये ई-मेलद्वारे तसेच इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांनी त्यांचेकडील जा.नं.शे.व्य./श्री सा.सं.वि.शि/ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ अन्वये महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ यातील कलम २८-१ अ अ पोट कलम १ अन्वये महामंडळास भोगवटा मुल्यावर देण्यात आली आहे. तसेच कलम (३)-(अ) अन्वये जमीन मांजी खंडकरी शेतक-यांना वाटपाचे काम चालू आहे. तथापि, वरील जमीनीपैकी मौजे निमगाव-को-हाळे व सावळीविहीर येथील जमीनीबाबत काही माजी खंडक-यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ,औरंगाबाद येथे याचिका क्रं.५८८६/२०१४ दाखल करुन दि.०८/०५/२०१४ रोजी जमीन वाटपास अंतरिम स्थगिती आदेश मिळविला आहे. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथून स्थगिती आदेशाबाबत अंतिम निर्णय लागल्याशिवाय मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना खरेदीने उपलब्ध करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तद्नुषंगाने श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी वर्ष साजरे केले जाणार आहे. या उत्सवासाठी देश विदेशातील विविध ठिकाणाहून साईभक्त शिर्डी येथे मोठया प्रमाणात येणार आहेत. भविष्यात या उत्सवासाठी होणा-या साईभक्तांच्या गर्दीच्या दृष्टिने समाधी शताब्दी महोत्सव आयोजनासाठी व विविध प्रकल्पांसाठी आणि साईभक्तांना पायाभूत सोयी-सुविधांसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनींचे अत्यंत लगत असलेली शेती महामंडळाकडील मौजे शिर्डी व निमगाव-को-हाळे हद्दीतील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर ची आवश्यकता आहे. यास्तव शेती महामंडळाचे जमीनी संबंधात मे.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात श्री.प्रकाश तेजमल खाबीया व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर हे रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ चे दाखल असून त्यात मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी दिलेला स्थगिती आदेश उठविणेकामी व उपरोक्त जमीनी संस्थानला कायम खरेदी करणेस परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन (इंटरव्हेंशन अर्ज) क्रं.१२५९६/२०१७ चे दाखल करणेत आले.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील WRIT PETITION NO.5886 OF 2014 WITH CIVIL APPLICATION NO 12596 OF 2017 IN WRIT PETITION 5886 OF 2014 मध्ये दि.०९/१०/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

ORAL ORDER :

Shri Kulkarni, learned Counsel for the petitioners, upon instructions, makes motion for withdrawal of the petition, with a prayer for issuance of direction to the respondent Collector to decide the representation in relation to the allotment of land, which was earlier claimed to have been owned by the petitioners or their ancestors.

2. Liberty is granted to the petitioners to file fresh representation in relation to the land claimed to have been owned by them to the concerned Competent Authority for its allotment. If such representation is made, the same be expeditiously decided by the respondent-Collector or the Competent Authority.

3. With above observations, the petition stands dismissed as withdrawn.
4. In view of dismissal of the petition, pending Civil Application stands disposed of.

मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे उपरोक्त निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांच्या लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानने कायम खरेदी करुन मिळणेकामी मागणी केलेल्या जमीनींचे संदर्भात वाद संपुष्टात आलेले आहेत. परिणामी स्थगिती आदेश रद्द झालेले आहेत. त्यामुळे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडील उपरोक्त पत्र जा.क्रं.शे.व्य./श्री.सा.सं.वि.शि./ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ चे निरर्थक झालेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.१ दि.२३/१०/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. यातील **निर्णय क्रं.९१४** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

दि.२३/१०/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या,त्यास मान्यता देण्यात आली.

(३) निर्णय क्रं.९००

"यावर सविस्तर चर्चा होऊन,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी जागेची पाहणी करुन,त्या जागेचे स्थान,उपयुक्तता,त्यावरील अतिक्रमण याविषयी खात्री करुन सविस्तर फेरप्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले."

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२४ अन्वये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचे ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र संस्थान जमीनींच्या अत्यंत लगत असलेने सदरची जमीन संस्थानसाठी खरेदी करणेचे ठरलेले आहे. त्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ व सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२५९६/२०१७ मधील दि.०९/१०/२०१७ रोजी निर्गत केलेल्या आदेशाचा संदर्भ देवून मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांना त्यांचेकडेस यापूर्वी इकडील जा.नं. एसएसएसटी/ मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ चे प्रस्तावा अन्वये संस्थानने मागणी केलेली लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील शेती महामंडळाची मौजे निमगाव-को-हाळे येथील ४०.७३ हेक्टर व शिर्डी येथील ११.६२ हेक्टर अशी एकूण ५२.३५ हेक्टर जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/ ५३४३/२०१७ दि.०४/०१/२०१८ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस पुन:श्च प्रस्ताव सादर करणेत आला

व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.शेव्य/श्री.सा.स.वि.शि./लक्ष्मीवाडी/१८-१९/७७७ दि.०३/०८/२०१८ अन्वये इकडेस पत्र सादर केले असून त्यात त्यांनी "सदरचा विषय हा संचालक मंडळाचे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यामध्ये संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान यांना साईभक्तांच्या विविध प्रयोजनासाठी सदरची जमीन विक्री करणेबाबत The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition,Rehabilitation and Resettlement Act २०१३ अन्वये व शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ मे २०१५ यातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील गट नंबरच्या क्षेत्राचे मुल्यांकन निश्चित करुन मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना कळविले होते. तसेच त्यानंतरही दि.०१/०२/२०१८ व दि.२०/०२/२०१८ रोजी पुन्हा त्यांना सदर जमीनीचे मुल्यांकन पाठविण्याबाबत कळविले होते.

याबाबत मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.मह/कार्या.जमीन २ब/११०८/२०१८ दि.२०/०५/२०१८ अन्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे की शासन निर्णय क्रं.संकीर्ण/०३/ २०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२ मे २०१५ पाहता सदर शासन निर्णयात जमीन थेट खरेदी पध्दतीने खाजगी वाटाघाटीने सिंचन व इतर प्रकल्पासाठी द्यावयाची असल्यास मोबदला निश्चितीसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने मोबदला रक्कम निश्चित करावी असे स्पष्ट नमूद केले आहे व त्याची कार्यपध्दती नमूद केली आहे. त्यानुसार The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition,Rehabilitation and Resettlement Act २०१३ अन्वये शासन निर्णय संकीर्ण ०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ व एलक्युएन ०१/२०१७/प्र.क्र.१२ अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ नुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत खरेदीदार यंत्रणा यांनी

जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडे विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी सुचित केल्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळयातील मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर जमीन मागणीचा प्रस्ताव विहीत नमुन्यामध्ये जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना पाठविण्यात यावा. सदर जमीनीचे मुल्यांकन निश्चित होवून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल." असेबाबत इकडेस कळविलेले होते.

तदनुषंगाने इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२६२९/२०१८ दि.३०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या तयारीसाठी मा.ना. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.०३/०५/२०१७, दि.०६/०७/२०१७ व दि.०१/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे मालकीचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील ५२ हेक्टर ३५ आर जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आलेली असून दि.०१/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी संस्थानने मागणी केलेली शेती महामंडळाकडील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके शासनाचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे मुल्यांकन करण्यात यावे,असेबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे उक्त जमीनीचे मुल्यांकन भुमी संपादन अधिनियम २०१३ प्रमाणे व शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ रोजीच्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून शासन परिपत्रक क्रं.एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२ /अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ नुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडेस विहित नमुन्यात सादर करणेबाबतचा प्रश्न उदभवत नाही.

शेती महामंडळाकडील उपरोक्त क्षेत्र हे हरित विभागात (ग्रीन झोन) समाविष्ट असून भविष्यात संस्थानला सदर क्षेत्राचे रहिवास विभागात (येलो झोन) मध्ये रुपांतर करावे लागणार आहे. त्यासाठी संस्थानला मोठया प्रमाणात अधिमुल्य रक्कम (प्रिमीयम) शासनाला अदा करावे लागणार आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ही धार्मिक संस्था असून धर्मादाय ट्रस्ट आहे. सदर ट्रस्टद्वारे लोकोपयोगी सार्वजनिक उपक्रम राबविले जातात. तरी मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानने मागणी केलेले शेती महामंडळाचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील एकूण क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके शासनाचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य दर तक्त्याप्रमाणे कायम खरेदी मिळणेकामी विनंती करणेत आली व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करुन त्यात मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी दि.०१/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार उक्त क्षेत्राचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे मुल्यांकन करणेबाबत त्यांचेमार्फत मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना आदेश होणेकामी विनंती करणेत आली व प्रत मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेली आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.२७ निर्णय क्रं.४७४ प्रमाणे शेती महामंडळाची जमीन शासनाचे बाजारमुल्य दरानुसार खरेदी करण्यासाठी पाठपुरावा करणेत यावा,असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने इकडील दि.०२/१०/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना पुन:श्च स्मरणपत्र सादर करणेत आलेले असून प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांना सादर करणेत आलेली आहे. सदरचा प्रस्ताव अद्याप महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे कार्यालयाकडे प्रलंबित आहे.

तथापि उपरोक्त प्रस्तावातील काही जमीनी खंडकरी शेतकरी यांनी शासनाकडे मागणी केलेल्या असल्याचे समजते. तदनुषंगाने मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या व खंडकरी शेतकरी यांनी मागणी न केलेल्या जमीनींबाबतची माहिती मा.स्थावर व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता यांचे कार्यालयातून समक्ष प्राप्त करुन घेतली असता त्यात खालील नमुद केलेल्या व संस्थानच्या जमीनींच्या लगत असलेल्या जमीनी खंडकरी शेतकरी यांनी मागणी केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानला खरेदी मिळणेकामीच्या सुधारीत प्रस्तावातील जमीनी.

अ.नं.	जमीन मागितली ते गाव	मागणीचे सर्वे नं. /गट नं.	क्षेत्र हे.आर	क्षेत्र एकर गुंठे
१	निमगाव-को-हाळे	८४/२	००.७७	१.३७
२	निमगाव-को-हाळे	८५/२	०२.१६	५.१६
३	निमगाव-को-हाळे	८६	०१.६२	४.०२
४	निमगाव-को-हाळे	८९	०१.८०	४.२०
५	निमगाव-को-हाळे	९०/२	१०.३६	२५.३६
६	निमगाव-को-हाळे	९७	००.११	०.११
७	निमगाव-को-हाळे	९८	००.१०	०.१०
८	निमगाव-को-हाळे	९९	००.१७	०.१७
	एकूण		१७.०९	४२.२९

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय कितींचे तीर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे,साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा या मुलभुत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ. तातडीच्या उपाययोजना करणेसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी तातडीने उपलब्ध करणे जरुरीचे झालेले आहे.

सदर जमीनींचे मुल्यांकन मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१,राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतले असून त्यात त्यांनी त्यांचेकडील जा.क्रं.मुल्यांकन/२०२०/१७/२०२० दि.३०/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर जमीनींचे सन २०१९-२० चे बाजारमुल्य खालीलप्रमाणे दर्शविलेले आहे.

अ.नं.	स.नं.	गावाचे नाव	क्षेत्र	दर विभाग क्रं.	सन २०१९-२० चे बाजारमुल्य रुपये
१	८४/२ .	निमगाव-को-हाळे	०० हे. ७७ आर	११.७	३,८३,३८,०००/-
२	८५/२	निमगाव-को-हाळे	०२ हे. १६ आर	११.४	८,३५,२५,०००/-
३	८६	निमगाव-को-हाळे	०१ हे. ६२ आर	११.४	६,५९,७५,०००/-
४	८९	निमगाव-को-हाळे	०१ हे. ८० आर	११.४	७,१८,२५,०००/-
५	९०/२	निमगाव-को-हाळे	१० हे. ३६ आर	११.४	३५,००,२५,०००/-
६	९७	निमगाव-को-हाळे	०० हे. ११ आर	११.४	६७,६०,०००/-
७	९८	निमगाव-को-हाळे	०० हे. १० आर	११.४	६१,७५,०००/-
८	९९	निमगाव-को-हाळे	०० हे. १७ आर	११.४	१,०२,७०,०००/-
		एकूण	१७ हे. ०९ आर		६३,२८,९३,०००/-

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय कितींचे तीर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे,साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा या मुलभुत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ. तातडीच्या उपाययोजना करणेसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी तातडीने उपलब्ध करणे जरुरीचे झालेले आहे.

यास्तव महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करता येईल व प्रत मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार त्याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे,असे ठरले."

मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णय क्रं.३२७ चे अनुषंगाने शेती महामंडळाच्या खरेदी करावयाच्या प्रस्तावित जमीनीचे नियोजनाबाबतचा अहवाल संस्थानचे बांधकाम विभागाकडून इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/४८२/२०२० दि.१४/०७/२०२० अन्वये मागविणेत आला. त्यास अनुसरुन बांधकाम विभागाने **त्यांचेकडील दि.०८/१२/२०२० रोजीचे टिपणी अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.**

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील जमीनीचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला खरेदी करणे प्रस्तावित आहे. याबाबत मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२७ अन्वये याकामी खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे, असे ठरले.

खरेदी करावयाचे प्रस्तावित क्षेत्र

अ.नं.	स.नं.	गावाचे नाव	क्षेत्र
१	८४/२	निमगाव-को-हाळे	०० हे. ७७ आर
२	८५/२	निमगाव-को-हाळे	०२ हे. १६ आर
३	८६	निमगाव-को-हाळे	०१ हे. ६२ आर
४	८९	निमगाव-को-हाळे	०१ हे. ८० आर
५	९०/२	निमगाव-को-हाळे	१० हे. ३६ आर
६	९७	निमगाव-को-हाळे	०० हे. ११ आर
७	९८	निमगाव-को-हाळे	०० हे. १० आर
८	९९	निमगाव-को-हाळे	०० हे. १७ आर
		एकूण	१७ हे. ०९ आर

मौजे निमगाव-को-हाळे हद्दीत संस्थान मालकीचे क्षेत्र व उपरोक्त तक्त्यात दर्शविलेले क्षेत्र यांचा नकाशा सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

तथापि श्री साईबाबा संस्थानच्या भविष्यातील गरजा विचारात घेऊन संस्थान मालकीच्या सर्व खुल्या जमीनींकरीता एकात्मिकृत विकास योजना (Integrated Development Plan/Master Plan) करणे आवश्यक आहे, असे वाटते.

यास्तव महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडील उपरोक्त जमीन खरेदीबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे वर नमुद निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणेकामी मालमत्ता विभागास आदेशित केलेले आहे.

तदनुषंगाने मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णय क्रं.३२७ चे अनुषंगाने शेती महामंडळाकडील खरेदी करावयाच्या प्रस्तावित क्षेत्राचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार आहेत याबाबतचा संस्थानचे बांधकाम विभागाने सादर केलेल्या उपरोक्त दि.०८/१२/२०२० रोजीचे अहवालात नमुद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे येथील **संस्थान मालकीच्या जमीनी व प्रस्तावित खरेदी करावयाच्या जमीनींमध्ये भविष्यात गोशाळा, लाडू व बर्फी निर्मिती विभाग, ऍम्युजमेंट पार्क (Amusement Park), औद्योगिक प्रशिक्षण केंद्र/सैनिक प्रशिक्षण शाळा/आश्रम शाळा, अद्ययावत मध्यवर्ती भांडार इमारत, अद्ययावत वाहन विभाग, वाहनतळ, रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम राबविता येतील.** त्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील **संस्थान मालकीचे जमीनींचे लगत असलेल्या उपरोक्त तक्त्यात** दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला नाममात्र दरात किंवा दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करता येईल व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करता येईल.

प्रस्ताव – निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमीनीलगत असलेल्या शेती महामंडळाचे मालकीच्या खरेदी करावयाच्या उपरोक्त प्रस्तावित क्षेत्रात भविष्यात गोशाळा, लाडू व बर्फी निर्मिती विभाग, ऍम्युजमेंट पार्क (Amusement

Park), औद्योगिक प्रशिक्षण केंद्र/सैनिक प्रशिक्षण शाळा/आश्रम शाळा, अद्ययावत मध्यवर्ती भांडार इमारत, अद्ययावत वाहन विभाग, वाहनतळ, रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम राबविता येतील. त्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील संस्थान मालकीचे जमीनींचे लगत असलेल्या उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला नाममात्र दरात किंवा दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करणेच्या व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस सादर करणेच्या मान्यतेसाठी सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

17/12

विषय क्र.- ३७

131

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

160

विषय - संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१/०१/२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबंधित जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील पत्र क्रं.न.प/टे-०८/९२१/२०२१ दि.२५/०५/२०२१.

टिपणी

अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१ (२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- शिर्डी शहरातील साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पुर्ण करणेसाठी संस्थान व्यवस्थापन समिती शिर्डी नगरपंचायतीस नेहमी मदत करीत असते. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील २५ रस्ते भूसंपादन व विकसित करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमध्ये त्रिपक्षीय करार दि.१५/१०/२००६ रोजी झाला होता व त्यानुसार रस्ते विकसन व रस्ते भूसंपादन कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी करावा, असे ठरले. सदर करारानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत ०५ रस्ते विकसनाचे काम सन २०१२ मध्ये पुर्ण झालेले आहे. उर्वरीत ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत आलेले असल्याने सध्या फक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दरम्यान करारानुसार कार्यवाही चालू आहे.

उक्त करारात ठरलेनुसार शिर्डी नगरपंचायतमार्फत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यापैकी भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०९ रस्त्यांचे भूसंपादन करणे,सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे,अतिक्रमणे हटविणे इ.कामे करणेत आलेली आहेत व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत रस्ते विकसनाचे काम करण्यात आले.

प्रस्तुत ११ रस्त्यांपैकी शिर्डी मंजूर विकास योजनेतील नगर-मनमाड रस्ता (लक्ष्मीनगर जवळून जाणारा रस्ता) सर्वे क्रं.९ पर्यंत १८.० मीटर रुंदीच्या रस्त्याच्या प्रयोजनासाठी मौजे शिर्डी,ता.राहाता येथील जमीनीचे एलएक्यु/एसआर.नं/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणान्वये तत्कालीन मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांनी दि.३१/०१/२०११ अन्वये अंतिम निवाडा घोषित करुन भूसंपादन केले आहे. सदर निवाडयामध्ये समाविष्ट असलेल्या खालील जमीन मालकांनी मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी एलएक्यु/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात अंतिम निवाडयान्वये मंजूर केलेल्या रकमा मान्य नसलेने भूसंदर्भ दावे प्रथमत: मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगांव यांचेकडेस दाखल केले होते. परंतु मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर यांचेकडील आदेश क्रं.TW3828/19 अन्वये खालील तक्त्यात नमुद असलेले सर्व भूसंदर्भ दावे मे.दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,राहाता यांचेकडेस वर्ग केले आहेत. त्यानुसार संबंधित दाव्यामध्ये मे.कोर्टाने आदेश पारित केलेले आहेत. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

परिशिष्ट अ

अ.क्र.	जमीन मालकाचे नांव	संपादित स.नं.	संपादित क्षेत्र चौमी.	मा.दिवाणी न्यायालयाचे नांव	मा.न्यायालयाकडील एल.आर.ए नं.	मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ट स्तर,राहाता यांनी भूसंदर्भ दाव्यात पारित केलेले आदेश दिनांक
१	मदनबाई मोहनलाल लोढा व इ ४	६/८४	४५०.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३२/२०१२	०५/०३/२०२१
२	निवृत्ती शामराव शिदे	४/८०	६५०.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३३/२०१२	३०/०१/२०२१
३	मिनाबेन रविंद्र वेद	४/२९	५१५.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३४/२०१२	२७/०१/२०२१
४	निता टुर्सॲण्ड ट्रॅव्हल्स करिता	५/३	३२१.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३५/२०१२	२७/०१/२०२१

१	२	३	४	५	६	७
५	विशाल कांतीलाल जैन	५/२४ ५/२५	५०.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३६/२०१२	२८/०१/२०२१
६	चंपालाल झुंबरलाल लोढा	६/१००	२३६.५	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३७/२०१२	२८/०१/२०२१
७	चांदमल झुंबरलाल लोढा	६/९९	२२०.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३८/२०१२	२९/०१/२०२१
८	विशाल कांतीलाल जैन	५/२३/१	१४१०.००	मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता	३९/२०१२	२९/०१/२०२१

उक्त तक्त्यातील रकाना नं. ०२ मध्ये नमुद विविध जमीन मालकांचे एल.आर.ए (भूसंदर्भ दाव्यात) रकाना नं.०७ मध्ये नमुद दिनांकाना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणेबाबत मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी आदेश निर्गमीत केलेले आहेत. सदर आदेशाप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांचेकडून दि.३१/०५/२०२१ अखेर परिगणीत करुन निश्चित करुन घेतली आहे. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

परिशिष्ट ब

अ.क्र.	जमीन मालकाचे नांव	मा.दिवाणी न्यायालयाकडील एल.आर.ए.नं.	मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचेकडील आदेशाच्या अधिन राहून मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी, तथा भूसंपादन अधिकारी यांनी दि.३१/०५/२०२१ अखेर परिगणीत करुन निश्चित करुन दिलेली एकुण रक्कम रु (संबंधितांना प्रत्यक्ष अदा करावयाची रक्कम)
१	२	३	४
१	मदनबाई मोहनलाल लोढा व इ ४	३२/२०१२	१०,२६,०९०/-
२	निवृत्ती शामराव शिदे	३३/२०१२	२४,६५,३२९/-
३	मिनाबेन रविंद्र वेद	३४/२०१२	१७,४५,८६५/-
४	निता टुर्सअँण्ड ट्रॅव्हल्स करिता	३५/२०१२	९,६३,०८४/-
५	विशाल कांतीलाल जैन	३६/२०१२	१,५०,०१३/-
६	चंपालाल झुंबरलाल लोढा	३७/२०१२	७,०९,५६२/-
७	चांदमल झुंबरलाल लोढा	३८/२०१२	६,६०,०५८/-
८	विशाल कांतीलाल जैन	३९/२०१२	५८,६६,३३३/-
		एकुण रक्कम रु	१,३५,८६,३३६/-

उक्त परिशिष्ट ब मधील तक्त्यातील रकाना नं.०४ मध्ये नमुद केलेली रक्कम ही मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अधिन राहून मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांचेकडून परिगणित करुन घेतली असून त्याबाबतचा निवाडा मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग शिर्डी यांनी त्यांचेकडील आदेश क्रं.का.वि/भूस/६/१३६/२०२१, दि.०७/०४/२०२१ अन्वये घोषित केला आहे. उक्त भूसंदर्भ दाव्यात एकुण रक्कम रु.१,३५,८६,३३६/- (रु.एक कोटी पस्तीस लाख शहाऐंशी हजार तीनशे छत्तीस मात्र) इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना मुदतीत अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त ०८ भुसंदर्भ दाव्यांमध्ये संस्थानला प्रतिवादीपणात सामील करण्यात आलेले नाही. तथापि त्रिपक्षीय करारनाम्यानुसार वाढीव नुकसान भरपाई देणे संस्थानवर बंधनकारक आहे.

विभागाचा अभिप्राय:- दि.१५/१०/२००६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,शिर्डी नगरपंचायत शिर्डी, व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेत झालेल्या त्रिपक्षीय करारानुसार २५ रस्ते विकसन व भूसंपादनाकामी आवश्यक असणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्व्यवस्था,शिर्डी यांनी उपलब्ध करुन द्यावा,असे ठरले आहे. उक्त ०८ भूसंदर्भ दाव्यात संस्थानला प्रतिवादीपणात सामिल केलेले नाही परंतु त्रिपक्षीय करारनाम्यानुसार संस्थानला उपरोक्त ०८ भूसंदर्भ दाव्यात वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणे संस्थानला बंधनकारक आहे. सदर करारनाम्यानुसार तसेच मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांनी दि.३१/०१/२०२१ रोजी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणेबाबत दिलेला आदेश विचारात घेवून उक्त प्रस्तावात नमुद केलेली दि.३१/०५/२०२१ अखेर होणारी व्याजासह नुकसान भरपाईची वाढीव रक्कम

रु.१,३५,८६,३३६/- (रु.एक कोटी पस्तीस लाख शहाऐंशी हजार तीनशे छत्तीस मात्र) इतकी संबंधितांना अदा करणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करता येतील.

तथापि शिर्डी विकास योजनेतील रस्त्यासाठी भुसंपादन निवाडयामध्ये घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसल्याने भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ खाली मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत जमीन मालक श्री.दिपक गोपाळराव गांधी व इतर ४ यांना अदा करणेसंदर्भात संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.१९/१२/२०२० रोजीच्या सभेपुढे विषय क्रं.३६ निर्णयार्थ सादर करणेत आला होता. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून निर्णय क्रं.५७१ नुसार सदर निर्णयाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात यावे,असे ठरले. त्यानुसार मा.उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेकामी संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दि.१७/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे विधी विभागास कळविणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.०६/०८/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१४० प्रमाणे या विषया संदर्भातील भुसंपादन प्रकरणाची सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात यावे, तहकुब. असा निर्णय झालेला आहे. **सदर निर्णयाप्रमाणे सदर भुसंपादन प्रकरणासंबंधीत कागदपत्रे मा.सर्व समिती सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तरी प्रस्तुत विषयाबाबत निर्णय होणेस विनंती आहे.**

प्रस्ताव - संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/ २००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१/०१/२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबंधित जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या ०८ भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम रु.१,३५,८६,३३६/- इतकी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ३८

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

163

विषय – शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी. रुंदीकरण संबंधीत भुसंपादन एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ यामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं.(भुसंपादन निर्देश अर्ज) ४/२००४ व ५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

टिपणी -

अधिनियमातील तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१(२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना -

प्रकरणाची पुर्वपिठीका- शिर्डी विकास योजनेतील ९.० मीटर पालखी रस्ता रुंदीकरण या प्रयोजनासाठी भुसंपादन निवाडा मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ अन्वये घोषित करण्यात आलेला आहे. सदर निवाडयातील संपादित केलेल्या मिळकतीचे ताबे दि.०८/०५/२००४ रोजी घेण्यात आलेले आहेत.

शिर्डी विकास योजनेतील ९.० मीटर पालखी रस्ता रुंदीकरणासाठी मौजे शिर्डी येथील मुळ जमीन मालक संपत धोंडीराम पारख यांचे मालकीचे नगर भूमापन क्रं.७६ मधील २६ चौमी. इतके क्षेत्र रस्त्यासाठी संपादीत झाले असून संपादीत क्षेत्राचा निवाडा क्रं.२१/२००३ दि.२५/११/२००३ रोजी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला आहे. प्रस्तुत निवाडयात घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसलेने मुळ जमीन मालक यांचे कायदेशीर वारस संदिप संपत पारख व इतर २ आणि शिवचंद धोंडीराम पारख यांनी कलम १८ खाली मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे न्यायालयात लॅण्ड रेफरन्स नं.०४/२००४ दाखल केला होता.

तसेच मौजे शिर्डी येथील जमीन मालक रमेश पदाजी कोते यांचे मालकीचे नगर भूमापन क्रं.२८४ मधील क्षेत्र २१.७५ चौ.मीटर इतके क्षेत्र पालखी रस्त्यासाठी संपादन करण्यात आलेले आहे. सदर क्षेत्राचा निवाडा क्रं.२१/२००३ दि.२५/११/२००३ रोजी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला आहे. प्रस्तुत निवाडयात घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसलेने मुळ जमीन मालक रमेश पदाजी कोते यांनी वाढीव नुकसान भरपाईसाठी कलम १८ खाली मा.दिवाणी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,राहाता यांचे न्यायालयात लॅण्ड रेफरन्स नं.०५/२००४ दाखल केला होता.

संबंधीत जमीन मालक यांनी संपादित जमीनीचा वाढीव मोबदला मिळणेकामी भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ प्रमाणे दाखल केलेल्या लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ व ५/२००४ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांचे न्यायालयात उक्त दावे दाखल केलेले होते. सदर दाव्यांचा अंतिम निर्णय मा.न्यायालयाने दि.०५/०३/२०२१ रोजी पारित केलेले आहेत. उक्त दोन्हीही भुसंदर्भ न्यायालयाने मंजूर केलेले आहेत.

मा.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत जमीन मालक यांना अदा करणेसाठी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.नप/टे-०८/९२१/२०२१ दि.२५/०५/२०२१ अन्वये इकडेस कळविले की, शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता रुंदीकरण एलएक्युएसआर/२१/२००३ निवाडा घोषित दि.२५/११/२००३ निवाडयाच्या अनुषंगाने लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ श्री.संदिप संपत पारख व इतर आणि लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ श्री.रमेश पदाजी कोते यांनी मे.कोर्टात भुसंदर्भ दाखल केलेले होते. सदर दाव्यामध्ये मा.न्यायालय,वरिष्ठ स्तर, राहाता यांनी अंतिम निर्णय पारित करुन वाढीव नुकसान भरपाईच्या रकमा वादी/अर्जदार यांना अदा करण्याबाबत आदेश केलेले आहेत. त्याप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी भुसंपादन कायदा १८९४ चे कलम २८ नुसार त्यांचेकडील आदेश क्रं.का.वि.भुस/६/१३६/२०२१ दि.०७/०४/२०२१ नुसार संबंधीत जमीन मालक यांना अदा करावयाच्या वाढीव नुकसान भरपाईच्या रकमा परिगणीत करुन दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे निधी उपलब्ध होणेबाबत नगरपंचायत,शिर्डी यांनी कळविले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे दि.२५/०५/२०२१ च्या पत्रासोबत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सादर केलेल्या मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे दि.०७/०४/२०२१ च्या कलम २८ खाली निर्गत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ संपत धोंडीराम पारख (मयत) तर्फे वारस संदिप संपत पारख व इतर मध्ये कोर्टाचे आदेश दि.०५/०३/२०२१ प्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी दि.३१/०५/२०२१ अखेर वाढीव नुकसान भरपाई व्याजासह परिगणीत करुन रक्कम रु.१,७९,२६८/- कळविली आहे. तसेच लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची व्याजासह नुकसान भरपाई रक्कम परिगणीत करुन रक्कम रु.१,९१,८८४/- कळविली आहे. दोन्हीही रकमा मिळून एकुण एकंदर रु.३,७१,१५२/-(अक्षरी रु.तीन लाख एकाहत्तर हजार एकशे बावन्न मात्र) जमा करणेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचे दि.२५/०४/२०२१ च्या पत्रान्वये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम रु.३,७१,१५२/- ही दि.३१/०५/२०२१ पर्यंत या दिनांकावर आधारीत व्याजासह मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांनी परिगणीत करुन दिलेली आहे. याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीसमोर सादर करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेस

कालावधी लागणार असल्याने हा कालावधी माहे जुलै २०२१ अखेर अपेक्षित धरल्यास माहे जुन व जुलै २०२१ या दोन महिन्यांचे व्याज संबंधीतांना अदा करावे लागेल. दोन महिन्याचे १५% प्रमाणे व्याज परिगणीत करुन लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ मध्ये रु.१,८०,५५७/- इतके व लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ मध्ये रु.१,९३,२६४/- असे दोन्हीही लॅण्ड रेफरन्सचा व्याजासह वाढीव मोबदला एकुण रक्कम रु.३,७३,८२१/- होत आहे.

एलएक्युएसआर नं.२१/२००३ निवाडा घोषित दि.२५/११/२००३ चे अनुषंगाने लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ भिकचंद कचरदास संकलेचा यांचा वाढीव नुकसान भरपाई मिळणेबाबत भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ खाली दाखल होता. त्याचा दि.१६/०३/२०२० रोजी मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी आदेश पारीत केलेला आहे. त्याप्रमाणे उक्त भुसंपादन एलएक्युएसआर २१/२००३ या निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.१,३७,४६,११२/- इतकी जमा केलेली असून त्यापैकी रक्कम रु.१,२८,६१,६७२/- इतकी खर्च झालेली असून माहे डिसेंबर २०२० अखेर रक्कम रु.८,८४,४४०/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) या खात्यात जमा असल्याने लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ श्री.भिकचंद कचरदास संकलेचा यांचे प्रकरणात मे.कोर्टाचे आदेशाप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी वाढीव नुकसान भरपाई मोबदला परिगणीत करुन येणारी रक्कम रु.२,११,८२३/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात जमा असलेल्या रक्कम रु.८,८४,४४०/- या रकमेतून समायोजित करता येईल असेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी तथा निर्णयार्थ दि.०७/१२/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे दि.१९/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्रं.५७० प्रमाणे संबंधीत लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ मध्ये भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यावर एलएक्युएसआर नं.२१/२००३ या निवाडयाची जमा रक्कम रु.८,८४,४४०/- जमा रकमेतून मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/- समायोजित करता येईल, असेबाबत निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही देखील झालेली आहे.

विभागाचा अभिप्राय - एलएक्युएसआर २१/२००३ च्या निवाडयात मंजूर केलेली रक्कम मान्य नसलेने भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ नुसार दाखल भुसंपादन निर्देशन अर्ज क्रं.४/२००४ संपत धोंडीराम पारख (मयत) तर्फे वारस संदिप संपत पारख व इतर यांची जुलै २०२१ अखेर व्याजासह रक्कम परिगणीत करुन त्यांना देय असलेला वाढीव मोबदला रक्कम रु.१,८०,५५७/- व लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ रमेश पदाजी कोते यांना जुलै २०२१ अखेर व्याजासह परिगणीत करुन आलेली रक्कम रु.१,९३,२६४/- या दोन्हीही लॅण्ड रेफरन्सची माहे जुलै २०२१ अखेर व्याजासह एकूण देय रक्कम रु.३,७३,८२१/- इतकी होत असून भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात निवाडा क्रं.२१/२००३ मध्ये माहे मार्च २०२१ अखेर जमा असलेली रक्कम रु.६,९२,५५६/- या रकमेतून उक्त दोन्ही भूसंदर्भाची माहे जुलै २०२१ अखेर परिगणना करुन येत असलेली रक्कम रु.३,७३,८२१/- समायोजित करता येईल व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविता येईल.

मा.तदर्थ समितीचे दि.०६/०८/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१४० प्रमाणे या विषया संदर्भातील भुसंपादन प्रकरणाची सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात यावे, तहकुब. असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे सदर भुसंपादन प्रकरणासंबंधीत कागदपत्रे मा.सर्व समिती सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तरी प्रस्तुत विषयाबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

प्रस्ताव - मा.तदर्थ समितीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्रं.५७० चे अनुषंगाने एलएक्युएसआर २१/२००३ च्या निवाडयात मंजूर केलेली रक्कम मान्य नसलेने भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ नुसार दाखल भुसंपादन निर्देशन अर्ज क्रं.४/२००४ संपत धोंडीराम पारख (मयत) तर्फे वारस संदिप संपत पारख व इतर यांची जुलै २०२१ अखेर व्याजासह रक्कम परिगणीत करुन त्यांना देय असलेला वाढीव मोबदला रक्कम रु.१,८०,५५७/- व लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ रमेश पदाजी कोते यांना जुलै २०२१ अखेर व्याजासह परिगणीत करुन आलेली रक्कम रु.१,९३,२६४/- या दोन्हीही लॅण्ड रेफरन्सची माहे जुलै २०२१ अखेर व्याजासह एकूण देय रक्कम रु.३,७३,८२१/- इतकी होत असून भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात निवाडा क्रं.२१/२००३ मध्ये माहे मार्च २०२१ अखेर जमा असलेली रक्कम रु.६,९२,५५६/- या रकमेतून उक्त दोन्ही भूसंदर्भाची माहे जुलै २०२१ अखेर परिगणना करुन येत असलेली रक्कम रु.३,७३,८२१/- समायोजित करणेच्या व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ३९

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय – शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी. रुंदीकरण संबंधीत भुसंपादन एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ यामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं. (भुसंपादन निर्देश अर्ज) ३/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

टिपणी -

अधिनियमातील तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१(२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना -

प्रकरणाची पुर्वपिठीका - शिर्डी विकास योजनेतील ९.० मीटर पालखी रस्ता रुंदीकरण या प्रयोजनासाठी भुसंपादन निवाडा मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ अन्वये घोषित करण्यात आलेला आहे. सदर निवाडयातील संपादित केलेल्या मिळकतीचे ताबे दि.०८/०५/२००४ रोजी घेण्यात आलेले आहेत.

शिर्डी विकास योजनेतील ९.० मीटर पालखी रस्ता रुंदीकरणासाठी मौजे शिर्डी येथील मुळ जमीन मालक १) रमणलाल कचरदास लोढा (मयत) २) माणकचंद कचरदास लोढा (मयत) तर्फे वारस २ अ) संतोष माणकचंद लोढा यांचे मालकीचे नगर भूमापन क्रं.१८७ मधील अनुक्रमे १२.२५ चौमी व १.५० चौमी. इतके क्षेत्र रस्त्यासाठी संपादीत झाले असून संपादीत क्षेत्राचा निवाडा क्रं.२१/२००३ दि.२५/११/२००३ रोजी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला आहे. प्रस्तुत निवाडयात घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसलेने मुळ जमीन मालक रमणलाल कचरदास लोढा (मयत),माणकचंद कचरदास लोढा (मयत) तर्फे वारस २ अ) संतोष माणकचंद लोढा यांनी कलम १८ खाली वाढीव नुकसान भरपाई मिळणेकरीता मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे न्यायालयात लॅण्ड रेफरन्स नं.०३/२००४ दाखल केला होता.

संबंधीत जमीन मालक यांनी संपादित जमीनीचा वाढीव मोबदला मिळणेकामी भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ प्रमाणे दाखल केलेल्या लॅण्ड रेफरन्स नं.३/२००४ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांचे न्यायालयात उक्त दावा दाखल केलेला होता. सदर दाव्याचा अंतिम निर्णय मा.न्यायालयाने दि.३०/०४/२०२१ रोजी पारित केलेला आहे. उक्त भुसंदर्भ न्यायालयाने मंजूर केलेला आहे.

मा.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत जमीन मालक यांना अदा करणेसाठी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.नप/टे-०८/१३२०/२०२१ दि.०५/०८/२०२१ अन्वये इकडेस कळविले की, शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता रुंदीकरण एलएक्युएसआर/२१/२००३ निवाडा घोषित दि.२५/११/२००३ निवाडयाच्या अनुषंगाने लॅण्ड रेफरन्स नं.३/२००४ रमणलाल कचरदास लोढा (मयत) व माणकचंद कचरदास लोढा (मयत) तर्फे वारस २ अ संतोष माणकचंद लोढा यांनी मे.कोर्टात भुसंदर्भ दाखल केलेला होता. सदर दाव्यामध्ये मा.न्यायालय,वरिष्ठ स्तर, राहाता यांनी अंतिम निर्णय पारित करुन वाढीव नुकसान भरपाईच्या रकमा वादी/अर्जदार यांना अदा करण्याबाबत आदेश केलेले आहेत. त्याप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांनी भुसंपादन कायदा १८९४ चे कलम २८ नुसार त्यांचेकडील आदेश क्रं.का.वि.भुस/६/२६३/२०२१ दि.२३/०७/२०२१ नुसार निवाडा घोषित करुन संबंधीत जमीन मालक यांना अदा करावयाच्या वाढीव नुकसान भरपाईची रक्कम परिगणीत करुन दिलेली आहे. त्याप्रमाणे निधी उपलब्ध होणेबाबत नगरपंचायत,शिर्डी यांनी कळविले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे दि.०५/०८/२०२१ च्या पत्रासोबत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सादर केलेल्या मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे दि.२३/०७/२०२१ च्या कलम २८ खाली निर्गत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता लॅण्ड रेफरन्स नं.३/२००४ रमणलाल कचरदास लोढा (मयत) व माणकचंद कचरदास लोढा (मयत) तर्फे वारस २ अ) संतोष माणकचंद लोढा इ.मध्ये कोर्टाचे आदेश दि.३०/०४/२०२१ प्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि.३१/०८/२०२१ अखेर वाढीव नुकसान भरपाई व्याजासह परिगणीत करुन रक्कम रु.१,१९,७३१/- (अक्षरी रु.एक लाख एकोणवीस हजार सातशे एकतीस मात्र) जमा करणेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

एलएक्युएसआर नं.२१/२००३ निवाडा घोषित दि.२५/११/२००३ चे अनुषंगाने लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ भिकचंद कचरदास संकलेचा यांचा वाढीव नुकसान भरपाई मिळणेबाबत भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ खाली दाखल होता. त्याचा दि.१६/०३/२०२० रोजी मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी आदेश पारीत केलेला आहे. त्याप्रमाणे उक्त

भुसंपादन एलएक्युएसआर २१/२००३ या निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.१,३७,४६,११२/- इतकी जमा केलेली असून त्यापैकी रक्कम रु.१,२८,६१,६७२/- इतकी खर्च झालेली असून माहे डिसेंबर २०२० अखेर रक्कम

रु.८,८४,४४०/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) या खात्यात जमा असल्याने लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ श्री.भिकचंद कचरदास संकलेचा यांचे प्रकरणात मे.कोर्टाचे आदेशाप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी वाढीव नुकसान भरपाई मोबदला परिगणीत करुन येणारी रक्कम रु.२,११,८२३/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात जमा असलेल्या रक्कम रु.८,८४,४४०/- या रकमेतून समायोजित करता येईल असेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी तथा निर्णयार्थ दि.०७/१२/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे दि.१९/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्रं.५७० प्रमाणे संबंधीत लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ मध्ये भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यावर एलएक्युएसआर नं.२१/२००३ या निवाडयाची जमा रक्कम रु.८,८४,४४०/- जमा रकमेतून मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/- समायोजित करता येईल, असेबाबत निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही देखील झालेली आहे.

विभागाचा अभिप्राय - भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात निवाडा क्रं.२१/२००३ मध्ये माहे जुलै २०२१ अखेर जमा असलेली रक्कम रु.६,७२,६१७/- या रकमेतून उक्त भूसंदर्भाची माहे ऑगस्ट २०२१ अखेर परिगणना करुन येत असलेली रक्कम रु.१,१९,७३१/- (अक्षरी रु.एक लाख एकोणवीस हजार सातशे एकतीस मात्र) समायोजित करता येईल व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविता येईल.

प्रस्ताव - शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी. रुंदीकरण संबंधीत भुसंपादन एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ यामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं.(भुसंपादन निर्देश अर्ज) ३/२००४ मध्ये दि.३०/०४/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार वाढीव नुकसान भरपाईची रक्कम जमीन मालक १) रमणलाल कचरदास लोढा (मयत) २) माणकचंद कचरदास लोढा (मयत) तर्फे वारस २ अ संतोष माणकचंद लोढा यांना अदा करणेसाठी रक्कम रु.१,९१,३७१/- इतकी होत असून भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात निवाडा क्रं.२१/२००३ मध्ये माहे जुलै २०२१ अखेर जमा असलेली रक्कम रु.६,७२,६१७/- या रकमेतून उक्त भूसंदर्भाची माहे ऑगस्ट २०२१ अखेर परिगणना करुन येत असलेली रक्कम रु.१,१९,७३१/- समायोजित करणेच्या व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविणेच्या निर्णयार्थ सादर.

14/8/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

ERP- TRA-MEETING-248-2021

विषय क्र.- ४०

मा. तदर्थ समितीचे बैठकीतील विषयाची टिपणी

श्री साई प्रसादालय

विषय : **शिर्डीतील गोरगरीब नागरीकांसाठी फुड पॅकेट अथवा भोजन व्यवस्था सुरु करणेबाबत ...**

टिपणी :-

संस्थान अधिनियम :- कलम २१ (१) (घ) - भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रस्तावना :- शिर्डी ग्रामस्थ श्री जगन्नाथ सुर्यभान गोंदकर व इतर ५ यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित विनंती पत्रात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :

'गेल्या दिड वर्षापासून शिर्डी शहरात कोविडमुळे साईबाबा मंदिर बंद आहे. त्यामुळे गोरगरीब नागरीकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्या अनुषंगाने माणसूकीच्या दृष्टीकोनातुन श्री साईबाबा संस्थानच्या माध्यमातुन प्रसादालय अथवा फुड पॅकेट सुरु करावे. जेणेकरुन नागरीकांना आपल्याकडून दोन वेळच्या जेवणाचा आधार मिळेल.'

सद्यस्थिती :- सध्या मा. शासनाचे निर्देशाप्रमाणे श्री साईमंदिर दि. ५ एप्रिल, २०२१ पासून बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री साई प्रसादालयही साईभक्तांचे भोजनासाठी बंद ठेवण्यात आलेले आहे. मात्र इकडील विभागामार्फत दैनंदिन २,००० ते २,२०० व्यक्तीकरीता भोजन बनविण्यात येते, ज्यात कोव्हीड सेंटर, क्वारंटाईन सेंटर, श्री साईनाथ हॉस्पीटल, श्री साईबाबा हॉस्पीटल, अनाथ आश्रम, पोलीस कर्मचारी, शिर्डी मंदिर सुरक्षेतील पोलीस व होमगार्ड तसेच विभागातील कर्तव्यावरील कर्मचारी यांचेकरीता दोन वेळच्या भोजनाची व्यवस्था करण्यात येते. तसेच कोरंटाईन डॉक्टर्स व कर्मचारी यांना नाष्टाची सुविधा पुरविण्यात येते. यासाठी इकडील विभागात कायम कर्मचा-यांची सेवा घेण्यात येत आहे. तत्पुर्वी इकडील विभागात काम करणारी आऊटसोर्सची सर्व कर्मचारी बंद करण्यात आले आहेत. ज्यात अन्नपाकीटे बनविणे, चपाती/पुरी बनविणे, चपाती मशीनवर चपाती बनविणे, हाऊसकिपींग, पेस्ट कंट्रोल, स्वच्छता व वाढपीची कामे कायम कर्मचारी व चक्रीय पध्दतीने कायम कंत्राटी कर्मचा-यांकडून करण्यात येत आहेत. ही सर्व कर्मचारी कर्तव्यास ठेवतांना मा. शासनाच्या कर्मचारी उपस्थितीचे प्रमाण ५०% चे आत होईल याचा विचार करण्यात आलेला आहे.

मागणी :- लॉकडाऊन पूर्वी प्रसादालय चालू असतांना जनरल हॉलमध्ये श्री साई समाधी शताब्दी वर्षापासून मोफत भोजन देण्यात येते, व्ही.आय.पी. कक्षात रुपये ५०/- मात्रचा दर आकारुन भोजन देण्यात येते. तसेच नाष्टा पाकीटांचा दर प्रती पाकीट रुपये ५/- असा आहे. मा. शासनाचे निर्देशाप्रमाणे मंदिर बंद केल्यामुळे ही सेवा बंद करण्यात आलेली आहे. सध्या वर नमूद ठिकाणी कोव्हीड-१९ अंतर्गत मा. शासनाचे निर्देश पाळून विभागातील कामकाज करण्यात येत आहे. तरीही शिर्डी गावातील नागरीकांचे विनंतीपत्रात प्रसादालय अथवा फुड पॅकेट सुरु करण्याची विनंती केली आहे. या पत्रात त्यांनी नाष्टा पाकीटे मोफत अथवा सशुल्क पुरविणेबाबत कळविण्यात आलेले नाही. तरीही सशुल्क सेवा दयावयाची असेल, तर या पत्राच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. त्यासाठी सदरहु प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे बैठकीचे निर्णयार्थ ठेवणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान :- धोरणात्मक / आर्थिक

विभागाचा अभिप्राय :- संदर्भीय पत्राचे अनुषंगाने विचार करावयाचा झाल्यास, शिर्डीमध्ये अंदाजे ३० ते ३५ हजार लोकसंख्या आहे. यातील गोरगरीब जनतेचे वर्गीकरण करणे शक्य नाही. तरीही नेहमीच्या अंदाजानुसार दैनंदिन १० ते १२ हजार पाकीटे बनवावी लागतील. सदर पाकीटे बनवितांना शासनाच्या ५०% चे आत कर्मचारी उपस्थितीचे उल्लघन होऊ शकते. किंबहुना कर्मचा-यांच्या संख्येत वाढ होऊ शकते. तसेच नाष्टा पाकीटे वितरण करतांना मोठया प्रमाणात गर्दी होऊन शासनाच्या सोशल डिस्टन्सचे उल्लघन होऊ शकते. तसेच पंचक्रोशातील नागरीकही नाष्टा पाकीटांची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच भोजनाची व्यवस्था करावयाची झाल्यास शिर्डीतील जवळजवळ ५०% म्हणजेच १२ ते १५ हजार नागरीक लाभ घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पंचक्रोशीतीलही नागरीक भोजनाची लाभ घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे दैनंदिन १५ ते १८ हजार नागरीकांसाठी भोजनाची व्यवस्था करावी लागेल. ही सुविधा पुरवितांना लॉकडाऊनच्या नियमाचे मोठया प्रमाणात उल्लघन होऊ शकेल. यामुळे कदाचित संस्थानवर कायदेशीर अथवा शासन कडक निर्बध लादण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या अहमदनगर जिल्हामध्ये कोरोना रुग्णांच्या संख्येतही मोठया प्रमाणात वाढ होत आहे, त्यामुळे शासनाने जिल्ह्यातील लॉकडाऊनचे निर्बधात सुट दिलेली नाही, याचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

पान नं. २ ... वर

प्रस्ताव ७ शिर्डी ग्रामस्थ श्री जगन्नाथ सुर्यभान गोंदकर व इतर ५ यांचे विनंतीपत्राचा विचार करता, शिर्डी शहरातील गोरगरीब नागरीकांकरीता प्रसादालय अथवा फुड पॅकेट सुरु करावे किंवा कसे ? याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. यासाठी सदरहु प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे बैठकीत निर्णयार्थ सादर.

14/8/7

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था शिर्डी

विषय क्र.- ४७

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

विषय- शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा तिमाही पहाणी अहवाल अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

संदर्भ- १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १३/१२/२०१८, विषय नं. ७, निर्णय क्र. ७३४
२) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/३५१९/२०१९ दि. ०२/०३/२०१९
३) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/२८९६/२०२० दि. २३/०३/२०२०
४) मा.तदर्थ समिती सभा दि. ११/०५/२०२०, विषय नं.४५, निर्णय क्र. २७९
५) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/१३७/२०२१ दि. २२/०४/२०२१

• श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधिल तरतुद-

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिर प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पुरविणे अशी तरतुद आहे.

• प्रास्ताविक

मा. व्यवस्थापन समितीच्या सभेच्या दि. १३/१२/२०१८ रोजीच्या सभेतील –

विषय नं. ७ - शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रुपये ४२,५१,५९९/- प्रमाणे प्रतिमहा अर्थसहाय्य मंजुरीचे शासन निर्णयाचे अवलोकन होणेबाबत.

निर्णय क्र. ७३४ – यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.सासवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि.०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्र. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र.२० का.१६ दि. २२/११/२०१८, अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना दि. ०१/१२/२०१७ पासून दरमहा रु.४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच शिर्डी नगरपंचायतीस दि.०१/१२/२०१७ ते दि.०३/१०/२०१८ या ११ महिने कालावधीत रक्कम रु. ३०,००,०००/- प्रतिमहा या प्रमाणे रु.३,३०,००,०००/- रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. शासनाचे दि. २२/११/२०१८ चे शुध्दी पत्रकानुसार दि. ०१/१२/२०१७ ते दि.०३/१०/२०१८ या ११ महिने कालावधीतील फरकाची रक्कम रु. १,३७,६७,५८९/- (एक कोटी सदवतीस लाख सदुसष्ट लाख पांचशे एकोन नव्वद रु. मात्र) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. सदरची कार्यवाही दि. ०१/०१/२०१९ नंतर करावी.

तथापि सदर अनुदानाचा विनियोग योग्य पध्दतीने होत आहे किंवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे व कामाच्या व्याप्तीप्रमाणे (Scope of Work) कार्यवाही ठेकेदाराकडून स्वच्छता विषयक कामे केली जाते किंवा नाही, तसेच शहरात होणा-या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचा-यांसह एक समिती करण्यात यावी. या समितीने सदर कामाचे दरमहा परिक्षण करावे व परिक्षणाबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्येक तिमाहीस मा. व्यवस्थापन समितीचे सभेस सादर करावा असा संदर्भ क्र. १ नुसार आदेश झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून शिर्डी नगरपंचायतीस, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छतेची कामे करण्यासाठी लेखाशाखा (अनुदान विभागामार्फत) दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतके अनुदान देण्यात येत असते, स्वच्छता कामी शिर्डी नगरपंचायतीने नेमलेल्या ठेकेदारामार्फत होणारी साफसफाईची कामे करारनाम्यातील अटी शर्तीनुसार होतात किंवा कसे? याबाबत आकस्मित पाहणी करण्यासाठी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार संदर्भ क्र.१ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समिती शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या नगरमनमाड रोड, हॉटेल कलासाई ते हॉटेल शांताई रोड, पालखी रोड, पिंपळवाडी रोड, दत्त नगर, माऊली नगर, एच.पी.गॅस रोड ,हॉटेल सन ॲड सन रोड, हॉटेल गणपती पॅलेस, हॉटेल सेंट लॉरेन्स रोड, बाजार तळ व परिसर, संभाजीनगर, कालिकानगर, बिरेगांव रोड, सातभाई मळा रोड, पानमळा रोड, शिर्डी विमानतळ रोड, श्री रामनगर, पाण्याची टाकी कनकुरी रोड, प्रसादालयासमोरील रिंगरोड, लक्ष्मीनगर नाला, इ. रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची संदर्भ क्र. १ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीकडून दरमहा आकस्मिक पाहणी करण्यात येऊन, पाहणी अहवाल मा. व्य. समीतीचे सभेपुढे सादर करण्यात येतो. यापुर्वी चा अहवाल मा. तदर्थ समीतीचे दि. ०६/०८/२०२१ रोजीचे सभेपुढे नोंद घेणेकामी सादर करण्यात आला होता.

(.३) शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या स्वच्छता कामांचा माहे एप्रिल, मे, जुन २०२१ पाहणी अहवाल प्रत्येक महिन्यास लेखाशाखा अनुदान विभागास खालील प्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.

अ.नं.	शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत स्वच्छतेच्या कामांची आकस्मिक पाहणी समितीने समक्ष पाहणी केलेली महिना / दिनांक		लेखाशाखा विभागास पाहणी अहवाल सादर करण्यात आलेली दिनांक
१	एप्रिल २०२१	दि. ०४.०५.२०२१	दि. २०.०५.२०२१
२	मे २०२१	दि. ०३.०६.२०२१	दि. १८.०६.२०२१
३	जुन २०२१	दि. ०१.०७.२०२१	दि. १७.०७.२०२१

उपरोक्त नमुद केलेल्या पाहणी समितीचे अहवाला सोबत नगरपंचायत ठेकेदार कंपनी यांचेकडून वेळोवळी प्राप्त झालेले कर्मचा-यांचे बायोमॅट्रीक पंचींग हजेरी रिपोर्ट, कर्मचा-यांचा पी.एफ. भरणा केलेले चलनांच्या प्रती, शिर्डी नगरपंचायत हद्दीत किटकनाशक कार्बोलिक (जंतुनाशक) पावडर, औषधांची फवारणी व धुर फवारणी, केल्याबाबतचे रहिवाशांचे अभिप्राय, स्वच्छता कामांसाठी लागणा-या साहित्यांच्या खरेदीच्या बीलांच्या प्रती, त्याचप्रमाणे घंटागाडीव्दारे ओला व सुका कचरा नियमितपणे घेऊन जाण्यात येत असलेबाबत नागरिकांच्या अभिप्राय अहवाल इतर अनुषंगीक दस्तऐवज सोबत जोडून लेखाशाखा अनुदान विभागास सादर केलेले आहेत.

तरी माहे एप्रिल२०२१ ते जुन २०२१ याकालवधीतील स्वच्छता पाहणीचे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील दैनंदिन स्वच्छता कामांबाबतचे दरमाह परिक्षण केलेल्या कामाचा त्रिमासीक अहवाल मा. तदर्थ समितीपुढे नोंद घेणेकामी सविनय सादर...

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर"

विषय – मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूध पुरवठा आदेश रद्द करणे व दूध खरेदीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रीया करणेबाबत...

मा. उच्च न्यायालयाकडून टोंड गाय दूध खरेदीसाठी रक्कम रु. ५,३१,६१,५००/- इतक्या रकमेला दि. १२.०३.२०२१ रोजी मान्यता मिळाल्यानंतर एप्रिल २०२१ ते मार्च-२०२२ या कालावधीत कॅन्टीन विभागासाठी त्यांचे मागणीनुसार आवश्यक असणारे टोंड गाय दूध खरेदी करण्यासाठी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. यामध्ये ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर निविदा तांत्रिक दृष्ट्या ही पात्र ठरल्या होत्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे:-

४. मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव
५. मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव
६. मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक

वरील तीनही पात्र निविदाधारकांच्या ई- निविदा कमर्शिअल बीड ०७.०६.२०२१ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले होते. यामध्ये मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दर न्युनतम प्राप्त झाले होते. सदर न्युनतम दरधारकाशी खरेदी समितीचे सभेत चर्चावाटाघाटी करुन त्यातुन प्राप्त अंतिम दराप्रमाणे पुरवठा आदेश देण्यासाठी मा. तदर्थ समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२८.०६.२०२१ रोजीच्या खरेदी समिती सभेत चर्चा वाटाघाटी होऊन जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१०९१/२०२१ दि. ०१.०७.२०२१ अन्वये मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना टोंड गाय दूधाच्या (Fat-३.५, SNF-८.५) पुरवठ्यासाठी दि.३१.०३.२०२२ पर्यंतचे कालावधीसाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यांनी त्याप्रमाणे दि. ०५.०७.२०२१ पासून आपला टोंड गाय दूधाचा पुरवठा सुरु केलेला होता.

दि. १३.०७.२०२१ रोजी कॅन्टीन विभागाकडील लिपीक, श्री. निकम यांनी सदर पुरवठादाराने पुरविलेले दुधाचा वास येत असलेबाबत तक्रार केली होती. त्यावेळी श्री. निकम यांना सदर दुधाचा लॅब रिपोर्ट करुन घेणेबाबत सुचना केली होती. तसेच मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना ही दूधाचा वास येत असलेबाबत कळविले होते त्यांनी दूध बदलून देणेची तयारी दाखविली होती. तसेच यापुढे अशी तक्रार येऊ नये म्हणून दूधाचा दर्जा सुधारणेबाबत मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना सुचना केली होती. त्यानंतर दि. २३.०७.२०२१ रोजी श्री. निकम, कॅन्टीन विभाग, लिपीक यांनी दूधाचा वास येत असलेबाबत तक्रार केली होती. यानुसार मा. प्रशासकीय अधिकारी, श्री. जगताप साहेब यांचेशी झालेले चर्चेनुसार पुरवठादार यांना दि. २४.०७.२०२१ रोजी समक्ष बोलविण्याचे ठरले होते. त्यानुसार पुरवठादार मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना दि. २३.०७.२०२१ रोजी फोनवर निरोप देण्यात आला होता. तथापी ते उपस्थित नव्हते. त्यांनी डेअरीचे प्रतिनिधी श्री. रोकडे यांना समक्ष दि. २४.०७.२०२१ रोजी शिर्डी येथे पाठविले होते.

दरम्यान दि. २४.०७.२०२१ रोजी सकाळी ११. वाजता डेअरीचे प्रतिनिधी श्री. रोकडे यांचे समक्ष मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा. प्रशासकीय अधिकारी श्री. जगताप, प्र. अधीक्षक, कॅन्टीन विभाग, श्री. डांगे यांचेशी एकत्रित झालेल्या चर्चेत सदर पुरवठादाराने दि.०५.०७.२०२१ ते २४.०७.२०२१ या कालावधीत दूधाचा पुरवठा संस्थानचे मागणीप्रमाणे नसल्याचे श्री. डांगे यांनी समक्ष सांगितले. तसेच सदर पुरवठादाराने पुरविलेल्या ०२ पिशव्यांवर मॅन्युफॅक्चरींग व एक्सपायरी डेट नसल्याचे आढळून आले. ही बाब श्री. रोकडे डेअरीचे प्रतिनिधी यांना दाखविण्यात आली होती.

त्यानंतर याबाबत चर्चा होऊन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा पुरवठा आदेश त्वरीत रद्द करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच संस्थानची अडचण होऊ नये म्हणुन मागील पुरवठादार मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव व मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांनी संस्थानला गेले ०५-०६ वर्षापासून चांगल्या दर्जाचे दूधाचा पुरवठा केला आहे त्यामुळे त्यांचेकडून दूध खरेदी करण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यास अनुसरुन मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेशी संपर्क करुन संस्थानची दूधाची नविन ई-निविदा प्रक्रीया होईपर्यंत त्यांना वरील मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दरात रु.३४.५० पैसे प्रती लिटर दराने पुरवठा करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी ती मान्य करुन तसा ई-मेल पाठविला आहे. तसेच मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांना देखील याबाबत विचारणा केली होती ते ही या दरात दूध पुरविण्यास तयार आहेत. असे फोनवर सांगितले होते तथापी अद्याप त्यांचा ई-मेल प्राप्त न झालेमुळे त्यांचेशी संपर्क केला असता त्यांनी त्यांच्या संघाच्या सभेत आज चर्चा होईल त्यानंतर ई-मेल देतो असे सांगितले आहे.

वरील निर्देशानुसार दि.२५.०७.२०२१ पासुन मे. व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचा दूध पुरवठा बंद केलेला आहे व मे. गोदावरी खोरे. ना. प्र. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेकडून तुर्त ०८ दिवसांसाठी दूध खरेदी करण्यात येत आहे.

दरम्यान सदर पुरवठादार यांनी दि.२५.०७.२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांची समक्ष भेट घेतली त्यावेळी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी श्री. जगताप साहेब, प्र. अधीक्षक, कॅन्टीन श्री. डांगे, प्र. अधीक्षक, खरेदी, श्री. कुलकर्णी हे उपस्थित होते. त्यावेळी श्री. जगताप साहेब व श्री. डांगे, प्र. अधीक्षक यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूधाचा पुरवठा सुरु झाल्यापासून तो मागणीप्रमाणे नसल्याचे सांगितले होते. यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना तुमच्याकडून संस्थानला दुधाचा पुरवठा व्यवस्थित न झाल्यामुळे तुमचेकडून संस्थानला दूध खरेदी करावयाचे नाही असे समक्ष निर्देशीत केले आहे व त्यांची संस्थानकडे जमा असलेली डिपॉजिटची रक्कम जप्त करण्याचे ही निर्देश दिले आहेत.

कॅन्टीन विभागाने मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांनी पुरविलेल्या दूधाबाबतचा लेखी अहवाल दि. २७.०७.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०५ वाजता खरेदी विभागाकडे पाठविलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

"कॅन्टीन विभागास आवश्यक असणारे गाय दूधासाठी आपले मार्फत मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांना मधूर ब्रॅन्ड, होमोजिनाईज्ड व पाश्चराईज्ड, ३.५ फॅट, ८.५ एसएनएफ टोन्ड गाय दूधाचा जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१०९१/२०२१ दि.०१/०७/२०२१ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला असुन दि. ०५/०७/२०२१ रोजी पासुन गाय दूधाचा पुरवठा चालु झालेला आहे.

संबंधीत पुरवठा धारकाकडुन दि.०५/०७/२०२१ ते दि.१३/०७/२०२१ रोजी पर्यंतचे दूधाची फॅट व एसएनएफ पुरवठा आदेशाप्रमाणे होते परंतु त्यानंतर येणा-या दूधाची प्रतवारी कमी येत असल्याने व वास येत असल्याचे आपणांस तोंडी समक्ष कळविले होते. त्यावर आपले मार्फत पुरवठा धारकास दूरध्वनीद्वारे कळविले असता पॅकिंग पिशवी खराब असल्याने वास येत असल्याचे मान्य करून पॅकिंग पिशवी बदलुन दिले.

मा.चेअरमन साहेब यांच्या कुटूंबियांनी दि.२३/०७/२०२१ रोजी साईनिवास अतिथीगृह येथे कॉफी मागितल्यानंतर सदर कॉफीचा वास येत असल्याचे तेथील कर्मचा-यांना निर्दशनास आणुन दिले. दि.२४/०७/२०२१ रोजी सकाळी गुरूस्थान अभिषेक, पुजेनंतर मा.वरिष्ठ अधिकारी यांना चहा, दूध दिले असता दूधाचा आंबट वास येत होता तसेच सकाळी १०.०० साई सभागृह येथे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आढावा बैठकीवेळी साई सभागृह येथील कर्मचा-यांनी दुध तापविलेनंतर त्या दूधाचा उग्र वास येत असल्याचे सर्व अधिकारी यांचे निर्दशनास आले. त्यावेळी मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री रोकडे समक्ष हजर होते व त्यांनीही प्रत्यक्ष दुधाचा उग्र वास येत असलेचे मान्य केलेले होते.

त्यामुळे दि.२४/०७/२०२१ रोजी प्रशासकिय अधिकारी डॉ.आकाश किसवे व श्री चंद्रकांत डांगे प्र.अधिक्षक कॅन्टीन विभाग यांनी पंचासमक्ष साईनाथ मंगलकार्यालय येथील बिल्डींग मध्ये असलेल्या कॅन्टीन मध्ये आवक झालेल्या मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे मधूर ब्रॅडच्या दूधाचा पंचनामा केला व त्याचे व्हिडिओ शुटींगही केले.

मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचेकडील दूध पुरवठा चालू केल्यानंतर अनेकदा काही पिशव्यांवर मॅन्यु. व एक्सपायरी डेटचा उल्लेख आढळुन आलेला नाही, कधी कधी दुध तापविलेनंतर त्या दुधाचा उग्र वास येत असल्याचे आपणांस व पुरवठाधारकास वेळोवेळी फोनद्वारे कळविण्यात आलेले होते. तसेच दि.०९/०७/२०२१ रोजी आलेल्या दुधापैकी ७५ लिटर खराब दूध व दि.२२/०७/२०२१ रोजी १६ लिटर लिकेज दूध पुरवठा दाराने बदलुन दिलेले आहे. तसेच दि.१४/०७/२०२१ पासुन फॅट व एसएनएफ कमी येत असल्याचेही पुरवठा धारकास दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले आहे.

सदर दुधाची कॅन्टीन कडे असलेल्या फॅट ॲनालायझर मशिनव्दारे दररोज प्रतवारी चेक केलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आपले माहीतीसाठी सादर"

दिनांक	आवक झालेले दूध लिटर मध्ये	फॅट	एसएनएफ
०५/०७/२०२१	२००	४.६	१०.९
०६/०७/२०२१	२००	४.६	१०.८
०७/०७/२०२१	२००	४.६	१०.९
०८/०७/२०२१	२००	४.६	११.०
०९/०७/२०२१	२००	४.४	१०.५
१०/०७/२०२१	२००	४.५	१०.६
११/०७/२०२१	२००	४.५	१०.६
१२/०७/२०२१	२००	४.५	१०.८

दिनांक	आवक झालेले दूध लिटर मध्ये	फॅट	एसएनएफ
१३/०७/२०२१	२००	३.९	९.२
१४/०७/२०२१	२००	३.४	८.१
१५/०७/२०२१	२००	३.३	७.८
१६/०७/२०२१	२००	३.२	७.५
१७/०७/२०२१	२००	३.१	७.५
१८/०७/२०२१	१९६	३.३	८.०
१९/०७/२०२१	२००	३.४	८.१
२०/०७/२०२१	१९८	३.२	७.६
२१/०७/२०२१	२५०	३.३	७.८
२२/०७/२०२१	२३४	३.४	८.१
२३/०७/२०२१	२५०	३.३	७.८
२४/०७/२०२१	२५०	१.८	४.३
एकुण	४१७८		

वरील अहवालाचे अवलोकन करता मे. व्हि. एम. डिस्टीब्युटर्स, यांनी दि. ०५.०७.२०२१ पासून दूध पुरवठा सुरु झाल्यानंतर दि.१३.०७.२०२१ पर्यंत चांगल्या प्रतीच्या दूधाचा पुरवठा केला असल्याचे वरील कॅन्टीन विभागाने दिलेल्या आकडेवारी वरुन दिसुन येते.

कॅन्टीन विभागाने ज्यावेळी दुधाला वास येतो असे खरेदी विभागाकडे कळविले होते. त्यावेळी पुरवठादाराला याबाबत सुचित केले होते. तसेच कॅन्टीन विभाग लिपीक, श्री. निकम यांना सदर दुधाची लॅब तपासणी करुन घेण्याचे ही सुचित केले होते.

कॅन्टीन विभागाकडे चौकशी करता, मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांनी पुरविलेले सर्व दूध वापरण्यात आलेले आहे.

दूधाच्या पुरवठ्याबाबत पुरवठा आदेशात दिलेल्या याबाबतच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे:-

२- पुरवठा कालावधी, पुरवठा करावयाचे दूधाचे स्पेसिफीकेशन, ब्रॅन्ड, अंदाजे परिमाण व दूधाचे मंजूर

दर वगैरे सर्व तपशील सोबतचे परिशिष्टात नमूद केला आहे. त्याप्रमाणे दुधाचा पुरवठा करावा लागेल. संस्थानचे कॅन्टीन विभागाकडून पुरविले जाणारे दुधाची दररोज तपासणी करून त्यांना योग्य वाटल्यास स्विकारले जाईल. पुरवठा आदेशात दिलेले स्पेसिफिकेशन व ब्रॅन्डप्रमाणे दुध पुरविण्याची दक्षता घ्यावी.

१०- ज्या ब्रॅण्डच्या निविदा मंजूर होतील त्याच ब्रॅण्डचे दुध पुरवावे लागेल. वेगळया ब्रॅण्डचे दुध स्विकारले जाणार नाही. खराब दुधाचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे आपणांवर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्या दूधाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

११- टोन्ड गाय दूध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड (३.५% फॅट, ८.५ एसएनएफ) गुणप्रतीचे, १/२ लिटर पॉलीथीन पॅकिंगमध्ये पुरविणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी गुणप्रतीचे दूध पुरविल्यास मा.दुग्धविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.एमएलके १०९९/प्रक्र३२१/पदुम८ दि.२७/१२/२००० मधील दूध खरेदीबाबतच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ०.१ कमी फॅटसाठी रु.०.३५ पैसे कपात करणेत येईल.

१३- पुरवठा करीत असलेल्या दूधाची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन दूध स्वीकारले जाते. तथापी दूध स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर काही दूध खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

१४- दूध पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार दूधाच्या ५०० मिलीच्या प्रत्येक पिशवीवर Date of Packing, Quantity and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

१५- पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या दूधामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१७- पुरविलेल्या दूधाची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्य शासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

३०- आपण दुधाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग आपल्याकडून झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन आपले नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत मा.तदर्थ समिती/मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

सदर पुरवठादाराकडून दूध पुरवठा बंद केल्यामुळे याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रीया करावी लागेल व ई-निविदा अंतिम होऊन पुरवठा आदेश देईपर्यंत संस्थानला आवश्यक असणारे टोंड गाय दूध

पुर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव व मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून, वरील नमूद विशेष अपवादात्मक परिस्थिती अचानक निर्माण झालेमुळे खरेदी करावे लागेल. पुढील ०१ वर्षाचे दूध खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रीया करुन अंतिम निर्णय होणेकामी साधारण ४०-४५ दिवसांचा किमान कालावधी अपेक्षित आहे.

ई-निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत कॅन्टीन विभागाकडून आवश्यक असणा-या दूधाची मागणी घेण्यात आली आहे. यामध्ये कॅन्टीन विभागाने ४५ दिवसांसाठी मंदिर चालू न झाल्यास ११००० लिटर दूधाची गरज लागेल व याकामी रु.३,७९,५००/- पर्यंत अंदाजे खर्च येईल. तर मंदिर चालू झाल्यास सरासरी ०१ दिवसासाठी १८०० लिटर दूध गृहीत धरुन ४५ दिवसांसाठी ८१००० लिटर अंदाजे दूध लागेल व त्यासाठी रक्कम रु.२७,९४,५००/- इतका अंदाजे खर्च येईल असे कळविले आहे.

प्रस्ताव:- वरील नमुद सर्व वस्तुस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना ३१ मार्च २०२२ पर्यंतचा दिलेला पुरवठा आदेश रद्द करणेस
२. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांची बयाणा रक्कम रु. ३,००,०००/- जप्त करुन संस्थान जमा करणेस
३. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूध पुरवठा बंद केलेनंतर पुर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून ०८ दिवसासाठी रु. ३४.५० पैसे प्रती लिटर नुसार गरजे प्रमाणे खरेदी करण्यात येत असलेल्या दुध खरेदीस व येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस
४. नविन निविदा प्रक्रीया अंतिम होईपर्यंत ४५ दिवसांसाठी मंदिर चालू न झाल्यास खरेदी करावे लागणा-या अंदाजे ११००० लिटर दूध खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.३,७९,५००/- आणि मंदिर चालू झाल्यास ८१००० लिटर अंदाजे दूध खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.२७,९४,५००/- चे खर्चास व ही दूध खरेदी पूर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून रु. ३४.५० पैसे प्रती लिटर प्रमाणे करणेस
५. सप्टेंबर-२०२१ पासून ते ऑगस्ट-२०२२ पर्यंत टोंड गाय दूध खरेदीची नविन ई- निविदा प्रक्रीया राबविणेस व याकामी वर्तमानपत्रात द्यावयाचे जाहिरात खर्चास

वरील १ ते ५ प्रमाणे प्रस्तावित कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ समिती सभेसमोर सादर.

29/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

29/7/2021

मा. तदर्थ समितीचे सभेसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय: डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, हृदयविकार तज्ञ (निलंबीत), श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते चौकशी अहवालाबाबत..

मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय-

-दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६०६- नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अहवालाची नोंद घेऊन यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला

Dr. R.V. Rao In-charge Medical Director is hereby appointed as an Enquiry officer to enquire into the allegations against Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma.

At first instance, Dr. R.V. Rao, Enquiry Officer shall issue show cause notice about irregularities, lapses and misconduct prima facie committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma.

After receipt of the eply from the Droctors conderned, within reasonable period, Dr. R.V. Rao shall proceed to conduct further inquiry, if the charges are not accepted, by framing appropriate charges etc. under delegated authority of the Managing Committee, till enquiry is completed and final report to the Managing Committee about findings of facts in respect of charges against the Doctors is submitted, within one month.

-दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८३- Upon considering the articles of charges and statement of imputations, there appears to be grave misconducts committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma, prima facie. By now the enquiry is underway and Enquiry Officer was authorized to serve the notice vis-à-vis to serve charge sheet.

The charge sheet is now served on the delinquents. The committee bereby resolves, condidering the nature of enquiry, seriousness of the charges, dereliction of duties and misconduct, prima facie committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma, both the delinquent-doctors should be kept under suspension till further orders. During suspension period they will be entitled for subsistence allowance as per rules. During suspension period their headquarters shall be Shirdi.

The committee's decision shall be implemented through the Executive Officer Shri Rajendra Jadhav, who is responsible to serve suspension order immediately on both the doctors and report the compliance to the Committee.

The Enquiry Officer to continue the further enquiry and submit his final report, as early as possible.

-दि. २८/०५/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५६- यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधिश श्री. जे. एल. देशपांडे पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी पत्र देऊन, त्यांना विचारणा करणेत यावी.

-दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९२ – उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा. श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश,पुणे यांनी केलेली विनंती मान्य करणेत येऊन, सदरहूकामी त्यांना तात्काळ नेमणूक आदेश देण्यात यावा. तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी, याबाबी पुरविणेस व सदरहू चौकशीकामी येणा-या रु. ५०,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

-दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६४ – उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्टाचे अवलोकन करता, ॲड. सी. जे. बोरुडे, अहमदनगर यांचा या क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव विचारात घेता, डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते निहाय चौकशीकामी सादरकर्ते अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच त्यांना दयावयाचे मानधन कार्यकारी अधिकारी यांनी निश्चीत करुन त्यास समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

प्रस्तावना -

डॉ. बजाज व डॉ. वर्मा हे कार्डीओलॉजीस्ट अनुक्रमे दि. ०९/०४/२००७ व दि. ०२/०२/२००९ पासून संस्थान सेवेत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये रुग्णांसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहित्याचा वापर करणेकरीता बेकायदेशीररीत्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतले आहेत. तसेच रुग्णाच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आल्याने मा. व्यवस्थापन मंडळाचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६०६ अन्वये डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना दि. २०/०८/२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली. त्यांना नोटीस बाबत लेखी खुलासा सादर करणेकामी नैसर्गिक न्याय तत्वाचे नियमानुसार योग्य ती संधी दिली होती परंतु त्यांनी लेखी खुलासा सादर केला नाही. दि. ०६/११/२०१४ रोजी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर रीतसर आरोपपत्र बजावले आहे. त्यानंतर मा. व्यवस्थापन मंडळाचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८३ अन्वये डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना दि. ०८/११/२०१४ पासून खाते चौकशीसाठी संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत

करण्यात आले आहे. निलंबन कालावधीत नियमाप्रमाणे त्यांना निलंबन भत्ता अदा केला जात होता परंतू निलंबन आदेशातील अटी-शर्तीनुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा निलंबन कालावधीत उपस्थिती नोंदवत नाही तसेच वरिष्ठांच्या परवानगीशिवाय विनापरवानगी मुख्यालय सोडून जातात असे निदर्शनास आले आहे, त्यामुळे निलंबन भत्ता अदा केला जात नाही.

खाते चौकशी कामी श्री. जे. एल. देशपांडे साहेब., पुणे, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश यांची दि. २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच संस्थानचे वतीने श्री. सी. जे. बोरूडे, ॲडव्होकेट, अहमदनगर यांची सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच ॲडव्होकेट श्री. सी. जे. बोरूडे यांना या खातेचौकशी कामकाजामध्ये सहाय्य करणेकरीता वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची नेमणुक करणेत आली. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी निलंबन आदेशाविरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर अनुक्रमे रिट पिटीशन क्र. १००५५/२०१४ व १००६०/२०१४ दाखल केलेले आहे. सदरच्या रिट पिटीशनमध्ये मा. न्यायालयासमोर संस्थानचे म्हणणे प्रतिज्ञापत्राव्दारे सादर केलेले आहे. सदर पिटीशनमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

A) For a writ of certiorari Order direction in the nature of certiorari or any other appropriate writ or direction, calling for the record and proceedings of the impugned Order Exhibit-"F" dated 07.11.2014 No.SSST/SSSH/467/2014, Passed by respondent No.3 suspending the petitioner and after examining the legality, validity and propriety thereof the impugned Order Exhibit-"F" dated 07.11.2014 No.SSST/SSSH/467/2014, passed by respondent No.3 be quashed and set-aside.

B) Pending hearing and the final disposal of the present Writ Petition, the implementation, execution and operation of the empugned Order Exhibit-"G" dated 07.11.2014 No. SSST/ SSSH/ 467/2014, passed by respondent No.3 by stayed

C) Pending hearing and the final disposal of the present Writ Petition, while proceeding with the enquiry against the petitioner, the panel of three Expert Senior Intervantional Cardiologist from Maharashtra be appointed for conducting the Departmental enquiry against the petitioner instead of respondent No.4, out of which the petitioner be permitted to assign one of the name of Senior Intervantional Cardiologist

D) Pending hearing and the final disposal of the present Writ Petition, the appropriate directions be issued against the respondents to provide the documents as applied by the petitioner by their communication dated 23rd August 2014, as early as possible before proceeding the actual Departmental enquiry against the petitioner by giving fair opportunity

E) Ad interim order in terms of prayer clause 'B','C','D'.

F) Pass such other orders which are necessary in the facts and circumstances of the case in favour of the petitioner.

त्यानंतर डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर खाते चौकशी विरोधात रिट पिटीशन क्र. ५४४१/२०१६ दाखल केले आहे. त्यात खाते चौकशीस स्थगिती मिळावी अशी विनंती केली आहे. सादर केलेले आहे. सदर पिटीशनमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

A) Admit the petition;

B) Quash and set aside the ambiguous and illegal Orders dated 27-3-2016 (Exh-M) and 23-04-2016 (Exh-R) passed by the Enquiry Officer;

C) Direct the Respondent to decide Applications dated 29-04-2016 and 23-04-2016 (Exh. U&V) about the applicability of the law governing the disciplinary action initiated against the Petitioners;

D) Direct the Pespondent to give fair opportunity of adequate and reasonable time for defending the allegation in accordance with Law;

E) Stay the further proceeding of the domestic enquiry till decision and disposal of Application dated 29-04-2016 and 23-04-2016 (Exh-U&V) addressed to the Respondent;

F) Grant interim relief in terms of Prayer Clause(f); and,

G) Allow the Petition in the above terms.

उपरोक्त रिट पिटीशन १००५५/२०१४, १००६०/२०१४ व ५४४१/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी दि. २३/०६/२०१६ रोजी खालीलप्रमाणे निकाल राखुन ठेवलेला आहे.

Heard learned Counsel for the parties at length.

2 The learned Counsel for respondent in Writ petition No.5441 of 2016 has tendered across the Bar the affidavit-in-reply. The same is taken on record.

3 Reserved for judgment.

दरम्यानच्या काळात कोपरगाव येथील समाजसेवक श्री. संजय भास्करराव काळे यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ६३६/२०१५ दाखल केले होते. त्यात मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर, मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना प्रतिवादी केले आहे. मा. त्रिसदस्य समितीसमोर दि. ०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १३ नुसार दि. २९/०३/२०१६ रोजी संस्थानचे वतीने डॉ. विजय बाळकृष्ण पाटील, तत्कालीन प्र. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांनी शिर्डी पोलीस

स्टेशन, शिर्डी येथे डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर एफ.आय.आर. दाखल करणेत आला असून भारतीय दंड विधान कलम ४०८ अन्वये त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचे केसमध्ये जामिन मिळणेकामी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर अनुक्रमे क्रिमीनल ॲप्लीकेशन नं २५४२/२०१६ व २५४५/२०१६ दाखल केले होते. त्यात मा. न्यायालयाने डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना जामीनासाठी ०४ आठवडे मुदतवाढ दिलेली आहे. त्यानंतर सदर निर्णयाविरुध्द डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे SLP(Crl) No. ००६६६९-००६६७०/२०१६ दि. २८/०८/२०१६ रोजी दाखल केले होते.

त्यात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दि.२१/०७/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निकाल दिला आहे.

ORDER

We make it clear that the petitioners shall cooperate with tha investigation.

In the meantion, interim protection granted by the High Court shall continue tor seven weeks.

Learned counsel for the respondent - State shall file the updated status report before the next date of hearing

Having heard Mr. Kapil Sibal, learned senior counsel appearing for the petitioners and Mr. Katneshwarkar, learned counsel appearing for the State of Maharashtra, we are inclined to direct that the interim order passed by this Court on 3.10.2016 shall remain in vogur. The investigating authority shall proceed in accordanc with law and the petitioners shall fully cooperate with the investigation. That apart, they shall abide by the terms and conditions imposed under Section 438(2) of the Code of Criminal Procedure.

दि. ०६/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., अहमदनगर यांनी शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं. कलम ६४/२०१६ भादविक. ४०८, ४०९ या गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने महत्वाची माहिती मिळणेबाबत पत्र दिले असुन सदर पत्रात शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं. ६४/२०१६ भादविक. ४०८, ४०९ याप्रमाणे दाखल गुन्ह्यातील फिर्यादी डॉ. विजय बाळकृष्ण पाटील, वय - ४२ वर्षे, धंदा – नोकरी, साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी रा. १/५ साई सहवास, ५०० रुम मागे, शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर, यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरीलप्रमाणे गुन्हा रजिस्टरी दाखल झालेला असुन सदर गुन्ह्याचा तपास आम्ही करत आहोत.

सदर गुन्ह्यातील आरोपी नामे १. डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा , २. डॉ. हरिष हुकूमचंद बजाज दोघे रा. शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर यांचेविरुद्ध संस्थानने त्यांना सेवानिलंबीत करुन निवृत्त न्यायाधीशांमार्फत विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचे तपासाचे दृष्टीने सदर चौकशीचे अहवालाची आवश्यकता असल्याने सदर चौकशी अहवाल त्वरीत मिळणेस विनंती केली होती.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाले असुन श्री.जे.एल.देशपांडे, खाते चौकशी अधिकारी यांनी बंद लिफाफ्यामध्ये दि. १८/०७/२०१७ रोजी खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे. डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा हृदयविकार तज्ञ यांना सेकंड शो कॉज नोटीस देऊन सोबत सदरच्या अहवाल देता येईल. त्यांचा खुलासा आलेनंतर मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये सादर केल्यानंतर खातेचौकशी अहवालाची नक्कल प्रत पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा., अहमदनगर यांना देता येईल, अशी दि. २८/१२/२०१७ रोजी टिपणी सादर केली होती. परंतू चौकशी अहवालाबाबत निर्णय न घेता चौकशी अहवालाची प्रत पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., अहमदनगर यांना देणेबाबत सुचना करण्यात आली. त्यानुसार दि.१०/०३/२०१८ चे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांना चौकशी अहवालाची प्रत देण्यात आलेली आहे.

तसेच दि. १६/०८/२०१७ रोजी विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना निलंबीत डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता या दोनही डॉक्टरांच्या सेवा पुढील ४ ते ५ वर्ष उपलब्ध होणार नाहीत. तसेच दोन्ही डॉक्टर्स निलंबित असल्याने त्यांचे पदावर नियमीत भरती करता येत नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या दि. १०/०४/२०१५ रोजीच्या निर्णयानुसरचार हदयविकास तज्ञांची नियुक्ती करणेस तदर्थ समितीची मान्यता मिळावी, असा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावास अनुसरुन शासननिर्णय दि. ०८ मे २०१८ रोजी श्री साईबाबा रुग्णालयासाठी हृदय विकार तज्ञ संवर्गातील ०२ काल्पनिक पदे भरण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

श्री संजय भास्कर काळे, कोपरगाव यांचे क्रिमीनल रिट पिटीशन ६३६/२०१६ मधील मागणीनुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेविरुध्द शिर्डी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ६४/२०१६ भादवि क. ४०८, ४०९ याप्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये चार्जशिट दाखल झालेले नाही.

तरी श्री संजय काळे, कोपरगाव यांनी दि. २९/०८/२०२० रोजीचे पत्रात- प्रधान जिल्हा न्यायाधीशांनी केलेली निलंबनाची कारवाई सेवा निवृत्त् जिल्हा न्यायाधीशांनी अयोग्य ठरवून त्यांना निर्दोष जाहीर केले असल्यास डॉक्टरांना दोषमुक्त करणे जरुरी आहे. पण जर ते डॉक्टर दोषी अढळले असतील तर संस्थानने त्यांचेवर दोष सिध्द झाल्यामुळे सक्त कारवाई करुन पोलीसांकडे गुन्हा दाखल करावा.

आपणास विनम्र आवाहन आहे. आपणाकडून ही न्यायदानाची प्रक्रिया पुर्ण करुन कारवाई साठी मा. उच्च न्यायालयाकडून निर्देश प्राप्त करुन घेऊन कारवाई करावी. सदर अहवालास आज तीन वर्षे होऊन गेल्याने मुळ तक्रारदार हया नात्याने आपणाकडे न्यायाची भिक्षा मागत आहे.

सदर प्रकरणात डॉक्टर दोषी नसल्यास त्यांना दोष मुक्तीचा दाखला देऊन सेवेत रुजू करुन घ्यावे. निपक्ष न्यायाची तसेच त्वरित अहवाल वाचन व्हावे. अशी मागणी केली आहे.

मॅन्युअल ऑफ डिपार्टमेंटल इन्क्वायरीज (विभागीय चौकशी पुस्तिका) या पुस्तिकेतील प्रकरण चार-खटला भरणे त्यातील

४.२- फौजदारी कार्यवाहीच्या तुलनेत विभागीय कारवाई- संबंधित कर्मचा-यावर प्रथम शिस्तभंगाची कारवाई करण्याची व नंतर फौजदारी खटला भरण्याची शासनास मोकळीक आहे. अथवा शासन प्रथम फौजदारी खटला भरुन आणि त्याच्या निर्णयाची वाट पाहून दोषसिध्दी निश्चीत झाल्यानंतर वर्तणुकीच्या आधारावर शिक्षा करण्याबाबत कार्यवाही करु शकेल. शासन तिसरा पर्याय म्हणून एकाचवेळी फौजदारी कार्यवाहीबरोबर विभागीय कारवाई करण्यास प्रारंभ करु शकेल. प्रत्येक प्रकरणात प्रथम फौजदारी कार्यवाही करण्याचे बंधन शासनावर नाही, ही कायदेशीर परिस्थिती आहे. परंतु, विभागीय प्राधिका-यांनी विभागीय कारवाई सुरु करण्यापूर्वी खटला दाखल करणे व निर्णयांची प्रतीक्षा करणे उचित ठरेल. याचा आणखी एक फायदा असा की, शासकीय कर्मचारी फौजदारी दोषारोपात प्रत्यक्ष सिध्दापराधी ठरल्यानंतर त्याच्यावर विभागीय कारवाई करण्याची आवश्यकताच राहणार नाही. म्हणून प्रत्येक व्यक्तीगत प्रकरणातील सर्व संबध्द बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत आणि फौजदारी खटल्याबरोबरच शिस्तभंगविषयक कार्यवाही करावयाची असेल तर जाणीवपूर्वक दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणात गंभीर स्वरुपाचे दोषारोप असतील आणि त्यास सबळ पुरावा असेल, तर विभागीय कार्यवाहीही चालू ठेवावी म्हणजे लोकसेवकाच्या गैरवर्तणुकीबद्दल त्वरित निष्कर्ष काढता येईल आणि त्याची पुढील सेवा चालू ठेवण्याबाबतही अंतिम निर्णय घेता येईल. खटला चालू असतानाच विभागीय चौकशीही चालू करावी किंवा कसे या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सर्वात चांगली वेळ म्हणजे खटला भरण्यास मंजुरी देण्यात येते, ती होय.त्या टप्प्यावर सर्व दस्तऐवज उपलब्ध असतात आणि मुळ दस्तऐवजाच्या फोटो-स्टॅट प्रती किंवा मूळ प्रती चौकशी करणा-या प्राधिका-यासमोर ठेवणे, हे कठीण काम नाही. दोषारोपित अधिका-याने एकदा मूळे कागदपत्रे मान्य केल्यानंतर चौकशी करणा-या अधिका-याने आणि / किंवा दोषारोपित अधिका-याने यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या दस्तऐवजाच्या फोटो-स्टॅट प्रतीपुढील विभागीय कार्यवाहीच्या प्रक्रियेच्या वेळी वापरात आणता येतील. कारण न्यायालयीन कार्यवाहीच्या वेळी मूळ प्रती आवश्यक असतात. आणखी असे की, अपील न्यायालयाच्या निर्णयासाठी शासनाने वाट पाहण्याची आवश्यकता नाही. याबाबतीत संविधानाच्या अनुच्छेद ३११ च्या खंड (२) दुस-या परंतुकान्वये निर्बंध घालण्यात आलेला नाही. परिणामी, शासनाने विभागीय कार्यवाही सुरु करणे समर्थनीय ठरेल आणि केवळ ट्रायल कोर्टात सिध्दापराध ठरलेल्या कर्मचा-यास त्याच्या वर्तणुकीच्या आधारावर शिक्षा करता येईल. तथापि, जेथे अपील न्यायालयाकडून ट्रायल न्यायालयातील अपराधसिध्दी रद्द ठरवण्यात आली असेल तर केलेल्या शिक्षेचा प्रभाव ताबडतोब कमी होईल आणि परिस्थितीचे पुनर्विलोकन करणे शासनावर बंधनकारक असेल.

डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाले असुन श्री.जे.एल.देशपांडे, खाते चौकशी अधिकारी यांनी बंद लिफाफ्यामध्ये दि. १८/०७/२०१७ रोजी खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर दाखल केलेली फिर्याद व खाते निहाय चौकशीमध्ये असलेले आरोप, त्या सोबत दाखल केलेली कागदपत्रे आणि स्वरुप सारखेच आहेत.

विभागीय चौकशी पुस्तिका मधील प्रकरण चार- खटला भरणे त्यातील ४.२ नुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेविरुध्द दाखल केलेल्या एफ. आय. आरचा निर्णय झालेनंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल. उपरोक्त कार्यवाही पूर्ण झालेनंतर श्री संजय काळे यांना कळविता येईल तोपर्यंत श्री काळे यांचा दि. २९/०८/२०२० रोजीचा अर्ज नस्तीबंद करण्यात आला.

श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, खाते चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत.

Point of determination	Answers
01. Whether it is proved by management that both the CSE's committed various acts alleged in the charge sheet and statements of imputations in the respective inquiries proved against them, with object to earn undue monetary advantage by way of extracting commission from various supplier companies / distributors ?	Yes
02. Whether it is proved by management that both the CSE's violated and committed breach of managing committee resolution no. 02 decision no. 343 Dt. 17/04/2013 followed by circular Dt. 18/04/2013 in the matter of proportionate use of stents in the cardiology procedures conducted by them?	Yes.
03. Is it proved by management that both the CSE's involved themselves in unethical practice of operating clinical registry without obtaining or suggesting to take due permission from competent authority and without following prescribed procedure and used stents and other material of a particular i.e. Heart Beat Intervention Pvt. Ltd. During such clinical registry operated at the hospital?	Yes.
04. Is it proved by management that both the CSE's instead of making use of stent required in cardiology procedure in equal proportion, used stents of a particular company name heart Beat Intervention Pvt. Ltd. more in proportion to earn under monetory benefit / commission from the said company?	Yes.
05. Whether it is proved that by management that, both the CSE's acting as a cardiologist at Hospital, mis-used their position by preferring Drug Coated Stents with object to earn undue monitory benefit instead of using low cost stents of other companies / brands and caused financial loss to Sansthan as well as Government?	Yes.
06. Is it proved by management that CSE Dr. Bajaj appointed unauthorized person giving him access with official record with object to acquire more number of patients and to earn more financial benefit?	Yes.
07. Is it proved by management that both the CSE's kept their patients unattended and subjected some of them to premature discharge to accommodate more number of patients and there by floated standard norms and professional ethics?	No
08. Is it proved by management that both the CSE's used to pressurize or exercise undue influence on the seller companies to make sale of their products like Stent, Balloons etc. at higher prices and not to reduce the prices by way of permissible discounts?	No
09. Is it proved by management that both the CSE's made indiscriminate use of stents by implanting the same to patient irrespective of its requirement to a particular patient with object to increase use of stents and to earn more commission from the concerned company?	No

विभागाचा अभिप्राय:-

डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाले असुन श्री.जे.एल.देशपांडे, खाते चौकशी अधिकारी यांनी बंद लिफाफ्यामध्ये दि. १८/०७/२०१७ रोजी खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर दाखल केलेली फिर्याद व खाते निहाय चौकशीमध्ये असलेले आरोप, त्या सोबत दाखल केलेली कागदपत्रे आणि स्वरुप सारखेच असल्याने एफ. आय. आर. वरील निर्णयानुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर कार्यवाही करणे प्रस्तावित असल्याने चौकशी अहवालावर निर्णय घेतलेला नाही.

तरी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही. सदर चार्जशिट दाखल होणेस किती कालावधी लागू शकतो हे निश्चीत नाही. त्यामुळे डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचे खाते चौकशीत श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, खाते चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या सोबतचे चौकशी अहवालाबाबत निर्णय होणेस विनंती.

19/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

18/6/21

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
रुग्णालये विभाग

विषय :- रुग्णालये विभागात वार्षीक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाची विभागीय चौकशी होणेबाबत...

टिपणी :-

श्री साईनाथ रुग्णालय व साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल या दोन्ही रुग्णालयांसाठी आवश्यक असणारी औषधे, स्टेशनरी व इतर खरेदी करण्याची जबाबदारी खरेदी व्यवस्थापक, रुग्णालये विभाग यांची आहे. रुग्णालयामध्ये रुग्णांना सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर, लॅब, ब्लड बॅंक या सर्व ठिकाणी मोठया प्रमाणावर औषध साठयाची उपलब्धता नसल्याची बाब निदर्शनास आली. रुग्णालये खरेदी विभागामार्फत मध्यवर्ती औषध भांडारात औषध साठा टंचाई असलेबाबत संशय निर्माण झाला.

त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/वशी-मुकाअ/१८८५ दि.०९.०१.२०२१ अन्वये औषध खरेदीबाबत तपासणी समिती गठीत करण्यात आली होती. तपासणी कार्यवाही चालू असतांनाच खरेदी व्यवस्थापक सदर कार्यालयीन तपासणीस सशयास्पदरितीने सामोरे जात असल्याचे निदर्शनास आले. कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करु लागले. अंतिमतः तर तपासणी पथकातील एका सदस्यावर तपासणीकरीता आक्षेप घेण्याचे पत्रसुद्धा त्यांनी दिले. तपासणीकरीता आवश्यक असलेले मध्यवर्ती औषध भांडाराचे रेकॉर्ड व खरेदी विभागाचे रेकॉर्ड या दोन्हींवर त्यांचे नियंत्रण असल्याचे तपासणी समितीचे निदर्शनास आले. सदर तपासणी समितीचा अहवाल व खरेदी विभाग व मध्यवर्ती औषध भांडार तसेच सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर, लॅब यांची मागणीपत्रे यावरुन संस्थान मध्यवर्ती औषध भांडारात मोठया प्रमाणावर औषध साठा टंचाई असलेबाबत निदर्शनास आले. संस्थान प्रशासन गोर-गरीब रुग्णांकरीता मोफत व सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता वार्षीक रु.५० ते ६० कोटीची खर्च तरतुद मंजुर करते. तथापि, प्रत्यक्षात यापैकी साधारणतः २० ते ३० टक्केच खरेदी व मोठया प्रमाणावर अखर्चित रक्कम शिल्लक राहते व स्टोअरमध्ये पुरेसा साठा न ठेवल्याने रुग्णालयात गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होते, त्यांना बाहेरील खाजगी औषध दुकानांमधून महागडया दराने औषधे खरेदी करावी लागतात. सामान्यतः जीवनरक्षक बाब असल्याने सदर खर्च पुढे ढकलताही येत नाही व टाळताही येत नाही व गोर-गरीब रुग्णांची मोठी कोंडी होते, असे दि.२०.०२.२०२१ रोजीच्या प्राथमिक तपासणी अहवालावरुन दिसून आले आहे.

खरेदी व्यवस्थापक यांना वेळोवेळी दिलेल्या कारणे दाखवा नोटीसा व खुलासे :-

१) सदर बाबत दि.२५.०२.२०२१ रोजीचे दैनिक सकाळ वृत्तपत्रात, दि.२७.०२.२०२१ रोजीचे दैनिक लोकमंथन व इतर स्थानिक वृत्तपत्रांमध्ये औषध खरेदी संदर्भात टिकात्मक बातमी प्रसिद्ध झाली. या संबंधीत खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल आभाळे यांना जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/६४ दि.०५.०३.२०२१ अन्वये **खुलासा मागविण्यात आला होता.** तसेच दि.२७.०२.२०२१ रोजी लोकमंथन, अहमदनगर आवृत्तीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांचेबरोबर काही माहिती अधिकार कार्यकर्ते व पुर्वी मेडीकल रिप्रेझेंटेटीव्ह म्हणून एकाच कंपनीत काम करत असल्याचे व संस्थानचे खरेदी विभागामध्ये खरेदी व्यवस्थापक म्हणून कार्यरत राहीला. त्यातून खाजगी दुकानांची विक्री वाढवत राहीला, अशी बातमी प्रसिद्ध झाली. संस्थान रुग्णालयामध्ये कृत्रिम औषधटंचाई निर्माण करुन बाहेरील औषध दुकानांचा मोठया प्रमाणावर खप वाढवून अवैध आर्थिक व्यवहार होत असलेबाबत संशयास पुष्टी मिळून खरा असलेबाबत शक्यता निर्माण झाली..

२) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१४३ दि.१२.०२.२०२१ अन्वये, विनापरवानगी गैरहजर राहत असलेबाबत खुलासा नोटीस देण्यात आली आहे.

३) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१६५ दि.१९.०६.२०२१ अन्वये, तक्रारदार श्री.दिगंबर हरीभाऊ कोते यांनी तक्रार अर्ज केला आहे. त्याबाबत खुलासा नोटीस देण्यात आली आहे.

४) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२०९ दि.०७.०७.२०२१ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पीटल येथे खरेदी व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना कर्तव्यात केलेला कसुर व शंकास्पद कामकाज व झालेल्या अनियमितता याबाबत खुलासा नोटीस देण्यात आली आहे – त्याकरीता ०७ दिवस कालावधी देण्यात आला होता. तथापि, दि.०९.०७.२०२१ रोजी त्यांनी ६० दिवसांची मुदत

मिळणेबाबत मागणी केली. जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२३६ दि.१४.०७.२०२१ अन्वये खुलासा करणेकामी आणखी ०७ दिवस मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदतवाढ पत्रावर श्री.आभाळे यांनी *"मी दि.१३.०४.२०२१ रोजी खुलाशाकामी मागणी केलेले सर्व कागदपत्र मिळालेनंतर ७ ते १० दिवसांचे आत खुलासा देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करेल तरी सर्व कागदपत्रे मिळावी"* असा शेरा देऊन मुदतवाढ पत्र घेतले आहे - दि.२१.०७.२०२१ पर्यंत – अद्याप खुलासा प्राप्त नाही. तसेच त्यांना कागदपत्रे स्वतः पाहण्यास मुभा दिलेली आहे.

५) जा.नं.एसएसएस/वशी-मुकाअ/७२१/२०२१ दि.१३.०७.२०२१ अन्वये, "सन २०२०-२१ खरेदी आदेशात सुमारे ७६६ औषधे व सर्जिकल साहित्य यांचा साठा शिल्लक नसतांना वार्षीक खरेदी आदेशामध्ये पहिल्या टप्प्यात त्यांची मागणी केली नसलेबाबत" बाबत ०७ दिवसांचे आत कारणे दाखवा नोटीस. अद्याप खुलासा प्राप्त नाही.

६) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२५३ दि.१७.०७.२०२१ अन्वये, "खरेदी व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना २०१५-१६ ते २०२०-२१ कालावधीत ३१९० औषधांचा साठा निरंक असतांना खरेदी आदेशामध्ये पहिल्या टप्प्यात औषधे मागविली नाही" बाबत ०७ दिवसांचे आत कारणे दाखवा नोटीस. अद्याप खुलासा प्राप्त नाही.

खरेदी व्यवस्थापक यांनी दि.२९.०४.२०२१ रोजी खुलासा सादर केला असून त्यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

अशाप्रकारे खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांना अनियमित कामकाजाबाबत ०७ कारणे दाखवा नोटीसा दिल्या असून पैकी त्यांनी एक नोटीसचा खुलासा केला असुन उर्वरीत नोटीसांचा खुलासा केलेला नाही. बाबत, सर्व अनुषंगीक दप्तराची मागणी केली असून त्यानंतर ०७ ते १० दिवसांत खुलासा देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणार असलेबाबत त्यांनी मुदतवाढ पत्रावर हस्ताक्षरात लिहुन दिले आहे. यावरुन त्यांना देण्यात आलेल्या ०७ नोटीसांपैकी एका नोटीसचा खुलासा केला आहे, तोही असमाधानकारक असून उर्वरीत ०६ नोटीसांचा त्यांनी खुलासा केला नसून ते स्पष्टीकरणात्मक खुलासा देण्यास टाळाटाळ करण्याचे दिसत आहे.

सदर खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांची शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव इ. नसतांनाही त्यांची नियुक्ती झालेबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात जनहीत याचिका क्र.३१३३९/२०१६ दि.०६.१०.२०१६ दाखल झाली होती. मा.व्य.स. निर्णय क्र.६६१/दि.१९.०९.२०१६ अन्वये एका उप वैद्यकीय संचालकास जनहीत याचिका औरंगाबाद खंडपीठात दाखल असल्याने खंडपीठाचा आदेश होईपावेतो त्यांना कायम करण्यास तूर्त निर्णय घेता येणार नाही व सदरहू प्रस्ताव पुढील सभेमध्ये फेर सादर करावा असा ठराव झाला होता. ठीक अशाच प्रकारची जनहीत याचिका या खरेदी व्यवस्थापक यांचे विरुद्ध **दि.०६.१०.२०१६** रोजी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल असतांना खरेदी व्यवस्थापकाला संस्थान सेवेत कायम करण्यात आले.

शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षणात खरेदी व्यवस्थापक यांच्या नियुक्ती संबंधीत शैक्षणिक पात्रता व अनुभव यावर आक्षेपही नोंदविण्यात आलेला आहे. बाबत, वैधानिक लेखापरिक्षक यांना सदर आक्षेपाबाबत संस्थानमार्फत पुनःश्च पत्रव्यवहार करुन विचारणा करण्यात आली होती. तथापि, त्यानंतरही शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांनी त्यांचा आक्षेप कायम ठेवल्याचा पत्रव्यवहार दिसून आला आहे. अशाप्रकारे या खरेदी व्यवस्थापकाची वादग्रस्त नियुक्ती, त्यांचे नियुक्तीबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दाखल असलेली जनहीत याचिका, शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षक यांचा खरेदी व्यवस्थापक यांचे नियुक्तीवर असलेला आक्षेप, यासह सध्या या खरेदी व्यवस्थापकाचे संशयास्पद व अनियमित कामकाज, औषध भांडारात आवश्यक औषध साठा उपलब्ध करुन देण्याऐवजी बाहेरील खाजगी औषध दुकानांचा खप वाढविण्याचे व गोर-गरीब रुग्णांना वेठीस धरणे अशा अनेक अवैध बाबी समोर येत आहे.

तसेच खरेदी व्यवस्थापकांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसा व नोटीसांना करण्यात आलेला खुलासा व त्या खुलाशास अनुसरुन माहिती अधिकार कार्यकर्ते अखर्चित उत्पन्न, संस्थानला त्यावर भरावा लागलेला आयकर इ. तथापि, हा आरोप इतर विभागांवर न करता फक्त औषध खरेदीबाबतच कसे? अशाप्रकारचे वेठीस धरण्याची माहिती अधिकारातील त्यांची पत्रे, मा. शासनास ते करत असलेले पत्रव्यवहार यावरुन सदर खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांचे माहिती अधिकार कार्यकर्ते यांचेशी संबंध

असल्याचेही दिसून येते व त्याप्रमाणे ते संस्थानमध्ये औषध खरेदी व्यवहार करत असलेबाबत व संस्थानमध्ये असलेल्या दस्तऐवजांवरुन संशस्पाद व अनियमित असलेबाबत दिसून येत आहे.

तरी यापुढे खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांचेमार्फत होत असलेले अनियमित कामकाज व रुग्णांची त्यामुळे होणारी गैरसोय थांबण्यासाठी त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. दि.०९.०१.२०२१ रोजी गठीत करण्यात आलेल्या तपासणी समितीने दि.२०.०२.२०२१ रोजी प्राथमिक तपासणी अहवाल सादर केला आहे. त्यासंबंधीत कारणे दाखवा नोटीसांचा खुलासा केलेला नाही. त्याव्यतिरिक्त त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसांचा त्यांनी खुलासा केलेला नाही. त्याकरीता कागदपत्रांची मागणी केली असून त्यानंतर ते खुलासा देण्याचा प्रयत्न करणार असलेबाबतचा त्यांचा पावित्रा या सर्वांचा विचार करता त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत असून खरेदी विभागातील कागदपत्रे, मध्यवर्ती औषध भांडारातील कागदपत्रे या सर्वांचे अवलोकन करता व त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसा यावरुन खरेदी व्यवस्थापक यांचेवर खालीलप्रमाणे गंभीर आरोप आहेत :-

१) तपासणीकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीच्या प्राथमिक तपासणी अहवालामध्ये औषध भांडारात औषध/साहित्य साठा नोंदीकरीता वापरण्यात येणा-या संगणक प्रणालीमध्ये साठा नमुना तपासणी केली असता साधारणतः ४१७ ते ११३८ दिवसांपर्यंत औषध भांडारात औषध साठा शिल्लक नसल्याचे व तो उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

२) रुग्णालयातील सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर, लॅब इ. सर्व विभागांच्या मागणीपत्रांची नमुना पद्धतीने तपासणी केली असता एकुण ५५१ मागणीपत्रांपैकी ५०० मागणीपत्रांची औषध साठा शिल्लक नसल्याने त्या मागणीपत्रांची पुर्णपणे पर्तता झालेली नसल्याचे दिसुन आले आहे.

३) रुग्णालयातील गोर-गरीब रुग्णांना डॉक्टरांनी सुचविलेली औषधे ही बाब जीवनरक्षक असल्याने व कोणत्याही परिस्थतीत त्याला पर्याय नसल्याने गोर-गरीब रुग्णांची कोंडी झाली व त्यांना सदर औषधे बाहेरील खाजगी औषध दुकानांमधून महागडया दराने खरेदी करावी लागली.

४) गठीत करण्यात आलेल्या तपासणी समितीच्या प्राथमिक तपासणी अहवालात वर्षनिहाय अंदाजपत्रकीय तरतुद व वर्षनिहाय प्रत्यक्ष खरेदी करण्यात आलेली औषधे/सर्जिकल साहित्य व आवश्यकता असूनही औषधे खरेदी न केल्याने शिल्लक राहीलेली अखर्चित रक्कम नमुद केली आहे, ती खालीलप्रमाणे :-

आर्थिक वर्ष	मंजुर अंदाजपत्रकीय तरतुद रु.	प्रत्यक्ष खरेदी खर्च रु.	अखर्चित रक्कम रु.
२०१५-१६	५५,००,००,०००	१९,६८,००,०००	३५,३२,००,०००
२०१६-१७	६०,००,००,०००	१६,३७,००,०००	४३,६३,००,०००
२०१७-१८	५५,००,००,०००	१८,३२,००,०००	३६,६८,००,०००
२०१८-१९	६०,००,००,०००	२१,७५,००,०००	३८,२५,००,०००
२०१९-२०	५०,००,००,०००	२१,१५,००,०००	२८,८५,००,०००
२०२०-२१	४०,००,००,०००	५,४०,४७,०००	३४,५९,५३,०००
एकुण :-	३२०,००,००,०००	१०२,६७,४७,०००	२१७,३२,५३,०००

यावरुन संस्थान प्रशासन गोर-गरीब रुग्णांना जीवनरक्षक औषधांकरीता खर्च मंजुर करत आहे. तथापि, खरेदी व्यवस्थापकाच्या संशयीत कारभारामुळे गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होऊन त्यांना सदर सेवेपासून वंचित ठवले जात आहे, असे दिसते.

५) वार्षीक अंदाजपत्रकीय तरतुद असतांना व सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर यांची मागणी असतांना मागील ०६ वर्षांमध्ये साधारणतः रु.२१७ कोटी रक्कम अखर्चित राहीली आहे. रुग्णांना बाहेरील औषध दुकानांमधुन महागडया दराने औषधे खरेदी करावी लागली आहेत कारण मागणीपत्रांची औषध भांडार पुर्तताच करु शकलेले नाही.

६) संस्थानला आयकर कायद्यामध्ये शिल्लक अखर्चित रकमेवर आयकर आकारणीची तरतुद आहे. रुग्णांना औषधे व साहित्य या जीवनरक्षक बाबींची गरज असतांना औषध खरेदी झालेली नाही. त्यामुळे अखर्चित उत्पन्नाचा विनियोग झालेला नाही. इतर बाबींशी तुलना करता इतर खर्च जीवनरक्षक बाबीत येत नाही त्यामुळे इतर प्रशासकीय पुर्तता झाल्यानंतर खर्च केला जातो. तथापि, औषध खरेदीकरीता करण्यात आलेली खर्चाची तरतुद अकार्यक्षम खरेदी धोरणामुळे शिल्लक राहीली आहे.

७) वार्षीक खरेदी आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन खरेदी व्यवस्थापकाने औषधे, सर्जिकल साहित्य खरेदी करणे आवश्यक होते तथापि, खरेदी व्यवस्थापक यांनी त्याचे पालन केले नाही.

८) खरेदी विभागातील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, L1 (Lowest 1) यांना खरेदी आदेश देण्यात आले. त्यांनी पुरवठा वेळेत केला नाही. त्यामुळे L2 (Lowest 2) यांचेकडुन खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही कालावधीकरीता रुग्णालयातील रुग्णांना औषध साठा उपलब्ध झाला नाही. या कालावधीत रुग्णांची गैरसोय होऊन बाहेरील खाजगी औषध दुकानांमधुन महागडया दराने औषधे खरेदी करावी लागली.

आर्थिक वर्ष	L2 कडून खरेदी
२०१५-१६	८६,१८,४५१
२०१७-१८	६८,००,६५०
२०१८-१९	८१,६०,५५९

L1 ला पुरवठा आदेश देण्यात येऊन L2 कडून खरेदी करण्यात आली आहे. सदर बाब सातत्याने वर्षानुवर्षे केल्याचे निदर्शनास येते. यावरुन सर्रास अशाप्रकारे अनियमित काम झाले आहे. L1 ने पुरवठा केला नाही म्हणून त्यांचेवर शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही खरेदी नियमावलीप्रमाणे केलेली दिसत नाही.

९) सन २०१५ ते जुलै २०१८ पर्यंत खरेदी संदर्भात पुरवठादारांना देण्यात आलेले ई-मेल संगणक प्रणालीतून डीलिट करण्यात आलेले आहेत, याचा खुलासा व कारणीमीमांसा होत नाही. सदर ई-मेल हे खरेदी व्यवस्थापक यांनी दिलेले असूनही सदरचा मुलभूत डाटा मिळत नाही अथवा डीलीट होण्याची/करण्याची कारणीमीमांसा कळून येत नाही. त्याबाबतचा खुलासा त्यांनी केलेला नाही.

१०) औषध खरेदी प्रक्रिया ही नियमितपणे राबवून रुग्णालयाला आवश्यक औषधे खरेदी करण्याची जबाबदारी खरेदी व्यवस्थापकाची असते. तथापि, सदर प्रक्रिया जाणीवपूर्वक वर्षानुवर्षे रेंगाळत ठेवण्यात येऊन वर्षनिहाय खरेदी झालेली नाही. प्रशासकीय पुर्तता करुन खरेदी कार्यपद्धती राबविण्यात खरेदी व्यवस्थापक यांनी टाळाटाळ केल्याचे मागील वर्षांच्या निविदा कार्यपद्धतीवरुन दिसते.

११) निविदा कार्यपद्धती असूनही असे निदर्शनास येते की, काही ठराविक पुरवठाधारकच निविदा कार्यपद्धतीमध्ये भाग घेतात व वर्षानुवर्षे त्यांचेकडुन खरेदी झाल्याचे दिसुन येते. यावरुन औषध खरेदी बाबत खुल्या बाजारपेठेत सर्वांना आवाहन करुन जास्तीत जास्त पुरवठाधारकांना निविदा पद्धतीमध्ये भाग घेण्याकरीता प्रवृत्त केलेले नाही. वर्षानुवर्षे विशिष्ठ पुरवठाधारकच पुरवठा आदेश घेत असल्याचे दिसुन येते.

१२) निविदा कार्यपद्धती वेळेत न राबविणे, वरिष्ठांकडे वेळेत प्रस्ताव सादर न करणे त्यामुळे वर्षनिहाय निविदा कार्यपद्धती अवलंबलेली नाही, असे दिसते.

१३) डॉक्टरांनी पुढील वर्षाकरीता कळविलेल्या संभाव्य औषध मागणी व्यतिरिक्त औषधांची मागणी केल्यास सदर बाब वैद्यकीय संचालकांच्या निदर्शनास आणून देऊन त्यावर नियंत्रण ठेवणे व आवश्यकतेप्रमाणे वार्षीक अंदाजपत्रकीय तरतुद याचा वापर करणे आवश्यक होते. तथापि, खरेदी व्यवस्थापक यांनी त्यांच्या कर्तव्यात कसुर केला आहे.

१४) सन २०२०-२१ करीता देण्यात आलेल्या खरेदी आदेशांमध्ये एकुण १५८ L-1 पुरवठादारांना खरेदी आदेश देण्यात आले. तथापि, औषधांचा पुरवठा होत नसल्याने पुरवठादारांची आढावा बैठक घेतली.

त्यामध्ये असे निदर्शनास आले की, ९६३ औषधे/साहित्य आपण पहिल्या टप्प्यामध्ये मागविलेले नाही. औषध भांडारात सदर औषधांचा साठा तपासणी केली असता ७६६ औषधांचा शुन्य साठा असल्याचे निदर्शनास आले. खरेदी व्यवस्थापक यांचेमार्फत रुग्णालयात वार्षीक खरेदी कार्यपद्धती अवलंबण्यात आली होती. तथापि, औषधांचा साठा शिल्लक नसतांनासुद्धा खरेदी व्यवस्थापक यांनी पुरवठादारांकडुन पहिल्या टप्प्यात औषधे मागविलेली नाहीत.

१५) अशाप्रकारे मागील वर्षांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, वार्षीक खरेदी कार्यपद्धती अवलंबून देखील खरेदी आदेश देतांना मात्र खरेदी व्यवस्थापक साधारणतः एकुण ३१९० औषधे/साहित्य पहिल्या टप्प्यात मागविली नाहीत.

अ.नं.	आर्थिक वर्ष	एकुण पुरवठाधारक	खरेदीचे आदेशाचेवेळी आषध साठा निरंक नग संख्या
१	२०१५-१६	१३१ पुरवठाधारक	८४८ औषधांचा निरंक मागणी
२	२०१७-१८	१०२ पुरवठाधारक ५२८ कोटेशनधारक	१०९६ औषधांचा निरंक मागणी
३	२०१८-१९	२१० पुरवठाधारक	४८० औषधांचा निरंक मागणी
४	२०२०-२१	१५८ पुरवठाधारक	७६६ औषधांचा निरंक मागणी

अशाप्रकारे संस्थान प्रशासन रुग्णालयात गोर-गरीब रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता वार्षीक साधारणतः रु.५५ ते ६० कोटी रककम मंजुर करते. तथापि, खरेदी व्यवस्थापक यांचेकडून वार्षीक साधारणतः रु.२१ कोटीं पर्यंतच खरेदी केली जाते व कृत्रीम औषध टंचाई निर्माण केली गेली असे वॉर्ड, ओटी, इतर विभागांच्या मागणीपत्रांची औषध भांडाराकडून पुर्तता झाली नाही या आकडेवारीवरुन रुग्णालयाबाहेरील औषध दुकानांचा खप वाढविण्याच्या उद्देशाने औषध खरेदीचे कामकाज खरेदी विभागाकडून झाल्याची गंभीर बाब समोर आलेली आहे. औषधे/सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीबाबत अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाबाबत :-

अ) खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांची सखोल विभागीय चौकशी करणे.

ब) चौकशी कामकाजात खरेदी व्यवस्थापक यांचा दबाव खरेदी विभाग व भांडार विभागातील कर्मचारी/अधिकारी व संभाव्य साक्षीदार यांच्यावर दबाव येणार नाही यादृष्टीने विभागीय चौकशी कालावधीत त्यांना सेवा निलंबित करणे.

उपरोक्त "अ" व "ब" कार्यपद्धतीस अनुक्रमे मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने निर्णयार्थ सादर.

22/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ४५

मा तदर्थ (Ad-hoc) समितीसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय- बाह्ययंत्रणेद्वारे ठेकेदारामार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात कार्यरत बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत . . .

टिपणी -

संस्थान अधिनियम २००४-

१३(४) - समितीस, संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु, ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही.

शासननिर्णय-

शासननिर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा दि. ०७/०८/२००९

मा व्यवस्थापन समितीचा ठराव क्र -

१) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६७.

संस्थान रूग्णालयांमधील रूग्णसंख्या व डॉक्टरांची असलेली कमतरता या बाबींचा विचार करता, रूग्णालयांमधील डॉक्टरांची पदे कायमस्वरूपी भरेपर्यंत रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता सध्या संस्थानला कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, बीएएमएस डॉक्टरांची नेमणूक करणेस व त्यांना प्रत्येकी एकत्रित मासिक रू. १६,२००/- मात्र मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४११.

सध्या हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत नियुक्त केलेल्या BAMS डॉक्टरांना दरमहा रू.१६,२००/- मात्र इतके एकत्रित मानधन देण्यात येते. सदरचे देण्यात येणारे मानधन खुपच कमी आहे. असे सर्व समिती सदस्यांचे मत झाले.

मात्र BAMS डॉक्टर्सची पदे आकृतीबंधात मंजूर नाहीत. सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. मात्र त्यास मंजूरी मिळालेली नाही. मंजूरी मिळाल्यानंतर त्यांच्या वेतनवाढीबाबत निर्णय घेणे उचीत राहील. असे मुख्य कार्यकारी अधिकारी नमूद केले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, या सर्व BAMS डॉक्टरांना दि. ०१/०६/२०१८ पासून रू. ३५,०००/- मात्र मानधन लागु करावे, असे ठरले. हॉस्पिटलकडील BAMS डॉक्टरांना आकृतीबंधात मान्यता नसल्याने यासाठी शासनाची मान्यता घ्यावी, शासनाची मान्यता मिळाल्यानंतर BAMS डॉक्टरांना दि. ०१/०६/२०१८ पासून वाढीव मानधन देण्यात यावे असे ठरले.

३) मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४.

मा व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१०/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ५९४ नुसार महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी

सप्ताहीक सुट्टी (Paid Weekly off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly off) देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना-

वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस) यांची काल्पनिक पदे निर्माण करून दि.०१.०६.२०१८ पासून प्रति कर्मचारी मासिक एकत्रित मानधन रू.३५,०००/- देऊन त्यांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात बाह्ययंत्रणेद्वारे (outsoursing) घेण्यास मान्यता मिळणेविषयी वेळोवेळी मा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.१७/०७/२०१८, दि.०६/०८/२०१९, दि.०५/०३/२०२०, दि.०६/१०/२०२० व दि. ०३/१२/२०२० रोजी प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. त्यास अनुसरून विधी व न्याय विभागाकडून दि.१८/०३/२०१९, दि.०५/०८/२०१९, दि.०४/०९/२०१९, दि.०६/०२/२०२०, दि.१०/०९/२०२०, दि.०३/१२/२०२० व दि.२२/१२/२०२० रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे.

शासनाचे दि.१०/०९/२०२० रोजीचे पत्रास अनुसरून दि.०३/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविणेत आले आहे - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणेत आलेल्या कार्यगटाने सुधारित आकृतीबंध प्रारूप मसुदे श्री साईबाबा संस्थानकडे दि.१८ सप्टेंबर २०२० रोजी सादर केले असून सदरचे प्रारूप आकृतीबंधाबाबत विभागनिहाय आढावा घेतला असून, त्यानुसार सुधारीत प्रारूप आकृतीबंधाबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच सदरचे कार्यगटाने सादर केलेले विभागनिहाय व पदनिहाय सुधारित प्रारूप सेवाप्रवेश नियम मा तदर्थ समिती सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेत येत आहेत; सुधारित प्रारूप सेवाप्रवेश नियमांस मा तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर, त्यावर हरकती मागवून त्या निकाली काढलेनंतर, अंतिम सेवाप्रवेश नियम मा शासन मान्यतेसाठी पाठविणेत येणार आहे. तरी, संस्थानचे दोन्ही रूग्णालयात वैद्यकीय सेवाकरीता सदर वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) यांची आवश्यकता आहे. संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) यांना मा व्यवस्थापन समिती दि. ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४११ नुसार रू. ३५,०००/- मात्र मानधन लागु करणेस मान्यता मिळणेस विनंती. करणेत आली.

त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.२२/१२/२०२० रोजीचे पत्र मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. या संवर्गातील काल्पनिक पदे निर्माण करून दि.०१/०६/२०१८ पासून प्रति कर्मचारी मासिक एकत्रित मानधन रू. ३५,०००/- देऊन त्यांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंगने) घेण्याच्या योग्य तो प्रस्ताव तसेच सदर वैद्यकीय अधिका-यांची पदे व संस्थानाच्या विविध विभागातील आस्थापनेवरील पदांचा एकत्रित सर्वसमावेशक सुधारीत आकृतिबंध तयार करण्याचा योग्य तो प्रस्ताव मा उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र १२०/२०१९ मध्ये तसेच सिव्हील ॲप्लीकेशन क्र १३०२९/२०१९ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करून सादर करावा, ही विनंती.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक: मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/भाग-२/सेवा-३ दि. ०४ जुलै,२०१९ रोजीचे खालीलप्रमाणे शासन परीपत्रक पारीत करणेत आले आहे.

१. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध

होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारकांमधुन प्राधान्याने भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे, B.A.M.S. अर्हताधारकांमधुन त्या ठिकाणी नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे आगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत. सदर पदे वाचा येथिल क्र.२ नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती मार्फत भरण्यात यावीत.

२. उपरोक्त नमुद कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांपैकी आदिवासी व दुर्गम भागात काम करण्यास इच्छुक बी.ए.एम.एस (B.A.M.S.) अर्हताधारकांना दरमहा रू.४५,०००/- व इतर भागात काम करणा-या बी.ए.एम.एस. (B.A.M.S.)अर्हताधारकांना रू.४०,०००/- इतके एकत्रित मानधन देण्यात यावे.

३. सदर मानधनासाठी येणारा खर्च २२१००१४६(१०)कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. उपरोक्त कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दि.०२.०३.२०१५ व २१.०४.२०१५ मधील नमूद अटी व शर्ती लागु राहतील.

तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक राहाता यांनी दि.११/०४/२०२१ रोजीचे पत्रान्वये, कोरोना रूग्णाची वाढती संख्या विचारात घेता श्री साईबाबा रूग्णालय शिर्डी येथे सुसज्ज ७० खाटांचे अद्यावत Covid Hospital संपूर्ण मनुष्यबळ, वैद्यकीय सुविधेसह तात्काळ कार्यान्वीत करणेबाबत इकडील कार्यालयास कळविले असुन त्यानुसार श्री साईबाबा रूग्णालयात १४० खाटांची कोव्हीड हॉस्पिटल सुरू करणेत आले आहे. वैद्यकीय सुविधा सुरू करणेत आल्याने रूग्णांवर वेळेवर उपचार करणेकामी सध्या वैद्यकीय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६७ नुसार सध्या ठेकेदारास कामगार विभागामार्फत देणेत आलेल्या कार्यादेशात साईबाबा रूग्णालयास प्रति दिन २० बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी प्रति दिन रू.६२३.०७ वेतन दराने पुरविणेबाबत कळविणेत आलेले असुन सध्या ०७ बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी पुरविणेत येत आहेत. सदर वैद्यकीय अधिकारी यांना प्रतिमहा रू.१८,६९२ रूपये वेतन अदा करणेत येत आहे. सदर बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी हे श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर नेमणूक केलेली नसून ठेकेदाराच्या आस्थापनेवर आहेत.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील रिक्त जागा भरणेकामी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीत एम बी बी एस पात्रताधारक निवासी वैद्यकीय अधिकारी / आरएमओ व कॅज्युअल्टी मेडीकल ऑफीसर / सीएमओ या पदांचा समावेश असलेल्या जाहीरात दिनांक, पदसंख्या, नेमणूका व राजीनामे माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ. नं.	पदनाम	जाहीरात प्रसिध्द केलेली दिनांक	पदसंख्या	मुलाखत दिनांक	नेमणूक केलेली संख्या	कामावर हजर संख्या	राजीनामे / नोकरी सोडून गेलेले
१	सीएमओ	०४/०६/२०१७	५	२०/०६/२०१७	०	०	०
२	आरएमओ	०४/०६/२०१७	९	२०/०६/२०१७	९	७	५
३	सीएमओ	१५/०२/२०१८	८	१४/०८/२०१८	०	०	०
४	आरएमओ	१५/०२/२०१८	१३	१४/०८/२०१८	४	२	२
५	सीएमओ	०१/०१/२०१९	७	११/०१/२०१९	७	५	५
६	आरएमओ	०१/०१/२०१९	१५	११/०१/२०१९	१५	१२	१२
७	सीएमओ	२३/०७/२०१९	०६	०२/०८/२०१९	०	०	०

अ. नं.	पदनाम	जाहीरात प्रसिध्द केलेली दिनांक	पदसंख्या	मुलाखत दिनांक	नेमणूक केलेली संख्या	कामावर हजर संख्या	राजीनामे / नोकरी सोडून गेलेले
८	आरएमओ	२३/०७/२०१९	१०	०२/०८/२०१९	३	१	१
९	सीएमओ	२१/१०/२०२०	०८	१०/११/२०२०	०	०	०
१०	आरएमओ	२१/१०/२०२०	२४	१०/११/२०२०	७	४	२
११	सीएमओ	०६/०४/२०२१	०८	२७/०४/२०२१	१	१	०
१२	आरएमओ	०६/०४/२०२१	१६	२७/०४/२०२१	८	७	०
१३	सीएमओ	०१/०५/२०२१	०७	१५/०५/२०२१	०	०	०
१४	आरएमओ	०१/०५/२०२१	०८	१५/०५/२०२१	४	३	०

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाचे मंजुर आकृतीबंधानुसार एम बी बी एस पात्रताधारक आरएमओ / निवासी वैद्यकीय अधिकारी व सीएमओ / कॅज्युअल्टी मेडीकल ऑफीसर या पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

रूग्णालय	पदनाम	मंजुर पदसंख्या	भरलेली पदे			रिक्त पदसंख्या
			स्थायी	कंत्राटी	एकूण	
श्री साईबाबा	आरएमओ	४०	१८	०६	२४	१६
	सीएमओ	०६	००	००	००	०६
श्री साईनाथ	आरएमओ	१६	०८	०६	१४	०२
	सीएमओ	०६	०४	०१	०५	०१
एकूण		६८	३०	१३	४३	२५

एम बी बी एस पात्रताधारक वैद्यकीय अधिकारी रिक्त जागा भरणेकरीता वेळोवेळी जाहीरात प्रसिध्द करूनही रिक्त जागांवर आवश्यक एम बी बी एस पात्रताधारक आर एम ओ / सी एम ओ मिळालेले नाहीत.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

सध्या बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी ठेकेदारामार्फत पुरविणेत येत आहेत. सदर वैद्यकीय अधिकारी यांना प्रतिमहा रू.१८,६९२ रूपये वेतन अदा करणेत येत आहे. उपरोक्त महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे परिपत्रकाचे अनुषंगाने बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी यांना आठवडा सुट्ट्यांसह प्रतिमहा रू.३५,०००/- वेतन अदा करता येईल तसेच दि. ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४११ निरस्त करता येईल.

जसजसे एम बी बी एस पात्रताधारक वैद्यकीय अधिकारी प्राप्त होतील तसतसे बी ए एम एस वैद्यकीय अधिका-यांची सेवा संपुष्टात आणता येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ४६

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

विषय:- नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता Transport Ventilator खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

टिपणी,

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.११/०५/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८५ अन्वये नविन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता ०२ नग Transport Ventilator खरेदीकामी विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१९४७०९७/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन तांत्रिकदृष्टया मसुदा अंतिम करणेकामी बनविण्यात आलेल्या तज्ञ समितीकडून दि.१२/१०/२०२० रोजी उपरोक्त खरेदीकामीचा मसुदा तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी सुचविलेल्या आवश्यक त्या बदलानुसार दुरुस्ती करुन अंतिम करण्यात येऊन दि.२९/१०/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये मशिनरी, हत्यारे, उपकरणे व सर्जिकल साहित्य इ. खरेदीकामीच्या ऑनलाईन ई-निविदा मागविणेकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.०५/१२/२०२० ते दि.२१/१२/२०२० या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. तसेच निविदाधारकांच्या शंका निरसन करण्यासाठी दि.०८/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षामध्ये मा.मुख्यलेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षिका यांचे उपस्थितीत Pre-bid मिटींग आयोजित करण्यात आली होती. सदरचे Pre-bid मिटींगमध्ये निविदांधारकांनी उपस्थित केलेल्या शंका व त्यानुसार करण्यात आलेल्या शंकाचे निरसन बायोमेडीकल विभागामार्फत करण्यात आलेले होते. निविदाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन करुन तयार केलेली Amendment शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येऊन सदरहू ई-निविदेस पुढील पाच दिवस दि.२६/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. तसेच दि.२६/१२-२०२० रोजीचे मंजूर टिपणीन्वये दि.०२.०१.२०२०१ पर्यंत पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आलेली होती.त्यानंतर दि.०४/०१/२०२१ चे मंजूर टिपणीन्वये दि.०९/०१/२०२१ पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार प्राप्त ऑनलाईन ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

S.N.	Name of Tender	Tender ID_No.	No.of Received Tender
1	Tender E – Transport Ventilator New Cardiac Ambulance of Shri Saibaba Hospital, Shirdi.	2020_SAI_625087_1	२

उपरोक्त तक्त्यातील Transport Ventilator खरेदीकामी तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झालेल्या आहेत, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ०२ कार्डीयाक रुग्णवाहिका असून त्यापैकी एका कार्डीयाक रुग्णवाहिकेचे Transport Ventilator खराब झालेले आहे त्यामुळे कार्डीयाक रुग्णवाहिकेसाठी Transport Ventilator ची गरज आहे. तथापी शासन निर्णय क्र.४४३१ – "कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमूद करेल.

पान नं.२/-

अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल" अन्वये उपरोक्त खरेदीकामी प्राप्त तांत्रिक बाबींच्या ई- निविदा उघडून खरेदीची कार्यवाही करता येईल.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

Sr. No.	Name of Supplier
1	M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar
2	M/s. R.S. Enterprises, Pune

यानुसार वरीलप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकुण ०२ तांत्रिक ई-निविदा दि.२३/०२/२०२१ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आला असून तो बायोमेडीकल विभाग यांचे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यानूसार बायोमेडीकल विभागाकडून दि.०४/०३/२०२१ रोजी तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी दोन्ही निविदाधारकांनी दिलेले Technical Specification हे आपण मागणी केलेल्या Technical Specification प्रमाणे आहे. त्यामुळे दोन्ही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असलेबाबत बायोमेडिकल विभागाने कळविले होते.

वरीलप्रमाणे उपरोक्त खरेदीकामी तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या ०२ निविदाधारकांच्या कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.३१/०३/२०२१ रोजीचे मा.खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

१) तांत्रिकदृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशील :-

Sr. No	Description of Work / Item(s)	No. of Qty	Units	R S Enterprises		Gandhi Enterprises	
				Rate	Amount	Rate	Amount
1.00	Transport Ventilator with 1 Year Warranty for New Cardiac Ambulance	2.00	Nos.	880000.00	1760000.00	805000.00	1610000.00
1.01	Accessories						
1.02	Breathing hose set with expiratory valve & flow sensor.	2.00	Nos.	0.00	0.00	0.00	0.00
1.03	AC-DC Adaptor	2.00	Nos.	0.00	0.00	0.00	0.00
1.04	Oxygen high pressure hose	2.00	Nos.	0.00	0.00	0.00	0.00
1.05	Test Lung	2.00	Nos.	0.00	0.00	0.00	0.00
1.06	NIV mask for Adult & Paediatric Use	4.00	Each 2	0.00	0.00	0.00	0.00
Total Amt. in Rs – (Transport Ventilator with all Accessories)					1760000.00		1610000.00
1.07	LAMC Cost- LAMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years.						
1.08	LAMC Cost For 2th Year	2.00	Nos.	10000.00	20000.00	18880.00	37760.00
1.09	LAMC Cost For 3th Year	2.00	Nos.	10000.00	20000.00	19825.00	39650.00
1.10	LAMC Cost For 4th Year	2.00	Nos.	10000.00	20000.00	20815.00	41630.00
1.11	LAMC Cost For 5th Year	2.00	Nos.	10000.00	20000.00	21855.00	43710.00
1.12	LAMC Cost For 6th Year	2.00	Nos.	10000.00	20000.00	22950.00	45900.00
Total Amt. in Rs. (LAMC Cost)					100000.00		208650.00
Total Amt. in Rs. (Transport Ventilator with all Accessories + ५ year LAMC Cost)					1860000.00		1818650.00

पान नं.३/-

२) निम्नत्तम निविदाधारकांचा तपशील :-

Sr. No	Description of Work / Item(s)	No. of Qty.	Units	Gandhi Enterprises	
				Rate	Amount
1.00	Transport Ventilator with 1 Year Warranty for New Cardiac Ambulance	2.00	Nos.	805000.00	1610000.00
1.01	Accessories				
1.02	Breathing hose set with expiratory valve & flow sensor.	2.00	Nos.	0.00	0.00
1.03	AC-DC Adaptor	2.00	Nos.	0.00	0.00
1.04	Oxygen high pressure hose	2.00	Nos.	0.00	0.00
1.05	Test Lung	2.00	Nos.	0.00	0.00
1.06	NIV mask for Adult & Paediatric Use	4.00	Each 2	0.00	0.00
	Total Amt. in Rs – (Transport Ventilator with all Accessories)				1610000.00
1.07	LAMC Cost- LAMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years.				
1.08	LAMC Cost For 2th Year	2.00	Nos.	18880.00	37760.00
1.09	LAMC Cost For 3th Year	2.00	Nos.	19825.00	39650.00
1.10	LAMC Cost For 4th Year	2.00	Nos.	20815.00	41630.00
1.11	LAMC Cost For 5th Year	2.00	Nos.	21855.00	43710.00
1.12	LAMC Cost For 6th Year	2.00	Nos.	22950.00	45900.00
	Total Amt. in Rs. (LAMC Cost)				208650.00
	Total Amt. in Rs. (Transport Ventilator with all Accessories + ५ year LAMC Cost)				1818650.00
	दि.०२/०४/२०२१ रोजीचे ई मेल पत्रान्वये LAMC चे दरात प्रतिवर्षी रक्कम रु.४००/- इतकी सूट दिलेली आहे त्यानूसार आलेले LAMC चे अंतिम दर				206650.00
	सूटी नंतर आलेले अंतिम दर (Transport Ventilator with all Accessories + ५ year LAMC Cost)				1816650.00

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांचे Transport Ventilator with all Accessories करीता निम्नतम दर प्रति नग रक्कम रू.८,०५,०००/- याप्रमाणे ०२ नगाकरीता रक्कम रू.१६,१०,०००/- इतके दर प्राप्त झालेले आहेत तर त्यांनी वॉरंटी संपल्यानंतर पुढील पाच वर्षाकरीता LAMC रक्कम रू.२,०८,६५०/- इतकी देऊ केलेली आहे. म्हणजेच ०२ नग Transport Ventilator with all Accessories व पुढील ५ वर्षाकरीता LAMC ची रक्कम असे एकुण रक्कम रू.१८,१८,६५०/- इतका खर्च येणार आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ०२ कार्डीयाक रुग्णवाहिका असून त्यापैकी एका कार्डीयाक रुग्णवाहिकेचे Transport Ventilator खराब झालेले आहे त्यामुळे लवकरात लवकर कार्डीयाक रुग्णवाहिकेसाठी Transport Ventilator खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांना दूरध्वनीवरुन त्यांनी देऊ केलेल्या दरात अजून सूट मिळणेकामी विचारणा केली असता त्यानी दि.०२/०४/२०२१ रोजीचे ई मेल पत्रान्वये "no further discount is possible in ventilator. The prices are already gone up due covid. Still we reduce Rs. 400 per year in labour AMC charges." असे कळविलेले आहे. त्यामुळे त्यांचे पुढील पाच वर्षाकरीता LAMC रक्कम रू.२,०६,६५०/- इतकी देऊ केलेली आहे. त्यामुळे ०२ नग Transport Ventilator with all Accessories व पुढील ५ वर्षाकरीता LAMC ची रक्कम असे एकुण रक्कम रू.१८,१६,६५०/- इतका खर्च येणार आहे व

प्राप्त झालेले निम्नतम दर हे आपण घेतलेल्या अंदाजे खर्चापेक्षा जरी कमी प्राप्त झालेले असले तरी सदरहू मटेरिअलचे Specification आपल्या मागणीप्रमाणे असलेबाबत बायोमेडीकल विभागामार्फत खात्री करणेत आलेली आहे.

आपल्याकडे असलेले ०२ Transport Ventilator पैकी ०१ नग Transport Ventilator वापरुन खराब झाल्यामुळे ते Scrap करण्यात आलेले आहे. तसेच उर्वरित ०१ नग Transport Ventilator खराब झाल्यामुळे ते दुरुस्तीकरता कंपनीला पाठविले आहे. सदर Transport Ventilator दुरुस्त होऊन आल्यावर एका रुग्णवाहिकेमध्ये बसविण्यात येईल. परंतु नवीन ०२ नग Transport Ventilator खरेदी केल्यास दोन्ही रुग्णवाहिकेत बसविण्यात येईल व जुना ०१ नग Transport Ventilator Standby ठेवता येईल, असे मत आहे.

तरी कार्डीयाक रुग्णवाहीका करीता नविन ०२ नग Transport Ventilator with all Accessories खरेदीकामी M/s.Gandhi Enterprises, Ahmednagar यांनी देऊ केलेले अंतिम निम्नतम दर रक्कम रु.१८,१६,६५०/- मात्र स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देणेस तसेच सदरहूकामी राबविणेत आलेल्या खरेदीचे कार्यवाहीस मंजुरी मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर.

9/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

26/06/21

SSH-Meeting-295-2021

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर

(प्रकाशने विभाग)

विषय – संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि. ०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.. ..

टिपणी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूद -

या अधिनियमातील कलम क्रमांक १७ (२)(ठ) मध्ये, *" श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"* अशी तरतूद आहे.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन, संस्थान व्यवस्थापनामार्फत दरवर्षी संस्थानकडून साईभक्तांना पुरविणेत येणा-या सोयी-सुविधा, वर्षभरात साई मंदिरात साजरे करणेत येणारे उत्सव, रथ-पालखी व इतर दैनंदिन कार्यक्रम या विषयाची सर्व माहितीने परिपूर्ण अशी श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका छपाई करुन, साई भक्तांना वाजवी व माफक दरात सशुल्क विक्री करणेत येतात. दरवर्षी अशा प्रसिध्द करणेत येणा-या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांना साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळतो.

(अ) विषयाची पूर्वपीठीका व सद्य:स्थिती –

(०१) प्रकाशने विभागाकडील दिनांक २५ मार्च, २०२१ व दिनांक १३ मे, २०२१ रोजीचे मंजूर टिपणीनुसार, विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे विचारार्थ चक्रीय पध्दतीने दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी सादर करणेत आलेला होता. तथापि, त्यावर मा. तदर्थ समितीने, विषयांकित प्रस्ताव नियमित बैठकीपुढे सादर करावा, असा निर्णय दिलेला होता.

(०२) त्यानुसार विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे नियमित सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता. विषयांकित प्रस्तावावर मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेत साधकबाधक चर्चा होऊन, निर्णय क्रमांक ९८ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे -

".. .. यावर सविस्तर चर्चा केली, ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यांत आली. श्री साई दैनंदिनी छपाई करण्यापुर्वी त्याचा मसुदा मंजूरीसाठी समिती समोर आणावा. "

(०३) सन २०२२ करीता श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या श्री साईबाबा दिनदर्शिका छपाई करुन भक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेपुढील विषयांकित प्रस्तावानुसार, खालील तक्ता क्रमांक ०१ मधील रकाना क्रमांक ६ ते ८ मध्ये नमूद केलेप्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई संख्येस व त्याकामी येणारे अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

तक्ता क्रमांक ०१

अ. क्र.	उप क्रमांक	तपशील	सन २०२१ छपाई संख्या	सन २०२१ मंजूर छपाई दर / प्रती नग	सन २०२२ करीता प्रस्तावित छपाई संख्या	सन २०२२ करीता अंदाजित छपाई दर / प्रती नग	सन २०२२ अंदाजित छपाई खर्च रक्कम रुपये
१	२	३	४	५	६	७	८
०१	--	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)					
	०१	दैनंदिनी – मराठी	१,००,०००	५७.००	१,००,०००	७४.००	७४,००,०००/-
	०२	दैनंदिनी – हिंदी	०,१५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०३	दैनंदिनी – इंग्रजी	०,१०,०००	५७.००	०,२५,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०४	दैनंदिनी – तेलगू	०,२५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२९,६०,०००/-
		अ.क्र. ०१ करीता एकूण	१,५०,०००	--	२,२५,०००	--	--
०२	--	श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज	छपाई नाही	२३.४०	०,५०,०००	३१.००	१५,५०,०००/-
०३	--	श्री साई दिनदर्शिका (०१ पानी / मोठे)	५०,०००	१४.५०	२,००,०००	१९.००	३८,००,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कलेंडर (८ पेजेस)	छपाई नाही	१४२.००	१०,०००	१८५.००	१८,५०,०००/-
०५	--	श्री साईबाबा मेटपेट वॉल कलेंडर (७ पेजेस)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	२२४.००	२२,४०,०००/-
०६	--	श्री साईबाबा थ्री डी वॉल कलेंडर (०१ पानी)			३,०००	२३०.००	६,९०,०००/-
०७	--	श्री साईबाबा थ्री डी डेस्क कॅलेंडर (०७ पानी)	छपाई नाही	११०.००	१०,०००	१४३.००	१४,३०,०००/-
०८	--	श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर (१४ पानी)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	७०.००	७,००,०००/-
०९	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (कार्यालय / ०६ पानी)	छपाई नाही	२१.५०	१०,०००	२८.००	२,८०,०००/-
१०	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती / ०६ पानी)	छपाई नाही	११.००	१०,०००	१५.००	१,५०,०००/-
११	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स (०७ पानी)	छपाई नाही	९.१५	१५,०००	१२.००	१,८०,०००/-
						एकूण रक्कम रुपये -	२,९५,२०,०००/-

पान २ वर .. .. कृ.मा.प. ...

(०४) मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९८ नुसार, सन २०२२ करीता छपाई करावयाचे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामासाठी प्रसिध्द करावयाचे ई-निविदेचा मसुदा दिनांक ०९ ऑगष्ट, २०२१ रोजी निविदा दस्तऐवज तपासणी समितीकडून तपासणी करुन खालील निर्देशांसह मान्यता मिळालेली आहे –

"... १) खरेदी नियमावली दि.०१.१२.२०१६ नुसार निविदा शुल्क रू.१५,०००/- असावे.

२) वार्षिक उलाढाल - मागील ३ आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल किमान रू. ३ कोटी असावी.

३) सादर करावयाचे दर हे सर्व करांसहित व शिर्डी पोहोचचे असावेत. पुरवठा आदेश दिल्यानंतर निविदेमध्ये / पुरवठा आदेशात नमूद दरामध्ये ज्या करांचार समावेश असेल त्यांचे दरामध्ये शासनाने काही बदल (कमी-जास्त) केल्यास त्यानुसार पुरवठा आदेशातील दरामध्ये बदल करण्यात येईल. सदर बदल हा शासनाचे नोटिफिकेशन ज्या दिनांकाला निर्गमित होईल त्या दिनांकापासून पुढील कामासाठी लागु राहिल."

उपरोक्त निर्देशांनुसार, ई-निविदेच्या मसुद्यात उचित बदल करणेत आलेला असून, अंतिम ई-निविदा मसुदा मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे.

(०५) तसेच, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील मूळ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, विषयांकित प्रस्तावास व मा. तदर्थ समितीचे निर्णयास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी दिवाणी अर्ज (Civil Application) दाखल करणेबाबत विधी विभागास दिनांक २३ ऑगष्ट, २०२१ रोजी पत्र देणेत आलेले असून, दिवाणी अर्ज दाखल करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

(ब) विभागाचा अभिप्राय –

(०१) सन २०२१ मध्ये मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस मान्यतेस्तव दिवाणी अर्ज दिनांक ०९ जुलै, २०२० रोजी दाखल करणेत आलेला होता. तथापि, तथापि, माहे मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने, संस्थानमार्फत दाखल करणेत आलेला दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० यावर मा. न्यायालयात सुनावणी होऊ शकली नाही व त्याबाबत आदेश प्राप्त झाले नाहीत.

(०२) दरम्यानचे कालावधीत, संस्थान प्रशासनामार्फत सन २०२१ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेसाठी माहे डिसेंबर, २०२० / माहे जानेवारी, २०२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून ई-निविदा मागणी करणेत आली.

(०३) सन २०२१ – दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मागणी करणेत आलेल्या ई-निविदांच्या तांत्रिक व व्यावसायिक निविदा संस्थानचे प्रशासकीय स्तरावरील खरेदी समितीपुढे अनुक्रमे दिनांक १२/०१/२०२१ व दिनांक १४/०१/२०२१ रोजी उघडणेत आल्या. सदर ई-निविदांचा अहवाल मा. तदर्थ समितीचे समक्ष दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेत आला असतां, त्यावर मा. तदर्थ समितीने *" मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे."* असा निर्णय पारित केला.

(०४) सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामी मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी घेतलेल्या सुधारित निर्णयावर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समक्ष मूळ दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० वर सुनावणी होऊन, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी मान्यता दिली.

(०५) या सर्व प्रक्रियेत बराचसा किंबहुना खूपच मोठा कालावधी व्यतित झाल्याने, परिणामी सन २०२१ करीता प्रशासकीय स्तरावरील मंजूर टिपणी दिनांक २२ जानेवारी, २०२१ व दिनांक २६ जानेवारी, २०२१ अन्वये एकूण ०८ प्रकारचे प्रकाशनापैकी फक्त श्री साई दैनंदिनी – २०२१ (छपाई संख्या - १५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका – मोठी १ पानी (छपाई संख्या – ५०००० प्रती) याकरीता अनुक्रमे दिनांक २३ जानेवारी, २०२१ / ०१ एप्रिल, २०२१ व दिनांक ०२ मार्च, २०२१ रोजी कार्यादेश देणेत आले. या कार्यादेशानुसार माहे मार्च / एप्रिल, २०२१ अखेर छपाई पूर्ण होऊन, दैनंदिनी व दिनदर्शिका साईभक्तांसाठी वाजवी किंमतीत सशुल्क उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

(०६) परंतु, माहे एप्रिल, २०२१ मध्ये पुनःश्च कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने, मा. शासनाने घातलेल्या टाळेबंदी सदृश्य कडक निर्बंधामुळे दर्शन व इतर व्यवस्था ठप्प झाल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका विक्रीत मोठ्या प्रमाणावर घट झाली. त्यामुळे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०६ ऑगष्ट, २०२१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सदरहू दैनंदिनी रुपये २५/- मात्र प्रती नग या नाममात्र दराने विक्री सुरु करणेत आलेली आहे. आजरोजी दैनंदिनी विक्रीत अल्पशी वाढ दिसत असली तरी, परंतु अद्यापपावेतो यास पाहिजे तसा प्रतिसाद मिळालेला नाही.

(०७) आता विषयांकित प्रस्तावास अनुसरुन, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, परिच्छेद अ मधील श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका - २०२२ चे छपाईकामी, तक्ता क्रमांक ०१ मध्ये नमूद केलेनुसार प्रस्तावित केलेल्या संख्येप्रमाणे छपाई करणेस मान्यता मिळालेली आहे.

पान ३ वर ....

(०८) संस्थानमार्फत दरवर्षी दैनंदिनी व दिनदर्शिका भक्तांना सशुल्क उपलब्ध करुन दिल्या जातात, याबाबतचा पूर्वीचा अनुभव पाहतां, माहे ऑक्टोबर (दसरा, दिवाळी व नाताळ, नववर्ष दिना ईत्यादीचासलग सुट्टयांचा कालावधी) ते माहे जानेवारी या कालावधीत नवीन वर्षानिमित्त भक्तांचा दैनंदिनी व दिनदर्शिका खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळून, त्याची विक्री मोठया प्रमाणावर होत असते. परंतु, सदर गर्दीचा कालावधी उलटून गेल्यास आणि दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करणेस खूपच उशीर झाल्यास, त्याच्या विक्रीवर निश्चितच परिणाम होतो.

(०९) या सर्व बाबींचा विचार करुन, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे निर्णयानुसार, सन २०२२ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका वेळेत उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळेपावेतो, मा.न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून, विषयांकित दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामी कालापव्यय होऊ नये म्हणून प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल तसेच उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मधील छपाई करावयाच्या दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबत मा. उच्च न्यायालय ज्या पध्दतीने मान्यता देईल, त्यानुसार विषयांकित साहित्यांची छपाई करणेसाठी कार्यादेश देता येईल आणि याबाबत प्रसिध्द करावयाचे निविदेतील अटी-शर्ती मध्ये याबाबीचा सविस्तररित्या समावेश करता येईल. तसेच वर नमूद केलेल्या साहित्यांचा अंतिम छपाई कार्यादेश पारित करणेपूर्वी, कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाविषयी त्या-त्या वेळेची वस्तु:स्थिती लक्षांत घेऊन, परिस्थितीनुरुप विषयांकित साहित्य छपाई करणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेता येईल.

(क) विभागाचा प्रस्ताव -

उपरोक्त परिच्छेद अ व परिच्छेद ब मध्ये नमूद केलेल्या सविस्तर विवेचनास अनुसरुन तसेच मा. तदर्थ समितीने दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने दिलेल्या निर्णयानुसार / निर्देशानुसार, विषयांकित **दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी अर्ज** (Civil Application) **दाखल करणेची कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु करणेत आलेली आहे. त्यानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशास / निर्णयास अधिन राहून, प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया प्रशासकीय स्तरावर सुरु करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समक्ष निर्णयास्तव सादर.**

भाग्यश्री बोनायत (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
6/9/21

विषय क्र.- ४८

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय.
(संरक्षण विभाग)

विषय :- पोलीस निरीक्षक, साई मंदिर शिर्डी यांचे दि.०१/०९/२०२१ च्या चौकशी अहवालाचे वाचन करणे, अहवालानुसार निष्पन्न झालेले संस्थानचे कर्मचारी १) श्री राजेंद्र जगताप, प्रभारी प्रशासकीय विभाग प्रमुख, २) श्री अजित जगताप, ३) श्री सचिन गव्हाणे, ४) श्री राहुल फुंदे, ५) श्री विनोद कोते, (सी.सी.टी.व्ही. विभाग प्रमुख) व ६) श्री चेतक साबळे यांनी व्हिडीओ व फोटो संस्थानचे बाहेर पत्रकारांना पाठवले, तसेच श्री साईबाबा समाधी मंदिर सुरक्षेस वरील संस्थान कर्मचारी यांचेपासून धोका होऊ शकतो असा अहवाल आहे, या विषयी सविस्तर चर्चा करुन पुढील निर्णय घेणेबाबत...

टिपणी.

मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्या, तदर्थ समिती यांनी दि.३१/०७/२०२१ तदर्थ समितीची बैठक संपलेनंतर समितीपुढील विषय सुचीतील विषय क्र.२७ व ६७ चे अनुषंगाने प्रत्यक्ष पाहणी करण्याकरीता गेले असता त्यांचा सदरहू मंदीर प्रवेश हा कोविड नियमाचे उल्लंघन असल्याबाबत प्रसार माध्यमांमध्ये बातमी प्रसारीत झालेली होती.

सदर प्रकरणी मा.जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांनी दि.०९/०८/२०२१ चे पत्राने श्री ए.बी. परदेशी, पोलीस उपनिरीक्षक, तथा संरक्षण अधिकारी यांना चौकशीचे आदेश दिलेले होते. तथापी श्री परदेशी यांनी दि.२०/०८/२०२१ रोजी उच्च रक्तदाबाचा व मधुमेहाचा त्रास असल्याने आमची तब्येत साथ देत नसल्याने सदरची चौकशी ही दुसरे अधिकारी यांचेकडे चौकशीकामी वर्ग होणेस विनंती आहे, असे लेखी पत्राने कळविल्याने मा.अध्यक्ष साहेब, तथा जिल्हा प्रधान न्यायाधिश, अहमदनगर यांनी सदरचा अर्ज चौकशीकामी पोलीस निरीक्षक, साई मंदीर सुरक्षा यांचेकडे वर्ग करण्यात आला होता.

सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्याचा आदेश दिल्यानंतर त्या कामकाजात उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रविंद्र ठाकरे यांनी सदरहू पोलीस अधिकारी यांना बोलावण्याचे पत्र देवून हस्तक्षेप केला किंवा नाही. याबाबत श्री ए.बी. परदेशी यांचा अहवाल प्राप्त असुन सोबत अवलोकनार्थ सादर केला आहे.

तसेच श्री हर्षवर्धन गवळी, पोलीस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी यांनी वरील प्रकरणी चौकशी करुन जा.क्र.६७७/२०२१ दि.०१/०९/२०२१ चे पत्राने चौकषीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला असुन सदरचा चौकशी अहवाल वाचन करुन निर्णय होणेकामी सोबत जोडला आहे.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ४९

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा)

विषय - श्री. राजेंद्र सोपानराव जगताप, तत्कालीन (विद्युत पर्यवेक्षक), प्र.पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे मा.न्यायालयातील प्रलंबीत कोर्ट केसबाबत...

टिपणी

विषयाची पूर्वपीठीका –

अ) श्री.जगताप यांचेकडे मंदिर विभागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला होता. दि.२०.११.२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे आयत्या वेळेचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.सदरचे प्रस्तावात श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, (विद्युत पर्यवेक्षक), प्र.पाणी पुरवठा विभाग प्रमुख (अतिरिक्त कार्यभार प्र.अधिक्षक, मंदिर विभाग) यांचे विरोधात शिर्डी पोलीस स्टेशनला दाखल झालेला प्रथम माहिती अहवाल व निवेदनांबाबत असे नमुद आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.७१४ अन्वये ,"श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, विद्युत पर्यवेक्षक,(प्र.पाणी पुरवठा विभाग प्रमुख) यांचेकडून दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ पासून मंदिर विभागाचा कार्यभार काढून घेणेत आलेला आहे. त्यांचेवर दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाचा तपास शिर्डी पोलीस स्टेशनमार्फत चालू असुन सदर गुन्हयाचा निकाल संस्थानला प्राप्त झाल्यानंतर तो व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा व त्यानंतर प्रसुतुत प्रकरणी पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

तसेच श्रींचे मंदिरात व द्वारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणा-या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करावी, असे ठरले. तसेच पुढील पालखीचे दरम्यान होणा-या गर्दीचे वेळी सुरक्षा व्यवस्था चोख ठेऊन कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी," असे ठरले आहे.

ब) श्री.जगताप यांचे विरुध्द १) सेशन केस नं.३१/२०२१ कोपरगांव येथील सत्र न्यायालयात दाखल केलेली केस, २) शिर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा रजिष्टर नं.२४९ सन २०१८ बाबत.

श्री.जगताप यांचेबाबत मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे जा.नं. आस्था/३५०/२०२१, जिल्हा न्यायालय, अहमदनगर, दिनांक – ०७ सप्टेंबर, २०२१ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास पाठविणेत आलेले आहे. सदरचे पत्रातील मुद्दा क्रं. (२) मध्ये ," श्री राजेंद्र सोपान जगताप, प्रभारी प्रशासकीय अधिकारी यांचे विरुध्द सेशन केस नं.३१/२०२१ कोपरगांव येथील सत्र न्यायालयात दाखल आहे. तसेच शिर्डी पोलिस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नं.२४९ सन २०१८ चा भा.दं.वि. कलम ३५४,३२३,५०४, ५०६ प्रमाणे दाखल आहे. अशा पार्श्वभूमीवर संस्थानला भेट देणा-या मान्यवरांचे विशेषतः मा.उच्च न्यायालयाचे व मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचे सत्कार त्यांचे हस्ते केले जातात व फोटो काढले जातात ही गंभीर बाब आहे व सर्वथा राजशिष्टाचाराच्या प्रचलित नियमांचे विरुध्द आहे.याबाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे. " असे नमुद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत-

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.११.२०१८ अन्वये निर्णय क्रं.७१४ नुसार पारीत झालेला असुन, श्री.जगताप यांचेबाबत मा.न्यायालयात कोर्ट केस प्रलंबीत आहे. मा.न्यायालयाचे निकालानंतर पुढील कार्यवाही करता येईल. असे ठरले आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-मुकाअस्वीय/२४९२/२०१८ दि.१७.११.२०१८ रोजीचे आदेशान्वये त्यांचेकडील प्र.अधिक्षक, मंदिर विभागाचा अतिरिक्त कार्यभार काढुन घेण्यात आलेला असुन, त्या ठिकाणी श्री.रमेश नारायण चौधरी, प्र.अधिक्षक यांचेकडे मंदिर विभागाचा कार्यभार सोपविणेत आलेला आहे.

तसेच जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/५३१/२०२१ दि.२२.०६.२०२१ रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये श्री.राजेंद्र सोपानराव जगताप यांचेकडे संस्थानचे प्र.प्रशासकिय अधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

तरी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष महोदय, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे दि.०७.०९.२०२१ रोजीचे पत्राबाबत प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसभेसमोर निर्णयार्थ सादर.

(भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

RAB - Meeting 352 - 2021

विषय क्र.- ५०

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ

बांधकाम विभाग

विषय – श्री साईबाबा समाधी मंदिरासमोरील भूमिगत कॅश काऊंटींग हॉलचे जिन्यावरील काही भागात स्लॅब टाकणे हे काम मा.तदर्थ समितीचे पूर्व परवानगी शिवाय वास्तुमधील संरचनात्मक बदल केल्या संबधीचे असल्याने त्यावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबत..

टिपणी :-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

१. अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

२. अधिनियमाचे कलम १४ पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागविण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे अधिकारी असतील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - दि.२२/०७/२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.नितीन देसाई व प्र.उप कार्यकारी अभियंता यांनी समाधी मंदिरातील दर्शन रांगेची पहाणी केली. सदरहू पहाणी दरम्यान समाधी मंदिरात दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची रांग अंडरपासमधून जिन्याने व रआल्यानंतर प्रथम व्दारकामाई मंदिरात दर्शन घेऊन श्रींचे समाधीचे दर्शन घेतात. व्दारकामाईकडे जाणा-या दर्शनरांगेसाठी काऊंटींग हॉलचे जिन्याचे डक्टमुळे अडचण येते करीता कॅश काऊंटींग जिन्याचे डक्टवर आरसीसी स्लॅब करणेबाबत चर्चा झाली व त्यानुसार कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले. याबाबत आर्किटेक्ट माथूर ॲन्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांचेकडून दि.२६/०७/२०२१ रोजीचे ई-मेलव्दारे डिझाईन व स्ट्रक्चरल ड्रॉईंग मागविणेत आले होते. तसेच याबाबत अभिप्राय घेणेत आलेला असून त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. In Sai Mandir, the staircase ST1 in going down from the ground floor gate to the counting hall in the basement. We observed that staircase has a lot of head clearance while going down, as the space above was left vacant in the original design to suit movement of large number of devotees for pooja in the abihishek hall, housed in the basement at that time. This also caused a cut in the floor space of the Darshan hall above.

Now the use of the basement has changed to Counting hall which means only limited number of official people would be using the staircase. Therefore the need for having a taller staircase has vanished and the same space can be added to the Darshan hall area above by putting a slab across. This will not only, not curtail the movement to the basement through the staircase but also enhance the Darshan hall space above.

Therefore we recommend construction of this slab.

त्यानुसार याकामी २.५२ मी.x २.७७ मी. x ०.१५ मी. या साईजचा स्लॅब टाकणेचे नियोजित होते. जिन्यावर आर.सी.सी. स्लॅबचे छत व फ्लोरींगसाठी मार्बल बसविणेसाठी एकूण रक्कम रु.१,०२,३७७/- मात्र खर्च अपेक्षित होता. यामध्ये जिन्यावर आर.सी.सी स्लॅबचे छत टाकणेचे रु.७९,२४९/-चे काम श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा.लि. यांनी देणगीदाखल करुन घेणेकामी व फ्लोरींगसाठी मार्बल बसविण्याचे रु.२३,१२८/- मात्र रकमेचे काम जय भवानी ग्रेनाईट ॲन्ड टाईल्स, साकुरी प्रो.प्रा. श्रीपतसिंग जाट यांनी देणगीदाखल करणेकामी इकडील दि.२३/०७/२०२१ रोजीचे टिपणी अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणेत आलेली आहे.

समाधी मंदिरात दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची रांग अंडरपासमधून जिन्याने वर आल्यानंतर प्रथम व्दारकामाई मंदिरात दर्शन घेऊन श्रींचे समाधीचे दर्शनासाठी जाते. व्दारकामाईकडे जाणा-या दर्शनरांगेसाठी काऊंटींग हॉलचे जिन्याचे डक्टमुळे अडचण येत होती तसेच दर्शनरांगेतून लहान मुले डक्टमध्ये डोकावतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समाधी मंदिरातील तळघरातील कॅश काऊंटींग हॉलचे पूर्व बाजूकडील जिन्याचे डक्टवर आर.सी.सी स्लॅब टाकण्याची आवश्यकता असल्याने सदर काम लॉकडाऊन काळात समाधी मंदिर दर्शनासाठी बद असल्याचे कालावधीत देणगीदाखल करुन घेणेत आलेले आहे.

मा.अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.१४/०९/२०२१ रोजीचे पत्रान्वये, श्री साईबाबा समाधी मंदिरासमोरील भूमिगत कॅश काऊंटींग हॉलचे जिन्यावरील काही भागात स्लॅब टाकणे व त्यासंबधीची अनुषंगिक कामे करणेबाबत या विषयाचे दि.०१/०९/२०२१ चे पत्र क्र.एसएसएस/वशी-मु.का.अ.स्वीय/१८९३/२०२१, हे काम तदर्थ समितीचे पूर्वपरवानगीशिवाय वास्तूमधील संरचनात्मक बदल केल्यासंबधीचे असल्याने त्यावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देशीत केले आहे.

..२/-

दि.०१/०४/२०२० ते दि०३१/०७/२०२१ अखेरचे कालावधीत करण्यात आलेल्या सिव्हील बांधकामांचे एकूण ०१ ते १८ मधील सिव्हील बांधकामांची माहिती मा.तदर्थ समितीचे अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर करणेत आलेली आहे. सदर कामामध्ये अं.क्र.१८ अन्वये विषयांकित कामाबाबत माहिती सादर करणेत आलेली आहे.

प्रस्ताव - तरी श्री साईबाबा समाधी मंदिरासमोरील भूमीगत कॅश काऊंटींग हॉलचे जिन्यावर आर.सी.सी स्लॅबचे छत टाकणे व फ्लोरींगसाठी मार्बल बसविणे ही कामे अनुक्रमे श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई व जय भवानी ग्रेनाईट ॲन्ड टाईल्स, साकुरी प्रो.प्रा. श्रीपतसिंग जाट यांचेमार्फत देणगीदाखल करणेत आलेली असून ही कामे मा.तदर्थ समितीचे पूर्व परवानगी शिवाय वास्तुमधील संरचनात्मक बदल केल्या संबधीचे असल्याने त्याबाबत चर्चा होऊन सदर कामास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान,विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
18.9 18/09.

Con-Meeting
435-2021

विषय क्र.५१ . ERP-No-454

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
लेखाशाखा विभाग

विषय :- रुग्णालये विभागातील वार्षीक औषध खरेदीमधील अनियमितता व आक्षेपार्ह कामकाजा संबंधीत आर्थिक बाबींचे विशेष लेखापरिक्षण करण्यास व त्याकामी येणा-या रु.७५,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत...

209

टिपणी :-

संस्थान संचलित श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय ही दोन रुग्णालये कार्यरत आहेत. वार्षीक साधारणतः ४ ते ५ लाख ओपीडी रुग्ण व २५ ते ३० हजार आयपीडी रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविली जाते. रुग्णालयात भरती झालेल्या रुग्णांना संस्थानमार्फत औषध पुरवठा केला जातो. औषध खरेदीकरीता स्वतंत्र खरेदी व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत विहीत पद्धतीने औषध खरेदी केली जाते. अशाप्रकारे वार्षीक साधारणतः रु.५० ते ६० कोटी ची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात येते, निविदा कार्यपद्धती राबवून औषध खरेदी केली जाते. इतक्या मोठया प्रमाणावर औषध खरेदी असल्याने पुरवठादार मोठया प्रमाणावर सुट देऊन दर देतात व त्याप्रमाणे वार्षीक औषध खरेदी केली जाते. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, प्रशासनाकडून वार्षीक अंदाजपत्रकीय तरतुद मंजुर करण्यात येऊनही रुग्णालयातील खरेदी विभागामार्फत औषध खरेदी केली जात नाही. रुग्णालयातून सवलतीच्या दरातील औषधे उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना बाहेरील खाजगी औषध दुकानांमधून महागडया दराने औषधे खरेदी करावी लागतात. अशाप्रकारे मागील काही वर्षांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे भरती झालेल्या रुग्णांना वॉर्ड, ओटी, सब स्टोअर इ. ठिकाणांहून औषधांची मागणी केली जाते. त्यापैकी जवळजवळ ५० टक्क्यापर्यंत औषधे संस्थानमध्ये उपलब्ध नसतात.

प्राथमिक तपासणी अहवाल :- श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील वैद्यकीय साहित्य व औषध इ. बाबींची तपासणी करण्याकरिता संस्थानचे मुख्य लेखाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जा.क्र.एसएसएस/ वशी/मुकाअ/१८८५/दि.०९.०१.२०२१ अन्वये तपासणी समिती गठीत करण्यात आली होती. सदर तपासणी समितीला खरेदी व्यवस्थापक यांनी कागदपत्रे देण्यास टाळाटाळ केली. तपासणी सदस्यावर आक्षेप घेतला, मोठया विलंबाने तपासणी समितीने अंतिमतः उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करुन दि.२०.०२.२०२१ रोजी प्राथमिक तपासणी अहवाल सादर केला. तपासणी अहवालामध्ये १) मध्यवर्ती औषध भांडारामध्ये मोठया प्रमाणावर व सर्रास औषधसाठा टंचाई असते. २) वॉर्ड, ओटी, सब स्टोअर यांचेकडुन रुग्णालयात भरती असलेल्या आवश्यक असलेल्या औषधांची वारंवार मागणी करुन औषध साठा उपलब्ध होत नाही. ३) संस्थानने मंजुर केलेल्या खरेदी स्त्रोतांप्रमाणे औषध खरेदी केली जात नाही. ४) संस्थान प्रशासनाने औषध खरेदीकरीता अंदाजपत्रकीय तरतुद मंजुर केली आहे. तथापि, खरेदी विभाग, रुगणालये यांचेमार्फत अत्यंत कमी रकमेची खरेदी केलेली दिसते, एकुण सरासरी अंदाजपत्रकीय तरतुदीच्या साधारणतः ३०% पर्यंतच खरेदी केली गेलेली आहे. या गंभीर बाबी समोर आल्या.

या सर्व अनियमित व आक्षेपार्ह बाबींचा **सविस्तर प्रस्ताव क्र.१०२** मा. तदर्थ समितीच्या सभेसमोर मांडण्यात आला. त्यावर निर्णय क्र.१४२/दि.०६.०८.२०२१ अन्वये, *"या विषया संदर्भातील सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तहकुब."* असा निर्णय झाला. मा.तदर्थ समितीच्या निर्णयास अनुसरुन साधारणः २५०० कागदपत्रे रुग्णालये खरेदी विभागामार्फत प्रत्येकी मा.अध्यक्ष महोदय व इतर दोन समिती सदस्यांना पाठविण्यात आली.

वार्षीक औषध खरेदी, औषधसाठा यासंबंधीत अनियमितता व आक्षेपार्ह बाबींचे विशेष लेखापरिक्षण :- रुग्णालयात भरती झालेल्या रुग्णांकरीता वॉर्ड, ओटी, सब स्टोअर ची मागणीपत्रके संख्या, उपलब्ध औषधांची संख्या, शिल्लक नसलेली औषधांची व सर्जिकल साहित्य यांची संख्या, प्रत्यक्ष औषध खरेदी व शिल्लक अंदाजपत्रकीय तरतुद यासंबंधीत मागील काही वर्षांची तुलनात्मक आकडेवारी व संस्थानचा प्राथमिक तपासणी अहवाल यामुळे सदर आर्थिक बाबींची सत्यता पडताळणी करिता विशेष लेखापरिक्षण करुन अहवाल समिती समोर सादर करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

विशेष लेखापरिक्षक नियुक्ती :- निपक्षपाती तपासणी विशेष लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होण्यासाठी सन २०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षक मे.ए.एस.बेदमुथा ॲन्ड कं. चाटर्ड अकौटंटस यांचेशी चर्चा झाली. त्यांनी एका वर्षातील आर्थिक बाबींची तपासणी करुन अहवाल देण्याचे मान्य केले. तथापी अचानक तपासणी अहवाल देण्यास असमर्थता दर्शविली. त्यानंतर मागील शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांपैकी मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दुरध्वनीवर विचारणा केली त्यांनी सदर कामकाज करण्याची तयारी दर्शविली. त्यास अनुसरुन दि.२३.०८.२०२१ रोजी मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांचे नियुक्तीची टिपणी प्रस्तावीत करण्यात आली. त्यावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२९.०८.२०२१ रोजी *" i) तदर्थ समिती निर्णय क्र.१०२ दि.०६.०८.२०२१ ची प्रत सादर केली आहे. त्यात दस्तऐवज समिती सदस्यांना द्यावयाचा निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली आहे काय? ii) तदर्थ समिती सभा निर्णय क्र.९४ दि.०६.०८.२०२१ प्रत सादर करावी. iii) यापुवी बजाज व वर्मा प्रकरणात त्रयस्थ व नामांकीत लेखापरिक्षण करणेत आले असून त्यावेळी व्यवस्थापन समितीचा निर्णय झालेला होता. त्याप्रमाणे या प्रकरणी तदर्थ समितीची मान्यतेने कार्यवाही करावी असे नम्र मत आहे. यापुर्वी Store चे Audit झाले असल्यास काय प्रक्रिया केली त्याप्रमाणे कार्यवाही करावी. iv) शासननियुक्त लेखापरिक्षक यांची यादी (शासन निर्णय) सादर करावा. वरील मुद्दयांवर कार्यवाही करावी असे नम्र मत आहे. "* असा शेरा नोंदविला.

यावर दि.३०.०८.२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "वरील मुद्दे विचारात घेऊन तातडीची बाब म्हणून लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे. औषध खरेदी प्रक्रियेतील अनियमितता तसेच रुग्णांना औषधे स्वस्त मिळणेस्तव सदर बाब आवश्यक आहे." या शे-यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांची – रुग्णालये विभागात वार्षीक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजासंबंधीत लेखापरिक्षण करणेबाबत नियुक्ती आदेशावर स्वाक्षरी केली आहे. जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/१८६७/ दि.३०.०८.२०२१ अन्वये, नियुक्ती आदेश ई-मेलद्वारे निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये सन २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षांकरिता प्रति वर्ष २५,०००/- अशी एकुण ७५,०००/- अधिक त्यावरील देय कर व अनुशंगिक प्रवासखर्च या फीवर त्यांना नियुक्ती करण्यात आली व लेखापरिक्षण कामकाज दि.३१.०८.२०२१ पासुन सुरु करण्यात आले आहे.

विशेष लेखापरिक्षण थाबविणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देश :- मा.अध्यक्ष महोदय यांचा दि.०२.०९.२०२१ रोजीचा ई-मेल व पत्र क्र. No.374/Date 02.09.2021 दिले, त्यामधील आदेश पुढीलप्रमाणे, "Order – *Persud. If the information of appointment of Auditor etc., pending the decision by the Committee is correct, it would be amounting to overreaching and interference in the functioning of the Committee. Hence, call for report about the correctness of the information urgenty and if any such steps are taken after 06.08.2021 meeting of the Committee such steps and action be stayed forthwith."* त्यास अनुसरुन,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.एसएसएसटी/वशी/लेखा/१९४०/ दि.०४.०९.२०२१ रोजीचे मा.अध्यक्ष महोदय यांना मुद्देनिहाय पत्र पुढीलप्रमाणे:-

"संस्थानचे रुग्णालये विभागातील वार्षिक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांचे अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाची विभागीय चौकशी होणेबाबतचा प्रस्ताव दि.०६.०८.२०२१ रोजीच्या मा. तदर्थ समितीच्या सभेमध्ये प्रस्तावित करण्यात आला होता. त्यावर या विषयासंदर्भातील सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करण्यात यावे. तहकुब असा निर्णय संमत झाला आहे. त्यास अनुसरुन उपलब्ध कागदपत्रे समिती सदस्यांना पाठविण्यात आली आहेत.

रुग्णालये विभागात वार्षिक औषध खरेदी व औषध साठा यामध्ये मोठी अनियमितता व आक्षेपार्ह कामकाज झाल्याबाबत लेखाशाखा विभागाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. त्या अनुशंगाने प्रस्ताव मा. तदर्थ समितीच्या सभेमध्ये निर्णयार्थ सादर केला आहे. तो तहकुब ठेवण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील सत्यता पडताळणी करण्याकरिता व बाब आर्थिक व्यवहारांशी, औषधसाठ्या संबंधीत व रुग्णांच्या गैरसोई संबधीत

असल्याने त्याची निपक्षपाती तपासणी करण्याच्या उद्देशाने विशेष लेखापरिक्षण/तपासणी सुरु करण्यात आली आहे.

संस्थान अधिनियम २००४ कलम १४ (२) अन्वये विशेष करून पोटकलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता, कार्यकारी अधिकारी विश्वस्तव्यवस्थेची सर्व मालमत्ता व अभिलेख यांच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल. अशी तरतुद आहे. दि.०६.०८.२०२१ रोजीच्या सभेतील प्रस्तावात विशेष लेखापरिक्षण/तपासणी प्रस्तावित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रशासनिक कामकाज स्थगित ठेवण्याचा प्रश्न येत नाही.

लेखापरिक्षकांच्या नियुक्तीबाबत पारदर्शकतेची काळजी घेण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या लेखापरिक्षणाकरिता यापूर्वी संस्थानमार्फत राज्य शासनाच्या स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग (Local Fund) यांचेकडुन करुन घेण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तथापी क्र.स्था.१८/ब/ श्री. साईबाबा संस्थान शिर्डी/ विलेप/ अअ-३/६८८/ दि.२९.०४.२०१५ चे पत्रानुसार असे लेखापरिक्षण करता येणार नाही अशा आशयाचे पत्र स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाकडुन संस्थानला प्राप्त झालेले आहे. त्यांनतर अशाप्रकारचे विशेष लेखापरिक्षण करण्याकरिता व मा. विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांनी नियुक्त केलेले वैधानिक लेखापरिक्षकांपैकी लेखापरिक्षकांची नियुक्ती करुन लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे. बरोबर याच धर्तीवर सदर प्रशासनिक कामकाजाकरिता मागील शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे. ए. एस. बेदमुथा, औरंगाबाद यांना लेखापरिक्षण. करणेबाबत सुचविले होते. त्यांनी त्यांच्या लेखापरिक्षणाचा व्याप पाहून सदर कामकाज असमर्थता दर्शविली आहे. त्यानंतर त्यापुर्वीच्या अशाप्रकारे लेखापरिक्षणाचे कामकाज करणा-या शासन नियुक्त लेखापरिक्षक मे. शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, लातुर यांचेशी चर्चा केली आहे व त्यांनी त्यास संमती दिल्याने दि. ३०.०८.२०२१ रोजी त्यांची विशेष लेखापरिक्षण / तपासणी करणेकामी नियुक्ती करण्यात आली आहे.

लेखापरिक्षण फी बाबत चार्टर्ड अकौटंटच्या निर्देशानुसार व ब शहर गृहीत धरता साधारणः मॅन्डेज प्रमाणे १ सीए व ३ सेमी क्वालिफाईड मदतनीस गृहीत धरल्यास (२०,००० १ + ५०००-३ असे ७ दिवस याकरिता २,४५,०००/- इतकी फी होते. तथापी त्यांनी रु. ७५,०००/ अधिक जीएसटी व लेखापरिक्षण कालावधीत संस्थानचे निवासस्थानात निवास व भोजन व्यवस्था, या अटीवर संपुर्ण कामकाज करण्यास संमती दिली आहे. एकुण खर्च मा. कार्यकारी अधिकारी यांचे कार्यकक्षेत आहे.

अशाप्रकारे सदर प्रशासनिक कामकाजामुळे समितीच्या कोणत्याही कामकाजात हस्तक्षेप होत नाही. अपचारी कर्मचा-याच्या अनियमित आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यास स्थगिती देण्याची कोणतीही विधीवत तरतुद अधिनियमात दिसून येत नाही. तथापि आपण असे आदेश अपचारी कर्मचा-यांच्या अर्जावर दिलेले आहेत ते विधीवत नसल्याने प्रशासनिक कामकाजाचा भाग म्हणुन आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्याकरिता सुरु करण्यात आलेले विशेष लेखापरिक्षण / तपासणी कामकाजास आपली स्थगिती व्यवहार्य नाही असे मत आहे. त्यामुळे विशेष लेखापरिक्षण सुरु ठेवुन तातडीने लेखापरिक्षण अहवाल तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करण्याकरिता लेखापरिक्षण करणे गरजेचे आहे." असे कळविण्यात आले आहे.

विशेष लेखापरिक्षण कामकाजाकरीता मा.तदर्थ समितीची मान्यता घेण्याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचा दि.०७.०९.२०२१ रोजीचा ई-मेल व त्यासोबत त्यांचे क्र.३७८/दि.०७.०९.२०२१ पत्र :- त्यामध्ये, *"Seen. The subject is pending before the Committee. The said work is not of emergency work or routine course. Hence, it is without permission of the Committee. Hence, for want of permission from the Committee it is disapproved to execute such work by bypassing the Committee. The CEO should seek permission from the Committee."*

मा.अध्यक्ष महोदय यांचे दि.०७.०९.२०२१ रोजीचे पत्रास अनुसरुन दि.०८.०९.२०२१ रोजी त्यावर आदेश होणेस्तव प्रस्तावित करण्यात आले होते. त्यावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, *"संपूर्ण संचिकेसह टिपणी सादर करावा, संचिकेतील दस्तऐवजांसह परीपूर्ण उल्लेख करुन टिपणी सादर करावी, असे मत आहे"* असा शेरा दिला. सदर प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आला. त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या दि.०७.०९.२०२१ रोजीच्या ई-मेल पत्रासोबत पाठविलेल्या पत्राची प्रत पोष्टाद्वारे प्राप्त झाली आहे. त्यावर दि.१५.०९.२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर विशेष लेखापरिक्षणाकरीता मा.तदर्थ समितीची मान्यता मिळेपर्यंत स्थगित ठेवावे, असे निर्देश दिले. त्यास अनुसरुन सुरु करण्यात आलेले "रुग्णालये विभागात वार्षीक औषध खरेदीमध्ये खरेदी

व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाच्या आरोपासंबंधीत लेखापरिक्षण कामकाज" स्थगित करण्यात आले आहे. यावेळी विशेष लेखापरिक्षण कामकाजाची सद्यस्थिती - लेखापरिक्षण संस्थेने दि.३१.०८.२०२१ रोजी लेखापरिक्षण सुरु केले होते. दैनंदिन ०१ सीए व ०३ सहाय्यक अशी त्यांनी दि.०८.०९.२०२१ अखेर तपासणी केली व दि.१६.०९.२०२१ लेखापरीक्षक व त्यांचे प्रतिनिधी परत गेले असून लेखापरिक्षण कामकाज थांबविण्यात आले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशाप्रमाणे विशेष लेखापरिक्षणासाठी रु.७०,०००/- व अधिकची रक्कम खर्च करण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधीत प्रस्ताव दि.२६.०९.२०२१ रोजीच्या प्रस्तावित सभेत विषय ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन दि.२०.०९.२०२१ रोजी टिपणी प्रस्तावीत करण्यात आली होती. त्यावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, *"१) सदर विषयाबाबत मा.तदर्थ समिती अध्यक्ष यांनी काय निर्देश दिले आहे व त्याप्रमाणे काय कार्यवाही करण्यात आली आहे. २) दि.१६.०९.२०२१ रोजी लेखापरिक्षण थांबविण्यात आलेचे टिपणीत नमुद केले आहे. तरी सदर काम पूर्ण न झाल्याचे दिसते. ३) अहवाल हा अद्याप प्रलंबित आहे. तरी सर्व मुद्दयांची पुर्तता केलेनंतर कार्यवाही करावी असे नम्र मत आहे."* असा शेरा नोंदविला. सदर प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आला होता. दि.११.१०.२०२१ रोजी सदर शे-याप्रमाणे सखोल माहिती नमुद करुन प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन सखोल सादर करण्यात येत आहे.

अशाप्रकारे विशेष लेखापरिक्षणा संबंधीत खालीलप्रमाणे माहिती दप्तरी उपलब्ध आहे.

१) **वैधानिक लेखापरिक्षक** - संस्थान अधिनियम २००४ च्या कलम १७ (२)(ग) मधील तरतुदीनुसार नियुक्ती मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांचे मार्फत करण्याची तरतुद आहे. **अंतर्गत लेखापरिक्षक** - मा.विधी व न्याय विभागाचे सासंवि-२०१७/१२९४/प्र.क्र.१३४/का.१६ दि.०८.११.२०१७ चे पत्रान्वये अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती शासन मान्यतेने करण्यात येते.

२) तसेच पूर्व लेखापरिक्षक, कर सल्लागार यांच्या नियुक्त्या या मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने करण्यात येतात.

३) याव्यतिरिक्त निवडक आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरिक्षण, तपासण्या याबाबत यापुर्वी खालीलप्रमाणे लेखापरिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

i. यापुर्वी मा.व्य.स. निर्णय क्र.९४/दि.१६.०२.२०१६ अन्वये, "श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मेडीकल स्टोअर व भांडार विभागासंबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे व इतर खरेदीचे सन २००७-०८ ते २०१३-१४ या ०७ वर्षे कालावधीतील दप्तराचे विशेष लेखापरिक्षण/तपासणी करणेकामी शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांची विशेष लेखापरिक्षक म्हणून रु.१,८५,०००/- एकत्रित फी वर नेमणूक करण्यात यावी असे ठरले." असा ठराव दप्तरी आहे.

ii. तसेच यापुर्वी "श्री साईबाबा हॉस्पीटलमधील डॉ.हरीष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचेवर असलेल्या आरोपासंबंधीत लेखापरिक्षण करणेबाबत" जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/१६६/ दि.२३.०३.२०१६ अन्वये, रु.२२,०००/- फी वर नियुक्ती करण्यात आली आहे. यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही.

iii. तसेच यापुर्वी "मे. अपोलो हॉस्पीटल एंटरप्राईजेस लि., चेन्नई यांना चालविण्यास दिलेल्या औषध दुकानाचे विशेष लेखापरिक्षण करणेबाबत" जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/७९९/ दि.२७.०५.२०१६ अन्वये, रु.२४,५००/- एकत्रित फी वर नेमणूक करण्यात आली आहे. यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही.

अशाप्रकारे आर्थिक व्यवहारातील अनियमितता इ. संबंधीत तपासणी, विशेष लेखापरिक्षण हे वेळोवेळी करण्यात आलेले आहे. खर्च रक्कम मर्यादेनुसार मा.व्यवस्थान समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारातील खर्च मर्यादा असेल तर विशेष लेखापरिक्षक यांच्या नियुक्त्या मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या आहेत, तर खर्च मर्यादा मा.व्यवस्थापन समितीच्या अखत्यारीतील असेल तरच मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आल्याचे दिसून येते आहे.

४) **लेखापरिक्षण फी**:- Institue of Chartered Accountants of India यांच्या निर्देशानुसार शिर्डी हे "ब" शहर गृहीत धरता साधारण मॅडेजप्रमाणे ०१ सीए व ०३ सेमी क्वालीफाईड मदतनीस (रु.२०,०००*१ + रु.५,०००*३) असे किमान ७ दिवस गृहीत धरल्यास रु. २,४५,०००/- इतकी फी होते. तथापी चर्चा विचार विनिमय करुन प्रति वर्ष रु.२५,०००/- असे तीन वर्षांकरिता एकुण फी रु.७५,०००/- अधिक त्यावरील जीएसटी व प्रवास खर्च इतक्या फी वर नेमणूक करण्यात आली आहे. फी वाजवी असलेबाबत ICAI चे दरपत्रकाच्या आधारे खात्री करण्यात आली असुन त्यापेक्षा कमी फी ठरविण्यात आली आहे.

५) **लेखापरिक्षकांची निवड** – मा.विधी व न्याय विभागामार्फत विहीत पध्दतीने वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करण्यात येते. सन २०१९-२० चे वैधानिक लेखापरिक्षक यांना लेखापरिक्षण कामकाज करणेबाबत सुचविले होते. त्यांनी ते करण्यास असमर्थता दर्शविली त्यामुळे त्यामागील शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांशी चर्चा करुन नेमणुक केलेली आहे. त्यामुळे लेखापरिक्षक नेमणुक निपक्षपाती व शासनाने यापुर्वी नेमणुक केलेल्या लेखापरिक्षकांपैकी आहे. अशाप्रकारे विशेषलेखापरिक्षणाचे कामकाज सुध्दा केलेले आहे. त्यामुळे मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्राय :- आर्थिक बाबींशी निगडीत निवडक आर्थिक व्यवहारांची तपासणी करणे, आवश्यकता भासल्यास त्यातील सत्यता पडताळणीकामी लेखापरिक्षण संस्थेकडून विशेष लेखापरिक्षण करुन घेणे, सदर बाब प्रशासनिक व दैनंदिन कामकाजाचा भाग आहे. त्यास अनुसरुन रुग्णालये विभागातील वार्षीक औषध खरेदीमधील अनियमितता व आक्षेपार्ह कामकाजासंबंधीत आर्थिक बाबींचे विशेष लेखापरिक्षण आहे. त्याकरीता ठरविण्यात आलेली फी ही Institue of Chartered Accountants of India यांच्या मार्गदर्शक तत्वांस अनुसरुन निश्चित करण्यात आली असून लेखापरिक्षण संस्था पूर्वीच्या शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांपैकीच आहे. खर्च मर्यादा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अखत्यारीतील आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेचा मुद्दा सुद्धा विचारात घेण्यात आला आहे. या सर्व बाबींचा विचार करता सदर विशेष लेखापरिक्षण करण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव :-

मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशास अनुसरुन रुग्णालये विभागातील वार्षीक औषध खरेदीमधील अनियमितता व आक्षेपार्ह कामकाजासंबंधीत आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरिक्षण करण्याचे कामकाज स्थगित करण्यात आले आहे. त्याकरीता मागील शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांची रु.७५,०००/- अधिक त्यावरील जीएसटी व प्रवास खर्च या फी वर नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळण्यास व स्थगित करण्यात आलेले विशेष लेखापरिक्षण कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Issued to meeting DeDt.
Shri Lame. 12.10.21.

विषय क्र.- : ५२

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर

(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय – १) श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, प्र.प्रशासकिय अधिकारी
२) श्री.विनोद गोवर्धन कोते, प्र.सीसीटीव्ही विभाग प्रमुख
३) श्री.चेतन चांगदेव साबळे, मदतनीस, सीसीटीव्ही विभाग
यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

प्रस्ताव-

दाखल गुन्हयाचे अनुषंगाने १) श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, प्र.प्रशासकिय अधिकारी २) श्री.विनोद गोवर्धन कोते, प्र.सीसीटीव्ही विभाग प्रमुख ३) श्री.चेतन चांगदेव साबळे, मदतनीस, सीसीटीव्ही विभाग हे आरोपी अटक केलेबाबत जावक क्रं.४८२६/२०२१, शिर्डी पोलीस स्टेशन दि.२१.०९.२०२१ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.२२.०९.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त विषयांकित कर्मचा-यावर शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी दि.२१.०९.२०२१ रोजीचे पत्रात, शिर्डी पो.स्टे.शिर्डी गु.र.नं.३१०/२०२१, भा.द.वि.कलम ५०१,४०८,४६५,४६९,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ बी सह २ (१) (के), ६६ सह ४३ (अे) , ४३ (बी), ४३ (जी), ४३ (आय), ८४ (बी) तसेच शासकिय गुपिते अधिनियम १९२३ चे कलम ५ (डी) अन्वये गुन्हा दाखल आहे.

शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचे जावक क्रं.४८२६/२०२१, शिर्डी पोलीस स्टेशन दि.२१.०९.२०२१ रोजीचे पत्रात," उपरोक्त विषयान्वये सादर की, वर नमुद संदर्भांकित गुन्हा हा इकडील पो.स्टे. येथे आज दिनांक २१/०९/२०२१ रोजी १८.३४ वा.दाखल असुन नमुद चे गुन्हयातील आरोपी नामे-

१.राजेंद्र सोपानराव जगताप, वय-५४ वर्षे, धंदा नोकरी, प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी रा.साई श्रध्दा हौसिंग सोसायटीच्या शेजारी, उत्तर बाजु शिर्डी.

२.विनोद गोवर्धन कोते, वय-४९ वर्षे, धंदा-नोकरी, सीसीटीव्ही विभाग, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी रा.मातृकृपा नगर रोड शिर्डी

३.चेतक चांगदेव साबळे, वय-३३ वर्षे, व्यवसाय-मदतनीस, सीसीटीव्ही विभाग, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, रा.रुम नं.६, साईनगर बिल्डींग, शिर्डी

४.राहुल मारुती फुंदे, वय-३२ वर्षे, धंदा-नोकरी, वेल्डर, मॅकेनिकल विभाग, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

वर नमुद आरोपी क्र.१ ते ४ व अन्य २ आरोपी यांना सदरचे गुन्हयात अटकपुर्व वैदयकिय तपासणी करुन अटक करण्यात आलेले आहे.

सदरचे आरोपी क्र.१ ते ४ हे श्री साईबाबा संस्थानकडील नेमणुकीचे अधिकारी व कर्मचारी असल्याने आपणास माहितीस्तव कळविण्यात येत आहे. " असे म्हटलेले आहे.

यापुर्वी उपरोक्त विषयांकित कर्मचा-याचे गैरशिस्तवर्तनाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.राजेंद्र सोपानराव जगताप यांची संस्थान सेवेत दि.०२.०५.१९८९ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	रु.३००/- दंड	१
०२	ताकीद	१
०३	समज	१
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	०३

श्री.जगताप यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ०३ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे .

२) श्री.विनोद गोवर्धन कोते यांची संस्थान सेवेत दि.०२.०६.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	समज	२
०२	ठपका	२
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	०४

श्री.कोते यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ०४ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे .

पान नंबर २ वर..

३) श्री.चेतन चांगदेव साबळे यांची संस्थान सेवेत दि.१४.११.२००९ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा करणेत आलेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण २ विनीयम ४. निलंबन -:

(१) समिती किंवा समितीने यासाठी शक्ती प्रदान केलेले कोणतेही प्राधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेश पारित करुन संस्थानाच्या कर्मचाऱ्याला निलंबीत ठेवु शकतात-

(अ) जेव्हा त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई योजलेली असेल किंवा प्रलंबीत असले, किंवा

(ब) जेव्हा वर उल्लेख केलेल्या प्राधिका-यांच्या मतानुसार तो संस्थानाच्या हितसंबंधांना बाधा आणणा-या कारवायात गुंतला असेल, किंवा

(क) जेव्हा त्याच्या विरुध्दच्या एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणाचा तपास, चौकशी किंवा खटला चालु असेल: मात्र जेव्हा निलंबन आदेश समिती व्यतिरिक्त इतर प्राधिका-यांनी पारित केला असेल तर अशा प्राधिका-यांनी ताबडतोब ज्या परिस्थितीत आदेश पारित करण्यात आला त्यासंबधी समितीला कळविणे आवश्यक आहे.

(२) संस्थानाचा कर्मचारी समितीच्या आदेशाव्दारा पुढीलप्रमाणे निलंबीत ठेवला आहे असे मानले जाईल.

(अ) जर त्याला फौजदारी दोषारोपाबद्दल किंवा इतर कारणासाठी ४८ तासापेक्षा जास्त काळ पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत स्थानबध्द केले असेल तर त्याच्या स्थानबध्दतेच्या तारखेपासुन

(ब) जर त्याला ४८ तासापेक्षा जास्त काळ तुरंगवासाची शिक्षा झाली असेल तर आणि त्याला अशा गुन्हा शाबीतीमुळे ताबडतोब कामावरुन बडतर्फ केले नसेल, किंवा कमी केले नसेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले नसेल तर गुन्हा शाबीतीच तारखेपासुन.

स्पष्टीकरण:- सदर उपविनियमाच्या खंड (ब) मध्ये उल्लेख केलेल्या ४८ तासाच्या कालावधीची गणना गुन्हा शाबीती नंतर तुरुंगवासाच्या प्रारंभापासुन केला जाइल आणि यासाठी तुरुगवासाचे खंडीत कालखंड विचारात घेतले जातील.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी)सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतून बडतर्फी आणि काढून टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनियम, २०१३ प्रकरण ४ कलम १७ (अ) अन्वये निलंबन बडतर्फी आणि काढून टाकणे या कालखंडातील वेतने अंतर्गत वेतन देता येईल.

(१७) **निलंबनाच्या कालखंडातील निर्वाह भत्ता आणि पूरक भत्ता:-** योग्य प्राधिका-याच्या आदेशानुसार निलंबीत केलेल्या किंवा निलंबीत आहे असे मानले गेलेला संस्थानाचा कर्मचारी पुढील प्रदानांसाठी पात्र असेल, ते म्हणजे:-

(अ) निर्वाह भत्ता –त्याची रक्कम जर संस्थानचा कर्मचारी निम्या वेतनावर रजेवर असताना त्याला जेवढे वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक अशा रजा वेतनावरील रजा महागाई भत्ता एवढी असेल:

मात्र जेव्हा निलंबनाचा कालावधी सहा महिन्यापेक्षा जास्त असेल तेव्हा निलंबनाचा आदेश पारित करणारे किंवा तसा आदेश त्यांनी पारित केला आहे असे मानले गेलेले प्राधिकारी सहा महिन्यानंतरच्या कालखंडासाठी निर्वाह भत्ताच्या रकमेत पुढील प्रमाणे बदल करतात-:

(१)जर सदर प्राधिका-यांच्या मतानुसार निलंबनाच्या कालखंडात झालेली वाढ थेट संस्थानाच्या कर्मचा-यामुळे झाली नसेल (या संबंधीच्या कारणाची लेखी नोंद करणे आवश्यक आहे) तर निर्वाह भत्यात योग्य रकमेची वाढ केली जाऊ शकते, अशी वाढ पहिल्या तिन महिन्याच्या कालावधीत अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याच्या रकमेच्या ५०% यापेक्षा जास्त नसेल.

(२) जर सदर प्राधिकाऱ्यांच्या मतानुसार निलंबनाच्या कालखंडात झालेली वाढ थेट संस्थानाच्या कर्मचा-यामुळे झाली असेल (या संबंधीच्या कारणाची लेखी नोंद करणे आवश्यक आहे) तर निर्वाह भत्यात योग्य रकमेची घट केली जाऊ शकते, अशी वाढ पहिल्या तिन महिन्याच्या कालावधीत अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याच्या रकमेच्या ५०% यापेक्षा जास्त नसेल.

(३) महागाईभत्याचा दर वरील उपखंड (१)आणि (२) खाली अनुज्ञेय असलेल्या वाढलेल्या किंवा घट झालेल्या, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे,निर्वाह भत्त्यावर आधारीत असेल:

(ब) इतर पुरक भत्ता वरील उपखंड (१) आणि (२) खाली अनुज्ञेय असलेल्या वाढलेल्या किंवा घट झालेल्या, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, किंवा निर्वाह भत्त्यावर आधारीत असेल:

मात्र जोपर्यंत संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या ज्या खर्चासाठी भत्ता प्रदान केला जातो तो खर्च भागवला जात आहे. यासंबंधी सदर प्राधिकाऱ्याची खात्री होत नाही तोपर्यंत तो पूरक भत्ता प्राप्त होण्यास पात्र असणार नाही.

पान नंबर ३ वर...

विभागाचा अभिप्राय / स्पष्टमत -

१) श्री.गुलाबराव पाटील, पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी दिलेल्या दि.२१.०९.२०२१ रोजीचे पत्रानुसार १) श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, प्र.प्रशासकिय अधिकारी २) श्री.विनोद गोवर्धन कोते, प्र.सीसीटीव्ही विभाग प्रमुख ३) श्री.चेतन चांगदेव साबळे, मदतनीस, सीसीटीव्ही विभाग यांचेविरुध्द शिर्डी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३१०/२०२१, भा.द.वि.कलम ५०१,४०८,४६५,४६९,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ बी सह २ (१) (के), ६६ सह ४३ (अे) , ४३ (बी), ४३ (जी), ४३ (आय), ८४ (बी) तसेच शासकिय गुपिते अधिनियम १९२३ चे कलम ५ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून वरील चार कर्मचारी यांना दि. २१/०९/२०२१ रोजी १८. ३४ वा. चे सुमारास अटक करण्यात आली आहे.

२) त्यांचेबाबत जावक क्र.४८५४/२०२१ शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी दि.२३.०९.२०२१ रोजीचे पत्र इकडील आवक विभागास दि.२५.०९.२०२१ रोजी दिलेले असुन त्यात त्यांनी,नमुद गुन्ह्यात दिनांक २१.०९.२०२१ रोजी २१/४० वा.अटक करण्यात आलेली होती. सदरचे आरोपीतांना दिनांक २२/०९/२०२१ रोजी मा.न्यायालयात सादर केले असता मा. न्यायालयाने त्यांची दि.२५/०९/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केलेली आहे.

यावरुन १) श्री.राजेंद्र सोपानराव जगताप,प्र.प्रशासकिय अधिकारी २) श्री.विनोद गोवर्धन कोते, प्र.सीसीटीव्ही विभाग प्रमुख ३) श्री.चेतन चांगदेव साबळे, मदतनीस, सीसीटीव्ही विभाग यांना ४८ तासापेक्षा जास्त पोलीस कोठडी झालेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण २ विनीयम ४. निलंबन -:

(१) समिती किंवा समितीने यासाठी शक्ती प्रदान केलेले कोणतेही प्राधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेश पारित करुन संस्थानाच्या कर्मचाऱ्याला निलंबीत ठेवु शकतात-

(अ) जेव्हा त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई योजलेली असेल किंवा प्रलंबीत असले, किंवा

(ब) जेव्हा वर उल्लेख केलेल्या प्राधिका-यांच्या मतानुसार तो संस्थानाच्या हितसंबंधांना बाधा आणणा-या कारवायात गुंतला असेल, किंवा

(क) जेव्हा त्याच्या विरुध्दच्या एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणाचा तपास, चौकशी किंवा खटला चालु असेल: मात्र जेव्हा निलंबन आदेश समिती व्यतिरिक्त इतर प्राधिका-यांनी पारित केला असेल तर अशा प्राधिका-यानी ताबडतोब ज्या परिस्थितीत आदेश पारित करण्यात आला त्यासंबधी समितीला कळविणे आवश्यक आहे.

(२) संस्थानाचा कर्मचारी समितीच्या आदेशाव्दारा पुढीलप्रमाणे निलंबीत ठेवला आहे असे मानले जाईल.

(अ) जर त्याला फौजदारी दोषारोपाबद्दल किंवा इतर कारणासाठी ४८ तासापेक्षा जास्त काळ पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत स्थानबध्द केले असेल तर त्याच्या स्थानबध्दतेच्या तारखेपासुन

(ब) जर त्याला ४८ तासापेक्षा जास्त काळ तुरंगवासाची शिक्षा झाली असेल तर आणि त्याला अशा गुन्हा शाबीतीमुळे ताबडतोब कामावरुन बडतर्फ केले नसेल, किंवा कमी केले नसेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले नसेल तर गुन्हा शाबीतीच तारखेपासुन.

स्पष्टीकरण:- सदर उपविनियमाच्या खंड (ब) मध्ये उल्लेख केलेल्या ४८ तासाच्या कालावधीची गणना गुन्हा शाबीती नंतर तुरुंगवासाच्या प्रारंभापासुन केला जाइल आणि यासाठी तुरुगवासाचे खंडीत कालखंड विचारात घेतले जातील.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी (अधिनियम २००४ चे कलम १४ पोटकलम (२) क अन्वये समितीच्या कोणत्याही अन्य अधिका-याविरुध्द किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण २ विनीयम ४. निलंबन, (१) अ, ब (२) अ,ब नुसार १) श्री.जगताप यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२६४/२०२१ दि.२४.०९.२०२१, श्री.कोते यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२६५/२०२१ दि.२४.०९.२०२१, ३) श्री.साबळे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२६६/२०२१ दि.२४.०९.२०२१ त्यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ संस्थानचे सेवेतून सेवा निलंबित केले आहे.सेवा निलंबन आदेशाची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.

पान नंबर ४ वर...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण २ विनीयम ४ (१) (क) नुसार जेव्हा त्याच्या विरुध्दच्या एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणाचा तपास, चौकशी किंवा खटला चालु असेल: मात्र जेव्हा निलंबन आदेश समिती व्यतिरिक्त इतर प्राधिका-यांनी पारित केला असेल तर अशा प्राधिका-यानी ताबडतोब ज्या परिस्थितीत आदेश पारित करण्यात आला त्यासंबंधी समितीला कळविणे आवश्यक आहे.

श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, श्री.विनोद गोवर्धन कोते, श्री.चेतन चांगदेव साबळे यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ संस्थानचे सेवेतून सेवा निलंबित केले आहे. सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर अवलोकनार्थ सविनय सादर.

(भाग्यश्री बोमाथर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- ५३

मा. तदर्थ समिती सभेपुढील विषय

(सामान्य प्रशासन विभाग वशी -५)

विषय- दि. १४ ऑक्टोबर २०२१ ते दि. १७ ऑक्टोबर २०२१ या दरम्यान साजरा होणा-या श्री साईबाबा पुण्यतिथी उत्स्वाची तयारी, नियोजन व व्यवस्थापनाबाबत...

टिपणी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना:-

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे. तथापि, दि. ०७/१०/२०२१ रोजी घटस्थापनेच्या मुर्हतावर राज्यातील सर्व धार्मीक स्थळे भक्तांना दर्शनासाठी खुले करण्याबात मा. शासनाने निर्देशदिलेले आहेत. त्यानुसार सध्या साई मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी दि. ०७/१०/२०२१ पासुन खुले करण्यात आलेले आहे.

अ) अंदाजपत्रकीय खर्चाबाबत.

संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ गुरुवार, दि.१४/१०/२०२१ ते रविवार, दि.१७/१०/२०२१ (अश्विन शु ९|| शके १९४३ ते अश्विन शु १२|| शके १९४३) असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ व कोव्हीड १९ चा प्रादर्भाव लक्षात घेता सदर उत्सव कालावधीत मा. शासनाच्या आदेशानुसार साई मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी खुले झाल्यास अथवा कोव्हीड १९ ची परिस्थती राहील्यास या उत्सव कामी करावे लागणारी पुर्व तयारी व त्यासाठी येणारा खर्चाचा प्रस्ताव मा.तदर्थ समिती समोर चक्रिय पध्दतीने मान्यतेसाठी सादर दि. १०.०९.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे सादर करण्यात आला होता.

अ) Covid -19 चा प्रादुर्भाव कमी होऊन दर्शन सुरु झाल्यास रक्कम रुपये ४२,२२,७६७/- (रुपये बेचाळीस लाख,बाविस हजार, सातशे सदुसष्ठ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

ब) Covid -19 चा प्रादुर्भाव राहिल्यास दर्शन सुरु न झाल्यास रक्कम रुपये ११,८१,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख ऐक्याऐंशी हजार) खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावावर मा. तदर्थ समिती अध्यक्ष यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"Parmissions is granted for putting the subject by circulation. 'B' is approved. If lock down is withdrawn the 'A' may be submitted before the committee."

उपरोक्त निर्देशानुसार सन-२०२१ मध्ये साजरा करावयाचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

अ.नं.	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
१.	उत्सवाचा उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पाठविणे	अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. तथापि Covid 19 चा प्रादुर्भाव असल्याकारणाने श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव हा साध्या पध्दतीने साजरा करावा लागणार असल्याने, श्री. गुरुपौर्णिमा उत्सवाप्रमाणे भक्तमंडळ सभासदांना फक्त उत्सवाचा उदी प्रसाद पाठविता येईल. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात येईल.

पान नं. ०२ वर...

अ.नं.	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
	सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी	श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईंचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे. **श्री साईसच्चरित** साईबाबा महासंत | धीर उदार आणि दान्त | यात्रेकरुंसी कृपावंत | पैसे अत्यंत वांटिती||४|| दिडक्या चवल्या हाताचा कीस | अधेल्या-पावल्यांचा पाऊस | रुपये दहा कोणास वीस | कोणास पन्नास ते देत ||५|| हें काय सणासुदा दिसी | कार्यविशेषीं कां पर्वकाळासी | प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं | संतोषेंसीं अर्पीत ||६|| पहूड येती भवय्ये नाचती | गवय्ये गाती भाट वानिती | तमासगीर मुजरे देती | भजनीं रंगती हरिभक्त ||७|| ऐसे महाराज उदारवृत्ती | दानधर्मी सढळ स्थिती | ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति | इच्छा धरिती दर्शनाची ||८|| कधीं आलिया बाबांचे चित्तीं | पांथस्थांतेंही पैसे वांटिती | दीनदुबळयांचा परामर्ष घेती | कृपामुर्ति साईनाथ ||९||
		श्री साईंचे सत्य चरित्र साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत.
		कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानांच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये (तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळयांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत. थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा-चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वतः सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे.
०२	सांस्कृतिक कार्यक्रम	**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ करीता संस्थानमार्फत**
	प्रारंभ दिवस, गुरुवार, दि. १४/१०/२०२१	**मागील श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात (२०२०) मध्ये Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले नाही. या वर्षीही तशी परिस्थिती असल्याने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येणार नाही.**
	मुख्य दिवस शुक्रवार, दि.१५/१०/२०२१	
	तिसरा दिवस शनिवार, दि. १६/१०/२०२१	
	सांगता दिवस सोमवार, .१७/१०/२०२१	
०३	गुरुवार, दि.१४/१०/२०२१ (सायं. ४ ते ६) शुक्रवार, .१५/१०/२०२१ (सकाळी. १० ते १२) शनिवार, .१६/१०/२०२१ (सकाळी ०४ ते ०६) रविवार, .१७/१०/२०२१ (सकाळी. १० ते १२)	**कीर्तन कार्यक्रम.....** **Covid-19 चा प्रादुर्भाव असल्याने मंदिर विभागाचे कर्मचा-यांमार्फत श्रींच्या समाधी समोर चारही दिवस कीर्तन आयोजित करण्यात येईल.** (श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२१ प्रमाणे कार्यवाही करता येईल.)

पान नं. ०३ वर...

अ.नं	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
०४		विविध मिरवणूका
	गुरुवार, दि.१४/१०/२०२१ ते रविवार, दि.१७/१०/२०२१	साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून पोथी-फोटो-वीणा, पालखी, रथ, भिक्षाझोळी, सिमोल्लंघन मिरवणूक प्रथेप्रमाणे करण्यात येतील. उत्सवाचे प्रथम व मुख्य दिवशी सकाळी ५ वा पोथी फोटो-वीणा मिरवणूक निघेल. सकाळी ९ वा.भिक्षाझोळी, सायं. ५ वा. सिमोल्लंघन इ. प्रथेप्रमाणे करणेत येईल. **तथापि, पालखी, रथ, भिक्षाझोळी व सिमोल्लंघन मिरवणूकीबाबत परिस्थितीनुरुप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन निर्णय घेता येईल.**
५	शुक्रवार दि.१५/१०/२०२१	आराधना विधी आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर करण्यात येईल. सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live telecast) संस्थांनचे फेसबुक लाईव्ह कव्हरेजपेजवर करण्यात येईल त्यामुळे संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल तसेच हे प्रक्षेपण समाधी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीवर करण्यात येईल. आराधना विधीकरीता यजमानाची (पतीपत्नी) प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉलमध्ये प्रथेप्रमाणे करणेत येईल. **तथापि, प्रथेप्रमाणे आराधना विधी हा करावा लागेल. मात्र श्री साई प्रसादालयामधील प्रसाद भोजन व्यवस्था बंद असल्याने याबाबत मंदिर विभागाचे मागणीनुसार ठरावीक व्यक्तींसाठी प्रसाद भोजनांची व्यवस्था करण्यात येईल.**
६.	अखंड पारायण व्यवस्था	उत्सव काळात गुरुवार, दि.१४/१०/२०२१ रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरु होईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व उर्वरित राहिलेले ४८ अध्यायाचे प्रत्येकी एक अध्याय याप्रमाणे संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांचेमार्फत वाचन करण्यात येईल. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक व्यक्तीस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. दि.१५/१०/२०२१ रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. **Covid-19 चा प्रादुर्भाव असल्याने श्री गुरुपौर्णिमा उत्सवाप्रमाणे संस्थानचे अधिकारी व कर्मचा-यांकडून श्री साईसच्चरिताचे पारायण केले जाईल.**
७.	श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा	**साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाले असले तरी उत्सव काळात गुरुवार, दि.१४/१०/२०२१ते रविवार, दि.१७/१०/२०२१ अखेर Covid-19 चा प्रादुर्भाव असल्याने श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा बंद ठेवणेत येईल.**
८.	विद्युत रोषणाई	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल.
९.	प्रसाद-भोजन, चहा, व्यवस्था	उत्सव कालावधीमध्ये मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था स्वतंत्रपणे करण्यात येईल. विद्युत रोषनाई व फुल सजावट इ. साठी उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था सामाजिक अंतर ठेवून केली जाईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल. **Covid-19 चा प्रादुर्भाव असल्याने साईभक्तांसाठी प्रसाद-भोजन, चहा, कॉफी, दुध, बिस्कीट , लाडु व्यवस्था सर्व सुविधा बंद राहतील.**
१०.	संरक्षण विभाग	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाले असल्याने उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात संरक्षण विभागामार्फत बंदोबस्त ठेवण्यात येईल. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मां. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल.

पान नं. ०४ वर...

अ.नं	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
११.	लेखाशाखा (देणगी काऊंटर)	उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्यास देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यंत करण्यात येईल.
१२.	बांधकाम	उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी मंडप/शामियाने इ. व्यवस्था केली जाईल.
१३.	जादा कंत्राटी कर्मचारी	आवश्यकता भासल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल.
१४.	प्रथमोपचार	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास संस्थानमार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अंशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात येईल.
१५.	पालखी व्यवस्था	**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात, उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. तथापि या वर्षी कोरोनाचा पादुर्भाव असल्याने संरक्षण विभागामार्फत संबंधित पालखी मंडळांना पालखी न आणणेबाबत विनंती करण्यात येईल. तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फतही याकामी प्रेसनोट प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.**
१६	पाणी पुरवठा	पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल.
१७	फोटो व्हीडीओ शुटींगबाबत	उत्सवाचे कार्यक्रमाचे फोटो व व्हीडीओ शुटींगची क्लीप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रेसला देण्यात येईल
१८	खर्चाचे अंदाजपत्रक	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०२० साठी रु.२२,८०,००० /- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ११,५५,८९६/- मात्र इतका खर्च झालेला आहे. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२१ करीता अंदाजे रक्कम रु. ११,८१,०००/- मात्र इतका खर्च मंजुरीसाठी सादर केला आहे.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२० करीता झालेला खर्च व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२१करीता अंदाजे अपेक्षित खर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे येईल.

श्री पुण्यतिथी उत्सव -२०२१ अंदाजपत्रक

अ.क्र	खर्च तपशिल	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव - २०२०		श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२१ अंदाजे खर्च
		अंदाजे खर्च	प्रत्यक्ष खर्च	
१	मंडप, कमानी, स्टेज, व इतर	३,००,०००	-	-
२	कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत कलाकार) व मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, कलाकार निवास, इतर खर्च	६०,०००	२१,०००	३१,०००
३	भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह)	--	२०,५३८	२५,०००
४	विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च)	९,५०,०००	२५,०००	२५,०००
५	पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था		-	-
६	सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी	-	-	-
७	मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन	-	-	-
८	जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन	-	-	-
९	भाडोत्री क्रेन			-
१०	उदीप्रसाद पाकिटे छपाई , उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह)	९,६०,०००	१०,८९,३५८	११,०० ,०००
	एकुण रुपये	२२,८०,०००	११,५५,८९६	११,८१,०००

संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे.

पान नं. ०५ वर...

सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर तूया त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

श्री साई मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असुन यंदाचा श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ गुरुवार, दि.१४/१०/२०२१ ते रविवार, दि.१७/१०/२०२१ असा चार दिवस साजरा करणेस व याकामी वरीलप्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करणेस अंदाजे रक्कम रुपये ४२,२२,७६७/- मात्र खर्च येईल असे मत आहे.

ब) श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवातील पाद्यपुजा व इतर कार्यक्रम:-

संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव पुर्व परंपरेनुसार पार पाडले जातात. सदरच्या प्रत्येक उत्सवात पहाटे व्दारकामाईत अखंड पारायणास सुरुवात होते तत्पूर्वी श्रींचा फोटो /पोथी /वीणा मिरवणूकीने गुरुस्थानमार्गे व्दारकामाईत येतात व मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांच्या हस्ते अंखड साईसच्चरित पारायणास व्दारकामाईत सुरवात होते. तसेच श्रींचे स्नान झाल्यानंतर समाधि मंदिरात मा. समिती सदस्य यांचे हस्ते पाद्यपुजा पार पाडली जाते.

आता श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवरांची निश्चिती करणे आहे. तरी वीणा, पोथी, श्रींचा फोटो, अध्यायाचे वाचन, श्रींची पाद्यपुजा, रुद्राभिषेक कोणी करावा याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

श्री पुण्यतिथी उत्सव २०२१ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

दिनांक	वेळ	कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे
पारंभ दिवस		**उत्सवाचा प्रथम दिवस**
दि.१४/१०/२०२१ गुरुवार	पहाटे ५.००	**श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक** **वीणा-** **पोथी-** **प्रतिमा-**
	पहाटे ५.१५	**अध्याय वाचन –** **अध्याय क्र.१ -** **अध्याय क्र.२ –** **अध्याय क्र.३ -** **अध्याय क्र.४ –** **अध्याय क्र.५ -**
	सकाळी ६.०० सायंकाळी	**श्रींची पाद्यपूजा -**
मुख्य दिवस		**उत्सवाचा मुख्य दिवस**
१५/१०/२०२१. शुक्रवार	पहाटे ५.००	**श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक** **वीणा -** **पोथी -** **प्रतिमा-**
	सकाळी ६.०० सायंकाळी	**श्रींची पाद्यपूजा-**
	सकाळी ९.००	**भिक्षा झोळी कार्यक्रम –**
	सकाळी १०.३०	**आराधना विधी कार्यक्रम-**
तृतीय दिवस	सकाळी ६.००	**तृतीय दिवस**
१६/१०/२०२१ शनिवार		**श्रींची पाद्यपूजा-**
सांगता दिवस		**उत्सवाचा सांगता दिवस**
१७/१०/२०२१ रविवार	सकाळी ६.००	**श्रींची पाद्यपूजा-**
	सकाळी ६.४५	**गुरुस्थान येथे रुद्राभिषेक -**

पान नं. ०६ वर...

प्रस्ताव

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ निमित्त करावयाच्या नियोजनकामी खालील प्रमाणे 'अ' व 'ब' नुसार मान्यता मिळणेस विनंती.

अ) श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ करीता करावयाचे नियोजनाकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. रु. ११,८१,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

ब) श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ गुरुवार, दि.१४/१०/२०२१ ते रविवार, दि.१७/१०/२०२१ या कालावधीत साजरा होणार असुन उत्सवानिमित्त वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक, साईचरित्र पारायण, भिक्षा झोळी व आराधना विधी इ. बाबत समिती सदस्य यांची नावे निश्चित होणेस विनंती.

तरी उपरोक्त **'अ'** व **'ब'** प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थानविश्वस्तव्यवस्था शिर्डी

GA-MEETING-450-2021

ERP-1 311

परिशिष्ट - अ.

आयत्या वेळेचा

विषय क्र.- १/१

खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषय – मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचेकडून दूध खरेदी करणेचे बंद केलेमुळे पर्यायी व्यवस्था म्हणून दूधाची खरेदी करणेबाबत...

मा. उच्च न्यायालयाकडून टोंड गाय दूध खरेदीसाठी रक्कम रु. ५,३१,६१,५००/- इतक्या रकमेला दि. १२.०३.२०२१ रोजी मान्यता मिळाल्यानंतर एप्रिल २०२१ ते मार्च-२०२२ या कालावधीत कॅन्टीन विभागासाठी त्यांचे मागणीनुसार आवश्यक असणारे टोंड गाय दूध खरेदी करण्यासाठी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. यामध्ये ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर निविदा तांत्रिक दृष्ट्या ही पात्र ठरल्या होत्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे:-

१. मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव
२. मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव
३. मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक

वरील तीनही पात्र निविदाधारकांच्या ई- निविदा कमर्शिअल बीड ०७.०६.२०२१ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले होते. यामध्ये मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दर न्युनतम प्राप्त झाले होते. सदर न्युनतम दरधारकाशी खरेदी समितीचे सभेत चर्चावाटाघाटी करुन त्यातुन प्राप्त अंतिम दराप्रमाणे पुरवठा आदेश देण्यासाठी मा. तदर्थ समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२८.०६.२०२१ रोजीच्या खरेदी समिती सभेत चर्चा वाटाघाटी होऊन जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१०९१/२०२१ दि. ०१.०७.२०२१ अन्वये मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना टोंड गाय दूधाच्या (Fat-३.५, SNF-८.५) पुरवठ्यासाठी दि.३१.०३.२०२२ पर्यंतचे कालावधीसाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यांनी त्याप्रमाणे दि. ०५.०७.२०२१ पासून आपला टोंड गाय दूधाचा पुरवठा सुरु केलेला होता.

दि. १३.०७.२०२१ रोजी कॅन्टीन विभागाकडील लिपीक, श्री. निकम यांनी सदर पुरवठादाराने पुरविलेले दुधाचा वास येत असलेबाबत तक्रार केली होती. त्यावेळी श्री. निकम यांना सदर दुधाचा लॅब रिपोर्ट करुन घेणेबाबत सुचना केली होती. तसेच मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना ही दूधाचा वास येत असलेबाबत कळविले होते त्यांनी दूध बदलून देणेची तयारी दाखविली होती. तसेच यापुढे अशी तक्रार येऊ नये म्हणून दूधाचा दर्जा सुधारणेबाबत मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना सुचना केली होती. त्यानंतर दि. २३.०७.२०२१ रोजी श्री. निकम, कॅन्टीन विभाग, लिपीक यांनी दूधाचा वास येत असलेबाबत तक्रार केली होती. यानुसार मा. प्रशासकीय अधिकारी, श्री. जगताप साहेब यांचेशी झालेले चर्चेनुसार पुरवठादार यांना दि. २४.०७.२०२१ रोजी समक्ष बोलविण्याचे ठरले होते. त्यानुसार पुरवठादार मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना दि. २३.०७.२०२१ रोजी फोनवर निरोप देण्यात आला होता. तथापी ते उपस्थित नव्हते. त्यांनी डेअरीचे प्रतिनिधी श्री. रोकडे यांना समक्ष दि. २४.०७.२०२१ रोजी शिर्डी येथे पाठविले होते.

दरम्यान दि. २४.०७.२०२१ रोजी सकाळी ११. वाजता डेअरीचे प्रतिनिधी श्री. रोकडे यांचे समक्ष मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा. प्रशासकीय अधिकारी श्री. जगताप, प्र. अधीक्षक, कॅन्टीन विभाग, श्री. डांगे यांचेशी एकत्रित झालेल्या चर्चेत सदर पुरवठादाराने दि.०५.०७.२०२१ ते २४.०७.२०२१ या कालावधीत दूधाचा पुरवठा संस्थानचे मागणीप्रमाणे नसल्याचे श्री. डांगे यांनी समक्ष सांगितले. तसेच सदर पुरवठादाराने पुरविलेल्या ०२ पिशव्यांवर मॅन्युफॅक्चरींग व एक्सपायरी डेट नसल्याचे आढळून आले. ही बाब श्री. रोकडे डेअरीचे प्रतिनिधी यांना दाखविण्यात आली होती.

त्यानंतर याबाबत चर्चा होऊन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा पुरवठा आदेश त्वरीत रद्द करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच संस्थानची अडचण होऊ नये म्हणुन मागील पुरवठादार मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव व मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांनी संस्थानला गेले ०५-०६ वर्षापासून चांगल्या दर्जाचे दूधाचा पुरवठा केला आहे त्यामुळे त्यांचेकडून दूध खरेदी करण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यास अनुसरुन मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेशी संपर्क करुन संस्थानची दूधाची नविन ई-निविदा प्रक्रीया होईपर्यंत त्यांना वरील मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दरात रु.३४.५० पैसे प्रती लिटर दराने पुरवठा करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी ती मान्य करुन तसा ई-मेल पाठविला आहे. तसेच मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांना देखील याबाबत विचारणा केली होती ते ही या दरात दूध पुरविण्यास तयार आहेत. असे फोनवर सांगितले होते तथापी अद्याप त्यांचा ई-मेल प्राप्त न झालेमुळे

त्यांचेशी संपर्क केला असता त्यांनी त्यांच्या संघाच्या सभेत आज चर्चा होईल त्यानंतर ई-मेल देतो असे सांगितले आहे.

वरील निर्देशानुसार दि.२५.०७.२०२१ पासुन मे. .व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचा दूध पुरवठा बंद केलेला आहे व मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेकडून तुर्त ०८ दिवसांसाठी दूध खरेदी करण्यात येत आहे.

दरम्यान सदर पुरवठादार यांनी दि.२५.०७.२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांची समक्ष भेट घेतली त्यावेळी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी श्री. जगताप साहेब, प्र. अधीक्षक, कॅन्टीन श्री. डांगे, प्र. अधीक्षक, खरेदी, श्री. कुलकर्णी हे उपस्थित होते. त्यावेळी श्री. जगताप साहेब व श्री. डांगे, प्र. अधीक्षक यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूधाचा पुरवठा सुरु झाल्यापासून तो मागणीप्रमाणे नसल्याचे सांगितले होते. यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना तुमच्याकडून संस्थानला दुधाचा पुरवठा व्यवस्थित न झाल्यामुळे तुमचेकडून संस्थानला दूध खरेदी करावयाचे नाही असे समक्ष निर्देशीत केले आहे व त्यांची संस्थानकडे जमा असलेली डिपॉजिटची रक्कम जप्त करण्याचे ही निर्देश दिले आहेत.

कॅन्टीन विभागाने मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांनी पुरविलेल्या दूधाबाबतचा लेखी अहवाल दि. २७.०७.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०५ वाजता खरेदी विभागाकडे पाठविलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

"कॅन्टीन विभागास आवश्यक असणारे गाय दूधासाठी आपले मार्फत मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांना मधूर ब्रॅन्ड, होमोजिनाईज्ड व पाश्चराईज्ड, ३.५ फॅट, ८.५ एसएनएफ टोन्ड गाय दूधाचा जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१०९१/२०२१ दि.०१/०७/२०२१ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला असुन दि. ०५/०७/२०२१ रोजी पासुन गाय दूधाचा पुरवठा चालु झालेला आहे.

संबंधीत पुरवठा धारकाकडुन दि.०५/०७/२०२१ ते दि.१३/०७/२०२१ रोजी पर्यंतचे दूधाची फॅट व एसएनएफ पुरवठा आदेशाप्रमाणे होते परंतु त्यानंतर येणा-या दूधाची प्रतवारी कमी येत असल्याने व वास येत असल्याचे आपणांस तोंडी समक्ष कळविले होते. त्यावर आपले मार्फत पुरवठा धारकास दूरध्वनीद्वारे कळविले असता पॅकिंग पिशवी खराब असल्याने वास येत असल्याचे मान्य करून पॅकिंग पिशवी बदलुन दिले.

मा.चेअरमन साहेब यांच्या कुटूंबियांनी दि.२३/०७/२०२१ रोजी साईनिवास अतिथीगृह येथे कॉफी मागितल्यानंतर सदर कॉफीचा वास येत असल्याचे तेथील कर्मचा-यांना निर्दशनास आणुन दिले. दि.२४/०७/२०२१ रोजी सकाळी गुरूस्थान अभिषेक, पुजेनंतर मा.वरिष्ठ अधिकारी यांना चहा, दूध दिले असता दूधाचा आंबट वास येत होता तसेच सकाळी १०.०० साई सभागृह येथे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आढावा बैठकीवेळी साई सभागृह येथील कर्मचा-यांनी दुध तापविलेनंतर त्या दूधाचा उग्र वास येत असल्याचे सर्व अधिकारी यांचे निर्दशनास आले. त्यावेळी मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री रोकडे समक्ष हजर होते व त्यांनीही प्रत्यक्ष दुधाचा उग्र वास येत असलेचे मान्य केलेले होते.

त्यामुळे दि.२४/०७/२०२१ रोजी प्रशासकिय अधिकारी डॉ.आकाश किसवे व श्री चंद्रकांत डांगे प्र.अधिक्षक कॅन्टीन विभाग यांनी पंचासमक्ष साईनाथ मंगलकार्यालय येथील बिल्डींग मध्ये असलेल्या कॅन्टीन मध्ये आवक झालेल्या मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे मधूर ब्रॅडच्या दूधाचा पंचनामा केला व त्याचे व्हिडिओ शुटींगही केले .

मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचेकडील दूध पुरवठा चालू केल्यानंतर अनेकदा काही पिशव्यांवर मॅन्यु. व एक्सपायरी डेटचा उल्लेख आढळुन आलेला नाही, कधी कधी दुध तापविलेनंतर त्या दुधाचा उग्र वास येत असल्याचे आपणांस व पुरवठाधारकास वेळोवेळी फोनद्वारे कळविण्यात आलेले होते. तसेच दि.०९/०७/२०२१ रोजी आलेल्या दुधापैकी ७५ लिटर खराब दूध व दि.२२/०७/२०२१ रोजी १६ लिटर लिकेज दूध पुरवठा दाराने बदलुन दिलेले आहे. तसेच दि.१४/०७/२०२१ पासुन फॅट व एसएनएफ कमी येत असल्याचेही पुरवठा धारकास दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले आहे.

सदर दुधाची कॅन्टीन कडे असलेल्या फॅट ॲनालायझर मशिनव्दारे दररोज प्रतवारी चेक केलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आपले माहीतीसाठी सादर"

दिनांक	आवक झालेले दूध लिटर मध्ये	फॅट	एसएनएफ
०५/०७/२०२१	२००	४.६	१०.९
०६/०७/२०२१	२००	४.६	१०.८
०७/०७/२०२१	२००	४.६	१०.९
०८/०७/२०२१	२००	४.६	११.०
०९/०७/२०२१	२००	४.४	१०.५
१०/०७/२०२१	२००	४.५	१०.६

दिनांक	आवक झालेले दूध लिटर मध्ये	फॅट	एसएनएफ
११/०७/२०२१	२००	४.५	१०.६
१२/०७/२०२१	२००	४.५	१०.८
१३/०७/२०२१	२००	३.९	९.२
१४/०७/२०२१	२००	३.४	८.१
१५/०७/२०२१	२००	३.३	७.८
१६/०७/२०२१	२००	३.२	७.५
१७/०७/२०२१	२००	३.१	७.५
१८/०७/२०२१	१९६	३.३	८.०
१९/०७/२०२१	२००	३.४	८.१
२०/०७/२०२१	१९८	३.२	७.६
२१/०७/२०२१	२५०	३.३	७.८
२२/०७/२०२१	२३४	३.४	८.१
२३/०७/२०२१	२५०	३.३	७.८
२४/०७/२०२१	२५०	१.८	४.३
एकुण	४१७८		

वरील अहवालाचे अवलोकन करता मे. व्हि. एम. डिस्टीब्युटर्स, यांनी दि. ०५.०७.२०२१ पासून दूध पुरवठा सुरु झाल्यानंतर दि.१३.०७.२०२१ पर्यंत चांगल्या प्रतीच्या दूधाचा पुरवठा केला असल्याचे वरील कॅन्टीन विभागाने दिलेल्या आकडेवारी वरुन दिसुन येते.

कॅन्टीन विभागाने ज्यावेळी दुधाला वास येतो असे खरेदी विभागाकडे कळविले होते. त्यावेळी पुरवठादाराला याबाबत सुचित केले होते. तसेच कॅन्टीन विभाग लिपीक, श्री. निकम यांना सदर दुधाची लॅब तपासणी करुन घेण्याचे ही सुचित केले होते.

कॅन्टीन विभागाकडे चौकशी करता, मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांनी पुरविलेले सर्व दूध वापरण्यात आलेले आहे.

दूधाच्या पुरवठ्याबाबत पुरवठा आदेशात दिलेल्या याबाबतच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे:-

३- पुरवठा कालावधी, पुरवठा करावयाचे दूधाचे स्पेसिफीकेशन, ब्रॅन्ड, अंदाजे परिमाण व दूधाचे मंजूर

दर वगैरे सर्व तपशील सोबतचे परिशिष्टात नमूद केला आहे. त्याप्रमाणे दुधाचा पुरवठा करावा लागेल. संस्थानचे कॅन्टीन विभागाकडून पुरविले जाणारे दुधाची दररोज तपासणी करून त्यांना योग्य वाटल्यास स्विकारले जाईल. पुरवठा आदेशात दिलेले स्पेसिफिकेशन व ब्रॅन्डप्रमाणे दुध पुरविण्याची दक्षता घ्यावी.

१०- ज्या ब्रॅण्डच्या निविदा मंजूर होतील त्याच ब्रॅण्डचे दुध पुरवावे लागेल. वेगळ्या ब्रॅण्डचे दुध स्विकारले जाणार नाही. खराब दुधाचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे आपणांवर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्या दूधाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

११- टोन्ड गाय दूध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड (३.५% फॅट, ८.५ एसएनएफ) गुणप्रतीचे, १/२ लिटर पॉलीथीन पॅकिंगमध्ये पुरविणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी गुणप्रतीचे दूध पुरविल्यास मा.दुग्धविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.एमएलके १०९९/प्रक्र३२१/पदुम८ दि.२७/१२/२००० मधील दूध खरेदीबाबतच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ०.१ कमी फॅटसाठी रु.०.३५ पैसे कपात करणेत येईल.

१३- पुरवठा करीत असलेल्या दूधाची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन दूध स्वीकारले जाते. तथापी दूध स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर काही दूध खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

१४- दूध पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार दूधाच्या ५०० मिलीच्या प्रत्येक पिशवीवर Date of Packing, Quantity and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

१५- पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या दूधामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१७- पुरविलेल्या दूधाची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्य शासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

३०- आपण दुधाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग आपल्याकडून झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन आपले नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत मा.तदर्थ समिती/मा.व्यवस्थापन

11/8/2021

समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

सदर पुरवठादाराकडून दूध पुरवठा बंद केल्यामुळे याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रीया करावी लागेल व ई-निविदा अंतिम होऊन पुरवठा आदेश देईपर्यंत संस्थानला आवश्यक असणारे टोंड गाय दूध पुर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव व मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून, वरील नमूद विशेष अपवादात्मक परिस्थिती अचानक निर्माण झालेमुळे खरेदी करावे लागेल. पुढील ०१ वर्षाचे दूध खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रीया करुन अंतिम निर्णय होणेकामी साधारण ४०-४५ दिवसांचा किमान कालावधी अपेक्षित आहे.

ई-निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत कॅन्टीन विभागाकडून आवश्यक असणा-या दूधाची मागणी घेण्यात आली आहे. यामध्ये कॅन्टीन विभागाने ४५ दिवसांसाठी मंदिर चालू न झाल्यास ११००० लिटर दूधाची गरज लागेल व याकामी रु.३,७९,५००/- पर्यंत अंदाजे खर्च येईल. तर मंदिर चालू झाल्यास सरासरी ०१ दिवसासाठी १८०० लिटर दूध गृहीत धरुन ४५ दिवसांसाठी ८१००० लिटर अंदाजे दूध लागेल व त्यासाठी रक्कम रु.२७,९४,५००/- इतका अंदाजे खर्च येईल असे कळविले आहे.

वरील नमुद सर्व वस्तुस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले होते.

१. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना ३१ मार्च २०२२ पर्यंतचा दिलेला पुरवठा आदेश रद्द करणेस
२. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांची बयाणा रक्कम रु. ३,००,०००/- जप्त करुन संस्थान जमा करणेस
३. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूध पुरवठा बंद केलेनंतर पुर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून ०८ दिवसासाठी रु. ३४.५० पैसे प्रती लिटर नुसार गरजे प्रमाणे खरेदी करण्यात येत असलेल्या दुध खरेदीस व येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस
४. नविन निविदा प्रक्रीया अंतिम होईपर्यंत ४५ दिवसांसाठी मंदिर चालू न झाल्यास खरेदी करावे लागणा-या अंदाजे ११००० लिटर दूध खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.३,७९,५००/- आणि मंदिर चालू झाल्यास ८१००० लिटर अंदाजे दूध खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.२७,९४,५००/- चे खर्चास व ही दूध खरेदी पूर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून रु. ३४.५० पैसे प्रती लिटर प्रमाणे करणेस
५. सप्टेंबर-२०२१ पासून ते ऑगस्ट-२०२२ पर्यंत टोंड गाय दूध खरेदीची नविन ई- निविदा प्रक्रीया राबविणेस व याकामी वर्तमानपत्रात द्यावयाचे जाहिरात खर्चास

वरील १ ते ५ प्रमाणे प्रस्तावित कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे दि.०६.०८.२०२१ रोजीच्या सभेसमोर सादर करण्यात आला होता. सदर सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

निर्णय क्रं.१४९- यावर सविस्तर चर्चा केली. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना समितीचे पुढील सभेसमोर बोलविण्यात यावे. प्रयोगशाळा अहवाल समितीसमोर सादर करण्यात आला.

वरील निर्णयाप्रमाणे मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना मा. तदर्थ समिती सभेपुढे बोलविण्यात येईल. तथापी मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दूध दि.२५.०७.२०२१ पासून बंद केलेमुळे दि.२५.०७.२०२१ पासून सदर दूध खरेदीबाबतचा अंतिम निर्णय होईपर्यंत मागील पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव व मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून विशेष अपवादात्मक बाब म्हणून त्याच दराने दूध खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबत दि.०६.०८.२०२१ रोजीच्या सभेत निर्णय झालेला नाही. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दूध बंद केलेमुळे पर्यायी व्यवस्था म्हणून मागील पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेकडून निविदेतील अंतिम दर रु. ३४.५० पैसे प्रती लिटर प्रमाणे करणेस दूध पुरवठा चालू आहे. तसेच शासन स्तरावर मंदिरे खुले करणेबाबतच्या हालचाली चालू आहेत. त्यामुळे शासनाचे मंदिरे खुले करण्याचे आदेश प्राप्त झाले तर मंदिराबरोबर संस्थानची कॅन्टीन सेवाही साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावी लागेल. तसेच सध्याही संस्थानचे दोन्हीही रुग्णालये व कोव्हीड सेंटर येथे चहा व दूध ही सेवा चालू आहे.

मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांनी त्यांचे दि. ३०.०७.२०२१रोजीच्या ई-मेल पत्राने रु. ३४.५० पैसे प्रती लिटर या दराने दूध पुरवठा करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना मा. तदर्थ समितीचे पुढील सभेत बोलावून याबाबतचा अंतिम निर्णय होईपर्यंत मागील पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव व मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून रु. ३४.५० पैसे प्रती लिटर या दराने कॅन्टीनचे गरजेप्रमाणे दूध खरेदीस मान्यता मिळणेसाठी सदर विषय चक्रीय पध्दतीने मा. तदर्थ समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

14/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

13/8 16/8/2021

मा. अध्यक्ष तदर्थ समिती, तसेच पुरवठा मिळावा याबाबतचे कोर्ट कार्यवाही की सहमत आहे काही तरतूद कार्यवाही करावे

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती
17/8/2021

I am told that notice was issued to the supplier to show cause. Auditing now proceeding, approval to get supply as proposed as temp. arrangement may be accorded

(सुधाकर योलगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अहमदनगर,
अध्यक्ष, तदर्थ समिती
16/8/2021

14/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रस्ताव व त्यावरील मा. अध्यक्ष व मा. सदस्य यांचे अभिप्राय वाचले. मा. अध्यक्ष महोदय यांनी सदरबाबत आपूर्ती केलेल्या व नमूद केलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

23/08/2021
(G. P. Bankar)
Assistant charity Commissioner (a)
member ad-hoc committee S.S.S.T
Shirdi.

आयत्या वेळेचा विषय क्र.- ७/2

भांडार विभाग

"मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषयः- संस्थानचे भांडार विभागाकडील शुद्ध तूप विक्रीसाठीचे Base Price बाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

संस्थानचे भांडार विभागाकडील लॉकडाऊनमुळे वापर न झालेले २३९.२५ क्विंटल शुद्ध तूप पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपूर, यांना परत देणेस व त्यांनी परत न घेतल्यास संस्थानने शुद्ध तुपाची खरेदी केलेली किंमत Base Price धरुन त्यापुढे लिलावाने येणा-या उच्चतम बोलीद्वारे सदरचे शुद्ध तूप विक्री करणेस दि.०६.०७.२०२१ रोजी मा. तदर्थ समितीची चक्रीय पद्धतीने मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेस अनुसरुन मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., भगवानपूर, यांचे संचालक श्री पोमील जैन यांचेशी संस्थानचे सदर तूप बदलून मिळणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी त्यांचा प्लॅन्ट बंद असल्यामुळे शुध्द तूप बदलून देणेस असमर्थता दर्शविली होती.

सदरचे २३९.२५ क्विंटल गाईचे शुद्ध तूप जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेसाठी मान्यता मिळालेली आहे. तथापि, या लिलावाला मर्यादा असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने संकेतस्थळावरून ई-निविदा कम लिलाव करण्याचे ठरले होते.

सदर शुद्ध तुपाची ई-निविदा कम लिलाव प्रकिया करण्यात येवून त्याला २ वेळा मुदतवाढ देवून फक्त १ ई-निविदा प्राप्त झाली होती. तथापि, सदर निविदाधारकाने सदर तूप संस्थानला खरेदी करावयाचे असे समजून ई-निविदा भरली होती. त्यामुळे याकामी पुन्हा ई-निविदा कम लिलाव प्रक्रिया करण्यात आली आहे. तथापि, सदर शुद्ध तुपाची वापराची मुदत संपलेमुळे Base Price म्हणजेच संस्थानचे खरेदीइतकी किंमत मिळेल का नाही? याबाबत शंका आहे. तसेच तूपाची मुदत संपल्यामुळे व Base Price मुळे सदर ई-निविदा कम लिलाव प्रक्रियेला प्रतिसाद मिळालेला नाही, असे दिसते.

सदर शुद्ध तूपाची वापर तारीख संपलेमुळे ई-निविदा जी प्रसिद्ध केली आहे, त्यामध्येही Base Price रु. २६,१५०/- नमुद केली आहे. ती काढून टाकावी, म्हणजे याकामी प्रतिसाद मिळेल कि नाही? याबाबत अंदाज येईल व सदर ई-निविदा कम लिलाव प्रकियेस प्रतिसाद मिळालेस प्राप्त झालेल्या दरापैकी उच्चतम दराने विक्री करावयाची अगर कसे? याबाबतचा अंतिम निर्णय होणेसाठीचा प्रस्तावही मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करावा लागेल.

तरी वरील वस्तुस्थिती विचारात घेता, सदर ई-निविदा कम लिलाव प्रकियेत Base Price रु. २६,१५०/- काढून टाकून निविदा कम लिलाव प्रक्रिया करणेस अगर प्रसिध्द केलेले ई निविदा कम लिलाव प्रक्रियेत सदर बेस प्राईस काढून टाकलेबाबत शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेसाठी सदर विषय मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पद्धतीने सादर.

13/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मंजूर

23/08/2021

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

17/8/2021

(भानुदास पोलवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

13/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

Approved.
16/8/2021

(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

"मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषयः- संस्थानचे भांडार विभागाकडील ४३१.७० क्विंटल शुद्ध तूप Base Price काढून टाकून ई-निविदा कम ई-लिलाव पध्दतीने विक्री करणेबाबत...

कोव्हीड-१९ चे लॉकडाऊनमुळे संस्थानचे भांडार व लाडू निर्मिती विभागाकडे सध्या खालीलप्रमाणे शुध्द तूपाचा साठा शिल्लक आहे, त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणेः-

अ.नं.	शिल्लक असलेले तुप (क्विंटल)	१५ किलोचे डब्यांची संख्या	दर (प्रती क्विंटल)	एकुण किंमत (रु.पै.)	मुदत संपण्याची तारीख
०१	२३०.२५ भांडार ०९.०० लाडू विभाग (बॅच नं. २५/२२.१०.२०)	१,५३५ ६० १,५९५	२६,१००/- २६,१००/-	६०,०९,५२५/- २,३४,९००/- ६२,४४,४२५/-	२१.०७.२०२१
०२	४३१.७० (बॅच नं. २८/२३.११.२०)	२,८७८	२६,१००/-	१,१२,६७,३७०/-	२२.०८.२०२१
०३	२१९.६० (बॅच नं. ०२/०५.०१.२१)	१,४६४	२६,१००/-	५७,३१,५६०/-	०४.१०.२०२१
	८९०.५५	५,९३७		२,३२,४३,३५५/-	

शासनाकडून मंदिरे भक्तांना दर्शनासाठी अजुनही बंद आहेत व शासनाचे मंदिरे खुली होण्यासाठी कधी आदेश होतील याबाबत निश्चितपणे काहीही सांगता येणार नाही.

सदर अनिश्चित परिस्थितीत वरील २३९.२५ क्विंटल शुध्द तुप मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि., भगवानपूर, यांनी बदलून न दिल्यास, वर्तमानपत्रात ७ दिवसाच्या मुदतीची जाहिरात प्रसिध्दी देवून सदर शुध्द तुपाची जाहीर लिलावाव्दारे उच्चतम दराने विक्री करणेस व प्राप्त होणारी रक्कम संस्थान जमा करणेस मा. तदर्थ समितीची चक्रीय पद्धतीने दि.०६.०७.२०२१ रोजी मान्यता मिळालेली होती. त्यास अनुसरुन मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. यांचेशी संपर्क साधला होता, परंतु त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे वरील अ.नं.१ मधील २३९.२५ क्विंटल शुध्द तूपाची ई-निविदा कम ई-लिलावाद्वारे संस्थानचा खरेदी दर Base Price नमूद करुन विक्री करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात आलेली होती. तथापि, त्यास प्रतिसाद मिळालेला नाही म्हणून Base Price काढून ई-निविदा कम लिलाव करण्याचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे दि.१६.०८.२०२१ रोजी चक्रीय पद्धतीने सादर केला होता. त्यास मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेली आहे. त्याप्रमाणे ई-निविदा कम ई-लिलाव प्रक्रिया शासनाचे संकेतस्थळावर ऑनलाईन चालू असून त्याची मुदत दि.०७.०९.२०२१ रोजी संपत आहे.

वरीलप्रमाणे तक्त्यातील अ.नं.१ साठी ई-निविदा कम लिलाव प्रक्रिया ऑनलाईन चालू आहे.

शासनाचे मंदिर सुरु होण्याचे आदेश झाले व लाडू विक्री आणि मोफत बुंदी प्रसाद पाकिटे वाटप जर लगेचच चालू झाले तर सदर शुध्द तूपाचा वापर होऊन सदर तूपाचा साठा काही प्रमाणात संपू शकतो. तथापि, धार्मिक स्थळे चालू होणे, बुंदी व लाडू प्रसाद वाटप सुरु होणे या सर्व बाबींबाबत सध्या तरी अनिश्चितता असलेमुळे वरील अ.नं.२ मध्ये नमूद केलेप्रमाणे शिल्लक असलेले शुध्द तूप संस्थानने खरेदी केलेल्या प्रती क्विंटल रु.२६,१००/- दर Base Price निश्चित करुन त्यापुढे उच्चतम दराने ई-निविदा कम ई-लिलाव अगर ई-लिलावाद्वारे विक्री करणेस मान्यता मिळणेसाठीचा विषय चक्रीय पध्दतीने तयार करण्यात आला होता. तथापि, दि.३१.०७.२०२१ रोजी मा.तदर्थ समितीची सभा असलेमुळे या विषयावर चक्रीय पध्दतीने निर्णय होणेऐवजी हा विषय दि.३१/७/२०२१ रोजी होणारे मा.तदर्थ समितीचे सभेतील आयत्या वेळेचे विषयामध्ये समाविष्ट करण्यात आला होता. तथापि, वेळेअभावी या विषयावर निर्णय होऊ शकला नाही.

वरील सभेत वरील अ.नं.२ चे शुध्द तूपाविषयीचा निर्णय न झालेमुळे व सदर शुध्द तूपाची मुदत या महिन्यातच संपणार असलेमुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी या दुस-या टप्प्यातील शुद्ध तुप विक्रीची ऑनलाईन विक्रीसाठीची ई-निविदा कम लिलाव प्रक्रियेबाबतची फाईल त्वरीत सादर करणेचे समक्ष निर्देश दिलेले होते. या निर्देशास अनुसरुन दुस-या टप्प्यातील ४३१.७० क्विंटल शुद्ध तुप विक्रीची ई-निविदा कम लिलाव प्रक्रियेसाठी मा. तदर्थ समितीचे पुढील सभेत मान्यता मिळणेचे अधीन राहून दि.०५.०८.२०२१ ते दि.१२/८/२०२१ या कालावधीसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया करणेत आलेली होती.

दरम्यान भांडार विभागाकडील दुस-या टप्प्यातील शिल्लक ४३१.८५ क्विंटल शुद्ध तूप संस्थानने खरेदी केलेल्या प्रती क्विंटल रु. २६,१००/- दर Base Price निश्चित करुन त्यापुढे उच्चतम दराने ई-निविदा कम ई-लिलाव

अगर ई-लिलावाद्वारे विक्री करणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव दि.०६.०८.२०२१ रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर केला असता, त्यावर निर्णय क्र.१५१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा केली, मिलीटरी, नेव्ही, एअर फोर्स प्रोव्हिजन सप्लायर्स, गुरुद्वारा वगैरे हे तुप झेऊ शकतात. त्यांचेकडे संपर्क साधुन त्यांना खरेदी किंमतीमध्ये (Base Price) दुस-या बॅचचे ४३१.८५ क्विंटल तुप विक्री करण्यासाठी प्रयत्न करावेत."

वरील निर्देशानुसार शुद्ध तुपाचे विक्रीकरीता इंडियन आर्मी, इंडियन नेव्ही, इंडियन एअरफोर्स, गुरुद्वारा, अमृतसर व गुरुद्वारा नांदेड यांना दि.१६.०८.२०२१ रोजीचे पत्रान्वये संस्थानकडे उपलब्ध असलेले शुद्ध तुपाचे Details कळवून संस्थानला प्राप्त झालेले खरेदी दराने आपण सदर शुद्ध तुप खरेदी करण्यास इच्छुक असल्यास तसे कळविण्याची विनंती केलेली आहे. मात्र अद्यापपावेतो त्यांचेकडून काहीही प्रतिसाद मिळालेला नाही. मात्र सदर ४३१.७० क्विंटल शुद्ध तुपाची दि.२२.०८.२०२१ रोजी मुदतही (Expiry) संपलेली आहे.

तिरुमला तिरुपती देवस्थानने त्यांचेकडे गाईचे शुध्द तूपाचा आवश्यक साठा आहे व त्यांचा कोव्हीड-१९ चे परिस्थितीमुळे वापरही सध्या कमी आहे. त्यामुळे संस्थानकडून शुध्द तूप ते खरेदी करु शकणार नसलेबाबत व त्याबद्दल दिलगीर असल्याचे दि.२७.०७.२०२१ चे डिजीटल साईन केलेले पत्राने संस्थानला कळविले आहे.

आता संस्थानकडे शिल्लक असलेल्या शुध्द तूपासाठी पुरवठादाराकडून बदलून घेणे व अगर Base Price काढून टाकून पुन्हा याकामी ई-निविदा कम लिलाव किंवा ई-लिलाव पध्दतीने सदर शुध्द तूपाची विक्री करणे हेच पर्याय सध्या उपलब्ध आहेत. तथापि, यामध्ये पहिला पर्याय पुरवठादाराकडून शुध्द तूप बदलून घेणेबाबत पुरवठादार मालक श्री.पोमिल जैन यांना पुन्हा मोबाईल फोनवर विनंती केली होती, त्यावेळी त्यांनी ते त्यांचा शुध्द तूपाचा प्लॅन्ट सुरु झालेनंतर सदरचे सर्व शुध्द तूप बदलून देणेस तयार असल्याचे सांगितले होते. म्हणून त्यांना त्यांचा प्लॅन्ट कधी चालू होईल व संस्थानला सदर शुध्द तूप बदलून घेणेकामी येणारे खर्चाची माहिती कळविणेची विनंती लेखी पत्राद्वारे केली आहे. याबाबत त्यांचेकडून लेखी पत्राद्वारे संस्थानला कळविणेबाबत पाठपुरावा केला असता त्यांनी मी लेखी पत्र देऊ शकणार नाही, परंतु प्लॅन्ट सुरु झालेनंतर सदर शुध्द तूप मी संस्थानला बदलून देईल असे दि.२७.०८.२०२१ रोजी फोनवर सांगितले आहे.

मा.तदर्थ समितीचे मान्यतेस अधीन राहून सदर ४३१.७० क्विंटल शुद्ध तुपाचे विक्रीसाठीचे वर नमूद केलेली ई-निविदा कम ई-लिलाव प्रक्रिया करुन सदर प्रक्रियेला दोन वेळा मुदतवाढ देवूनही प्रतिसाद मिळालेला नाही. तथापि, आता सदर शुद्ध तुपाची वापराची मुदत (Expiry) संपलेमुळे त्याचे विक्रीतुन Base Price म्हणजेच संस्थानचे खरेदी इतकी किंमत मिळेल की नाही? याबाबत शंका आहे. तसेच तूपाची मुदत संपल्यामुळे व Base Price मुळे सदर ई-निविदा कम लिलाव प्रक्रियेला प्रतिसाद मिळालेला नसावा, असे दिसते. त्यामुळे बेस प्राईस काढून टाकून एकदा सदर शुध्द तूपासाठी ई-निविदा कम लिलाव प्रक्रिया करावी असे मत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, दुस-या टप्प्यातील ४३१.७० क्विंटल शुद्ध तुपाचे विक्रीसाठी ई-निविदा कम लिलाव प्रकियेत रु. २६,१००/- ही Base Price काढून टाकून ई-निविदा कम लिलाव प्रकिया करणेस मान्यता मिळणेसाठी व सदर शुध्द तूपासाठी मा. तदर्थ समितीचे अधीन राहून वर नमूद केलेप्रमाणे केलेले ई-निविदा कम लिलाव प्रक्रियेस मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पद्धतीने सादर.

29/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रस्ताव पाहिला असता अन्य पर्याय उपलब्ध नसलेने मूळ किंमत काढुनच सदरी देणेस हरकत नाही. त्याप्रमाणे ई-निविदा करावी.

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती
01/09/2021

मा. कमकक्ष तदर्थ समिती यांचे मताशी सहमत आहे व प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती
29/8/2021

29/8/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

As no other options are shown, approval is given to remove the base price for extending the

(सुधाकर यालगंडडा) 01.09.2021
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

आयत्या वेळेचा विषय क्र. ७/४

मा. तदर्थ समितीचे समक्ष चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर

(प्रकाशने विभाग)

विषय – संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि. ०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.. ..

टिपणी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूद -

या अधिनियमातील कलम क्रमांक १७ (२)(ठ) मध्ये, *" श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"* अशी तरतूद आहे.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन, संस्थान व्यवस्थापनामार्फत दरवर्षी संस्थानकडून साईभक्तांना पुरविणेत येणा-या सोयी-सुविधा, वर्षभरात साई मंदिरात साजरे करणेत येणारे उत्सव, रथ-पालखी व इतर दैनंदिन कार्यक्रम या विषयाची सर्व माहितीने परिपूर्ण अशी श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका छपाई करुन, साई भक्तांना वाजवी व माफक दरात सशुल्क विक्री करणेत येतात. दरवर्षी अशा प्रसिध्द करणेत येणा-या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांना साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळतो.

(अ) विषयाची पूर्वपीठीका व सद्य:स्थिती –

(०१) प्रकाशने विभागाकडील दिनांक २५ मार्च, २०२१ व दिनांक १३ मे, २०२१ रोजीचे मंजूर टिपणीनुसार, विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे विचारार्थ चक्रीय पध्दतीने दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी सादर करणेत आलेला होता. तथापि, त्यावर मा. तदर्थ समितीने, विषयांकित प्रस्ताव नियमित बैठकीपुढे सादर करावा, असा निर्णय दिलेला होता.

(०२) त्यानुसार विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे नियमित सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता. विषयांकित प्रस्तावावर मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेत साधकबाधक चर्चा होऊन, **निर्णय क्रमांक ९८** खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे -

> *".. .. यावर सविस्तर चर्चा केली, ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यांत आली. श्री साई दैनंदिनी छपाई करण्यापुर्वी त्याचा मसुदा मंजूरीसाठी समिती समोर आणावा. "*

(०३) सन २०२२ करीता श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या श्री साईबाबा दिनदर्शिका छपाई करुन भक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेपुढील विषयांकित प्रस्तावानुसार, खालील **तक्ता क्रमांक ०१** मधील **रकाना क्रमांक ६ ते ८ मध्ये** नमूद केलेप्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई संख्येस व त्याकामी येणारे अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

तक्ता क्रमांक ०१

अ. क्र.	उप क्रमांक	तपशील	सन २०२१ छपाई संख्या	सन २०२१ मंजूर छपाई दर / प्रती नग	सन २०२२ करीता प्रस्तावित छपाई संख्या	सन २०२२ करीता अंदाजित छपाई दर / प्रती नग	सन २०२२ अंदाजित छपाई खर्च रक्कम रुपये
१	२	३	४	५	६	७	८
०१	–	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)					
	०१	दैनंदिनी – मराठी	१,००,०००	५७.००	१,००,०००	७४.००	७४,००,०००/-
	०२	दैनंदिनी – हिंदी	०,१५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०३	दैनंदिनी – इंग्रजी	०,१०,०००	५७.००	०,२५,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०४	दैनंदिनी – तेलगू	०,२५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२९,६०,०००/-
		अ.क्र. ०१ करीता एकूण	१,५०,०००	--	२,२५,०००	--	--
०२	--	श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज	छपाई नाही	२३.४०	०,५०,०००	३१.००	१५,५०,०००/-
०३	--	श्री साई दिनदर्शिका (०१ पानी / मोठे)	५०,०००	१४.५०	२,००,०००	१९.००	३८,००,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कलेंडर (८ पेजेस)	छपाई नाही	१४२.००	१०,०००	१८५.००	१८,५०,०००/-
०५	--	श्री साईबाबा मेटपेट वॉल कलेंडर (७ पेजेस)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	२२४.००	२२,४०,०००/-
०६	--	श्री साईबाबा थ्री डी वॉल कलेंडर (०१ पानी)			३,०००	२३०.००	६,९०,०००/-
०७	--	श्री साईबाबा थ्री डी डेस्क कॅलेंडर (०७ पानी)	छपाई नाही	११०.००	१०,०००	१४३.००	१४,३०,०००/-
०८	--	श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर (१४ पानी)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	७०.००	७,००,०००/-
०९	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (कार्यालय / ०६ पानी)	छपाई नाही	२१.५०	१०,०००	२८.००	२,८०,०००/-
१०	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती / ०६ पानी)	छपाई नाही	११.००	१०,०००	१५.००	१,५०,०००/-
११	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स (०७ पानी)	छपाई नाही	९.१५	१५,०००	१२.००	१,८०,०००/-
						एकूण रक्कम रुपये -	२,९५,२०,०००/-

पान २ वर .. .. कृ.मा.प. ...

(०४) मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९८ नुसार, सन २०२२ करीता छपाई करावयाचे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामासाठी प्रसिध्द करावयाचे ई-निविदेचा मसुदा दिनांक ०९ ऑगष्ट, २०२१ रोजी निविदा दस्तऐवज तपासणी समितीकडून तपासणी करुन खालील निर्देशांसह मान्यता मिळालेली आहे –

"... *१) खरेदी नियमावली दि.०१.१२.२०१६ नुसार निविदा शुल्क रू.१५,०००/- असावे.*

२) वार्षिक उलाढाल - मागील ३ आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल किमान रू. ३ कोटी असावी.

३) सादर करावयाचे दर हे सर्व करांसहित व शिर्डी पोहोचचे असावेत. पुरवठा आदेश दिल्यानंतर निविदेमध्ये / पुरवठा आदेशात नमूद दरामध्ये ज्या करांचार समावेश असेल त्यांचे दरामध्ये शासनाने काही बदल (कमी-जास्त) केल्यास त्यानुसार पुरवठा आदेशातील दरामध्ये बदल करण्यात येईल. सदर बदल हा शासनाचे नोटिफिकेशन ज्या दिनांकाला निर्गमित होईल त्या दिनांकापासून पुढील कामासाठी लागु राहिल."

उपरोक्त निर्देशांनुसार, ई-निविदेच्या मसुद्यात उचित बदल करणेत आलेला असून, अंतिम ई-निविदा मसुदा मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे.

(०५) तसेच, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील मूळ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, विषयांकित प्रस्तावास व मा. तदर्थ समितीचे निर्णयास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी दिवाणी अर्ज (Civil Application) दाखल करणेबाबत विधी विभागास दिनांक २३ ऑगष्ट, २०२१ रोजी पत्र देणेत आलेले असून, दिवाणी अर्ज दाखल करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

(ब) विभागाचा अभिप्राय –

(०१) सन २०२१ मध्ये मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस मान्यतेस्तव दिवाणी अर्ज दिनांक ०९ जुलै, २०२० रोजी दाखल करणेत आलेला होता. तथापि, तथापि, माहे मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने, संस्थानमार्फत दाखल करणेत आलेला दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० यावर मा. न्यायालयात सुनावणी होऊ शकली नाही व त्याबाबत आदेश प्राप्त झाले नाहीत.

(०२) दरम्यानचे कालावधीत, संस्थान प्रशासनामार्फत सन २०२१ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेसाठी माहे डिसेंबर, २०२० / माहे जानेवारी, २०२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून ई-निविदा मागणी करणेत आली.

(०३) सन २०२१ – दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मागणी करणेत आलेल्या ई-निविदांच्या तांत्रिक व व्यावसायिक निविदा संस्थानचे प्रशासकीय स्तरावरील खरेदी समितीपुढे अनुक्रमे दिनांक १२/०१/२०२१ व दिनांक १४/०१/२०२१ रोजी उघडणेत आल्या. सदर ई-निविदांचा अहवाल मा. तदर्थ समितीचे समक्ष दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेत आला असता, त्यावर मा. तदर्थ समितीने " *मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.*" असा निर्णय पारित केला.

(०४) सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामी मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी घेतलेल्या सुधारित निर्णयावर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समक्ष मूळ दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० वर सुनावणी होऊन, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी मान्यता दिली.

(०५) या सर्व प्रक्रियेत बराचसा किंबहुना खूपच मोठा कालावधी व्यतित झाल्याने, परिणामी सन २०२१ करीता प्रशासकीय स्तरावरील मंजूर टिपणी दिनांक २२ जानेवारी, २०२१ व दिनांक २६ जानेवारी, २०२१ अन्वये एकूण ०८ प्रकारचे प्रकाशनापैकी फक्त श्री साई दैनंदिनी – २०२१ (छपाई संख्या - १५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका – मोठी १ पानी (छपाई संख्या – ५०००० प्रती) याकरीता अनुक्रमे दिनांक २३ जानेवारी, २०२१ / ०१ एप्रिल, २०२१ व दिनांक ०२ मार्च, २०२१ रोजी कार्यादेश देणेत आले. या कार्यादेशानुसार माहे मार्च / एप्रिल, २०२१ अखेर छपाई पूर्ण होऊन, दैनंदिनी व दिनदर्शिका साईभक्तांसाठी वाजवी किंमतीत सशुल्क उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

(०६) परंतु, माहे एप्रिल, २०२१ मध्ये पुनःश्च कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने, मा. शासनाने घातलेल्या टाळेबंदी सदृश्य कडक निर्बंधामुळे दर्शन व इतर व्यवस्था ठप्प झाल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका विक्रीत मोठ्या प्रमाणावर घट झाली. त्यामुळे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०६ ऑगष्ट, २०२१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सदरहू दैनंदिनी रुपये २५/- मात्र प्रती नग या नाममात्र दराने विक्री सुरु करणेत आलेली आहे. आजरोजी दैनंदिनी विक्रीत अल्पशी वाढ दिसत असली तरी, परंतु अद्यापपावेतो यास पाहिजे तसा प्रतिसाद मिळालेला नाही.

(०७) आता विषयांकित प्रस्तावास अनुसरुन, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, **परिच्छेद अ** मधील श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका - २०२२ चे छपाईकामी, **तक्ता क्रमांक ०१** मध्ये नमूद केलेनुसार प्रस्तावित केलेल्या संख्येप्रमाणे छपाई करणेस मान्यता मिळालेली आहे.

पान ३ वर ....

(०८) संस्थानमार्फत दरवर्षी दैनंदिनी व दिनदर्शिका भक्तांना सशुल्क उपलब्ध करुन दिल्या जातात, याबाबतचा पूर्वीचा अनुभव पाहतां, माहे ऑक्टोबर (दसरा, दिवाळी व नाताळ, नववर्ष दिना ईत्यादीचासलग सुट्टयांचा कालावधी) ते माहे जानेवारी या कालावधीत नवीन वर्षानिमित्त भक्तांचा दैनंदिनी व दिनदर्शिका खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळून, त्याची विक्री मोठया प्रमाणावर होत असते. परंतु, सदर गर्दीचा कालावधी उलटून गेल्यास आणि दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करणेस खूपच उशीर झाल्यास, त्याच्या विक्रीवर निश्चितच परिणाम होतो.

(०९) या सर्व बाबींचा विचार करुन, मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजीचे निर्णयानुसार, सन २०२२ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका वेळेत उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळेपावेतो, मा.न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून, विषयांकित दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामी कालापव्यय होऊ नये म्हणून प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल तसेच उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मधील छपाई करावयाच्या दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबत मा. उच्च न्यायालय ज्या पध्दतीने मान्यता देईल, त्यानुसार विषयांकित साहित्यांची छपाई करणेसाठी कार्यादेश देता येईल आणि याबाबत प्रसिध्द करावयाचे निविदेतील अटी-शर्ती मध्ये याबाबीचा सविस्तररित्या समावेश करता येईल. तसेच वर नमूद केलेल्या साहित्यांचा अंतिम छपाई कार्यादेश पारित करणेपूर्वी, कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाविषयी त्या-त्या वेळेची वस्तुःस्थिती लक्षांत घेऊन, परिस्थितीनुरुप विषयांकित साहित्य छपाई करणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेता येईल.

(क) विभागाचा प्रस्ताव -

उपरोक्त परिच्छेद अ व परिच्छेद ब मध्ये नमूद केलेल्या सविस्तर विवेचनास अनुसरुन, **विषयांकित दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी अर्ज (Civil Application) दाखल करणेची कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु करणेत आलेली आहे. त्यानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशास / निर्णयास अधिन राहून, प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया प्रशासकीय स्तरावर सुरु करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समक्ष चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर.**

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
27/8/21

दिनांक -
निर्णय -

Needs discussion about numbers of diary. Hence put in Regular meeting
01/09/2021
(श्रीमती गीता बनकर)
सदस्य, तदर्थ समिती -तथा-
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

Needs to be discussed in regular meeting about number of diaries
6/9/2021
(भानुदास पालवे)
सदस्य, तदर्थ समिती -तथा-
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

27/8/21
(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
सदस्य सचिव, तदर्थ समिती -तथा-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

संक्षेपाने चर्चा करण्याची वरज आहे म्हणून विषय नियमित बैठकीत ठेवावा.
01.09.2021
(सुधाकर यलगाडडा)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर

आयत्या वेळेचा | विषय क्र.- १/ ५

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर
विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

टिपणी:-

विषय – शैक्षणिक वर्ष २०२० -२१ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTEAct, 2009) अन्वये इयत्ता १ लीचे एकूण २३६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.....

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधान मंडळाचा प्रसिध्द केलेल्या अधिनियमामधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक – शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा) अन्वये २५ % प्रवेश देणे, यामध्ये वंचित गटातील व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी मोफत प्रवेश दिला जातो. वंचित गटातील बालक याचा अर्थ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती बालके व दुर्बल घटकांतील बालके याचा अर्थ ज्या बालकांच्या माता पित्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या धार्मीक अल्पसंख्याकसह इतर बालके असा होय. अशा इयत्ता १ ली ते ८ वी प्राथमिक विभागातील बालकांना प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देणे चालू ठेवणेत यावे असे अधिनियमात नमूद केलेले आहे.

अ] संदर्भ क्रं. १ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –अ, मे २५, २०१२/ जेष्ठ 4 शके १९३४ अधिनियम पत्रामधील पान नं. ४ (छ) मुद्यानुसार मोफत जागेवर प्रवेश दिल्यावर, माहिती पत्रकाचे मुल्य, कोणतीही नोंदणी फी, शिकवणी फी किंवा कोणतेही इतर आकार किंवा निधी , पालक किंवा बालक यांचेकडून घेता येणार नाही असे नमूद करण्यात आलेले असल्याने सदर पालकांकडून शालेय फी घेता येणार नाही.

ब] संदर्भ क्रं. ०२ अध्यादेश मुद्दा क्रं. ०३ नुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल व वंचीत घटकातील बालकांना खाजगी विना अनुदानीत व खाजगी कायम विना अनुदानीत शाळांमध्ये (Private unaided Non-minority schools, PrivatePermanent Unaided non- minority schools) किमान २५ % ठेवण्याची तरतुद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची तरतुद आहे. तसेच पान नं. ६ मुद्दा क्रं. १८ नुसार २५ % प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशीत होणा-या विद्यार्थ्यांची शैक्षणीक शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे निश्चित केलेल्या दरानुसार शाळांना करण्यात येईल.

क] संदर्भ क्रं. ०३ मधील पान नं. ३ आ (५) नुसार, ऑनलाईन प्रक्रियेत शाळेने केलेल्या नोंदणीची पडताळणी संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी. ज्या शाळा २५ % प्रवेशाकरीता पात्र आहेत परंतु नोदंणी करत नाहीत किंवा Entry Level स्तरावरील एकुण प्रवेश क्षमतेच्या २५ % जागा उपलब्ध करुन देणार नाहीत अशा शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी तात्काळ नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याबाबत/ शाळेची मान्यता काढण्याबाबत नोटीसा द्याव्यात. ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेत लॉटरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याला शाळा प्रशासनाने नाकारल्या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी तपासणी करावी व शाळा प्रशासन हेतू पुरस्पर प्रवेश नाकारल्याचे आढळल्यास नियमाप्रमाणे शाळा मान्यता काढण्याची कारवाई करावी.

पानं नं. २ वर.....

सन २०१५ -१६ ते सन २०१९-२० अखेर आर.टी. ई. नियमानुसार शाळेत मोफत प्रवेशाबाबतची प्रक्रीया खालीलप्रमाणे राबविण्यात आलेली असून त्याबाबतचा तपशिलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

शैक्षणिक वर्ष	इयत्ता	३ तुकडी मान्यते नुसार झालेले एकूण झालेले प्रवेश	२५ % प्रमाणे पात्र ठरले ले एकूण मोफत झाले ले प्रवेश	मा. व्य. समितीने संबधित वर्षात प्रशासकीय मंजूरीने ठरवून दिलेले शालेय शुल्क	यादी जाहिर होणेपुर्वी पालकां नी भरलेली शालेय फी विद्यार्थी संख्या	यादी जाहिर होणेपुर्वी पालकांनी भरलेली शालेय फी एकूण रक्कम	शासनाकडून शाळेला संबधित वर्षाचे येणे असलेले एकूण शालेय शैक्षणिक शुल्क	शासनाकडून शाळेला संबधित वर्षात आज पर्यंत जमा झालेले एकूण शालेय शैक्षणिक शुल्क
१	२	३	४	५	६	७	८	९
२०१५-१६	१ ली	१५६	३९	रु. ३२७०/-	३९	१२७५३०	१,२७, ५३०	१,२७,५३०
सन २०१५-१६ मध्ये पालकांनी भरलेली शै. फी रु. १,२७,५३०/- दि. ०१/०६/२०१८ रोजीचे प्रशासकीय मंजूर टिपणीने संबधित ३९ पालकांचे बॅंक खाती रक्कम जमा करणेत आलेली आहे. कार्यवाही पूर्ण								
२०१६-१७	१ ली	१५६	३९	रु. ३६००/-	०५	१६२००	१,४०,४००	१,४०,४००
२०१६-१७	२ री	१५६	३८	रु. ३६००/-	११	३२४००	१,३६,८००	१,३५,९०७
एकूण रु.	------	------	७७	------		४८६००	२,७७,२००	२,७६,३०७
सन २०१६-१७ इ. २ री १ विद्यार्थी शाळा सोडून गेला आहे.								
सन २०१६-१७ मध्ये पालकांनी भरलेली शै. फी एकूण रु. ४८६००/- दि. ०१/०६/२०१८ रोजीचे प्रशासकीय मंजूर टिपणीने संबधित १६ पालकांचे बॅंक खाती रक्कम जमा व उर्वरीत रक्कम संस्थान खाती जमा आहे. सदर वर्षातील हिशोब कार्यवाही पूर्ण झालेली आहे.								
सन २०१७ -१८								
२०१७-१८	१ ली	१५६	३९	रु. ३९६० /-	---	----	१,५४,४४०	-----
२०१७-१८	२ री	१५६	३९	रु. ३९६० /-	---	----	१,५४,४४०	-----
२०१७-१८	३ री	१५६	३७	रु. ४१००/-	०१	४१००	१,५१,७००	-----
एकूण रु.	------	------	११५	------	०१	४१००	४,६०,५८०	-----
सन २०१७-१८ इ. ३ री २ विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत.								
यादी जाहिर होणेपुर्वी १ विद्यार्थ्यांने फी भरलेली असून ती रक्कम रु. ४१००/- परत करावी लागणार आहे.								
सन २०१८-१९								
२०१८-१९	१ ली	१५६	३९	रु. ४३६० /-	०६	२६१६०	१,७०,०४०	-----
२०१८-१९	२ री	१५६	३७	रु. ४३६० /-	००	००	१,६१,३२०	-----
२०१८-१९	३ री	१५६	३८	रु. ४५१०/-	००	००	१,७१,३८०	-----
२०१८-१९	४ थी	१५६	३४	रु. ४५१०/-	००	००	१,५३,३४०	-----
एकूण रु.	------	------	१४८	------	०६	२६१६०	६,५६,०८०	-----
सन २०१८-१९ इ. २ री – २ विद्यार्थी , इ. ३ री – १ विद्यार्थी, इ. ४ थी - ५ विद्यार्थी असे एकूण ८ विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत.								
यादी जाहिर होणेपुर्वी ६ विद्यार्थ्यांनी फी भरलेली असून ती रक्कम रु. २६१६०/- परत करावी लागणार आहे.								
सन २०१९-२०								
२०१९-२०	१ ली	२५६	६१	रु. ४८००/-	०४	१२०००	२, ९२, ८००	-----
२०१९-२०	२ री	१५६	३९	रु. ४८००/-	---	---	१, ८७, २००	-----
२०१९-२०	३ री	१५६	३७	रु. ४९६०/-	---	---	१,८३,५२०	-----
२०१९-२०	४ थी	१५६	३६	रु. ४९६०/-	---	---	१,७८,५६०	-----
२०१९-२०	५ वी	१५६	३४	रु. ५३२०/-	---	---	१,८०,८८०	-----
एकूण रु.	---	----	२०७	-----	०४	१२०००	१०,२२,९६०	-----
सन २०१९- २०२० इ. ३ री – २ विद्यार्थी, इ. ४ थी - ३ विद्यार्थी , इयत्ता ५ वी – ५ विद्यार्थी असे एकूण १० विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत.								
यादी जाहिर होणेपुर्वी ४ विद्यार्थ्यांनी फी भरलेली असून त्यामध्ये ०३ विद्यार्थ्यांनी रु. २४००/- व १ विद्यार्थी रु. ४८००/- अशी एकूण रु. १२०००/- इतकी रक्कम शैक्षणिक फी जमा आहे ती रक्कम परत करावी लागेल.								

पान नं. ३ वर.....

विभागाची मागणी:- प्रास्ताविकेमध्ये 'अ','ब', व 'क' नुसार नमुद केलेप्रमाणे व शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमा नुसार शासनाच्या ऑनलाईन प्रक्रीयेनुसार दिनांक २४ जुन,२०२० ते दिनांक २० नोव्हेंबर,२०२० अखेर तीन टप्यामध्ये मोफत प्रवेश प्रकीया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आलेली आहे.

ऑनलाईन मोफत प्रवेश प्रक्रियेद्वारे पंचायत समिती कार्यालय, राहाता यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता इयत्ता १ ली साठी एकूण २३६ प्रवेश संख्येनुसार 25 % प्रमाणे एकूण ५९ जागा ऑनलाईन निश्चित केलेल्या आहेत. त्यापैकी आर. टी. ई. २५% अंतर्गत एकूण ५९ जागा प्रवेशित झालेल्या आहेत. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षात आर. टी. ई. अंतर्गत यापुर्वी प्रवेशीत झालेल्या परंतू संबधित वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाबाबत तपशिलवार तक्ता खालीलप्रमाणे मोफत प्रवेश करावे लागतील असे नम्र मत आहे.

तक्ता क्र. ०१. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ आर. टी. ई. अंतर्गत एकूण २६६ मोफत प्रवेश तक्ता:-

शैक्षणिक वर्ष	इयत्ता	३ तुकडी मान्यते नुसार झालेले एकूण झालेले प्रवेश	२५ % प्रमाणे पात्र ठरलेले एकूण मोफत झालेले प्रवेश	मा. व्य. समिती सन २०१८ -१९ चे स्कुल फी मध्ये १० % वाढ करुन शालेय शुल्क	यादी जाहिर होणेपुर्वी पालकांनी भरलेली शालेय फी विद्यार्थ्यांची संख्या	यादी जाहिर होणेपुर्वी पालकांनी भरलेली शालेय फी एकूण रक्कम	शासनाकडून शाळेला येणे असलेले शालेय शुल्क
२०२०-२१	१ ली	२३६	५९	रु. ४८००/-	---	----	२,८३,२००/-
२०२०-२१	२ री	२५६	६१	रु. ४८००/-	---	---	२,९२,८००/-
२०२०-२१	३ री	१५६	३९	रु. ४९६०/-	---	---	१,९३,४४०/-
२०२०-२१	४ थी	१५६	३७	रु. ४९६०/-	---	---	१,८३,५२०/-
२०२०-२१	५ वी	१५६	३६	रु. ५३२०/-	---	---	१,९१,५२०/-
२०२०-२१	६ वी	१५६	३४	रु. ५३२०/-	---	---	१,८०,८८०/-
एकूण रु.	------		२६६	------	---	----	१३,२५,३६०/-

(एकूण अक्षरी तेरा लाख पंचवीस हजार तीनशे साठ रुपये मात्र)

तक्ता क्र. ०२. शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमानुसार वर्ष निहाय इयत्ता नुसार दिलेले प्रवेश व शासनाकडून आजतागायत वर्ष निहाय येणे असलेली व प्राप्त झालेली एकूण रक्कम तपशिल खालीलप्रमाणे आहे.

शैक्षणिक वर्ष	इयत्ता वर्गानुसार २५ % प्रमाणे मोफत दिलेले एकूण प्रवेश	शासनाकडून येणे असलेले संबधित वर्षाचे शैक्षणिक शुल्क रुपये	शासनाकडून आज अखेर प्राप्त झालेले एकूण शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती	शासनाकडून येणे बाकी असलेले एकूण शैक्षणिक शुल्क रुपये
२०१५-१६	१ ली	१,२७,५३०/-	१,२७,५३०/-	--------
२०१६-१७	१ ली ,२ री	२,७७,२००/-	२,७६,३०७/-	८९३/-
२०१७-१८	१ ली, २ री, ३ री	४,६०,५८०/-	----	४,६०,५८०/-
२०१८-१९	१ ली, २ री, ३ री, ४थी	६,५६,०८० /-	----	६,५६,०८० /-
२०१९-२०	१ ली, २ री, ३ री,४ थी, ५ वी	१०,२२,९६०/-	----	१०,२२,९६०/-
२०२०-२१	१ ली, २ री, ३ री,४ थी, ५ वी व इयत्ता ६ वी	१३,२५,३६०/-	----	१३,२५,३६०/-
एकूण		३८,६९,७१०/-	४,०३, ८३७/-	३४,६५,८७३/-

(एकूण अक्षरी चौतीस लाख पासष्ठ हजार आठशे त्र्याहात्तर रुपये मात्र)

पान नं. ४ वर.....

उपरोक्त **तक्ता क्रमांक ०१** मध्ये नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTEAct, 2009) अन्वये इयत्ता १ ली ते इयत्ता ६ वी पर्यंत एकूण २६६ मोफत प्रवेश देण्यात आलेले आहे.

तसेच **तक्ता क्रमांक ०२** मध्ये नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते सन २०२०-२१ अखेर शासनाकडून येणे असलेल्या व प्राप्त झालेल्या वषै निहाय शुल्क प्रतिपुर्ती बाबतचा तपशिल सादर केलेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० अखेर शासनाकडून येणे असलेली शुल्क प्रितपुर्ती मिळणेकामी जा. न. एसएसएस/ वशी-इंमिस्कुल / ७६२/ २०१९ दि. ०३ जुन २०१९ , जा. न. एसएसएस/ वशी-इंमिस्कुल / ४३०/ २०२० दि. १७ जानेवारी, २०२० , जा. न. एसएसएस/ वशी-इंमिस्कुल / १५०४ / २०२० दि. २४ सप्टेंबर , २०२० अन्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान – आर्थिक व प्रशासकीय बाब म्हणून करणे गरजेचे आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:- प्रास्ताविकेमध्ये 'अ','ब', व 'क' नुसार नमुद केलेप्रमाणे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमा नुसार.....

१. शैक्षणिक वर्ष २०२० – २१ मध्ये इयत्ता १ ली या वर्गासाठी अधिनियम-२००९ (RTE Act-2009) अंतर्गत २५% प्रमाणे प्रवेशीत झालेले **एकूण ५९** विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनेनुसार मोफत प्रवेश देणेस मान्यता मिळणेकामी,

२. तसेच यापुर्वी २५% आर.टी.ई. अंतर्गत मोफत देण्यात आलेले प्रवेश पुढील वर्गात नियमीत करणेकामी,

३. २५% आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणीक शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे निश्चित केलेल्या दरानुसार संस्थान खाती जमा करणेस मान्यता मिळणेकामी,

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत बाबीना चक्रीय पद्धतीने मंजूरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर,

16/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रस्ताव मंजूर.

23/03/2021
(गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

25/3/2021
(भानुदास पालवे)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग
सदस्य, तदर्थ समिती

16/3/21
(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

23/3
(श्रीकांत अणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

आयत्यावेळेचा विषय क्र.- ७/ ९

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतिने निर्णयार्थ सादर

सामान्य प्रशासन विभाग, (वशी-११)

विषय :- संस्थान मार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवातील निमंत्रण पत्रिका, दैनंदीन टपाल उदी-प्रसादपाकिटे, मनिऑर्डर भक्तमंडळ सभासदांना पाठविणेकामी डिजीटल फ्रॅंकिंग मशिन खरेदी करणेबाबत...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-११ जावक विभागामार्फत फ्रॅंकींग मशीनद्वारे एका उत्सवासाठी एक लाख सत्याहात्तर हजार भक्तमंडळ सभासदांना उत्सावाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद असे तीनही उत्सवात व दैनंदिन वार्षिक एकूण टपाल अंदाजे दहा लाख बासष्ट हजार मात्र टपाल फ्रॅंकिंग करुन त्याच प्रमाणे दैनंदीन टपालाचे १८०० ते २००० पर्यंत टपाल पाकीटे फ्रॅंकींग करावी लागतात. सदरहू मशिनचा वापर हा पोष्टेज खर्चाकामी येत असून, सन २०११ मध्ये संस्थानचा दैनंदिन पत्रव्यवहार फ्रॅंकिंग करुन पोस्टाव्दारे पाठविणेकामी भारत सरकार डाक विभाग, माहिती तंत्रज्ञान डाक भवन संसद मार्ग, न्युदिल्ली यांचे निर्देशानुसार तसेच अधिक्षक, पोस्ट ऑफीस श्रीरामपुर यांनी उपरोक्त संदर्भिय क्र.०२ चे पत्राने कळविलेनुसार सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-११ जावक कक्षासाठी मे.कोरस इं.लि.पुणे पुरवठादार यांचेमार्फत **निओपोस्ट कंपनी, फ्रांस** या कंपनीचे डिजिटल फ्रॅंकिंग मशिन IJ-90-(N100031) दि.२२ जुलै, २०११ रोजी खरेदी करण्यात आलेले आहे. **फ्रॅंकिंग मशिन लायसेन्स दि. १७/११/२०११ ते १६/११/२०१६ पर्यन्त तसेच दि. १७/११/२०१६ ते १६/११/२०२१ पर्यन्त असा कालावधी आहे.**

सदरहू फ्रॅंकिंग मशिनचा दि.०१ जानेवारी, २०-१२ पासून दैनंदीन व इतर टपालाचे कामकाजासाठी वापर सुरु करण्यात आलेला आहे. यामशिनचा वॉरंटी कालावधी दि.३१ डिसेंबर, २०१२ मध्ये संपुष्टात आल्यानंतर सन २०१३-१७ अखेर या मशिनचा दुरुस्ती देखभाल करार मे. कोरस इं.लि. पुणे यांचेशी करण्यात आलेला होता. त्यानंतर सन २०१८ मध्ये सदर फ्रॅंकिंग मशिनचा देखभाल दुरुस्ती करार थेट कंपनी निवोपोस्ट इंडिया प्रा.लि.गुडगांव यांचेशी करण्यात आलेला होता. निओपोस्ट इंडिया प्रा.लि., गुडगांव यांचा दुरुस्ती देखभालचा कालावधी संपल्यानंतर OST Electronics private ltd, Chandigarh यांचेशी फ्रॅंकिंग मशिनचा सन-२०१९ मध्ये दुरुस्ती देखभाल करार करण्यात आला आहे.

डिजीटल फ्रॅंकिंग मशिन सन-२०१२ पासून संस्थानच्या दैनंदिन पत्रव्यवहार व वार्षिक ०३ उत्सवाचे भक्तमंडळ सभासद यांना उत्सव निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पोष्टाव्दारे पाठविण्यासाठी १० वर्षापासून फ्रॅंकीग मशिनचा वापर होत असून, आजपावेतो ५४,७१,९०३ एवढया संख्येचे पाकीटे फ्रॅंकिंग मशिनमधून फ्रॅंकिंग करुन भक्तमंडळ सभासदांना तसेच जावक विभागाचे दैनंदिन पत्रव्यवहाराद्वारे अंदाजे ३९,२८,९९७ आजपावेता पाकीटे (टपाल) फ्रॅंकिंग करुन भक्तांना पाठविण्यात आले आहे.

डिजीटल फ्रॅंकिंग मशिनचा १० वर्षातील सततच्या वापर विचारात घेता फ्रॅंकिंग मशिन वारंवार नादुरुस्त होत असून, मशिनची देखभाल दुरुस्ती करुनही मशिन पाहिजे त्याप्रमाणे फ्रॅंकिंग करणेकामी स्पीड घेत नाही. तसेच पत्रव्यवहार करणेस विलंब होत असून, मशिन देखभाल दुरुस्ती करणेकामी कंपनीचे इंजिनयर यांना वारंवार बोलवावे लागते.

डिजीटल फ्रँकिंग मशिनचा तपशिल खालीलप्रमाणे:-

अ.नं.	मशिनचा तपशिल	सन २०११ सालातील फ्रँकिंग मशिन खरेदी किंमत	घसारा किंमत (दि.३१/०३/२०२१) अखेर	सन २०११ ते आजपावतो देखभाल दुरुस्तीसाठी झालेला एकूण खर्च	सन २०११ ते आजपावेतो मशिनद्वारे फ्रँकिंग करण्यात आलेल्या पाकीटांची संख्या
०१	IJ-90 Neopost Digital Franking Machine version-1	९,२२,५००/-	६०,६०७.४२	७,१९,१८१/-	९४,००९००

विभागाचा अभिप्राय:

डिजीटल फ्रँकींग मशीन खरेदी करणेकामी पोष्ट ऑफीस कार्यालय, श्रीरामपुर यांना जा.नं.एसएसएस-वशी-११/११८६/२०२१ दि.०८.०७.२०२१ अन्वये फ्रँकिंग मशिनची नावे कळविणेबाबत सांगण्यात आले होते. त्यानुसार पोष्ट ऑफीस कार्यालय, श्रीरामपूर यांनी दि.१९.०७.२०२१ रोजीचे इमेल पत्राव्दारे दि.२६/०७/२०२१ रोजीचे भारत सरकार मान्यता प्राप्त पत्राव्दारे खालील ०३ फ्रँकिंग मशिन कंपन्याची नांवे कळविली आहे.

१) **Pitney Bowes**

२) **Neopost**

३) **Kilburn**

उपरोक्त पैकी Kilburn ही कंपनी Pitney Bowes या कंपनीची सहयोगी कंपनी आहे असे संकेतस्थाळावरुन दिसुन येते.

तसेच आता Neopost कंपनिचे अधिकृत विक्रेते मे. OST Electronics private ltd, Chandigarh यांनी दि. ३० जुलै-२०२१ चे ईमेलपत्राव्दारे Neopost India Private Limited या कंपनिचे नांव (नामांतर) Quadient solutions india private limited Gurgaon असे झालेले असलेबाबत कळविले आहे.

तसेच संकेत स्थळावर Franking Machine बाबत शोध घेतला असता ,Frama Ag (Telepost) ही कंपनी अस्त्विात असुन त्यांनी दि. २०/०७/२०२१ रोजी ईमेल व्दारे माहिती कळविली आहे.

ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या माहितीचा विचार करता , तसेच सध्या सामान्य प्रशासन विभागाकडे असणारे फ्रँकिंग मशिनचा विचार करता अणि संस्थानकडुन कामकाजाचा भार लक्षात घेता, खाली नमुद केलेल्या तांत्रिक बाबींनुसार Technical Specification) Franking Machine खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणे उचित राहिल तसेच ईमेलनुसार प्राप्त झालेल्या दराचा विचार करता व फ्रँकिंग मशिन १ नग खरेदी करीता अंदाजे ८.५० ते ९.५० लाख मात्र खर्च (सर्व करांसह) अपेक्षित आहे. मा. शासनाच्या निर्देशानुसार रु. १०/- लाख मात्रची खरेदी ही सिलबंद दरपत्रके मागवुन करता येईल.

Technical Specification

1 Speed Approx- 12000 to 13000 Per Hour.

2 Weighing platform -10 to 20 kgs.

3-Print Value- 0.0000 to 9999.99

4-Max Article thickness upto 16mm to 19 mm.

5 Ink (Compitable)

प्रस्ताव :-

सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-११ जावक विभागाचे टपालाचे दैनंदीन कामकाजाकरीता बाजारात उपलब्ध असलेल्या कंपन्याकडुन डिजीटल फ्रँकींग मशीन खरेदी करणेकामी दर पत्रके मागविणेस व या कामी रु. १० लाख मात्रचे खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर

permission is granted to put up the subject by circulation before the committee.
14.9.2021

(भाग्यश्री बानायत , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी.

प्रस्ताव वाचला. विषयाची आवश्यकता पाहता चक्रीय पध्दतीने आणणेस मा. अध्यक्ष यांनी मान्यता दिलेली आहे सबब मंजूर

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा .धर्मादाय आयुक्त , अहमदनगर
14/09/2021

प्रस्ताव मंजूर करणेस हरकत नाही

(भानुदास ह. पालवे) 16/9/2021
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त ,नाशिक

(भाग्यश्री बानायत , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी.

proposal is accepted
14.9.2021

(सुधाकर वे. यर्लगड्डा)
अध्यक्ष , तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश अहमदनगर

fes-368

आयत्या वेळेचा | विषय क्र.- ७/७

मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्येसाठी सविनय सादर
सामान्य प्रशासन (वशी - ०५)
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय- श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०२१ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना:-

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ गुरुवार, दि.१४/१०/२०२१ ते रविवार, दि.१७/१०/२०२१ (अश्विन शु ९|| शके १९४३ ते अश्विन शु १२|| शके १९४३) असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे सदरच्या अधिसूचनेचा कालावधी कधीपर्यंत असेल हे आज सांगता येणार नाही.

तरी साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ साजरा करता येईल.

विभागाचा अभिप्राय –

सन-२०२१ मध्ये साजरा करावयाचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

अ.नं.	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
१.	उत्सवाचा उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पाठविणे	अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. तथापि Covid 19 चा प्रादुर्भाव असल्याकारणाने श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव हा साध्या पध्दतीने साजरा करावा लागणार असल्याने, श्री. गुरुपौर्णिमा उत्सवाप्रमाणे भक्तमंडळ सभासदांना फक्त उत्सवाचा प्रसाद पाठविणेबाबत निर्णय घ्यावा लागेल तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज अॅटम) प्रसिध्दीस देण्यात येईल.
	सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी	श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईंचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे. **श्री साईसच्चरित** साईबाबा महासंत	धीर उदार आणि दान्त	यात्रेकरुंसी कृपावंत	पैसे अत्यंत वांटिती||४|| दिडक्या चवल्या हाताचा कीस	अधेल्या-पावल्यांचा पाऊस	रुपये दहा कोणास वीस	कोणास पन्नास ते देत ||५|| हें काय सणासुदा दिसी	कार्यविशेषीं कां पर्वकाळासी	प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं	संतोषेंसीं अर्पीत ||६|| पहूड येती भवय्ये नाचती	गवय्ये गाती भाट वानिती	तमासगीर मुजरे देती	भजनीं रंगती हरिभक्त ||७|| ऐसे महाराज उदारवृत्ती	दानधर्मी सढळ स्थिती	ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति	इच्छा धरिती दर्शनाची ||८|| कधीं आलिया बाबांचे चित्तीं	पांथस्थांतेंही पैसे वांटिती	दीनदुबळयांचा परामर्ष घेती	कृपामुर्ति साईनाथ ||९||

अ.नं.	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
		श्री साईंचे सत्य चरित्र साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत.
		कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये (तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळ्यांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत. थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा–चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वतः सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे. **साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास ह्या उत्सवासाठी, मा. तदर्थ समितीव्दारा श्री रामनवमी उत्सवासाठी निश्चित करण्यात आलेल्या परंतु प्रत्यक्षात त्यांचे कार्यक्रम न झालेल्या कलाकारांना संधी देता येईल व पूर्वी ठरल्याप्रमाणे मानधनही देता येईल. सदरहू कलाकार या उत्सवासाठी उपलब्ध न झाल्यास विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांना संधी देण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही करता येईल. कलाकार कार्यक्रमासाठी त्यावेळेच्या अधिसुचनेस अधिन राहून कार्यक्रमासाठी मोजक्याच प्रेक्षकांना शताब्दी मंडपात प्रवेश देण्याची कार्यवाही संरक्षण विभागामार्फत करण्यात येईल.** **दर्शन सुरु न झाल्यास तीनही दिवसांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार नाहीत.**
०२	सांस्कृतिक कार्यक्रम	**संस्थानमार्फत** **उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येईल. मागील श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात (२०२०) मध्ये Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले नाही. यावर्षी तशी परिस्थिती असल्यास सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येणार नाही.**
	प्रारंभ दिवस, गुरुवार, दि.१४/१०/२०२१ आश्विन शु ९ || शके १९४३	सायंकाळी ७.३० ते रात्री १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.
	मुख्य दिवस शुक्रवार, दि.१५/१०/२०२१ आश्विन शु १०|| शके १९४३	सायंकाळी ७.३० ते रात्री १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. २) साईभक्तासाठी दर्शन सुरु झाल्यास मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल व शासनाचे अधिसुचनेस अधिन राहून कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्री. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यंत (दि.१६/१०/२०२१) इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.
	तिसरा दिवस शनिवार , दि.१६/१०/२०२१ आश्विन शु ११|| शके १९४३	सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.

अ.न	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
	सांगता दिवस सोमवार, दि.१७/१०/२०२१ आश्विन शु.१२ शके १९४३	सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.
०३		**कीर्तन कार्यक्रम**
	गुरुवार, दि.१४/१०/२०२१ (सायं. ४ ते ६) शुक्रवार दि.१५/१०/२०२१ (सकाळी. १० ते १२) शनिवार दि.१६/१०/२०२१ (सकाळी ०४ ते ०६) रविवार, दि.१७/१०/२०२१ (सकाळी. १० ते १२)	**कीर्तन कार्यक्रम** उत्सवाचे तिन्ही दिवसांकरीता कीर्तनकार निश्चित करावयाचा आहे. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल. नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तन कार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल. **Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यास मंदिर विभागाचे कर्मचा-यांमार्फत श्रींच्या समाधी समोर चारही दिवस कीर्तन आयोजित करण्यात येईल.**
०४		**विविध मिरवणूका**
	गुरुवार, दि.१४/१०/२०२१ ते रविवार, दि.१७/१०/२०२१	साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून पोथी-फोटो-वीणा, पालखी, रथ, भिक्षाझोळी,सिमोल्लंघन मिरवणूक प्रथेप्रमाणे करण्यात येतील. उत्सवाचे प्रथम व मुख्य दिवशी सकाळी ५ वा पोथी फोटो-वीणा मिरवणूक निघेल. सकाळी ९ वा.भिक्षाझोळी, सायं. ५ वा. सिमोल्लंघन तसेच उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.१४/१०/२०२१ रोजी श्रींचे पालखीची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल व दुस-या (मुख्य) दिवशी दि.१५.१०.२०२१ रोजी श्रींचे रथाची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल. **पालखी, रथ, भिक्षाझोळी व सिमोल्लंघन मिरवणूकीबाबत परिस्थितीनुरुप स्थानिक शासकीय अधिका-यांची चर्चा करुन निर्णय घेता येईल.**
५	शुक्रवार दि.१५/१०/२०२१	**आराधना विधी** आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर करण्यात येईल. सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live telecast) संस्थानचे फेसबुक लाईव्ह कव्हरेजपेजवर करण्यात येईल त्यामुळे संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल तसेच हे प्रक्षेपण समाधी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीवर करण्यात येईल. समाधी मंदिराचे वास्तुस (बुटी वाडयास) १०० वर्ष झाल्याने गावकरी व इतर साईभक्त यांची वर्दळ पहिल्या मजल्यावर बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत येईल. आराधना विधीकरीता यजमानाची (पतीपत्नी) प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉलमध्ये करणेत येईल, त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश दिला जाणार नाही. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते, तेच भोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाईप्रसादालयाच्या व्ही.आय.पी. च्या दोन हॉलमध्ये ठराविक वेळेत सामाजिक अंतर ठेवून देण्याची व्यवस्था करण्यात येईल. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे सामाजिक अंतर ठेवून देण्यात येईल. **साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाले नाही तरी आराधना विधी हा करावा लागेल मात्र श्री साई प्रसादालयामधील प्रसाद भोजन व्यवस्था संस्थानतर्फे बंद ठेवण्यात येईल.**
६.	अखंड पारायण व्यवस्था	उत्सव काळात गुरुवार, दि.१४/१०/२०२१ रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. मा.तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास उर्वरित राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.१३/१०/२०२१ रोजी नोंदविली जातील. त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. दि.१५/१०/२०२१ रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल.

अ.न	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
		साईभक्तांसाठी दर्शन सुरु न झाल्यास श्री गुरुपौर्णिमा उत्सवाप्रमाणे संस्थानचे अधिकारी व कर्मचा-यांकडून श्री साईसच्चरिताचे पारायण केले जाईल. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात पोथी-वीणा प्रतीमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपुजा या कार्यक्रमांकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे निश्चित करणे आहे. याबाबतची टिपणी मा. तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.
७.	श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा	**साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाले तरी उत्सव काळात गुरुवार, दि.१४/१०/२०२१ते रविवार, दि.१७/१०/२०२१अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा बंद ठेवता येईल (पुजेसाठी बसणा-या साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे शक्य होणार नाही)**
८.	विद्युत रोषणाई	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल.
९.	प्रसाद-भोजन, चहा, कॉफी, दुध, बिस्कीट , लाडु व्यवस्था	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन देण्याची कार्यवाही सामाजिक अंतर ठेवून केली जाईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था सामाजिक अंतर ठेवून केली जाईल. साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. चारही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सामाजिक अंतर ठेवून सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल. सन २०२१ चे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात चारही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. **साईभक्तांसाठी दर्शन सुरु न झाल्यास वरील सर्व सुविधा बंद राहतील.**
१०.	संरक्षण विभाग	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात संरक्षण विभागामार्फत बंदोबस्त ठेवण्यात येईल. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल..
११.	लेखाशाखा (देणगी काऊंटर)	**साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून नेहमीचे प्रथेप्रमाणे देणगी काऊंटर्स सुरु ठेवण्यात येतील.** उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्री ११ वा. पर्यंत करण्यात येईल. **सध्या गेट नं. ४ चे बाहेर साईभक्तांसाठी देणगी काऊंटर चालू करण्यात आलेले आहे. दर्शन सुरु झाले नाही तरी सदरच्या देणगी काऊंटरचा उपयोग साईभक्तांना देणगी देण्यासाठी होऊ शकेल.**
१२.	बांधकाम	उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी मंडप/शामियाने इ.व्यवस्था केली जाईल.
१३.	जादा कंत्राटी कर्मचारी	आवश्यकता भासल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल.
१४.	प्रथमोपचार	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास संस्थानमार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात येईल.

१५	पालखी व्यवस्था	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात, उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. तथापि या वर्षी कोरोनाचा पादुर्भाव असल्याने संरक्षण विभागामार्फत संबंधित पालखी मंडळांना पालखी न आणणेबाबत विनंती करण्यात येईल. तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फतही याकामी प्रेसनोट प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
१६	पाणी पुरवठा	पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल.
१७	फोटो व्हीडीओ शुटींगबाबत	उत्सवाचे कार्यक्रमाचे फोटो व व्हीडीओ शुटींगची क्लीप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रेसला देण्यात येईल
१८	खर्चाचे अंदाजपत्रक	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०२० साठी रु.२२,८०,००० /- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ११,५५,८९६/- मात्र इतका खर्च झालेला आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेस अधिन राहून कार्यवाही करावी लागणार असल्याने मोजक्याच साईभक्तांना मंदिरात प्रवेश दिला जाणार असल्याने पूर्वी सादर केलेल्या अंदाजपत्रकाऐवजी आता नव्याने सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२१ करीता "अ" व "ब" नुसार खर्च मंजुरीसाठी सादर केला आहे.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२० करीता झालेला खर्च व अपेक्षित खर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

श्री पुण्यतिथी उत्सव -२०२१ अंदाजपत्रक

अ.क्र	खर्च तपशिल	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव - २०२०		श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२१ अंदाजे खर्च	
		अंदाजे खर्च	प्रत्यक्ष खर्च	Covid -19 चा प्रादुर्भाव कमी होऊन दर्शन सुरु झाल्यास अ	Covid -19 चा प्रादुर्भाव राहिल्यास दर्शन सुरु न झाल्यास ब
१	मंडप, कमानी, स्टेज, व इतर	३,००,०००	-	१,९८,४५०	-
२	कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत कलाकार) व मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, कलाकार निवास, इतर खर्च	६०,०००	२१,०००	१,००,०००	३१,०००
३	भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह)	--	२०,५३८	८,९१,०००	२५,०००
४	विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च)	९,५०,०००	२५,०००	१०,५०,०००	२५,०००
५	पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था		-	१०,०००	-
६	सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी	-	-	२५,०००	-
७	मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन	-	-	३०००००	-
८	जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन	-	-	५,३८,३१७	-
९	भाडोत्री क्रेन			१०,०००	-
१०	उदीप्रसाद पाकिटे छपाई , उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह)	९,६०,०००	१०,८९,३५८	११,००,०००	११,००,०००
	एकुण रुपये	२२,८०,०००	११,५५,८९६	४२,२२,७६७	११,८१,०००

239

विभागाचा अभिप्राय –

संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ साजरा करणेसाठी व याकामी संस्थानचे विविध विभागांनी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यांत आलेली आहे सदरच्या अधिसूचनेचा कालावधी कधीपर्यंत असेल हे आज सांगता येणार नाही.

तरी साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ साजरा करता येईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव –

तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२१ चे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी खालीलप्रमाणे "अ" व "ब" प्रमाणे नियोजन करता येईल.

<u>अ) Covid -19 चा प्रादुर्भाव कमी होऊन दर्शन सुरु झाल्यास</u> रक्कम रुपये ४२,२२,७६७/- (रुपये बेचाळीस लाख बाविस हजार, सातशे सदुसष्ठ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

<u>ब) Covid -19 चा प्रादुर्भाव राहिल्यास दर्शन सुरु न झाल्यास</u> रक्कम रुपये ११,८१,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख ऐक्याऐंशी हजार) खर्च अपेक्षित आहे.

तरी "अ" व "ब" प्रमाणे येणारे खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर .

Permission is granted for putting the subject by circulation.
14.09.2021

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
8/1/9

प्रस्ताव व त्यावरील टिप्पणी वाचली. टिपणीवरून अ व ब संभाव्य नियोजन नमूद आहे. त्यानुसार जशी परिस्थिती आहे त्यानुरूप ब प्रमाणे मंजूर. परंतु 'अ' प्रमाणे करावयाचे भविष्यात ठरलेस तसा प्रस्ताव (श्रीमती गीता प्रवीण बनकर) पुन्हा सादर करावा.

सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर 14/09/2021

मा. कलेक्टर महोदय यांचेशी सहमत आहे व माझेही वरील अभिप्राय आहे.
(भाऊसाहेब ह. जाधव) 16/9/2021
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

'B' is approved.
If lockdown is withdrawn, the 'A' may be submitted before the committee
14/9/2021
(सुधाकर वें. यलगड्डा)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

आयत्या वेळेचा विषय क्र.- 02

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सामान्य प्रशासन विभाग/श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी

श्री साईबाबा महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक (Ad-Hoc) पदभरतीकामी दि.२७-२८ सप्टेंबर, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या थेट मुलाखतीचा अहवाल

दिनांक : २९ सप्टेंबर, २०२१.
स्थळ : शिर्डी.

मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.ससं/उशि/पुवि/कायम विना अनु. कार्यभार/महावि/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ अन्वये सन २०२०-२१ मधील विद्यार्थी संख्या विचारात घेता, प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाकरिता अनुज्ञेय शिक्षक व शिक्षकेतर पदांना मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार श्री साईबाबा महाविद्यालयाकडे आवश्यक ३५ सहाय्यक प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक पदभरतीकामी (Ad-Hoc) वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, Walk In Interview घेऊन सर्व कार्यवाही करणेस मा. तदर्थ समितीचे सभेत दिनांक १३.०५.२०२१ व दि.१०.०८.२०२१ रोजी चक्रिय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यता मिळालेली आहे.

दि.१०.०८.२०२१ रोजीचे चक्रिय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावानुसार श्री साईबाबा महाविद्यालाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता तात्पुरते प्राध्यापक (Ad-Hoc) भरतीकामी विद्यापीठाचे नियमानुसार स्थानिक निवड समितीचे गठन करण्यात आलेले होते. सदर समितीमध्ये पुढीलप्रमाणे सदस्य होते. १.मा.अध्यक्ष तदर्थ समिती यांचे नामनिर्देशीत म्हणून तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती गीता बनकर २. श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून प्रभारी प्राचार्य श्री.विकास शिवगजे ३. अहमदनगर जिल्हयातील मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयापैकी एका वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य/ सबंधीत विषयाचे विभागप्रमुख ४. अहमदनगर जिल्हयातील मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयांपैकी एका वरिष्ठ महाविद्यालयाचे संबंधीत विषयाचे तज्ञ तसेच सदरील नियमावलीनुसार या समितीचे सचिव म्हणून श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून प्रभारी प्राचार्य श्री.विकास शिवगजे हे काम पाहतील, वरील समिती गठीत करुन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली."

त्यानुसार श्री साईबाबा महाविद्यालयाकडील दि.०७.०९.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/११९८/२०२१ दि.१७.०९.२०२१ रोजीचे पत्रान्वये, सहाय्यक प्राध्यापक (Assistant Professor) , ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक या पदावरील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती कामी Walk in Interview ची जाहिरात दिनांक १८ सप्टेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमानपत्रातुन (दैनिक लोकमत, लोकसत्ता अहमदनगर, दैनिक दिव्यमराठी, दैनिक पुण्यनगरी, नाशिक, दैनिक पुण्यनगरी पुणे, दैनिक सकाळ औरंगाबाद, दनिक प्रहार, मुंबई) व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा महाविद्यालयाकडील दि.०७.०९.२०२१ रोजीचे मंजूर टिपणीनुसार, वार सोमवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ व मंगळवार दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री साईबाबा संस्थानचे साई सभागृह येथे इच्छुक उमेदवारांचे मुलाखतीचे कामकाज सुरु करण्यात आले. या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीच्या कामकाजासाठी मा.तदर्थ समितीने गठीत केलेल्या स्थानिक निवड समितीचे खालील सदस्य हजर होते.

अ.क्र.	उपस्थितांची नांवे	पदनाम
०१.	श्रीमती गिता बनकर	सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती
०२.	प्रा.विकास म.शिवगजे	प्रभारी प्राचार्य
०३.	बाहेरील महाविद्यालयातील सबंधीत विषयांचे विभागप्रमुख	तक्ता अ मधील विषय विभागप्रमुख अ.क्र.१ ते १७
०४.	बाहेरील महाविद्यालयातील सबंधीत विषयांचे विषयतज्ञ	तक्ता अ मधील विषय तज्ञ अ.क्र.१ ते १७

श्री साईबाबा महाविद्यालयाकडील जा.क्र.एसएसएस / श्री साईबाबा महाविद्यालय/२०६९/२०२१ दि.२१ सप्टेंबर, २०२१ अन्वये, इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणे कामी विषयतज्ञ म्हणुन वरिष्ठ व जेष्ठ प्राध्यापकांना नेमणेकामी अनुक्रमे मा.प्राचार्य, रावबहादूर नारायण बोरावके महाविद्यालय, श्रीरामपुर, मा.प्राचार्य, सी.डी.जैन वाणिज्य महाविद्यालय, श्रीरामपुर, मा.प्राचार्य, लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राहुरी, मा.प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राहाता व मा.प्राचार्य, के.जे.सोमैय्या महाविद्यालय, कोपरगांव यांना विनंती करणेत आलेली होती. त्यानुसार संबंधित महाविद्यालयाचे मा.प्राचार्यांनी खाली नमूद केलेप्रमाणे विषयतज्ञ यांची नेमणूक केलेली होती व ते मुलाखती घेणेकामी हजर होते.

पान क्र. २ वर

तक्ता – अ

अ.क्र.	विषय	विषय विभागप्रमुख नावे	विषयतज्ञांचे नावे
०१.	मराठी	डॉ.भोर यु.एल.	डॉ.कदम एस.बी.
०२.	इंग्रजी	डॉ.देवकर सुनिल	डॉ.कासार आर.डी.
०३.	हिंदी	डॉ.दळवी ए.एस.	डॉ.वेताळ ए.एल.
०४.	अर्थशास्त्र	डॉ.पवार एन.सी.	प्रा.भडके व्ही.व्ही.
०५.	इतिहास	डॉ.खिलारी एस.पी.	डॉ.नवथर बी.एस.
०६.	भूगोल	डॉ.चोळके एस.पी.	डॉ.नलगे डी.एम.
०७.	राज्यशास्त्र	प्रा.तोंडे डी.एस.	प्रा.जाधव ए.बी.
०८.	वाणिज्य	डॉ.पुलाटे एस.के.	डॉ.कळमकर आर.पी.
०९.	वनस्पतीशास्त्र	डॉ.सानप आर.आर.	डॉ.जगदाळे पी.ई.
१०.	रसायनशास्त्र	डॉ.जगदाळे ए.एन.	प्रा.अंगारखे बी.एल.
११.	गणित	डॉ.जगताप आर.आर.	डॉ.घोलप पी.एस.
१२.	प्राणीशास्त्र	डॉ.आढाव यु.के.	डॉ.सानप आर.आर.
१३.	भौतिकशास्त्र	डॉ.शेटे एस.टी.	डॉ.भोसले बी.बी.
१४.	इलेक्ट्रॉनिक्स	डॉ.येवले जे.ई.	डॉ.गोसावी आर.एस.
१५.	संगणकशास्त्र	डॉ.शिंदे बी.एस.	प्रा.कुंजीर जी.एम.
१६.	ग्रंथपाल	डॉ.आनंदकर ए.बी.	प्रा.मगर एस.बी.
१७.	शारिरीक शिक्षण संचालक	प्रा.वाळूंज एन.एम.	प्रा.पवार व्ही.एस.

मुलाखतीसाठी प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे, मुलाखतीचे प्रथम दिवशी म्हणजेच दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ८.३० वाजेपासून सकाळी ११.०० वाजेपर्यन्तचे कालावधीत उपरोक्त अ.क्र.०१ ते ०८ विषयांचे पदांसाठी विहित वेळेत उपस्थित असणारे ५६ व वेळेनंतर ४ असे एकुण ६० इच्छुक व पात्र उमेदवारांची नाव नोंदणी व त्यांनी आणलेल्या कागदपत्राची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर इच्छुक उमेदवारांचे नांव, गाव व इतर माहितीसह विहित नमुन्यातील तक्ते तयार करुन, मुलाखती घेणेकामी गठीत केलेल्या स्थानिक निवड समितीकडे सादर करणेत येऊन, दुपारी १२ वाजेपासुन मुलाखतीचे कामकाज सुरु होऊन, ते पूर्ण करणेत आले.

तसेच मुलाखतीचे व्दितीय दिवशी म्हणजेच दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ८.३० वाजेपासून सकाळी ११.०० वाजेपर्यन्तचे कालावधीत उपरोक्त अ.क्र.०९ ते १७ विषयांचे पदांसाठी विहित वेळेत उपस्थित असणारे ४७ व वेळेनंतर ०२ असे एकुण ४९ इच्छुक व पात्र उमेदवारांची नाव नोंदणी व त्यांनी आणलेल्या कागदपत्राची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर इच्छुक उमेदवारांचे नांव, गाव व इतर माहितीसह विहित नमुन्यातील तक्ते तयार करुन, मुलाखती घेणेकामी गठीत केलेल्या स्थानिक निवड समितीकडे सादर करणेत येऊन, दुपारी १२ वाजेपासुन मुलाखतीचे कामकाज सुरु होऊन, ते पूर्ण करणेत आले.

सर्व उमेदवारांकडून त्यांचेवर कोणत्याही पोलीस स्टेशन अथवा न्यायालयात गुन्हा दाखल अथवा प्रलंबित नसलेबाबतचे स्वयंघोषणापत्र घेण्यात आले. मुलाखती घेणेसाठी हजर असलेले स्थानिक निवड समिती सदस्यांनी दिलेल्या गुणांनुसार उच्च ते निम्नतम गुणानुक्रमांनुसार पात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

तक्ता – ब

अ.क्र.	विषयाचे नाव व भरावयाची पदे	प्राधान्य क्रमांक	गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या उमेदवारांची नावे
१.	मराठी - ०२ पद (Marathi – 02 Post)	१.	डॉ.वडीतके सुनिता सकाहरी, मु.पो.ता.राहाता
		२.	औताडे बाबासाहेब गंगाधर, मु.पो.सरला बेट, ता.श्रीरामपूर
		३.	डॉ.लहारे माया नारायण, मु.पो.ता.श्रीरामपूर
		४.	महाजन अमोल सिताराम, मु.पो.ता.शेवगांव
२.	इंग्रजी – ०१ पद (English – 01 Post)	१.	तक्ते शिवनाथ अशोक, मु.पो.अश्वी खुर्द, ता.संगमनेर
		२.	गायकवाड सुनिल गंगाधर, मु.डाऊच बु., पो.मुर्शदपुर, ता.कोपरगांव

पान क्र.३ वर

अ.क्र.	विषयाचे नाव व भरावयाची पदे	प्राधान्य क्रमांक	गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या उमेदवारांची नावे
३.	हिंदी - ०२ पद (Hindi – 02 Post)	१.	भुजाडे बाबासाहेब सखाराम, मु.पो.ता.कोपरगांव
		२.	श्रीमती हरदास सोनाली रामदास, मु.पो.अस्तगांव, ता.राहाता
		३.	डॉ. ठूबे स्वाती सुधाकर,मु.पो.लोणी खु.ता.राहाता
		४.	वाघ जनार्दन नामदेव, मु.पो.लोणी खु., ता.राहाता
४.	अर्थशास्त्र - ०१ पद (Economics – 01 Post)	१.	श्रीमती खांडरे स्वप्नाली रमेश, मु.पो.साकुरी, ता.राहाता
		२.	भवरे विशाल मधुकर, मु.पो.अंबड, ता.किनवड, जि.नांदेड
५.	इतिहास - ०२ पद (History – 02 Post)	१.	डॉ.मेंगाने चंद्रभान वाळूबा, मु.पो.निमगाव (मठ), ता.येवला
		२.	श्रीमती धरम शितल अरविंद, मु.पो.ता.कोपरगांव
		३.	काळे राजेंद्र रामभाऊ, मु.पो.वरुर, ता.शेवगांव
		४.	शितोळे रमेश अंबऋशी, मु.पो.किणी, ता.जि.उस्मानाबाद
६.	भुगोल - ०२ पद (Geography – 02 Post)	१.	कचरे अमोल झुंबर, सावेडी, अहमदनगर
		२.	सोनवणे विजय राजेंद्र, मु.पो.कळस बु., ता.अकोले
		३.	सोनवणे सचिन सुभाष, मु.पो.पिंपळस, ता.राहाता
		४.	वानखेडे संदीप रावसाहेब, मु.पो.जळगांव, ता.राहाता
७.	राज्यशास्त्र -०२ पद (Politics – 02 Post)	१.	डॉ.बोडखे पंचफुला रामराव, मु.पो.किणगांव, ता.अहमदपुर, जि.लातुर
		२.	ढोकणे शिवाजी गोरक्षनाथ, मु.पो.ता.श्रीरामपुर
		३.	वाघ कैलास शरद, मु.पो.धामोरी, ता.कोपरगांव
		४.	श्रीमती गायकवाड नुतन रंगनाथ, मु.पो.ता.शिरुर, जि.पुणे
८.	कॉमर्स - ०३ पदे (Commerce – 03 Post)	१.	डॉ.कोपटे योगिता अरुण, मु.पो.ता.कोपरगांव
		२.	गांडूळे प्रभाकर राजेंद्र, मु.पो.गुहा, ता.राहुरी
		३.	डॉ.औताडे संतोष भिमराज, मु.पो.जळगांव, ता.राहाता
		४.	गायकवाड मिलींद रामदास, मु.पो.घुलेवाडी, ता.संगमनेर

पान क्र.४ वर

अ.क्र.	विषयाचे नाव व भरावयाची पदे	प्राधान्य क्रमांक	गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या उमेदवारांची नावे
९.	वनस्पतीशास्त्र – ०४ पदे (Botany – 04 Post)	१.	पटारे दिपक बाबासाहेब, मु.पो.भोकर, ता.श्रीरामपुर
		२.	गुजांळ नानासाहेब त्रिंबक, मु.पो.निमगांव टेंभी, ता.संगमनेर
		३.	पठाण असिर अहमद अजिज खॉं, मु.पो.लोणी खु. ता.राहाता
		४.	डॉ.भुसारे भूषण प्रमोद, मु.पो.धामोरी, ता.कोपरगांव
		५.	धनवटे राहुल संजय, मु.नपावाडी, पो.पिंपळवाडी, ता.राहाता
		६.	येवते तानाजी प्रभाकर, औरंगाबाद
१०.	रसायनशास्त्र – ०५ पदे (Chemistry – 05 Post)	१.	पानसंबळ श्रेयस संभाजीराव, मु.पो.ता.राहुरी
		२.	पावसे नितीन रावसाहेब, मु.पो.हिवरगांव पावसा, ता.संगमनेर
		३.	मोरे नामदेव रामनाथ, मु.पो.उंबरे, ता.राहुरी
		४.	शेलार प्रदीप सोमनाथ, मु.पो.रुई, ता.राहाता
		५.	हारदे देविदास ज्ञानदेव, मु.पो.तुळापुर, ता.राहुरी
		६.	कुंभार सचिन संजय, मु.पो.शिर्डी, ता.राहाता
		७.	कु.गोर्डे दिपाली संजय, मु.पो.केलवड, ता.राहाता
११.	गणित – ०३ पदे (Mathematics- 03 Post)	१.	बावके विकास भानुदास, मु.पो.साकुरी, ता.राहाता
		२.	मगर गणेश भानुदास, मु.कौठा, पो.चांदा, ता.नेवासा
		३.	हासे प्रशांत ज्ञानेश्वर, मु.म्हाळादेवी, पो.रुंभोडी, ता.अकोले
		४.	कु.पारधी आरती सुधाकर, मु.पो.राहाता,
		५.	कोल्हे अक्षय सुनिल, मु.पो.देर्डे चांदवड, ता.कोपरगांव
१२.	प्राणीशास्त्र -०३ पदे (Zoology – 03 Post)	१.	भांड विकास सुर्यभान, मु.वेल्हाळे, पो.राजापुर, ता.संगमनेर
		२.	शेख मुबीन मोहम्मदसलीम, मु.पो.शिर्डी, ता.राहाता
		३.	-
१३.	पदार्थविज्ञान - ०३ पदे (Physics – 03 Post)	१.	भांड गणेश रामचंद्र, मु.पो.शिलेगांव, ता.राहुरी
		२.	ठोसर सागर संभाजी, शिर्डी, ता.राहाता
		३.	कवडे सुनिल बाळासाहेब, मु.पो.घोसपुरी, ता.जि.अहमदनगर
		४.	कु.जेजुरकर माधुरी राजेंद्र, मु.पो.अस्तगांव, ता.राहाता

पान क्र.५ वर

अ.क्र.	विषयाचे नाव व भरावयाची पदे	प्राधान्य क्रमांक	गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या उमेदवारांची नावे
१४.	इलेक्ट्रॉनिक्स - ०१ पद (Electronics – 01 Post)	१.	कुंढारे मनोज गोटीराम, मु.पो.ता.कोपरगांव
		२.	सय्यद हमीद शरफुद्दीन, दिल्लीगेट, अहमदनगर
		३.	डॉ.वाघडकर योगेश भाऊसाहेब, मु.पो.कोळपेवाडी, ता.कोपरगांव
१५.	संगणकशास्त्र – ०१ पद (Comp. Science- 01 Post)	१.	सदाफळ नानासाहेब भानुदास, मु.पो.ता.राहाता
		२.	गायकवाड महेश शिवाजी, मु.पो.अश्वी बु. ता.संगमनेर
१६.	ग्रंथपाल - ०१ पद (Librarian - 01 Post)	१.	कुलकर्णी अनंत माधव, गणेशनगर, धायरी, पुणे
		२.	शिंदे नवनाथ गोकुळ, मु.पो.बोत्रा, ता.परंडा, जि.उस्मनाबाद
		३.	गडकरी राजश्री बन्सीधर, मु.पो.पुणतांबा, ता.राहाता
१७.	शारिरीक शिक्षण संचालक – ०१ पद (Physical Director - 01 Post)	१.	सातपुते विक्रम दामोदर, मु.पो.सुकेवाडी, ता.संगमनेर
		२.	वाघ सुहास एकनाथ, मु.पो.ता.कोपरगांव
		३.	कचरे परिमल सुरेश, बेगमपुरा, औरंगाबाद

उपरोक्त **तक्ता – ब** मध्ये नमुद केलेल्या **यादीतील गुणानूक्रमांकांनुसार** पात्र उमेदवारांना, श्री साईबाबा महाविद्यालयाकडील **सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक** या पदावर प्राधान्य / निवड क्रमाने खालील अटी-शर्तीस अधिन राहून नेमणूक / नियुक्ती देणेत यावी, असे मत आहे.

०१. सदरची नियुक्ती पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची ०१ वर्षासाठी म्हणजेच चालू शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता (सेवेत हजर दिनांक ते ३१ मे, २०२२ किंवा शैक्षणिक वर्षाचे कामकाज संपेपर्यन्त यापैकी जे आधी होईल तोपर्यंत) राहील, मुदतीनंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०२. सदरची नियुक्ती तात्पुरत्या(Ad-hoc) स्वरुपात एकत्रित मानधन तत्वावर करणेत यावी.

०३. सदरच्या नियुक्ती या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी संख्येनुसार महाविद्यालयाचे मागणीप्रमाणे टप्प्या-टप्प्याने करण्यात याव्यात.

०४. उपरोक्त परिशिष्ठातील अ.क्र.१२ प्राणीशास्त्र या विषयासाठी ०३ सहाय्यक प्राध्यापक पदे भरती करावयाचे आहेत, मात्र मुलाखतीकामी प्रत्यक्ष ०२ उमेदवार हजर असल्याने, त्यांची गुणवत्तेनुसार निवड झाल्याने, तिस-या रिक्त जागेसाठी महाविद्यालयाने आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता घेऊन तासिका तत्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करावी.

०५. या नियुक्तीचे कालावधीत संबंधित सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांना खाली नमूद केलेप्रमाणे मागील वर्षी अदा करणेत आलेप्रमाणे या ही वर्षी एकत्रित मासिक मानधन आदा करणेत यावे. देय्य रक्कमेतून प्रचलित पध्दतीने नियमानुसार शासकीय करांची कपात करणेत यावी.

अ. क्र.	शाखा	एकत्रित मासिक मानधन रुपये
०१	कला (Arts)	रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र)
०२	वाणिज्य (Commerce)	रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र)
०३	विज्ञान (Science)	रुपये २१,०००/- (अक्षरी रुपये एकवीस हजार मात्र)
०४	संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स (Computer Science & Electronics)	रुपये २२,०००/- (अक्षरी रुपये बावीस हजार मात्र)
०५.	ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक (Librarian & Physical Director)	रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र)

पान क्र.६ वर

०६. नियुक्त करणेत येणारे सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांचा तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात एकत्रित मानधन तत्वावरील कार्यभार श्री साईबाबा महाविद्यालय यांचेकडून निश्चित करणेत येऊन, त्यांचे दैनंदिन शैक्षणिक व इतर कामकाजाचे वेळापत्रक तयार करणेत येईल.

०७. संबंधित सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांची मानधन बिले श्री साईबाबा महाविद्यालयामार्फत तयार करुन, विहित पध्दतीने लेखाशाखेमार्फत आदा करणेत येईल तसेच मानधनाची देय्य रक्कम संबंधितांचे बँक खात्यात जमा करणेत येईल.

०८. निवड झालेल्या पात्र उमेदवाराना सेवेत रुजू होणेसाठी दि. -- -- -- -- -- ही अंतिम तारिख देण्यात यावी. सदर तारखेपर्यंत निवड झालेल्या पात्र उमेदवारांनी रुजू होणे अपेक्षित आहे.

०९. उपरोक्त यादीतील निवड करणेत आलेले पात्र उमेदवार अंतिम तारखेपर्यंत हजर झाले नाहीतर, त्यांचा नेमणूक आदेश आपोआप संपुष्टात येईल. त्यानंतर गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या पात्र उमेदवारांना उचीत प्रशासकीय मान्यतेने नेमणूक / नियुक्ती आदेश देणेत येईल. तसेच अपवादात्मक स्थितीत प्रथम पात्र उमेदवार हजर झाले नाहीतर गुणतालिकेतील गुणानूक्रमांनुसार निवड झालेल्या पात्र उमेदवारांना उचित प्रशासकीय मान्यतेने नेमणूक / नियुक्ती आदेश देण्यात यावेत.

१०. नियुक्त होणारे सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांनी महाविद्यालयाचे कार्यस्थळावर / महाविद्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहणेबाबतची अट नियुक्ती पत्रात नमुद करणेत यावी.

११. नियुक्त होणा-या उमेदवारांच्या नेमणुका या तात्पुरत्या स्वरुपातील (Ad-Hoc) असल्याने त्यांना शासकीय व शिक्षण खात्याचे कोणतेही वेतन व वेतनेत्तर लाभाचे नियम व अटी लागू होणार नाहीत अगर संस्थानमधील नियमित नियुक्तीनंतर मिळणा-या सेवा-सुविधा अगर फायदे देय्य होणार नाही.

१२. नियुक्त झालेल्या उमेदवारांकडून नियुक्तीचे / सेवेच्या कालावधीत कोणतीही गैरवर्तणूक घडल्यास अथवा आपले काम असमाधानकारक आढळून आल्यास कोणत्याही क्षणी त्यांची नियुक्ती रद्द करणेत येईल अथवा कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची सेवा विनानोटीस संपुष्टात आणली जाईल.

१३. नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारांकडून विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात यावी. त्यांना हमीपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास अथवा नियुक्ती करणेत आलेल्या / हजर झालेल्या उमेदवारांना सेवा सोडून जावयाची असल्यास त्यांना एक महिना पूर्वनोटीस द्यावी लागेल किंवा एक महिन्याचे वेतन नोटीस पे म्हणून संस्थानकडे जमा करण्याची अट नियुक्ती पत्रात नमुद करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता असावी, असे प्रस्तावित करणेत येत आहे.

29.9.2021
(विकास शिवगजे)
प्रभारी प्राचार्य,
श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी

29/09/2021
(श्रीमती गिता बनकर)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
तथा सदस्य तदर्थ समिती